

महाराष्ट्रातील निवडक संस्थानांमधील स्थापत्य, प्रशासन आणि सांस्कृतिक स्थित्यंतरांचा अभ्यास

साहित्य आणि ललित कला अभ्यास मंडळाअंतर्गत
भारतीयविद्या विषयातील विद्यावाचस्पती (पीएच. डी.)
साठी सादर केलेला प्रबंध

अभ्यासक
नंदकिशोर रमाकांत एकबोटे

मार्गदर्शक
डॉ. मंजिरी भालेराव

श्री. बालमुकुंद लोहिया संस्कृत व भारतीय विद्या अध्ययन केंद्र
टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे

जून २०१७

प्रतिज्ञापत्र

मी श्री. नंढकिशोर रमाकांत एकबोटे निवेढन करतो की, भारतीयविद्या अध्ययन केंद्रांतर्गत टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे येथे विद्यावाचस्पती (पीएच.डी.) साठी "महाराष्ट्रातील निवडक संस्थानांमधील स्थापत्य, प्रशासन आणि सांस्कृतिक स्थित्यंतरांचा अभ्यास" या विषयावर मी साढर केलेला शोधनिबंध हा माझ्याच अध्यापनाचा परिपाक आहे. हा शोधनिबंध मी संपूर्ण स्वतंत्रपणे लिहिला आहे. हे मी प्रतिज्ञापूर्वक नमूढ करतो.

ढिनांक :- संशोधक

संशोधन केंद्र :- श्री. बालमुकुंढ लोहिया संस्कृत व
भारतीयविद्या अध्ययन केंद्र
टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे श्री. नंढकिशोर रमाकांत एकबोटे

प्रमाणपत्र

प्रमाणित करण्यात येते की, श्री. नंढकिशोर रमाकांत एकबोटे यांनी भारतीयविद्या अध्ययन केंद्रांतर्गत टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे येथे विद्यावाचस्पती (पीएच.डी.)साठी

" महाराष्ट्रातील निवडक संस्थानांमधील स्थापत्य, प्रशासन आणि सांस्कृतिक स्थित्यंतरांचा अभ्यास"

या विषयांतर्गत प्रबंध माझ्या मार्गदर्शनाखाली पूर्ण केला आहे. त्यांचे हे संशोधन स्वतंत्र व नवे असून त्यात ज्या लेखांचा, ग्रंथांचा उल्लेख केला आहे, त्यांची संदर्भ म्हणून नोंद केली आहे.

ढिनांक :-

संशोधन केंद्र :- श्री. बालमुकुंद लोहिया संस्कृत व
भारतीयविद्या अध्ययन केंद्र
टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे

डॉ. मंजिरी भालेराव

ऋणनिर्देश

आपली भारतीय संस्कृती अनेक पैलूंनी समृध्द आहे. या संस्कृतीमध्ये विविध प्रकारच्या जीवनधारा अखंडपणे कार्य करीत आहेत. ग्रंथाची निर्मिती हा अत्यंत मूलभूत असा एक विचार आहे. लोकांना माहिती देण्याकरिता अशा स्वरूपाच्या अनेक ग्रंथांची निर्मिती हजारो वर्षे चालू आहे. कुठल्याही ग्रंथाची निर्मिती ही कला, विद्या, खेळ, व्यापार, उद्योग, सेवा यामध्ये ज्ञान प्राप्त करण्याकरता व त्यांचा हेतू साध्य करण्याकरीता असते. अनेक लोकांची मदत, मार्गदर्शन प्रत्यक्ष सहभाग लागतो. जगाच्या या अथांग ज्ञानसागरामध्ये एक कण एवढीच भर घालण्याचे कार्य आपण निश्चित करू शकतो. त्यामुळेच या कणभर ग्रंथाची निर्मिती करण्याची मला ज्यांनी प्रेरणा दिली, ज्यांनी सहकार्य केले, अशा अनेक श्रध्दास्थानांचा ऋणनिर्देश करणे महत्त्वाचे आहे. प्रथम माझे आराध्य दैवत बुध्दीची देवता भगवान श्रीगणेश यांचे मनोमन स्मरण करतो. त्याचप्रमाणे कुलस्वामिनी बदामी, बनशंकरी माता व तिरूपती तिरूमलय श्रीव्यंकटेश या माझ्या अराध्य दैवतांचे स्मरण करून व या महाराष्ट्राच्या सांस्कृतिक जडणघडणीत भर घालण्याचा ब्रह्मचैतन्य गोंदावलेकर महाराज, गोंदवले याठिकाणी मी पीएच. डी. ग्रंथ लिहिण्याचा संकल्प केला. त्या सर्वांच्या मी ऋणात आहे. महाराष्ट्रामध्ये ज्यांनी स्वराज्य व्यवस्था उभी केली, ते स्वराज्य संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांना प्रणाम करतो.

लहानपणापासून माझ्या शिक्षणाकरीता ज्यांनी स्वतः सायकलवरून व्यवसाय केला, कष्ट केले ते माझे वडील कै. रमाकांत मनोहर एकबोटे व आई शशिकला रमाकांत एकबोटे यांच्या ऋणात मी आजन्म आहे. प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीचे कार्याध्यक्ष प्रा. डॉ. गजानन रमाकांत एकबोटे यांनी मला प्रोत्साहन दिले.

प्रत्यक्ष हा ग्रंथ लिहिण्याकरीता माझ्या मार्गदर्शिका डॉ. मंजिरी भालेराव व टिळक महाराष्ट्र विद्यापीठात पीएच. डी. प्रवेशापासून ते मार्गदर्शक मिळेपर्यंत ज्यांनी सातत्याने उत्साह दिला, प्रेरणा दिली, असे विभाग प्रमुख आदरणीय डॉ. श्रीपाद भट सर यांच्या मी ऋणात आहे. त्याचप्रमाणे डॉ.सदाशिव शिवदे, एन. सी. एल. मधील मा. डॉ. श्री. विजयराव कुलकर्णी यांनी सातत्याने चौकशी करून माझा उत्साह वाढविला व मार्गदर्शन केले. माझ्या ग्रंथाच्या या संदर्भासाठी काही ग्रंथ वाचण्यास दिले व काही लोकांच्या भेटी घेण्यास उत्तेजन दिले. पीएच. डी. संशोधनाच्या अभ्यास प्रक्रियेत तो कसा करावा याकरिता मार्गदर्शन करणारे डॉ. श्रीनंद बापट, डॉ.अंबरीष खरे व डॉ. शरद हेबाळकर यांनी योग्य वेळी योग्य मार्गदर्शन केले. प्रा. सौ.ज्योत्स्ना एकबोटे, प्रा. शामकांत देशमुख, प्राचार्य डॉ. राजेंद्र झुंजारराव सर यांनी वेळोवेळी मदत केली. या ग्रंथात ऐतिहासिक स्वरूपाचे संदर्भ असल्यामुळे

त्यासंदर्भात श्री. गजाभाऊ मेहेंदळे, कै. निनादजी बेडेकर, श्री. पांडुरंग बलकवडे, श्री. महेशजी तेंडूलकर, श्री. मंदार लवाटे, सौ. अनुराधा कुलकर्णी, श्री. मिलींदभाऊ एकबोटे यांनी प्रोत्साहन दिले.

हा ग्रंथ लिहित असताना या अंतीम टप्प्यापर्यंत अनेक हितचिंतकांनी प्रत्यक्ष शारिरीक कष्ट माझ्यासाठी सहन करून पुस्तके उपलब्ध करून दिली. ग्रंथालयात जाऊन माझ्या विनंतीला मान देऊन मला संदर्भ ग्रंथ आणून दिले, त्यामध्ये मॉडर्न महाविद्यालय, शिवाजीनगर, पुणे ५ येथील ग्रंथपाल सौ. माधुरी दात्रे, श्री. शंकरराव हजारे, श्री. अनिल काकड, सुखदा पानसरे, सौ. सारीका साबळे, माधुरी कळवनकर यांनी प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीच्या ग्रंथालयातून संदर्भ ग्रंथ देण्याकरिता मदत केली. एखादा संदर्भ ग्रंथ जर सापडत नसेल तर तो ग्रंथ पुण्यातून किंवा पुण्याबाहेर उपलब्ध करून देण्याकरीता माझ्याकरिता कष्ट घेणारे सहाय्यक ग्रंथपाल श्री. शंकरराव हजारे व श्री. अमित साळुंके यांच्या मी ऋणात आहे. श्री. रविंद्र भोसले यांनी वेळोवेळी पुण्याबाहेरील ग्रंथ मिळविण्यासाठी मदत केली. मॉडर्न कॉलेज, शिवाजीनगर, पुणे ५ येथील ग्रंथालयामध्ये काम करणारे श्री. संकेत मुळे यांनी कॉम्प्युटर एडीटींगला मोलाची व महत्त्वाची मदत केली. गणेशखिंड मॉडर्न महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. संजय खरात व ग्रंथपाल सौ. संगिता ढमढेरे यांनी सातारा व कोल्हापूर येथील ग्रंथ उपलब्ध करून देण्यास मदत केली. या ग्रंथामध्ये संस्थानिकांच्या राजवाड्यांचे नकाशे उपलब्ध करून देण्याकरीता सिंहगड इन्स्टिट्युटच्या प्राध्यापिका स्थापत्य विशारद वैशाली लाटकर मॅडम, तसेच फलटण संस्थानाच्या राजवाड्याचे केअरटेकर श्री. जाधव व स्वतः रघुनाथराजे निंबाळकर यांनी मोलाची मदत केली. त्याचप्रमाणे साताऱ्याचे बांधकाम खात्याचे एक्झिक्युटीव्ह इंजिनिअर श्री. अनिल कुलकर्णी व श्री. माळी तसेच स्वतः श्री. उदयनराजे भोसले यांनी राजवाड्यासंदर्भात माहिती देण्यास मदत केली. त्याचप्रमाणे भोर संस्थानचे पंतसचिव घराण्यातील श्री. राजे पंतसचिव यांनी परदेशातून फोन करून ग्रंथपालांना (गंगूताई पंतसचिव ग्रंथालय) भोर संस्थानचे मूळ ग्रंथ उपलब्ध करून देण्यास मदत केली. सध्याच्या भोर संस्थानच्या राजवाड्याचे केअर टेकर श्री. शेटे सर यांचाही मी अत्यंत आभारी आहे. नागपूर येथील श्री. अंबरिष घटाटे व इतिहासकार श्री. श्रीपाद केशव चितळे यांनी नागपूर संस्थानच्या सध्याच्या राजवाड्यासंदर्भात ग्रंथ उपलब्ध करून दिले. त्यांनाही मी मनापासून धन्यवाद देतो. औंध संस्थानच्या पंतप्रतिनिधी घराण्यातील श्री. उदय प्रतिनिधी, डॉ. अनिरूध्द प्रतिनिधी, स्थापत्यविशारद श्री. ऋषिकेश प्रतिनिधी यांनी पुस्तके व माहिती उपलब्ध करून दिली. त्यांचाही मी आभारी आहे. त्याचप्रमाणे स्थापत्यविशारद श्री. अविनाश सोवनी, मॉडर्न पी. ई.एस. गर्ल्स हायस्कूल येथील शिक्षिका सौ. उज्ज्वला हातागळे यांनी मला अनेक ग्रंथ उपलब्ध करून दिले. त्याचप्रमाणे माझे हितचिंतक ॲड्. नितीन आपटे, ॲड्. सौरभ देशपांडे यांनी वेळोवेळी संस्थानिकांच्या संदर्भात असलेली माहितीपर

पुस्तके किंवा संदर्भ ग्रंथ उपलब्ध करून दिले. श्रीक्षेत्र गोंदावले येथील मा. प्रा. श्री. शामराव पाटील यांनी फलटण संस्थानच्या संदर्भात ग्रंथ उपलब्ध करून दिले. त्याचाही मी ऋणी आहे.माझी बहिण सौ. निलिमाचे पती श्री. अभयराव खिरे यांनी मुंबई येथे भरलेल्या प्रदर्शनात उपलब्ध असलेली संस्थानिकांच्या संदर्भातील पुस्तके उपलब्ध करून दिली. मॉडर्न कॉलेज, शिवाजीनगर, पुणे ५ येथील प्रा. श्री. सुधीर उजळंबकर सर, सौ. मोनिका वैद्य, अकौन्टंट श्री. विलास लाड, लेखनिक श्री. प्रकाश साबळे यांनी ग्रंथालयात पुस्तके शोधून देण्यास मोलाची मदत केली. प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीच्या मध्यवर्ती कार्यालयात काम करणारे श्री. राजन देवकते व श्री. राजू जाधव यांनी माझ्यासाठी वेळोवेळी धावपळ केली. त्यांचाही मी आभारी आहे. मॉडर्न हायस्कूलच्या मुलांचे वसतिगृह येथील ॲड्. बाबासाहेब चव्हाण, रेक्टर श्री. आदिनाथ कुटे, श्री. विवेक कुलकर्णी, श्री. आर. एस. बारगजे यांनी वेळोवेळी लिखाण कामाकरिता जागा उपलब्ध करून दिली, या प्रबंधाकरिता ठिकठिकाणी संस्थानांमध्ये जाण्याकरिता गाडीचे चालक श्री. शेखर शिंदे, श्री. उमेश वानखडे, श्री. विशाल शिंदे, श्री. सिताराम सोनपसारे यांनी वेळी अवेळी ड्रायव्हिंग केले, त्यांचाही मी आभारी आहे.

मॉडर्न अभियांत्रिकी महाविद्यालयाचे ग्रंथपाल सौ. अश्विनी फरांदे यांनी अनेक पुस्तकांचे संदर्भ दिले. मॉडर्न महाविद्यालय, शिवाजीनगर, पुणे ५ येथील इंग्रज विभागाच्या प्रमुख प्रा. सौ. अलका कांबळे यांनी काही महत्त्वाच्या मराठी मसुद्याचे इंग्रजीकरण करून दिले. त्याचप्रमाणे याच विद्यालयाचे कॉमर्स विभागातील श्री. अशोक कांबळे यांनी काही ग्रंथ उपलब्ध करून दिले. मराठी विभाग प्रमुख प्रा. डॉ. सौ. स्नेहल तावरे यांनी या प्रबंधाचे वाचन करण्याकरिता काही ग्रंथ सुचविले व याच विभागात काम करणारे श्री. गजानन अपिने यांनी काही मराठी ग्रंथ उपलब्ध करून दिले.

हा प्रबंध लिहिण्याकरिता श्रीज्ञानेश्वर महाराज संस्थान, आळंदी जगत्गुरू तुकाराम महाराज संस्थान देहू तसेच प्रज्ञाचक्षु गुलाबराव महाराज ग्रंथालय, माधान, अमरावती आणि मोरया गोसावी संस्थान, चिंचवड यांच्या विश्वस्तांनी अनेक ग्रंथ उपलब्ध करून दिले. त्यांचाही मी आभारी आहे. या ऋणनिर्देशामध्ये काही व्यक्तींचा उल्लेख माझ्याकडून राहून गेला असेल त्यांची मी क्षमा मागतो व अशा सर्व अज्ञात व्यक्तींचा मी आभारी आहे.

हा शोधनिबंध पूर्णत्वास नेण्याकरीता माझे लिखाण कॉप्युटरवर टाईप करण्याचे अत्यंत अवघड व महत्त्वाचे काम ज्यांनी केले त्या सौ. स्मिता कुलकर्णी यांचाही मी अत्यंत आभारी आहे. माझे स्नेही श्री. मंगेश नलावडे यांनी या ग्रंथालयातील सर्व फोटोग्राफर्स एडिट करून मला मोलाचे सहकार्य केले आहे.

माझ्या या पीएच. डी. ग्रंथाच्या शोधनिबंधाच्या लिखाण कामात अनेक अडचणी आल्या त्या सगळ्यावर मात करून प्रत्यक्ष लिखाण करण्याकरिता माझी पत्नी सौ. समृध्दी हिने महत्त्वाची मदत केली. माझी पुतणी डॉ. निवेदिता आणि डॉ. गायत्री तसेच माझा पुतण्या डॉ. दिग्विजय यांनी मला वेळोवेळी उत्साह दिला. माझ्या कन्या डॉ. वैष्णवी आणि ऋवेदी यांनी या काळात माझ्या आहाराकडे विशेष लक्ष दिले. टिळक महाराष्ट्र विद्यापीठातील या संशोधन ग्रंथाच्या प्रक्रियेत मदत करण्यासाठी संबंधित प्राध्यापक वर्ग, पीएच. डी. विभागाच्या ऑफिसमधील सर्व स्टाफ व इतर सर्व सेवक वर्ग या सर्वांनी मला वेळोवेळी मदत केली. या सर्वांचा मी आभारी आहे.

ही संशोधन प्रक्रिया पूर्ण होण्याकरीता केसरी मराठा संस्थेचे, मराठा संशोधन पत्रिकेचे संपादक मंडळ तसेच प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीचे 'ज्ञानमय' रिसर्च जनरलचे संपादक मंडळ (आयएसएसएन २३९७-७४८४) यांचेपण मी मनापासून आभार मानतो. भांडारकर प्राच्य विद्या संशोधन मंदिर संस्था, भारत पुणे येथील श्री. डॉ. बहुलकर, ग्रंथपाल श्री. सागळे यांनी याकरिता शुभेच्छा देऊन मार्गदर्शन केले त्याचप्रमाणे भारत इतिहास संशोधन मंडळ, पुणे ३० येथील ग्रंथपाल जयश्री बागाईतकर यांनी वेळोवेळी संदर्भ ग्रंथ देण्यास परिश्रम घेतले.

लोकमान्य टिळकांच्या दूरदृष्टीमुळे त्यांच्या पुढच्या पिढीकडून टिळक महाराष्ट्र विद्यापीठ निर्माण झाले, टिळक महाराष्ट्र विद्यापीठाचे कुलगुरू मा. डॉ. दिपकजी टिळक यांचाही मी आभारी आहे. टिळक महाराष्ट्र विद्यापीठाच्या संचालक मंडळांतर्गत श्री. बालमुकुंद लोहिया संस्कृत व भारतीयविद्या अध्ययन केंद्र यांच्या दूरदृष्टीमुळेच विद्यापीठात हा प्रबंध लिहिण्याची संधी मला मिळाली आहे.

धन्यवाद !

ऋणी : नंदकिशोर रमाकांत एकबोटे

अनुक्रमणिका

क्रमांक	तपशिल	पृष्ठ क्रमांक
१.	मुखपृष्ठ	एक
२	प्रतिज्ञापत्र	दोन
३	मार्गदर्शकाचे प्रमाणपत्र	तीन
४	ऋणनिर्देश	चार
५	अनुक्रमणिका	आठ
६	संक्षिप्त नाम सूची	नऊ
७	चित्र सूची	दहा ते अठरा
प्रस्तावना :-	संशोधन विषय निवडीचा उद्देश	१-६
प्रकरण १ :	महाराष्ट्राचा प्राचीन इतिहास	७- २६
प्रकरण २ :	महाराष्ट्रातील निवडक संस्थानांच्या निर्मितीचा इतिहास	२७-३१
प्रकरण ३:	सातारा संस्थान	४०-११३
प्रकरण ४ :	भोर संस्थान	११४-१८४
प्रकरण ५ :	औंध संस्थान	१८५-२३२
प्रकरण ६ :	फलटण संस्थान	२३३-२८२
प्रकरण ७ :	नागपूर संस्थान	२८३-३२२
प्रकरण ८ :	सातारा संस्थानचे छत्रपती शाहू महाराज यांच्या नंतरची प्रशासकीय कार्ययंत्रणा व त्यामध्ये झालेली प्रशासकीय स्थित्यंतरे	३२३-३३७
प्रकरण ९ :	संस्थानांच्या कारभारात झालेली सांस्कृतिक व स्थापत्य विषयक स्थित्यंतरे (इ. स. १८१८ ते इ. स. १९४७)	३३८-३६१
•	प्रबंधाचा एकत्रीत उपसंहार	३६२-३६९
•	संदर्भग्रंथ सूची	३७०-३७३
•	परिशिष्ट	३७४-३८७

संक्षिप्त नाम सूची *(Abbreviation)*

1. *BCL: British Council's Library*
2. *BISM: Bhart Itihas Sanshodhak Mandal*
3. *BKPND: Bharatiya Kala Prakashan New Delhi*
4. *BORI: Bhandarkar Oriental Research Institute*
5. *CSMMS: Chatrapati Shivji maharaj Museum Satara*
6. *CSMK: Chatrapati Shahu Museum Kolhapur*
7. *DCPRI: Deccan College Post-Graduate and Research Institute*
8. *DYPCOEK: D. Y. Patil college of Engineering and, Kolhapur*
9. *MARG: Modern Architectural Research Group*
10. *RKM: Raja Kelakar Museum*
11. *SCOA: Sinhagad College Of Architecture*
12. *SSGPV: Shrimanta Sau Gangubai Pantasachiv Vachanalay*
13. *SVG: Shaskiya Vibhagiya Granthalay*

चित्र सूची

चित्र क्रमांक	तपशिल	पृष्ठ क्रमांक
प्रकरण २ :–	**महाराष्ट्राच्या राजकीय संस्थानिकांच्या निर्मितीचा इतिहास**	
२.१	महाराष्ट्रातील निवडक संस्थानांचे महाराष्ट्राच्या भौगोलिक नकाशावर असणारे स्थान (*संदर्भ- Dastane, Maharashtra)*	३१
प्रकरण : ३ :–	**सातारा संस्थान**	
३.१	मूळ आज्ञापत्राचे पहिले पान *(संदर्भ-कुलकर्णी अ. रा., आज्ञापत्र २००७, डायमंड पब्लीकेशन, पुणे, पृष्ठ क्र. ८४ ते ८७)*	४१
३.२	छत्रपती शिवाजी महाराज *(संदर्भ-बेंद्रे वा. सी., १९६७, मुंबई, मालोजीराजे व शहाजी महाराज यांची विचिकित्सक चरित्रे)*	६४
३.३	छत्रपती संभाजी महाराज *(संदर्भ- Maharaja Sambhajiraje. Maratha, late 17th century. Opaque pigments and gold on paper, 146 by 220mm (including border). BL Add.21475, f. 1)Ref:BCL*	६७
३.४	राजाराम महाराज *(संदर्भ-Chatrapati Rajaram Maharaj , Ref : Chatrapati Shahaji Museum, New Palace Kolhapur)*	६७
३.५	छत्रपती शाहू महाराज *(संदर्भ-CSMK)*	६९
३.६	छत्रपती प्रतापसिंह महाराज *(संदर्भ-CSMMS)*	७२
३.७	साताऱ्याच्या राजवाड्यातील नक्षीकाम *(संदर्भ-SVG)*	१०५
३.८	साताऱ्याच्या राजवाड्याच्या दर्शनी भागाचा नकाशा *(संदर्भ-Maratha Manors, Khare G. H. पृष्ठ क्र. १०८, १०९ मार्ग पब्लीकेशन Saryu Doshi)*	११०

३.९	सातारा राजवाड्याचा पहिल्या मजल्यावरील स्थापत्याचा नकाशा *(संदर्भ-Maratha Manors, Khare G. H. पृष्ठ क्र. १०८, १०९ मार्ग पब्लीकेशन Saryu Doshi)*	१११
३.१०	मराठा शैलीतील स्थापत्यशास्त्रामध्ये राज्याचा खजिना सुरक्षित ठेवण्याकरिता केलेली स्थापत्यविषयक रचना *(संदर्भ-Maratha Manors, Khare G. H. पृष्ठ क्र.१०९ ,मार्ग पब्लीकेशन Saryu Doshi)*	११२
३.११	सातारा राजवाड्यातील सदरेच्या पुढील भागाचे चित्र	११३
३.१२	सातारा राजवाड्यातील तुळयांचा उपयोग	११३
प्रकरण : ४ :-	**भोर संस्थान**	
४.१	भोर संस्थान भौगोलिक नकाशा *(संदर्भ- BORI)*	*११९*
४.२	भोर संस्थानचे राजचिन्ह *(संदर्भ- भागवत अ. ना., १९०३, भोर संस्थानचा इतिहास, खंड क्र. १, ज्ञान प्रकाशन छापखाना, भोर*	*१२५*
४.३	षष्ठ्याब्दी पूर्तीच्या वेळी घेण्यात आलेला राजकुटुंबातील मंडळींचा फोटो *(संदर्भ- Shrimanta Sau Gangubai Pantasachiv Vachanalay)*	१३६
४.४	राजा श्रीमंत रघुनाथराव बाबासाहेब पंडित पंतसचिव *(संदर्भ- SSGPV)*	१३६
४.५	भोर संस्थानाने चालू केलेली पहिली मुलींची शाळेची ढगडी इमारत *(संदर्भ- SSGPV)*	१६२
४.६	भोर संस्थानाचे राजचिन्ह (श्रीमंत रघुनाथराव पंतसचिव मोनोग्राम) *(संदर्भ- SSGPV)*	१६२
४.७	रामनवमीचा उत्सव	१६३
४.८	भोर येथील राजवाडा *(संदर्भ- SSGPV)*	१६३
४.९	श्रीमंत सौ. गंगूबाई साहेब पंतसचिव वाचनालयाची इमारत (ग्रंथालय)	१६४

४.१०	राजवाड्याच्या वास्तुरचनेत झालेला बदल	१६४
४.११	राजवाड्याचा मुख्य दरवाजा – प्रवेशद्वार	१६७
४.१२	दिंडी दरवाजा	१६६
४.१३	तळखडा एक संशोधन	१६६
४.१४	भोर संस्थानच्या राजवाड्याचा जमिनीपासून २.३ मीटरच्या पातळीवर छेद घेऊन काढलेला तळमजल्याचा नकाशा *(संदर्भ- Sinhagad College Of Architecture, Telang M.V, Latkar Vaishali, Chitnis Sonal)*	१६७
४.१५	भोर संस्थानच्या राजवाड्याचा जमिनीपासून ५.६ मीटरच्या पातळीवर छेद घेऊन काढलेला नकाशा *(संदर्भ- SCOA, Telang M.V, Latkar Vaishali, Chitnis Sonal)*	१६८
४.१६	भोर संस्थानच्या राजवाड्याचा दुसऱ्या मजल्याचा व छताचा नकाशा जमिनीपासून ८.६ मीटरवर छेद घेऊन काढलेला नकाशा *(संदर्भ- SCOA, Telang M.V, Latkar Vaishali, Chitnis Sonal)*	१६९
४.१७	भोर संस्थानच्या राजवाड्याच्या तिसऱ्या मजल्याचा व छताचा नकाशा जमिनीपासून ११.६ मीटरच्या पातळीवर छेद घेऊन काढलेला नकाशा *(संदर्भ- SCOA, Telang M.V, Latkar Vaishali, Chitnis Sonal)*	१७०
४.१८	भोर राजवाड्याचा उत्तरेकडून दिसणारे व राजवाड्याचा जमिनीपासून ते छतापर्यंत उभा छेद घेतल्यावर राजवाड्याची रचना दर्शविणारा नकाशा. *(संदर्भ- SCOA, Telang M.V, Latkar Vaishali, Chitnis Sonal)*	१७१
४.१९	भोर संस्थानातील राजवाड्याच्या पहिल्या चौकातील गोलाकार पायऱ्या असलेल्या चौकाचा नकाशा *(संदर्भ- SCOA, Telang M.V, Latkar Vaishali, Chitnis Sonal)*	१७२

४.२०	भोर संस्थानच्या राजवाड्याचा जमिनीपासून ते वरच्या मजल्यापर्यंतचा पूर्वेकडून पश्चिमेकडे असा संपूर्ण आडवा, उभा छेद घेऊन काढलेला नकाशा. *(संदर्भ- SCOA, Telang M.V, Latkar Vaishali, Chitnis Sonal)*	१७३
४.२१	भोर संस्थानच्या राजवाड्याचा जमिनीपासून ते वरच्या मजल्यापर्यंतचा दक्षिणेतून उत्तरेकडे असा संपूर्ण आडवा, उभा छेद घेऊन नकाशा काढला आहे. *(संदर्भ- SCOA, Telang M.V, Latkar Vaishali, Chitnis Sonal)*	१७४
४.२२	भोरच्या राजवाड्यातील सर्वांत शेवटच्या चौकातील जमिनीपासून छतापर्यंत घेतलेल्या छेदाचा नकाशा *(संदर्भ- SCOA, Telang M.V, Latkar Vaishali, Chitnis Sonal)*	१७५
४.२३	भोर राजवाड्याचे जमिनीपासून १४.६ मीटरच्या स्तरावरून दिसणारा छताचा नकाशा *(संदर्भ- SCOA, Telang M.V, Latkar Vaishali, Chitnis Sonal)*	१७६
४.२४	भोर संस्थानच्या राजवाड्यामध्ये लाकडाचे स्तंभ, कमानी, हस्त छज्जा, दोन स्तंभामध्ये लाकडात केलेली जाळी, दरवाजे, भिंतीतील कोनाडे यांचे मापासहित काढलेले चित्र *(संदर्भ- वाय. जी. कालेकर यांनी हे चित्र काढले आहे.) SVG*	१७७
४.२५	भोरच्या राजवाड्याचे मुख्य प्रवेशद्वाराच्या दरवाज्याचे मापानुसार बारकाईने काढलेले चित्र, *(संदर्भ- वाय. जी. कालेकर यांनी हे चित्र काढले आहे.) SVG*	१७८
४.२६	भोर राजवाड्यातील बंदीगृह	१७९
४.२७	मुख्य प्रवेशद्वारापासून आत गेल्यावर पहिल्या चौकातून दुसऱ्या चौकात जाण्याचा मार्ग	१८०
४.२८	भोर राजवाड्यातील तुळशीवृंदावनाचा चौक	१८१
४.२९	भोर राजवाड्यातील तीर-वाड्याच्या स्थापत्यामध्ये मुख्य चौकाच्या चारी बाजूंनी छज्जा	१८२
	सहस्य भाग	

४.३०	भोर भाटघर पाण्याचे धरण	१८३
४.३१	भोर राजवाडा - गणेशपट्टी	१८३
४.३२	ढगडाच्या खांबावर काढलेले कोरीव नक्षीकाम	१८४
प्रकरण : ५ :-	**औंध संस्थान**	
५.१	औंधचे राजे भवानराव ऊर्फ बाळासाहेब पंत *(संदर्भ- भागवत अ. ना. व आठले कृष्णाजी नारायण, १९१५, साताऱ्याच्या प्रतिनिधी घराण्याचा इतिहास , ग्रंथ क्र. १, प्रकाशन औंध संस्थानचे छापखान्यात, औंध)*	२००
५.२	महाराष्ट्रातील मराठाकालीन संस्थानांमधील राजवाड्याच्या अंतर्गत लाकडाच्या व ढगडाच्या जोड कामासंदर्भात माहिती (स्तंभ, स्तंभ शिर्ष, तुळई, हस्त आणि तळखडा) *(संदर्भ- माटे म. श्री., २००८:६४ मराठेशाही वास्तु शिल्प (१६५० ते १८५०), कॅन्टीन्टेल प्रकाशन,पुणे ३०,)*	२२६
५.३	महाराष्ट्रातील मराठाकालीन संस्थानांमधील राजवाड्याच्या अंतर्गत लाकडाच्या व ढगडाच्या जोड कामासंदर्भात माहिती (लाकडाचा तीर, ढगडाचे त्रिकोणी छत, ढगडाचे गोलाकार छत व ढगडाची कमान) *(संदर्भ- माटे म. श्री., २००८:६४ मराठेशाही वास्तु शिल्प (१६५० ते १८५०), कॅन्टीन्टेल प्रकाशन,पुणे ३०,)*	२२७
५.४	छताच्या नक्षीकामाचे छायाचित्र	२२८
५.५	औंध संस्थानातील राजवाड्याच्या आतमध्ये असलेल्या यमाई मंदिराच्या सभागृहामधील छतांचीही चित्र	२२८
५.६	औंध राजवाड्याच्या दर्शनी भागाचे चित्र	२२९
५.७	औंध राजवाड्यातील दुसऱ्या चौकातील तुळशी वृंदावनाचे चित्र	२२९
५.८	औंध राजवाड्याच्या तळमजल्यावरील स्थापत्याचा नकाशा (ब) *(संदर्भ -नकाशा अंतरंग आर्किटेक्ट, पुणे ३०)*	२३०
५.९	औंध राजवाड्याच्या तळमजल्यावरील स्थापत्याचा नकाशा (*क)* *(संदर्भ-:नकाशा अंतरंग आर्किटेक्ट, पुणे ३०)*	२३१

५.१०	औंध राजवाड्याच्या पहिल्या मजल्यावरील स्थापत्याचा नकाशा (अ)	२३२
	(संदर्भ –नकाशा अंतरंग आर्किटेक्ट, पुणे ३०)	
प्रकरण ६ :–	**फलटण संस्थान**	
६.१	मुधोजी मनमोहन राजवाड्याच्या पहिल्या मजल्याचे जुने व नवे दरबार सभागृहाचा नकाशा (संदर्भ - D. Y. Patil college of Engineering and, Kolhapur)	२६२
६.२	मुधोजी मनमोहन राजवाड्याचा छतापासून जमिनीपर्यंतचा घेतलेला वरून दिसणारा आराखडा *(संदर्भ - DYPCOEK)*	२६३
६.३	मुधोजी मनमोहन राजवाड्याच्या तळमजल्याचा आराखडा *(संदर्भ - DYPCOEK)*	२६४
६.४	मुधोजी मनमोहन राजवाड्याचा दुसऱ्या मजल्याचा आराखडा *(संदर्भ - DYPCOEK)*	२६५
६.५	फलटणच्या राजवाड्यात असलेल्या राममंदिराचा दर्शनी भाग	२६६
६.६	फलटणच्या राजवाड्यासमोरील पुरातन मंदीर	२६६
६.७	फलटणच्या राजवाड्याचा दर्शनीभाग	२६७
६.८	फलटण संस्थानचे बोधचिन्ह	२६७
६.९	मुधोजी मनमोहन फलटण राजवाड्याच्या दर्शनी भागाच्या सर्वात वरती असलेली सरस्वतीची मूर्ती	२६८
६.१०	फलटण राजवाडाच्या बांधकामातील स्थित्यंतराचा शिलालेख	२६९
६.११	फलटण राजवाड्यातील कोरीव शिलालेख	२७०
६.१२	मुधोजी मनमोहन राजवाड्याचे आतील भागाचे प्रवेशद्धार	२७१
६.१३	सज्जांना आधार देण्याकरीता लाकडी कोरीव तीरांचा वापर	२७२
६.१४	मुधोजी मनमोहन राजवाड्याच्या देवघराच्या बाजूस केलेले नक्षीकाम	२७२
६.१५	मुधोजी मनमोहन राजवाड्यात लाकूडकाम केलेल्या जाळीचे चित्र	२७३
६.१६	मुधोजी मनमोहन राजवाड्यात दरबार हॉलचे प्रत्यक्ष चित्र	२७३
६.१७	मुधोजी मनमोहन राजवाड्यात दरबार हॉलचे दर्शनी भागाचे प्रत्यक्ष चित्र	२७४
६.१८	मुधोजी मनमोहन राजवाड्यात दरबार हॉलचे युरोपियन	२७५

	पद्धतीच्या छताचे चित्र	
६.१९	मुधोजी मनमोहन राजवाड्यात दरबार हॉलचे युरोपियन	२७५
	पद्धतीच्या छताचे चित्र व सजावट	
६.२०	मुधोजी मनमोहन राजवाड्यात दरबार हॉलचे अंतर्गत	२७६
	सजावट असलेले चित्र	
६.२१	मुधोजी मनमोहन राजवाड्यामध्ये पहिल्या व दुसऱ्या	२७६
	मजल्याचे पहिल्या मजल्यावरून दिसणारे दृश्य	
६.२२	मुधोजी मनमोहन राजवाड्यामध्ये पहिल्या व दुसऱ्या	२७७
	मजल्याचे पहिल्या मजल्यावरून दिसणारे दृश्य व दगडी चौक	
६.२३	मुधोजी मनमोहन राजवाड्यामध्ये दुसऱ्या मजल्यावरील	२७७
	चौकामधून दिसणाऱ्या खिडक्या व दरवाजांचे स्थापत्य	
६.२४	मुधोजी मनमोहन राजवाड्यामध्ये दुसऱ्या मजल्यावरील	२७८
	खिडक्या स्थापत्य	
६.२५	मुधोजी मनमोहन राजवाड्यात तुळशी वृंदावनाचा चौक	२७८
	व त्याबाजूने असलेले नवीन राजवाड्यात केलेल्या कामाचे चित्र२६१	
६.२६	मुधोजी मनमोहन राजवाड्यात तुळशी वृंदावनाचा	२७९
	चौक व त्याबाजूने असलेले युरोपियन पद्धतीच्या कमानीचे चित्र	
६.२७	मुधोजी मनमोहन राजवाड्यात लाकडाच्या हस्तांवर	२७९
	कोरलेले पोपटाच्या आकाराचे कोरीव कामाचे चित्र	
६.२८	मुधोजी मनमोहन राजवाड्यात लाकडाच्या हस्तांवर	२८०
	कोरलेले माकडाच्या आकाराचे कोरीव कामाचे चित्र	
६.२९	मुधोजी मनमोहन राजवाडा-लाकडाच्या कमानीचे वैशिष्ट्य	२८०
६.३०	मुधोजी मनमोहन राजवाडा-एकमुखी दत्त मंदिराचे	२८१
	उत्कृष्ट दगडाचे स्थापत्य	
६.३१	राजवाड्यातील पाणी निःस्सारण योजना	२८१
६.३२	राजवाड्याचे प्रवेशद्वार - मुधोजी मनमोहन राजवाडा	२८२
प्रकरण ७ :-	**नागपूर संस्थान**	
७.१	नागपूरकर भोसले यांची वंशावळ *(संदर्भ -कोलारकर श्री. गो.,*	३०१

पुरंदरे गो. मा., २००९, नागपूर राज्याचा अर्वाचिन इतिहास,
श्री मंगेश प्रकाशन, नागपूर-१७)

७.२ नागपूरकर भोसले यांच्या राजवाड्याचा पहिल्या मजल्याचा नकाशा *(संदर्भ –Architect के. एम. गिन्हे, Bharatiya Kala Prakashan New Delhi)* ३११

७.३ नागपूर संस्थानच्या राजवाड्याचा अंतर्गत रचना दाखविणारा तळमजल्याचा नकाशा *(संदर्भ –Architect के. एम. गिन्हे, BKPND)* ३१२

७.४ नागपूर संस्थानच्या राजवाड्याचा अंतर्गत रचना दाखविणारा (जानोजी भोसले) तळमजल्याचा नकाशा *(संदर्भ –Architect के. एम. गिन्हे, BKPND)* ३१३

७.५ धाकटे भोसले राजवाड्याच्या पहिल्या मजल्याचा नकाशा *(संदर्भ –Architect के. एम. गिन्हे, BKPND)* ३१४

७.६ कै. राणी बकाबाई भोसले यांचा राजवाड्याचा नकाशा *(संदर्भ –Architect के. एम. गिन्हे, BKPND)* ३१५

७.७ कै. राणी बकाबाई भोसले वाड्यातील देवघराचा नकाशा *(संदर्भ –Architect के. एम. गिन्हे, BKPND)* ३१६

७.८ अहिरराव वाड्यातील तळमजल्यावर मराठा स्थापत्यामध्ये असलेली सर्व प्रकारची दालने व अंतर्गत स्थापत्याचा नकाशा *(संदर्भ –Architect के. एम. गिन्हे, BKPND)* ३१७

७.९ सुक्करवार दरवाज्याचा स्थापत्याचा नकाशा *(संदर्भ –Architect के. एम. गिन्हे, BKPND)* ३१८

७.१० सक्करधारा दरवाजा स्थापत्याचा नकाशा *(संदर्भ –Architect के. एम. गिन्हे, BKPND)* ३१९

७.११ बावडी नंदनवन *(संदर्भ –Architect के. एम. गिन्हे, BKPND)* ३२०

७.१२ शिव मंदिराचे स्थापत्यामधील नागरशैलीतील शिखराचा नकाशा *(संदर्भ –Architect के. एम. गिन्हे, BKPND)* ३२१

७.१३ शिव मंदिर सभागृह *(संदर्भ –Architect के. एम. गिन्हे, BKPND)* ३२२

प्रकरण ८ :– सातारा संस्थानचे छत्रपती शाहू महाराज यांच्यानंतर प्रशासकीय कार्ययंत्रणा व त्यामध्ये झालेली प्रशासकीय स्थित्यंतरे

८.१ पहिला बाजीराव पेशवा .*(इ. स. १६९९-१७४०)*

संदर्भ :Raja Kelkar Museum, Pune ३२८

८.२ माधवराव पेशवे दुसरा .(इ. स. १६९१-१७४०) *संदर्भ :RKM Pune* ३२९

महाराष्ट्रातील निवडक संस्थानांमधील स्थापत्य, प्रशासन आणि सांस्कृतिक स्थित्यंतरांचा अभ्यास

प्रस्तावना

संशोधन विषय निवडीचा उद्देश

महाराष्ट्राच्या इतिहासात सतराव्या शतकात पूर्वार्धामध्ये मराठी सत्तेचा उदय झाला. छत्रपती शिवाजी महाराजांनी उत्तरेकडील मुघल सत्ताधीश विजापूरची आदिलशाही, कोकणातील सिद्दी, गोव्यातील पोर्तुगीज व ठिकठिकाणी वसाहत करून राहिलेले इंग्रज यांच्याशी अविरत संघर्ष करून मराठ्यांचे स्वतंत्र राज्य निर्माण केले. लोककल्याण आणि स्वधर्म रक्षण हा राज्याचा पाया होता. (इ.स. १६३० ते १६८० हा शिवकाल मानला जातो.) छत्रपती शिवाजी महाराजांच्या मृत्यूनंतर मराठ्यांना छत्रपती संभाजी महाराज, छत्रपती राजाराम महाराज व महाराणी ताराबाई यांच्या नेतृत्वाखाली स्वराज्यासाठी किंवा स्वराज्य रक्षणासाठी संघर्ष करावा लागला, यावेळी शंभुपुत्र छत्रपती शाहूमहाराज व महाराणी येसूबाई हे औरंगजेबाजाच्या कैदेत होते. साधारणत: इ.स.१६८० ते १७०७ हा सत्तावीस वर्षांचा कालखंड मराठ्यांचा स्वातंत्र्यसंग्राम म्हणून ओळखला जातो.

या स्वातंत्र्य संग्रामात अनेक अडचणींवर मात करून मराठे विजयी झाले. सत्तावीस वर्षांच्या प्रदीर्घ लढाईनंतर सुद्धा औरंगजेब मराठ्यांचे राज्य नष्ट करू शकला नाही. त्यामुळे अत्यंत निराश मन:स्थितीमध्ये औरंगजेबाचा दि. २० फेब्रुवारी १७०७ मध्ये मृत्यू झाला.

औरंगजेबाच्या मृत्यूनंतर शंभुपुत्र किंवा थोरले शाहुमहाराज यांची औरंगजेबाच्या कैदेतून सुटका दि. ८ मे १७०७ मध्ये झाली.

मराठ्यांच्या स्वातंत्र्यसंग्रामात अमात्य, सचिव, सेनापती, प्रतिनिधी यांसारख्या प्रधानांच्या नेतृत्वाखाली मराठा सरदारांनी मुघलांविरुद्ध दिलेला लढा असला, तरी काही कर्तृत्ववान मराठा सरदारांनी स्वत:च्या हिंमतीवर स्वतंत्रपणे लढा दिला होता, त्यामुळे सरदारांमध्ये वतनांचा लोभ निर्माण होत होता. वरील स्वातंत्र्य संग्रामामुळे नवीन कार्यक्षेत्रे निर्माण करून देणे ही काळाची गरज ठरली. हाच काळ प्रशासकीय स्थित्यंतरांचा काळ ठरला. पुढे साधारणत: इ.स. १७१४ ते १९४९ या कालखंडापर्यंत काही सरदारांनी स्वतंत्र संस्थाने निर्माण करून स्वातंत्र्यापर्यंत स्वत: चे महत्त्व कमी करू न देता इंग्रजांच्या मदतीने टिकविली. याचा अभ्यास करीत असताना त्यांनी बांधलेल्या राजवाड्यासारख्या वास्तूंमध्ये, प्रशासकीय यंत्रणेमध्ये व त्या काळी असलेल्या सांस्कृतिक परिस्थितीमध्ये झालेल्या बदलांची दखल घेणे क्रमप्राप्त आहे. या सर्व स्थित्यंतरांचा, बदलांचा इतिहासाच्या पुनर्लेखनाच्या दृष्टीने

काय उपयोग आहे याचे मूल्यमापन करणे हा प्रबंध लेखाचा मुख्य उद्देश व प्रयोजन आहे. याकरिता ''महाराष्ट्रातील निवडक संस्थानांमधील स्थापत्य, प्रशासन आणि सांस्कृतिक स्थित्यंतरांचा अभ्यास'' हा विषय निवडला आहे.

संशोधन विषयाचा कालखंड व स्वरूप

मराठ्यांच्या स्वातंत्र्य संग्रामानंतर म्हणजेच (इ.स. १७१४ नंतर) अष्टप्रधान मंडळ निष्प्रभ ठरले व नवीन पराक्रम गाजविलेले व स्वत:ची नवीन कार्यप्रणाली निर्माण करणारे सरदार यांचे मराठा मंडळ स्थापन झाले. त्यांना विशिष्ट प्रदेश देण्यात आले. या योजनेचे सार असे होते की, -

१. ज्या विशिष्ट प्रदेशात सरदारांनी आपले प्रमुख स्थान निर्माण केले, त्यांनी त्या प्रदेशांचे नियंत्रण व संरक्षण करावे,
२. वसुलीच्या उत्पन्नातून आपला सैनिकांचा खर्च वजा करून उरलेली रक्कम मध्यवर्ती तिजोरीमध्ये भरावी.
३. छत्रपती म्हणजेच शंभुपुत्र शाहुमहाराजांनी निकडीचे बोलविणे केल्यास आपल्या सैन्यांसहित हजर राहून शत्रुविरुद्ध त्यास मदत करावी.

यामुळे जी संस्थाने निर्माण झाली, ती संस्थाने स्वत: ला संस्थानिक राजे म्हणू लागली. ढरम्यानच्या काळात शाहूमहाराजांचे सेनापती धनाजी जाधव यांच्याकडे असलेले कर्तबगार सेनानी म्हणजे कोकणातून आलेले बाळाजी विश्वनाथ - या व्यक्तीमुळे त्यांच्या पुढील इतिहासाला वेगळे वळण लागले व त्याच कालखंडात रोवले गेलेले बीज नवीन बलाढ्य संस्थाने, नवीन प्रशासन कार्यपद्धती व सांस्कृतिक बदल घडवत गेले. इ. स. १७१४ ते १८१८ या कालखंडात छत्रपतींचे वंशज शाहू महाराज (सातारा व कोल्हापूर संस्थान) व बाळाजी विश्वनाथ यांचे वंशज बाजीराव पेशवा यांनी महाराष्ट्रावर राज्य केले. नंतर इंग्रजांच्या काळातही संस्थानिकांनी स्वत:चे अस्तित्व ठेवून काही प्रशासकीय बदल केले व काही सांस्कृतिक बदलांना सामोरे जावे लागले. याच काळामध्ये संस्थानिकांनी स्वत:च्या वास्तू राजवाडासदृश्य निर्माण केल्या.

हे सर्व बदल कसेकसे झाले व कशाकशा पद्धतीने झाले याचा अभ्यास करून त्याचे निष्कर्ष नोंदविणे हे या प्रबंधाचे स्वरूप आहे. साधारणत: इ.स. १७१४ ते इ. स. १९४९ पर्यंत कालखंडाचा विचार केला गेला आहे.

संशोधन विषयांची मुख्य अंगे

महाराष्ट्रातील निवडक संस्थानांमधील स्थापत्य, प्रशासन आणि सांस्कृतिक स्थित्यंतरांचा अभ्यास करताना संस्थानिकांची व्याप्ती खालीलप्रमाणे आहे.

अ.क्र.	संस्थानिकांच्या राज्याचे नाव	प्रशासकाचे नाव
१.	सातारा संस्थान	राजे भोसले (छत्रपती संभाजी महाराजांचे वंशज)
२.	भोर संस्थान	राजे पंत सचिव
३.	फलटण संस्थान	राजे निंबाळकर
४.	औंध संस्थान	राजे पंत प्रतिनिधी
७.	नागपूर संस्थान	राजे भोसले (छत्रपती संभाजी महाराजांचे वंशज)

वरील सर्व संस्थाने स्थापत्य, प्रशासन व सांस्कृतिक स्थित्यंतरांचा इतिहासाचा अभ्यास ही प्रमुख अंगे आहेत.

संशोधन सर्वेक्षण

महाराष्ट्रातील राजकीय संस्थानिकांचा एकत्रितपणे त्यांच्या कालखंडात (इ.स.१७१४ ते इ.स. १९४९) झालेले स्थापत्यविषयी बदल, त्यांची प्रशासकीय कार्यपद्धती व त्याअनुषंगाने झाले. सांस्कृतिक स्थित्यंतरांचा अभ्यास एकत्रितपणे केलेला आढळलेले नाही. अनेक संशोधकांनी त्या काळातील राजकीय व्यक्तींविषयी, संस्थानिकांविषयी वैयक्तिक माहिती, कौटुंबिक माहितीसुद्धा उपलब्ध करून दिली. परंतु छत्रपती शिवरायानंतरच्या कालखंडात महाराष्ट्राच्या स्वातंत्र्यसंग्रामात व नंतर काळानुरूप झालेली स्थित्यंतरे व त्याचा अभ्यास झालेला दिसत नाही, तसेच संस्थानिकांचा स्वधर्मावर झालेला परिणाम यांचाही अभ्यास किंवा मूल्यमापन झालेले दिसत नाही. असे सर्वेक्षणात आढळले आहे.

संशोधनाच्या अभ्यासाची पद्धती

संशोधनाची पद्धती :- वर्णनात्मक आणि विश्लेषणात्मक संशोधन पद्धतीचा वापर केला आहे.

महाराष्ट्रातील प्राचीन काळ, मध्ययुगीन काळ (शिवपूर्व काळ), शिवकाळ किंवा मराठा काळ, इंग्रज काळ या सर्व साधनग्रंथांचे वाचन करून त्या काळातील ऐतिहासिक सत्यांश शोधून व

संस्थानिकांच्या सध्या असलेल्या राजवाड्यामध्ये जाऊन उदा. भोर, फलटण, औंध, सातारा यांचे ग्रंथालयात जाऊन किंवा तेथील राजवाड्यांचे व इतर स्थापत्यांचे अवलोकन करून, रचना बढलून, माणसांच्या सवयीनुसार, लोकांच्या सवयीनुसार केलेले बढल यांचा बारकाईने अभ्यास करून त्यावर निष्कर्ष नोंढविणार आहे.

स्थापत्यामध्ये त्यांच्या वैशिष्ट्यांचा अभ्यास करताना ही रचना अशीच का केली असावी यावर संशोधन करून त्याकाळी असलेल्या सामाजिक स्थितीवर उपाय म्हणून स्थापत्य केले असले पाहिजे. यावरून काय निष्कर्ष निघतो याचा अभ्यास करणार आहे.

सर्व परिस्थितीचे नुसते विश्लेषण न करता त्यातील बारकावे व विश्लेषणांचे नवीन संदर्भ यांच्या निष्कर्षाचा अभ्यास करून नोंढविणार आहे. या सर्व कालखंडात झालेली स्थित्यंतरे ही एक नवीन काळाची गरज व लोककल्याणकारी योजनांची बिजे आहेत. हे माझ्या संशोधनाच्या पद्धतीने लक्षात येणार आहेत. हे करताना काही मुद्दयांवर विश्लेषण केले आहे.

१. संस्थानांच्या कक्षेत येणारी भौगोलिक स्थिती
२. संस्थानांच्या कक्षेत येणारी कर्तबगार व मुत्सद्दी माणसे
३. संस्थानांच्या कक्षेत येणाऱ्या स्थापत्य वास्तू
४. संस्थानांच्या कक्षेत येणाऱ्या समाजाची सांस्कृतिक स्थिती
५. संस्थानांच्या कक्षेत येणाऱ्या राजकारणांची प्रशासकीय यंत्रणा

वरील माझ्या संशोधन पद्धतीचे वर्णन करावयाचे झालेच तर असे म्हणता येईल की, ही संशोधन पद्धती गुणात्मक, विश्लेषणात्मक मूलभूत संशोधन पद्धती असे वर्णन करावे लागेल.

(टिप :- Research Methodology म्हणजे संशोधन पद्धती मध्ये एकंदर सहा प्रकार येतात. त्यामध्ये १. मुलभूत अथवा विशुद्ध संशोधन, २. वर्णनात्मक संशोधन, ३. विश्लेषणात्मक संशोधन, ४. संकल्पनात्मक संशोधन, ५. उपयोजित संशोधन, ६. अनुभवधिष्ठित संशोधन किंवा प्रायोजिक संशोधन या सर्व संशोधन पद्धती आहेत. त्यामध्ये क्र. २ व क्र. ३ या दोन्ही संशोधन पद्धतीचा उपयोग केला आहे.)

प्रबंधाची रूपरेषा

या प्रबंधाची विभागणी खालीलप्रमाणे केली आहे.

प्रकरण १ :- महाराष्ट्राचा प्राचीन इतिहास (स्थापत्य, प्रशासन व सांस्कृतिक स्थिती)

प्रकरण २ :- महाराष्ट्रातील निवडक संस्थानांच्या निर्मितीचा इतिहास

प्रकरण ३ :- सातारा संस्थान

प्रकरण ४ :- भोर संस्थान

प्रकरण ५ :- औंध संस्थान

प्रकरण ६ :- फलटण संस्थान

प्रकरण ७ :- नागपूर संस्थान

प्रकरण ८ :- सातारा संस्थानचे छत्रपती शाहू महाराज यांच्यानंतर प्रशासकीय कार्ययंत्रणा व त्यामध्ये झालेली प्रशासकीय स्थित्यंतरे

प्रकरण ९ :- संस्थानांच्या कारभारात झालेली सांस्कृतिक व स्थापत्यविषयक स्थित्यंतरे

महाराष्ट्रातील संस्थानांची व्याप्ती लक्षात घेता सातारा, भोर, औंध, फलटण, नागपूर, यांचा सविस्तर स्थित्यंतर इतिहासाचा अभ्यास होईल, म्हणून हा प्रबंध लिहिताना असा विचार केला गेला की, "महाराष्ट्रातील निवडक संस्थानांमधील स्थापत्य, प्रशासन आणि सांस्कृतिक स्थित्यंतराचा अभ्यास" या संशोधनामध्ये सातारा, भोर, औंध, फलटण आणि नागपूर या संस्थानांमध्ये स्थापत्यविषयक अभ्यास करताना असे आढळून आले की, सर्व राजवाड्यांच्या रचना एकसारख्या असून या स्थापत्यामध्ये राजवाडा बांधताना त्यांना लागणारे साहित्य, त्यांची असलेली रचना, संपूर्ण राजवाड्याची आखणी उदा. तटबंदी, प्रांगण, मंदिरे, देवघर, सोपा, तळघर, छोटी सभागृहे, मोठी सभागृहे, बाळंतिणीची खोली, दिवाणखाना किंवा सदर दरबार सभागृह, आरसे महाल, रंग महाल, राजवाड्याची सजावट, लाकडाच्या कमानी, झुंबरे, खिडक्या, लाकडाचे जाळीकाम इ. चे निष्कर्ष व निरीक्षणे व संशोधन बरेचशे एकसारखे असून त्यामुळे त्यांचा तपशील सातारा, भोर व फलटण या प्रकरणात विभागून घेतला आहे. त्याचप्रमाणे वरील सर्व संस्थाने ज्या राज्यघटनेवर चालत असत ती राज्यघटना सुरवातीच्या काळात रामचंद्रपंत अमात्य यांच्या आज्ञापत्रानुसार चालत असून त्यानंतर वरील संस्थानाचा इतिहास वाचताना राज्यघटनेचा उल्लेख आढळतो. परंतु प्रत्यक्षामध्ये सध्याचे औंध संस्थान सोडले तर इतर कोणत्याही वंशजांकडे संस्थानांची राज्यघटना मिळाली नाही. म्हणून औंध संस्थानच्या प्रकरणामध्ये प्रातिनिधीक स्वरूपात संस्थानची राज्यघटना कशी असावी, याकरीता औंध

संस्थानची राज्यघटना जशी आहे तशी घेतली आहे. तात्पर्य अष्टप्रधान मंडळाच्याद्वारे चालणारी किंवा आज्ञापत्राद्वारे चालणारी राज्यघटना व ही औंध राज्याची घटना एक प्रशासकीय स्थित्यंतर आहे.

महाराष्ट्रातील सातारा, भोर, औंध फलटण आणि नागपूर अशा निवडक पाच संस्थानचा अभ्यास करताना त्यांच्या कालखंडामध्ये सांस्कृतिक स्थित्यंतरे झाली याचे कारण इंग्रजांनी आपल्यावर केलेले राज्य व आपल्या भारतीय संस्कृतीमध्ये असलेल्या परंपरा व रूढी यांच्यावर स्वकीयांनी ताशेरे ओढले. याच काळामध्ये क्रांतीकारक निर्माण झाले. त्याचबरोबर भारतीय सुधारकही निर्माण झाले. एकंदरीतच आक्रमकांमुळे व परकीय सत्तेमुळे सांस्कृतिक बदल घडत गेले, याचा आढावा सर्व संस्थानाच्या मिळून शेवटच्या प्रकरणात घेत आहे. या शोध प्रबंधामध्ये स्थापत्य, प्रशासन आणि सांस्कृतिक या क्रमाने संस्थानिकांमध्ये होत गेलेल्या स्थित्यंतराचा अभ्यास करत असताना असे जाणवले की, प्रथमतः प्रशासनातील स्थित्यंतरे याची मांडणी केल्याशिवाय स्थापत्य व सांस्कृतिकविषयक झालेली स्थित्यंतरे त्या अनुषंगाने मांडावी लागतील म्हणून प्रशासन, स्थापत्य व सांस्कृतिक या क्रमाने विषयाची मांडणी केली आहे.

प्रकरण पहिले

महाराष्ट्राचा प्राचीन इतिहास

प्रकरणाचा तपशिल

क्रमांक	तपशिल	पृष्ठ क्रमांक
प्रकरण १ :	**महाराष्ट्राचा प्राचीन इतिहास**	**७**
१.१	प्रागैतिहासिक महाराष्ट्र	९
१.१.१	पुराश्मयुग	९
१.१.२	मध्याश्म युग	९
१.१.३	नवाश्म युग	१०
१.१.४	ताम्रपाषाण युग	११
१.१.७	प्राचीन ऐतिहासिक काळ	११
१.२	महाराष्ट्राची भौगोलिक परिस्थिती	१२
१.३	महाराष्ट्राचा पूर्वेतिहास	१२
१.३.१	सातवाहन	१३
१.३.२	वाकाटक	१३
१.३.३	चालुक्य	१३
१.३.४	राष्ट्रकुट	१३
१.३.७	कदंब	१४
१.३.६	याढव	१४
१.३.७	बहमनी राज्यकर्ते	१६
१.३.८	विजापूरची आदिलशाही आणि अहमदनगरची निजामशाही	१७
१.४	शिवपूर्वकाल म्हणजे मध्ययुगीन कालखंड	१८
१.४.१	ठळक प्रसंगांचा कालपट	१९
१.४.२	आदिलशाही प्रशासन	२७
१.४.३	प्रमुख मराठा घराणी	२७
१.७	सारांश	२६
१.६	उपसंहार	२६

प्रकरण १ : महाराष्ट्राचा प्राचीन इतिहास

महाराष्ट्राच्या प्राचीनत्वाचा प्रत्यक्ष साक्षीदार म्हणजे सह्याद्री !

सह्याद्रीच्या कडे-कपाऱ्यांत ढडलेल्या किंबहुना त्याच्या अजस्त्रबाहुबलात नैसर्गिकरित्या किल्लयांसाठी केलेली पार्श्वभूमी आणि त्यांच्या अंगाखांद्यावर खेळणाऱ्या अनंत ध्येयासह असलेल्या नरवीरांनी निर्माण केलेला महाराष्ट्राचा ज्वलंत इतिहास प्राचीन काळात पाहावयास मिळतो.

भारतात आर्यावर्त आणि ढक्षिणपथ हे मुख्य पंरपरेने विभाग, भूस्तराच्या दृष्टीने ही विभागणी शास्त्रशुध्द आहे. ढक्षिणापथामध्ये सह्याद्रीच्या ढालीच्या कृष्णप्रस्तर प्रढेश म्हणजेच महाराष्ट्र (कर्वे चिं. ग., १९५४ : ५). महाराष्ट्रातील इतिहासाची सुरुवात प्रागैतिहास काळापासून सुरुवात होते. या काळातील ढगडी हत्यारे व प्राण्यांचे अश्मीभूत अवयव यावरून निष्कर्ष काढावे लागतात.

महाराष्ट्रातील अश्मयुगीन पुराव्यांचे वर्गीकरण.

अ. पुराश्म युग आ. मध्याश्मयुग इ. नवाश्मयुग

ई. ताम्रपाषाण युग आणि महापाषाण युग उ. प्राचीन ऐतिहासिक काळ

असे कालखंड करावे लागतील

१.१ प्रागैतिहासिक महाराष्ट्र

१.१.१ पुराश्मयुग(Palaeolithic) (या कालखंडात पूर्व पुराश्म युग, मध्य पुराश्मयुग व उत्तर पुराश्मयुग असे कालखंड पुरातत्त्वात अभ्यासले जातात).

महाराष्ट्रात विविध भागांमध्ये झालेल्या उत्खननांमध्ये प्राचीन अश्मयुगीन मानवाची हत्यारे सापडल्याचे ढिसते. पाषाणातील ही हत्यारे ढोन पद्धतीमध्ये सापडतात.

१. गोट्यांपासून केलेली हत्यारे

२. ढगडाच्या मोठ्या छिलक्यापासून केलेली हत्यारे

या ढोन्ही पद्धतींमध्ये हात कु-हाडी, तासण्या, फरश्या इ. सारखी हत्यारे उत्खननात सापडली. याच काळात महाराष्ट्रातील अन्य ठिकाणी रानटी बैल, रानटी हत्ती, अजस्त्र घोडे इत्याढी प्राण्यांची अश्मीभूत हाडे मिळाली.या पुराश्म युगाच्या उत्तर पुराश्मयुगात मानव तात्पुरत्या स्वरूपात का होईना झोपड्या बांधून राहू लागला.

१.१.२ मध्याश्म युग (Mesolithic) :- या कालखंडामध्ये मागील प्राचीन अश्मयुगापेक्षा सापडलेली ढगडी हत्यारे आकाराने लहान सापडली. उढा. तासण्या, वेधण्या व नोकहत्यारे पण चांगल्या धारधार, पातळ पोतीची मिळाली. उढा. सातारा जिल्ह्यात कृष्णे काठी संगम माहुली येथे मध्याश्म युगातील काही

क्षुद्राश्म हत्यारे किंवा अवजारे सापडली. विशेषतः जावळी येथे क्षुद्राश्म अवजारे सापडण्याच्या दृष्टीने सर्वात महत्वपूर्ण असून तेथे सर्वात जास्त म्हणजे ३८७ क्षुद्रास्त्रे प्राप्त झाली आहेत.हत्यारे ढुरून फेकता येऊन प्राण्यांची शिकार करता येईल अशी निर्माण झाली. मनुष्य निसर्ग अवस्थेमध्ये राहत होता. गुहेत किंवा कड्याकपाऱ्यांत निवास करीत असत. शरीरझाकावे, अशा प्रकारची बुद्धीपण नव्हती. हा काळ साधारणतः २५ हजार वर्षाचा होता. या मध्याश्म युगाच्या उत्तर भागामध्ये मनुष्य एका गुहेमध्ये एकत्र कुटुंबासारखा राहू लागला. कुटुंबाकरिता केलेली प्राण्यांची शिकार एकत्रपणे वाटून घेऊ लागले. या एकत्रित राहण्यामधूनच टोळ्या निर्माण झाल्या असाव्यात किंवा समूह निर्माण झाले असावेत (ढेव शां. भा., १९७६ : १६८).

१.१.३ नवाश्म युग(Neolithic)(या कालखंडात पूर्व नवाश्म युग व उत्तर नवाश्म युग या कालखंडाचा अभ्यास केला जातो. आपण त्याचा एकत्रित याठिकाणी विचार केला आहे.):- या पृथ्वीच्या पाठीवरील मानवाच्या प्रगतीतील एक महत्त्वाचा टप्पा म्हणजे नवाश्मयुग होय. याचे कारण एक मोठे पाऊल मानवाने या कालखंडामध्ये संस्कृतीच्या दृष्टीने व उत्क्रांतीच्या इतिहासाच्या वळणावर ठेवले.

उढा. स्वतःच्या अन्न निर्मितीविषयी त्याचे धोरण बढलले म्हणजे स्थिर जीवन जगून म्हणजेच एकाच जागी राहून अन्न निर्मिती करणे, त्यासाठी लागणारी जनावरे पाळणे, मातीची घरे बांधणे, मातीची भांडी बनवणे, म्हणजेच स्वसंरक्षण करून भीती नष्ट करून त्याला एखाढे घर करून राहवे अश्या प्रकाराची बुद्धी किंवा जाणीव झाली. नवाश्य युगाला क्रांतीयुग असे पुरातत्त्वात म्हणतात. मानवी जीवनामध्ये खूप मोठे बढल घडून आले. जनावरांचा उपयोग मांस खाण्यासाठी व शेतीच्या कामासाठी सुद्धा जनावरांचा उपयोग होतो, अशा स्वरूपाची बुद्धी निर्माण झाली असावी. त्यामुळे पशुपालन निर्माण झाले. पशुपालनामुळे जीवनात स्थिरता व सुबत्ता येऊ लागली. यामधूनच छोट्या-छोट्या वसाहतींची व खेड्यांची निर्मिती झाली. उत्तर नवाश्म युगामध्ये मानवाने प्रगती केली व शेतीचे काम जोखमीचे व कष्टाचे असल्यामुळे घरातील पुरुष हे काम करू लागले व स्त्रिया घरातील कामे करू लागल्या. उढा. स्वयंपाक बनविणे, वेताच्या काठीच्या टोपल्या बनविणे, मातीची मडकी बनविणे, शंखांचे ढागिने बनविणे, शेतीला उपयोगी पडतील अशी ढगडाची हत्यारे घरच्या घरी बनविणे व घरातील लाकूडकामाला उपयोगी पडतील अशी लाकडे ढगडाच्या हत्याराने कापून घरातील लाकूड कामाची डागडुजी करणे इ. स्वरुपाची कामे नकळत जीवनात गरज म्हणून होऊ लागली. भारतात नवाश्म युगाचा पुरावा मुख्यतः काश्मीर, आंध्र प्रदेश, कर्नाटक आणि मध्यप्रदेश याठिकाणी मिळाला आहे.

सारांश शेती,स्थिर जीवन, घोटून गुळगुळीत केलेली ढगडी हत्यारे, मातीची भांडी बनविण्याची कला व विणकाम करणे ही नवाश्म युगाची वैशिष्ट्ये मानली जातात (ढीक्षित स. का., १९६० : २८).

१.१.४ ताम्रपाषाण युग आणि महापाषाण युग (या कालखंडात ताम्र आणि लोखंड या धातूंचा वापर होऊ लागल्यामुळे त्याचा या कालखंडात विचार केला आहे. याचा कालखंड इ. स. पूर्व २७०० ते इ. स. पूर्व १००० असा असू शकतो.):- महाराष्ट्रात आजपर्यंत झालेल्या १. प्रकाशे २. नेवासे ३. जोर्वे ४. नाशिक ५. सावळढे-बहुरूपे ६. ढायमावाढ ७. नाशिक ८. कैसान ९. कऱ्हाड या भागातील वसाहती काळ्या मातीवर झालेल्या ढिसतात. याचा अर्थ असा तेथील झाडे, झुडपे, जंगल तोडून भूमी वसाहतीसाठी निर्माण केली असावी. कारण वरील भागात झालेल्या उत्खननावरून ताम्रपाषाण युगातील संस्कृतीचे स्वरूप, कालखंड, व्यापकत्व महाराष्ट्राबाहेर त्या काळात झाले की व्यापारी ढेवाण-ढेवाण, लोकांची शरीररचना, त्यांची वैशिष्ट्ये इ. गोष्टी कळू शकतात (महाराष्ट्र शासन, सातारा गॅझेटिअर, १९६३ : ८२). महाराष्ट्रात इतरत्र उपलब्ध झालेल्या पुराव्यांनुसार ताम्रपाषाण युगातील

१. उत्तर हडप्पा संस्कृती २. ढायमावाढ संस्कृती ३. जोर्वे संस्कृती ४. सावळढे संस्कृती
२. या काळात बनवलेली मातीची भांडी १. तांबड्या पृष्ठभागावर काळ्या रंगात रंगवलेली २.जाळीढार चौकोन ३. जाळीढार त्रिकोण ४. काळे आडवे पट्टे अशा स्वरूपाची व यामध्ये मोठाले घडे, मोठाले रांजण, लहान वाडगे इ. आकारामध्ये होती असे पुराव्यानिशी ढिसते.

या काळात लघु अश्म हत्यारे वापरत होते, असेही पुरावे त्यांना तांबे या धातूची माहिती झाली होती हेही या काळात लोक वापरत. पाषाण विविध रंगाचे बारीक असलेले मणी हे अलंकारासाठी वापरीत असे आढळून आले आहे. घर बांधताना मातीबरोबर झाडांच्या, वाश्यांचा वापर करून भिंती व छप्पर बांधण्याची कला अवगत होताना ढिसते. हा काळ साधारणतः इ. स. पूर्व १२०० असावा असे कार्बन १४ पद्धतीने काढला आहे.

१.१.५ प्राचीन ऐतिहासिक काळ :-ताम्रपाषाण युगाच्या उत्तरार्धातील काळातील अवशेषांचे उत्खनन साधारणतः म्हणजे मौर्य सातवाहन काळातील अवशेषांचे उपलब्ध झालेले पुरावे यावरून इ. स. पूर्व सहाव्या शतकापासून काळ हा ऐतिहासिक काळ म्हणून मानता येतो.

इ.स. पूर्व शतक पहिले ते इ.स. तिसरे शतक या कालखंडात सातवाहनांचे राज्य महाराष्ट्रावर होते. हे पुराव्यानिशी माहिती झाले आहे.

इ. स. पूर्व दुसऱ्या शतकात सातारा जिल्ह्यातील कराड या गावाच्या यात्रेकरूची मध्यप्रदेशातील सुप्रसिद्ध भाराहुत येथील स्तुपाच्या वेदिकेच्या बांधणीसाठी काही अनुदाने दिल्याचा अभिलेखात उल्लेख आहे. याच्यावरून असे अनुमान काढू शकतो की, महाराष्ट्र प्रांतातील व्यापारी भारताच्या इतर प्रांतांच्या संपर्कात होते व ते धनवानही होते असे दिसते. नाशिकजवळील नाणेघाटात राणी नागनिका व तिच्या परिवाराचे दगडात कोरलेले अवशेष व शिलालेख सापडले आहेतच. त्यामध्ये राणीने दोन अश्वमेध व एक राजसूय यज्ञ केलाचा उल्लेख व त्याचप्रमाणे त्याठिकाणी अनेक स्वरूपाची दाने केल्याचा उल्लेख शिलालेखात सापडला. हे सर्वश्रृत आहेच (डिसकळकर द. बा., १९६४ : ३२). महाराष्ट्रात नाशिक, शिरवळ, वाई, कार्ले इ. ठिकाणाच्या बौध्द गुहा सातवाहनच्या काळातील आहेत, असे संशोधनातून स्पष्ट झाले आहे.

१.२ महाराष्ट्राची भौगोलिक परिस्थिती

ऐतिहासिक काळाच्या संदर्भात विचार किंवा लेखन करताना ह्या भागाच्या भौगोलिक परिस्थितीचा साधारणतः अंदाज असावा लागतो म्हणून यासंदर्भात पुढीलप्रमाणे सांगता येईल.

दक्षिण भारतात १६ अंश/२० अंश उत्तर अक्षांशांमध्ये भारताच्या पश्चिम किनाऱ्याच्या आसपासचा प्रदेश हा महाराष्ट्राचा किंवा मराठ्यांचा प्रदेश होय (गायकवाड आर.डी.,१९७० : ८२-८४).

यामध्ये पश्चिमेला - समुद्रसीमा (दमण ते गोवा आणि कारवार यांचा अंतर्भाव)

उत्तरेला - विंध्य सातपुड्याची रांग.

दक्षिण - पूर्वेला - तेलंगणा व कर्नाटक रांगा.

कृष्णानदी व तिचे खोरे ही महाराष्ट्राची दक्षिण सीमा.

या प्रदेशामध्ये पुणे-सातारा, कोल्हापूर व सांगली-मिरज या प्रदेशांचा समावेश होतो. याच प्रदेशाला पूर्वी 'कुंतल' म्हणत असत. या ग्रंथामध्ये याच भागातील राजकीय संस्थाने उदा. भोर, सातारा, फलटण, औंध या संस्थानांचा प्रामुख्याने विचार होणार आहे.

१.३ महाराष्ट्राचा पूर्वेतिहास

भारतावरील आक्रमणांच्या इतिहासाचा अभ्यास करताना आपल्याला असे आढळून येईल की, आर्यावर्त व दक्षिणपथ असे भारताचे दोन भौगोलिक किंवा राजकीय भाग पडले.

दक्षिण पथाला - दंडकारण्य असेही म्हणतात. अलीकडच्या काळात नाशिक, जोर्वे, नेवासा, चांदोली, सावेगाव, झामगाव, दायमाबाद, नांदूर, मध्यमेश्वर या ठिकाणच्या उत्खननांवरून व कार्बन १४ च्या

किरणोत्सारी पद्धतीवरून महाराष्ट्र भूमीच्या इतिहास पूर्वकाळाचा अंदाज संशोधक अजूनही घेत आहेत. महाराष्ट्राचा उगम इ.स. पूर्वी ७ लक्ष ते ३० लक्ष मानला आहे(अग्निहोत्री ढ. ह., १९७७ : ४५).

थोर पुरात्त्वतज्ञ सांक्लीया ह. श्री. यांच्या मते इ.स.पूर्वी १७०० च्या सुमारास महाराष्ट्रात पशुसंवर्धनाचा आरंभ झाला. गोढावरीच्या काठावर सातवाहनांचे पहिले ऐतिहासिक राजघराणे उढयास आले.

१.३.१ सातवाहन :–या राजघराण्याने महाराष्ट्रात इ.स. पूर्व २४० ते इ.स. २३५ असे ४७५ वर्षे राज्य केले. सातवाहन राजांची स्वतःची नाणी सुरू केली. यज्ञ संस्कृतीचा पुरस्कार केला, तसे बौध्द धर्मालाही उत्तेजन ढिले. सातवाहन हा महाराष्ट्राचा ज्ञात ऐतिहासिक राजवंश होता(कर्वे चिं. ग., १९७४ : ४८६).

सातवाहन घराण्यातील सिमुक, कृष्ण, श्रीसातफर्णी, लंबोढर, अपालिक, 'हाल', यज्ञश्री इ. महत्त्वाचे राजे झाले. सातकर्णी स्वतःला ढक्षिणापथपती असे म्हणत असत. 'हाल' राजाने'गाथा सप्तशती' हा प्रसिद्ध ग्रंथ प्राकृत भाषेत निर्माण केला.

सातवाहनांचे राज्य - ऋषिक (खानढेश), अश्मक (गोढावरी), मूलक (पैठण), सौराष्ट्र (काठेवाड), कुकुर (राजपुतना), अपरान्त (कोकण) इ. भागांवर पसरलेले होते.

१.३.२ वाकाटक :– सातवाहनानंतर महाराष्ट्रीय राजे म्हणजे वाकाटक. इ.स. २७० ते ७७० असे ३०० वर्षे राज्य केले. वाकाटकांचा मूळ पुरुष विंध्यशक्ती. विंध्यशक्ती हा सातवाहनांचा मांडलिक होता. त्याचा मुलगा प्रवरसेन या ढोघांनी मिळून विशेष पराक्रम करून आपली सत्ता वाढविली. या राजघराण्याचा गुप्त घराण्याशी संबंध होता. संस्कृत कवी कालिढास हा याच घराण्याशी संबंधित होता. प्रवरसेन याने सेतुबंध हे काव्य प्राकृत भाषेत लिहिले आहे.

१.३.३ चालुक्य :– वाकाटकांनंतर महाराष्ट्रात चालुक्यांनी राज्य स्थापन केले. चालुक्यांनी अंढाजे इ.स.सहावे शतक ते इ.स.आठ्वे शतक या कालखंडात सत्ता होती. या घराण्यात सत्यश्री, पुलकेशी यांनी पल्लव, कढंब यांच्यावर विजय मिळवून पृथ्वीवल्लभ हे पढ स्वतःला धारण केले. ढंतिढुर्ग या राजाने चालुक्यांचा प्रढेश जिंकून राष्ट्रकुट घराण्याची स्थापना केली, ढंतिढुर्ग हा चालुक्याचा एक मांडलिक होता (जोशी पी. जी.,२००२ : ३२६). चालुक्यांच्या कारकिर्दीत महाराष्ट्रातील काही भागात राष्ट्रकूटांची सत्ता स्थापन झाली होती. चालुक्य व राष्ट्रकूट यांची एकाच वेळी महाराष्ट्रावर सत्ता होती.

१.३.४ राष्ट्रकुट :– अंढाजे इ. स. ४४० ते ९७४ या काळात राज्य केले. मानपूर हे त्यांच्या राजधानीचे ठिकाण होते. राष्ट्रकूट स्वतःला 'कुंतलाधिपती' म्हणवून घेत असत. याच घराण्यातील राजा कृष्ण यांने सिंधच्या अरब आक्रमकांवर विजय मिळवला होता. वेरूळ येथील कैलास लेणे याच राजाने करवून घेतले. याचा मुलगा धृवराज याने इ.स.७८० ते ७९२ या काळात राष्ट्रकुटांचे राज्य हिमालयापर्यंत

वाढवित नेले होते (जोशी प्र. न., १९७८ : २६). धृवराजाचा मुलगा गोविंदराज अंदाजे इ. स. ७९३ ते इ. स. ८१४ ह्याने याच काळात वैदिक, जैन व बौध्द हे तिन्ही धर्म सलोख्याने राहण्याच्या प्रयत्नाच श्रेय त्याला जाते.

१.३.५ कदंब :-राष्ट्रकूटांच्यानंतर अंदाजे इ.स. १००० ते १२७२ या काळात कदंब राजांनी गोव्यात व महाराष्ट्रात राज्य केले. कदंब राजाच्या घराण्यातूनच कऱ्हाड व कोल्हापूर या प्रदेशात शिलाहार राजांचा उदय झाला.

शिलाहार :-शिलाहार राजांनी कोकण प्रांत जिंकून ते स्वतःला कोकणचक्रवर्ती अशी बिरुदावली लावत असत. शिलाहार राजे विद्या व कला यांचे पुरस्कर्ते होते. शिलाहार राजापासून शेलार, कदंबा राजापासून कदम अशी घराणे उदयास आली.

१.३.६ यादव :- इ. स. बाराव्या शतकाच्या सुमारात यादवांचा उदय झाला. देवगिरीचे यादव किंवा जाधव याचा संबंध श्रीकृष्णाच्या घराण्याशी प्रस्थापित केला आहे.

महाराष्ट्राच्या दृष्टीने देवगिरीचे यादव हे मराठी भाषा किंवा वाङ्मय यांचे आधारस्तंभ वाटतात. यादवांच्या घराण्यातील भिल्लम नावाच्या पराक्रम पुरुषाने सोमेश्वर चालुक्यांचा पराभव करून संपूर्ण महाराष्ट्रावर सत्ता प्रस्थापित केली. याच घराण्यातील राजा सिंघण याचा सेनापती खोलेश्वर याने माळवा, छत्तीसगड, गुजरात व संपूर्ण कुंतलप्रांत हा प्रदेश जोडला व पराक्रमाने महाराष्ट्र राज्य वाढविले. याचाच मुलगा बिज्जल याने कोकण प्रांत संपूर्ण अधिपत्याखाली आणला.

याच घराण्यात कृष्णदेव यादवाने तेलंगणपण जोडले. याच कृष्णदेवाच्या काळात यादवांचे साम्राज्य डोळ्यात भरण्याइतपत आर्थिकदृष्ट्या भरभराटीला व ऐश्वर्याला आले होते. कृष्णदेवराय व त्यांचा मुलगा रामदेवराय याने इ.स. १२७१ ते इ. स. १३०९ या काळात उकृष्ट राज्य केले. यांच्याच कारकिर्दीमध्ये अल्लाउद्दीन खिलजीने यादवांची राजधानी देवगिरीवर हल्ला करून यादवांच्या सत्तेच्या विघटनाला सुरुवात झाली. रामदेवराय याचा मुलगा शंकरदेव (इ. स. १३०९ ते इ. स. १३१८) या काळात यादव सत्ता परकीयांच्या हाती गेली. यादव राजे हे वैदिक संस्कृती, विद्या व कला यांचे पुरस्कर्ते होते (शेणोवलीकर ह. श्री., १९७६ : १२).

यादवांची कारकीर्द अत्यंत बहुमोलाची होती, कारण भास्कराचार्य, लक्ष्मीधर व चांगदेव हे प्रख्यात ज्योतिषी याच यादवांच्या कालखंडात होऊन गेले. याच कालखंडात शारंगधर यांनी 'संगीत रत्नाकर' हा ग्रंथ लिहिला. हेमाद्री पंडीताने चतुर्वर्गचिंतामणी, कालनिर्णय, तिथीनिर्णय, आयुर्वेद

रसायन, पर्जन्ययोग इ. ग्रंथांची निर्मिती केली व वास्तुशास्त्रामध्ये अमोलिक व पायाभूत स्थापत्याची रचना केली (ढेशपांडे अ. ना., १९७३ : १८६).

इ.स. १२९६ मध्ये महाराष्ट्रावर पहिले मुस्लिम आक्रमण झाले. यात यादवांचा पराभव झाला. तरीपण यादवांचे राज्य इ. स. १३१८ पर्यंत अबाधित होते. इ. स. १३१८ मध्ये यादवांच्या राजाचा दारुण अंत झाला आणि दक्षिणेवर मुस्लिम राजवट चालू झाली. खिलजी घराण्यातील मुबारकाने 'मलिक याखलखी' यास देवगिरीचा राज्यपाल म्हणून नियुक्त केले. तथापि उत्तर भारतात खिलजी घराण्याची राजवट अनपेक्षितपणे संपुष्टात आली. तुघलक घराण्यातील महंमद तुघलकाची कारकीर्द सुरू झाली. त्याची कारकीर्द अनेक घटनांनी गाजली व त्याला राजधानी दिल्लीहून देवगिरीला स्थलांतरित करावी लागली.

देवगिरीचे नाव बदलून दौलताबाद असे ठेवले. या तुघलकाच्या काळात इ. स. १३१८ ते इ. स. १३४७ या काळात त्यांनी प्रचंड प्रमाणात महाराष्ट्राची लूट केली. त्याची जुलमी राजवटीविरुध्द त्याच्याकडेच काम करणारा हसन गंगू ऊर्फ जाफरखान याच्या नेतृत्वाखाली इ. स. १३४७ मध्ये बंड झाले व त्यामध्ये तुघलकाच्या सैन्याचा पराभव होऊन हसन गंगूचे राज्य दौलताबादवर निर्माण झाले. या हसनगंगू ला हसन गंगू बहुमनी असेपण म्हणत असत. (हसन गंगू हा जन्माने कनिष्ठ अफगाण असून दिल्लीचा रहिवासी होता व तो गंगू ब्राह्मण ज्योतिषाच्या पदरी प्रामाणिकपणे काम करीत होता. या गंगू ब्राह्मणाचे तुघलकाच्या दरबारात मोठे वजन होते. हसन गंगू त्याच्या शेतात काम करीत असताना त्याला मोठे धन सापडले. ते त्याने प्रामाणिकपणे गंगू नावाच्या ब्राह्मणाला परत केले व त्याने ही गोष्ट तुघलक राजाला सांगितली. त्याच्या या प्रामणिकपणाबद्दल त्याला तुघलकाने सैन्यात महत्त्वाचे पद देऊन त्याचा बहुमान केला. परंतु तुघलकाच्या जुलमी राजवटीविरुद्ध त्याच्या मनाला पटेना, म्हणून त्याने बंड केले. परंतु हे सर्व आपण ज्याच्याकडे काम करीत होतो त्या गंगू ब्राह्मणाचे संस्कार होते, असे मानून त्याने हसन गंगू ब्राह्मणी हे नाव धारण केले व त्या ब्राह्मणीचे पुढे बहमनी झाले आणि गंगू हसनच्या घराण्याने हेच नाव पुढे चालू ठेवले. बहमनी नावाने एकंदर अठरा राजांनी राज्य केले).

अशा तऱ्हेने महाराष्ट्रावर इस्लामी सत्ता जवळजवळ ३०० वर्षे आदिलशाही, कुतुबशाही, निजामशाही, बेदरशाही या माध्यमातून व दिल्लीतील मोगलांच्याकडून राबविली जात होती. ज्याज्या राजांनी राज्य केले, त्यांचे नाव व कालखंड खाली देत आहे.

१.३.७ बहमनी राज्यकर्ते (सन १३४७-१५२६)

अ. क्र.	नाव	कारकीर्द
१.	अल्लाउद्दिन बहमनशहा (हसन गंगू)	१३४७-१३५८
२.	महमदशहा प्रथम	१३५८-१३७५
३.	मुजाहिदशहा	१३७५-१३७८
४.	दाऊदशहा	-१३७८
५.	महमूद प्रथम	१३७८-१३९७
६.	गियासुद्दिनशहा	-१३९७
७.	शम्सउद्दीनशहा	-१३९७
८.	तजुद्दीन फिरोजशह	१३९७-१४२२
९.	अहमदशहा वली प्रथम	१४२२-१४३५
१०.	अल्लाउद्दिनशहा अहमद द्धितीय	१४३६-१४५७
११.	हुमायुनशहा जालीम	१४५७-१४६१
१२.	निजामशहा	१४६१-१४६३
१३.	महमदशहा द्धितीय	१४६३-१४८२
१४.	महमूदशहा द्धितीय नामधारी सुलतान	१४८२-१५१८
१५.	अहमदशहा द्धितीय	१५१८-१५२०
१६.	अल्लाउद्दिनशहा तृतीय	१५२०-१५२२
१७.	वल्लीउल्लाशहा	१५२२-१५२६
१८.	कलीमउल्ला शहा	१५२६-१५३८

१.३.८ विजापूरची आदिलशाही आणि अहमदनगरची निजामशाही

अ. क्र.	विजापूर राजाचे नाव	कालखंड
१.	युसूफ आदिलशहा	१४८९-१५१०
२.	इस्माईलशहा	१५१०-१५३४
३.	मल्लूशहा	-१५३४
४.	इब्राहिमशहा प्रथम	१५३४-१५५८
५.	अलीशहा प्रथम	१५५८-१५८०
६.	इब्राहिमशहा द्वितीय	१५८०-१६२७
७.	महमदशहा	१६२७-१६५७
८.	अलीशहा द्वितीय	१६५७-१६७२
९.	शिकंदरशहा	१६७२-१६८६
	अहमदनगर राजाचे नाव	
१.	अहमदशहा प्रथम	१४९०-१५०९
२.	गुरहानशहा प्रथम	१५०९-१५५३
३.	हूसेनशहा प्रथम	१५५३-१५६५
४.	मुर्तझशहा प्रथम	१५६५-१५८८
५.	हूसेनशहा द्वितीय	१५८८-१५८९
६.	इस्माईलशहा	१५८९-१५९१
७.	बुरहानशहा द्वितीय	१५९१-१५९५
८.	इब्राहिमशहा	-१५९५
९.	अहमद (अल्पकाळ)	-१५९५
१०.	बहादूर	१५९५-१५९९
११.	मुर्तझा दुसरा	१५९९-१६३१
१२.	हुसेन तिसरा	१६३१-१६३३

(कर्वे चिं. ग., १९५४ : ५२१)

१.४ शिवपूर्वकाल म्हणजे मध्ययुगीन कालखंड (इ. स. १३४७ ते इ. स. १७२६)

या कालखंडात सरंमजामदारी जीवनपद्धतीचा विकास व धर्मपंथाचा उदय झाला आणि यामुळेच आपली जीवनपद्धती छोट्या-छोट्या केंद्रात विभागली गेली. याचा फायदा परकीयांनी घेतला. आपल्या शेजारील राष्ट्रांमध्ये काय घडते आहे? आपण कसे एकीने राहिले पाहिजे, याची सुतराम जाणीवसुद्धा राहिली नाही याचे कारण स्वायत्तकेंद्र.

म्हणजे उदा.

१. इ.स. आठव्या शतकात सिंध प्रातांवर दहिरसारखा राजा आक्रमण करून सत्ता स्थापन करतो.
२. इ. स. १०२४ ते इ. स. १०२७ च्या दरम्यान गजनीच्या महम्मदानी गुजरातमध्ये सोरटी सोमनाथवर हल्ला केला, मंदिर उध्वस्त केले, मंदिरातील मूर्ती तोडून निघून केला व जाताना अलौकिक व अमूल्य अशी संपत्ती घेऊन गेला. याचे सोयरसुतकही कोणाला नव्हते.

आपण एकाच देशाचे, एकाच संस्कृतीचे आहोत याची जाणीव नष्ट झाली. 'म्हणून देशाच्या ऱ्हासास सुरुवात झाली.

इ. स. १३१८ मध्ये देवगिरीच्या यादवांच्या ऐतिहासिक राज्याची समाप्ती झाली व त्यानंतर अल्लाउद्दीन खिलजी घराण्याचे राज्य सुरू झाले. इ. स. १३१८ च्या सुमारास महाराष्ट्रावर इस्लामी सत्तेने वर्चस्व निर्माण केले. तेव्हापासून जवळजवळ ३ शतके म्हणजे ३०० वर्षे इस्लामी सत्तेने राज्य केले (शेणोलीकर ह.श्री. व देशपांडे प्र. ना., १९५६ : २०५).

यादवी सत्तेच्या पतनानंतर संपूर्ण भारत खंडाचा विचार केल्यास चौदाव्या, पंधव्या व सोळाव्या शतकात मुस्लिम सत्ता वर्चस्वात होत्या, परंतु यामध्ये एक वैशिष्ठ अस होत की, दक्षिण भारतातील राजवटींची स्थिती कोणत्याही एका मुस्लिम एक छत्राखाली नव्हती. (महाराष्ट्र शासन, सातारा गॅझेटिअर, १९६३ : १०४).

विजापूरची आदिलशाही व अहमदनगरची निजामशाही यांच्या सत्ता विवाह संबंधाने जोडल्या असल्या तरी सोलापूरच्या वर्चस्वावरून कायमस्वरूपी आदिलशाही व निजामशाही यांच्यात वैरभाव होता. म्हणूनच मराठा वतनदारांनीआपल्या वतनदारी टिकविल्या व त्यामुळेच आपण राज्यकर्ते आहोत असा भाव निर्माण झाला व राजे यंत्रणा निर्माण झाली. परस्पर संघर्षामुळे मुस्लिम सत्ता क्षीण झाल्या व याचाच फायदा घेऊन सतराव्या शतकात छत्रपती शिवाजी महाराजांचे स्वराज्य निर्माण झाले.

छत्रपती संभाजी महाराज व छत्रपती राजाराम महाराज यांनी राज्य टिकविले व 'मराठा मंडळ' स्थापन केले. पुढे छत्रपती थोरले शाहूंनी त्यांना आणखीनच मोठे केले. त्यामुळे औरंगजेब दक्षिणेवर

मोहिमेवर आला, तेव्हा त्याने मराठ्यांचे थोडेफार राज्य हस्तगत करून परत औरंगाबादेस गेला. तेव्हा छत्रपती थोरले शाहूंच्या व रामचंद्रपंत अमात्य यांच्यासारख्या मराठ्यांना विरोध करणारी एकही मुस्लिम सत्ता नव्हती व त्यामुळेच हिंदू पथपादशाही निर्माण झाली व त्याचे केंद्र सातारा होते.

छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्वराज्य स्थापनेच्या सर्व हालचाली या परिसरात झाल्याने तसेच छत्रपतींनी आपल्या राजधानीचे ठिकाण साताऱ्याच्या पलीकडे रायगडावर अगोदरच सातारा हे महत्त्वाचे ठिकाण होते. त्यानंतर छत्रपती संभाजी महाराज यांचे पुत्र थोरले शाहू महाराज यांनी रायगडावरून राजधानी परत साताऱ्याला स्थलांतरित केली. त्यामुळे मराठा कालखंडात साताऱ्याला नवीन झळाळी प्राप्त झाली. साताऱ्याचा संबंध भोसले घराण्याशी आरंभापासून असल्याचे भोसल्यांच्या बखरीवरून स्पष्ट होते (बेंद्रे वा.सी., १९६७ : ३१ व ३९).

छत्रपती शिवाजी महाराजांच्या महानिर्वाणानंतर त्यांचे ज्येष्ठ पुत्र छत्रपती संभाजी महाराज यांनी नऊ वर्षे राज्य केले. या कालखंडात छत्रपती शंभुराजांना संषर्घ करावा लागला व मोगल, पोर्तुगीज, फ्रेंच व इंग्रज यांना त्यांची ढहशत होती. फंढफितुरीच्या विळख्यात अडकलेल्या काही सरढारांनी औरंगजेबाच्या सरढारांना मढत करून कोकणामध्ये संगमेश्वर या गावी त्यांना पकडून नंतर ३८ ढिवस त्यांचे हालहाल करून क्षेत्र वढू-बुद्रुक याठिकाणी त्यांचा शेवटी अपमानास्पढरित्या वध करून औरंगजेबाने मराठी राज्याला संकटात टाकले. छत्रपती संभाजी महाराजांच्या पत्नी महाराणी येसूबाई व शंभुपुत्र शाहु(वय वर्षे २) यांना अटक करून स्वतःच्या परिवाराबरोबर काही काळ ठेवून नंतर ढिल्लीला नजरकैढेत ठेवले. त्यानंतर महाराष्ट्रातील निष्ठावान मराठा सरढारांनी महाराष्ट्रातील सर्व मराठा सरढारांमध्ये जागृती करून औरंगजेबाला राज्य मिळू ढिले नाही. त्यानंतर छत्रपती राजाराम महाराज व शंभुपुत्र छत्रपती शाहुमहाराज परत स्वराज्यात येईपर्यंत ऐतिहासिक संघर्ष खूप घटनांनी भरलेला आहे. त्याचा संक्षिप्त आढावा पुढील बखरीवरून अभ्यासता येईल.

१.४.१ ठळक प्रसंगांचा कालपट

प्रसंग	बखरींतील काळ (ढिला असल्यास)	चर्चा
१. संभाजी महाराजांचा शेवट		(स-सरढेसाईकृत स्थिरबुद्धी राजारामांचे पृष्ठ) राजारामांच्या मागील बखरींत छत्रपती संभाजी महाराजांच्या चरित्रांत बखरनवीसानें विभवनास संवत्सरे शके १६१०

		असा उल्लेख केला आहे. ११ मार्च १६८१ (स. २२)
२. राजारामाची नजरबंद कैद समाप्त		माघ अमावास्येत (९-२-१६८१) नजरबंदीतून काढून फाल्गुन शु. ३ ला मंचकीं बसविले (स. १७)
३. शपथप्रमाणपूर्वक सर्व सरदारांची राजनिष्ठेविषयीं एकवाक्यता करवून राजाराम रायगड सोडतो		चैत्र व. १० शुक्रवार ५-४-१६८१ (स. १८)
४. संताजी घोरपडे यांस सेनापतिपद	श्रावण शु. ७ शके१६१० विभव संवत्सर	यावेळी छत्रपती संभाजी ह्यात होता तेव्हा येथील तिथी उघड उघड चूक आहे.
५. राजाराम पन्हाळा सोडून विशाळगड रांगण्याकडे		पन्हाळा सोडला-अश्विन व.८ गुरूवार २६ सप्टें. १६८१ (स. २४)
६. चंढीस आगमन		चंढीस पोचला १५-११-१६८१ (स. २५)
७. जुल्फकारखानानें रायगडास ढिलेला १० महिन्यांचा वेढा तह करून उठविला. राजमाता येसूबाई आणि बालराजे शिवाजी यांना कैद केले.		ईतिकदखानास, लढून नव्हे तर सूर्याजी पिसाळाच्या फितुरीने ; मार्गशीर्ष शु. २ रविवार ३-११-१६८१ रोजी गड मिळाला.(स. २०) ईतिकदखानास या कामगिरीमुळे जुल्फकारखान किताब मिळाला.
८. संताजीचें सेनापतिपद काढून महाढजीराव पानसंबळ यांस ढिले	शके १६१२	
९. चंढीस राज्यव्यवस्था सुरू ;सुमुहूर्ती मंचकारोहण व राजमुद्रा.		
१०. प्रल्हाद निराजीस प्रतिनिधिपद ढिले	राज्याभिषेक शक १९, शके १६१४ अंगिरा नाम संवत्सरे	

११. नाटकशाळा सगुणाबाईंस पुत्र-राजा कर्ण.		
१२. विशाळगडावर महाराणी ताराबाईस पुत्रप्राप्ती : राजा शिव (ऊर्फ दुसरा शिवाजी)	शके १६१३ प्रजापति-नाम संवत्सर	
१३. चंढीस राणी राजसबाईस पुत्रप्राप्ती संभाजी राजे.		
१४. चंढीस अंबिकाबाईस कन्या लवकरच निवर्तली.	शके १६१७ श्रीमुखनाम संवत्सरी	
१५. संताजी घोरपडे ह्या सेनापतीच्या बरोबरीचे दोन अधिक हुद्देदार केले. 'सेनासाहेबसुभा' परसोजी भोसले पुरूष होय आणि सरलष्कर सिढोजीराव निंबाळकर		नागपूरकर भोसल्याचा परसोजी भोंसले हा मूळ
१६. चंढीचे कारकिर्दीत प्रतिनिधी आणि अष्टप्रधानमंडळाची नेमणूक झाली.		सन १६९०-९१ (स. ४१ ते ४३) यांतील नावांत आणि स्थिरबुद्धी राजाराममधील नावात काही ठिकाणी फरक आहे.
१७. रामचंद्र नीळकंठ यांस हुकूमतपन्हा किताबत दिली, त्यांचे हुकूम छत्रपतीनींही मोडू नयेत असे करून अष्टप्रधानाप्रमाणे योग्यता करून विशाळगडास वस्त्रे पाठविली		(स. ४२)
१८. पातशाही फौजेशी लढून बागलाण, गुजराथ, गोंडवण, गंगातीर, स्वढेश, कर्नाटक, चंढी वगैरे मुलूख काबीज करण्याचा सपाटा.		
१९. सेनापती संताजी घोरपडे यांजकडून अवज्ञा, त्यावर माने सरदार पाठविले		आषाढमासी (जून १६९७) संता जीस नागोजी माने यांणी महाढेवाजवळ ढगा ढेऊन मारलें असा जेधे शकावलीचा उल्लेख (स.८४)

२०. संताजीचें सेनापतिपद काढून धनाजी जाधवास ढिलें.		मे १६९६ मध्ये (स. ४२)
२१. चंदीस जुल्फकारखानाचा वेढा		२९-८-१६९० (स. २८) पासून ७-२-१६९८ पावेतों.
२२. जुल्फकारखानाची व राजारामाची गुप्त मसलत व राजारामाची जिंजीहून सुटका.		जिंजीच्या सात वर्षांच्या वेढ्यांत जानेवारी १६९३ मध्यें मराठी फौजांनी जुल्फकारखानाच्या फौजेस सळों की पळों करून सोडले होतें त्यावेळी राजारामाच्या कारणानेंच केवळ एकदा जुल्फकारखानाचा जीव वाचला होता.त्या उपकाराची परतफेड म्हणून ही राजारामाची सुटका होय १६९७ (स. ६६-६७)
२३. चंदी पडली.		७-२-१६९८ (स. ६७)
२४. राजाराम विशाळगडी सुखरूप पोहोंचतो.		वेलोरास १-१२-१६९७ स तेथून विशाळगडी २२-२-१६९८ स पोंचला. (स.७२-७३)
२७. मराठेशाही मोडण्याच्या कामांत मेटाकुटीस आलेला पादशहा निराश होऊन मराठ्यांनी चाकरी तरी करावी अशी अट घालून तह करू इच्छितो.		
२६. प्रतिनिधी प्रल्हाद निराजीची आत्महत्या.		१६९४ चे सुमारास.(स.४२)
२७. रामचंद्र नीळकंठ बावडेकर हुकूमतपन्हा यांस अमात्यपद मिळाले.	शके १६१९	अमात्यपद दोघांना ढिले होतें. हणमंत्यांना जिंजीकडे आणि बावडेकरांना महाराष्ट्रात. पुढें राजाराम देशीं परत आल्यावर दोन

		समान पदांऐवजी एकच ठेवणें भाग पडले, त्यावेळीं ते पद अमात्यांना दिलें.
२८. राजाराम साताऱ्याहून सिंहगडास व राहोरी वांबोरीवरून पुणतांबे-पाशी गंगा उतरोन औरंगाबादेच्या पातशाही छावणीवर शाहूस सोडविण्याकरिता साहसी छापा घालतो.		सोलापुरावरून टेंभुर्णीजवळ भीमा उतरून राजारामानें ब्रह्मपुरीच्या बादशाही छावणीवर शाहूस हस्तगत करण्याच्या उद्देशानें हल्ला केला, पण साधला नाही. (स. ८१)
२९. राजाराम पुण्याहून सिंहगडावर राज्याभिषेक गेला . तेथें नवज्वरानें मृत्यू	२६ प्रमाथी नाम संवत्सरशक १६२१ फाल्गुन वद्य	शकफाल्गुन वद्य १ स ३-३-१७०० (स. १०) अल्पकाळ ज्वर येऊन छातीच्या विकाराने रक्ताच्या गुळण्या होऊन त्या आजारानें वारला. अष्टमीसह नवमी(स.१०)
३०. अंबिकाबाई सती जातात.	मृत्यूनंतरच्या तिसऱ्या दिवशी	
३१. ताराबाईपुत्र दुसरा शिवाजी मुंज व राज्याभिषेक पन्हाळा येथें.	इसने मया व अलफ राज्याभिषेक शके २८ शालिवाहन शक १६२३ वृषा संवत्सर	सर जदुनाथ सरकार याची बादशाही तवारिखांच्या आधारें म्हणतात कीं, राजारामाचा दासीपुत्र कर्ण यास गादी मिळाली. पण तो देवींनें ३ आठवड्यांतच वारला, (औरंगझेबचरित्र पृ. १३७)
३२. शाहूच्या नावें सरदेशमुखी वतनें दरशेंकडा १२॥ च्या सनदा.		
३३. बादशहाचा मृत्यु	शके १६२८	२०-२-१७०७ अहमदनगर व्ययनाम संवत्सरी माघ अमावास्येस येथे मेला. (स. २४)

३४. राजसबाईंनी ताराबाई व छत्रपतीशिवाजी यांना नजरबंद केले व संभाजीस गादी ढिली.	सन १७१४ (स. १७४)
३५. छत्रपती शिवाजी (ढुसरा) वारला.	चैत्र शु. २ शके १६२८ व्ययसंवत्सरी
३६. शाहूची सुटका	शके १६२९ सर्वजित नाम संवत्सर

(श्री. वा. सी. बेंद्रे, १९६३ : ४१-४७)

छत्रपती शाहूंची सुटका झाल्यावर साताऱ्याला परत येण्यापूर्वी त्यांना महाराणी ताराबाई यांच्याशी संघर्ष करावा लागला. त्याचा इतिहास पुढे प्रसंगानुसार येणारच आहे, परंतु छत्रपती घराण्याने साताऱ्याशी का संबंध जोडला याचा विचार करू. सातारा हा प्रांत ढेश व कोकण यांना जोडणारा महत्त्वाचा घटक होता. ढेशातून कोकणात जाणारे सर्व व्यापारी मार्ग सातारा जिल्ह्यांतून जात असत. त्यामुळे सातारा जिल्हा हा राजकीयदृष्ट्या महत्त्वाचा होता.

सातारा जिल्ह्यात लहानमोठे ३४ किल्ले असून त्यांतील काही प्राचीन म्हणजेच शिलाहार राजवटीत बांधलेले आहेत. शिवकाळात किल्ला हे संरक्षणाचे प्रभावी माध्यम ठरल्यामुळे किल्लयांचे महत्त्व वाढले.

छत्रपती शिवाजी महाराजांनी बांधलेला प्रतापगडाचा किल्ला हे उत्तम उढाहरण होय. किल्लयांचा जसा राज्य संरक्षणासाठी वापर होता तसाच तुरुंग म्हणूनही वापर केला जातो. उढा. साताऱ्याचा अजिंक्यतारा हा किल्ला. हा पुरातन किल्ला असून शिवशाहीमध्ये व आढिलशाहीमध्येसुद्धा याचा तुरुंग म्हणून वापर केल्याचा स्पष्ट पुरावा आहे. यावरून शिवपूर्वकाळ व शिवकाळात सातारा जिल्ह्याला अनन्यसाधारण महत्त्व आहे (नरवणे एम. एन., १९९५ : १५२ व १५३). छत्रपती शंभुपुत्र शाहू महाराजांनी राजधानी परत रायगडावरून साताऱ्यात आणली. त्यावेळी वाई प्रांत, कऱ्हाड प्रांत, मिरज प्रांत, माण प्रांत, भोर प्रांत, औंध प्रांत, फलटण प्रांत इ. लष्करीदृष्ट्या महत्त्वाच्या ठिकाणांमुळे साताऱ्याच्या गादीचा व्याप आपणास लक्षात येतो. याच काळात आढिलशाही प्रशासन कसे होते ते अभ्यासू.

१.४.२ आदिलशाही प्रशासन

विजापुरातील आदिलशाहीचे प्रशासन मुघलांइतके दक्ष किंवा काटेकोर नसले तरी तुलनात्मकदृष्ट्या ते बऱ्यापैकी काटेकोर असल्याचे दिसते. राजकीय अस्थिरता आणि परस्परातील याढवी ही प्रशासनाच्या अस्थिरतेची मुख्य कारणे असली तरी कुतुबशाही, निजामशाही यांच्या तुलनेत आदिलशाही प्रशासन बरेच स्थिर होते. त्यांच्या प्रदेशात येणाऱ्या शहरी व मैदानी भागावर मुस्लिमांचे वर्चस्व होते व डोंगराळ प्रदेशात हिंदूंचे वर्चस्व होते. डोंगराळ प्रदेशात हिंदू प्रशासक नेमल्यामुळे त्याची महसुली भरणा करण्याची जबाबदारी स्थानिक देशमुखांकडे होती. महसूल हा खेडेगावांनुसार गोळा केला जाई व त्याची जबाबदारी हिंदू सरंजामदारांकडे असे. एकंदरीतच महसूल गोळा करणे, शांतता व सुव्यवस्था ठेवणे याकरिता अमीन या अधिकाऱ्यांची नेमणूक केलेली असे. म्हणजेच अमीन व अंमलदार / सरंजामदार यांच्यावर देखरेख ठेवणाऱ्याला मोकासदार म्हणत असत. त्याचा अधिकार या आदिलशाहीमध्ये फार मोठा होता. त्याच्या गैरहजेरीत जमिनीची कागदपत्रे बनत नसत. त्याचप्रमाणे पहाडी भागातील किल्ल्यांचा कारभार, लष्कर भरती व संरक्षण इ. सर्व व्यवहार हिंदू किल्लेदारांच्या हाती असत. त्यामध्येच असलेल्या एखाद्या एकनिष्ठ मराठा सरदारांच्या नावाने देशमुख अशा पदव्या दिल्या जात असत. म्हणजेच जिल्ह्याच्या प्रमुख अधिकाऱ्याला देशमुख अशी पदवी दिली जात असे (कर्वे चिं. ग., १९७४: ७२४).

भाऊबंदकीचा अभिशाप आदिलशाही व निजामशाही या दोन्ही शाह्यांना आरंभापासून लाभलेला होता. त्यामुळे कुटुंबव्यवस्था वतनदारीमुळे बिघडून गेलेली होती. उदा. मामा-भाचा, मेहुणा-मेहुणा, सासरे-जावई, भाऊ-चुलतभाऊ हे सर्वजण परस्परविरूद्धच्या आदिलशाही, कुतुबशाही, निजामशाहीमध्ये परस्परांना संपविण्याकरिता समोरासमोर उभे ठाकत असत, आदिलशाही, कुतुबशाही राज्यात घोरपडे, जाधव, निंबाळकर यांसारखे मराठा सरदार होते. त्यामुळे नाते हे राजकारणात गौण समजले जाऊ लागले (सरदार दि. बा., १९६० : १०१). याचा फायदा शासनकर्त्यांना म्हणजेच सर्व मुसलमानांना, मोगलांना व सर्व शाह्यांना झाला. थोडक्यात हिंदूंमधील परस्पर याढवीचा मुस्लिम सत्तांनी सुनियोजित वापर केल्याचे दिसते. एकनिष्ठ हिंदू सरंजाम राजा, नाईक, राव आढी पदव्यांनी गौरविले जात असे. त्यामुळे हीच मराठा घराणी पुढे स्थानिक राज्यकर्ते झाल्याचे दिसून येते.

१.४.३ प्रमुख मराठा घराणी

छत्रपती शिवाजी महाराजांच्या म्हणजेच भोसल्यांच्या वंशजांपैकी इंद्रसेन राणा हा साताऱ्याचा म्हणून उल्लेख केलेला आढळतो. तो अहंमदशहा बहमनीच्या समकाली (इ.स. १४०३ ते इ. स. १४७७)

होता. बृहदीश्वराच्या शिलालेखांमध्ये सातारगडाचा उल्लेख येतो. भोसल्यांच्या घरातील शुभकृष्णाच्या नातवाला म्हणजेच भीमसिंहाला राजा घोरपडे बहादूर हा किताब दिला होता. मुधोळ रायबा व वाई हे परगणे बहाल केले होते. (इ. स. १४२७ ते इ. स. १४६०) फलटण तालुक्यातील शिखरशिंगणापूरचे तळे मालोजी राजे भोसले यांनी बांधले होते. ते छत्रपती शिवाजी महाराजांचे आजोबा होते (बेंद्रे वा.सी., १९६७ : ३१ व ३५, ३९ व ७६).

छत्रपती शिवाजी महाराजांचे वडील शहाजी राजे हे आदिलशहांच्या सेवेत जेव्हा दाखल झाले, (इ.स. १६२६ ते इ.स. १६७६) तेव्हा महंमद आदिशहांनी त्यांना पुण्याची जहागीर कायम केली होती. शिवाय त्यांना कऱ्हाड परगण्यातील २२ गावांची देशमुखी व 'राजा' हा किताब दिला होता. थोडक्यात, शहाजीराजांचा अपवाद वगळता शिवाजी महाराजांच्या कुळातील कोणी भोसल्यांनी विजापूरच्या आदिलशहाची सेवा केल्याचे आढळत नाही. याशिवाय सातारा जिल्ह्यामध्ये व पुणे प्रांतामध्ये फलटणचे राव नाईक निंबाळकर हेही घराणे मातब्बर मराठा घराणे म्हणून कार्यरत होते. अशा परिस्थितीमध्ये छत्रपती शिवाजी महाराज, छत्रपती संभाजी महाराज, छत्रपती राजाराम महाराज यांच्या काळात प्रशासकीय बदल कसे होत गेले व संस्थानिकांचे बिजारोपण कसे झाले त्याचा आपण अभ्यास करू.

१.५ सारांश :- या प्रकरणामध्ये महाराष्ट्राच्या प्राचीनतेच्या भूगोलाचा व इतिहासाचा आढावा घेतला आहे. पुराश्म युगापासून ते ऐतिहासिक काळातील राजांनी निर्माण केलेल्या भौगोलिक प्रांतांच्या राज्यांचे राजे उदा. सातवाहन, वाकाटेक, चालुक्य, राष्ट्रकूट, कदंब, शीलाहार ते यादवांपर्यंत यांचा थोडक्यात इतिहास व त्यानंतर आलेले आक्रमक ज्यांनी महाराष्ट्र भूमीवर राज्य केले. त्यामध्ये बहमनी, आदिलशाही, निजामशाही या सर्वांचे कालखंड यांचा आढावा घेऊन शिवपूर्व काल म्हणजे मध्ययुगीन कालखंडाच्या घडामोडी त्यापासून ते महाराष्ट्र भूमीतील लोकांचे सत्व जागृत करणारा राजा शिवछत्रपती व त्यांचे वारस यांच्या कालखंडांच्या धावत्या इतिहासाची नोंद या प्रकरणात घेतली आहे. या कालखंडातूनच भावी संस्थानांची बीजे निर्माण झाली. याचा पुढील प्रकरणात अभ्यास आहे.

१.६ उपसंहार :- महाराष्ट्र हा शब्द ज्या भूभागाला लावला गेला त्या भूभागांची अगोदर व नंतर काय परिस्थिती होती व ती परिस्थिती कशी बदलत गेली, मग ती भौगोलिक रचना असो किंवा इतिहास असो किंवा प्रशासन असो अथवा संस्कृती असो त्यामध्ये कशी स्थित्यंतरे झाली. याचा अभ्यास आपण या प्रकरणात केला आहे. आजचा महाराष्ट्र हा शब्द उच्चारल्यावर एवढा सगळा कालपट उभा राहतो.

प्रकरण दुसरे

महाराष्ट्रातील निवडक संस्थानांच्या निर्मितीचा इतिहास

प्रकरणाचा तपशिल

क्रमांक	तपशिल	पृष्ठ क्रमांक
प्रकरण २ :	महाराष्ट्रातील निवडक संस्थानांच्या निर्मितीचा इतिहास	२७
२.१	संस्थानांची निर्मिती	२९
२.१.१	प्राचीन महाराष्ट्राची प्रशासन यंत्रणा	३७
२.२	सारांश	३७
२.३	उपसंहार	३८
२.४	महाराष्ट्रातील निवडक संस्थानांचे महाराष्ट्राच्या भौगोलिक नकाशावर असणारे स्थान हे दर्शविणारे नकाशाचे चित्र	३९

प्रकरण २

महाराष्ट्रातील निवडक संस्थानांच्या निर्मितीचा इतिहास

२.१ संस्थानांची निर्मिती

महाराष्ट्राच्या इतिहासात सतराव्या शतकात पूर्वार्धामध्ये मराठी सत्तेचा उदय झाला. छत्रपती शिवाजी महाराजांनी उत्तरेकडील मुघल सत्ताधीश विजापूरची आदिलशाही, कोकणातील सिद्दी, गोव्यातील पोर्तुगीज व ठिकठिकाणी वसाहत करून राहिलेले इंग्रज यांच्याशी अविरत संघर्ष करून मराठ्यांचे स्वतंत्र राज्य निर्माण केले. लोककल्याण आणि स्वधर्म रक्षण हा राज्याचा पाया होता. (इ.स. १६३० ते १६८० हा शिवकाल मानला जातो.) छत्रपती शिवाजी महाराजांच्या मृत्यूनंतर मराठ्यांनी छत्रपती संभाजी महाराज, छत्रपती राजाराम महाराज व महाराणी ताराबाई यांच्या नेतृत्वाखाली स्वराज्यासाठी किंवा स्वराज्य रक्षणासाठी संघर्ष करावा लागला, यावेळी शंभुपुत्र छत्रपती शाहुमहाराज व महाराणी येसूबाई हे औरंगजेबाच्या कैदेत होते. साधारणत: इ.स.१६८० ते १७०७ हा सत्तावीस वर्षाचा कालखंड मराठ्यांचा स्वातंत्र्यसंग्राम म्हणून ओळखला जातो.

या स्वातंत्र्यसंग्रामात अनेक अडचणींवर मात करून मराठे विजयी झाले. सत्तावीस वर्षांच्या प्रदीर्घ लढाईनंतरसुद्धा औरंगजेब मराठ्यांचे राज्य नष्ट करू शकला नाही. त्यामुळे अत्यंत निराश मन:स्थितीमध्ये औरंगजेबाचा दि. २० फेब्रुवारी १७०७ मध्ये मृत्यू झाला.

औरंगजेबाच्या मृत्यूनंतर शंभुपुत्र किंवा थोरले शाहुमहाराज यांची मोगलांच्या कैदेतून सुटका दि. ८ मे १७०७ मध्ये झाली. औरंगजेबाच्या मृत्यूनंतरच त्याचा मुलगा अझिमशाह याने त्याचा सल्लागार झुलफिकारखान याच्या सांगण्यावरून शाहूची सुटका केली व नंतर इ. स. १७०८ मध्ये सातारा मुक्कामी छत्रपती शाहूंचा राज्याभिषेक झाला (रानडे म. गो., १८९७ : १४५).

मराठ्यांच्या स्वातंत्र्यसंग्रामात अमात्य, सचिव, सेनापती, प्रतिनिधी यांसारख्या प्रधानांच्या नेतृत्वाखाली मराठा सरदारांनी मुघलांविरुध्द दिलेला लढा असला, तरी काही कर्तृत्ववान मराठा सरदारांनी स्वत:च्या हिंमतीवर स्वतंत्रपणे लढा दिला होता, त्यामुळे सरदारांमध्ये वतनांचा लोभ निर्माण होता. वरील स्वातंत्र्यसंग्रामामुळे नवीन कार्यक्षेत्रे निर्माण करून देणे ही काळाची गरज ठरली. हाच काळ 'प्रशासकीय स्थित्यंतरांचा' काळ ठरला.

मराठ्यांच्या स्वातंत्र्यसंग्रामानंतर अष्टप्रधान मंडळ निष्प्रभ ठरले व नवीन पराक्रम गाजविलेले व स्वत:ची नवीन कार्यप्रणाली निर्माण करणारे सरदार यांचे मराठा मंडळ (चिटणीस के.

एन., १९८७ : १४०-१४४) स्थापन झाले. त्यांना विशिष्ट प्रदेश देण्यात आले. या योजनेचे सार असे होते की,

१. ज्या विशिष्ट प्रदेशात सरदारांनी आपले प्रमुख स्थान निर्माण केले, त्यांनी त्या प्रदेशांचे नियंत्रण व संरक्षण करावे,
२. वसुलीच्या उत्पन्नातून आपला सैनिकांचा खर्च वजा करून उरलेली रक्कम मध्यवर्ती तिजोरीमध्ये भरावी.
३. छत्रपती म्हणजेच शंभुपुत्र शाहुमहाराजांनी निकडीचे बोलविणे केल्यास आपल्या सैन्यांसहित हजर राहून शत्रूविरुध्द त्यास मदत करावी.

या विशिष्ठ प्रदेशालाच मराठा सरदारांनी संस्थान बनविले. यामुळे जी संस्थाने निर्माण झाली, ती संस्थाने स्वत: संस्थानिक राजे म्हणू लागली. ढरम्यानच्या काळात शाहुमहाराजांचे सेनापती धनाजी जाधव यांच्याकडे असलेले कर्तबगार सेनानी म्हणजे कोकणातून आलेले बाळाजी विश्वनाथ (हेरवाडकर वि. र., १९७६ : १७६)या व्यक्तीमुळे पुढील इतिहासाला वेगळे वळण लागले व त्याच कालखंडात रोवले गेलेले बीज नवीन बलाढ्य संस्थाने, नवीन "प्रशासन कार्यपद्धती व सांस्कृतिक बढल घडवत गेले". इ. स. १७१४ ते १८१८ या कालखंडात छत्रपतींचे वंशज शाहू महाराज (सातारा व कोल्हापूर संस्थान) व बाळाजी विश्वनाथ यांचे वंशज बाजीराव पेशवा यांनी महाराष्ट्रावर राज्य केले. नंतर इंग्रजांच्या काळातही संस्थानिकांनी स्वत:चे अस्तित्व ठेवून काही प्रशासकीय बढल केले व काही सांस्कृतिक बढलांना सामोरे जावे लागले. याच काळामध्ये संस्थानिकांनी स्वत:च्या वास्तू राजवाडा सदृश्य निर्माण केल्या. संस्थानिकांनी स्वतंत्र संस्थाने स्वबळावर निर्माण केली व राज्ययंत्रणा राबविण्याकरिता खालील गोष्टींचा विचार केला.

१. संस्थानांच्या प्रशासकीय कक्षेत येणारी भौगोलिक स्थिती
२. संस्थानांच्या प्रशासकीय कक्षेत येणारी कर्तबगार व मुत्सद्दी माणसे
३. संस्थानांच्या प्रशासकीय कक्षेत येणाऱ्या स्थापत्य वास्तू
४. संस्थानांच्या प्रशासकीय कक्षेत येणाऱ्या समाजाची सांस्कृतिक स्थिती
७. संस्थानांच्या प्रशासकीय कक्षेत येणाऱ्या राजकारणांची प्रशासकीय यंत्रणा

महाराष्ट्रातील संस्थानांमधील स्थापत्य, प्रशासन आणि सांस्कृतिक स्थित्यंतरांचा अभ्यास करताना असे निष्कर्ष लक्षात आले की, त्यांनी बांधलेल्या राजवाड्यासारख्या वास्तुंमध्ये राजवाड्यांची निर्मिती करताना त्यांची विशिष्ट प्रकारे अशी रचना केली की, प्रशासकीय काम व समाजाशी निगडित असलेली

काही सांस्कृतिक कार्ये यासाठी वेगळी रचना तयार केली. राजवाड्यांसारख्या वास्तू बांधताना त्यामध्ये मराठा स्थापत्य व पाश्चिमात्य आर्किटेक्चर यांचे मिश्रण करून परंपरा जोपासण्याचा जाणीवपूर्वक प्रयत्न केला आहे. इ. स. १७१४ ते इ. स. १९४९ या दोनशे पस्तीस वर्षांच्या कालखंडात काही सामाजिक व सांस्कृतिक बदल झाले. उदा. बालविवाह असेल, सतीची चाल असेल, प्राण्यांचे बळी देणे इत्यादी गोष्टी, सांस्कृतिक स्थित्यंतरामध्ये समाज प्रबोधन करून संस्थानिकांनी "स्वधर्म टिकवून"स्थित्यंतरे केली. प्रशासकीय कार्यामध्ये अष्टप्रधान मंडळांपासून बदल घडवून, आपल्या कार्यक्षेत्रात येणाऱ्या प्रत्येक गावाचा विचार करून त्याप्रमाणे प्रशासन यंत्रणा शेवटच्या स्तरापर्यंत निर्माण केली. उदा. सुभेदार, दप्तरदार, पोतनीस, मामलेदार, फौजदार व गाव कामगार पाटील इत्यादीपर्यंतच्या सर्व प्रशासकीय व्यवस्था क्रमाक्रमाने काळाची गरज म्हणून प्रशासनात आणल्या गेल्या.

मराठा मंडळ स्थापन होण्यापूर्वी प्रशासन करताना शिवछत्रपती यांनी फक्त मराठी मुलूखावरच राज्य केले, असे म्हणणे अर्ध सत्य ठरेल. शिवछत्रपतींनी मराठी मनावरपण कायमस्वरूपी राज्य केले. असे आजही जाणवते, शिवकाळात (इ.स. १६३० ते १६८०) देशमुखी अस्तित्त्वात होती, वतनदार कुलकर्णी-देशपांडे होते, आडनावे अनेक वेळेस गावांवरून पडत असत. उदा. सातारकर, पैठणकर, करमाळकर, मावडीकर, मालढणपूरकर. त्याचप्रमाणे पदांवरूनही आडनावे निर्माण झाली. उदा. सरसेनापती, सरनौबत, पाटील, देशमुख, चिटणीस, सबनीस, फडणीस, पोतनीस, कारखानीस, पंतसचिव, पंतप्रतिनिधी, शिवकाळी आदिलशाही, निजामशाही, बरीदशाही, कुतुबशाहीबरोबरच दिल्लीचा बादशहा हे मुस्लिम राज्यकर्ते नेहमी आपापसांत सत्ता वाढविण्यासाठी डावपेच (राजकीय) करीत असे. (ढेरे आर. व्ही.,१६९०-१९४८, १८-२०) बहुतांशी राज्य मुस्लिमांनी करायचे व भांडणे स्थानिक मराठा सरदारांमध्ये व्हायची म्हणजे आपणच आपल्या राज्यातील लोकांशी भांडायचे, मारायचे. हे कोणासाठी करायचे तर एखाद्या आदिलशाह, निजाम, मोगल राज्याच्या राज्यविस्तारासाठी म्हणजे मरायचे आम्ही व राज्य करायचे परकीयांनी अशी स्थिती होती, शिवरायांनी ही परिस्थिती बदलण्याकरिता अवघे आयुष्य खर्च केले. शंभुरायांनी स्वत: यातना सहन करीत बलिदान केले. राजारामांनी स्वकीय एकत्र यावेत म्हणून स्वत: कर्तेपण घेऊन प्रयत्न केले व मराठा मंडळ स्थापन केले.

छत्रपती शिवाजी महाराजांनी स्वतंत्र्य राज्याच्या निर्मितीबरोबर राज्य प्रशासन बळकट होण्याकरिता अनेक सक्षम विचारवंत, योद्धे, मुत्सद्दी, व्यवहारकुशल, गुप्तहेरगीरी करणारे, प्रशासन चालवणारे, करारी, कर्तबगार अशी माणसे पारखून त्यांचे अष्टप्रधान मंडळ बनविले. त्यात फक्त

गुणवत्तेला, निष्ठेला व स्वराज्य प्रेमाला स्थान होते. त्यांनी म्हणून अष्टप्रधानांची नेमणूक केली. संभाजी महाराजांनीसुद्धा हीच पद्धत चालू ठेवली होती. तीच पद्धत छत्रपती राजाराम चालू ठेवत असताना मोगलांच्या ससेमिऱ्यामुळे जिंजीला महाराजांना स्वसंरक्षणार्थ जावे लागले. त्याकाळात महाराष्ट्राची राज्यव्यवस्था नीट चालावी म्हणून मराठा मंडळाला छत्रपती राजारामांनी कार्यान्वित केले. (श्री. वा. सी. बेंद्रे, १९६३ : १३) एकूणच प्रशासन व्यवस्था करताना प्रामुख्याने आपल्याकडे असलेल्या राज्यांची भौगोलिक स्थिती, आर्थिक स्थिती, धार्मिक स्थिती व प्रशासनाच्या कक्षेत येणाऱ्या क्षेत्रफळाच्या आकारमानानुसार त्यांची केलेली विभागणी व त्यावरील अधिकारी व्यक्तीची नेमणूक.

या गोष्टींचा विचार मराठा सरदार मंडळींनी केला असावा. एकंदरीत असे इतिहासावरून वाटते. दक्षिण महाराष्ट्रामध्ये पुणे, सांगली, सातारा या ठिकाणी जवळजवळ कमी जास्त प्रमाण थोडेसे बदल करून शिवरायांनी घालून दिलेल्या प्रशासकीय पद्धतीप्रमाणे राज्यव्यवस्था चालू होती. त्यानंतर त्यामध्ये कर्तबगार, मुत्सद्दी लोकांनी स्वत:ची संस्थाने निर्माण करण्यास सुरुवात केली. साधारणत: इ. स. १६९० नंतरच्या काळात ज्या-ज्या सरदारांनी, प्रधानांनी, सरसेनापतींनी, सरनौबतांनी, सचिवांनी व देशमुखांनी, पंतप्रतिनिधींनी आपापल्या ताब्यातील किंवा ज्याकडे त्यांनी लक्ष देण्यास सांगितले त्या मुलखांमध्ये त्यांचे ऐकणारी माणसे छोटा सरदार, पाटील इ. तालुका व गाव स्तरावरच्या लढवय्यांना एकत्रित करून त्यांनी आर्थिक, सामाजिक व भावनिक बंधनांनी एकत्रित करून स्वत:ची ऐकणारी म्हणून एक प्रशासकीय यंत्रणा हळूहळू रूप धरू लागली. (एकबोटे नं. र.,२०१५:११)

एका विशिष्ट प्रांताच्या, मुलुखाच्या प्रशासकीय अधिकाऱ्याने स्वत:च्या अधिपत्याखाली समाज एकत्र आणून स्वत:ची संस्थाने निर्माण होणाऱ्या एका नैसर्गिक पण योजनाबद्धप्रक्रियेला सुरुवात झाली. सध्याच्या महाराष्ट्राच्या इतिहासावरून आपल्याला असे दिसेल, इ. स. पूर्व काळापासून ते आतापर्यंत उदा. मौर्य, चालुक्य, राष्ट्रकुट , शिलाहार, कल्चूरी, यादव इ. स. १४९३ मध्ये मलीक अहंमद, १४८१ मध्ये इसूब आदिलशाह नंतर निजामशाह या तीन्ही शाहांचा अंमल दीर्घकाल होता व पुढे मराठ्यांनी राज्य केले. यावरून आपल्याला सहज लक्षात येईल की, "प्रशासनेसारखी बदलत गेली,"(महाराष्ट्र शासन, सातारा गॅझेटिअर, १९६३ : १०१)जनता म्हणजे रयत यांना कधी समजले नाही की, आपल्यावर कोण, कधी राज्य करतो, पण ही परिस्थिती छत्रपती शिवरायांनी बदलली. याची इतिहासामध्ये नोंद आहेच. परंतु त्यानंतर छत्रपती शिवाजी महाराज, संभाजी महाराज, छत्रपती राजाराम महाराज, छत्रपती शाहुमहाराजांनंतर कोल्हापूर व सातारा अशा दोन गाद्या निर्माण झाल्या. त्यानंतर पेशवे, होळकर, शिंदे यांनी मराठ्यांचे वर्चस्व पुन्हा एकदा सिध्द केले.

त्याच काळात इंग्रज, पोर्तुगीज यांनी पाळेमुळे रोवून आपली स्वत:ची अशी छोटी पण प्रभावी केंद्रे तयार केली. आधुनिक शस्त्रे, कल्पना यांच्या जिवावर त्यांनी अत्यंत समृद्ध अशा भारतावर हळूहळू शस्त्राच्या धाकाने, विज्ञानाच्या आधारावर सुधारणेच्या नावाने हिंदू धर्मातील वाईट प्रथा नष्ट करण्याच्या प्रयत्नातून समाजावर पकड घेत गेले व आपल्यावर राज्य करायला लागले असे सर्वांनाच कळून आले. आपल्यात पडलेली ढुही व तोडा आणि फोडा नीतीमध्ये सुधारणेचा झेंडा व धर्मविषयक भेदभाव निर्माण करणे, एकत्र कुटुंब व्यवस्था फोडणे असे उद्योग चालूच ठेवले.

वरील सर्व परिस्थितीला अर्वाचीन भारतातील घडामोडी असे म्हणतात. साधारणत: १७१० ते १९७० असा २४० वर्षांचा कालखंड साधारणत: इतिहासकारांच्या मते अर्वाचीन भारताचा कालखंड म्हणावा लागेल. मध्ययुगीन पारंपरिक चालीरिती लोप पावू लागल्या व औद्योगिक आणि आर्थिक क्षेत्राबरोबर धर्म आणि शिक्षण या क्षेत्रांतही अत्यंत महत्त्वाचे बदल घडून आले. ही नवी दृष्टी लाभलेल्या भारतीय समाजाने इंग्रजांना घालविण्याचा प्रारंभ केला व अंतिम यश मिळविले.

इ.स. १७०७ मध्ये शाहुमहाराज (छत्रपती संभाजीपुत्र) दिल्लीवरून सुटून महाराष्ट्रात दाखल झाले. इ.स.१७०७ ते १७१३ या कालखंडात महाराणी ताराबाई (छत्रपती राजारामांची पत्नी) यांनी कोल्हापुरात गादी निर्माण केली. परंतु शाहूंना सत्ता घेण्यास त्यांनी नकार दिला. शाहुमहाराजांनी महाराणी ताराबाईंकडील सरदार व मुत्सद्दी माणसे यांना आपणाकडे ओढण्यास सुरुवात केली. यामध्ये त्यांना बाळाजी विश्वनाथ हा कोकणातील मुत्सद्दी व लढवय्या मिळाला व त्यांनी शाहुमहाराजांना खूप मदत केली. बाळाजी विश्वनाथ यांनी कान्होजी आंग्र्यांसारखे सागर सम्राट आपल्या बुद्धी कौशल्याने शहाजी महाराजांच्या बाजूने आणले. (शिवदे सदाशिव, २००८ : १३७)इ. स. १७१३ मध्ये शाहुमहाराजांनी 'पेशवे' पद बहाल केले. बाळाजी विश्वनाथ या पेशव्याने दिल्लीपर्यंत लढाया केल्या व मुत्सद्देगिरीने शाहुमहाराजांचे राज्य व आत्मविश्वास वाढविला व त्यांनी चौथाई मिळवून दिली, ती खालीलप्रमाणे :-

१. त्यांनी दिल्लीच्या बादशहाकडून औरंगाबाद, विदर्भ, खानदेश, बिदर, हैद्राबाद व विजापूर या प्रांतांतील चौथाईचा हक्क बादशहांकडून शाहुमहाराजांच्या पदरात पाडला.

२. माळवा व गुजरातच्या चौथाईचा हक्कपण मिळावा अशी अट बादशहाला घालून शाहुमहाराजांच्या पदरात हा पण टाकला.

३. छत्रपती शिवाजी महाराजांनी स्थापन केलेला मुलूख शाहूमहाराजांकडे परत घेऊन छत्रपतींच्या सरदेशमुखींचा अधिकार मुगल बादशहाने मान्य केला पाहिजे या अटीपण मान्य करून घेतल्या.

अशा पद्धतीने अत्यंत मुत्सद्दी व लढवय्या असलेल्या बाळाजी विश्वनाथांमुळे शाहुमहाराजांचा राज्यविस्तार वाढला. (बेंद्रे वा. सी., : १९७५, घाणेकर एच. के., मुंबई, : ४६४-४७०)याच शाहुमहाराजांच्या कालखंडामध्ये ज्याज्या सरदारांना शंभुपुत्र शाहुमहाराजांनी आपापले प्रांत किंवा वतने सांभाळण्यास दिली होती. त्यात्या वतनांचे सरदार हे संस्थानिक बनले. उदा. छत्रपती शिवाजी महाराजांच्या कार्यकालात सबनिशीचा कारभार, पदभार श्री. नारोपंत मुकुंद हे शंकरजी नारायण यांचे वडील होते. शंकरजी हे मोरोपंत पिंगळे (पेशवे) यांच्याबरोबर काम करीत होते. मोरोपंतांनंतर रामचंद्रपंत अमात्यांसोबत काम करीत होते. त्यांच्यातील कौशल्यामुळे रामचंद्रपंत अमात्य यांनी त्यांना फौजेत दाखल केले.

छत्रपती संभाजी महाराजांच्या बलिदानानंतर छत्रपती राजाराम महाराज मोगलांच्या ससेमिराच्या सततच्या कारवाईला तोंड देत जिंजीस गेल्यानंतर रामचंद्रपंत अमात्य यांच्या सहाय्यास त्यांनी शंकराजी नारायण (भोर संस्थानचे संस्थापक) व परशुराम प्रतिनिधी यांना सोबत उर्वरित महाराष्ट्राचे रक्षण करण्याकरिता ठेवले होते.याचप्रमाणे संताजी घोरपडे व धनाजी जाधव यांनीसुध्दा मोठ्या जबाबदारीने स्वराज्य रक्षण करून औरंगजेबाच्या म्हणजेच मोगलांच्या सेनेवर दहशत निर्माण केली होती, हंबीरराव मोहिते यांच्या हाताखाली ही सर्व मंडळी तयार झाली होती. (रानडे म. गा., १८९७ : १३८) शंकराजी नारायण यांनी एक महत्त्वाचे कार्य केले आणि त्यांनी हे कार्य अशावेळी केले की, छत्रपती संभाजी महाराज यांच्या बलिदानाच्या धक्क्यातून मराठा सरदार सावरत असतानाच त्यांनी मोगलांवर हल्ला करून वाई व प्रतापगड त्यांच्याशी लढून, संघर्ष करून स्वतः युध्द करून स्वराज्यात दाखल केले व वाई आणि प्रतापगड स्वराज्यात दाखल झाले. तसेच ऑक्टोबर १६८९ ते डिसेंबर १६९० याच लागोलाग कालखंडात तोरणा व राजगड हे किल्ले स्वराज्यात आणले. सतराव्या शतकाच्या म्हणजे १६९० ते १६९२ या घराण्याचा उल्लेख राजकारणात येण्यास सुरुवात होते.

मराठ्यांचे राज्य नष्ट करण्याच्या उद्देशाने औरंगजेबाने स्वराज्यातील अनेक किल्ले व त्यालगतचा प्रदेश घेतला. अशी संघर्षाची परिस्थिती निर्माण झाली. संभाजी महाराजांना ठार केल्याची बातमी कळताच मराठा सरदारांनी ताबडतोब राजारामची कैदेतून मुक्तता करून त्यास गादीवर बसविले. वास्तविक याच प्रसंगी राजाराम महाराज पकडले जाणार होते, परंतु मराठा सरदारांची दूरदृष्टी व सैनिकांनी केलेल्या

पराक्रमामुळे राजाराम महाराजांचा संभाजी महाराजांसारखा जो दुर्दैवी शेवट झाला असता तो टळला. अशा परिस्थितीत राजाराम महाराज कर्नाटकातील जिंजी किल्ल्याकडे आश्रयास जाण्याचा निर्णय केला. पुढे जिंजी हे लवकरच मराठ्यांच्या हालचालींचे प्रमुख केंद्र बनले. हे स्वातंत्र्ययुध्द यशस्वी करण्यासाठी राजाराम महाराजांनी अशी घोषणा केली की, जिंकेल तो मुलूख तुमचा, अशा प्रकारे जहागिरी किंवा इनाम जमिनीची लालूच दाखविल्यामुळे सारा महाराष्ट्र मोगलांच्या विरुद्ध युद्धाला तयार झाला. राजछापदी असताना शंकराजी नारायण पंतसचिवांनी स्वराज्यावर आलेले संकट दूर करण्यासाठी मोठा हातभार लावला. शंकराजी नारायण यांनी बजावलेल्या कामगिरीची माहिती रामचंद्रपंत अमात्यांनी जिंजीस राजाराम महाराजांकडे लिहून पाठविली व त्यांच्याकरिता एखाद्या पदासाठी शिफारस केली. शंकराजी नारायण यांस पंतसचिव पदाची वस्त्रे राजाराम महाराजांकडून इ. स. १६९० मध्ये मिळाली तेव्हा पंतसचिवांच्या ताब्यात जुन्नर, पुणे, कडेवळीत, इंदापूर, चौल, राजापुरी, कर्डे व पौडखोरे वगैरे प्रांत असून सुधागड, तोरणा, पुरंदर, वर्धनगड, मनमोहनगड, राजगड, सिंहगड, मृगगड, कावेरीगड, रोहिडा आणि घनगड हे किल्ले होते. शंकराजी नारायण यास पंतसचिव पद प्राप्त झाल्यानंतर त्यांच्या दप्तराकरिता त्यांच्या नावाचा'श्री शंकराजी नारायण' हा शिक्का व पत्र वगैरे पुरे केले असता 'श्रीपत्रमधि रयभाति' हे मार्तब सुरू झाले. शंकराजी नारायण पंतसचिवांच्या अंगी साहस, धैर्य बुद्धिमत्ता इत्यादी अलौकिक गुण होते. ते कलमबहाद्दरीत व मुत्सद्दीपणात निष्णात होते. त्यांच्याकडे जी कामगिरी दिली होती ती उत्तम रितीने बजाविल्यामुळे छत्रपतींच्या अष्टप्रधान पदापैकी पंतसचिव हे महत्त्वपद प्राप्त करून भोर संस्थान संपादन केले (भागवत अ. ना., १९०३ : ६५ व ६६). या भोर संस्थानांची पुढे भव्य वास्तू राजवाडा म्हणून निर्माण झाली. याचे कारण अशा अनेक संस्थानिकांचे भव्य राजवाडे उभे राहिले व त्या राजवाड्यातून राज्याची प्रशासन यंत्रणा काम करू लागली. त्यामुळे मराठा मंडळाने चालू केलेली ही संघर्ष यात्रा इंग्रजांना भारतातून जाईतोपर्यंत स्थानिक महाराष्ट्रीयन लोकांना स्वराज्यामध्ये ठेवण्यात यश मिळाले. या शोधप्रबंधामध्ये सातारा, भोर, औंध, फलटण आणि नागपूर या संस्थानांची निवड केली. तत्पूर्वी प्राचीन महाराष्ट्रामध्ये कशा पध्दतीने राज्ययंत्रणा होती. याचा आपण अभ्यास करू.

२.१.१ प्राचीन महाराष्ट्राची प्रशासन यंत्रणा

प्राचीन महाराष्ट्राच्या प्रशासनाचा शोध घेत जाता आपण सव्वा दोन हजार वर्षांपूर्वीच्या कालखंडापर्यंत जाऊन पोहचतो. उदा. अश्मक, मूलक, राष्ट्रीक, महाराष्ट्रीक, या जनपदांच्या काळात ही प्रशासन यंत्रणा निर्माण झाली असणार. इ. स. पूर्व दोनशेच्या कालखंडामध्ये महाराष्ट्रात सातवाहन राजाचे स्थिर राज्य निर्माण झाले म्हणजे आजच्या मितीला २२१५ वर्षांपूर्वी महाराष्ट्रामध्ये प्रशासन

यंत्रणेला सुरुवात झाली, असे म्हणावे लागेल. इ. स. नंतर २५० वर्षे सातवाहनांचे राज्य टिकले, हे आपणास इतिहासावरून समजते. म्हणजे सुमारे ४५० वर्षे सातवाहन कुटुंबाने राज्य केले. याच वरील कालखंडात दक्षिणपथपती सातकर्णी सातवाहनच्या मृत्यूनंतर त्याची राणी नागणिकेनी राज्यकारभार पाहिला. हे नाणेघाटातील शिलालेखातून स्पष्ट होते. नंदमौर्य साम्राज्याप्रमाणेच महाराष्ट्रातील सातवाहन साम्राज्यही श्रेणीबध्द असेच होते. साम्राज्याची विभागणी 'आहार' व 'पथ' या दोन विभागांमध्ये असे. असे प्रशासकीय यंत्रणेवरून समजते. नाशिकच्या शिलालेखातून आपणास असे आढळते की, प्रत्येक 'आहारावर' अमात्याची नेमणूक असे. कौटिलीय अर्थशास्त्रात अमात्याचे तीन प्रकारे वर्गीकरण केले आहे. उत्तम, मध्यम, आणि अण्वरअमात्य. आजही प्रशासनामध्ये अण्व सचिव हे पद आहे. अमात्याची प्रमुख जबाबदारी जमीन महसुलीची वसुली असे. प्रसिध्द काण्हेरीच्या शिलालेखात राजामात्यांचा उल्लेख आहे. कदाचित केंद्रीय मुख्य राजाच्या अमात्याला 'राजामात्य' म्हणत असावेत. मौर्य प्रशासनात राष्ट्रीक अधिकारी असे. कौटिल्याच्या अर्थशास्त्रात याचा उल्लेख जमीन महसुल वसूल करणारा अधिकार असाच आहे. सातवाहन प्रशासनातल्या 'आहार' व 'पथ'या प्रादेशिक प्रशासनाचा मूळ आधार ग्राम किंवा गाव होता. गावाचा कारभार 'ग्रामीक' पाहत होता, असे आपण पाहिले. हाल सातवाहनाची गाथासप्तशती यामध्ये ग्रामाधिकारी याचा उल्लेख आहे. प्राचीन महाराष्ट्राचे नागरीकरण मागे लिहिल्या प्रमाणे किमान सव्वा दोन हजार वर्षापूर्वी सातवाहनाच्या कालखंडात झाले. याच कालखंडात मोठी मोठी नगरे, बाजारपेठा उदयाला आल्या. या नगर व्यवस्थेमध्ये निगम सभा असत. निगम सभेमध्ये अध्यक्षपद श्रेष्ठी यांना दिले जात असे. निगमाची कार्यकारिणी असायची. कार्यकारिणीच्या सभासदांना पौरवृंद म्हणत असत.

सातवाहन काळात चालू झालेली प्रशासकीय परंपरा अशीच चालू राहिल्या व त्यामध्ये नवीन भर पडतच गेली. महाराष्ट्रा मध्ये सातवाहनाच्या राजवटीनंतर वाकाटक, चालुक्य, राष्ट्रकूट, कल्याणी, चालुक्य वंश, यादव या घराण्यातील प्रशासन व्यवस्था कौटिलीय अर्थशास्त्रानुसार राहिली. उदा. राजाचे मंत्रिमंडळ असे - प्रधान, महाप्रधान, अमात्य इ. असे अधिकाऱ्यांचे उल्लेख शिलालेखात आढळतात. सभा आणि समिती अशा स्वरुपाच्या प्रतिनिधी सभा असत. 'सभापदी' व 'गणपूर्ती' सभा अध्यक्ष यासारखे आजच्या व्यवस्थेतील शब्द आमच्या प्राचीन प्रशासक परंपरेची आठवण करून देत आहेत.

प्राचीन महाराष्ट्राने प्रचंड व्यापार उदीम पाहिला आहे. अगदी रोमपर्यंत महाराष्ट्रातील व्यापारी पोहचले. निरनिराळ्या प्रकारची नाणी वापरात होती. गदायन ही सोन्याची नाणी प्रचारात होती. तर

द्राम हे चांदीचे नाणे होते. प्राचीन प्रशासन व्यवस्थेत करपद्धती होती. पण त्यामध्ये धार्मिक आणि शैक्षणिक क्षेत्र कर पद्धतीत मुक्त ठेवले होते.


यादवकालीन प्रशासनात दुर्ग प्रशासनाला विशेष महत्त्व होते. किल्ला बांधणीचे तंत्र भारतात अगदी मौर्य कालखंडापासून प्रचलित होते. कौटिल्याच्या अर्थशास्त्रात दुर्ग बांधणी संदर्भात सविस्तर उल्लेख आहेतच. यादवांच्या अगोदर प्राचीन महाराष्ट्रातही सातवाहन किल्ला बांधणीला प्रारंभ केला. पुढे वाकाटक, चालुक्य, राष्ट्रकुट या काळातही किल्ले बांधणी सुरू राहिली. उदा. जलदुर्ग, स्थलदुर्ग, गिरिदुर्ग व वनदुर्ग अशा प्रकारचे किल्ले प्राचीन महाराष्ट्रात बांधले गेले. यादवोत्तर कालखंडातल्या मोगल व इतर आक्रमणाच्या धुमश्चक्रीत हे किल्ले पाडले गेले व त्यातील बऱ्याच किल्लयांची छत्रपती शिवाजी महाराजांनी पुनर्बांधणी केली. यामुळेच प्राचीन महाराष्ट्रातील परंपरा पुनर्जीवित झाली. प्राचीन महाराष्ट्रामधील सैनिकी प्रशासनात दंडनायक, महादंडनायक, सैन्याधिपती, सकल सैन्याधिपती, सहानी, पट्टसहानी ही अधिकारपदे होती. त्याचप्रमाणे 'दुर्गाधिपती' हा दुर्ग प्रशासनातला प्रमुख अधिकारी होता. सातवाहनांची राजधानी प्रतिष्ठान (पैठण) ही होती. या प्राचीन महाराष्ट्राने स्थिर असे प्रशासन अनुभवले आहे. या प्रशासनात स्त्रियांचाही लक्षणीय सहभाग होता. हे शिलालेखातून स्पष्ट झाले आहे. तात्पर्य, ही प्रशासन यंत्रणा जवळजवळ दोन हजार वर्षे टिकली व मध्ययुगीन धुमश्चक्रीमध्ये काहीशी विस्कळित झाली. त्यावर नवा इस्लामी साज चढला. परंतु छत्रपती शिवाजी महाराजांनी या प्राचीन परंपरेचे पुनर्जागरण करत महाराष्ट्रीय प्रशासन व्यवस्था नव्याने अष्टप्रधान स्वरूपात उभी केली. मराठी स्वराज्याचे पुनर्स्थापन केले. ते कसे केले हे आपण पुढील विभागात बघू (पांडे श्रीनिवास, २०१३ : ६८).

सारांश :– या प्रकरणामध्ये छत्रपती शिवाजी महाराजांनी निर्माण केलेले स्वराज्य आक्रमकांपासून किंवा मोगलांपासून टिकविण्यासाठी जो संग्राम करावा लागला व त्या संग्रामातूनच मराठा मंडळ तयार झाले. त्या मराठा मंडळातूनच मराठा राज्य टिकविण्याच्या प्रक्रियेतून संस्थानिकांची निर्मिती कशी झाली याचा आढावा घेतला आहे. स्वराज्यामध्ये असलेले कर्तृत्ववान सरदार व छत्रपती राजारामांनी निर्माण केलेल्या सातारा राजधानीचे रूपांतर सातारा संस्थानामध्ये झाले. त्याच अनुषंगाने मराठा मंडळात असणाऱ्या सरदारांनी स्वतःची संस्थाने निर्माण केली. पण ती सर्व संस्थाने सातारा संस्थानच्या अधिपत्याखाली काम करीत असत. याचा आढावा या प्रकरणात घेतला आहे. पुढील प्रकरणात सातारा संस्थानच्या संदर्भात अभ्यास केला आहे.

उपसंहार :- महाराष्ट्रात किंवा संपूर्ण देशात संस्थानिक निर्माण होण्याचे महत्त्वाचे कारण म्हणजे बलाढ्य झालेले स्थानिक सरदार व त्यांनी जनतेत निर्माण केलेली स्वतःची प्रशासकीय कार्ययंत्रणा व जनतेकडून महसूल गोळा करण्याच्या निमित्ताने झालेला संपर्क यामुळेच बलाढ्य सरदार जनतेला राज्यकर्ते वाटू लागले. छत्रपती शिवाजी महाराजांच्यानंतर आलेल्या राजांचे प्रशासकीय यंत्रणेच्या शेवटच्या टोकापर्यंत म्हणजेच सर्वांत कमी अधिकार असलेल्या प्रशासकीय व्यक्तीपर्यंत संपर्क किंवा धाक कमी झाला यामुळेच सरदार स्वकर्तृत्त्वाने संस्थानिक झाले व ती एक काळाची गरज झाली, कारण स्वराज्य संग्रामात (इ. स. १६८० ते इ. स. १७०७) संस्थानिकांचे बीजारोपण झालेले दिसत आहे.

२.४ महाराष्ट्रातील निवडक संस्थानांचे महाराष्ट्राच्या भौगोलिक नकाशावर असणारे स्थान हे दर्शविणारे नकाशाचे चित्र

चित्र क्रमांक : २.१



महाराष्ट्रातील निवडक संस्थानांचे महाराष्ट्राच्या भौगोलिक नकाशावर असणारे स्थान हे दर्शविणारे नकाशाचे चित्र (या प्रबंधातील सातारा संस्थान, भोर संस्थान, फलटण संस्थान, औंध संस्थान व नागपूर संस्थान)

प्रकरण : तिसरे

सातारा संस्थान

प्रकरणाचा तपशिल

क्रमांक		तपशिल	पृष्ठ क्रमांक
प्रकरण	**३:**	**सातारा संस्थान**	**४०**
	३.१	सातारा संस्थानाची प्रशासकीय कार्य यंत्रणा	४६
	३.२	आज्ञापत्र	४७
	३.२.१	राजा व राजधर्म	५०
	३.२.२	प्रधान	५१
	३.२.३	साहुकार	५२
	३.२.४	वतनदार	५३
	३.२.५	वृत्ती आणि इनामे	५४
	३.२.६	दुर्ग	५४
	३.२.७	आरमार	५७
	३.३	मराठ्यांच्या राज्य यंत्रणेतील स्थित्यंतरे	५८
	३.४	प्रशासकीय स्थित्यंतरेका घडली	६०
	३.५	सातारा संस्थानची परंपरागत चालत आलेली प्रशासकीय कार्ययंत्रणा व अष्टप्रधान मंडळ त्यामधील स्थित्यंतरे	६२
	३.५.१	छत्रपती शिवाजी महाराज ते शेवटचे सातारा संस्थानचे शहाजी महाराज उर्फ आप्पासाहेब यांच्यापर्यंत अष्टप्रधान मंडळातझालेली स्थित्यंतरे.	६४
	३.५.२	छत्रपती संभाजी महाराज	६५
	३.५.३	छत्रपती राजाराम महाराज	६६
	३.५.४	छत्रपती थोरले शाहू महाराज	६८
	३.५.५	छत्रपती रामराजे	७०
	३.५.६	छत्रपती शाहू महाराज(धाकटे)आबासाहेब	७२
	३.५.७	छत्रपती प्रतापसिंह महाराज	७२
	३.५.८	छत्रपती शहाजीमहाराज (आप्पासाहेब)	७३
	३.६	अष्टप्रधानांची कामे	७६
	३.६.१	मुख्य प्रधान किंवा पेशवा (पेश्वा)	७६

३.६.२	पंत अमात्य	७७
३.६.३	पंत सचिव	७७
३.६.४	मंत्री	७८
३.६.७	सेनापती	७८
३.६.६	ढानाध्यक्ष किंवा पंडीतराव	७९
३.६.७	सुमंत	७९
३.६.८	न्यायाधिश	८०
३.७	प्रशासकीय यंत्रणेत ढिले जाणारे किताब	८४
३.८	प्रशासकीय कामात ढिली जाणारी पढे	८४
३.८.१	मनसबढार	८४
३.८.२	सुभेढार	८४
३.८.३	जहागिरढार	८४
३.८.४	मोकाशी किंवा मुकासढार	८७
३.९	कनिष्ठ अधिकारी	८७
३.९.१	कारखानिस	८७
३.९.२	सबनिस	८७
३.९.३	पारसनिस	८७
३.९.४	फडणीस	८७
३.९.७	वाकनीस	८७
३.९.६	चिटणीस	८७
३.९.७	पोतनीस	८७
३.९.८	जमेनीस	८६
३.९.९	पोतढार	८६
३.९.१०	ढप्तरढार	८६
३.९.११	मामलेढार	८६
३.९.१२	जकातढार	८६
३.९.१३	हवालढार	८६

३.९.१४	जमादार	८६
३.९.१५	कमाविसदार	८६
३.९.१६	अंमलदार	८६
३.९.१७	रिसालेदार	८७
३.९.१८	भालदार	८७
३.९.१९	चोपदार	८७
३.९.२०	शिरस्तेदार	८७
३.९.२१	जामदार	८७
३.९.२२	खासबारदार	८७
३.९.२३	कारकून	८७
३.१०	सातारा संस्थानची ग्रामपातळी वरील प्रशासकीय कार्ययंत्रणा	८७
३.१०.१	पाटील	८८
३.१०.२	कुललकर्णी	८९
३.१०.३	चौगुला	८९
३.१०.४	शेटे महाजन	८९
३.१०.५	देशमुख	८९
३.१०.६	देशपांडे	९०
३.१०.७	मिरासदार	९०
३.१०.८	बलुतेदार	९०
३.११	साताऱ्याच्या प्रशासकीय कार्ययंत्रणेत परंपरागत चालत आलेली उद्योग व्यवस्था व त्यामधील स्थित्यंतरे	९२
३.१२	अठरा कारखाने	९२
३.१२.१	पीलखान किंवा राजशाळा	९२
३.१२.२	अंढारखाना, आबढारखाना किंवा पानीयशाला	९२
३.१२.३	उंष्ट्रारखाना किंवा उंटशाला	९२
३.१२.४	जवाहीरखान किंवा रत्नशाला	९३
३.१२.५	गाडीखाना किंवा रथशाळा	९३

३.१२.६	फरासखाना किंवा शिबिरशाला	९३
३.१२.७	तालीमखाना उर्फ मल्लशाळा	९३
३.१२.८	जिन्नसखाना	९३
३.१२.९	अंबारखाना किंवा धान्यसंग्रहशाळा	९४
३.१२.१०	तोफखाना किंवा यंत्रशाळा	९४
३.१२.११	शिकारखाना	९४
३.१२.१२	ढफ्तरखान किंवा लेखनशाला	९४
३.१२.१३	मुढलकखाना किंवा पाकशाला	९४
३.१२.१४	नटखाना किंवा नाटक शाला	९५
३.१२.१५	नगारखाना किंवा ढुंढुभिशाला	९५
३.१२.१६	सराफखाना	९५
३.१२.१७	सरबतखाना किंवा वैद्यशाला	९५
३.१२.१८	लकडखाना	९५
३.१३	बारा महाल	९६
३.१३.१	ढारूणी महाल	९६
३.१३.२	खजिना महाल	९६
३.१३.३	अंबार महाल	९६
३.१३.४	पागा महाल	९६
३.१३.५	गोशाला महाल	९६
३.१३.६	बागमहाल	९७
३.१३.७	टांकसाळ महाल	९७
३.१३.८	शिबंढी महाल	९७
३.१३.९	इमारत महाल	९७
३.१३.१०	सौढागिरी महाल	९८
३.१३.११	चौबिक महाल	९८
३.१३.१२	जामढार महाल	९८
३.१४	सातारा संस्थानच्या राजवाड्याचे स्थापत्य	९९

३.१४.१	नवीन राजवाडा	९९
३.१४.२	सभागृहाची रचना :- स्थापत्य	९९
३.१४.३	जुना राजवाडा	१००
३.१४.४	आढालत वाडा	१०१
३.१५	स्थापत्य विषयक महत्वाचे निष्कर्ष	१०१
३.१६	राजवाड्याच्या रचनेचे निरीक्षण व निष्कर्ष	१०१
३.१६.१	सदर किंवा दिवाणखाना	१०१
३.१६.२	दरबार सभागृह	१०२
३.१६.३	आरसे महाल	१०२
३.१६.४	रंग महाल	१०२
३.१७	राजवाड्याच्या स्थापत्यातील बांधकामा संदर्भातील काही निष्कर्ष अभ्यास करून दिसत आहेत.	१०३
३.१८	भोसले घराण्याची वंशावळ	१०३
३.१९	सातारा संस्थानामधील स्थापत्य व संशोधनात्मक निरीक्षण आणि निष्कर्ष	१०७
३.२०	सारांश	१०७
३.२१	उपसंहार	१०८
३.२२	सातारा संस्थानामधील स्थापत्य व स्थापत्या मधील झालेली स्थित्यंतर याचे नकाशे व छायाचित्रे	११०-११३

प्रकरण : ३

सातारा संस्थान

३.१ सातारा संस्थानाची प्रशासकीय कार्ययंत्रणा

साताऱ्याच्या गादीकरिता छत्रपती थोरले शाहू महाराज (छत्रपती संभाजी पुत्र) यांनी अष्टप्रधान मंडळ नेमण्यापूर्वी महाराष्ट्रात बऱ्याच घडामोडी घडत होत्या, छत्रपती संभाजी महाराज यांच्या बलिदानानंतर छत्रपती राजाराम १७ नोव्हेंबर १६८९ रोजी जिंजीस पोहचले. त्यावेळी संभाजी महाराजांनी जे अष्टप्रधान नेमले होते, त्यामध्ये त्यांच्या बलिदानामुळे स्वराज्यात काही काळ गोंधळाची स्थिती निर्माण झाली. छत्रपती संभाजी महाराजांनी जेव्हा राज्याभिषेक करून जेव्हा राज्यारोहण केले, त्यावेळी छत्रपती शिवाजी महाराजांच्या अष्टप्रधान मंडळातील काही महत्त्वाच्या मंडळींवर राजद्रोह अशा स्वरूपाचा आरोप करून त्यांना मारून टाकले व काही नवीन नेमणुका केल्या. पुढे छत्रपती राजारामांच्या काळात शूर मुत्सद्दी सरदारांच्या नेमणुका अष्टप्रधान मंडळात करून प्रशासकीय कार्ययंत्रणा बसविण्याचा चांगला प्रयत्न केला, २ मार्च १७०० या दिवशी छत्रपती राजारामांचे सिंहगडावर महानिर्वाण झाले. त्यानंतर महाराणी ताराबाई यांनी राज्य सांभाळले. छत्रपती राजारामांच्या प्रेरणेतून चालू झालेले मराठा मंडळ यांनी प्रशासकीय कार्यामध्ये नियोजन करून राज्य सांभाळण्यासाठी महत्त्वाचे कार्य केले व हे कार्य चालू असतानाच इ. स. १७०७ मध्ये छत्रपती शाहू यांचे आगमन झाले. महाराणी ताराबाई व छत्रपती शाहू यांच्यात राजकीय स्वरूपाची भांडणे झाली. हे सर्वांनाच ज्ञात आहे. छत्रपती शाहू यांनी सातारा येथे राज्यारोहण केल्यानंतर परत नवीन अष्टप्रधान मंडळ तयार झाले. एकंदर अष्टप्रधान मंडळाचे मागील २० वर्षांत तीन वेळा स्थित्यंतर झाले. छत्रपती थोरले शाहू महाराज यांनी खालीलप्रमाणे अष्टप्रधान मंडळ नेमले.

१. पेशवा : बहिरो मोरेश्वर (यांचे भाऊ याच काळात निळोपंत मोरेश्वर ताराबाईंकडे होते.
   (थोरले शाहू महाराज यांचे चरित्र्य, १९७६ : १७४)
२. सेनापती :- धनाजीराव जाधव (याच काळात पिराजी घोरपडे ताराबाईंकडे होते)
३. सचिव :- नारोशंकर (शंकराजी नारायण यांचे पुत्र, मुतालिक पंताजी शिवदेव)
४. अमात्य :- बाळकृष्ण वासुदेव ऊर्फ अंबुराव हणमंते (मुतालिक प्रथम बाळाजी विश्वनाथ)
७. सुमंत :- महादजी गदाधर (नंतर आनंदराव रघुनाथ)
६. मंत्री :- रामचंद्र पुंडे (नंतर रामचंद्र त्रिंबक)
७. न्यायाधिश :- होनाजी अनंत

८. पंडितराव – प्रथम महाढजी गढाधर नंतर मुद्गलभट उपाध्ये

९. प्रतिनिधी :– गगाधर प्रल्हाढ (परशुराम त्रिंबक हे कैढेत होते)

हे नवीन पढ व नवीन उपक्रम होता. छत्रपती शाहूंनी नवीन प्रतिनिधी पढ तयार करून सर्व अष्टप्रधान मंडळाच्या वरचे स्थान ढिले.

राज्य चालविताना जे काही नियम, धोरणे व बारीकसारीक तपशील सढैव ध्यानात ठेवावे लागत असत, हे सर्व अत्यंत सूक्ष्म व मार्मिक पध्ढतीने त्या-त्या कार्यात राहून व ढूरदृष्टीने धोरणे कशी असावीत, म्हणजेच प्रशासन चालविण्याकरिता यंत्रणा कशी होती हे रामचंद्रपंत अमात्य यांनी लिहिलेल्या राज्यघटनेवरून लक्षात येते (जोशी प्र. ना., १९६० : ६१).

३.२ आज्ञापत्र

(या ग्रंथाचे मूळ हस्तलिखित उपलब्ध नसून इ. स. १८०१ मध्ये नक्कल केलेले हस्तलिखित धुळ्याच्या राजवाडे संशोधन मंढिराच्या ग्रंथालयात प्रत उपलब्ध आहे.)

आज्ञापत्र म्हणजे प्रशासन यंत्रणाच होती. किंबहुना छत्रपती शिवाजी महाराजांच्या मनातील शासनयंत्रणा चालविण्याचा कार्यभार ज्यांनी उचलला, त्या प्रशासन यंत्रणेतील त्यांचे मन जाणणाऱ्या अमात्य या अष्टप्रधान मंडळातील अत्यंत जबाबढार व मुत्सद्दी व्यक्ती रामचंद्रपंत यांनी अंढाजे इ. स. १७१५ मध्ये लिहून काढले. परंतु छत्रपती संभाजी महाराज, छत्रपती राजाराम महाराज, तसेच महाराणी ताराबाई व शंभुपुत्र थोरले शाहू महाराज यांनी जे प्रशासन चालविले ते सर्व या आज्ञापत्रात प्रतिबिंबित आहे. हे आज्ञापत्र म्हणजे मराठ्यांची राज्यघटना व प्रशासकीय राज्यपद्धती राबविण्याची एक पद्धत होती. हे आज्ञापत्र, एकंढर नऊ प्रकरणांत विभागलेले आहे (ढेशपांडे प्र. न., २००५ : ६). त्यामध्ये पहिली ढोन प्रकरणे हे छत्रपतींच्या घराण्याचे ऐतिहासिक वर्णन आहे व प्रकरण तीन ते नऊमध्ये राज्य प्रशासनाचे कार्य व त्याचे महत्त्व व कशा प्रकारे ही राज्यघटना अंमलात आणावी यासंबंधित आढेश व सूत्रबध्ढ निवेढन व सूक्ष्म विचार जाणवतात. या आज्ञापत्रास मराठेशाहीची राजनीती असे संबोधले जाते. या प्रशासन यंत्रणेमध्ये स्वराज्याचे प्रशासकीय तीन विभाग केलेले आढळतात. एक तळघाट, ढोन वरघाट व उर्वरित ढेश असे तीन विभाग केलेले आढळतात आणि मंत्रिमंडळात प्रधानाला सरकारकून हा अतिरिक्त अधिभार ढेऊन त्याची त्या पढावर नेमणूक केली जात असे आणि त्या विभागाची प्रशासकीय जबाबढारी संपूर्णपणे सरकारकुनावरच असे. ही परंपरा छत्रपती शाहू महाराज (छत्रपती संभाजी पुत्र) पर्यंत चालू होती. छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रशासकीय राज्ययंत्रणे मध्ये राजांनी कसे वागावे, कसे

बोलावे, राजघराणे म्हणजे नेमके काय, राजाने राज्यव्यवस्था कशी करावी, राज्यातील सावकार म्हणजे कोण व त्यांचा राज्यासाठी काय उपयोग करून घ्यावा (ढेशपांडे सौ. अ., २०११ : २१).

व्यापार निर्मिती कशी करावी, कोणाशी कसा व्यापार करावा, वतनदार मंडळींची नेमकी कामे काय, त्यांच्याकडून राज्याकरिता काय अपेक्षा आहे, वतनदारांच्या कक्षा राजांनी कशा ठरवाव्यात, त्यांची धार्मिक वृत्ती कशी आहे, राजाने इनामे कोणास द्यावी, राज्यातील गड, कोट, दुर्ग यासंदर्भात महत्त्वाच्या सूचना नव्हे आज्ञा कारण गड हे राज्याचे सार आहे. एकंदर प्रशासन यंत्रणा कशी राबवावी, यासंदर्भातील राजआज्ञा व सर्वांत महत्त्वाचे आरमार त्यासंदर्भात संपूर्ण सावधानता इ. स्वरूपाच्या आज्ञा व प्रबंध यासंदर्भात आज्ञापत्र मार्गदर्शक स्वरूपात राजाज्ञाच असे.

प्रशासकीय कार्ययंत्रणा छत्रपती शिवाजी महाराजांच्या मनात होती, ती प्रत्यक्ष कार्यरत होती. परंतु लिखित स्वरूपात लिहिण्यास त्यांच्या कालखंडात जमले नाही. ती इच्छा रामचंद्रपंत अमात्य यांच्याकडे बोलून दाखविली असता व कालांतराने योग्य वेळ येताच म्हणजे छत्रपती राजारामांचे पुत्र छत्रपती संभाजी (दुसरे) यांच्या आग्रहास्तव इ. स. १७१५ मध्ये लिहून काढली असे दिसते. या रामचंद्रपंत अमात्य यांनी पाच छत्रपतींच्या बरोबरीत काम केलेले होते.

१. छत्रपती शिवाजी महाराज, (स्वराज्य संस्थापक)
२. छत्रपती संभाजी महाराज (स्वराज्य संरक्षक)
३. छत्रपती राजाराम महाराज (स्वराज्य विस्तारक)
४. छत्रपती थोरले शाहू महाराज (स्वराज्य वर्धक)
५. छत्रपती संभाजी महाराज (दुसरे छत्रपती राजाराम पुत्र)(स्वराज्य सुधारक)

या सर्वांबरोबर यांनी काम केले. ते रामचंद्रपंत अमात्य वय वर्षे २३ ते वय वर्षे ६३ या काळात अंदाजे ४० वर्षे स्वतः भोसले घराण्याची सेवा करत होते व महाराष्ट्रातील एकमेव प्रशासकीय अधिकारी एवढी दीर्घ सेवा करणारा भोसले घराण्याला लाभला. त्यांनी या पाचही राजांच्या बरोबरीने व महाराणी ताराबाई यांच्याबरोबर राज्यकारभार केला.


रामचंद्रपंत अमात्य यांच्याबद्दल पुणतांबेकर एस. व्ही., प्रिन्सिपल ऑफ मराठा स्टेट पॉलिसी या लेखकांनी लिहून ठेवलेले संदर्भ (कुलकर्णी अ. रा., २००७ : ३२१).

"Ramchandrapant was one of the most able administrators and statesmen of Shivaji's time. A contemporary chronicle of Shivaji. Krishnaji Anand Sabhasad, has mentioned in his bakhar, the last wish of Shivaji which was : " should the Maratha kingdom break up, three Brahmans, namely. Pralhadpant, Ramchandrapant and Nilopant the

sons of his three trustworthy counselor – administrators, and three Maratha Sardars, Santaji, Baji Ghorpade and Dhanaji Jadhav would alone be able to save it. The Bakharkar further adds that 'Ramchandrapant would become famous in future.'

छत्रपती शिवाजी महाराजांची राज्ययंत्रणा स्थिर व सुखकारक होती. हे न्यायमूर्ती महादेव रानडे यांनी असे वर्णन केले आहे, मराठ्यांचे स्वराज्य छत्रपती शिवाजींनी निर्माण केले ते टिकले याचे कारण राज्य प्रशासन यंत्रणा व या यंत्रणेमुळे महाराजांना पराक्रमाची इमारत उभी करता आली (ढेशपांडे सौ. अ., २०११ : ६७). याचा अर्थ प्रशासकीय कार्ययंत्रणा जेवढी प्रभावी व सूक्ष्म असेल तेवढे यश अधिक मिळणार आणि हीच गोष्ट शिवाजी महाराजांनी जाणली होती व कृतीत आणली होती. म्हणूनच बस्तान बसलेल्या मोगलांच्या राज्याला त्यांनी नामोहरम करून स्वराज्य निर्माण केले. यामुळेच त्यांची यंत्रणा किती प्रभावी होती व प्रशासकीय कामातून त्यांना अष्टप्रधान मंडळाबरोबर काही महत्त्वाचे निर्णय घेता आले.आता आपण प्रत्यक्ष मराठ्यांच्या प्रशासकीय कार्ययंत्रणेची राज्यघटना याचा थोडक्यात अभ्यास खालीलप्रमाणे करू. (आज्ञापत्राच्या पहिल्या दोन प्रकरणामध्ये छत्रपती शिवाजी महाराज व छत्रपती संभाजी महाराज व छत्रपती राजाराम महाराज यांच्यासंदर्भातला इतिहास आहे व प्रत्यक्ष आज्ञा प्रकरण तीन म्हणजेच आज्ञा क्र. ३ पासून चालू होतात. त्यापुढीलप्रमाणे):-

चित्र क्रमांक : ३.१



मूळ आज्ञापत्राचे पहिले पान

३.२.१ राजा व राजधर्म

राजा व राजधर्म यांच्यासंदर्भात प्रशासकीय कार्ययंत्रणेत दिल्या गेलेल्या आज्ञा सारांश रूपाने

आज्ञापत्राची संकल्पना

१. राजा व राजधर्म यासंदर्भात राजाची धर्मविषयक कर्तव्ये प्रज्ञावंत व गुणवंतांचा संगम, युद्धनीतीचा अभ्यास, राज्याचे अर्थकारण, आपल्या मंत्र्यांचा सल्ला व राजकुमारांचे प्रशिक्षण या तीन गोष्टींसंदर्भात आज्ञा देताना राजाने स्वतः धर्माचरणी दृढ राहून राज्यातील देवस्थाने यांना उत्पन्ने करून द्यावीत व राज्यातील सत्पुरुषांचे योगक्षेम चालवून त्यांचा आशीर्वाद संपादित करावा.

२. राजाने स्वःशरीर संरक्षणासंदर्भात सावध राहून स्वतःजवळ अत्यंत विश्वासू व शूर शुभलक्षणी सेवक ठेवावे.

३. मादक द्रव्य सर्वथैव भक्षू नये.

४. सैनिकांकरिता सामग्री व हत्यारे ही स्वतः पूर्णपणे अवगत करून ठेवावीत. म्हणजेच ही सर्व हत्यारे स्वतःला चालविता आली पाहिजेत.

७. राज्यकारभार करताना लोकांचे हित हे मुख्य साध्य आहे, त्यामुळे दरबारात नृत्य, गायन करू नये व चित्त आसक्त होईल असे कृत्य करू नये.

६. भाट किंवा कवी यांना आश्रय द्यावा, परंतु त्यांचा राज्यकारभारात प्रवेश होऊ देऊ नये.

७. राजे लोकांनी दरबारामध्ये विनोदप्रवृत्ती ठेवू नये. आपल्याच शहाणपणावर न जाता त्या कार्यात जे बुध्दिमान असतील, त्यांचाच सल्ला घ्यावा.

८. राज्याचा खजिना नित्यनूतन वाढवावा. त्या कामामध्ये नेहमीपेक्षा जास्त विशेष कार्य ज्याने केले असेल, त्यास अधिक वेतन देऊ नये.

९. आपल्या राज्यातील दुर्ग संरक्षणाकरिता निवडक व शूर आणि त्या योग्यतेची माणसे ठेवावीत.

१०. सैनिकांमध्ये शिस्त कडक ठेवावी. परंतु उत्तम काम केल्यावर त्यांचे म्हणजेच सर्व सैनिकांचे कौतुक करावे. त्यांच्यावर लोभ करून ते निष्ठावान राहतील, असे करावे.

११. स्वराज्य रक्षणासाठी लागणारी सर्व शस्त्रे, विविध प्रकारची हत्यारे व युध्दसामग्री सदैव सज्ज ठेवावी.

१२. आपल्या अवगुणांचा त्याग करून निष्कपटपणे मनुष्यसंग्रह जास्तीत जास्त करावा.

१३. सेवक किंवा चाकर ठेवताना नीटपणे पारखून त्यांच्याबद्दल एखादा सैनिक किंवा अधिकारी जामीन ठेवून मग त्यास सेवक किंवा चाकर म्हणून ठेवावा.

१४. कोणत्याही सेवकाचा दोष स्वतःच्या मुखाने सर्वांसमोर उच्चारू नये.

१५. राजकुमारांच्या शिक्षणाची उत्तम सोय ठेवावी. त्यांना सर्व विद्येत निपुण ठेवावे. त्याकरिता निपुण व पारंगत शिक्षक नेमावेत.

१६. सूक्ष्म विचारवंत आणि निःस्पृह अशी माणसे आपल्याजवळ सतत ठेवावीत. जेणेकरून आपल्या हातून काही गैर घडल्यास आपली कानउघडणी करण्याकरिता त्यांना स्वतःहून अधिकार द्यावा (बनहट्टी श्री.ना.,१९६१: ७०).

१७. राजे लोकांनी खूप सोशीक राहून सेवकांच्या दोषाबद्दल सहिष्णुता धारण करावी.

१८. राजसभेमध्ये काही ज्येष्ठ लोकांनी संताप व अर्वाच्यपणा केल्यास त्यासमयी शांतता धरून त्यांच्या संतोषाकरिता हास्यवदन करावे. कौशल्याने व शहाणपणाने त्यांचे पारिपत्य करावे.

३.२.२ प्रधान

प्रधानाच्या संदर्भात प्रशासकीय कार्ययंत्रणेत दिल्या गेलेल्या आज्ञा सारांश रूपाने

आज्ञापत्राची संकल्पना

आज्ञापत्राच्या चौथ्या प्रकरणात प्रधान व त्याचे कार्य ही संकल्पना स्पष्ट करून सूचनारूपी आज्ञा दिलेल्या आहेत. याठिकाणी प्रधान याचा अर्थ अष्टप्रधान असा महाराजांना अभिप्रेत आहे. अष्टप्रधान मंडळात प्रधान, सेनापती, अमात्य, सचिव, मंत्री, सुमंतन्यायाधीश व पंडितराव यांचा समावेश असे. अष्टप्रधान म्हणजे फक्त कामाची विभागणी नव्हे तर प्रसंगी राजास योग्य सल्ला देणारे व राजास आवर घालणारे व राजाची सत्ता आणि कीर्ती वाढविणारे असे सर्व राजबंधूच होते. ही मूळ कल्पना या राजआज्ञाच्या पाठीमागे दिसते. त्यातील महत्त्वाच्या आज्ञा आपण बघू.

१. प्रधान हेच राज्यलक्षण गृहाचे आधारस्तंभ आहेत.

२. प्रधानांनी शासन चालविताना आपल्या चित्तामध्ये संपूर्ण राज्य लक्षात ठेवून राज्यकारभार करावा.

३. प्रधान म्हणजे सरकारकून, मनुष्य परीक्षा करून नियोजित कार्य धुरंधर पाहून मगच सरकारकूनी करावी (देशपांडे प्र. न., २००७ : ४०).

४. कुलीन व राजधर्म विशारद असून जर अवगुणी कुणी असेल त्याची नेमणूक करू नये.

७. प्रधानाची अवगणना कधीही करू नये. काही दोष घडल्यास त्याची वाच्यता न करता युक्तीने दोष सांडवावा.

६. प्रधानास मुतालिक देणे (वारसदार नेमणे) अशी वेळ आल्यास अगोदरच्या प्रधानाच्या अंगी असलेल्या गुणांनी संपन्न असावा.

७. संपूर्ण राज्यकारभार देश दुर्गाच्या कार्याची व्यवस्था प्रधानाच्या हाती द्यावा व सेना नायकास त्याच्या अधीन ठेवावे.

८. केवळ प्रधानाच्या ओंजळीने राजाने पाणी न पिता, राजाने राज्यकारभाराविषयक वर्तमान स्वतंत्रपणे हाताळावीत.

९. केवळ एक प्रधानाच्या हाती सर्व कारभार असू नये. त्याचबरोबर अनेक सरकारकून (प्रधान) व सेनानायक असावेत. (पायदळ, घोडदळ व नाविकदळ)

३.२.३ साहुकार

साहुकार यांच्यासंदर्भात प्रशासकीय कार्ययंत्रणेत दिल्या गेलेल्या आज्ञा सारांश रूपाने

आज्ञापत्राची संकल्पना

आज्ञापत्राच्या पाचव्या प्रकरणात साहुकार (व्यापारी) या संदर्भातील सूचनावजा आज्ञा आहेत. साहुकारांचे राज्यातील स्थान व त्यांचे महत्त्व या संदर्भात राज्यसंरक्षण कसे केले जाते, अशा संदर्भाच्या आज्ञा आहेत. राज्यकारभारासाठी जे आर्थिक बळ लागते, ते व्यापारी वर्गाकडून मिळते. म्हणून आपल्या राज्यातील साहुकारांचे संरक्षण करणे हे महत्त्वाचे ठरते. त्यासंदर्भात दिलेल्या सूचनावजा आज्ञा कशा आहेत ते बघू.

१. साहुकार म्हणजे राज्याची व राजश्रींची शोभा. याकरिता साहुकारांचा बहुमान चालवावा व त्यांना संतुष्ट राखून सर्व प्रकारच्या वस्तूंचा व्यापार राज्यात करावा.

२. इंग्रज, फ्रेंच इ. टोपीकर हेही साहुकारी (सावकारी) करतात, पण ते इतर भारतीय साहुकारांमध्ये नव्हेत. आपल्या स्वतःचे राज्य वाढवावे. स्वतःची प्रतिष्ठा वाढवावी, याबद्दल टोपीकरांना अभिमान आहे, म्हणून त्यांना जागा कदापीही देऊ नये.

३. नदीकाठावर किंवा खाडीच्या तोंडावर टोपीकर सावकारांना मुळीच जागा देऊ नये.

४. शत्रूच्या मुलखातील साहुकार सापडले तर त्यांना खंड करून त्यांचा बहुमान करावा व त्यांना शासन करू नये.

७. इंग्रज, फ्रेंच, पोर्तुगीज, डच व मोगल यांच्यातील साहुकारांना (सावकारांना) शहरामध्ये जागा देऊ नये. शहरापासून लांब जागा द्यावी व त्यांना इमारत बांधून देऊ नये. एकंदरीतच या आज्ञांमुळे प्रशासकीय कार्ययंत्रणेतील छत्रपती शिवाजी महाराजांची दूरदृष्टी दिसून येते व या आज्ञेचे तंतोतंत पालन जर पुढील राजांनी केले असते तर इंग्रजांनी किंवा ईस्ट इंडिया कंपनीने भारतावर राज्य केले नसते.

३.२.४ वतनदार

वतनदार यांच्यासंदर्भात प्रशासकीय कार्ययंत्रणेत दिल्या गेलेल्या आज्ञा सारांश रूपाने

आज्ञापत्राची संकल्पना

मराठ्यांच्या प्रशासकीय कार्ययंत्रणेमध्ये वतनदार हा नेहमीच महत्त्वाचा घटक असल्यामुळे समाजकारण, अर्थकारण आणि राजकारण यासाठी वतनाधिष्ठित 'गावसत्ता' ही कायमस्वरूपी असल्याने सतत बदलणाऱ्या राजसत्तेपेक्षा वतनदारांच्या अधिपत्याखाली असलेली ग्रामयंत्रणा ही अत्यंत महत्त्वाची होती (कुलकर्णी अ. रा., २००७ : १७१). हे तत्त्व छत्रपती शिवरायांपासून ते आतापर्यंतच्या संस्थानिकांपर्यंत लक्षात आले होते. त्यामुळेच एकेठिकाणी जेधे देशमुख छत्रपती शिवरायांना म्हणतात, हे महाराष्ट्र राज्य आहे, अवघीयांनी हिंमत धरून स्वामी सान्निध्य केले पाहिजे. अशा स्वरूपाचे उद्‌गार काढून छत्रपती शिवरायांना अफजलखानाच्या मोहिमेत मदत करून त्यांच्या पाठीशी उभे राहिले. यावरून आपल्याला असे दिसते की, वतनदारांची मने राजाने सांभाळली होती व त्यांना ते या देशाचा देशनायकच म्हणत असत. यासंदर्भातल्या आज्ञा अशा :

१. राज्यातील वतनदार देशमुख, देशकुलकर्णी व पाटील आढी करून हे राज्याचे ढायढाढ आहे (देशपांडे प्र. न., २००५ : ३०).
२. राजाशी निष्ठेने वर्तावे ही यांची बुद्धी नाही. वतन लोभाने हे परसत्तेचा आश्रय घेतात. या दोषांकरिता यांच द्वेष करून वतने बुडवू नयेत, पण त्यांचे जास्त लाडपण करू नयेत.
३. उच्छृंखल वतनदारास कठीण कार्यावर पाठवून त्यांच्या वृत्तीचा नाश होईल, असे पाहावे.
४. वतनदारास बाह्यतः खुष ठेवावे. पण अधूनमधून त्याच्याकडून द्रव्याची (संपत्ती) मागणी करून त्याला हालकेच करत राहवे.
५. वतनदारांमध्ये कार्य करणारा एखादा प्रामाणिक वतनदार असेल, (उदा. जेधे देशमुख) तर त्यास आदर देऊन संग्रह करावा.

३.२.५ वृत्ती आणि इनामे

वृत्ती आणि इनामे यांच्यासंदर्भात प्रशासकीय कार्ययंत्रणेत दिल्या गेलेल्या आज्ञा सारांश रूपाने

आज्ञापत्राची संकल्पना

वृत्ति म्हणजे निर्वाहाचे साधन म्हणून राजाकडून दिलेले दान असते. इनाम म्हणजे इनाम म्हणून दिलेली जमिन एखाद्या व्यक्तीने केलेल्या कार्याबद्दल बक्षीस म्हणून दिलेली असते. इनामकीच्या जमिनीला सरकारी सारा माफ असतो. तसा उल्लेख इनामकीच्या पत्रात केलेला असतो. वृत्ति या संकल्पनेत धार्मिक कार्यासाठी दिलेली जमिन म्हणजे धर्मार्थ भूमिदान करणे, याचे पुण्य अनंत आहे. अशा धारणेने सुद्धा काही ठिकाणी देवस्थानाकरिता उदरनिर्वाहाचे साधन म्हणून राजाकडून दिलेली असते. यासंदर्भात आज्ञा अशा :

१. वृत्तिलोप करणे हे परमपातक आहे. वृत्तिवंताने महद अपराध जरी केला तरी त्यास शासन करावे, परंतु वृत्ति काढून घेऊ नये.
२. सेवक लोकांनी सेवा उद्दंड केली तरी त्यास नवीन वृत्ति करून देऊ नये. ज्यास वृत्ति करून दिली त्यांचे वंशज हरामखोर निघाल्यास राज्यास अपाय होतो, तेव्हा नूतन वृत्ति कोणास करू देऊ नये.
३. विशेष कार्य केल्यास जर सगळयांनाच भूमी इनाम दिल्या तर राज्य कशाच्या आधारावर करणार याकरिता सरसकट इनामकी वाटत बसू नये.
४. धर्मकार्यार्थ भूमि देणे, थोर देवस्थाने अथवा थोर सत्पुरुषांचे मठ यांच्याकरिता धर्मार्थ सूक्ष्म विचार करून त्यांना भूमि द्यावी.
५. एकदा भूमी दान दिल्यावर त्यावर मात्र स्वतःवर प्राणांत संकट जरी ओढवले तरी दिलेल्या इनामकीमध्ये आचमनभर पाण्याचीसुद्धा आशा ठेऊ नये.

३.२.६ दुर्ग'

दुर्ग यांच्यासंदर्भात प्रशासकीय कार्ययंत्रणेत दिल्या गेलेल्या आज्ञा सारांश रूपाने

आज्ञापत्राची संकल्पना

दुर्गांच्या संदर्भात प्रशासकीय कार्ययंत्रणेच्या आज्ञा सारांश रूपाने महाराष्ट्राच्या प्रशासकीय कार्ययंत्रणेत दुर्गांना केंद्रस्थानी मानूनच स्वराज्याची निर्मिती केली. अगदी प्राचीन काळापासून ते आधुनिक काळातील शतकाच्यापर्यंत दुर्गांचे महत्त्व संपूर्ण जगभर आपल्याला दिसते (देशपांडे सौ. अ., २०११ : २३).दुर्ग म्हणजे दुर्गम ठिकाणी भक्कम बांधकामानी संरक्षित केलेली जागा, छत्रपती शिवाजी

महाराजांच्या अगोदर व त्यांच्या कालखंडात व त्यांच्या नंतरच्याही कालखंडात अनेक राजांनी हे दुर्ग प्राणपणाने जपले व काही दुर्ग स्वतः निर्माण केले. मध्ययुगीन युद्धपद्धतीमध्ये राज्याच्या रक्षणाकरिता गड-कोट-दुर्गांना अत्यंत महत्त्वाचे स्थान प्राप्त झाले होते. बहुतेक राजांच्या राजधान्या या संरक्षित जागा म्हणून त्या राजाच्या दृष्टीने असलेल्या स्वतःच्या मुलखातला जास्तीत जास्त निसर्गतः संरक्षित असलेला स्वतः धनद्रव्य खर्च करून भक्कम तटबंदीसहित संरक्षित केलेला असा किल्ला, गड किंवा कोट राजा राजधानी म्हणून निवडत असे. यासंदर्भात आज्ञापत्रात स्वराज्याच्या दुर्गाकरता सारांशरूपाने आज्ञा अशा आहेत :

१. संपूर्ण राज्याचे सार ते दुर्ग, गडकोट म्हणजेच राज्यलक्ष्मी गडकोट हे प्राणसंरक्षक हे पूर्ण चित्तात आणून त्यांचे संरक्षण करावे व नूतन बांधण्याचा संकल्प करावा.

२. गडकोट संरक्षणाचे कार्य फार नाजूक. ढगा झाला तर स्वस्थळासहित सर्व निर्माण केलेले राज्य हातून निघून जाईल. तेव्हा गडकोटांची देखभाल आणि शासन यामध्ये तिळमात्र अंतर पडू न द्यावे.

३. गड किल्लयांवरील अधिकारी मुख्य म्हणजे हवालदार व सरनोबत तसेच सबनीस व कारखानीस त्याचप्रमाणे तटसरनोबत, नाईकवडी (घोडेस्वार) रजपूत त्यांनी सर्व परमविश्वासाने आपापली कामे चोख ठेऊन कार्य तत्पर रहावे.

४. गडकिल्लयांमध्ये काम करणाऱ्या व्यक्तींमध्ये चोर, व्यसनी, भांग पिणारे, दारू पिणारे, फितवणारे, खुनी अशी मानसिकता असलेली माणसे अधिकारावर ठेऊ नयेत. दर तीन वर्षांनी हवालदार, मामलेदार बदलावेत. दर चार वर्षांनी सरनोबत बदलावा. दर पाच वर्षांनी सबनीस, कारखानीस बदलावेत आणि त्याजागी त्या जागेकरता योग्य गुणसंपन्न नवीन अधिकारी नेमावेत.

५. गड किल्लयाखालील मुलखातील वतनदारांना त्यासमीप असलेल्या किल्लयावरील सेवा सांगू नयेत (बनहट्टी श्री. ना., १९६१ : ११).

६. गडकिल्लांवरील कोणत्याही अधिकाऱ्यांने कुठलाही गुन्हा केल्यास त्यास ताबडतोब खातरजमा करून काढावे. यामध्ये कोणी ढगा करण्याची दुर्बुद्धी धरून कार्य करीत असल्यास त्याची चौकशी करून आरोप खरा ठरल्यास त्याचा शिरच्छेद करावा किंवा तो निरपराध ठरल्यास त्याचे अन्य मार्गाने समाधान करावे व त्याच्या योग्यतेनुसार त्याला दुसरी सेवा देण्यात यावी.

७. गड किल्लयांना गनिमांचा वेढा पडल्यास तो लढविण्याची शिकस्त करावी. आपला स्वतःचा जीव वाचविण्याकरिता किल्ला गनिमाच्या स्वाधीन करता एकवटून विरोध करावा. त्याप्रसंगी प्राणार्पण झाले तरी चालेल.

८. गडकिल्लयांवरील कोणी अधिकारी जीव वाचवून गनिमाकडे गेला असेल तर त्याला एकतर हस्तगत करावा अथवा त्यास अपाय करावा, तसे न झाल्या त्याच्या घरातील बायका मुलांना अटक करावी.

९. गडकिल्लयाची सेवा परम कठीण. त्या सेवेची भीड ज्याच्या अंगात असेल त्यांना किल्लांवर अधिकारी म्हणून नेमू नये.

१०. गड किल्लयांचे तट, बुरूज, ढिंडी ढरवाजे वेळ ढेऊन भक्कम बांधावेत, चोर ढिंड्या ठेवाव्यात.

११. आपण बांधलेल्या गड किल्लाच्या समोर त्याच्या उंचीपेक्षा मोठा डोंगर किंवा पर्वत असू नये (ढेशपांडे प्र. न., २००५ : ३६).

१२. भुईकोट किल्ला असेल तर त्याभोवती रुंढ आणि खोल खंढक खणावा. खंढकानंतर भुईकोट किल्लयाभोवती ढाट झाडी लावून त्यास ढुर्गम करावे. भुईकोट गडाभोवती ढिवसरात्र गस्त ठेवावी. गडावर टाकी व तळी बांधून सैन्याची व अधिकाऱ्यांची पाण्याची व्यवस्था उत्तम ठेवावीच.

१३. गडकिल्लयावरील राजमंढिर उत्तम बांधून त्यावर ढाट चुन्याचा गिलावा करावा. त्यामध्ये सर्वकाळ वस्ती करून त्यास नेटनेटके ठेवावे. संपूर्ण गडावर ठिकठिकाणी केर साचू ढेऊ नये.

१४. धान्याची कोठारे आग व उंढीर यापासून उपद्रव होणार नाहीत, अशा पद्धतीने बांधावीत. तेल व तुपांसाठी वेगवेगळ्या टाक्या कराव्यात किंवा रांजण गाडावेत व त्यात व्यवस्था करावी. ढारूखाना घरांच्या वस्तीपासून लांब असावा.

१५. ढारूगोळा तळघरात व्यवस्थित ठेवावा व त्यावर सक्त पहारा ढिवसरात्र असावा.

१६. गडकिल्लयांच्या तटबुरुजावर योग्य त्या ठिकाणी तोफा व बंढुका यांचा सरंजाम कोणत्याही क्षणी लढाई होईल असा लढाईस तयार अशा स्थितीत ठेवावा.

१७. पर्जन्यकाळी तोफांना व ढरवाजांना तेल-मेण ढेऊन संरक्षित करावे. त्याचप्रमाणे इमारत ढुरुस्तीचा कारखाना ठेऊन राजमंढिरातील व इतर सर्व बांधकामाची ढुरुस्ती त्याचप्रमाणे प्रधान अधिकाऱ्यांची घरे असतील तर त्यांची ढुरुस्ती त्याचप्रमाणे किल्लयावरील अधिकारी व शिबंढी यांची घरे असतील तर त्यांच्या घरांची ढुरुस्ती याचा काळात करू घ्यावी.

१८. गडावरील झाडे-झुडपे जी आहेत, ती राखावीत व नवीन झाडे लावून वृद्धी करावी. एकंदरीत झाडाझोडारा वाढवावा.

११. सर्व गडकिल्ल्यावर ज्योतिष, वैदिक, सर्व प्रकारचे वैद्य, लोहार, सुतार, पाथरवट, चर्मकार ठेऊन गडावरील सर्व उस्तवारी करावा.

३.२.७ आरमार

आरमारासंदर्भात प्रशासकीय कार्ययंत्रणेत दिल्या गेलेल्या आज्ञा सारांश रूपाने

आज्ञापत्राची संकल्पना :- आरमार च्या संदर्भात प्रशासकीय कार्ययंत्रणेच्या आज्ञा सारांश रूपाने

१. भारताच्या प्राचीन काळापासून इतिहास पाहिल्यास समुद्रातीरी असणाऱ्या प्रदेशाकडे किंवा परदेशाकडून भारताकडे येणाऱ्या समुद्र मार्गाकडे भारतीय राज्यकर्त्यांनी विशेष लक्ष दिलेले आढळत नाही. याचे मुख्य कारण म्हणजे विविध समुद्र किनाऱ्यांवर विविध राजांच्या सत्ता होता. त्यामुळे भारताच्या संपूर्ण समुद्रकिनाऱ्यावर कोणाही एका राजाची सत्ता असणे हे अशक्य होते. याचा फायदा सोळाव्या शतकामध्ये परदेशी युरोपीय व्यापाऱ्यांनी उढा. पोर्तुगीज, फ्रेंच व डच यांनी घेतला. या युरोपीय व्यापाऱ्यांनी भारताकडे येण्याचे मार्ग शोधून काढले. कारण त्यांना कल्पना आली होती की, कोणाही एकाच राजाचे साम्राज्य समुद्र किनाऱ्यावर नाही व तशी परिस्थितीही निर्माण झाली होती की, या युरोपीय व्यापाऱ्यांनी ठिकठिकाणी वखारी स्थापना केल्या होत्या. तशातच सिद्दी लोकांनी भारताच्या पश्चिम किनाऱ्यावर म्हणजे कोकणपट्टीवर आपला प्रभाव निर्माण केला. इ. स. १६६० नंतर छत्रपती शिवाजी महाराजांच्या कोकणच्या किनारपट्टीवरील या लोकांच्या हालचाली लक्षात आल्या. युरोपीय व्यापारी व सिद्दी नावीक सरदार यांची विनाकारण सत्ता समुद्रावर वाढली. वखारी निर्माण झाल्या व हे सर्व स्वराज्याच्या निर्मितीमध्ये अडथळे आहेत, हे शिवरायांना प्रकर्षाने जाणवले. यांना उत्तर देण्याकरिता आपणही आरमार निर्माण केले पाहिजे, एक स्वतंत्र यंत्रणा निर्माण करावी लागेल, असा निश्चय त्यांनी केला. शिवरायांनी कल्याण व भिवंडी येथे जहाज बांधण्याचा कारखाना निर्माण केला (सोवनी अविनाश, १९९८ : १०२).

पुढच्या पाच ते सहा वर्षांमध्येच एक सामर्थ्यशाली आरमार उभे करून सर्व युरोपीयन लोकांना उढा. पोर्तुगीज, फ्रेंच व इंग्रज या सर्वांना आश्चर्यचकित करून सोडले आणि म्हणून स्वतंत्र स्वराज्याचे स्वतंत्र आरमार तयार करून परकीय आक्रमणांवर, मोगलांवर व सिद्दीवर राजकीय ढबाव निर्माण केला. यासंदर्भात प्रशासकीय कार्ययंत्रणेला त्यांनी खालील आज्ञा दिल्या,

१. आरमार म्हणजे एक स्वतंत्र राज्य अंगच आहे असे मानावे.

२. राज्य अंग म्हणजेच राज्यव्यवस्थेचे खाते असून आरमाराला स्वतंत्र खात्याचा दर्जा देऊन त्या आरमारास प्रमुख नेमावा.

३. ज्याच्याजवळ आरमार त्याच्याजवळ समुद्र. याकरिता मध्यम आकाराचा गुरबा (जहाज) शस्त्रास्त्रे व शूर माणसे यांनीच उत्तम सजवाव्यात. मोठी जहाजे बांधण्याचे प्रयोजन करावे. त्याकरिता छोटी गलबते, शिवाडे, तारवे अशा स्वरूपाची विविध प्रकारची जहाजे बनवावीत.

४. आरमारास तनखा मुलकी कारभारातून नेमून द्यावा. जहाजाच्या उत्पन्नावर (पैदास्ती) नेमणूक करू नये. तसे केल्या गरिबांस त्रास होईल.

७. आरमाराने हमेशा दर्यात फिरून गनिमाचा बंदोबस्त करावा.

६. दर्यात कोणी स्वराज्यातील साहुकारांचे वाटेस जाऊ नये.

७. गनिमाचे मुलकातील सावकारी दर्यात आल्यास त्यामधील माल जप्त करावा. जर गनिमी आरमाराने युध्द केले, तर आपणही त्याप्रमाणे युद्ध करावे.

८. आरमारास मोठी मोठी लाकडे लागतात. तरी आपल्या राज्यातील अरण्यात सागवानाढी वृक्ष आहेत. ती झाडे त्यात्या हुजुरांच्या परवानगीने तोडून ती जहाज बांधण्याकरिता वापरावीत. सामान्य लोकांनी लावलेली आंबे, फणस इ. झाडे लाकूड कामाकरिता तोडून रयतेला दुःख देऊ नये.

९. रयतेतील एखादे झाड खूप जीर्ण होऊन कामातून गेले असेल, तरी त्या झाडाच्या मालकास द्रव्य द्यावे. त्याच्यावर बळजबरी न करता त्याला संतोष करून मगच झाड तोडून न्यावे.

३.३ मराठ्यांच्या राज्ययंत्रणेतील स्थित्यंतरे

छत्रपती शिवाजी महाराजांच्यापासून म्हणजे शिवकालापासून इ. स. १६८० पर्यंत नंतर छत्रपती संभाजी महाराज काळ इ. स. १६९० पर्यंत, नंतर छत्रपती राजाराम महाराज काळ इ.स. १७०० पर्यंत त्यानंतर महाराणी ताराबाई यांचा कालखंड इ. स. १७०७ पर्यंत त्यानंतर मराठ्यांच्या राज्यावर आलेले छत्रपती शाहू महाराज इ. स.१७४७ पर्यंत या सर्व कालखंडात वरील आज्ञापत्राप्रमाणे मराठ्यांची प्रशासकीय कार्ययंत्रणा चालत होती. न्यायमूर्ती महादेव गोविंद रानडे हे या आज्ञापत्रासंदर्भात म्हणतात, "मराठ्यांचे स्वराज्य छत्रपती शिवाजींनी निर्माण केले, ते टिकले याचे कारण त्यांची राज्यघटना. या राज्यघटनेमुळेच महाराजांना पराक्रमाची इमारत उभारता आली. आज्ञापत्र ही महाराजांच्या मनातील राज्यघटनाच होती." आज्ञापत्र लिहिणारे रामचंद्रपंत अमात्य यांनी मराठ्यांच्याछत्रपती शिवाजी महाराजांपासून पुढील पाचही राजांबरोबर काम केले असल्यामुळे म्हणजे जवळजवळ चाळीस वर्षे ते

राजघराण्याचे सल्लागार होते. त्यामुळे छत्रपती शिवरायांच्या मनातल्या व त्यांच्याशी (अमात्यांशी) बोलल्या गेलेल्या सर्व घटना या राज्यघटनेमध्ये प्रशासकीय कार्ययंत्रणेच्या आज्ञा म्हणूनच गणल्या गेल्या.

छत्रपती शाहूमहाराजांनी आपल्या अंतःसमयी आपली सर्व कार्ये व जबाबदारी म्हणजेच जवळजवळ कुलमुखत्यारप्रमाणे सर्व सत्ता पेशव्यांकडे हस्तांतरित केली. या उद्‌भवलेल्या परिस्थितीमुळे राज्याचा पंतप्रधान (पेशवा) हा जवळजवळ राजाएवढा श्रेष्ठ झाला व छत्रपती घराण्यातील पुढील वारसदार म्हणजे छत्रपती शाहूंनंतर त्यांचे आलेले वारसदार हे नाममात्र वारस राहिले. म्हणूनच प्रशासकीय कार्ययंत्रणेचे छत्रपती शाहूनंतर स्थित्यंतर झाले. इ. स. १७४१ नंतर स्वराज्यात संस्थाने निर्माण झाली. यामध्ये भोरचे संस्थान, औंध संस्थान, सांगली, मिरज व सातारासुद्धा एक संस्थानच होऊन गेले. ही सर्व संस्थाने व इतर काही संस्थाने निर्माण झाली. ती सर्व संस्थाने पेशव्यांच्या अधिपत्याखाली इ. स. १८१८ पर्यंत होती. इ. स. १८१८ मध्ये पेशवाई संपली. पेशव्यांनी निर्माण केलेले साम्राज्य एकहाती इंग्रजांच्या हाती गेले. संपूर्ण देशभरामध्ये निर्माण झालेली ७३८ संस्थाने इंग्रजांच्या हातात गेली. त्यानंतर इंग्रजांची प्रशासकीय कार्ययंत्रणा हळूहळू अंमलात येऊ लागली. महाराष्ट्रात पेशवाई संपल्यापासून ते इंग्रजांचे राज्य जाईपर्यंत सुमारे १३० वर्षांच्या कालखंडात प्रशासकीय यंत्रणेमध्ये स्थित्यंतरे झाली. छत्रपती शाहूंकडे पंतप्रतिनिधी या पदावर असलेले परशुराम त्र्यंबक यांच्यामुळे औंध संस्थान निर्माण झाले. त्या औंध संस्थाननी स्वतःच्या संस्थानची एक राज्यघटना बनवली. अष्टप्रधान मंडळ हे हळूहळू नामशेष झाल्यावर म्हणजेच प्रमुख राजाची पकड सैल झाल्यामुळे प्रधान मंडळातील सर्व कर्तबगार, मुत्सद्दी, शूर, महत्त्वाकांक्षी, लढवय्ये व प्रशासकीय कामाचे ज्ञान असलेले अशा सर्व मंडळींनी आपापल्या प्रभावाखाली असलेल्या क्षेत्रांमध्ये संस्थाने निर्माण केली. परंतु यामुळे एक चांगली घटना अशी घडली की, छत्रपती राजारामांच्या महानिर्वाणानंतर विस्कटलेले स्वराज्य छोट्या-छोट्या संस्थांनामुळे टिकून राहिले. त्यामुळे इंग्रजांच्या हाती जरी एकहाती राज्य असले तरी सामान्य जनतेचे राजे म्हणून या संस्थानिकांना हाताशी धरूनच राज्य करावे लागले. छत्रपती संभाजी महाराजांच्या कालखंडापासून (इ. स. १६८० नंतर) ते महाराणी ताराबाई यांच्या कालखंडापर्यंत (इ. स. १७०७) पर्यंत ही सत्तावीस वर्षे मराठ्यांच्या निर्माण केलेल्या स्वराज्याच्या स्वातंत्र्याचा रणसंग्रामच होता. या रणसंग्रामात छत्रपती राजाराम व छत्रपती शाहू यांनी निर्माण केलेले मराठा मंडळ यांनीच प्रशासकीय कार्ययंत्रणेच्या स्थित्यंतराच्या काळात महत्त्वाची भूमिका बजावली.

३.४ प्रशासकीय स्थित्यंतरे का घडली ?

छत्रपती शिवाजी महाराजांनी लष्करी आणि मुलकी ढोन्ही व्यवस्था वेगवेगळ्या ठेवून ढोन्ही यंत्रणांवर त्यांचा राजा म्हणून नियंत्रण होते. ढोन्ही खात्यांची बांधीव आखणी केल्यामुळे लष्करावर पण ढबाव होता व करवसुलीही होत होती. राज्यकारभाराची प्रशासकीय कार्ययंत्रणा शिवरायांच्या राज्याभिषेकानंतर अधिक चांगल्या स्वरूपात नव्या उत्साहाने कार्यान्वित झाली होती. स्वराज्याची घडी चांगली बसली होती. अशातच इ. स. १६८० मध्ये महाराजांचे चैत्र शु. पौर्णिमेला महानिर्वाण झाले. त्या ढिवशी हनुमानजयंती होती. त्यांच्या महानिर्वाणानंतर राज्यकारभाराच्या पध्ढतीत वेगाने बढल झाले.छत्रपती शिवाजी महाराजांच्या महानिर्वाणानंतर राजकीय परिस्थितीच बढलली. (सोवनी अविनाश, १९९८ : ६४)

वर्षभरातच ढिल्लीचा मोगल बाढशहा औरंगजेब ढक्षिण प्रांतावर विजय मिळविण्यासाठी प्रचंड सैन्यानिशी म्हणजे उढा. घोडढळ, पायढळ, संपत्ती, नोकरचाकर, जनाना, धान्य, राहण्याच्या व्यवस्थेसाठी लागणारे राहुट्या, मंडप, शामियाने इ. साहित्याचा प्रचंड लवाजमा घेऊन सरढारांसह महाराष्ट्रात येऊन थडकला, त्याच्या या स्वारीमुळे व छत्रपती संभाजी महाराजांच्या मर्यादेबाहेर जाणाऱ्या राजकीय अस्थिरतेमुळे मुलकी व्यवस्थेवर ताण पडला, त्यातून प्रजेची अवस्थाही मोगलांच्या सतत स्वाऱ्यांमुळे अतिढयनीय झाली. धनधान्यांची पळवणूक, पिकांची खराबी त्यामुळे सारा वसुली होऊ शकली नाही. या परिस्थितीतही संभाजी महाराजांनी पूर्वीचेच ढंडक पुढे चालू ठेवण्याचा प्रयत्न केला. वतने न ढेता रोख रकमांची पारितोषिके ढेण्याची प्रथा पुढे चालविली. परंतु एकंढरीतच महसूल यंत्रणेत ढिलाई आली होती. जेमतेम आठ वर्षे राज्य करणाऱ्या छत्रपती संभाजी महाराजांना शिवरायांनी स्वराज्याची घातलेली घडी टिकविण्यासाठी घातलेली लष्करी व मुलकी व्यवस्था जशी आहे तशी चालू ठेवण्याकरिता खूपच परिश्रम घ्यावे लागले, तशातच त्यांचे बलिढान झाले. त्यामुळे आणखीनच अस्थिरता निर्माण झाली. स्वाभाविकच प्रशासकीय यंत्रणा स्थित्यंतराच्या मार्गावर जाऊ लागल्या.

छत्रपती संभाजी महाराजांच्या बलिढानानंतर स्वराज्याची प्रशासकीय कार्ययंत्रणा बढलून गेली. मुख्य म्हणजे राजधानी रायगडाचा पाडाव होऊन मोगलांच्या हाती गेली. स्वराज्याचे अतिशय नुकसान झाले. त्यांची पत्नी महाराणी येसूबाई व मुलगा शाहू मोगलांच्या कैढेत गेले. नुकतेच सिंहासनावर बसलेल्या छत्रपती राजाराम महाराजांना जिंजीच्या किल्ल्यावर अक्षरशः पळून जावे लागले. औरंगजेबाने आढिलशाही व कुतुबशाही अशा ढोन प्रबळ राज्यसत्ता संपवून टाकून स्वतःच्या अधीन केल्या. औरंगजेबाच्या व त्यांच्या सरढारांच्या, सैनिकांच्या विकृतीमुळे महाराष्ट्र व कर्नाटक अशा ढोन

प्रांतांतला स्वराज्याचा मुलुख बेचिराख झाला. पर्यायी राज्यव्यवस्था सर्वतः कोलमडली. प्रशासकीय कार्ययंत्रणेचे अस्तित्व अस्पष्ट झाले. राज्याचा महसूल पूर्णपणे थांबला. रायगडावरील अपार संपत्ती औरंगजेबाच्या हाती गेली. हातीच पैसा नाही तर राज्य चालवणार कसे ? हा प्रश्न राजाराम महाराजांना पडला. छत्रपती राजाराम महाराज जिंजीवरून राज्य चालवत होते. परंतु त्याचवेळी महाराष्ट्रात रामचंद्रपंत अमात्य, संताजी घोरपडे, धनाजी जाधव, शंकराजी नारायण (भोर संस्थान संस्थापक) परशुराम त्र्यंबक (औंध संस्थानचे संस्थापक) खंडोजी बल्लाळ इ. मराठ्यांच्या सरदारांनी महाराष्ट्र झुंजवत ठेवला(रानडे म. गो., १८९७ : १३८). तशातच भर म्हणजे ज्या वतनदारांचे वसुली अधिकार काढून छत्रपती शिवाजी महाराजांनी व संभाजी महाराजांनी रोखीच्या नेमणुका करून दिल्या होत्या, त्यांना मोगली अंमलदार (औरंगजेबाचे सरदार) यांनी त्या रोखीच्या नेमणुकांना तुमची वतने परत देतो, परंतु आम्हाला सामिल व्हा, असे फतवे काढून फितवू लागले. जे देशद्रोही होते व लालची होते, ते मोगलांना जाऊन मिळाले. एकंदर परिस्थिती बिकट होत चालली. त्यामुळे पूर्वीची वतनदारी पध्दत माणसे टिकविण्याकरिता पुन्हा चालू करावी लागली.

छत्रपती राजारामांनी जिंजीस राहून वतने देण्याचा उपक्रमच राबविला. परंतु ही वतने नाइलाजाने जरी दिली असली तरी राज्याशी व छत्रपतींशी एकनिष्ठ राहून सेवा देऊ अशा शपथेवर वतने देण्यात आली. हे मोठे प्रशासकीय कार्ययंत्रणेचे स्थित्यंतर झाले. वतनदारी पद्धत परत स्वराज्यात चालू झाली व छोटी छोटी संस्थाने निर्माण होण्याच्या मार्गावर चालू लागली. मराठा मंडळात जे स्वराज्याचे आधारस्तंभ होते, त्यांनी औरंगजेबाने घेतलेले किल्ले परत घेण्याचा सपाटा लावला. त्यामुळे बराचसा भूभाग परत मराठ्यांच्या अधिपत्याखाली आला. छत्रपती राजारामांच्या २ मार्च १७०० मध्ये झालेल्या महानिर्वाणानंतर महाराणी ताराबाई यांनी राज्यकारभार हातात घेतला (शिवदे स. स., २००८ : ६२). वरील मराठा मंडळातील अधिकारी त्यांना मदत करतच होते. त्याचवेळी इ. स. १७०७ मध्ये शंभुपुत्र शाहूंचे आगमन झाले. (औरंगजेबाचा नुकताच मृत्यू झालेला होता व मराठ्यांमध्ये फूट पडावी म्हणून शंभुपुत्र शाहूंना दिल्लीहून महाराष्ट्रात पाठवण्यात आले.) मराठा मंडळामध्ये अस्वस्थतेचे वातावरण निर्माण झाले. नवीन आलेल्या शंभुपुत्र शाहूंना राजा मानायचे का, महाराणी ताराबाईं बरोबर शपथ घेतल्यामुळे त्यांच्याबरोबर रहायचे, असा संभ्रम निर्माण झाला. पुढे छत्रपती शाहू स्वराज्याचे स्वामी झाले. त्या वेळी आलेल्या या प्रचंड राजकीय उलथापालथ व राजकीय अस्थिरतेमुळे राज्य प्रशासन व्यवस्था स्थित्यंतराच्या मार्गावर होती. औरंगजेबाच्या मृत्यूचा फायदा घेऊन छत्रपती शाहूंनी मराठा मंडळाला विश्वासात घेऊन परत राज्याची घडी बसविण्याचा चांगला प्रयत्न केला. छत्रपती शाहू

महाराजांच्या काळात पेशव्यांच्या कर्तृत्वामुळे राज्याची व्याप्ती साम्राज्यात झाली व राज्य प्रशासकीय व्यवस्था हळूहळू स्थिर होऊ लागली.

३.७ सातारा संस्थानची परंपरागत चालत आलेली प्रशासकीय कार्ययंत्रणा व अष्टप्रधान मंडळ त्यामधील स्थित्यंतरे

छत्रपती शिवाजी महाराजांनी इ. स. १६७४ साली चालू केलेल्या सिंहासनाधिष्ठित छत्रपतींची परंपरा त्यांच्या राज्याभिषेकानंतर इ. स. १८४९ पर्यंत चालू होती. म्हणजे जवळजवळ १७५ वर्षे ही परंपरा चालू होती. १८४९ नंतर इंग्रजांनी सर्वस्वी सातारा राज्याचा ताबा घेतल्यामुळे छत्रपतींच्या घराण्याला राज्याधिकार नव्हते. परंतु राजाचे स्थान मात्र कायम होते. अष्टप्रधानांची सर्व कामे इंग्रजांच्या ताब्यात गेल्यामुळे अष्टप्रधानांची आवश्यकताच उरली नाही. यापैकी पंतप्रतिनिधी, पंतसचिव व पंतअमात्य या तिन्ही घराण्यांनी स्वतःचे छोटेसे राज्य तयार केले. तीच संस्थाने निर्माण झाली व त्यांना संस्थानिक म्हणून मान्यता मिळाली. सातारा व कोल्हापूर या छत्रपतींच्या घराण्यालाही संस्थानिकांच्या रांगेत बसवून ठेवले. परंतु अग्रक्रमाने त्यांना मान मिळत असे. एवढे सर्व होऊनही आज जनसामान्यांमध्ये छत्रपतींच्या व इतर संस्थानिकांच्या बद्दल मनामध्ये स्थान आहे.

पहिल्या छत्रपतींपासून ते शेवटच्या छत्रपतींपर्यंत अष्टप्रधानांच्या जागेवर प्रशासकीय कार्ययंत्रणेत कशी कशी स्थित्यंतरे होत गेली, याचा संशोधनात्मक अभ्यास पुढे ढेत आहे. छत्रपती शिवाजी महाराजांचा तसा प्रमुख कालखंड इ. स. १६७६ ते इ. स. १६८० हा २४ वर्षांचा कालखंड म्हणजे प्रचंड परिश्रम. यामध्ये अफजलखान प्रसंग, शाहिस्तेखान प्रसंग, आग्राभेट प्रसंग अशी जिवावर बेतणारी महाअरिष्टे येऊन त्यावर विजय मिळाला व महान स्वराज्य निर्माण केले व मराठ्यांचे छत्रपतिपढ निर्माण केले. सभासद म्हणतो, 'गागाभट्ट संतुष्ट जाले, भटगोसावी यांचे मते मुसलमान बाढशहा तक्ती बसून छत्रपती धरून पातशाही करितात आणि शिवाजीराजे यांनी चार पातशाही ढबविल्या आणि पाऊण लाख घोडा लष्कर गडकोट असे. अस्ता त्यांस तख्त नाही, याकरिता मराठा राजा छत्रपती व्हावा, असे चित्तात आणिले'(कुलकर्णी अ. रा., १९९१ : १७).

महाराष्ट्रातील जनता म्हणजे मराठा व सर्व मराठी जनतेचा राजा म्हणजे राजा छत्रपती शिवाजी महाराज. शिवछत्रपतींनी स्वतःला राज्याभिषेक विधी ७ जून १६७४ व राज्यारोहण समारंभ ६ जून १६७४ रोजी याढिवशी पंडीत गागाभट्ट आणि त्यांचे गुरूबंधू पंडीत अनंतभट्ट यांनी राज्याभिषेक विधी संपूर्ण केला. या विधीमध्ये प्रथम गणेशपूजन, स्वस्तिवाचन, मातृकापूजन, वसुंधरापूजन अशा विधीनंतर नंढीश्राध्ढ, नारायणपूजन आणि आज्याहोम करून आज्याहुती ढिल्या गेल्या. या सर्व

पूजेकरीता राजा सपत्नीक बसलेला असतो. अभिषेकासाठी वेढी किंवा चौधरा बांधण्यात आला. त्यावर पूर्वेला तुपाने भरलेला सोन्याचा कलश, दक्षिणेला दुधाने भरलेला चांदीचा कलश, पश्चिमेला दह्याने भरलेला कलश, उत्तरेला पाण्याने भरलेला मातीचा कलश ठेवण्यात आला. याशिवाय पवित्र सप्तनद्यांचे जल, विविध तिर्थक्षेत्रातील कुंड्याचे जल व समुद्राचे जल आणून ठरलेल्या शुभ्र घटिकेला वेदमंत्राच्या घोषात राजांच्या मस्तकावर अभिषेक केला गेला. नंतर सौम्य उष्ण जलाने स्नान घातले गेले. यानंतर पंचारतीने राजाला ओवाळले गेले. त्यानंतर पातळ तुपाने भरलेल्या काशाच्या परातीत राजाने मुहावलोकन केले. याठिकाणी राज्याभिषेक विधीचा पहिला भाग संपतो. त्यानंतर दुसऱ्या दिवशी राज्यारोहण विधी केला गेला. राजानी राजवस्त्रे व इतर सर्व अलंकार धारण केले होते. ढाल, तलवार आणि क्षत्रिय कुलाची निशाणी म्हणून धनुष्यबाणाची पूजा करून ती शस्त्रे अंगावर धारण करून सजविलेल्या दरबारातील सिंहासनाला प्रथम उजवा गुडघा टेकवून, मस्तक टेकवून सिंहासनाला नमस्कार केला. ठरलेल्या मुहूर्ताच्या वेळी सिंहासनाला पाय न लावता राजांनी त्यावर आरोहण केले. यावेळी राजांच्या डोक्यावर सोन्याचे छत्र धरून वेदमंत्राच्या घोषात राजा छत्रपती झाल्याचे मुख्य उपाध्यायांनी जाहिर केले. नंतर मंगल वाद्ये वाजू लागले. नंतर सोळा सुवासिनींनी राजाला ओवाळले व राज्यारोहण विधी पूर्ण झाला. याच क्षणाला मुख्य प्रधान (पेशवा) राजाच्या मस्तकावर तबकात भरलेली सोन्याची नाणी हळूवारपणे अर्पण करतात. त्यानंतर प्रधानमंडळ मानकरी, सरदार, परराज्यातील वकील व प्रतिनिधी राजांना आहेर अर्पण करतात. राजा मानाप्रमाणे अष्टप्रधान व इतर मानकऱ्यांना राजांनी मानवस्त्रे व शस्त्रे देऊन सन्मान केला. अशा प्रकारे राज्यारोहण समारंभ झाल्यावर छत्रपती श्रृंगारलेल्या हत्तीवरून सर्व लवाजम्यांसहित देवदर्शनास गेले व परत दरबारात आले. त्यानंतर सर्व राज्यरोहण समारंभ संपल्याचे जाहिर केले. अशा प्रकारे छत्रपती शिवाजी महाराज राजे झाले. अशा प्रकारे छत्रपती शिवाजी महाराजांचा राज्याभिषेक झाला व त्यांचे अष्टप्रधान मंडळ म्हणजे प्रशासकीय राज्यव्यवस्था होती. याचा आपण पुढील प्रकरणात अभ्यास करू.

३.७.१ छत्रपती शिवाजी महाराज ते शेवटचे सातारा संस्थानचे शहाजी महाराज ऊर्फ अप्पासाहेब यांच्या पर्यंत अष्टप्रधान मंडळात झालेली स्थित्यंतरे.

चित्र क्रमांक : ३.२



छत्रपती शिवाजी महाराज

राज्याभिषेक इ. स. १६७४, राजधानी-रायगड

मुद्रा : प्रतिपच्चंद्रलेखेव वर्धिष्णुर्विश्ववंदिता

शाहसूनोः शिवस्यैषा मुद्रा भद्राय राजते

मोर्तब-मर्यादेयं विराजते

अष्टप्रधान

मुख्यप्रधान :- पंतप्रधान : मोरोपंत पिंगळे (पेशवे)

पंतसचिव :- आण्णाजी (अनाजी) : दत्तो (सुरनिस)

पंतअमात्य :- रामचंद्र नीळकंठ बहुतकर (मुजुमदार)

मंत्री :- दत्ताजी त्रिंमळ(वाकनीस)

सेनापती :- हंबीरराव ऊर्फ हंसाजी मोहिते (सरनोबत)

सुमंत :- रामचंद्र त्र्यंबक (डबीर)

न्यायाधीश :- निराजी रावजी

याव्यतिरिक्त अष्टप्रधानांमध्ये स्थान नसलेले परंतु छत्रपती शिवाजी महाराजांच्या अत्यंत जवळ असलेले त्यांचे खाजगी सचिव म्हणजे चिटणीस हे पद निर्माण केले होते.

चिटणीस :- बाळाजी आवजी चित्रे (प्रभू)

३.७.२ छत्रपती संभाजी महाराज

चित्र क्रमांक : ३.३



छत्रपती संभाजी महाराज

छत्रपती शिवाजी महाराजांचे वारस त्यांचे ज्येष्ठ पुत्र संभाजीराजे होत. त्यांचा जन्म ज्येष्ठ शु. १२ म्हणजे १४ मे १६७७ रोजी किल्ले पुरंदर येथे झाला. छत्रपती संभाजी महाराजांचा विवाह इ. स. १६६१ मध्ये येसूबाईंशी झाला. त्या पिलाजी शिर्क्यांच्या कन्या होत. संभाजी येसूबाईंचे पहिले अपत्य भवानीबाई होत. त्यांचा जन्म १६७१ मध्ये शृंगारपूर येथे झाला. संभाजी येसूबाईंचे दुसरे अपत्य शाहू महाराज होत. त्यांचा जन्म मुंबई गोवा मार्गावरील माणगाव येथून जवळ असलेल्या गांगोली गावी १८ मे १६८२ रोजी झाला. छत्रपती शिवाजी महाराजांच्या मृत्यूनंतर संभाजी छत्रपती झाले. त्यांचा छत्रपती म्हणून कालखंड इ. स. १६८० ते १६८९ असा आहे. दि. २० जुलै १६८० रोजी संभाजी महाराजांचे सिंहासनारोहण झाले व १६ जानेवारी १६८१ रोजी राज्याभिषेक झाला. त्यांचे अष्टप्रधान मंडळ खालीलप्रमाणे :-

राज्याभिषेक :- इ. स. १६८१, राजधानी : रायगड

शके १७१३ माघ शुध्द सप्तमी किंवा १४ जानेवारी १६८१ रोजी सिंहासनाधिश झाले.

(शिवदे स. स.,२०१२ : ४७)

अष्टप्रधान

पंतप्रधान :- निळोपंत मोरोपंत पिंगळे

पंतसचिव :- अनाजी दत्तो / रामचंद्रपंत

पंतअमात्य :- रघुनाथ नारायण हणमंते, नारोपंत रघुनाथ

मंत्री :- दत्ताजी त्रिमल

सेनापती :- हंबीरराव मोहिते, महादजी सोमाजी पाणसंबळ, संताजी घोरपडे

सुमंत :- रामचंद्र त्रंबक डबीर

न्यायाधीश :- प्रल्हाद निराजी

पंडितराव :- मोरेश्वर रघुनाथ / कवि कलश

छत्रपती संभाजी महाराजांनी बाळाजी आवजी यांना अनावधानाने शासन केले होते, परंतु नंतर लगेचच चूक लक्षात आल्यावर त्यांचा पुत्र खंडोजी बल्लाळ (बाळाजी आवजी यांचा पुत्र) याला चिटणीस म्हणून स्थान देण्यात आले व कलेची उपासना व मंत्रशक्ती जाणणारा कवि कलश याला छंदोगामात्य म्हणून मंडळात सामिल करण्यात आले.

चिटणीस :- खंडो बल्लाळ (बाळाजी)

छंदोगामात्य :- चिटणीस : कवि कलश


११ मार्च १६८९ म्हणजे फाल्गुन वद्य अमावस्या यादिवशी छत्रपती संभाजी राजांना अतोनात छळ करून अतिशय क्रुरपणे ठार केले. श्रीक्षेत्र वढू, ता. शिरूर, जि. पुणे या गावी छत्रपती संभाजी राजांच्या देहाचे तुकडे करून त्यांची अवहेलना केली.

३.७.३ छत्रपती राजाराम महाराज

स्वराज्यासाठी संभाजी राजांनी केलेले बलिदान वाया गेले नाही. संपूर्ण महाराष्ट्र खवळून उठला. छत्रपती संभाजी महाराजांच्या बलिदानाचे दु:ख हदयात बाळगून छत्रपती राजाराम व ताराबाई यांच्या नेतृत्त्वाखाली मराठी जनतेने औरंगजेबाशी अभूतपूर्व महासंग्राम चालू केला. हा संग्राम औरंगजेबाच्या मृत्यूपर्यंत चालू होता. त्यात मराठ्यांचाच विजय झाला. छत्रपती राजाराम यांचा जन्म १४ फेब्रुवारी १६७० मध्ये झाला. प्रकृतीने नाजूक असलेल्या राजारामांना राज्यकारभार व लष्कराचा फारसा अनुभव नव्हता. छत्रपती संभाजी महाराजांच्या बलिदानाच्या घटनेनंतर त्यांची पत्नी महाराणी येसूबाई यांनी अत्यंत धिरोदत्तपणे व स्थिरचित्ताने पुढील पावले टाकली. सरदार संताजीराव घोरपडे, धनाजीराव जाधव, प्रल्हाद निराजी व खंडोजी बल्लाळ अशा प्रमुख मंडळींना एकत्र करून व त्यांच्याशी विचार विनिमय करून स्वराज्य वाचवण्याकरता रायगडावर असलेल्या राजारामांना छत्रपती करण्यात आले. अशा कठीण प्रसंगी महाराणी येसूबाईंनी प्रल्हाद निराजी यांच्या मदतीने स्वराज्यात असलेल्या किल्ल्यांची मजबूती व संरक्षण याकरता योजना तयार केली व सर्व प्रधान मंडळीपुढे मांडली. ९ फेब्रुवारी इ. स. १६८९ रोजी राजारामांना छत्रपती करण्यात आले. महाराणी येसूबाईंच्या योजनेनुसार रामचंद्रपंत

अमात्य, शंकराजी नारायण इ. प्रमुख मंडळींना रायगडातून बाहेर पडून औरंगजेबावर हल्ला करण्यास सांगितले. दि. ७ एप्रिल १६८९ रोजी छत्रपती राजारामांनी सोबत प्रल्हाद निराजी, खंडेराव दाभाडे, खंडो बल्लाळ, संताजी घोरपडे, धनाजी जाधव अशी

चित्र क्रमांक : ३.४



छत्रपती राजाराम महाराज

मातब्बर मंडळी घेऊन प्रतापगडावर गेले. तेथूनच जिंजीला जाण्याचा प्रस्ताव होता. एकंदर ७०० मैलाचा प्रवास व तोही शत्रूच्या राज्यातून अवघड वाटेने जायचे होते. अनेक ठिकाणी टोकाचा विरोध होण्याची शक्यता होती. जिंजीचा किल्ला अत्यंत मजबूत उत्कृष्ट तटबंदीचा शिवाय जिंजीच्या आजूबाजूला मराठे सरदारांचे राज्य असल्यामुळे तेथूनच सुरक्षितपणे राज्य करता येईल असे मुत्सद्दयांचे मत पडले. एकंदरीत सर्वांनी या प्रक्रियेत जिवावर बेतून काम केले. दि. २ नोव्हेंबर १६८९ रोजी छत्रपती राजाराम जिंजीला पोहोचले. तिथे पोचल्यावर अनेक मराठे सरदार राजारामांना मिळाले. उदा. अमृतराव निंबाळकर, नागोजी माने, नेमाजी शिंदे इ. सरदार छत्रपतींना येऊन मिळाले. जिंजीच्या किल्ल्यातच छत्रपती राजारामांनी आपले अष्टप्रधान मंडळ जाहिर केले व रामचंद्र पंत अमात्य यांना हुकूमतपन्हा असा किताब दिला. ते अष्टप्रधान मंडळ खालीलप्रमाणे :-

राज्यारोहण :- इ. स. १६८९ : राजधानी - जिंजी

अष्टप्रधान (मल्हार रामराव चिटणीसकृत छत्रपती राजाराम महाराजांची बखर : २१)

पंतप्रधान :- निळोपंत मोरेश्वर पिंगळे

पंतसचिव :- शंकराजी नारायण

पंतअमात्य :- जनार्दनपंत हणमंते

मंत्री :- रामचंद्र त्र्यंबक पुंडे

सेनापती :- संताजी, घोरपडे, धनाजी जाधव

सुमंत :- महादजी गदाधर

न्यायाधीश :- निराजी रावजी

पंडीतराव :- श्रीकाराचार्य

प्रतिनिधी :- प्रल्हाद निराजी

हुकूमतपनाह :- रामचंद्रपंत निळकंठ


छत्रपती राजाराम महाराजांच्या काळात पंतप्रतिनिधी हे पद निर्माण झाले. त्यानंतर पंतप्रतिनिधी या पदाला नंतरच्या काळात पंतप्रधानाच्या वरचे स्थान देण्यात आले. पंतप्रतिनिधी म्हणजे राजाचाच प्रतिनिधी. छत्रपती जेव्हा नसतील तेव्हा पंतप्रतिनिधीचा अधिकार राजाच्या खालोखाल असे, एवढे महत्त्व छत्रपती शाहूंच्या काळात या पदाला प्राप्त झाले.(हेरवाडकर र. वि., १९७६ : २२)

३.७.४ छत्रपती थोरले शाहू महाराज

औरंगजेबाच्या मृत्यूनंतर मुगल छावणीतून सुटून आलेले शंभूपुत्र शाहू महाराष्ट्रात येताच ताराबाईंनी त्यांना विरोध केला. छत्रपती शिवाजी महाराजांच्या मनात राजारामाला राज्य द्यावयाचे होते. असा ताराबाईंने युक्तीवाद केला. शंभूपुत्र शाहूंनी जवळजवळ तीन महिने महाराणी ताराबाई यांना विविध प्रकारे समजून सांगण्याचा प्रयत्न केला. तोपर्यंत शाहूनगर येथेच मुक्काम करत होते. ऑक्टोंबर १७०७ मध्ये ताराबाईंने शाहूंविरूध्द सैन्य पाठवले. पुण्याच्या दक्षिण सीमेला भीमा नदीच्या काठी खेड येथे (राजगुरूनगर) शाहूंनी छावणी केली. छत्रपती संभाजी महाराजांविषयी जनमानसात आदर असल्याने शाहूंना त्या सहानुभूतीचा फायदा होत होता. त्याचप्रमाणे ताराबाईंनी छत्रपती राजारामांच्या नंतर औरंगजेबासारख्या बलाढ्य सत्ताधीशाबरोबर टक्कर दिली होती. याशिवाय धनाजी जाधवांसारखा कसलेला सेनापती, रामचंद्रपंत अमात्य, शंकराजी नारायण सचिव, परशुराम पंत प्रतिनिधी ही जुनी जाणती मुत्सद्दी माणसे ताराबाईंबरोबर होती. यांच्या जोरावर ताराबाई आपले म्हणणे मान्य करेल, असे वाटत नव्हते. पण अत्यंत संयमाने शाहूंनी परिस्थिती हाताळली. त्यांनी सेनापती धनाजी जाधव व खंडोजी बल्लाळ यांच्याशी संपर्क साधून आपला पक्ष कसा न्याय्य आहे हे पटवून दिले. बाळाजी विश्वनाथांनी मुत्सद्देगीरी करून धनाजी जाधवांना व खंडोजी बल्लाळांना शाहूंच्या बाजूने ओढून घेतले. त्यामुळे ताराबाईंचे मुख्य आधार शाहूंना मिळाल्यामुळे ताराबाईंची परिस्थिती कठीण झाली. लढाई नावाचीच झाली. मुत्सद्देगिरीमुळे शाहूंना ताराबाईंवर विजय मिळवता आला. परशुराम पंत प्रतिनिधी व रामचंद्र पंत अमात्य यांनी ताराबाईंजवळ आणाभाका घेतल्यामुळे नैतिकदृष्ट्या ताराबाईच्या बाजूने

राहिले. खेडपासून राजधानी साताऱ्यापर्यंत येईपर्यंत शाहूंनी रोहीडा किल्ला जो शंकराजी नारायण सचिव यांच्याकडे होता. तो किल्ला सचिवांकडे मागितला. परंतु एकीकडे शाहू महाराज राज्याचे खरे वारसदार व ते नसताना ताराबाईंशी एकनिष्ठता या दोन्ही गोष्टींचा परिणाम होऊन त्यांनी स्वतः आंबवडे येथे द्विधा मनस्थितीत आत्मबलिदान केले. त्याचप्रमाणे अजिंक्यताऱ्यावर असलेला परशुराम पंत प्रतिनिधी हा पण कैद झाला. खरंतर ताराबाई व शाहू दोघांच्या बाजू खऱ्या होत्या. परंतु ताराबाईंच्या हट्टी व आग्रही स्वभावामुळे मराठ्यांची द्विधा मनस्थिती झाली होती.

चित्र क्रमांक : ३.७



छत्रापती शाहू महाराज

त्याचा परिणाम स्वराज्यावर होत आहे हे ताराबाईंच्या लक्षात आलेच नाही. जवळजवळ सर्व मराठा सरदारांनी शाहूंना मान्यता दिल्याने राजधानी सातारा शाहूंच्या ताब्यात आली. इ. स. १७०८ मध्ये १२ जानेवारीला साताऱ्याला शाहूंनी राज्याभिषेक करून घेतला व तेथेच स्वतःचे अष्टप्रधान मंडळ घोषित केले. ते खालीलप्रमाणे :-

अष्टप्रधान

पंतप्रतिनिधी :- गढाधर प्रल्हाद, परशुरामपंत त्र्यंबक

पंतप्रधान :- बाळाजी विश्वनाथ भट, बाजीराव बाळाजी

पंतसचिव :- नारोपंत शंकराजी (अल्पवयीन) मुतालिक पंताजी शिवदेव

पंतअमात्य :- अंबराव बापूराव हणमंते, महादजी गढाधर

मंत्री :- नारोराम शेणवी

सेनापती :- धनाजीराव जाधव, मानसिंग मोरे, खंडेराव दाभाडे

सुमंत :- महादजी गढाधर, आनंदराव रघुनाथ

न्यायाधीश :- होनाजी अनंत

पंडीतराव :- मुद्गल भट्ट उपाध्ये

याशिवाय खंडोबल्लाळ यांना चिटणीसपद देण्यात आले व छत्रपती शाहूंनी ताराबाईंच्या बाबत समझोत्याची भूमिका स्विकारली व वारणा नदीच्या दक्षिणेकडील प्रदेश व किल्ला ताराबाईंना व त्यांचा मुलगा शिवाजी (द्वितीय)यांना देण्याचे मान्य केले. ताराबाईंनी यास नकार दिला व कोल्हापूर आपली राजधानी बनवली. त्यामुळे मराठ्यांची परत एकदा द्विधा मनस्थिती झाली.

नोव्हेंबर १६९७ मध्ये औरंगजेबाने जिंजीला वेढा घातला. या वेढ्यातून छत्रपती राजारामांनी सुटून २२ फेब्रुवारी १६९८ ला राजाराम महाराज विशाळगडला आले. छत्रपती महाराष्ट्रात परतल्याने मराठ्यांचा उत्साह द्विगुणित झाला होता. रायगड मुघलांच्या ताब्यात असल्यामुळे छत्रपती राजारामांनी सातारा आपली राजधानी बनविली. मधल्या काळात सेनापती संताजी घोरपडेंचा स्वकीयांशी कलह होऊन मृत्यू झाला. तरीही मुगलांवर आक्रमण करण्याची योजना छत्रपती राजारामांनी संपूर्ण महाराष्ट्राचा दौरा करून ठरविली. या योजनेनुसार मध्य महाराष्ट्रात धनाजीराव जाधव व हणमंतराव निंबाळकर, खानदेशात नेमाजी शिंदे व विश्वासराव पवार, वऱ्हाडात परसोजी भोसले, उत्तर कर्नाटकात बर्हिजी घोरपडे यांना आपले कार्यक्षेत्र वाटून दिले. छत्रपती राजारामांच्या योजनेनुसार मराठ्यांनी आक्रमक धोरण स्विकारल्याचे दिसताच औरंगजेबाने पण जोर लावला. याचवेळी अत्यंत अल्पशा आजाराने सिंहगडावर छत्रपती राजारामांचा मृत्यू झाला. तो दिवस होता २ मार्च १७०० त्यावेळी राजारामांचे वय ३० वर्षे होते.

छत्रपती शाहू महाराजांच्या प्रशासकीय कार्ययंत्रणेत इ. स. १७१४ मध्ये आपल्याला असे आढळले की, पंतप्रतिनिधी, पंतसचिव, पंतप्रधान व पंतअमात्य ही पदे पुढे परंपरागत नेमून तशी पत्रे त्यांना दिली. छत्रपती शिवाजी महाराजांच्या काळात अशी पद्धत नव्हती.

३.७.७ छत्रपती रामराजे

छत्रपती राजारामांच्या अकाली मृत्यूने खचून न जाता त्यांची पत्नी ताराबाई व मुलगा शिवाजी (दुसरा) यांना १० मार्च १७०० रोजी गादीवर बसवले. त्यावेळी शिवाजी (दुसरा) यांचे वय ४ वर्षे होते. राज्याची सर्व सूत्रे ताराबाईंनी हाती घेतली. मराठ्यांमध्ये प्रचंड उत्साह निर्माण केला. भोसले घराण्याशी प्रामाणिक असलेले रामचंद्र पंत अमात्य यांनी अत्यंत चातुर्याने ताराबाईंना साथ देत सर्व मराठा सरदारांना एकत्र केले व त्यांना प्रचंड आत्मविश्वास दिला. सर्व मराठे सरदार उत्साहित झाले. कठोर परिश्रम करण्यास तयार झाले. याचा परिणाम म्हणून पुन्हा एकदा मराठे व औरंगजेब यांचे एकमेकावर हल्ले चालू झाले. औरंगजेबाने मराठ्यांचे किल्ले जिंकून घेतले पण त्याचा जास्त फायदा झाला

नाही, कारण थोड्याच दिवसांनी ते किल्ले रामचंद्र पंत अमात्य, शंकराजी नारायण, परशुराम पंत प्रतिनिधी, धनाजीराव जाधव, यांच्या कुशल नेतृत्त्वामुळे परत स्वराज्यात येत होते. अशा परिस्थितीत ७ वर्षे मराठा सरदारांनी कडक झुंज दिली. २७ वर्षे औरंगजेबाचे सैन्य अत्यंत कठीण परिस्थितीमध्ये महाराष्ट्रात झुंजत होते. औरंगजेबाचे वय ८८ वर्षे झाले होते. या म्हाताऱ्याला शेवटपर्यंत मराठ्यांना जिंकता आले नाही. २० फेब्रुवारी १७०७ मध्ये अहमदनगर येथे औरंगजेब मृत्यू पावला. त्याच्या मृत्यूपर्यंत ताराबाई व मराठा सरदारांनी धारदार असा संघर्ष केला व मराठ्यांचाच अंतिम विजय झाला.

(कोल्हापूरचे छत्रपती शिवाजी महाराज यांचे पुत्र, छत्रपती शाहू महाराजांच्यानंतर साताऱ्याच्या गादीवर दत्तक म्हणून आले.) राज्याभिषेक इ. स. १७४१, राजधानी : सातारा

छत्रपती रामराजे यांच्या काळात प्रशासकीय कार्ययंत्रणेत अष्टप्रधानांपैकी चारच नेमणुका दिसतात, कारण राज्याचा कारभार सर्वतोपरी पेशवे म्हणजेच पंतप्रधानाकडेच असल्यामुळे अन्य प्रधानांचे महत्त्व कमी झालेले दिसते.

प्रतिनिधी, सचिव ही दोन पदे वंशपरंपरेने दिली गेली व सेनापती पदावर संताजी घोरपड्यांच्या वंशजांचे युद्धकौशल्य बघून मुरारराव घोरपडे यांची नेमणुक केली.

मुख्य प्रधान किंवा पंतप्रधान :-

बाळाजी बाजीराव (नानासाहेब पेशवे) इ. स. १७६१ पर्यंत

थोरले माधवराव पेशवे इ. स. १७७३ पर्यंत

नारायणराव पेशवे इ. स. १७७३ मध्ये

रघुनाथराव पेशवे इ. स. १७७३ चे काही महिने

सवाई माधवराव पेशवे इ. स. १७७४ ते १७७७

पंतप्रतिनिधी :- जगजीवन परशुराम, श्रीनिवास गंगाधर भवानराव परशुराम पंडीत,

मुतालिक कृष्णरावजोशी

पंतसचिव :- चिमणाजी नारायण, सदाशिव चिमणाजी

सेनापती :- मुरारराव घोरपडे

न्यायाधीश :- रामशास्त्री प्रभुणे त्यांना छत्रपतींकडून अष्टप्रधानांचे मान नव्हते यांची

नेमणूक पेशव्यांनी केली होती.

३.७.६ छत्रपती शाहू महाराज (धाकटे)आबासाहेब

राज्याभिषेक : १७७७ राजधानी : सातारा

छत्रपती शाहू महाराज थोरले यांचे महानिर्वाण १७४९ मध्ये झाले. त्यानंतर अंतसमयी थोरल्या शाहू महाराजांनी बाजीराव पेशव्यांना सर्व सांभाळण्यास सांगितले. त्यामुळे प्रशासकीय कार्ययंत्रणेत मुख्य प्रधान हा राज्याचा सर्वेसर्वा झाला. धाकट्या परंपरागत पंतप्रधान, प्रतिनिधी, सचिव ही माणसे नेमण्यात आली. ती खालीलप्रमाणे होती (सोवनी अविनाश, १९९८: १०६).

पंतप्रधान :- सवाई माधवराव पेशवे - (इ. स. १७७७ ते इ. स. १७९६)

बाजीराव रघुनाथ (दुसरे बाजीराव)पेशवे इ. स. १७९६ ते इ. स. १८०८

प्रतिनिधी :- परशुराम श्रीनिवास

सचिव :- सदाशिव चिमणाजी

रघुनाथ चिमणाजी

शंकर रघुनाथ

३.७.७ छत्रपती प्रतापसिंह महाराज

चित्र क्रमांक : ३.६



छत्रपती प्रतापसिंह महाराज

राज्याभिषेक : इ. स. १८०८ राजधानी : सातारा

अष्टप्रधान

पंतप्रतिनिधी :- परशुराम श्रीनिवास

पंतप्रधान :- बाजीराव रघुनाथ पेशवे इ. स. १८१८ पर्यंत

ढिवाण :- विठ्ठल बल्लाळ महाजनी (इ. स. १८१८ मध्ये पेशवाई संपली पंतप्रधान पेशवेच्या पदाऐवजी ढिवाण हे पद चालविले होते.)

पंतसचिव :- चिमणाजी रघुनाथ

पंतअमात्य :- बापूराव कान्हो फडणीस

मंत्री :- रघुनाथराव जयंतराव

सेनापती :- बळवंतराव भोसले

सुमंत :- बळवंत मल्हार चिटणीस

न्यायाधीश :- चिंतामणराव चिटको

पंडीतराव :- रघुनाथराव, रामचंद्र रघुनाथराव

छत्रपती प्रतापसिंह महाराज हे देशप्रेमी महाराज होते. इंग्रजांचे वर्चस्व इ. स. १८१८ मध्ये राजधानी साताऱ्यावर जास्तच वाढले. प्रतापसिंहांना हा हस्तक्षेप मान्य नव्हता. छत्रपती प्रतापसिंहांना इंग्रजांच्या विरुद्ध कारस्थान केले. असा खोटा आरोप ठेवून खुद्द छत्रपती प्रतापसिंह महाराजांना इ. स. १८३४ मध्ये साताऱ्याला कैद करून पुढे काशी येथे ठेवले. या कैदेमध्ये इ. स. १८४७ मध्ये त्यांचे महानिर्वाण झाले. मराठ्यांच्या छत्रपतीला अशाप्रकारे अपमानास्पद वागणूक दिली, त्यामुळे इंग्रजांविरुद्धची नाराजी संपूर्ण राज्यामध्ये पसरली (भिडे वि. गो., १८६६ : ११) .

३.७.८ छत्रपती शहाजीमहाराज (अप्पासाहेब)

राज्याभिषेक : इ. स. १८३१ राजधानी : सातारा

अष्टप्रधान

पंतप्रतिनिधी :- परशुराव श्रीनिवास

दिवाण / कारभारी :- नरहर रघुनाथ पराडकर

पंतसचिव :- चिमणाजी रघुनाथ

पंतअमात्य :- सखाराम बापूराव फडणीस

मंत्री :- रघुनाथराव जयंतराव

सेनापती :- बळवंतराव भोसले : राजाज्ञा खंडेरावराजे शिर्के (१८४३)

सुमंत :- रामचंद्र गोपाळ

न्यायाधीश :- जोती त्र्यंबक फौजदार

पंडीतराव :- रामचंद्रपंत रघुनाथराव

छत्रपती शहाजी महाराज ऊर्फ अप्पासाहेब हे शेवटचे साताऱ्याचे छत्रपती होते. त्यांना पुत्र नसल्याने त्यांनी दत्तक घेतला, परंतु त्याला इंग्रजांनी मान्यता दिली नाही. इंग्रजांनी अतिशय धूर्तपणे

छत्रपतींच्या वतीने कमिशनर म्हणून बार्टऊ फियर यांला राज्यावर अंमल चालवायला सांगितला. अशा तऱ्हेने १८४१ मध्ये साताऱ्याचे राज्य पूर्णपणे खालसा करून छत्रपतींचे अधिकार संपवून सातारा संस्थान खालसा केले. इंग्रजांबद्दल त्यामुळे असंतोष पसरला (भिडे वि. गो., १८६६ : १०१).

मराठेकालीन अष्टप्रधानमंडळ हे राज्यकारभाराचे अत्यंत महत्त्वाचे वैशिष्ट्य होते. छत्रपती शिवाजी महाराजांनी अष्टप्रधान मंडळाची कल्पना रामायण, महाभारत, शुक्रनीति यातून घेतली असावी, असे काही इतिहासकारांचे मत आहे. 'शुक्रनीति' हा ग्रंथ सर्वांत अधिक परिचित होता. त्यामध्ये एकूण मंत्र्यांची संख्या दहा आहे. त्यामध्ये पुरोहिताला (राजगुरूला)महत्त्वाचे स्थान असून त्यापुढे प्रतिनिधी, प्रधान, सचिव, मंत्री, पंडित, सुमंत, अमात्य व दूत असे हुद्दे आहेत. पुरोहित हा नीतिशास्त्र, अस्त्रविद्या व व्यूहरचनेत कुशल असावा. त्याच्याखाली प्रतिनिधी, त्याने राजाने काय करावे व काय न करावे हे सांगावे. राज्याचा सर्व कारभार पाहणारा तो प्रधान. सैन्याची खडान्खडा माहिती असणारा तो सचिव. नीतितंत्रामध्ये सखोल ज्ञान असणारा तो मंत्री, धर्मतत्त्व जाणणारा तो पंडित. लोक व शास्त्र यांची नीति ज्यास माहिती आहे, तो न्यायाधीश. देशकाल तज्ज्ञ असलेला तो अमात्य आय व व्यय यावरील मुख्य अधिकारी तो सुमंत (भावे वा. कृ., १९७७ : १४ आणि १४१).

त्याला अनुसरूनच छत्रपती शिवाजी महाराजांनी अष्टप्रधान नेमले असे वाटते. ते पुढीलप्रमाणे असे :-

१. पेशवा किंवा मुख्य प्रधान, २. अमात्य, ३. मंत्री, ४. सुमंत, ५. पंडितराव, ६. सचिव, ७.सेनापती, ८. न्यायाधीश. यामध्ये शुक्रनीतीमधील प्रतिनिधी हे पद कमी आहे, ते छत्रपतीराजारामांनी आणले व छत्रपतीशाहू महाराजांनी कायम केले. अष्टप्रधान मंडळाची पध्दत छत्रपती शिवाजी महाराजांच्या राज्याभिषेकानंतर चालू झाली असे नाही तर शिवाजी महाराज बारा वर्षांचे असताना त्यांची शहाजीराजांनी पुण्याच्या जहागिरीवर रवानगी केली. त्यावेळी दादोजी कोंडदेव यांच्यासह पेशवे, मुजूमदार, डबीर व सबनीस असे चार अधिकारी दिले होते. दादोजींच्या मृत्यूनंतर शिवाजी महाराजांनी सरनौबत व सेनापती असे दोन अधिकारी १६४७ मध्ये वाढविले. त्यानंतर १६७६ मध्ये जावळीच्या विजयानंतर सचिव व सुमंत या दोन जागा निर्माण केल्या. पुढे आग्र्याहून आल्यानंतर १६६७ मध्ये मुख्य न्यायाधीशांचे नवीनच पद निर्माण केले. शिवाजी महाराजांच्या अष्टप्रधान मंडळ निर्मितीची क्रिया राज्याभिषेकाच्या वेळेपर्यंत अशी पूर्ण झाली. ती त्यांच्या महानिर्वाणापर्यंत होती. शिवाजी महाराजांच्या राज्याभिषेकाच्यावेळी त्यांचे अष्टप्रधान मंडळ पुढीलप्रमाणे कार्य करीत होते (भोसले जालिंदर, २००१: ४०).

१. पेशवा :- राज्य कार्य करणे, सेना घेऊन युद्ध व स्वारी करावी, स्वराज्याचे रक्षण करावे.

२. अमात्य किंवा मुजूमदार :- राज्यातील जमाखर्चाची चौकशी करून त्यावर लक्ष ठेवणे, वेळप्रसंगी युध्दास जावे.

३. सेनापती :- सर्व सैन्याचे नियंत्रण, रक्षण व स्वराज्याच्या प्रदेशाची विस्ताराची जबाबदारी व स्वतः युद्धास जाणे.

४. सचिव किंवा सुरनीस :- राजपत्रे तयार करणे, इतर राजपत्रांना संमती देणे, नवीन मुलूखाची व्यवस्था करणे.

७. मंत्री किंवा वाकनीस :- गुप्तहेर यंत्रणा राबविणे, राजकारणांच्या भेटी, मुत्सद्देगिरी करणे, राजकारण्यांची निती ठरविणे, वेळप्रसंगी युद्धास जाणे.

६. पंडीतराव किंवा दानाध्यक्ष :- राजास धर्म विचार सांगणे, विशेष पाहुण्यांचा सत्कार करणे, आचार-विचार, दान, शांती, अनुष्ठान यासंदर्भात मार्गदर्शन करणे व प्रायच्चित्य देणे.

७. सुमंत :- परराज्याच्या संदर्भात निती ठरविणे, वकील ठरविणे, परराज्याच्या वकीलांशी बोलणी करणे.

८. न्यायाधीश :- धर्मशास्त्रानुसार न्याय निवडा करणे, राज्याशी व जनतेशी हिताशी प्रामाणिक राहणे व त्यांचे हित करणे.

राजांची मानचिन्हे

छत्राकार मेघडंबरी असलेले सिंहासन, छत्री, अब्दागिर, मोर्चेल, सोन्याचा दांडीच्या चवऱ्या, सस्त्यचिन्हे सोन्याचे तराजू, मखमलि पंखे, सोन्याची झालर असलेले आणि हत्तीसह जरीपटका.

मानवस्त्रे :- मंदील व भरजरी पोशाख

अलंकार :-हिऱ्याची कंठी, रत्नजडीत तुरा, जेहगा, चौकडा व सोन्याचे कडे इत्यादी

वाहने :-अंबारीसह हत्ती, पालखी, श्रृंगारलेले घोडे व रथ

शस्त्रे :-रत्नजडीत मूठ, म्याणाची तलवार, ढाल, कट्यार, पट्टा, धनुष्यबाण

वस्तू :-नौबत, शिक्के, सोन्याचे कलमदान (सोवनी अविनाश, १९९८ : १३ व ३०)

राजांची प्रमुख कर्तव्ये व जबाबदाऱ्या

१. राजाने जात, पात, धर्म व गरीब-श्रीमंत असा भेदभाव न करता प्रजेचे पालनपोषण करणे.

२. संपूर्ण राज्याचे संरक्षण करण्याकरता स्वतःचे सैन्य निर्माण करणे.

३. स्वराज्यातील स्थानिक चालीरीती व आचारविचार व समाजव्यवस्थेतील दुर्गुणांना पायबंद घालणे.

४. राज्यातील प्रत्येक जनतेला न्याय मिळेल या पध्दतीने न्यायव्यवस्थेचे नियोजन करणे. (गायकवाड, सरदेसाई,१९९० : ११२)

७. अष्टप्रधान, अन्य लष्करी व मुलकी अधिकाऱ्यांच्या नेमणूका, त्यांच्या बढत्या, बरखास्त्या व त्यांच्यातील खाते बढल करणे.

६. राज्यातील मुलकी व लष्करी व्यवस्थेवर नियंत्रण ठेवणे.

७. खजिन्यावर संपूर्णतः नियंत्रण ठेवून खर्च करण्याचे धोरणे ठरविणे.

८. किल्ले व आरमाराची व्यवस्था, त्यासाठी अधिकाऱ्यांची नेमणूका व त्यांच्यामधील बढत्या व बरखास्त्या व बढल करणे याचेबाबत सर्व अधिकार

९. स्वाऱ्या, मोहिमेंची आखणी व नियोजन करणे व नियोजनासाठी लागणारे सरदार यांची नियुक्ती करणे.

१०. परराष्ट्र धोरण ठरवणे व परराज्यात वकील नेमणे.

११. सरंजाम देणे, वतन देणे, जहागिऱ्या देणे व इनामे देणे यांचे सर्व अधिकार

३.६ अष्टप्रधानांची कामे

३.६.१ मुख्य प्रधान किंवा पेशवा (पेश्वा)

मुख्य प्रधानाला नेमणूकीच्या वेळी वस्त्रे, शस्त्रे, ढागिने, अलंकार शिवाय हत्ती, घोडे व चौघडा देत असे. (भिडे वि. गो., १८६६ : १२३).

मुख्य प्रधान किंवा पेशवा यांचे कार्य :- अष्टप्रधान मंडळातील मुख्य प्रधान म्हणजे पेशवा होय. पेशव्यांचे अधिकार छत्रपतींच्या खालोखाल असून त्यांनी राज्यकारभार व्यवस्थितपणे चालला आहे की नाही हे पाहणे त्यांचे प्रमुख काम असे. राजाच्या गैरहजेरीत तो राज्याचा प्रमुख या नात्याने काम पाहत असे. राज्यातील अधिकाऱ्यांवर नियंत्रण ठेवून आहे तो मुलुख सांभाळून मुलुखाची वाढ करणे व प्रशासकीय सर्व अधिकाऱ्यांकडून एकढिलाने कार्य करून घेणे, पेशव्यांची देखरेख मुलकी व लष्करी खात्यांवर असे, सरकारच्या खलित्यांवर व फरमानांवर राजाच्या शिक्क्याच्या मोर्तबाखाली त्याचा मोर्तब असे. मल्हार रामराव चिटणीस यांच्या सप्तप्रकरणात्मक चरित्रात पेशव्यांच्या स्थानाविषयी म्हणजेच मुख्य प्रधानाविषयी उल्लेख आहे. तो असा, मुख्य प्रधान यांनी सर्व राजकार्य, मंत्र, राजकारण करावे. सर्वांशी समबुध्दीने, सर्वांचे अनुमते कोणाशी द्वेषबुध्दी न करिता सर्वांस घेऊन चालावे. राजहित ते प्राणाहून अधिक, आपला स्वार्थ निलप्राय न पाहता दक्षतेने व विचक्षपणे निरालस्य सर्वकाळ करीत

असावे. सेवा घेऊन युध्दाढिप्रसंगी शुरत्वेकरून राज्य नित्यनूतन साध्य करावे. शत्रूची बातमी राखून पराभव करावे. राजपत्रे होतील त्याजवर मुख्य प्रधान यांनी आपली ढुसरी चिन्हे करावी.

३.६.२ पंतअमात्य

पंतअमात्य यांच्या नेमणूकीच्या वेळी वस्त्रे, शस्त्रे, ढागिने, अलंकार शिवाय हत्ती, घोडे व चौघडा ढेत असे (भिडे वि. गो., १८६६ : ११७).

पंतअमात्य यांचे कार्य :- अमात्य म्हणजे मुजुमढार, अष्टप्रधान मंडळातील हे ढुसरे पढ. आपल्या राजाच्या राज्यातील एकूण जमाखर्चावर बारकाईने लक्ष ठेवावे व सर्व मुलकी, लष्करी व किल्लयांच्या हिशेबाच्या बाबी काटेकोरपणे पाहव्या लागत असत. सर्व राज्याच्या सर्व प्रांतांतील जमाखर्चाच्या नोंढी त्यांच्याकडे तपासण्यासाठी येत असत. राजाच्या सल्लयानुसार किंवा त्याच्याशी सल्ला मसलत करून कोणत्याही खात्याला धन लागत असल्यास अमात्यांची मंजुरी ही आवश्यक गोष्ट होती. अमात्या संबंधी सप्तप्रकरणात पुढील उल्लेख आढळतो तो असा, अमात्य यांनी सर्व राज्यातील आयव्यय जमाखर्च होईल तो लेखनाधिकारी यांचेकडून चौकशीने लिहिणे करून आपण स्वतः बघून राजास निवेढन करावे. राजपत्रांवर व तसेच राज्यातील सर्व खर्चांचे हिशोब, महातील हिशोब याजवर चिन्हे करावी. राजास नित्य निवेढन करावे, येविशी ढक्षनिपुण असावे, मोठीमोठी राज्यकार्ये करून युध्ढढिप्रसंग सैन्य घेऊन करावे.

३.६.३ पंतसचिव :-पंतसचिव यांच्या नेमणूकीच्या वेळी वस्त्रे, शस्त्रे, ढागिने, अलंकार शिवाय हत्ती, घोडे व चौघडा ढेत असे.

पंतसचिवयांचे कार्य :- सचिव म्हणजे सुरनीस. स्वराज्यातील प्रशासन यंत्रणेमधील निरनिराळ्या प्रांतांतील अधिकारी, लष्करी अंमलढार व किल्लेढार यांच्याकडून येणारी पत्रे व सरकारातून त्यास जाणारी खलिते याची पाहणी करून त्यातील मतलब तपासून पाहण्याचे काम सचिवांचे असे. सरकारी ढफ्तरावर अशा पध्ढतीने ढेखरेख ठेवणे, किल्लेढारास द्यावयाची हवालापत्रे, इनामपत्रे, सनढा इ. नोंढ सुरनीस म्हणून ठेवावी लागत असे. एकंढरच सर्व सरकारी खात्यांच्या ढफ्तराची व्यवस्था प्रशासकीय कामाच्या शिस्तीप्रमाणे लागली आहे की नाही हे पाहण्याचे त्याचे काम असे. सचिवाच्या हाताखाली पुष्कळ कारकून असत. त्यांच्या शिक्क्याशिवाय कोणताही सरकारी कागढ किंवा खलिता, मुलकी किंवा लष्करी अंमलढारास जात नसे. सचिवाच्या संढर्भात चिटणीसांच्या सप्तप्रकरणात्मक चरित्रात अशी नोंढ आढळते. सचिव यांनी राजपत्रे होतील त्यांत न्यूनाधिक अक्षर मजकूर यांचा शोध करून

राजपत्रावरील संमत करून बारचिन्ह ऋजू करावे. युध्दाढी प्रसंग करून राजहित, ते करत असावे (गायकवाड आर. डी., १९९० : १९७).

३.६.४ मंत्री

मंत्री यांच्या नेमणूकीच्या वेळी वस्त्रे, शस्त्रे, ढागिने, अलंकार शिवाय हत्ती, घोडे व चौघडा ढेत असे (सोवनी अविनाश, १९९८ : ८६).

मंत्री यांचे कार्य :- मंत्री म्हणजे वाकनीस. प्रशासकीय यंत्रणेतील राज्यातील अठरा कारखाने, बारा महाल, हुजूरपागा, जिलेबीचे पायढळ या सर्वांचा बंढोबस्त ठेवण्याचे काम वाकनीसाकडे असे. खाजगीकडील ढफ्तर व त्यांचा पत्रव्यवहार यांच्यावरही त्याची ढेखरेख असे. तसेच सर्वांत महत्त्वाचे काम म्हणजे राजाची ढैनंढिन कृत्ये व राज्यात होणाऱ्या घडामोडींची नोंढ ठेवत असे. वाकनीसाच्या हाताखाली गुप्तहेरांचे संघटन असे. राजाला भेटण्यास येणारी काही महत्त्वाची मंडळी, परढरबाराचे वकील यांच्यावर मंत्र्यांची करडी नजर असे. संपूर्ण राज्याचा गुप्तपत्रव्यवहार मंत्र्यांच्या ताब्यात असे. सप्तप्रकरणात्मक चरित्रात चिटणिसांनी मंत्र्यासंढर्भात असा उल्लेख केला आहे, मंत्री यांणी मंत्रकार्यात निपुण असून राजकारणे राखीत असावीत, राजांनी जे जे कर्म-कृत्य केले, त्याची ढिनचर्या, बाका लिहून ठेवावा. आमंत्रण, निमंत्रण, राजाचे भोजनाढिकाचे साहित्य, पढार्थ काय पाहिजे हे पाहात असावे व राज्यकार्याविषयी ढक्ष असोन युध्दाढी प्रसंग करावे. राजपत्रावर संमत असे चिन्ह करावे (भिडे वि. गो., १८६६ : १२६).

३.६.७ सेनापती

सेनापती यांच्या नेमणूकीच्या वेळी वस्त्रे, शस्त्रे, ढागिने, अलंकार शिवाय हत्ती, घोडे व चौघडा ढेत असे.

सेनापती किंवा सरनौबत यांचे कार्य :- सेनापती म्हणजेच सरनौबत. सेनापती हा सर्व लष्कराचा प्रमुख असून त्याला लष्कराची सर्व सुव्यवस्था पाहवी लागत असे. लष्करामध्ये प्रामुख्याने ढोन भाग होते. १. घोडढळ, २. पायढळ. घोडढळावरील सेनापतीचा अधिकार पायढळावरील सेनापतीपेक्षा अधिक असे, असे ढिसते. कारण पायढळावरच्या सेनापतीस अष्टप्रधान मंडळात जागा ढिसत नाही, असे ढिसते. मागे उल्लेख केलेल्या सप्तप्रकरणात्मक चरित्रात सेनापतीसंढर्भात असा उल्लेख आढळतो. सेनापती यांनी सर्व सेनारक्षण करून त्यांचे मानसन्मान रक्षून, वेतन समयाचे समयास पाववून राजास ज्यांनी जशी सेवा केली ते निवेढन करून, त्यास वेतन, बक्षिसे ढेवावीत. सर्व सैन्य घेऊन युध्दाढी प्रसंग करावे (कुलकर्णी अ. रा., १९९१ : १९३).

३.६.६ दानाध्यक्ष किंवा पंडितराव

दानाध्यक्ष किंवा पंडितराव यांच्या नेमणूकीच्या वेळी वस्त्रे, शस्त्रे, दागिने, अलंकार शिवाय हत्ती, घोडे व चौघडा देत असे.

पंडितराव यांचे कार्य :- पंडितराव म्हणजे दानाध्यक्ष, प्रशासकीय यंत्रणेत येणाऱ्या किंवा राजाच्या संबंधित येणाऱ्या धार्मिक बाबींवर त्याचा अधिकार चालत असे. क्वचितप्रसंगी राजाला शास्त्राचे विवेचन करून धार्मिक सल्ला देण्याचे काम करावे लागत असे. संपूर्ण राज्यातील कार्यकक्षेत येणाऱ्या विद्वानांचा व साधुपुरुषांचा आदरसत्कार करणे, राज्यातील सर्व देवदेवस्थानांविषयी माहिती ठेवणे व ते व्यवस्थित काम करीत आहेत की नाही ते पाहणे, राजाच्या राजवाड्यातील सर्व प्रकारचे धार्मिक विधी व्यवस्थितपणे पूर्ण करणे, त्याचप्रमाणे फौजदारी खटल्यात धर्मशास्त्राप्रमाणे न्यायनिवाडा होतो आहे की नाही हे पाहणे, कोणी धर्मबाह्य आचरण करत असल्यास त्यास शिक्षा करावी किंवा प्रायश्चित्त सांगावे अशा स्वरूपाची सर्व धर्मविषयक कामे स्वतः लक्ष घालून करून घ्यावी लागत असत. अष्टप्रधान मंडळातील पंडितराव हा एकमेव असा सदस्य होता की ज्याला युद्धप्रसंगात जावे लागत असे. मागे उल्लेख केल्याप्रमाणे सप्तप्रकरणात्मक चरित्रात पंडितरावासंदर्भात चिटणीस असे उल्लेख करतात की, पंडितराव यांनी धर्माधिकार सर्व चालवावित, पंडितजन यांचे विद्वान ब्राह्मण याचे सन्मान करावे. धर्माधर्म विविक्षा यज्ञ करणे व शांतिकपौषिक, नित्यनैमित्तिक, कालचेकाती सुचवून करवावे, दंड कोणास कसा करावा हा धर्म पाहणे, प्रायश्चित्ताचे निर्णय व त्यांची पत्रे होतील त्याजवर संमत असे चिन्ह करावे (रानडे म. गो., १८९७ : ९९, १०० व १०२).

३.६.७ सुमंत

सुमंत यांच्या नेमणूकीच्या वेळी वस्त्रे, शस्त्रे, दागिने, अलंकार शिवाय हत्ती, घोडे व चौघडा देत असे (भिडे वि. गो., १८६६ : २४४).

सुमंत :- सुमंत म्हणजे राज्याचा परराष्ट्रमंत्री होय. मराठ्यांच्या प्रशासकीय कार्ययंत्रणेत राज्याच्या कार्यक्षेत्राच्या शेजारी असणाऱ्या परराज्याशी होणाऱ्या एकंदर व्यवहाराची देखरेख ठेवणे. शेजारील राज्याशी युद्ध किंवा तह करण्यासंदर्भात राजाला अभ्यासकरून योग्य सल्ला देणे, परराज्यातील बातमी काढण्याचे किंवा त्यांच्यातील कमकुवतपणाचे दुवे शोधून काढून राजाच्या लक्षात आणून देणे व त्याचप्रमाणे परराज्याच्या वकिलांशी संबंध ठेवून त्यांच्याबरोबर आपल्या राज्याच्या हिताकरिता वाटाघाटी करणे, शेजारील राज्याकडून येणारे खलिते बघणे व जासूद यांच्यावर लक्ष ठेवणे, तसेच आलेले खलिते तपासून बघणे, त्याला उत्तर म्हणून सरकारकडून जाणारे खलिते व जासूद याची सर्व

व्यवस्था पाहणे हे सुमंताचे काम असे. मागे उल्लेख केल्याप्रमाणे सप्तप्रकरणात्मक चरित्रात चिटणीस असे लिहितात, सुमंत यांनी परराज्यातील राजकारणे, शत्रूचे संधिविग्रह पाहून बातमी राखणे व वकिल येतील जातील, त्यांचे सन्मान वगैरे पाहवेत. सर्व राज्यास निवेदन करून राजआज्ञेने राजकार्य व युद्धाढीप्रसंग करावेत. राजपत्रावरील संमत ऐसे चिन्ह करावे (गायकवाड आर. डी., १९९० : १६४).

३.६.८ न्यायाधिश

न्यायाधिश यांच्या नेमणूकीच्या वेळी वस्त्रे, शस्त्रे, दागिने, अलंकार शिवाय हत्ती, घोडे व चौघडा देत असे (भिडे वि. गो., १८६६ : २७७).

न्यायाधिश

न्यायाधिश हा अष्टप्रधान मंडळातील तसा महत्त्वाचा प्रधान. न्यायदान व्यवस्थित होते आहे की नाही हे पाहण्याचे प्रमुख काम असे. वेळप्रसंगी न्यायदान करावे लागत असे. त्यांच्याकडे दिवाणी व फौजदारी या दोन्ही प्रकारच्या खटल्यात प्रजेला न्यायदान करावे लागत असे. स्थानिक ग्रामसभेमध्ये किंवा सरकारी अधिकाऱ्यांनी दिलेला न्यायनिवाडा अन्यायकारक वाटल्यास गावातील लोकांना मध्यवर्ती सरकारकडे अर्ज करता येत असे. त्योवळी त्या खटल्याचा निवाडा करण्याची जबाबदारी या न्यायाधिशाची असे. जमिनीचे हक्क व ग्रामाध्यक्षांचे हक्क इ. संदर्भातील सर्व निकाल न्यायाधिशांच्या सहीने जाहीर होत.

न्यायाधिशासंदर्भात चिटणीस त्यांच्या सप्तप्रकरणात्मक चरित्रात असा उल्लेख करतात, न्यायाधीश यांनी सर्व राज्यातील न्याय अन्याय वृत्तीचे व भूमीचे सर्व काळ राजास काही एकदोष न लागे ऐसे न्याय करणारे अधिकारी व शास्त्रज्ञ ब्राह्मण नेमिले. त्यांचे विचारे धर्मतः न्याय करून सर्वकाळ राजास निवेदन करावे, पाहत असावे. न्यायाची निवाडापत्रे होतील त्याचवर संमत ऐसे चिन्ह करावे. अष्टप्रधान मंडळातील पंडितराव यांच्याप्रमाणेच न्यायाधिशांना युद्धावर जावे लागत नसे (गुने व्ही. सी., १९५३ : ६७).

मराठेकालीन प्रशासकीय यंत्रणा

मराठेकालीन प्रशासकीनामध्ये साधारणतः तीन भाग पडलेले दिसतात. त्यामध्ये

१. केंद्रीय प्रशासन किंवा मध्यवर्ती प्रशासन यंत्रणा (सेन सुरेंद्रनाथ, १९२५:२७)
२. प्रांतिक प्रशासन
३. खेडेगावातील प्रशासन

एकंदर राज्यव्यवस्था बघताना त्या व्यवस्थेचे दोन भाग पडतात.

१. केंद्रीय प्रशासन

२. लष्करी प्रशासन

१. केंद्रीय प्रशासन

अ) मुलकी प्रशासन :- मुलकी प्रशासनाच्या व्यवस्थेमध्ये स्वराज्यातील प्रदेशाची करवसुली यांची व्यवस्था व जनतेच्या पीकपाण्याची व्यवस्था बघणे हे प्रमुख प्रशासनाचे काम असे. त्याकरता वेगवेगळे अधिकारी नेमले जात. त्याला करवसुली अधिकारी म्हणत असत. राज्याची विभागणी परगण्यांमध्ये होत असे. या अनेक परगण्यांना सुभा असे म्हटले जात असे. सध्याच्या भाषेत सुभा म्हणजे राज्य व त्या राज्याचा अधिकारी म्हणजे सुभेदार, त्याच्या अधिकाराखाली काही अधिकारी नेमले जात ती याप्रमाणे :

१. **सर हवालदार** :- यांच्या अधिकारामध्ये राज्यातील परगणा व महाल येत असत. म्हणजे आजच्या राज्यभाषेत जिल्हा येत असे. यामधील सर्व करवसुली त्यांनी स्वतः करून सुभेदाराकडे द्यावी असे होते.

२. **देशमुख किंवा देसाई** :- यांच्या अधिकारामध्ये तरफ किंवा तालुका येत असे. त्या तरफातील सर्व करवसुली करण्याचा अधिकार देशमुख किंवा देसाई यांना असे. थोडक्यात ते तालुक्याचे अधिकारी असत.

३. **पाटील** :- यांच्या अधिकाराखाली व वाड्या असत. त्यातील सर्व करवसुली त्यांनी करुन म्हणजे महसूल जमा करुन सुभेदाराने ठरविलेल्या अधिकाऱ्याकडे द्यावे लागत असे. यासंदर्भातील महसूल गोळा करताना शिवाजी महाराजांना एकोणतीस मुलकी विभागामध्ये लक्ष द्यावे लागत असे (भावे वा. कृ., ११६ व ११७).

२. लष्करी प्रशासन

लष्करी प्रशासनामध्ये लष्कराची व्यवस्था ठेवण्याकरीता मराठ्यांच्या राज्यव्यवस्थेमध्ये चार उपविभाग केलेले आढळतात.

१. किल्ले, २. पायदळ, ३. घोडदळ पागा, ४. आरमार

१. किल्ल्यांच्या व्यवस्थेमध्ये राज्याच्या भौगोलिक रचनेनुसार काही भाग केलेले आढळतात. त्यामध्ये

अ. जमिनीवरील असलेले भूईकोट किल्ले

ब. डोंगरमाथ्यावरील उंच दुर्गम किल्ले

क. उंचीला कमी असणाऱ्या डोंगरमाथ्यावरील किल्ले

ड. समुद्र किनाऱ्यावर किंवा समुद्रातील किल्ले

या सर्व किल्ल्याच्या व्यवस्थेकरीता लष्कराने उत्तम व्यवस्था केलेली दिसते. सर्व प्रकारच्या किल्ल्यामध्ये धान्य, दारूगोळ, शस्त्रे आणि आवश्यक तेवढी शिबंदी (सैन्य) ठेवली जाई. शिवाय किल्ल्याच्या आत राहणाऱ्या सर्वांची सोय किल्ल्याच्या आतच केली जात असे. किल्ल्यावर असणाऱ्या सामुग्रीचा साधारणतः एक वर्ष पुरेल एवढा साठा केला जात असे. याप्रमाणे सर्व किल्ल्यांची व्यवस्था साधारणतः अशीच असे. फक्त राजधानीचा किल्ला हा मात्र इतर सरदार, प्रधान, अधिकारी यांच्या वाड्याच्या बरोबर बाजारपेठा, मंदिरे, उद्याने, महाल, पागा, अंबरखाने इ. विविध सोयींनी युक्त असे.

२. **पायदळ :-** पायदळामध्ये दहा सैनिकांची एक तुकडी असे. तुकडीवर एक नाईक असे. अशा पाच नाईकांवर म्हणजे पन्नास सैनिकांवर एक हवालदार असे. अशा तीन हवलदारांवर एक जुमलेदार असे. अशा दहा जुमलेदारांवर एक हजारी सरदार असे. अशा हजरी अनेक सरदारांवर पायदळाचा प्रमुख असे. त्याला ''सरनौबत'' अस किताब होता.

३. **घोडदळ / पागा :-** या विभागामध्ये सरकारतर्फे काही स्वारांना घोडी मिळत असे. त्यांन बारगिर म्हणत असत व दुसरा स्वतःची घोडी घेऊन त्याच्य खर्चासाठी रक्कम घेत असे. त्याला शिलेदार म्हणत असत. अशा पंचवीस स्वारांवर हवालदार असे व अश पाच हवालदारांवर एक जुमलेदार असे. (एकशे पंचवीस घोडेस्वार) अशा दहा जुमलेदारांवर एक सुभेदार असे. (बाराशे पन्नास घोडेस्वार) व अशा दहा सुभेदारांवर पंचहजारी सरदर असे.(बारा हजार पाचशे स्वार) वरील हवालदारांच्या हाताखाली घोड्यांची निगा राखण्याकरीता व नाल लावण्यकरीता एक नालाबंद कारागिर असे. घोड्याला पाणी देण्याकरीत पाण्याने भरलेली पखाळ जवळ ठेऊन घोड्यांची पाण्याची व्यवस्था करीत असे. त्याला भिस्ती म्हणत असत. असे अनेक भिस्ती व अनेक नालाबंद घोडदळामध्ये असत. घोडदळाच्या या प्रमुखालाही सरनोबत किंवा सेनानायक सुभा असे म्हणत असत. या सरनोबताच्या हाताखाली काही कारभारी असत. त्यांना मुजुमदार व जमेनिस म्हणत असत. अशी साधारणतः व्यवस्था घोडदळ व पायदळाची असे. घोडदळ आणि पायदळ यांच्या प्रमुखांच्या वरती '' सेनापती'' असे.

४. **आरमार :-** महाराष्ट्राच्या भूमीला खूप मोठा समुद्रकिनारा असल्यामुळे शत्रु त्या बाजुंनी सुध्दा आक्रमण करीत असत. इंग्रज, फ्रेंच, डच यांचे आरमार प्रभावी असे. त्यांच्यावर तोडगा काढण्यासाठी छत्रपती शिवाजी महाराजांनी अभ्यास करुन त्यांच्यापेक्षा प्रभावी व जहाल असे आरमार आश्चर्यकारकरित्या उभे केले. या आरमारामध्ये कोळी व भंडारी या समाजातील

लोकांचा भरणा जास्त होता. नवीन जहाज बांधण्याकरीता सिंधूदुर्ग व रत्नागिरी यांच्या लगतच्या समुद्र किनाऱ्यावर गोदया बांधल्या होत्या. या आरमारामध्ये छोट्या, मध्यम व मोठ्या अशा स्वरूपाच्या होड्या होत्या. छोट्या होड्यांमध्ये गलबते, तरांडा, गुरबा, दुबार, पगारा, शिबाड, मचवे, संगमिऱ्या, तिरकाठी यांचा समावेश होता. या आरमारात किमान दोनशे मोठी जहाजे होती. लहान, मध्यम व मोठी अशी एकंदर चारशे पेक्षा कमी नव्हती. एकंदर सर्व नौकांवरची सैनिकांची संख्या पाच हजारापर्यंत होती. आरमाराच्या प्रमुखाला ''दर्यासारंग'' हा किताब होता व त्याचा सुभेदार म्हणून मायनायक ही पदवी होती. स्वराज्याचा पहिला दर्यासारंग इब्राहिम खान होता आणि भंडारी व दौलतखान ''मायनायक'' होते. नंतरच्या काळात आरमाराच्या प्रमुखाला ''सरखेल'' ही पदवी देऊन कानोजी आंग्रे यांना आरमाराचे प्रमुख केले. त्यानंतरच्या काळात तुळाजी आंग्रे व सरदार घुळप हे आरमाराचे प्रमुख होते. छत्रपती शिवाजी महाराजांनी निर्माण केलेले आरमार हे त्यांच्याबरोबर नष्ट झाले नाही. आंग्र्यांनी आरमाराची शक्ती वाढविली होती. पेशव्यांनी आणि इंग्रजांनी मिळून आंग्र्यांना त्रास दिला व आरमाराचे नुकसान केले. त्यानंतर पश्चिम किनाऱ्याच्या रक्षणासाठी पेशव्यांनी मजबूत आरमार तयार केले, यामुळे मराठ्यांची सागरी व्यापारवृत्ती वाढली. पेशव्यांच्या काळात त्यांच्या जहाजांनी चीनपर्यंत मजल मारली होती. छत्रपती शिवाजी महाराजांनी निर्माण केलेल्या नाविक धोरणामुळे आणि आरमाराचा पाया घातल्यामुळे पेशव्यांना हे शक्य झाले होते.

अष्टप्रधान आणि त्यांच्या योग्यतेची पदे आणि नेमणुकांच्याव्यतिरिक्त राज्यकारभार चालवण्यासाठी प्रशासकीय यंत्रणेत मोठ्या अधिकाऱ्यांच्या व लहान अधिकाऱ्यांच्या नेमणुका त्यांची योग्यता बघून कराव्या लागत. दीर्घकाळ मुसलमान राजवटीचा परिणाम दिल्या जाणाऱ्या पदांवर व त्यांच्या नावावर जाणवतो. एकंदर प्रशासकीय यंत्रणेत याचा वापर असल्याने त्याची आपण ओळख करुन घेऊ.

३.७ प्रशासकीय यंत्रणेत दिले जाणारे किताब

किताब हा सन्मानदर्शक नावाच्या आधी लागणारी उपाधी असे. उदा.

अ. सरलष्कर :- लष्कराचा प्रमुख किंवा मोठ्या फौजेवरील सरदार.

ब. सेनासाहेब सुभा :- सेनासाहेब म्हणजे सैन्याचा प्रमुख व सुभा म्हणजे धनी.

म्हणजेच सैन्याच्या मोठ्या तुकडीचा सरदार.

क. सरखेल :- आरमाराचा प्रमुख. म्हणजेच पाण्यावर चालणाऱ्या सर्व लष्कराचा प्रमुख.

ड. ममलकत-मदार :- संपूर्ण राज्याचा आधार किंवा संपूर्ण राज्याचा राजाखालोखाल आधारस्तंभ.

इ. मदार-ऊल-महाम :- संपूर्ण राज्याचा कणा अर्थात राजाखालोखाल राज्य ज्याच्या बुद्धीच्या व शौर्याच्या आधाराने चालते. (महादजी शिंदेला हा किताब दिल्लीच्या बादशहाने दिला होता.)

उ. सेनाकर्ते :- सरलष्कराच्या बरोबरीचा हा किताब म्हणजेच लष्कराच्या सर्व तुकड्यांचा सेनाधिपती.

३.८ प्रशासकीय कामात दिली जाणारी पदे

३.८.१ मनसबदार :- मनसब म्हणजे हुद्दा किंवा पद (हा अरबी शब्द आहे.)

मनसबदार म्हणजे पदाधिकारी. घोडदलाच्या लष्करी अधिकाऱ्यांना मनसबदार म्हणत असत. (उदा. पाच हजार, दहा हजार ते एक लाख घोडेस्वारअसलेले मनसबदार)

३.८.२ सुभेदार :- सुभा म्हणजे राज्याचा मोठा भाग. या राज्याच्या मोठ्या भागावरील अधिकाऱ्याला सुभेदार म्हणत असे. उदा. दख्खनचा सुभा,महाराष्ट्र, केरळ, कर्नाटक, तामिळनाडू इ. विस्तृत भाग. एखादा मोठा प्रांत ज्यांच्या अधिपत्याखाली असतो. त्यांना सुभेदार म्हणत असत (सोवनी अविनाश, १९९८ : ९८).

३.८.३ जहागीरदार :- सैन्यातील सैनिकांची भरती करून त्यांचा खर्च भागवण्याकरता प्रत्येक सरदाराला काही प्रदेश दिला जात. त्या प्रदेशातून त्याला मिळणारा कर हे त्या सरदाराचे उत्पन्न अथवा विशिष्ट सैन्य बाळगण्याबद्दल दिला जाणारा मोबदला, त्याला जागीर म्हणत असत. जागीर दिलेल्या सरदाराला जागीरदार किंवा जहागीरदार म्हणत असत. हा सरकारी अधिकारी असे.

३.८.४ मोकाशी किंवा मुकासदार :- जहागिरीचा सरदार त्याला ज्याप्रमाणे जहागीर म्हणत असत. त्याचप्रमाणे विशिष्ट मुलुख ज्या सरदाराला दिला जात असे. त्याला अरबी भाषेत मुखस्सिस म्हणजेच मुकामदार म्हणजे मराठ्यांच्या प्रशासकीय व्यवस्थेत त्याला मोकाशी म्हणत असत. मुकासदार आणि जहागीरदार यांच्या कामाचे स्वरूप व दर्जा एकच आहे. सतराव्या शतकाच्या उत्तरार्धात ही परंपरा मराठेशाहीत चालू झाली.

३.१ कनिष्ठ अधिकारी

३.१.१ **कारखानीस** :- कारखान्या वरील प्रमुख अधिकारी, म्हणजेच कारखाना ज्याच्या अधिकाराखाली चालतो तो.

३.१.२ **सबनीस** :- प्रशासकीय लष्करातील सामानाचा जमाखर्च किंवा हिशेब ठेवण्यासाठी नेमलेला अधिकारी (सेन सुरेंद्रनाथ, १९२५:१६३).

३.१.३ **पारसनीस** :- मूळ शब्द फारस, नवीस, फारशी भाषा जाणणारा, त्या भाषेतील पत्रे, फर्माने यांचे वाचन व भाषांतर मराठीमध्ये करणे आणि फारशी भाषेत पत्रोत्तर पाठवणे हे काम करणारा अधिकारी.

३.१.४ **फडणीस** :- मूळ शब्द फर्द - नवीस. प्रशासकीय राज्यातील महसुलाचे जमाखर्चाचे हिशेब नोंदविणारा कारकून किंवा अशा कारकुनांवरील अधिकारी या अर्थाने हे पद चालविले जाते. (नाना फडणीस यांचे आडनाव भानू परंतु सुरवातीला कारकुनाचे काम करत असत म्हणून फडणीस या नावाने ओळखले जाऊ लागते.)

३.१.५ **वाकनीस** :- वाकियान - नवीस म्हणजेच बातमीपत्र पाठवणारा. प्रशासकीय राज्ययंत्रणेत अनेक ठिकाणांहून येणाऱ्या बातम्यांची नोंद करून ठेवणे व त्या योग्य ठिकाणी सांगणे यास वाकनीस म्हणत असत.

३.१.६ **चिटणीस** :- पत्रव्यवहार लिहिणारा कारकून, याचे अक्षर सुंदर असावेच लागते. पत्र लिहिण्यामध्ये तो कुशल असावा लागतो. मराठी भाषेतील चिठ्ठी या शब्दाचा अपभ्रंश होऊन चिट-नवीस असा पारसी शब्द तयार झाला. चिटणीसाची स्मरणशक्ती व बुद्धीमत्ता ही तल्लख असावी लागते. त्यामुळे चिटणीस या पदावर असलेला मनुष्य राजाच्या जवळ असे. (खंडोजी बल्लाळ यांचे वडील बाळाजी आवजी चित्रे हे छत्रपती शिवरायांचे चिटणीस होते.)

३.१.७ **पोतनीस** :- प्रशासकीय यंत्रणेमध्ये सरकारी खजिन्यावरील रोकडीचा हिशेब ठेवणारा प्रमुख अधिकारी, पोतनीसाचे काम हे जोखमीचे व विश्वासाचे असे.

३.१.८ **जमेनीस** :- प्रशासकीय यंत्रणेत जो हिशेब सबनीसांच्यामार्फत किंवा फडणीसांच्या मार्फत ठेवला जाई त्याची तपासणी करणारा अधिकारी (हल्लीच्या भाषेत लेखापरीक्षक-ऑडिटर) म्हणजेच जमेनीस.

३.१.९ **पोतदार** :- प्रशासकीय यंत्रणेत सरकारी टांकसाळीतील नाण्यांची पारख करणारा प्रमुख अधिकारी म्हणजे पोतदार

३.१.१० **दप्तरदार** :- दप्तर याचा अर्थ फडक्यात बांधलेला लेखी कागदांचा गठ्ठा. प्रशासकीय राज्यव्यवस्थेत अनेक कागदपत्रे व्यवस्थित ठेवावी लागत असत. त्यासाठी विशिष्ट प्रकारची स्वतंत्र यंत्रणा असे. ही सर्व व्यवस्था बघणारा दप्तरावरील अधिकारी म्हणजेच दप्तरदार. आजच्या भाषेत रेकॉर्ड इन्चार्ज.

३.१.११ **मामलेदार** :- मुआमला (व्यवहार) या अरबी शब्दावरून मामला असे नाव रूढ झाले. मामला म्हणजे परगणा, प्रशासकीय कारभाराकरिता केलेला भौगोलिक विभाग, त्यावर जो सरकारी अधिकारी नेमला जाई, त्याला मामलेदार म्हणत.

३.१.१२ **जकातदार** :- प्रशासकीय यंत्रणेत करवसुलीला फार महत्त्व आहे. प्रशासकीय राज्याच्या सीमेवर जकात नाक्यांवर वसुलीसाठी नेमलेला अधिकारी म्हणजे जकातदार.

३.१.१३ **हवालदार** :- प्रशासकीय यंत्रणेत वसुलीचे काम नीट होत आहे की नाही हे बघणारा सरकारी लष्करी अधिकारी त्याला हवालदार म्हणत.

३.१.१४ **जमादार** :- जम्मदार हा मूळ पारसी शब्द असून प्रशासकीय कामामध्ये शिपायांचा तुकडीचा प्रमुख किंवा सरशिपाई असे म्हणत असत. प्रशासकीय कार्ययंत्रणेत या तुकडीला कायम सावध राहवे लागत असे व त्यांना सावध ठेवण्याचे काम जमादार करत असे.

३.१.१५ **कमाविसदार** :- मूळ पारसी शब्द कमाविश्. प्रशासकीय कार्ययंत्रणेत एखाद्या मुलखाचा मक्ता घेऊन वसुली गोळा करणारा अधिकारी म्हणजे कमाविसदार. एकूण उत्पन्नाच्या काही टक्के भाग हे त्याच्या उत्पन्नाचे साधन असे. मराठ्यांच्या मुलुखाच्या बऱ्याच ठिकाणी कमाविसदार नेमलेले असत (कुलकर्णी अ. रा., १९९१ : २३ व २६).

३.१.१६ **अंमलदार** :- मूळ शब्द अमील, यावरून अंमल हा शब्द तयार झाला. प्रशासकीय कार्ययंत्रणेत एखाद्या छोट्या भागावर ज्याचा प्रभाग असे त्याला कार्ययंत्रणेत अंमलदार म्हणत असत.

३.१.१७ **रिसालेदार** :- रिसाला म्हणजे घोडदलाची तुकडी. प्रशासकीय कार्ययंत्रणेच्या घोडदलामध्ये विशिष्ट घोडदळांचा अधिकारी त्याला रिसालेदार म्हणत असत.

३.१.१८ **भालदार** :- प्रशासकीय कार्ययंत्रणेत ठरलेल्या ठिकाणी भाला घेऊन पहारा देणारे जे सेवक असत त्यांना भालदार म्हणत असत.

३.१.१९ **चोपदार** :- मूळ अरबी शब्द चौब. चौब याचा अर्थ काठी. प्रशासकीय कार्ययंत्रणेत काठी घेऊन पहारा देणारा किंवा राजाच्या दरबाराची व्यवस्था राखणारा याला चोपदार म्हणत असत.

३.१.२० **शिरस्तेदार** :- शिरस्ता या पारसी शब्दाचा अर्थ वहिवाट किंवा नियम. प्रशासकीय कार्ययंत्रणेत राजव्यवस्थेमध्ये जे कारकून लोक काम करत असत त्यांच्यावर देखरेख ठेवून व ते नियमाचे पालन करत आहे की नाही हे बघणारा म्हणजेच कारकुनाचा सरकारकून यालाच शिरस्तेदार म्हणत असत.

३.१.२१ **जामदार** :- प्रशासकीय कार्ययंत्रणेत अधिकारी, प्रधान, सरदार यांनी परिधान करायची वस्त्रे त्यांच्यासमोर घेऊन उभा राहणारा सेवक तो जामदार.

३.१.२२ **खासबारदार** :- प्रशासकीय कार्ययंत्रणेत जे जे अधिकारी बंदूक वापरत असतील ती बंदूक स्वतःच्या खांद्यावर घेऊन किंवा हाती घेऊन सरदाराबरोबर चालणारा सेवक म्हणजे खासबारदार.

३.१.२३ **कारकून** :- हा शब्द पूर्णतः फारसी आहे. प्रशासकीय कार्ययंत्रणेत कारकून म्हणजे सरकारी लेखनिक. पूर्वी सरकारी अधिकाऱ्यांना म्हणजे मोकासदाराच्या वतीने काम पाहणाऱ्या त्यांच्या नोकरीतील अधिकाऱ्यांनासुद्धा कारकून म्हणत असत. प्रशासकीय कार्ययंत्रणेत येणारी ही सर्व पदे किंवा अधिकार ही त्यांची आडनावे झाली आहेत. उदा. पेशवे, दिवाण, प्रतिनिधी, अमात्य, सचिव, सुमंत, पंडितराव, पोतदार, पोतनीस, फडणीस, वाकनीस, कारखानीस, चिटणीस, दप्तरदार, जमादार आणि हवालदारसुद्धा ही सर्व आडनावे झाली आहेत (अविनाश सोवनी, १९९८ : १०२).

३.१० सातारा संस्थानची ग्रामपातळीवरील प्रशासकीय कार्ययंत्रणा

मराठ्यांची प्रशासकीय कार्ययंत्रणा (छत्रपती शिवाजी, छत्रपती संभाजी, छत्रपती शाहुमहाराज यांच्या काळात) इ. स. १६८० ते १७५० या कालखंडात सामाजिक व आर्थिक घडामोडींचा केंद्रबिंदू म्हणजे खेडे होय. खेड्यांमध्ये शेते हा मुख्य व्यवसाय होता. खेड्यांचा उल्लेख काही वेळेला ग्राम किंवा मौजा या शब्दांनी करत असत. उदा. एखाद्या खेड्याचा विकास झाला असेल व त्यामुळे दोन स्वतंत्र खेडी झाली असतील तरीसुद्धा खेड्याचे मूळचे नाव बदलत नसे म्हणजेच जे जुने खेडे आहे, त्याच्यापुढे बुद्रुक असे लावत असत आणि खुर्द नव्या खेड्याच्या पुढे लावत असत. उदा. पुरंदर तालुक्यातील मावडी बुद्रुक व मावडी खुर्द.

ग्रामामध्ये साधारणतः चार सत्ता चालत असत.

१. दिवाणसत्ता या सत्तेमध्ये हवालदार, कारकून यांचा समावेश होतो. गावाचे संरक्षण करणे हे दिवाणसत्तेचे काम असे.

२. गोतसत्ता किंवा ग्रामसत्ता या सत्तेमध्ये वतनदार, बलुतेदार आणि रयत म्हणजे प्रजा यांचे काम चालत असे.

३. ज्ञानीसत्ता किंवा धर्मसत्ता या सत्तेमध्ये ग्रामामध्ये घडणाऱ्या ज्ञानी आणि धर्मसंदर्भात चर्चा होऊन न्याय होत असे.

४. व्यापारीसत्ता ही सत्ता ग्रामाचे ढळणवळणाचे कार्य बघत असे (गायकवाड आर. डी., १९९० : १६८).

वरील चार सत्तांशिवाय वतनदार हा परंपरागत त्याचा अधिकार चालवत असे कारण एखाद्या वतनदाराच्या वतनामध्ये अनेक ग्रामे येत असत व या वतनामध्ये प्रशासकीय कामकाजाकरता पुढील यंत्रणा असे.

३.१०.१ पाटील :- पाटील म्हणजे गावचा राजा. पाटलाचा संबंध संपूर्ण गावाच्या वसाहतीशी असे. गावातील शेतीमधील लावणी, संचणी व उगवणी ही पाटलाची मुख्य कामे असत. गावातील पडीक किंवा वांझोटी जमीन लागवडीखाली आणून त्यातून उत्पन्न निर्माण करणे, हे त्याचेच काम असे. कोणत्याही सरकारी अधिकाऱ्याला त्याच्या परवानगीशिवाय शेतसारा ठरवता येत नसे. पाटील व कुलकर्णी मिळून गावाचे अंदाजपत्रक तयार करीत असत. सरकारदरबारी गावाचे प्रतिनिधित्व पाटीलच करत असत. कारण ग्रामसत्तेचा प्रमुख पाटीलच होता. संपूर्ण गावचा सारा वसूल करणे व सरकारात जमा करणे व त्याचप्रमाणे एखाद्या वर्षी साऱ्याची रक्कम जमली नाही तर पाटलाला स्वतःला भरावी लागत असे. गावाचा न्यायनिवाडा त्याच्याशिवाय पूर्ण होत नसे. शांतता व सुरक्षितता प्रस्थापित करण्याची जबाबदारी पाटलाचीच असे. पाटील हा सामान्यतः मराठा असे. क्वचितप्रसंगी महार जातीकडे पाटीलकीचे वतन असे. उदा. वाई परगण्यातील नागेवाडीच्या पाटीलकीची सनद एका महाराकडे असण्याची माहिती आहे. गावाला पाटील नसेल तर ती कामे देशमुख करीत (जोशी शं. ना., १९६० : ६ व ८).

३.१०.२ कुलकर्णी :- कुलकर्णी हा गावचा दुसरा अधिकारी असे. तो पाटलाला सहाय्य करत असे. त्याला मिळालेल्या वतनाला लेखनवृत्ती म्हणत असत. गावचे सर्व दप्तर त्याच्याकडे असे. गावाच्या सर्व जमिनींची नोंद त्याच्याकडे असे. प्रत्येक गावाला कुलकर्णी असलाच पाहिजे असे दिसत नाही. कारण काहीवेळेला एकच कुलकर्णी अनेक गावांचे हिशेब ठेवत असे. जर एखाद्या कुलकर्ण्याला बरीच कामे असली तर तो आपल्या कामासाठी मुतालिक नेमत असे. कुलकर्णीपणाचे वतन हे वंशपरंपरेने चालत असलेले दिसते. काहीवेळा हे कुलकर्णी शिरजोरीने वागून लोकांना त्रास देत असत. असा उल्लेख काही

ठिकाणी आढळतो. समजा एखाद्या कुलकर्णीचे घराणे निर्वंश झाले तर त्याचे वतन संपूर्ण गावच्या मालकीचे होत असे (कुलकर्णी अ. रा., १९९१ : ३०-३४).

३.१०.३ चौगुला :- हा गावातला महत्त्वाचा घटक असे. तो वतनदार आहे. मूळशब्द चौगुला असा आहे म्हणजे चार कुळे बाळगणारा पाटलाचा सहाय्यक असे. काही ठिकाणी पाटलापेक्षा चौगुलाला जास्त मान मिळत असे. गावाची सारा वसुली करून ढिवाणीत पोहोचवण्याचे काम चौगुल्याकडे असे. महत्त्वाच्या कागदपत्रांची ने-आण करणे, गावाची कोठारे, गोदामे व धान्याचे पेव याची व्यवस्था ठेवावी लागत असे. गोत सभेमध्ये त्याला पाटलानंतरचे स्थान मिळत. प्रत्येक गावाला चौगुला असेलच असे नाही. समाजातल्या वेगवेगळ्या जातींत चौगुले ढिसून येतात.

३.१०.४ शेटे महाजन :- शेटे महाजन हा गावच्या वतनदारांचा एक वर्ग असे. गावातील विविध पेठांचे हे वंशपरंपरागत अधिकारी असत. गावात जर पेठ वसवायची असेल तर यांनाच ते काम करावे लागत असे. पेठ वसवणे हे शेट्याचे मुख्य काम होय. त्या पेठेचा हिशोब ठेवण्याचे काम महाजनांचे असे. गोतसभेमध्ये अधिकृतपणे त्यांचा सहभाग असे.

३.१०.५ देशमुख :- देशमुखी वतन हे सर्व वतनांत श्रेष्ठ वतन आहे. देशमुख यांचा उल्लेख विषयपती या संज्ञेने केला जात असे. देशमुखालाच कोकणामध्ये देसाई म्हणत असत व कर्नाटकात नाडगौडा म्हणत असत. कोकणातील देसाई ब्राह्मण असत. कर्नाटकातील नाडगौडा लिंगायत असत. तर महाराष्ट्रातील देशमुख बहुधा मराठे असत. देशमुखाला साधारणतः १. ज्या गावात पाटील नाही, त्या गावात पाटीलकीचे काम करावे लागत असे. २. देशमुख परगण्याचा वतनदार अधिकारी असे, त्यामुळे परगण्यातील वसाहत वाढविणे हे त्यातील मुख्य काम असे. ३. गावाची वांझोटी जमीन, गरजूंना लागवडीसाठी देण्याची योजना करावी लागत असे. ४. नवीन राहण्यासाठी आलेल्या रयतेला उत्तेजन देण्यासाठी थोडी जमीन क्रमाक्रमाने वाढवून ढिली जात असे व त्याचप्रमाणे क्रमाक्रमाने सारा वाढवून वसूल करण्याचे काम देशमुखांचे असे, त्याला इस्तावा असे म्हणत असत. ५. दरवर्षी गावात दौरे काढून रयतेची स्थिती पाहणे हे त्यालाच करावे लागत असे. ६. गावातील कुलकर्णींनी काम नीट केले आहे की नाही हे पाहणे त्याचे काम असे. ७. पाटलाने गावाचे संरक्षण नीट केले आहे की नाही हे पाहणे त्याचे काम असे (जोशी शं. ना., १९६० : ५१).

३.१०.६ देशपांडे :- देशपांड्यांना देश-कुलकर्णी म्हणत असत. गावातील काही जमीन त्याच्या मालकीची असे. संपूर्ण परगण्यातील कुलकर्ण्यांवर देखरेख करणे हे त्याचे मुख्य काम असे. छोट्या गावात कुलकर्ण्यांचे जे काम असे तेच काम संपूर्ण परगण्यात देशपांडे करीत असे. परगण्याचा हिशेब

ठेवणे व तपासणे हे त्याचे मुख्य काम होय. त्याच्या कामात झालेल्या हयगयीबद्दल सरकार किंवा राजा त्याला जाब विचारत असे (सेन सुरेंद्रनाथ, १९२७ : १७४).

३.१०.७ मिरासदार :- गावातील बहुसंख्य लोक मिरासदार असत. मिरासदार म्हणजे त्यांना जमिनी वंशपरंपरेने दिल्या असत. ते जमिनीचे मालक असून आपल्या जमिनीचा शेतसारा सरळपणे सरकारात जाऊन भरत असत. गोतसभेत हजर राहून गावाच्या कामात मदत करीत असत. मिरासदारांना त्यांच्या शेतीच्या किंवा इतर कामात मदत करण्यासाठी जे लोक बाहेरगावाहून येत असत, त्यांना उपरे म्हणत असत. गावाची वांझट किंवा पडीक जमीन त्यांना कसण्यासाठी देत असत. जर कालांतराने त्या पडीक जमिनीची मालकी त्यांना मिळाली तर उपरे लोक मिरासदार होत असत.

३.१०.८ बलुतेदार :- बलुतेदारांमध्ये साधारणतः बाराजण येत असत. त्यामध्ये सोनार, जंगम, शिंपी, कोळी, तराळ, माळी, डावरी, गोसावी, घडसी, रामोशी, तेली, तांबोळी व गोंधळी यांचा समावेश असे. त्याप्रमाणे गुरव हा धार्मिक सेवक गावातल्या दैवतांची पूजा करण्याचे काम करीत असे. ठाकूर हा जंगलात राहणाऱ्या जमातीचा पुढारी असे. जंगम हा लिंगायत लोकांचा पुरोहित होता. मुलाणी हा गावातील मशिदीची व कब्रस्तानाची देखरेख करत असे. वरील सर्व लोकांना अलुतेदार असे म्हणत असत. म्हणजेच अलुतेदार व बलुतेदार यांनी बनलेला गाव असे व यांनाच कारू व नारू असे म्हणत असत (कुलकर्णी अ. रा., १९९१ : २१).

मराठ्यांच्या राज्यकारभारासंबंधीच्या धोरणावरून लोककल्याणकारी राज्यकारभाराची ओळख पटते. विशेषतः छत्रपती शिवाजी महाराजांचे हिंदवी स्वराज्य हे देशमुख, देशपांडे, पाटील, कुलकर्णी किंवा चौगुले यांच्या कल्याणासाठी नव्हते. गावोगावी असलेली वतनदार मंडळी कधीही दुःखीकष्टी व दरिद्री दिसत नव्हती. कारण वतनदारांनी करवसुली न्यायदान अधिकार स्वतःकडे ठेवून जनतेला वारंवार त्रास होऊ नये, याकरीता छत्रपतीशिवाजी महाराजांनी वतनदार पद्धतीला फाटा दिला. काही ठिकाणी जुनी वतने रद्द केली. नवीन वतने देण्याचे टाळले. सामान्य जनतेला सुखी करणे हे शिवरायांचे ध्येय होते. त्याप्रमाणेच त्यांची प्रशासकीय मंडळी काम करीत. स्वराज्यातील जमिनीची मोजणी करून प्रतिवारी ठरविली. म्हणजे उत्पन्नाचा निश्चित हिस्सा महसूल आकार म्हणून ठरविला. शिवाजी महाराजांनी सामान्य दर्जाच्या अधिकाऱ्यांपासून ते अष्टप्रधान मंडळातील पेशव्यांपर्यंत रोख वतन देण्याची पद्धत सुरू केली व वतन म्हणून जमीन देण्याची पद्धत बंद केली. रयतेची पिळवणूक कमी झाली, भ्रष्टाचार कमी झाला. गरीब रयतेकरिता आदर्श शासनपद्धती उभी केली. उदा. प्रभावळीचा सुभेदार रामजी अनंत व चिपळूणच्या छावणीतील लष्करी अधिकारी यांना पाठविलेल्या एका पत्रात

शिवाजी महाराजांचा कल्याणकारी दृष्टीकोन स्पष्ट दिसतो. त्या पत्रात ते असे लिहितात. 'भाजीच्या देठालाही मन दाखविता कामा नये, रयतेचा वाटा रयतेला जावा व सरकारचा वाटा सरकारला जावा, फुकट वस्तू घ्यायला जाल, दाम मोजून वस्तू घ्या, शेतकऱ्याला लुबाडाल, कणीस कापूल न्याल, असा लोकांना त्रास द्याल तर मोगलाई बरी. या ठिकाणी छत्रपती शिवाजी महाराजांची स्वराज्याची कल्पना स्पष्ट होते (गायकवाड आर. डी., १९९० : १४०). मराठ्यांचे स्वराज्य व मोगलाई यातील फरक जाणवतो.

छत्रपती शिवाजी महाराजांची ही स्वराज्याची कल्पना संभाजी महाराजांनी चालविली, तिचाच पाठपुरावा छत्रपतीराजाराममहाराजांनी केला व त्यांच्या पश्चात महाराणी ताराबाईंनी मराठ्यांच्या स्वराज्याचे जतन केले. पुढे छत्रपती संभाजी महाराज, शाहु महाराज यांनी मराठ्यांच्या स्वराज्याचे धुरीणित्व स्वीकारले. तांत्रिकदृष्ट्या छत्रपतीशाहु महाराज हे पहिल्या तीन छत्रपतींसारखे स्वतंत्र राजासारखे प्रशासकीय कार्ययंत्रणेत ठामपणे काही निर्णय घेऊ शकले नाहीत. उदा. राज्यकारभाराची सर्व जबाबदारी त्यांनी अष्टप्रधान मंडळातील पेशव्यांवर टाकली. छत्रपती शाहूंच्या काळात मराठ्यांनी मोगल बादशहाकडून चौथाई व सरदेशमुखी वसूल करण्याचे अधिकार प्राप्त केले. परंतु त्यामुळे सरदारांना मिळणाऱ्या सनदांच्या राजकारणामुळे छत्रपती शिवाजी महाराजांचे स्वराज्याचे तत्त्व सुटले. अष्टप्रधानमंडळ पद्धती क्रमशः लुप्त होत चालली. छत्रपती शाहूंनी पेशव्यांवर विश्वास टाकून त्यांच्या हाती सर्व सत्ता दिली. जुन्या मंडळींना फाटा देऊन नव्या कर्तबगार मंडळींना हाताशी धरून मराठा मंडळाचा विस्तार केला. पेशव्यांनी महादजी शिंदे, मल्हारराव होळकर, परसोजी भोसले, गायकवाड, पवार इ. च्या मदतीने स्वराज्याचे साम्राज्यात रूपांतर केले. परंतु छत्रपतीशिवाजी महाराजांचे धोरणात्मक सूत्र कोठेतरी हरविल्याचे दिसते. त्याची परिणिती इ. स. १८१८ मध्ये झाली. पेशवाई संपली. या सबंध घडामोडींमध्ये ज्याज्या सरदारांनी स्वतःच्या पराक्रमाने जीजी भूमी व्याप्त केली होती किंबहुना स्वतःच्या पराक्रमानी मूळच्या वतनदारीमध्ये वाढ करून स्वतःचे असे वेगळेच साम्राज्य निर्माण केले व त्यातूनच संस्थानिकांची निर्मिती झाली.

३.११ साताऱ्याच्या प्रशासकीय कार्ययंत्रणेत परंपरागत चालत आलेली उद्योगव्यवस्था व त्यामधील स्थित्यंतरे

प्रशासकीय कार्ययंत्रणेत आपण अनेक वेळेला अठरा कारखाने व बारा महाल असे शब्द ऐकतो. त्यावेळी नेमके अठरा कारखाने किंवा बारा महाल म्हणजे काय याची थोड्क्यात माहिती करून घेऊ.

३.१२ अठरा कारखाने

कारखाना म्हणजे निरनिराळ्या वस्तू ठेवण्यासाठी किंवा त्यांच्या वापरानुसार लागणारी जागा. त्या जागेला कारखाना असे म्हणत असत. एकंदर प्रशासकीय कार्ययंत्रणेत राज्यव्यवस्थेत अठरा प्रकारच्या उद्योग व्यवस्थांना महत्त्व ढिले असून कारभार सुरळीत चालावा यासाठी ही खास व्यवस्था केलेली असे. छत्रपती शिवाजी महाराजांच्या काळापासून ते संस्थांनांच्या निर्मितीपर्यंत या उद्योगशाळा चालू होत्या. शिवाजी महाराजांनी राज्यव्यवहार कोष बनवताना संस्कृत किंवा स्वदेशी नावे ढेऊन या उद्योगशाळांना महत्त्व प्राप्त करून ढिले. पेशव्यांच्या काळात जुनी नावे परत प्रचलित होऊ लागली. पेशवाईच्या काळात फारसी व अरबी शब्द जास्त प्रचलित होते.

कारखान्यांचा तपशील

३.१२.१ **पीलखाना किंवा गजशाळा** :- घोड्यांची जशी पागा असे तसेच हत्तींची व्यवस्था ठेवण्यासाठी प्रशासन यंत्रणेत स्वतंत्र इमारतीची उभारणी करीत. हत्तींचे औषधपाणी, त्यांचा आहार, त्यांच्या स्वच्छतेसंदर्भातील सर्व गोष्टी जेथे होत असत त्या जागेला गजशाळा किंवा पीलखाना म्हणत असत (भिडे वि. गो., १८६६ : ४० व ४१) .

३.१२.२ **अंदारखाना, आबदारखाना किंवा पानीयशाला** :- प्रशासकीय कार्ययंत्रणेत पाण्याची नित्य गरज पडत असे. पाणी साठवण्याच्या टाक्या, हौद, तलाव इ. पाणी साठवण्याच्या जागेच्या ढेखरेख व्यवस्था करण्याची सोय ज्या ठिकाणी केली जाते त्या जागेला अंदारखाना किंवा पानीयशाला म्हणत असत.

३.१२.३ **उंष्ट्रारखाना किंवा उंटशाला** :- प्रशासकीय कार्ययंत्रणेत हत्तीप्रमाणे उंटांची व्यवस्था होत असे. त्या उंटांची व्यवस्था ज्याठिकाणी असे, त्या ठिकाणी त्यांच्या चाऱ्याची व्यवस्था, औषधपाण्याची व्यवस्था एकंदर उंटतंदुरुस्त राहवेत याकरिता ठेवण्यात आलेली जागा या जागेला उंष्ट्रारखाना किंवा उंटशाला म्हणत असत. अनेक वेळेला उंटावर नौबत ठेवून

बाजवित असे व तसेच टपालांची ढेवघेव करण्यासाठी उंटाचा वापर होत होता. अशा विविध प्रकारच्या उंटांची व्यवस्था ठेवण्याच्या जागेला उंटशाला म्हणत असत.

३.१२.४ **जवाहीरखाना किंवा रत्नशाला** :- प्रशासकीय कार्ययंत्रणेत राजाच्या कुटुंबांचे जोखमीचे जडजवाहीर, ढागढागिने आढी वस्तू ठेवण्यासाठी व त्यांच्यावर ढेखरेख ठेवण्यासाठी खास स्वरूपाची बंढिस्त जागा असे, त्या जागेला जवाहीरखाना किंवा जामढारखाना किंवा रत्नशाला म्हणत असत.

३.१२.५ **गाडीखाना किंवा रथशाळा** :- प्रशासकीय कार्ययंत्रणेत घोडे, उंट, हत्ती याप्रमाणे बैलांचीपण आवश्यकता लागत असे. त्यामुळे बैलगाड्या तोफा ओढणारे गाडे, अन्नधान्याच्या मालवाहतुकीसाठी लागणाऱ्या गाड्या यांची प्रत्यक्ष निर्मिती, त्यांची ढुरुस्ती, त्यांची ढेखभाल, त्यांची साफसफाई, त्यांची रंगरंगोटी थोड्क्यात वाहन किंवा रथ यांची सर्वांगीण व्यवस्था ठेवण्यासाठी जी जागा असे त्याला गाडीखाना किंवा रथशाळा म्हणत असत.

३.१२.६ **फरासखाना किंवा शिबिरशाला** :- सैनिकांच्या राहण्याकरिता किंवा मोहिमेवर जाण्यासाठी ज्या राहुट्या किंवा तंबू लागत असत, शामियाने लागत असत ते निर्माण करण्यासाठी जी कापडे लागत किंवा हत्यारे लागत किंवा त्यासाठी लागणारे साहित्य उढा. मेखा, ढोऱ्या, जाजमे, सतरंज्या, बैठकी, पायघड्या इ. सामान ठेवण्याची किंवा डागडुजी करण्याची किंवा शिलाई करण्याची जी बंढिस्त सुरक्षित जागा असे त्या जागेला फरासखाना किंवा शिबिरशाला म्हणत असत.

३.१२.७ **तालीमखाना ऊर्फ मल्लशाळा** :- प्रशासकीय कार्ययंत्रणेत अंगरक्षक म्हणून काही सैनिकांना विशेष प्रशिक्षण ढिले जात असे. हे सैनिक अंगरक्षक म्हणून राजांचे किंवा सेनापतींचे काम करीत असत. काही वेळेस स्वतः राजे किंवा सेनापतीसुद्धा मल्लशाळेत जात असत. ही जी व्यायामाची जागा असे, त्याठिकाणी कुस्त्यांचा हौढपण असे. त्या संपूर्ण जागेला तालीमखाना म्हणत असत. विविध प्रकारच्या व्यायामांची साधने या ठिकाणी ठेवलेली असत.

३.१२.८ **जिन्नसखाना** :- प्रशासकीय कार्ययंत्रणेत विविध प्रकारचे धार्मिक व सामाजिक कार्यक्रम होत असत. हे कार्यक्रम अष्टप्रधानांपैकी कोणाकडेही असत. त्या कार्यक्रमांना विविध प्रकारच्या भांड्यांची आवश्यकता लागत असे किंवा गडकिल्ल्यांवर किंवा राजवाड्यात होणाऱ्या धार्मिक कार्यक्रमांकरिता वस्तूंची आवश्यकता लागत असे. अगढी काथ्यापासून ते १० फूट लांबीच्या

परातीपर्यंत. एकंदरीत वेगवेगळ्या प्रकारच्या वस्तू, भांडी, सामान व इतर किरकोळ दैनंदिन आवश्यक असलेल्या वस्तू मोठ्या प्रमाणात ठेवण्याची जागा म्हणजे जिन्नसखाना होय.

३.१२.९ **अंबारखाना किंवा धान्यसंग्रहशाळा :-** प्रशासकीय कार्ययंत्रणेत विविध प्रकारची धान्ये काही वेळेला सारा स्वरूपात मिळत असत. त्याचप्रमाणे सैन्याच्या दैनंदिन भोजन व इतर व्यवस्थेकरता किंवा राजवाडा आणि किल्ला याठिकाणी होणाऱ्या विविध प्रकारच्या लोकांच्या एकत्रीकरणासाठी व त्यांची भोजनव्यवस्था करण्यासाठी धान्य विपुल प्रमाणात लागत असे. त्याकरिता धान्याचा संग्रह करण्याची जी जागा आहे त्याला धान्याची कोठारे किंवा अंबारखाना म्हणत असत (अविनाश सोवनी, १९९८ : ७०).

३.१२.१० **तोफखाना किंवा यंत्रशाळा :-** प्रशासकीय कार्ययंत्रणेत विविध प्रकारच्या तोफा लागत असत. त्यामध्ये काही दीर्घपल्ल्याच्या व काही आखूड पल्ल्याच्या छोट्या मोठ्या स्वरूपाच्या तोफा राजवाड्यांच्या व काही किल्ल्यांच्या रक्षणासाठी लागत असत. त्या तोफांची दुरुस्ती त्यांची देखभाल करण्याची जागा व तोफा ओतण्याचा कारखाना ज्या जागेमध्ये असे, त्या जागेला तोफखाना किंवा यंत्रशाला म्हणत असत.

३.१२.११ **शिकारखाना :-** प्रशासकीय कार्ययंत्रणेत विविध प्रकारचे प्राणी व पक्षी यांच्या संग्रहालयाची जागा म्हणजे शिकारखाना होय.

३.१२.१२ **दफ्तरखाना किंवा लेखनशाला :-** प्रशासकीय कार्ययंत्रणेत या लेखनशाळेला विशेष महत्त्व आहे. प्रशासकीय कार्ययंत्रणेत राज्याच्या विविध प्रांतांच्या जागेच्या करवसुलीची कागदपत्रे व्यवस्थित लावून प्रांताच्या क्रमवारीप्रमाणे ठेवण्याची जागा थोडक्यात त्या-त्या परगण्याच्या किंवा सुऱ्याच्या अंतर्गत असणाऱ्या सर्व गावांचे दफ्तर लेखन स्वरूपात म्हणजेच मूळ कागदपत्रांसहित ठेवण्याची जागा म्हणजे दफ्तरखाना (सेन सुरेंद्रनाथ, १९२७:३१०).

३.१२.१३ **मुदपाकखाना किंवा पाकशाला :-** प्रशासकीय कार्ययंत्रणेत ठिकठिकाणी स्वयंपाक करण्याकरिता जागा ठेवत असत. त्या पाकशालेमध्ये लाकूडफाटा ठेवण्यासाठी जागा असे व तयार केलेले पदार्थ मोठ्या प्रमाणात असतील, तर ती ठेवण्याची जागा व पाकशालेसाठी लागणारी भांडी, छोट्या-मोठ्या भोजनाच्या कार्यक्रमाकरता लागणारी भांडी व सर्व प्रकारचे अन्न शिजविण्याकरिता लागणारी जागा म्हणजे पाकशाला होय.

३.१२.१४ **नटखाना किंवा नाटकशाला :-** प्रशासकीय कार्ययंत्रणेत करमणुकीचे कार्यक्रमसुद्धा होत असत. सरदारांच्या किंवा सैन्यासाठी एकत्रित करमणुकीचे कार्यक्रम होत असत.

क्वचितप्रसंगी राजाही त्या प्रसंगाला येत असे. त्या जागेला करमणूकग्रह किंवा नाटकशाला म्हणत असत.

३.१२.१५ **नगारखाना किंवा ढुंढुभिशाला :-** प्रशासकीय कार्ययंत्रणेत नगारे वाजविण्याची पद्धत असे. विशेषकरुन महाद्धाराच्या वरच्या बाजूला किंवा महाद्धाराच्या बरोबर वरती म्हणजेच राजवाड्याच्या किंवा किल्ल्यांच्या पहिल्या प्रवेशद्धाराच्या वरती नगारे किंवा ढुंढुभी वाजविण्याकरिता जागा ठेवलेली असे. त्या जागेला नगारखाना किंवा ढुंढुभिशाला म्हणत असत.

३.१२.१६ **सराफखाना :-** प्रशासकीय कार्ययंत्रणेत राजाचे किंवा त्याच्या परिवाराचे सोन्याचे, चांदीचे अलंकार किंवा द्धागद्धागिने करण्याची जागा किंवा अलंकार द्धुरुस्त करण्याची जागा त्याला सराफखाना म्हणत असत.

३.१२.१७ **सरबतखाना किंवा वैद्यशाला :-** प्रशासकीय कार्ययंत्रणेत सैन्याच्या शारीरिक तंद्धुरुस्तीकरता औषधे लागत असत. ही औषधे झाडपाला, वनस्पती खोडे यांच्या रसातून तयार केली जात असत. ती औषधे तयार करण्याची जागा किंवा तयार झालेली औषधे ठेवण्याची जागा म्हणजे सरबतखाना किंवा वैद्यशाला व या जागेमध्ये वैद्यांनाही बसण्याची जागा असे. छोट्या वैद्यशालेत एकतरी वैद्य असे व मोठ्या वैद्यशालेत तीन ते चार वैद्य असत. छोट्या मोठ्या युद्धानंतर जखमी सैनिकांना द्धुरुस्त करण्यासाठी या सरबतखान्याचा किंवा वैद्यशालेचा उपयोग होत असे.

३.१२.१८ **लकडखाना :-** प्रशासकीय कार्ययंत्रणेत पाकशालेसाठी लाकूडफाटा मोठ्या प्रमाणात साठवावा लागत असे. त्याचबरोबर गवतही साठवावे लागत असे, हे सर्व मोठ्या प्रमाणात साठविण्याची जागा म्हणजे लकडखाना किंवा गंजीखाना म्हणत असत.

वरील अठरा कारखान्यांची व्यवस्था बघण्याचे काम अष्टप्रधान मंडळ करीत असे (गायकवाड आर. डी., १९९० : ११७).

प्रशासकीय यंत्रणेत आपण आतापर्यंत बघितलेले अठरा कारखाने म्हणजेच अठरा विविध प्रकारची खाती. परंतु संपूर्ण राज्यामध्ये ही खाती कमी जास्त प्रमाणात राजवाड्याच्या परिसरात किंवा किल्ल्याच्या परिसरात त्यांच्यात्यांच्या गरजेनुसार असत. या खात्यांवर राज्याचा राज्यप्रमुख म्हणून असा नेमलेला नव्हता. कारण सगळ्याच शाला किंवा कारखाने हे सर्वच ठिकाणी आवश्यक होते, असे नाही. प्रशासकीय कार्ययंत्रणेत अठरा कारखाने व बारा महाल असा उल्लेख इतिहासकार

अनेक ठिकाणी करतात. अष्टप्रधानांच्या हाताखाली अठरा कारखान्यांचे कारखानीस अधिकारी व बारा महालांचे प्रमुख अधिकारी त्यांच्या आज्ञेनुसार काम करीत असत. त्यांपैकी अठरा कारखान्यांची माहिती व कार्ये आपण बघितली (भावे वा. कृ., १९७७ : १७३).

३.१३ बारामहाल बघू व त्यांची व्यवस्था कशी होती याचा अभ्यास करू.

३.१३.१ दारुणी महाल :- मूळ शब्द अन्दरून याचा अर्थ अंतर्भाग किंवा अंतर्भागातील व्यवस्था म्हणजेच प्रशासकीय कार्ययंत्रणेत छत्रपती, सरंजामे सरदार, प्रधान यांच्या घराची व्यवस्था ठेवण्याचे खाते म्हणजे दारुणी महाल.

३.१३.२ खजिना महाल :- प्रशासकीय कार्ययंत्रणेत या महालाला विशेष महत्त्व आहे. हा महाल अत्यंत सुरक्षित असे. या महालाची जागा भक्कम इमारत स्वरूपाची असे. पैशाच्या ऐवजी धातूच्या नाण्यांच्या रूपात येत असे. लष्कराच्या स्वारीमध्ये किंवा युद्धामध्ये विजय मिळाल्यानंतर जो शत्रूचा खजिना मिळत असे आणि त्याचप्रमाणे द्रव्यभांडारही (चांदीची, सोन्याची, पितळेची नाणी) मिळत असे. ती ठेवण्याची जी व्यवस्था किंवा त्या खात्याला खजिना महाल म्हणत असत.

३.१३.३ अंबार महाल :- प्रशासकीय कार्ययंत्रणेत ज्याप्रमाणे करवसुली नाण्यांच्या रूपात मिळत असे, त्याचप्रमाणे काही कर किंवा वसुली धान्य रूपातपण मिळत असे. त्याची साठवण अंबरखान्यात होत असे, परंतु त्याची व्यवस्था ठेवणे, त्याचा हिशेब ठेवणे, त्याची स्वच्छता ठेवणे अशा स्वरूपाची कामे करावीच लागत असत व ते कार्य करण्याची यंत्रणा किंवा मनुष्यबळ उपलब्ध करणे हे त्या खात्याचे काम असे. अशाच प्रकारे कोठारातील धान्यांची व्यवस्था ज्या खात्यामार्फत ठेवली जात असे, त्या खात्याला अंबार महाल विभाग म्हणत असत (सोवनी अविनाश, १९९८ : ७२).

३.१३.४ पागा महाल :- प्रशासकीय कामकाजात घोड्यांना विशेष महत्त्व प्राप्त झाले होते. या घोड्यांद्वारे सरकारी नोकर म्हणजे प्रधान किंवा इतर ज्येष्ठ अधिकारी आणि त्यांच्या हाताखाली काम करणारे, सारा वसुली करणारे अधिकारी किंवा सरकारी लष्करातील अधिकारी यांचे घोडे ठेवण्याची जागा, त्यांची सुव्यवस्था बघण्याकरता घोड्यांची जाण असलेल्या व्यक्ती लागत असत. अशा तज्ज्ञ व्यक्तींच्या देखरेखीखाली ही व्यवस्था असे. त्या खात्याला अश्वशाला किंवा पागा म्हणत असत.

३.१३.५ गोशाला महाल :- आदिलशाही कागदपत्रांतून महल थती असे उल्लेख देतात. हा उल्लेख गाईंच्या गोशाला संदर्भात असे. थट्टी या मराठी शब्दापासून थती ही संज्ञा आदिलशाहीत रूढ झाली. या गोशाला महालामध्ये गाईंचे, म्हशींचे गोठे, त्यांचे चारापाणी, त्यांची सर्वतोपरी निगराणी करणे, दूध

काढणे व त्याची साठवण करणे या व्यवस्थेकरता कुशल कारागीर नेमून एक खाते तयार केले जात असे. त्या सर्व व्यवस्थेला गोशाला महाल म्हणत असत.

३.१३.६ बागमहाल :- प्रशासकीय कार्ययंत्रणेत सरकारी बागा यांची देखभाल करण्याचे कामी त्या क्षेत्रातील कुशल माळीकाम करणारे कारागीर यांची गरज भासत असे. राजाच्या राजवाड्यामध्ये देवघराला लागून एक छोटीशी बाग असे किंवा राजवाड्याच्या सर्वात शेवटच्या भागात बाग असे. ह्या बागेत जास्त करून फुलझाडे असत. या बागेतील फुले देवघरातील नित्यपूजेकरता व धार्मिक कार्यक्रमाकरिता वापरत असत. छत्रपती शाहू महाराजांनी साताऱ्याच्या आसपास स्वतःसाठी वेगवेगळ्या प्रकारची फुलझाडे लावून सुशोभित अशा बागा तयार करून घेतल्या होत्या. या एकंदरीत व्यवस्थेला लागणारी बि-बियाणे माती व इतर साहित्य यांची व्यवस्था बघण्याच्या खात्याला बागमहाल खाते म्हणत असत (भावे वा. कृ., १९७७:७०).

३.१३.७ टांकसाळ महाल :- प्रशासकीय कार्ययंत्रणेत टांकसाळ म्हणजे चलनी नाणी तयार करण्याचे कारखाने. त्या नाण्यांकरता लागणारे कच्चे साहित्य व इतर साचेबद्ध वस्तू म्हणजेच पूर्णतः नाणी सर्वतोपरी तयार करण्याचा कारखाना व ती नाणी योग्य पद्धतीने तयार झाली आहेत की नाही ही बघण्याची व्यवस्था व त्याचप्रमाणे नाण्यांची मोजदाद करून त्यांना सरकारी आदेशाप्रमाणे विविध ठिकाणी सुरक्षित पोचवणे अशा स्वरूपाची कामे करण्याकरता विश्वासू माणसे काम करीत असत. त्या खात्याला टांकसाळ महाल खाते असे म्हणत असत.

३.१३.८ शिबंदी महाल :- शिबंदी याचा अर्थ प्रशासकीय कार्ययंत्रणेत करवसुलीच्या कामासाठी किंवा सारा वसुलीच्या कामासाठी ठेवलेली सुसज्ज, हुशार शिपायांची फौज. प्रशासनामध्ये सारा किंवा करवसुलीचे काम सरकारी अधिकाऱ्यांकडे असे व या सरकारी अधिकाऱ्यांना मदतनीस म्हणून असलेल्या शिपायांची शिध्याची व्यवस्था, त्यांच्या इतर खर्चाची व्यवस्था व त्यांचे पगार खर्चाची व्यवस्था ही सर्व व्यवस्था प्रशासकीय कार्ययंत्रणेतून सरकारद्धारा होत असे. ही सर्व व्यवस्था बघण्याचे काम वसुली कामात हुशार असलेले व कौशल्याने करवसुली करणारे हुशार शिपाई म्हणजेच शिबंदी. ही सर्व व्यवस्था बघण्याच्या खात्याला शिबंदी महाल म्हणत असत.

३.१३.९ इमारत महाल :- प्रशासकीय कार्ययंत्रणेत सरकारी वास्तू, बांधकामे, इमारती, छोटे-छोटे वाडे, पाण्याचे बंधारे, तटबंद्या इ. स्वरूपाचे बांधकामे सरकारी काम करताना बांधली जात असत. त्या कामाकरता बांधकाम क्षेत्रातील तज्ज्ञ, अनुभवी व हुशार माणसे लागत असत व त्यांच्या हाताखाली काम करणारे कुशल बांधकाम मजूर वरील सर्व बांधकामांची देखभाल करीत असत. त्या एकंदर

व्यवस्थेमध्ये लागणारी माणसे व मनुष्यबळ यांची व्यवस्था म्हणजेच इमारत महाल व्यवस्था होय. (भावे वा. कृ., १९५७:१७३ व १७४).

३.१३.१० सौदागिरी महाल :- प्रशासकीय कार्ययंत्रणेत संपूर्ण राज्याची राज्ययंत्रणा ज्या आधारावर चालते ते खाते म्हणजे व्यापार खाते. संपूर्ण राज्यातील आयात-निर्यात व राज्यात निर्माण झालेल्या शेतीच्या उत्पन्नाच्या उलाढाली व त्यांच्यावर लागणारा कर किंवा सारा हे ठरविणे, त्याचा अभ्यास करणे व कर ठरवल्यावर त्याची अंमलबजावणी करणे याकरता उत्कृष्ट सौदा करणारे व शेतीच्या उत्पन्नाची माहिती असलेली जाणती माणसे हुशार कारकून एकंदरीत राज्यातील सर्व जमिनींच्या उत्पन्नांवरील कर व वसुली यासाठी काम करणारी यंत्रणा म्हणजेच व्यवस्था जी असे त्या खात्याला सौदागिरी महाल म्हणत असत.

३.१३.११ चौबिक महाल :- प्रशासकीय कार्ययंत्रणेत लाकडाचा वापर मोठ्या प्रमाणात होत असे. चौब या अरबी शब्दाचा अर्थ लाकडी काठी. चौबिक याचा अर्थ लाकडाच्या संदर्भातील सर्वकाही. राजाच्या राजवाड्याला किंवा प्रधानांच्या वाड्यांना ठिकठिकाणी विविध स्वरूपाची, विविध आकारांची, विविध जाडीची लाकडे लागत असत. त्याचप्रमाणे बांबू व फळ्या यापण मोठ्या प्रमाणात लागत असत. या सर्व लाकडांचा साठा ज्या ठिकाणी असे ती जागा खूप मोठी असे. चौबिक महालामध्ये असलेल्या लाकडांची मोजदाद, त्यांची आवक-जावक, लाकडाचे वाळवीपासून रक्षण करणे यासाठी लाकूड कामातील तज्ज्ञ मंडळी, कुशल कारागीर व लाकडे हाताळण्याची जाण असलेली तज्ज्ञ माणसे या विभागामध्ये काम करीत असत. एकंदरीत या विभागाची व्यवस्था बघणे त्याला चौबिक महाल म्हणत असत.

३.१३.१२ जामदार महाल :- सरकारी राज्ययंत्रणेमध्ये सरकारच्या किंवा राजाच्या मौल्यवान वस्तू, सोन्याचे अलंकार, ढागढागिने, वस्त्रालंकार, सोन्याची किंवा चांढीची भांडी इ. स्वरूपाचे किंमती सामान एका विशिष्ट भक्कम अशा संरक्षित इमारतीमध्ये किंवा तळघरामध्ये ठेवत असत. राज्ययंत्रणा किंवा राजा या वस्तू एकाच ठिकाणी न ठेवता विविध ठिकाणी मुद्दाम ठेवत असत. एकंदर या जडजवाहीर, ढागिन्यांची, मौल्यवान वस्तूंची व्यवस्था, संरक्षण आणि मोजदाद ठेवण्याकरिता विश्वासू व प्रामाणिक अशी माणसे नेमून या खात्याचे कामकाज चालत असे. या व्यवस्थेलाच जामदार महाल म्हणत असत.

मराठ्यांच्या प्रशासकीय कार्ययंत्रणेत महाल म्हणजे स्वतंत्र खातेच असे व ते खाते चालविण्याकरता जी तज्ज्ञ, कुशल माणसे लागत असत, त्यांची सर्व व्यवस्था बघणे या एकंदरीत व्यवस्थेला महाल म्हणत असत.महाल या यंत्रणेमध्ये स्थित्यंतरे खालीलप्रमाणे झाली. साताऱ्याचे छत्रपती शाहू महाराजांपर्यंत म्हणजे साधारणतः १७४१ पर्यंत ही व्यवस्था बऱ्यापैकी कार्य करीत होती. पुढे पेशवाईमध्ये ही व्यवस्था

थोडी कमी झालेली दिसते. त्या व्यवस्थेचे एकंदरीत स्थित्यंतर होऊन महाल आणि कारखाने यांची सरमिसळ झाली व कारखाना ही व्यवस्था रूढ होत गेली व या कारखान्यांच्या यादीत पेशवेकाळात भरच पडत गेली. उदा. दारुणी महालच्या ऐवजी खाजगीचा कारखाना. अशा अनेक महालांचे शब्दप्रयोग बदलले व बारा महाल व अठरा कारखाने ही व्यवस्थाही कमी कमी होत गेली.

एकंदरीतच प्रशासकीय कार्ययंत्रणेत १६८९ नंतर स्थित्यंतरे घडतच गेली. या स्थित्यंतरांमध्ये ज्याज्या प्रधानांनी पराक्रम गाजवले त्यांनी त्यांनी स्वतःची कार्यक्षेत्रे निर्माण केली व स्वतःचा प्रभाव वाढवला व हीच मंडळी नंतर स्वतःला त्यात्या क्षेत्राचे राजे म्हणवून घेऊ लागली. अशा प्रकारे प्रशासकीय यंत्रणेत १९४७ पर्यंत स्थित्यंतरे होतच गेली.

३.१४ सातारा संस्थानच्या राजवाड्याचे स्थापत्य

३.१४.१ नवीन राजवाडा :- हा वाडा किंवा राजवाडा इ.स. १८४४ मध्ये अप्पासाहेबाने म्हणजे प्रतापसिंहानंतर गादीवर बसलेल्या राजपुरुषाने बांधला.पहिल्या मंडपाची लांबी २७ मी. रुंदी ७.७ मी. व उंची ७.७ मी. आहे. या नवीन राजवाड्याच्या मोठ्या सभागृहातील डाव्या बाजूस रामायण व महाभारत आणि पुराणावरील कथांवर आधारित महाकाव्यांतील कथानकांवर आधारलेली भित्तीचित्रे आहेत.

छतावरील वाश्यांमुळे अकरा खण निर्माण झाले आहेत म्हणून या सभागृहास अकराखणी सभागृह म्हणतात. सभागृहात मध्यभागी आधारस्तंभ असलेल्या लाकडी खांबावर कोरीव नक्षीकाम केले आहे. यावरून सभागृह अत्यंत उच्च दर्जाचे करण्याचा प्रयत्न अप्पासाहेबांनी केला असावा (महाराष्ट्र शासन, महाराष्ट्र राज्य गॅझेटर, १९६३ : ९०४).

३.१४.२ सभागृहाची रचना :- स्थापत्य व त्यावरील संशोधनात्मक निष्कर्ष

१. सूर्यप्रकाश सभागृहात यावा व सभागृहातील भित्तीचित्रे स्पष्ट दिसावीत याकरिता सभागृहाच्या आग्नेय व दक्षिण बाजूस दरवाजे व खिडक्या जास्त प्रमाणात केल्याचे दिसते.

२. पूर्वेकडून म्हणजे आग्नेय व (दक्षिण व पूर्वेकडील) दिशांकडून येणाऱ्या प्रकाशाने सर्व सभागृह उजळून निघाले. हे स्थापत्य फार महत्त्वाचे दिसले.

३. सभागृहात जी भित्तीचित्रे आहेत त्यामध्ये साधारणतः ०.६ मीटर X १.२ मीटर (२'-०' X ४'-०') आकाराची ४ चित्रे आहेत व १.३७ मी. X १.२ मी. (४'-६'x४'-०') आकाराची १६ भित्तीचित्रे आहेत.

४. उत्तरेकडील प्रवेशद्धाराची रचना केलेली दिसते. येथेपण वास्तुशास्त्राचा वापर केल्याचे दिसते आहे.

५. दक्षिणेकडील खिडक्यांमुळे वायुविजनही व्यवस्थित होत आहे.

६. पूर्वेकडील भिंतीवर विष्णू, रंग खेळणारा श्रीकृष्ण, नृत्य करणारे शिव इत्याढी उल्लेखनीय आहेत.

७. उत्तरेकडील भिंतीवर रामाला उचलून नेणारा हनुमान, शेषशाही विष्णू, ऋध्दी व सिद्धीसहित श्रीगणेश, शिव परिवार, गरुडारूढ विष्णूचे मुख उत्तरेकडे असण्याचे कारण कदाचित हिमालय उत्तरेकडे आहे म्हणून की काय ही दिशा निवडली असावी. असे वाटते.

८. दक्षिणेकडील भिंतीवर कालियामर्दन करणारा श्रीकृष्ण, महिषासूरमर्दिनी, समुद्रमंथन, रामपंचायतन, पंचमुखी शिव (अत्यंत नावीन्यपूर्ण असे चित्र) युद्धाला निघालेले पांडव, झोपाळ्यावरील श्रीगणेश इ. चित्रे फारच मोहक व विलोभनीय आहेत.

९. मुख्य सभागृहाला लागू असलेल्या एका खोलीत एक नावीन्यपूर्ण चित्र बघण्यास मिळाले. उदा. दोन डोक्यांचा गरुड व धावत सुटलेला मदमस्त हत्ती.

वरील चित्रांची शैली मराठा शैलीची दिसली.

३.१४.३ जुना राजवाडा :- महाराजा प्रतापसिंहाने हा राजवाडा १८२४ मध्ये बांधला. व तिथे महाराजा प्रतापसिंह यांनी वास्तव्य केले.

राजवाड्याला शोभेल असा भव्य दरवाजा प्रवेश करतेसमयी बघण्यास मिळतो. साधारणतः पूर्वीच्या काळी एक हत्ती जाईल एवढी उंची होती. यामुळे भव्यता वाढत होती. दरवाजा मोठा म्हणून बाजूच्या भिंती / बुरूज त्याला शोभेल असे बांधावयास लागत (महाराष्ट्र शासन, महाराष्ट्र राज्य गॅझेटर, १९६३ : १०४ व १०५).

मुख्य दरवाजावर शत्रूने हल्ला केला तर राजवाड्याचे संरक्षण कसे करावे यासाठी दोन्ही बाजूच्या बुरुजांची रचना असे. आई भवानी मातेची मूर्तीची कमान त्या वाड्यात केली होती. नेहमीप्रमाणे वाड्याची वास्तुरचना किंवा स्थापत्य एक मराठमोळ्या पद्धतीने आहे.या चित्रांतील माता भगिनी यांचा पेहराव मराठी पद्धतीची लुगडी नेसल्या आहेत व पुरुष रेखाचित्रे पगडी व धोतरांनी रेखाटली आहेत.

वरील सर्व भित्तीचित्रे पाहिल्यावर निष्कर्ष असा निघतो की, ह्या शैलीची मांडणी व रेखाटन पूर्णपणे मराठा शैलीची आहे. फार कमी ठिकाणी असे आढळते. हा राजवाडा १८४४ मध्ये बांधण्यात आला म्हणजे

साधारणतः १७० वर्षे पूर्वी वाड्याच्या स्थापत्यामध्ये युरोपियन शैलीचा बिलकूल वापर करण्यात आला नसून संपूर्णपणे राजवाड्याच्या उभारणीमध्ये मराठा शैली दिसत आहे.

३.१४.४ अदालत वाडा :- थोरले छत्रपती शाहू महाराजांच्या (शंभुपुत्र) कालखंडानंतर अस्तित्वात असलेल्या राजवाड्याचा एक भाग आहे. या वास्तूचा पाया ३.०७ मी. उंच जमिनीपासून वर आहे. या राजवाड्याच्या भागाचा वापर ज्ञानदानासाठी करीत असत. ही वास्तू २०.४२ मी. लांब १४.०२ मी. रूंद आहे, ही वास्तू मोठ्या घडवलेल्या भरीव ढगडात बांधली आहे. महत्वाची कागदपत्रे व न्यायालयीन निवाडे यांचे संदर्भ व मूळ प्रती येथे ठेवत असत. इ. स. १७४१ ते इ. स. १८७६ अशी १२६ वर्षे या वाड्याचा न्यायदानासाठी व दिवाणी कामासाठी वापर होत असे. म्हणूनच याला अदालत वाडा अजूनही म्हणतात. सध्या राजवाड्याच्या या भागात राज कुळाचे वसतिस्थान आहे.

३.१५ स्थापत्यविषयक महत्वाचे निष्कर्ष

१. राजवाड्याची पायाभरणी ही भक्कम माटीव ढगडांनी केलेली आहे.
२. पायाभरणीवरील जोते हेसुद्धा भक्कम मोठ्या आकाराच्या माटीव ढगडात केलेली दिसते.
३. जोत्यावरील खांबांना मोठा तळखडा एक विशिष्ट आकारात घडवून नक्षीकाम केलेले आहे व प्रत्यक्ष स्थापत्य शास्त्रासाठी खांबांचा पाया भक्कम व रुंद असावा या नियमानुसार बनविलेला दिसला. वरील सर्व काम ढगडात म्हणजे काळ्या पाषाणात केलेले दिसते.
४. जोत्यावरील फरशी साधारणतः ०.१७ मी. जाडीची आयताकृती आकाराची उदा. ०.६ मी. x ३.६७ मी. असावी. ३.६७ मी. x ४.७७ मी. इत्यादी आकाराची सांधेमोड करून बनवलेली दिसते. ढगडाची फरशी एकाच कांडात (रुंदी) असेल असे वाटते. परंतु ज्या रुंदीच्या ढगडाने सुरुवात केली त्याच रुंदी एका रांगेत बसणाऱ्या ढगडांची ठेवलेली दिसते. उदा. २.७४ मी. x ३.६७ मी. ३.६७ मी. x ४.७७ मी. ३.६७ मी x ३.१६ मी. इत्यादी म्हणजे रुंदीसारखी ठेवून ढगडएका रेषेत वापरले आहेत.

३.१६ राजवाड्याच्या रचनेचे निरीक्षण व निष्कर्ष

३.१६.१ सदर किंवा दिवाणखाना - दिवाणखाना म्हणजे वाड्यातील मुख्य सभास्थान. या ठिकाणी न्यायदानाचे व सरकारी कामकाज होत असे. दिवाणखाना हा प्रवेशद्धारासमोर असे. दिवाणखान्याची रचना दोन काटकोन एकत्र केले असता इंग्रजी एल किंवा इंग्रजी टी अशा स्वरूपाची होते. दिवाणखान्याच्या दोन्ही बाजूंस साधारणतः जिना असतोच. दिवाणखान्याशेजारी माता-भगिनींना

बसण्यासाठी स्वतंत्र व्यवस्था असे. त्याचप्रमाणे दिवाणखान्याच्या मुख्य प्रवेश खांबावर सुंदर असे नक्षीकाम केलेले दिसत आहे (गायकवाड आर. डी., १९९० : ४१६).

३.१६.२ दरबार सभागृह :- दरबार सभागृह म्हणजे अतिशय महत्त्वाचे असे सरकारी कामकाज किंवा अतिमहत्त्वाच्या व्यक्तींबरोबर चर्चा करण्याची जागा. याची रचना दिवाणखान्यासारखीच असते. फक्त आकार थोडा मोठा असतो. दरबार गृहातच बहुतःशी राजा देवाचे स्थान ठेवत असे. ऐश्वर्याचे प्रदर्शन करण्यासाठी वेगवेगळ्या लाकडी खांबांवर वेगवेगळे कोरीव काम व जमल्यास त्याला लागून असलेल्या वरच्या भागावर सिंह, हत्ती, घोडे इ. प्राण्यांची तोंडे कोरीत असत. जेणेकरून जास्तीत जास्त दरबारगृहाचे सौंदर्य वाढेल. अशीच खांबांवर नक्षी कोरलेली असे. समजा, दरबार सभागृहात एखाद्या ठिकाणी भिंत येत असेल तर त्या ठिकाणी उत्तम दर्जाचा गिलावा व गिलाव्याचेच नक्षीकाम केलेले दिसत आहे.

३.१६.३ आरसे महाल :- आरसे महाल हे प्रतिष्ठित व महत्त्वाचे राजवाड्यातील एक दालन समजले जात असे. बहुतांशी पहिल्या मजल्यावरच आरसे महालाची जागा म्हणजे दिवाणखान्याच्या लगेचच वरती केलेली असे. या आरसे महालात छतालापण आरसे लावलेले दिसत आहेत व आरसे अशा प्रकारे लावले आहेत की, आरसे महालाची व्याप्ती मोठी दिसावी. आरसे महालाच्या भिंतींनासुद्धा विशिष्ट ठिकाणी आरसे लावून समोरच्याच भिंतीचे प्रतिबिंब त्यावर दिसून येत असे. त्यामुळे आरसे महालाची लांबी मोठी आहे असे भासत होते. एकंदरीतच आरसे महाल हा वैशिष्ट्यपूर्ण दिसत आहे.

३.१६.४ रंग महाल :- रंग महाल म्हणजे राजवाड्याचे वस्तुसंग्रहालय होय. राजवाड्याच्या संबंधी राजाच्या होऊन गेलेल्या राजांच्या अनुक्रमाने त्यांची चित्रे किंवा त्यांच्या तसबिरी आहेत. घराण्यातील व्यक्तींशिवाय मुलूखगिरीवर गेल्यानंतर ज्याज्या ठिकाणी संग्राम करून ज्या संग्राह्य वस्तू मिळतील, त्या आणून रंगमहालात ठेवीत असत. रंगमहालात काही ठिकाणी विशेषतः पुराणातील प्रसंगातील चित्रेरेखाटून ठेवलेली दिसतात. बहुसंख्य राजे लोक रामायण व महाभारत यांसारख्या महाकाव्यातील प्रसंग रेखाटून ठेवत असताना दिसतात. त्याचप्रमाणे पराक्रम केलेल्या त्यात्या राजांच्या कालखंडातील सरदारांचीपण चित्रे काढलेली दिसतात. असा हा रंगमहाल राजवाड्याच्या इतिहासातील व पराक्रमाची आठवण करून देणारा दिसत आहे.

३.१७ राजवाड्याच्या स्थापत्यातील बांधकामा संदर्भातील काही निष्कर्ष अभ्यास करून दिसत आहेत.

१. सुरुवातीलाच सव्वा मी. ते दोन मी. जोते बांधल्यावर त्यावर वाड्याचे उर्वरित बांधकाम केलेले दिसत आहे. क्वचित प्रसंगी तीन मी. ते चार मी. जोते पहिले बांधून, भराव करून वाड्याची उंची वाढविल्याचेही दिसत आहे.

२. जोत्यावर विटा किंवा चुन्याचा मारा किंवा विटेची माती यांचा वापर केलेला दिसत आहे.

३. जोत्यावरील बांधकामामध्ये वाडा बांधत असताना त्यामध्ये घडविलेले दगड, चपट्या विटा व चुना, चुन्याच्या गारा यांचा वापर दिसत आहे.

४. मातीमध्ये ताग कुटून टाकत असत. गवंडी काम अतिशय सुबकपणे, मातीकाम व दगडीकाम करताना हे मिश्रण वापरत असत. लाकूड सोडून उरलेल्या सर्व भागांवर चुन्या + गूळ + बारीक माती एकत्र करून गिलावा करण्याची पद्धत दिसत आहे.

५. बांधकामात लाकडी तुळई हे सर्वांत मोठे जड असून ते विशिष्टपणे चौकोनी किंवा आयताकृती अशा स्वरूपाच्या लांब किंवा लहान स्वरूपात बांधकामात उठून दिसत असताना दिसतात.

६. भिंतीची रुंदी कमीत कमी तीन फूट दिसत आहे. भिंतीची रुंदी जास्त ठेवण्याचे कारण अ. संरक्षण (सतत होणाऱ्या लढायांपासून बचाव) व टिकाऊपणा, वरील मजल्याचा भार घेण्याकरिता जाडी वाढविलेली आहे.

७. भिंतींची जाडी जास्त ठेवल्यामुळे आतील बाजूस एका प्रकारचा थंडपणा किंवा गारवा निर्माण व्हावा. असा शास्त्रीय दृष्टिकोन दिसत आहे.


८. या बांधकामात खालीलप्रमाणे विटांचे आकार दिसतात. (माटे म. श्री., २००८ :७० व ७१)


३.०५ मी. X १.८३ मी. X ०.६ मी. जाडीचा

२.मी. X २.४३ मी. X ०.६ मी. जाडीचा


१.५२ मी. X १.५२ मी. X ०.४६ मी. जाडीचा.


३.१८ भोसले घराण्याची वंशावळ






(*छत्रपती शहाजी ऊर्फ आप्पासाहेब महाराजांच्या निधनानंतर सातारा संस्थान खालसा झाले)







चित्र क्रमांक : ३.७



साताऱ्याच्या राजवाड्यातील नक्षीकाम

३.१९ सातारा संस्थानामधील स्थापत्य व संशोधनात्मक निरीक्षण आणि निष्कर्ष

संस्थानिकांच्या स्थापत्यामध्ये जसा जसा त्यांचा महसूल वाढत गेला तसे तसे त्यांनी स्वतःच्या राजवाड्यांमध्ये सरकारी कामकाजांकरीता म्हणजेच काही महत्त्वाच्या संस्थानांच्या राजवाड्यामध्ये व रचनेमध्ये थोडे फेरफार व बढल केले. त्यालाच आपण स्थापत्यविषयक स्थित्यंतरे असे म्हणतो. राजवाड्याचा काही हा महत्त्वाच्या सरकारी कामाकरीता त्याचप्रमाणे आंग्लशाही चालू झाल्यावर

त्यांच्या प्रशासकीय कार्ययंत्रणेमुळेसुद्धा प्रशासनात स्थित्यंतरे झाली. राजवाड्याच्या रचनेत स्थित्यंतरे झाली. त्याकरीता काही निरिक्षणे बघण्याकरीता संस्थानांचे स्थापत्याच्या नकाशावरून आपल्या लक्षात येईल. त्यामध्ये साताऱ्याच्या राजवाड्याच्या दर्शनी भागाचा नकाशा, साताऱ्याच्या राजवाड्याच्या स्थापत्याचा नकाशा, पूर्व-पश्चिम व दक्षिण-उत्तर छेद घेऊन तयार केलेला नकाशा पहा चित्र क्र. ३.८आणि सातारा राजवाड्याचा पहिल्या मजल्यावरील स्थापत्याचा नकाशा व जमिनीपासून ते छतापर्यंतचा घेतलेला उभा छेद याचा नकाशा, या नकाशामध्ये आपल्याला राजवाड्याची व्याप्ती दिसून येते. त्याचप्रमाणे मराठा आर्कीटेक्टरचा एक उत्कृष्ट नमूना म्हणून याकडे पाहिले जाते. तळमजल्याचा व पहिल्या मजल्याच्या नकाशावरून आपल्याला असे दिसून येईल की, तळमजल्याच्या पुढच्या भागाचा वापर सरकारी म्हणजेच संस्थानच्या कारभारासाठी वापरण्यात येत असे. तळमजल्याच्या दुसऱ्या चौकातील सर्व कक्षांचा वापर पाहुण्यांसाठी व दरबारातील प्रमुख मंडळींच्या सल्लामसलतीसाठी वापरत असत. पहिल्या मजल्यावरील जागेचा वापर हा संस्थानातील प्रमुख अधिकाऱ्यांच्या महत्त्वाच्या बैठकीसाठी वापरत असत व त्याचप्रमाणे स्वतः संस्थानच्या राजासाठी व त्याच्या परिवारासाठी काही खाजगी कक्ष तयार करून वापर केलेला दिसत आहे. संस्थानच्या राजाच्या व त्याच्या परिवाराच्या घरगुती सणवारासाठी पहिल्या मजल्यावरील सभागृहाचा उपयोग होत असे. त्याप्रमाणे त्याची रचना केलेली दिसत आहे, पहा चित्र क्र. ३.९ संस्थानिकांच्या मराठा शैलीच्या स्थापत्यामध्ये सातारा, भोर, फलटण, औंध आणि नागपूर या सर्व राजवाड्यांमध्ये तळघराचे स्थापत्य आपल्याला दिसते. हे तळघराचे स्थापत्य व त्याचा उपयोग यासंदर्भात सर्व संस्थानांमध्ये सामाईक स्थापत्य दिसले, म्हणून या ठिकाणी प्रातिनिधीक स्वरूपात या प्रकरणामध्ये घेतले आहे. पहा चित्र क्र. ३.१० तळघराचे स्थापत्यविषयक दृष्टीकोन व निष्कर्ष खालीलप्रमाणे :-

तळघर :- राजवाड्यामध्ये तळघर हे जाणीवपूर्वक निर्माण केलेले असे. तळघरात हवा खेळती राहवी म्हणून एका विशिष्ट प्रकारे व्यवस्था केली जात असे व या तळघराचे विविध उपयोग आहेत व त्यामध्ये सुरक्षासुद्धा आहे. तळघरामध्ये :

१. धान्यांचा साठा व्यवस्थितरित्या केला जात असे.

२. शस्त्रांचा साठा करण्याचे महत्त्वाचे ठिकाण म्हणजे तळघरच.

३. अत्यंत महत्वाची खलबते किंवा मंत्रीमंडळातील अति महत्त्वाच्या व्यक्तींची बैठक घेण्यासाठी तळघराचा उपयोग होत असे.

४. तळघरातून दुसऱ्या ठिकाणी सुरक्षित बाहेर पडण्यास भुयारी मार्गाच्या प्रवेशासाठी तळघराचा उपयोग केला जात असे.

७. युद्धप्रसंगी राजवंशाला वाचविण्याकरिता किंवा राजवंशाच्या माता-भगिनी, मुले, स्त्रिया, महत्त्वाचे लोक, नोकर-चाकर म्हणजेच राज्य चालविण्याकरिता असलेल्या सर्व छोट्यामोठ्या लोकांना वाचविण्याकरिता तळघराचा उपयोग केला जात असे.

६. खजिना :- अत्यंत मौल्यवान, परंपरागत दागिने, सोने, बक्षीस मिळालेली सोने, चांदी, जडजवाहिर, चांदीची, सोन्याची भांडी, मोठे हिरे व मौल्यवान वस्तू, सोन्याची किंवा चांदीची शस्त्रे, देवाच्या अंगावरील परंपरागत असलेले सर्व दागिने, देवस्थानची मौल्यवान भांडी, राजवंशाचे चलनी नाणे इ. सर्व प्रकारचा खजिना तळघरातच ठेवलेला आढळतो. काही ठिकाणी हा खजिना तळघरामध्ये अजून एक तळघर करून ठेवलेला आढळतो.

७. तळघरात दिवाबत्तीची सोय व्यवस्थित केलेली दिसते. दिवसातून दोन वेळा राजाचा खास माणूस किंवा स्वतः राणीसाहेब फेरी मारून येतात. अशा स्वरूपाची माहिती मिळते. एकंदरीतच तळघर हा राजवाड्याचा अत्यंत महत्त्वाचा व गुप्त विभाग असे. त्याला कडेकोट बंदोबस्त व सुरक्षा असे. सहजासहजी कोठे आहे हे शत्रूला समजू नये, अशा स्वरूपाचाच त्याचा मुख्य दरवाजा असे. तो दरवाजा जमिनीलगत असे, त्यामुळे तो जमिनीवरून ओळखता येत नसे.

८. काही ठिकाणी तळघर अशा स्वरूपाचे बनविलेले दिसते की, शत्रूला वाटावे तळघर आहे, परंतु तळघराच्या दिशेने आत गेल्यावर शत्रूचे सैनिक किंवा त्याची सर्व माणसे खोल असलेल्या विहिरीमध्ये पडत असत. ही विहीर 'फसवी विहीर' म्हणून ओळखली जात असे.

सातारा संस्थानच्या राजवाड्यात काही मोठे चौक आहेत व या चौकांमध्ये तुळईचा शेवट जर बाहेरच्या बाजूस किंवा चौकाच्या आतील बाजूस येत असेल तर त्याच्या अंतिम टोकाला लाकडाच्या नक्षीकामाची कारागिरी दिसत आहे. याचा दुसरा उद्देश असा की, तुळईचे अंतिम टोक बंद होते व तेथून वाळवी आत जात नाही, त्यामुळे तुळई संरक्षित रहाते व ज्या लाकडाच्या खांबावर तीन तुळ्या एकत्र येत असतील व त्या ठिकाणी त्या खांब व तुळई यांना आधार देण्याकरता लाकडाची कारागिरी केलेली आहे. खरेतर आधारासाठी लावलेले ते 'हस्त' आहेत, परंतु दोन्ही गोष्टी म्हणजे संरक्षण व आधार साध्य केलेले आहे. असे अनेक ठिकाणी सर्व राजवाड्यामध्ये आपणास दिसेल. पहा चित्र क्र. ३.११ आणि चित्र क्र. ३.१२

३.२० सारांश :- या प्रकरणामध्ये सातारा संस्थानची प्रशासकीय कार्ययंत्रणा जी कार्ययंत्रणा छत्रपती शिवाजी महाराजांनी अष्टप्रधान मंडळाच्या स्वरूपात घालून ढिली होती. ती प्रथम रायगडावरून चालू होती. तीच कार्ययंत्रणा साताऱ्यावरून चालत असे. उढा. अष्टप्रधान मंडळात पेशवा, सेनापती, सचिव, अमात्य, सुमंत, मंत्री, न्यायाधीश, पंडीतराव. छत्रपती राजारामांच्या काळात निर्माण झालेले प्रतिनिधीपढ या सर्वांची राज्य चालवित असताना त्यांनी करावयाची कामे व त्यांचे अधिकार आणि छत्रपती शिवरायांच्या मनात असलेली राज्यघटना ती रामचंद्रपंत अमात्य यांनी आज्ञापत्राच्या रूपाने सर्वांपुढे ठेवली. या सर्वांचा आढावा या प्रकरणामध्ये घेतला असून त्यामध्ये प्रथमतः राजा, प्रधान, साहुकार, वतनदार, वृत्ती आणि इनामे, ढुर्ग, आरमार यासंढर्भात ढिलेल्या सर्व आज्ञा यांच्यासंढर्भात माहिती ढिली आहे. तसेच छत्रपती शिवाजी महाराज यांचा झालेला राज्याभिषेक (इ. स. १६७४)ते सातारा संस्थानचे शहाजी महाराज उर्फ अप्पासाहेब (इ. स. १८३१) पर्यंत सर्व अष्टप्रधान मंडळात झालेली स्थित्यंतरे याचा आढावा व त्याचबरोबर प्रशासकीय यंत्रणेत काम करणारे मनसबढार ते कारकून या सर्वांची कार्ये, त्याचप्रमाणे ग्रामपातळीवरील प्रशासकीय यंत्रणा पाटीलापासून ते बलुतढारापर्यंत सर्वांची कामे आणि त्याचप्रमाणे सातारा संस्थानच्या कारभारात जी एकंढर राज्यव्यवस्था ज्याच्या आधारावर होती म्हणजेच मराठ्यांची राज्यव्यवस्था ज्या आधारावर होती ते अठरा कारखाने व बारा महाल यांची कार्ये यांचा आढावा घेण्यात आला आहे. वरील सर्व राज्यकारभार ज्या राजवाड्यातून चालायचा त्या राजवाड्याच्या स्थापत्यासंढर्भात संशोधनात्मक निष्कर्ष याचा आढावा घेण्यात आला आहे. संपूर्ण भोसले घराण्याची वंशावळ या प्रकरणाच्या शेवटी ढेण्यात आलेली आहे. सातारा संस्थानातून निर्माण झालेले भोर संस्थानचा आढावा पुढील प्रकरणात घेतला आहे.

३.२१ उपसंहार :- राज्य चालविताना प्रशासकीय यंत्रणेत काही नियम व धोरणे आणि बारीक सारीक तपशील सढैव ध्यानात ठेऊन अत्यंत सूक्ष्म व मार्मिक पद्धतीने राज्याची धोरणे ढूरदृष्टीने कशी असावीत याचा विचार राजाने करायचा असतो. म्हणून राज्य चालविताना आपल्या पुढेही राज्य असेच चालेल त्याकरीता राज्यघटना बनवावी लागते व त्या अनुषंगाने कार्यवाही करावी लागते. अशी ढूरदृष्टी ठेऊन राजाचे नेमके काम काय, पंतप्रधान किंवा पेशवा यांनी कशा पद्धतीने काम करावे, साहुकारांचा उपयोग कशा पद्धतीने करून घ्यावा, वतनढारांकडून वतनाधिष्ठित गावसत्ता कशी असावी, पराक्रम केलेल्या माणसांना वतने कशा पद्धतीने द्यावीत, अशा स्वरूपाचा सर्व बाजूंनी विचार राज्याची प्रशासकीय कार्ययंत्रणा करीत असे. संपूर्ण राज्याचे सार म्हणजे ढुर्ग आणि आरमार यासंढर्भात कशा


पद्धतीने राज्य चालविताना विचार व्हावा व तसा पायंडा पडावा या हेतूने संस्थानच्या राजाने काम केलेले दिसत आहे.

राज्य चालविताना हे राज्य एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे जात असते तेव्हा प्रशासकीय स्थित्यंतरे घडतात व राज्याचे मुख्य प्रधान, पंतसचिव, अमात्य, मंत्री, सेनापती, सुमंत, चिटणीस यांच्यामधेही बदल घडतात. कार्यपद्धतीत फरक पडतो. हे सर्व करत असताना राजा व अष्टप्रधान त्याचप्रमाणे लष्करी प्रशासन व ग्रामव्यवस्था याकडेही बारकाईने लक्ष ठेवावे लागते. या सर्वांना जोड म्हणून राज्यातील व्यापार व्यवस्था, उद्योग व्यवस्था, रोजगार व्यवस्था या सर्व नीट चालण्याकरिता प्रशासकीय कार्ययंत्रणेने अठरा कारखाने व बारा महाल यांच्या माध्यमातून एकंदरीत राज्याची सर्व बाजूंनी व्यवस्था उत्तम असावी. असाच प्रयत्न मुख्य सातारा संस्थानने केलेला दिसत आहे व ही सर्व प्रशासकीय कार्ययंत्रणा ज्या राजवाड्यातून चालायची त्या राजवाड्याच्या स्थापत्याकडे विशेष लक्ष दिलेले दिसत आहे. आपल्या राज्यातील लोकांची धार्मिक वृत्ती व सामाजिक अभिसारणाची प्रक्रिया नीट असावी, याकरिता संस्थानिक विविध उपक्रम व परंपरा यांचा मेळ घालून लोकांची मनःस्थिती नीट ठेवण्याचा प्रयत्न करत आहे.

सातारा संस्थान हे महाराष्ट्राचे प्रमुख संस्थान होते. तेथूनच सर्व सत्तासूत्रे हालत होती. साताऱ्याच्या छत्रपती शाहूंनी जेव्हा पेशव्यांकडे सत्ता सूत्रे दिली तेव्हा पुणे हे सत्तेचे केंद्र झाले. तरीपण साताऱ्यांच्या गादीवर असलेले छत्रपती हेच राजे असत.


३.२२ सातारा संस्थानामधील स्थापत्य व स्थापत्यामधील झालेली स्थित्यंतर याचे नकाशे व छायाचित्रे

चित्र क्रमांक : ३.८



साताऱ्याच्या राजवाड्याच्या दर्शनी भागाचा नकाशा, साताऱ्याच्या राजवाड्याच्या स्थापत्याचा नकाशा, पूर्व-पश्चिम व दक्षिण-उत्तर छेद घेऊन तयार केलेला नकाशा

चित्र क्रमांक : ३.१




The New Palace, Satara

5a) Plan: Ground Floor
5b) Section along axis AA' of Ground floor Plan
5c) Section along axis BB' of Ground floor Plan
5d) East Elevation, Facade
5e) Plan: First Floor
5f) Sectional Elevation of Festival Hall

(सातारा राजवाड्याचा पहिल्या मजल्यावरील स्थापत्याचा नकाशा व जमिनीपासून ते छतापर्यंतचा घेतलेला उभा छेद याचा नकाशा)

चित्र क्रमांक : ३.१०



मराठा शैलीतील स्थापत्यशास्त्रामध्ये राज्याचा खजिना सुरक्षित ठेवण्याकरिता केलेली स्थापत्यविषयक रचना

चित्रांक क्रमांक : ३.११



सातारा राजवाड्यातील सदरेच्या पुढील भागाचे चित्र

चित्र क्रमांक : ३.१२



सातारा राजवाड्यातील तुळयांचा उपयोग

प्रकरण : ४

भोर संस्थान

प्रकरणाचा तपशिल

क्रमांक	तपशिल	पृष्ठ क्रमांक
प्रकरण ४ :	**भोर संस्थान**	**११४**
४.१	भोर संस्थानची भौगोलिक परिस्थिती	११८
४.१.१	तालुके राजगड सिमा	११८
४.१.२	तालुके विचित्रगड सिमा	१२०
४.१.३	तालुके प्रचंडगड	१२०
४.१.४	पवन मावळ सिमा	१२०
४.१.५	तालुका सुधागड तालुका	१२०
४.२	भोर संस्थानातील किल्लेराजगड	१२०
४.३	भोर संस्थानातील रचना	१२१
४.४	भोर संस्थानचा उदय	१२१
४.५	सचिवघराण्याचा उदय	१२२
४.६	प्रशासकीय कामातील अधिकारी पुरूष व कामगिरी	१२५
४.६.१	श्रीमंत शंकराजी नारायण पंतसचिव (१६९० ते १७०७)	१२५
४.६.२	श्रीमंत नारोशंकर पंतसचिव (१७०७-३७)	१२८
४.६.३	श्रीमंत चिमणाजी नारायण पंतसचिव (१७३७-५७)	१२९
४.६.४	श्रीमंत सदाशिव चिमणाजी पंतसचिव (१७५७-८७)	१३०
४.६.५	श्रीमंत रघुनाथराव नारायण पंतसचिव (१७८७-९१)	१३१
४.६.६	श्रीमंत शंकरराव रघुनाथ पंतसचिव उर्फ बाबासाहेब पंतसचिव (१७९१-९८)	१३१
४.६.७	चिमणाजी शंकर उर्फ नानासाहेब पंतसचिव (१७९८ ते १८२७)	१३२
४.६.८	श्रीमंत रघुनाथराव चिमणाजी पंतसचिव (१८२७-३६)	१३३
४.६.९	चिमणाजी रघुनाथराव पंतसचिव उर्फ नानासाहेब पंतसचिव (१८३६, १८४९ ते १८७१)	१३३
४.६.१०	शंकरराव चिमणाजी पंतसचिव ऊर्फ रावसाहेब पंतसचिव (१८७१-१९२२)	१३४

४.६.११	श्रीमंत रघुनाथराव पंतसचिव ऊर्फ बाबासाहेब पंतसचिव	१३४
४.६.१२	पंतसचिव घराण्याची वंशावळ	१३७
४.७	भोर संस्थानाची प्रशासकीय कार्ययंत्रणा	१३८
४.७.१	प्रशासकीय विभाग	१३८
४.७.२	तालुका	१३८
४.७.३	कसबा	१३८
४.७.४	मौजे	१३८
४.८	भोर संस्थानाच्या प्रशासकीय कार्ययंत्रणेत झालेली स्थित्यंतराची कार्यपध्दती	१३८
४.८.१	कारभारी	१३९
४.८.२	सरसुभेदार	१३९
४.८.३	चिटणीस	१३९
४.८.४	दप्तरदार	१४०
४.८.५	पागनिस	१४०
४.८.६	पोतनिस	१४०
४.८.७	कोठनीस	१४०
४.८.८	शिबंदी	१४१
४.८.९	मामलेदार	१४१
४.८.१०	कमाविसदार	१४१
४.८.११	फडणीस	१४१
४.८.१२	फौजदार	१४२
४.८.१३	गाव कामगार पाटील	१४२
४.८.१४	कुलकर्णी	१४२
४.८.१५	शेटे महाजन	१४३
४.८.१६	सरगुवे व नाईकवडी	१४३
४.८.१७	देशमुख/देशपांडे/देशकुलकर्णी	१४३
४.९	कलेक्टर पदाची निर्मिती	१४४
४.१०	संस्थानातील इतर अधिकारी वर्ग	१४४

४.१०.१	महार	१४४
४.१०.२	रामोशी	१४४
४.१०.३	शिरस्तेदार	१४५
४.१०.४	शेतकी अधिकारी	१४५
४.१०.५	सार्वजनिक बांधकाम खाते	१४५
४.१०.६	वजन-माप अधिकारी	१४५
४.१०.७	खरेदी अधिकारी	१४५
४.१०.८	पोस्ट ऑफीस	१४६
४.१०.९	पोलिस व्यवस्था	१४६
४.१०.१०	न्याय व्यवस्था	१४६
४.१०.११	वैद्यकीय अधिकारी	१४६
४.१०.१२	फॉरेस्टअधिकारी	१४७
४.१०.१३	शिक्षणाधिकारी	१४७
४.१०.१४	पर्यवेक्षक	१४७
४.१०.१५	इंजिनिअर	१४७
४.११	कार्यकारी कायदे मंडळाची स्थापना	१४८
४.१२	भोर संस्थानातील सांस्कृतिक जीवन व त्याची स्थित्यंतरे	१४८
४.१३	वेशभूषा पध्दत	१५०
४.१४	प्रत्यक्ष संशोधनात्मक वस्तुस्थितीचा अभ्यास-भोर संस्थानाच्या राजवाड्याचे स्थापत्य व त्यात झालेली स्थित्यंतरे	१५१
४.१४.१	भोर राजवाड्याचे स्थापत्य	१५२
४.१४.२.	भोर संस्थानामधील स्थापत्य व स्थापत्यामधील झालेली स्थित्यंतर त्याचे चित्र क्रमांकासहित संशोधनात्मक निरीक्षण	१५६
४.१५	सारांश	१६०
४.१६	उपसंहार	१६१
४.१७	भोर संस्थानामधील स्थापत्य व स्थापत्यामधील झालेली स्थित्यंतर याचे नकाशे व छायाचित्रे	१६२-१८४

प्रकरण : ४

भोर संस्थान

४.१ भोर संस्थानची भौगोलिक परिस्थिती

भोर संस्थानचे संस्थापक मूळ पुरुष श्रीमंत शंकराजी नारायण पंतसचिव यांच्या संस्थानच्या ताब्यात जो प्रदेश होता, त्याची प्राकृतिक रचना सर्वसाधारणपणे विचार करता अगढी वैशिष्ट्यपूर्ण होती. भौगोलिक रचनेच्या दृष्टीने पाहता संस्थानाच्या एकूण प्रदेशापैकी ढोन तृतीयांश भाग घाटमाथ्यावर, एक तृतीयांश भाग तळकोकणात होता. संस्थानाच्या हद्दीत सह्याद्री पर्वताच्या लांब लांब रांगा असल्याने हा सर्व प्रदेश डोंगर, ढऱ्याखोऱ्यांचा व ढुर्गम बनलेला असून घनढाट जंगलांनी व्यापलेला होता.

भोर संस्थानच्या ताब्यातील प्रदेशाचा विस्तार ढक्षिणोत्तर १८' ते १८'-४७ अक्षांश व पूर्व-पश्चिम ७३'-०० ते ७३'-१७ रेखांशात वसलेला होता. तसेच संस्थानच्या राजधानीचे ठिकाण भोर हे पुण्याच्या ढक्षिणेकडे १८'-९ अक्षांश आणि ७३'-७३ रेखांशावर वसलेले आहे (जोशी वा. ना., १९३९ : २९).


भोर संस्थानच्या मुख्य सीमांचा उल्लेख करीत असताना संस्थानच्या उत्तरेस व वायव्येस रायगड जिल्ह्याची हद्द होती. ईशान्येस सह्याद्री पर्वत, पूर्वेस व ढक्षिणेस सातारा व पुणे या ढोन जिल्ह्यांची हद्द होती. तसेच पश्चिमेस रायगड जिल्ह्याची हद्द येत होती. संस्थानच्या सर्व प्रदेशांचे राज्यकारभाराच्या सोयीसाठी पाच विभाग केले होते.

४.१.१ तालुके राजगड सीमा

तालुका - (छत्रपती शिवाजी महाराजांच्या म्हणजेच शिवकालामध्ये सध्या ज्याला आपण तालुका असे म्हणतो, त्याला परगणा म्हटले जात असे. काही ठिकाणी शिवकालामध्ये छोट्या कार्यक्षेत्राला महाल पण म्हणले जात असे. परंतु नंतरच्या कालखंडामध्ये ज्यावेळी संस्थानांची निर्मितीला सुरूवात झाली आणि पेशवाई संपत आली होती, त्याच कालखंडामध्ये परगणा किंवा महाल यांची नावे फक्त तीच राहिली. परंतु भौगोलिकदृष्ट्या त्यांचे कार्यक्षेत्र कमी-जास्त झाले. संस्थानिकांच्या कालखंडामध्ये बहुतांशी परगण्याची किंवा महालांची फक्त नावे तीच ठेऊन भौगोलिक क्षेत्राच्या सीमा बढलल्या, तेच नाव ठेऊन नवीन कार्यक्षेत्राला तालुका म्हणण्यात आले. त्यासंबंधीचा एक नकाशा उपलब्ध आहे. त्यावरूनच भोर संस्थानच्या प्रशासकीय विभागात तालुका शब्द वापरण्यात आलेला आहे.)

पूर्वेस पुणे जिल्ह्यातील हवेली व पुरंदर तालुका, पश्चिमेस महाड तालुका, दक्षिणेस विचित्रगड तालुका, उत्तरेस प्रचंडगड व हवेली तालुका हद्द होती (जोशी वा. ना., १९३९ : ७).

चित्र क्रमांक :४.१



भोर संस्थान भौगोलिक नकाशा

४.१.२ तालुके विचित्रगड सीमा

विचित्रगड तालुक्यापासून संस्थानच्या प्रदेशास प्रारंभ होतो. उत्तरेस महादेवाच्या डोंगररांगा, वायव्येपासून नैर्ऋत्यपर्यंत सह्याद्रीचा भाग पूर्वेस पुणे जिल्ह्यातील तालुका पुरंदर, पश्चिमेस महाड तालुका, दक्षिणेस वाई तालुका व उत्तरेस राजगड तालुक्याची हद्द होती.

४.१.३ तालुके प्रचंडगड

पूर्वेस व दक्षिणेस राजगड तालुका, उत्तरेस हवेली तालुका, पश्चिमेस महाड, माणगाव तालुके.

४.१.४ पवन मावळ सीमा

पवन मावळ तालुक्याच्या दक्षिणेस व पूर्वेस हवेली तालुका प्रचंडगड तालुका.

४.१.५ सुधागड तालुका

कोकणचे दोन भाग आहेत त्यास उत्तर व दक्षिण कोकण म्हणतात. त्यापैकी श्रीमंत सचिवांच्या भोर संस्थानच्या ताब्यातील तळकोकणातील जो सुधागड तालुका होता, तो दक्षिण कोकणात मोडला जात होता. सुधागड तालुका तळ कोकणात सह्याद्रीच्या पायथ्यालगत होता. दक्षिणेस माणगाव व रोहे तालुका, उत्तरेस पेण तालुका, पूर्वेस मावळ व हवेली तालुका व पश्चिमेस नागोठणे पेठा हद्द होती. या तालुक्याच्या बाजूला ब्रिटिशांची सत्ता होती (ढेरे आर. व्ही., २००५ : १८-२०).

४.२ भोर संस्थानातील किल्ले राजगड

छत्रपती शिवाजी महाराजांनी हा किल्ला १६४८ सालात बांधून या ठिकाणी प्रथम राजधानी केली, शिवाजी महाराजांच्या राज्याची प्रथम राजधानी म्हणून किल्ले राजगडला विशेष महत्त्व आहे. तसेच पंतसचिवांची सुरूवातीची राजधानी म्हणून देखील राजगडाला महत्त्व होते. श्रीमंत शंकराजी पंतसचिवांनी संस्थाानचा राज्यकारभार काही काळ राजगडावरून केला. राजगडाचे पूर्वीचे नाव मुरूंबदेव असे होते. एके ठिकाणी या डोंगराचा उल्लेख शहामृग पर्वत असाही केल्याचे आढळते. छत्रपती शिवाजी महाराजांनी सुमारे २७ वर्षे स्वराज्याचा कारभार राजगडावरून केला. तसेच महत्त्वाची राजकारणे राजगडावरून केली. अत्यंत बिकट व प्रतिकूल परिस्थितीत स्वराज्याचा कारभार राजगडाच्या साक्षीनेच चालविला म्हणून शिवाजी महाराजांची प्रथम राजधानी हा मान राजगडाकडेच जातो. हा बालेकिल्ला भोर पासून ३० कि.मी. वायव्य दिशेस व पुण्यापासून ४५ कि.मी. नैर्ऋत्य दिशेस आहे. हा बालेकिल्ला डोंगराच्या सुळक्यावर बांधला असल्याने चढण्यास कठीण आहे. किल्ल्याला तीन माच्या आहेत.पद्मावती देवीचे मंदिर, घोड्यांचा पागा, दिवाणघर, अंबरखाना आणि श्रीब्रह्मऋषींचे मंदिर हे सुद्धा आहेत. हा किल्ला औरंगजेबाने जिंकून त्यास ''नजीबगड'' असे नामकरण केले होते. हा किल्ला

शंकराजी नारायण पंतसचिवांनी मोगलांकडून दोन वेळा जिंकून घेतला. छत्रपती शिवाजी महाराजांनी राजगडाचे नाव ''शिवपट्टण'' ठेवले होते. पंतसचिवांच्या ताब्यातील तालुक्याचे नाव राजगड असे होते (बावडेकर न. वा., १९३४ : ७१ व ७२).

४.३ भोर संस्थानातील रचना

भोर संस्थान हे आकाराने मोठे असले तरी उत्पादनाच्या मानाने लहान होते, परंतु मानाच्या (भोर संस्थानामध्ये छत्रपती शिवाजी महाराजांची राजधानी राजगड होती. ज्या रायरेस्वरावर शिवाजी महाराजांनी हिंदवी स्वराज्याची शपथ घेतली ते स्वयंभू रायरेस्वर भोरच्या जवळच आहे. म्हणून सध्याच्या भोर संस्थानाच्या परिसरात या दोन गोष्टी महत्त्वाच्या असल्याने त्यांना मान होता. त्याचप्रमाणे भोर संस्थान जेव्हा निर्माण झाले, तेव्हा पंतसचिवांनी गावामधील सामाजिक सुविधा यांकडे जास्त लक्ष दिले. उदा. रस्ते, शेतीला पाणी व सांस्कृतिक कार्यक्रमाचे पंतसचिवांना भोर संस्थानला इंग्रजाचे राज्य असतानासुद्धा नऊ तोफ्यांच्या सलामीचा मान मिळाला होता. एकंदरीतच भारतातील अनेक संस्थानांपैकी भोर संस्थानला त्या काळात मानाचे स्थान होते (भागवत अ. ना., १९०३ : ७३१). दृष्टीने भोर संस्थानाची जागा फार उंच होती. संस्थानचे एकूण क्षेत्रफळ १४९१ चौ. मै. होते. त्यात पाच महाल आणि तालुके मिळून संस्थानातील गावांची संख्या एकूण ७०२ होती. कसबा, भोर हे संस्थानच्या राजधानीचे ठिकाण होते (जोशी वा. ना., १९३९ : ३१).

४.४ भोर संस्थानचा उदय

भोर संस्थानचे संस्थापक मूळ महापुरुष श्रीमंत शंकराजी नारायण पंतसचिव हे अष्टप्रधान मंडळातील तिसऱ्या दर्जाचे मंत्री होते. भोर संस्थानच्या पंतसचिवपदाचा उपभोग घेतलेले हे घराणे मूळचे वेरूळ भागातील औरंगाबाद परिसरातील गांडापूरचे म्हणजे सध्याच्या गंगापूरचे होते. गंगापूर हा औरंगाबाद जिल्ह्यातील एक तालुका आहे. पंतसचिवाचे वंशज गांडेकर हे त्या काळात आपले नाव सोडून आले. त्यावेळी त्यांचे गांडापूर हे गाव निजामशाहीच्या अंमलाखाली होते. आपल्या कुटुंबासमवेत ते सुरुवातीला पुण्याच्या नैर्ऋत्य दिशेस आठ कोसावर भोर मावळात राजगड किल्ल्याच्या पायथ्याजवळ मांगदरी म्हणून एक खेडेगाव आहे त्या ठिकाणी येऊन राहिले. पुन्हा परत कधी ते आपल्या गांडापूर या मूळ गावी गेले नाहीत (भागवत अ. ना., १९०३ : ४८).

सतराव्या शतकाच्या सुरुवातीला सर्व दक्षिण देशावर आदिलशाही, कुतूबशाही व निजामशाही या तीन शाह्यांचे वर्चस्व होते. चौथी मोंगलशाही आपले पाय रोवण्याच्या तयारीत होती. कारण इ. स. १६३७ मध्ये निजामशाही व मोंगल याच्यात एक तह झाला व या तहामुळेच दक्षिण देशावर मोंगलशाहीला

सुरूवात झाली (भागवत अ. ना., १९०३ : १७ व २१). या काळात अनेक कर्तृत्ववान मराठी घराणी उदयास आली. त्यामध्ये जावळीचे मोरे, वेरूळचे भोसले, फलटणचे निंबाळकर, शिंदखेडचे जाधव, भोसले घराणे हे वेरूळ भागातील असल्यामुळे व पंतसचिवांचे घराणे हेदेखील या भागातील असल्यामुळे भोसले व पंतसचिव घराण्यांचे पूर्वीपासूनचे संबंध होते. इ. स. १६०३ मध्ये मालोजीने आदिलशाही फौजांचा पराभव केला. त्यामुळे निजामशहाने खूष होऊन मालोजी राजा हा किताब, पंचहजारी मनसब तसेच पुणे, सुपे, चाकण आणि इंदापूर या गावांची देशमुखी दिली. राहण्यासाठी शिवनेरी किल्ला बक्षीस म्हणून दिला. मालोजीला दोन मुले होती. शहाजी व शरीफजी,पैकी शहाजी हा वडील मुलगा असल्याने तो जहागिरीचा मालक बनला. शहाजींच्या जहागिरीत इंदापूर, बारामती, पुणे, सुपे, मावळ वगैरे प्रांत येत होता. आदिलशहाने शहाजीस कर्नाटक जहागिरी देऊन बंगलोर प्रांताकडे नेमणूक केली. शहाजीने या संधीचा फायदा उठवून तेथे एक राज्य स्थापन केले. कर्नाटकात जाताना शहाजीने त्यांच्याबरोबर जी इतर कर्ती माणसे नेली, त्यात पंतसचिव घराण्यातील मूळ पुरुष कोन्हेर विठ्ठल होते. यावरून भोसले व पंतसचिव घराण्याचे सुरुवातीपासून संबंध असल्याचे दिसून येते(ढेरे आर. व्ही., २००५ : ३).

श्री. शहाजीने कर्नाटकात जाण्यापूर्वी पुणे प्रांताच्या जहागिरीची सर्व व्यवस्था दादोजी कोंडदेव या विश्वासू कारभाऱ्याकडे सोपविली होती. इ. स. १६४१ च्या सुमारास दादोजी कोंडदेव हे पुणे प्रांताच्या जहागिरीचा हिशेब देण्याकरिता बंगलोरला गेले होते. त्यावेळी दादोजी कोंडदेव परत पुणे प्रांती येताना उपयोगी पडणारी कर्ती माणसे व पुणे प्रांताचा अनुभव असणारी जाणकार मंडळी बंगलोरहून पुणे प्रांती पाठविली. त्यात कोन्हेर विठ्ठलपंत गाडेकरांचा वंशज नारो मुकुंद गांडेकर हे एक होते. म्हणजे शहाजींच्या समवेत कर्नाटकात मुकुंदपंत व कोन्हेरपंत गांडेकर या पंतसचिव घराण्यातील वंशजांच्या कामगिरीचा काळ बंगलोरला झाल्याचे दिसून येते.

४.५ सचिव घराण्याचा उदय

शहाजीने शिवाजीला पुणे प्रांताचा अनुभव असणाऱ्या सर्व माणसांचे स्वतंत्र मंत्रिमंडळ तयार करून दिले. त्या मंत्रिमंडळामध्ये नारो मुकुंद गांडेकर होते. श्रीशिवाजी महाराजांच्या प्रारंभीच्या अनेक महत्त्वाच्या घडामोडींत नारो मुकुंदाचे नाव आढळून येते. इ. स. १६४३ मध्ये नारो मुकुंदास शिवाजी महाराजांच्या सैन्यात प्रथम लहानशी नोकरी मिळाली.ते लष्करात कारकुनीच्या नोकरीस होते. भोर अथवा सुधागड किल्ला जिंकून घेण्याकरिता नारोपंतांनी मोठी कामगिरी करून दाखविली व हा किल्ला स्वराज्यात आणला. नारोपंतांच्या अंगची कामातील कर्तबगारी व हुशारी पाहून या किल्ल्याची सबनिसी शिवाजी महाराजांनी सन १६४३ मध्ये नारोपंतांस दिली. श्रीशिवाजी महाराज प्रतापगडावर मुक्कामी

असताना नारोपंत हे भोर गडाच्या सबनिसीचा हिशेब देण्याकरिता प्रतापगडावर आले होते. त्यावेळी नारोपंतांनी आपला मुलगा शंकराजी यास आपल्यासमवेत नेले होते.शंकरजीला दरबारात एखादी छोटीशी नोकरी मिळावी हा त्या पाठीमागे हेतू होता. शिवाजी महाराजांच्या अष्टप्रधान मंडळींतील पेशवे मोरोपंत पिंगळे (मुख्य प्रधान) यांच्याजवळ ही गोष्ट नारोपंतांनी काढल्यावर पेशव्यांनी शंकरजीस आपल्या हाताखाली नोकरीत ठेवून घेतले (जोशी वा. ना., १९३९ : ६३).

छत्रपती संभाजी महाराजांच्या कारकिर्दीत पूर्वीचे अष्टप्रधान मंडळ विस्कळीत झाले. शिवाजी महाराजांच्या मृत्यूनंतर मराठी राजकारणाची दिशा बदलली. पुढे शंकराजी हे रामचंद्रपंत अमात्य यांच्या हाताखाली नोकरी करू लागले. इ. स. १६८६ मध्ये रामचंद्रपंत अमात्यांनी शंकराजींच्या अंगची हुशारी व शौर्य पाहून त्यास कारकुनीच्या कामातून काढून फौजी कामात घेतले. कारण छत्रपती संभाजीच्या कारकिर्दीत शंकराजी नारायण ''राजाज्ञा'' होते (राजाज्ञा म्हणजे राजाच्या गैरहजेरीत जर एखादा निर्णय घ्यायचा असेल तर ही व्यक्ती जो निर्णय घेईल तो मान्य करावा व त्याप्रमाणे राज्यकारभार करावा, तीच राजाज्ञा समजावी. एवढे राजाज्ञा या पदाला महत्त्व होते.)(ढेरे आर. व्ही., २००७ : ७६) . त्यापूर्वी ३० मे १६८६ मध्ये संभाजी महाराजांनी रामचंद्र पंतांकडील पंतसचिवपद काढून ते शंकराजी नारायण यास दिले (भागवत अ. ना., १९०३ : ७३).


मराठ्यांचे राज्य नष्ट करण्याच्या उद्देशाने औरंगजेबने स्वराज्यातील अनेक किल्ले व त्यालगतचा प्रदेश घेतला. अशी संघर्षाची परिस्थिती निर्माण झाली असता संभाजी महाराज मोगलांच्या हाती सापडले. पुढे औरंगजेबाने छत्रपती संभाजीस ठार केले. छत्रपती संभाजी महाराजांना ठार केल्याची बातमी कळताच मराठा सरदारांनी ताबडतोब राजारामची कैदेतून मुक्तता करून त्यास गादीवर बसविले. वास्तविक याच प्रसंगी राजाराम महाराज पकडले जाणार होते. परंतु मराठा सरदारांची दूरदृष्टी व सैनिकांनी केलेल्या पराक्रमामुळे राजाराम महाराजांचा संभाजी महाराजांसारखा जो दुर्दैवी शेवट झाला असता तो टळला. अशा परिस्थितीत छत्रपती राजाराम महाराजांनी कर्नाटकातील जिंजी किल्ल्याकडे आश्रयास जाण्याचा निर्णय केला. पुढे जिंजी हे लवकरच मराठ्यांच्या हालचालीचे प्रमुख केंद्र बनले.हे स्वातंत्र्ययुद्ध यशस्वी करण्यासाठी राजाराम महाराजांनी अशी घोषणा केली की, जिंकेल तो मुलुख तुमचा. अशा प्रकारे जहागिरी किंवा इनाम जमिनीची लालूच दाखविल्यामुळे सारा महाराष्ट्र मोगलांच्या विरुद्ध युद्धाला तयार झाला. राजज्ञापदी असताना शंकराजी नारायण पंतसचिवांनी स्वराज्यावर आलेले संकट दूर करण्यासाठी मोठा हातभार लावला. शंकराजी नारायण यांनी बजावलेल्या कामगिरीची माहिती रामचंद्रपंत अमात्यांनी जिंजीस राजाराम महाराजांकडे लिहून पाठविली व

त्यांच्याकरिता एखाद्या पदासाठी शिफारस केली. शंकराजी नारायण यास पंतसचिव पदाची वस्त्रे राजाराम महाराजांकडून इ.स. १६९० मध्ये मिळाली. तेव्हा पंतसचिवांच्या ताब्यात जुन्नर, पुणे, कडेवळीत, इंदापूर, चौल, राजापुरी, करडे व पौडखोरे वगैरे प्रांत होते. तसेच सुधागड, तोरणा, पुरंदर, वर्धनगड, मनमोहनगड, राजगड, सिंहगड, मृगगड, कावेरीगड, रोहीडा आणि धनगड हे किल्ले होते. शंकराजी नारायण यास पंतसचिव पद प्राप्त झाल्यानंतर त्यांच्या दप्तरांकरिता त्यांच्या नावाचा 'श्री शंकराजी नारायण'हा शिक्का व पत्र वगैरे पुरे केले असता 'श्रीपत्रमधिर यभती' हे मार्तब सुरू झाले. ('श्रीपत्रमधि रयभती' असे शब्द ज्या पत्रावर शिक्का स्वरूपात असतात, तेच पत्र अधिकृत आहे, असे गृहित धरावे लागत असे. हा अधिकार शंकराजी नारायण यांना दिलेला होता. त्याचप्रमाणे 'रूजू सुरविर,''सुदबार'असे पंतसचिव स्वतः लिहित असत.)शंकराजी नारायण पंत सचिवांच्या अंगी साहस, धैर्य, शौर्य व बुद्धिमत्ता इत्यादी अलौकिक गुण होते. ते कलम बहाद्दरीत व मुत्सद्दीपणात निष्णात होते. त्यांच्याकडे जी कामगिरी दिली होती ती उत्तमरीतीने बजाविल्यामुळे छत्रपतींच्या अष्टप्रधान पदांपैकी पंतसचिव हे महत्पद प्राप्त करून भोर संस्थान संपादन केले (जोशी वा. ना., १९३१ : ७).

छत्रपती राजारामांच्या महानिर्वाणानंतर महाराणी ताराबाईंच्या काळात अशीच अनेक शौर्याची कामे केली. नंतर १७०७ मध्ये मोंगल म्हणजे औरंगजेबाने छत्रपती शाहू (छत्रपती संभाजी महाराज पुत्र) यांना दक्षिणेत कैदेतून परत पाठविले. कारण मराठ्यामध्ये वाद निर्माण व्हावेत. महाराणी ताराबाई व छत्रपती शाहू यांच्यात वाद निर्माण व्हावा अशी त्याची इच्छा होती. छत्रपती शाहू महाराज दक्षिणेस यावयास निघाले असता खरे वारसदार म्हणून अनेक मराठा सरदार त्यांना येवून मिळाले. महाराणी ताराबाईंना चिंता वाटू लागली की, आपण इतके वर्षे छत्रपती महाराजांनी सांभाळलेले राज्य आता छत्रपती शाहूच्या हाती पडणार म्हणून तिने युक्ती केली. आपल्या बाजूच्या सरदारांना एकनिष्ठेची शपथ घ्यावयास लावली. त्यांपैकी शंकराजी नारायण एक होते. छत्रपती शाहू महाराजांनी रोहिडा किल्ल्याजवळ शंकराजींना भेटीस बोलाविले. छत्रपती शाहू साक्षात शंभुपुत्र व छत्रपती राजाराम यांची पत्नी महाराणी ताराबाई दोन्ही आपले मालकच पण कोणाची बाजू घ्यावी या द्विधा मनःस्थितीमध्ये या कर्तबगार व एकनिष्ठ सेवकास प्रश्न पडला व त्यांचे पुनर्वसन त्यांच्या हौतात्म्यामध्ये झाले. त्यांनी द्विधा मनःस्थितीमध्ये २७ ऑक्टोबर १७०७ मध्ये आंबवडे येथे जलसमाधी घेतली.

स्वराज्याचा एक हिरा नदीपात्रात वाहून गेला. त्यांचे चिरंजीव नारोशंकर यांना साताऱ्यास बोलवून सचिवपद दिले. पुढे भोर संस्थानाची निर्मिती शंकराजी नारायण यांच्या बलिदानातून झाली.

चित्र क्रमांक : ४.२



भोर संस्थानचे राजचिन्ह

४.६ भोर संस्थानातील प्रशासकीय कामातील अधिकारी पुरुष व त्यांची कामगिरी

४.६.१ श्रीमंत शंकराजी नारायण पंतसचिव (१६९० ते १७०७)

शंकराजी नारायण यांच्या अंगी साहस, धैर्य व शौर्य, बुद्धीमत्ता असे अलौकिक गुण होते (जोशी वा. ना., १९३९ : १४). भोर संस्थानचे मूळ संस्थापक आद्यपुरुष श्रीमंत शंकराजी नारायण पंतसचिव हे सुरूवातीस मोरोपंत पेशवे पंतप्रधान यांच्या हाताखाली छोट्या-मोठ्या कामास राहिले. यावेळी त्यांचे वय अवघे २२ वर्षांचे होते. मोरोपंत पेशवे मुख्य प्रधान असल्याने त्यांच्याजवळ पुष्कळ काम होते. शंकराजीस त्यांनी आपल्या जवळ ठेवून घेतले. मोरोपंत पेशव्यांसारखा शंकराजी नारायण यांस गुरू मिळाल्यावर अत्यंत बुद्धिमान व धाडसी तरुणाने मोरोपंतांच्या अंगीअसलेले मुत्सद्दीपणा, राजकारण, समरविद्या इ. अलौकिक गुण ताबडतोब उचलले. त्यांनी मोरोपंतांची मर्जी संपादन केली. शंकराजीचे सह्याद्रीच्या डोंगररांगा हिंडणे, शिकार करणे, मावळे लोकांत मिसळणे, त्यांची मैत्री संपादन करणे, त्यांना एकत्र जमविणे, मावळी मुलखातील पाऊलवाटा शोधणे, एखादे धाडसाचे काम करून दाखविणे इ. गुण उदयाला कारणीभूत झाले.

रामचंद्रपंत अमात्यांना गुणाची व शौर्याची चांगली पारख होती. ते केवळ शंकराजी नारायण यास नुसती शाबासकी देऊनच राहिले नाहीत तर त्यांनी त्यास खर्चाकरिता लागलीच वाई प्रांतचा सुभा दिला आणि ही महत्त्वाची कामगिरी करून दाखविल्याचे रामचंद्रपंतांनी जिंजीस कळविले. तसेच राजाराम महाराजांकडे शंकराजी करिता एखाद्या पदाबद्दल शिफारस केली. ज्या सरदारांनी धामधुमीच्या काळात वेळप्रसंगी राजनिष्ठा दाखवून स्वराज्याचे संरक्षण व संवर्धन केले. अशा व्यक्तींना राजाराम

महाराजांनी बहुमान व पदव्या दिल्या. त्यांपैकी शंकराजी नारायण पंतसचिव हे होते. त्यांच्यासाठी राजाराम महाराजांनी पंतसचिवपद आणि पदाची वस्त्रे पाठवून दिली.

कोकणपट्टी व पुण्यापर्यंतच्या सर्व प्रदेशाची व्यवस्था ठेवून देखरेख करण्याची कामगिरी शंकराजी नारायण पंतसचिवांकडे दिली. त्यावेळी शंकराजीस ज्या प्रांतांची व्यवस्था ठेवण्याचे काम करावे लागले होते, त्यात मावळ, पुणे, जुन्नर, कडेवळी, इंदापूर, राजापुरी, पौडखोरे इ. प्रांत होते. राजाराम महाराजांनी स्वराज्याच्या कारभाराची सूत्रे रामचंद्रपंत अमात्य, शंकराजी नारायण पंतसचिव व परशुराम त्रिंबक यांच्या हातात दिली होती. राजाराम महाराजांनी शंकराजी पंतसचिवांना पदाची वस्त्रे देऊन सुधागड, तोरणा, पुरंदर, मृगगड, वर्धनगड, कोरीवगड, मनमोहनगड, रोहिडा, सिंहगड व धनगड इ. किल्ले व त्यालगतचा प्रदेश त्यावरील अधिकार दिला. राजाराम महाराजांनी जिंजीवरून आपल्या शिक्क्याची अभयपत्रे पाठवून दिली होती. तसेच श्री. शंकराजी नारायण असा त्यांचा नावाचा अष्टदली शिक्का दिला. हा शिक्का त्यांच्या वंशाकडे वंशपरंपरेने शेवटपर्यंत पुढे चालू होता.

मोगलांच्या आक्रमणाचे संकट महाराष्ट्रावर आणि जिंजीवर आले असताना या आक्रमणाची लाट थोपवून धरण्याची अलौकिक कामगिरी रामचंद्रपंत अमात्य आणि संताजी घोरपडे यांनी केली. त्यांच्या जोडीला शंकराजी नारायण पंतसचिव, परशुराम प्रतिनिधी, हनुमंतराव निंबाळकर आणि धनाजी जाधव इ. पराक्रमी सरदारांची साथ मिळालेली होती. संताजी घोरपडे आणि धनाजी जाधव यांच्या संयुक्त फौजेमुळे मोगल सैन्याला जिंजी जिंकणे शक्य झाले नाही (रानडे म. गो., १८९७ : १३८).

राजाराम महाराज जिंजीकडे निघून गेल्यामुळे मोगलांचे लक्ष कर्नाटकात जिंजीकडे होते. त्यामुळे स्वराज्यातील मोगल लष्कराचा दबदबा कमी झाला. या काळात मराठे स्वराज्यात व जिंजीत लढत होते. सन १६९३ मध्ये धनाजी, रामचंद्रपंत अमात्य व शंकराजी नारायण यांनी दहा हजार फौजेनिशी औरंगजेबाचा सरदार मुजाहिद्दीन या औरंगजेबाच्या सरदारावर हल्ला चढवून पन्हाळ्याचा वेढा उठविला. शत्रूच्या अनेक अधिकाऱ्यांना ठार करून तोफा काबीज केल्या व पन्हाळा पुन्हा स्वराज्यात आणला.

राजाराम महाराज सन १६९८ च्या सुमारास सैन्यानिशी जिंजीवरून मोगल फौजांना चुकवित महाराष्ट्रात विशालगडावर आले. जिंजीच्या किल्लयातून राजाराम महाराज निसटल्याची बातमी औरंगजेबास समजताच तो संतप्त झाला. अशा परिस्थितीत राजारामाने सातारा या ठिकाणी राजधानी स्थापन करून राज्यकारभारास सुरुवात केली. त्यामुळे मराठा सरदारांमध्ये मोठा उत्साह व

आत्मविश्वास निर्माण झाला. त्यावेळी राजाराम महाराजांनी शंकराजी पंतसचिवांच्याकडे स्वराज्याच्या बंढोबस्ताची कामगिरी सोपविली व राजाराम महाराज स्वत: खानदेश, बागलान, गंगथडी, वऱ्हाड या प्रांताची देशमुखी व चौथाईचे हक्क वसूल करण्यासाठी गेले. त्यावेळी औरंगजेबाने सर्जाखान या मुस्लिम सरदारास पुण्यात छोट्या फौजेनिशी ठेवले होते. त्यांचा बंढोबस्त करण्याचे काम राजाराम महाराजांनी शंकराजी पंतसचिवांकडे सोपवले. सर्जाखानच्या सैन्याची व शंकराजीच्या सैन्याची पुण्याजवळ लढाई झाली. या लढाईत सर्जाखानचा पराभव झाला. खानाची ढुर्दशा केली व पुणे प्रांत सोडवून घेतला. त्याठिकाणी आपल्या फौजेची ठाणी बसविली.

छत्रपती राजाराम महाराजांचा मृत्यू व औरंगजेबाच्या हालचाली

राजाराम महाराज स्वराज्यातील सरदेशमुखी व चौथाईचा हक्क वसूल करून सिंहगडास आले. तेथेच ते आजारी पडून सन १७०० मध्ये मार्च महिन्यात मृत्यू पावले.

छत्रपती राजाराम महाराजांच्या प्रोत्साहनामुळे त्यांच्या कारकिर्दीत लोकांचे अंगी एक प्रकारचा विलक्षण उत्साह व शक्ती उत्पन्न झाली होती. महाराष्ट्र धर्म रक्षणाकरिता मराठेवीर सर्वस्वावर पाणी सोडण्यासदेखील तयार झाले होते. छत्रपती राजाराम महाराजांच्या मृत्यूसमयी रामचंद्रपंत अमात्य सिंहगडावर होते. तेव्हा राजाराम महाराजांची पत्नी ताराबाई साहेब आपल्या पुत्रासह पन्हाळा किल्ल्यावर होती. त्यावेळी रामचंद्रपंत, शंकराजी पंतसचिव व परशुराम त्रिंबक प्रतिनिधी पन्हाळगडावर होते. या तीन मुख्य व्यक्तींच्या सल्ल्याशिवाय ताराबाई साहेबांना काहीच करता येत नव्हते.

सन १७०१ मध्ये महाराणी ताराबाईने युवराज शिवाजीचा पन्हाळगडावर राज्याभिषेक करून त्याला मराठ्यांचे छत्रपती केले आणि राजमाता या नात्याने ताराबाईने राज्यकारभाराची सर्व सूत्रे हाती घेतली. राज्यकारभाराचे बरेच काम पंतसचिवांवर सोपविले होते. थोड्याच दिवसात मोगलांच्या ताब्यात गेलेले सर्व किल्ले व प्रदेश शंकराजी पंतसचिवांनी मोगलांपासून परत घेतले. सिंहगड घेतल्याची बातमी औरंगजेबास कळाली. तेव्हा त्याला मोठा धक्का बसला. या किल्ल्यास त्याने 'बक्षिदाबक्ष' असे नाव ठेवले होते.

शाहू महाराज व पंतसचिव निष्ठा

औरंगजेबाचा अंत इ. स. १७०७ मध्ये झाला. इ. स. १६८२ ते इ. स. १७०७ अशी २५ वर्षे मराठ्यांशी त्यांचा संघर्ष चालू होता. पण त्यात त्याचा टिकाव लागला नाही व शेवटी महाराष्ट्रातच त्याचा अंत झाला (भागवत अ. ना., १९०३ : ७३). राजाराम महाराजांची पत्नी महाराणी ताराबाई साहेब या तिचा मुलगा छोटा शिवाजी याच्या नावाने स्वत: राज्यकारभार चालवित होती. शाहू महाराज

दक्षिणेत येण्यास निघाले. त्यांनी ताराबाईस आपण येत असल्याचे पत्र पाठविले. ताराबाईला आपल्या मुलाकरिता गादी पाहिजे होती. म्हणून शाहूला राज्य मिळवून द्यायचे नाही असा तिने निश्चय करून सर्व सरदारास एकत्र बोलाविले. शंकराजी पंतसचिव यांच्या ताब्यात असलेले किल्ले आपल्याला मिळाल्याशिवाय राज्यास बळकटी येणार नाही. असा विचार करून शाहू महाराजांनी शंकराजी पंतसचिवांना भेटीस बोलविले. परंतु ते भेटीस गेले नाहीत कारण जर आपण भेटीस गेलो नाही तर आपल्या हातून मोठे पातक घडेल, असेही त्यांना वाटत होते. राज्याचे खरे मालक शाहू महाराज असून त्यांच्या हुकुमाप्रमाणे आपण त्यांच्या भेटीस जात नाही. हेही आपण पातकच करीत आहोत, असे त्यास वाटत होते. इकडे आड तिकडे विहीर अशी त्यांची स्थिती होऊन ते राजगडावर स्वस्थ होते. कर्तव्य की भावना यांचा काही काळ संघर्ष त्यांच्या मनात निर्माण झाला. अखेर या दोन्ही आपत्तींतून देहत्याग करणे हा पर्याय त्यांनी स्वीकारला म्हणून सन १७०७ मध्ये त्यांनी अंबवडे येथे देहविसर्जन केले.

४.६.२ श्रीमंत नारोशंकर पंतसचिव (१७०७-३७)

पंतसचिव घराण्यातील आद्य पराक्रमी पुरुष श्रीमंत शंकराजी नारायण पंतसचिवांच्या आकस्मिक निधनामुळे ताराबाई साहेबांच्या पक्षाला फार मोठा धक्का बसला. श्रीमंत शंकराजी नारायण पंतसचिवांच्या अंगची नीतिमत्ता, स्वामिनिष्ठा, वतनासक्ती, स्वदेशाभिमान इ. गुण लक्षात घेऊन शाहू महाराजांनी ताबडतोब शंकराजीचा मुलगा नारोशंकर या अज्ञान मुलास पंतसचिव पदाची वस्त्रे व सनद पाठवून दिली. नारोशंकर पंतसचिवांना हे पद वयाच्या दुसऱ्या वर्षी मिळाले होते. शाहू महाराजांनी मुत्सद्दीपणा व मनाचा थोरपणा दाखवून नारोशंकर यास पंतसचिवपद देऊन त्यांना आपल्या पक्षात ओढून घेतले. पुढील काळात श्रीमंत नारोशंकर पंतसचिवास पदाची वस्त्रे देऊन त्यांच्या नावाची सनद दिली, ती खालीलप्रमाणे होती (देव दि. वि.,१९३४: १३).

॥ श्री ॥

स्वस्ति श्री राज्याभिषेक शके ३३ सर्वजितनाम संवत्सरे, वैशाख वद्य पंचमी इंदुवासरे क्षत्रिय कुलावंतस श्री राजा शाहू छत्रपती स्वामी यांनी समस्त राजकार्य धुरंधर विश्वास निधि राजमान्य राजेश्री नारोशंकर पंडित पंतसचिव यास आज्ञा केली ऐसीजे.

पंतसचिव घराण्यास शाहू महाराजांनी जी सनद तयार करून दिली ती चिरकाल चालणारी ताम्रपटावरील सनद होती. त्यात जो मजकूर लिहिलेला होता त्यावरून शंकराजी पंतसचिवांनी पूर्वी केलेले पराक्रम, त्यांच्या प्रांताची जहागिरीची स्थिती अशा अनेक गोष्टींचे स्पष्टीकरण केले होते.

शिक्का

श्रीमंत शंकराजी पंतसचिवांच्या वेळी जो त्यांच्याकडे शिक्का होता तोच शिक्का नारोशंकर पंतसचिव यांच्या कारकिर्दीत चालत होता. तो पुढीलप्रमाणे :

''श्रीमच्छंकर सुतनारायण''

सर्व प्रधानांस जसे मुतालीक असत त्याप्रमाणे पंतसचिवांचे रांझेकर नावाचे मुतालीक होते. त्यांना मुतालिकीची वस्त्रे देऊन त्यांचे हाती दरख्त, कामे व सर्व प्रांताचा बंदोबस्त करून दिला आणि श्रीमंत नारोशंकर पंचसचिव हे शाहू महाराजांच्या कृपेने लहानपणापासून पंतसचिवपदाचे उत्तराधिकारी झाले. आणि दौलतीचा, जहागिरीचा व मुलखाचा सर्व कारभार नारोशंकर यांच्या नावाने त्यांची मातोश्री येसूबाई साहेब व त्यांचे मुतालीक ही दोघे पाहू लागली. येसूबाई साहेब कर्त्या होत्या. त्यांचे आपल्या कारभाऱ्यांवर, अंमलदारांवर व प्रजेवर चांगले वजन होते. त्यांचा मोठा वचक होता.

श्रीमंत नारोशंकर पंतसचिव यांना दृष्टांत झाला की, पुरंदर किल्ल्याजवळ असणाऱ्या बेलसर गावाच्या कुलकर्ण्यांकडून श्रीरामाच्या मूर्ती घ्या. त्यानुसार श्रीरामाच्या मूर्ती यांना मिळाल्या तेव्हापासून पंतसचिवांचे कुलदैवत श्रीराम झाले. नारो शंकर पंतसचिवांच्या कारकिर्दीत रणांगणावर शौर्य दाखवावे असा त्यांच्या हातून एखादा मोठा पराक्रम झाल्याचे आढळून येत नाही. त्यांची कारकीर्द स्वस्थतेची गेली. मृत्यूबरोबरच पंतसचिव (गांडेकर) घराण्याचा औरस वंश नाहीसा होऊन गोत्रज वंशाला सुरूवात झाली. नारोशंकर पंतसचिव हे शके १६७८ ज्येष्ठ वद्य एकादशी बुधवार दि. २३ जून १७३६ मध्ये भोर येथे मृत्यू पावले.

४.६.३ श्रीमंत चिमणाजी नारायण पंतसचिव (१७३७-७७)

नारोशंकर पंतसचिवांच्या निधनानंतर पंतसचिवपदाचे उत्तराधिकारी झालेले चिमणाजी नारायण पंतसचिव हे नारोशंकर पंतसचिवांचे सावत्र बंधू महादजी शंकर यांचे पुत्र होते. जेव्हा सन १७३७ मध्ये पंतसचिव पदाचे पदाधिकारी झाले तेव्हा वयाने बरेच मोठे होते. तसेच कामकाजातही बरेच हुशार होते. कारण शाहू महाराजांनी त्यांच्या अंगची हुशारी पाहून त्यांस आपल्या जवळ ठेवले होते. तो येथे काही कामकाजात मदत करीत होता. त्यावरून पंतसचिव पदाला योग्य अशी व्यक्ति आहे याची खात्री शाहू महाराजांना झाल्याने त्यांनी संस्थानचे व पदाचे उत्तराधिकारी केले. प्रत्येक मनुष्याची योग्यता ओळखून शाहू महाराज त्याची परीक्षा करून मगच एखाद्या व्यक्तीस मामला, जहागिरी किंवा पदाची वस्त्रे देत. पंचसचिवपदाची वस्त्रे व अधिकार चिमणाजी नारायण यास मिळाल्याबरोबर त्यांनी

संस्थानाचे अधिकारी झाल्याचे सुधागड येथील किल्लेदारास व कारकुनास पत्रे पाठवून सर्व अंमलदारांस व रयतेस आपला हुकूम मानण्याबद्दल कळविले होते.

सन १७४० च्या सुमारास चिमणाजी नारायण पंतसचिव हे नेरे या गावी राहत होते. तेथे त्यांच्या मालकीचा मोठा वाडा होता, परंतु तो त्या वर्षी आगीत भस्मसात झाला. सबब कारणामुळे पंतसचिवांनी नेरे हे गाव सोडले. त्यानंतर नीरानदीच्या काठचा भोर हा गाव राहण्यासाठी पसंत केला. मग त्या ठिकाणी नवीन वाडा बांधून तेथे आपल्या संस्थानाची राजधानी केली. तेव्हापासून भोर गावाची भरभराट झाली व पंतसचिवांचे राज्य भोर संस्थान म्हणून ओळखले जाऊ लागले. चिमणाजी नारायण इ. स. १७७७ मध्ये भोर येथे परलोकवासी झाले. (जोशी वा. ना., १९३९ : २० आणि २१)

चिमणाजी नारायण पंतसचिवांचे लग्न शामजी हरी शिरवळकर यांच्या मुलीबरोबर झाले. त्यांचे नाव भवानीबाईसाहेब होते. त्यांना तीन पुत्र झाले. त्यापैकी थोरले सदाशिवराव, मधले आनंदराव व धाकटे रघुनाथराव असे होते. आनंदरावचे नाव कोठेच आढळून येत नाही. ते सन १७७६ मध्ये मरण पावले, तर चिमणाजी नारायण हे सन १७७७ मध्ये मृत्यू पावले. त्यांची समाधी भोर येथे श्री. मुरलीधर मंदिरासमोर आहे.

४.६.४ श्रीमंत सदाशिव चिमणाजी पंतसचिव (१७७७-८७)

चिमणाजी नारायण पंतसचिवांच्या मृत्यूनंतर त्यांचा वडील पुत्र सदाशिव चिमणाजी हा पंतसचिवपदाचे उत्तराधिकारी झाले. मात्र पंतसचिवपदावर कायम करण्याच्या अधिकाराची मंजूरी पूर्वी छत्रपती साताऱ्यावरून देत होते. आता त्याऐवजी ही मंजूरी पुण्यातून मिळणार होती कारण पेशव्यांनी मराठा राज्यकारभाराची सर्व सूत्रे आपल्या हाती घेऊन सातारचे सत्ताकेंद्र पुण्यात आणले होते. छत्रपतीची सत्ता संपुष्टात येऊन पेशव्यांचा अधिकार वाढलेला होता. हे ताराबाईस मुळीच खपले नाही म्हणून पेशव्यांच्या तंत्राने वागणाऱ्या आपल्या नातवास (रामराजे) त्यांनी सातारच्या किल्लयावर कैद करून ठेवले व आपल्या कारभाऱ्यामार्फत राज्यकारभार चालविण्याचा प्रयत्न केला. चिमणाजी पंतसचिव हे भोर संस्थानच्या गादीवर आले होते. त्यामुळे त्यांची नियुक्ती प्रथम पेशव्यांच्या दरबारातून आणि मग छत्रपतींकडून कायमची होणार होती, म्हणून पंतसचिवपदाची वस्त्रे मिळविण्यासाठी सन १७७७ मध्ये सदाशिव चिमणाजी यांस पेशवे दरबारास रुपये पन्नास हजार नेराना देऊन पंतसचिवपदाची वस्त्रे मिळाली होती. सन १७६९ मध्ये सदाशिव रघुनाथ घाणेकर यांची भोर संस्थानचा कारभारी म्हणून पेशवे दरबारातून नियुक्ती केली. पेशवे दरबारातून नियुक्त केलेले पेशव्यांचे कारभारी भोर संस्थानात तीन वर्षे होते (भागवत अ. ना., १९०३ : १४७ व १४६).

छत्रपती दरबारात लष्करी पथक

अष्टप्रधान मंडळातील पंतसचिव हे तिसऱ्या दर्जाचे मंत्री असल्याने पंतसचिवांना परंपरागत छत्रपतीच्या दरबारात आपले लष्करी पथक ठेवावे लागत होते. याशिवाय छत्रपती कामाच्या निमित्ताने स्वारीवर निघाल्यास पंतसचिवांना आपल्या पथकासह बरोबर जावे लागत होते. पुढे सत्तेचे केंद्र पुण्यात आल्यानंतर लष्कराचे पथक पंतसचिवांना पुण्याच्या दरबारात हजर ठेवावे लागत असे. तसेच दरबारातून येणारी कामगिरी करावी लागत असे.

श्रीमंत चिमणाजी यांचे वडीलपुत्र सदाशिव हे पंतसचिवपदाचे उत्तराधिकारी बनले. त्यांचे लग्न सगुणाबाईसाहेब यांच्याशी झाले. त्यांना पुत्र प्राप्ती झाली नाही. तर त्यांचे मधले बंधू आनंदराव हे सदाशिवरावांच्यापूर्वीच मृत्यू पावले होते. तर सन १७८७ मध्ये सदाशिवराव मृत्यू पावले, त्यावेळी त्यांचे धाकटे बंधू रघुनाथराव हयात होते. मग तेच भोर संस्थानच्या गादीचे मालक झाले.

४.६.७ श्रीमंत रघुनाथराव नारायण पंतसचिव (१७८७-९१)

चिमणाजी नारायण यांच्या मृत्यूनंतर त्यांचे धाकटे बंधू रघुनाथराव नारायण हे पंतसचिवपदाचे उत्तराधिकारी झाले. त्यावेळी त्यांना सातारा व पुणे दरबारास एक लाख रुपये पदाची वस्त्रे मिळविण्यासाठी द्यावे लागले तसेच हत्तीखाना खर्चही पंतसचिवांकडे होता. याशिवाय रघुजी भोसले, सेनासाहेब सुभा, रघुजी आंग्रे, परशुराम पंडीत, अहिल्याबाई होळकर व राजमंडळ हे पंतसचिवांच्या प्रदेशातून पुण्यास येत. या सर्वांची व्यवस्था ठेवण्याची कामगिरी पंतसचिवांना करावी लागत असे. या सर्व दरबारातून कामाच्या निमित्ताने येणाऱ्या वकिलांचा खर्च द्यावा लागत असे, या सर्व खर्चाचा आर्थिक भार तिजोरीवर पडल्याने पंतसचिवांना दिवाळखोरी सहन करावी लागली.

श्रीमंत रघुनाथराव पंतसचिव पदावर आले त्यावेळी त्यांचे वय बरेच मोठे होते. त्यांची पत्नी सौ. जानकीबाईसाहेब यांना शंकरराव व बनाबाई अशी दोन अपत्ये होती. रघुनाथरावांनी पदाचा चार वर्षे उपभोग घेतला. ते सन १७९१ मध्ये मृत्यू पावले.

४.६.६ श्रीमंत शंकरराव रघुनाथ पंतसचिव ऊर्फ बाबासाहेब पंतसचिव (१७९१-९८)

रघुनाथरावांच्या मृत्यूनंतर त्यांचे पुत्र शंकरराव पंतसचिवपदाचे उत्तराधिकारी झाले. त्यावेळी संस्थानची आर्थिक परिस्थिती अतिशय नाजूक होती. त्यातच पदप्राप्तीकरिता मोठा खर्च करावा लागला. तसेच पदाची वस्त्रे मिळताच अनेक संकटांना व अडचणींना पंतसचिवांना तोंड द्यावे लागले.

श्रीमंत शंकरराव यांचा मृत्यू सन १७९८ मध्ये झाला. त्यांचे पहिले लग्न सखाराम बापू बोकील यांच्या मुलीबरोबर झाले तर दुसरे लग्न रामशास्त्री प्रभुणे यांची मुलगी सौ. पार्वतीबाई व तिसरे लग्न

विश्वासराव आंबेडकर यांची मुलगी सौ. राधाबाईसाहेब समवेत जेजुरीत झाले. परंतु एकाही कुटुंबास संतती झाली नाही. म्हणून मागदरी येथील भावबंधापैकी काशी मोरेश्वर यांचा मुलगा दत्तक घेऊन त्याचे नाव चिमणाजी शंकर ठेवले आणि तेच भोर संस्थानचे उत्तराधिकारी झाले (जोशी वा. ना.,१९३१ : २२८).

४.६.७ चिमणाजी शंकर ऊर्फ नानासाहेब पंतसचिव (इ. स. १७१८ ते १८२७)

चिमणाजी शंकर यांची कारकीर्द त्रासातच गेली. सुरुवातीचे काही दिवस त्यांची सावत्र आई राधाबाईसाहेब व त्यांचे संबंध बरे होते. परंतु कारभाराची सूत्रे प्रत्यक्ष श्रीमंत चिमणाजी पाहू लागले. त्यावेळी त्यांच्यात व त्यांच्या सावत्र आई मध्ये मतभेद निर्माण झाले तेव्हा राधाबाईंनी संस्थानातील काही मंडळींना हाताशी धरून स्वतंत्र कारभार करण्यास सुरुवात केली.

सन १८१७ मध्ये तिसऱ्या इंग्रज-मराठा युद्धास खडकी येथे सुरुवात झाली. हे युद्ध बाजीराव पेशवे पर्वतीवरून पाहत होते. सुरुवातीला मराठा सैन्याने इंग्रजांना खंबीरपणे तोंड दिले. परंतु अनेक सरदार फितूर झाल्याने मराठ्यांना विजय मिळाला नाही, मराठा सैन्याची पूर्ण वाताहात झाली. अशा परिस्थितीत बाजीरावाने निवडक सरदारांना बरोबर घेऊन पुणे सोडून जाण्याचा निर्णय घेतला त्यात इतर सरदारांबरोबर भोर संस्थानचे अधिपती चिमणाजी पंतसचिवही होते. म्हणजे इंग्रज-मराठा युद्धाच्यावेळी श्रीमंत पंतसचिव हे पेशव्यांसोबत असल्याचे निदर्शनास येते एवढेच नव्हे तर इंग्रज-मराठा संघर्षाच्या शेवटच्या टप्प्यात पंतसचिव हे बाजीरावांच्या समवेत होते.

भोर संस्थानचे अधिपती श्रीमंत चिमणाजी नारायण पंतसचिव व इंग्रज सरकार यांच्यामध्ये २२ एप्रिल १८२० रोजी १० कलमांचा तह झाला. या तहानुसार पंतसचिवांना इंग्रज सरकारशी कसे वागावे, त्यांचा दर्जा, हक्क व मर्यादा यांचा त्यात स्पष्ट उल्लेख केलेला होता. त्यानंतर जुलै १८२० मध्ये छत्रपती व श्रीमंत पंतसचिव यांच्यात तह झाला. या तहानुसार पंतसचिवांचे व छत्रपतींचे अधिकार, मर्यादा उल्लंघन झाले तर त्याचा निकाल इंग्रज सरकार करेल याचा त्यात स्पष्ट उल्लेख होता.

श्रीमंत चिमणाजी शंकर यांचे पहिले लग्न भवानीबाईसाहेब व दुसरे लक्ष्मीबाईसाहेब यांच्याशी झाले. मात्र त्यांना पुत्रप्राप्ती झाली नाही म्हणून त्यांनी घरचा सावत्र बंधू वामनराव यांचा मुलगा दत्तक घेऊन त्याचे नाव रघुनाथराव ठेवले. सन १८२७ मध्ये चिमणाजी मृत्यू पावले (भागवत अ. ना., १९०३ : १७६ व १९५).

४.६.८ श्रीमंत रघुनाथराव चिमणाजी पंतसचिव (१८२७-३६)

चिमणाजी शंकरराव यांची दोन कुटुंबे होती. त्यांना औरस पुत्र झाला नाही म्हणून त्यांनी रघुनाथराव यास दत्तक घेतले. पूर्वी दत्तकमंजुरी छत्रपती व पेशवे दरबारातून होत असे. परंतु आता मात्र दत्तक मंजुरी ईस्ट इंडिया कंपनीकडून होणार होती. त्यानुसार कंपनीकडे पत्रव्यवहार होऊन मुंबई सरकारने पंतसचिवपदाची वस्त्रे सन १८२७ मध्ये रघुनाथरावांस दिली व ते भोर संस्थानचे अधिकारी बनले.

रघुनाथराव स्वभावाने शांत व धर्मशील होते. त्यांनी ब्रिटिशांच्या मदतीने संस्थानची आर्थिक परिस्थिती सुधारली. यांचे लग्न गंगुबाईसाहेब यांच्याबरोबर झाले. त्यांना एक पुत्र झाला. तो त्याचवर्षी मरण पावला. त्यानंतर त्यांना औरस संतती झाली नाही म्हणून त्यांनी आपला सावत्र बंधूचा पुत्र बळवंतराव यास दत्तक घेऊन त्याचे नाव चिमणाजी ठेवले. सन १८३६ मध्ये रघुनाथराव मृत्यू पावले (जोशी वा. ना., १९३१ : २४७).

४.६.९ चिमणाजी रघुनाथराव पंतसचिव ऊर्फ नानासाहेब पंतसचिव (१८३६,१८४९ ते १८७१)

चिमणाजी पंतसचिवपद मिळाले त्यावेळी त्यांचे वय तीन वर्षांचे होते. तर रघुनाथराव मृत्यू पावले तेव्हा त्यांच्या पत्नी गंगुबाईसाहेब जिवंत होत्या. चिमणाजीचे दत्तकविधान रघुनाथरावांच्या हयातीतच खालसा झाले.

सातारचे राज्य खालसा

छत्रपती प्रतापसिंह महाराज कंपनी सरकारच्या मदतीने सातारच्या गादीवर आले. त्यावेळी प्रतापसिंहाचे व ब्रिटिश सरकारचे मैत्रीपूर्ण संबंध होते. परंतु ते सन १८३९ नंतर राहिले नाहीत. प्रतापसिंह महाराज ब्रिटिश सरकारच्या विरोधात ढंगा व फितुरी करीत आहेत, अशी ब्रिटिशांची खात्री झाली. त्यांची चौकशी झाली असता त्यातून ते सुटू शकले नाहीत. तेव्हा ब्रिटिशांनी प्रतापसिंहास पदच्युत केले व त्यांच्या जागी अप्पासाहेब महाराजांची सातारच्या गादीवर नेमणूक केली. सन १८३९ ते १८४८ या काळात अप्पासाहेब हे साताराच्या गादीवर होते. सन १८४८ मध्ये अप्पासाहेब मृत्यू पावले. ते निपुत्रिक असल्याने ब्रिटिश सरकारच्या हुकुमानुसार सन १८४९ मध्ये सातारचे राज्य खालसा करून मराठी सत्ता नष्ट केली.

चिमणाजी यांची पहिली काही वर्षे कर्जफेड व तडजोडीमध्ये गेली. त्यांनी संस्थान कर्जमुक्त केले. नीरा नदीवर दगडी पूल बांधला. शिक्षणाची व्यवस्था, चलन, व्यापार, नळाद्वारे पाणी, रस्ते,

सरकारी व सार्वजनिक इमारती, पोलिस यंत्रणा, चौक्या, न्याय, कचेऱ्या, कोर्ट फी स्टँप इ. सुधारणा केल्या.

सन १८४४ मध्ये चिमणाजीचे लग्न मल्हारराव आंबेकर यांच्या मुलीबरोबर भोर येथे झाले. त्यांना ढहा वर्षांनी एक मुलगा झाला. त्याचे नाव शंकरराव ठेवले. तोच पुढे पंतसचिवपढाचा उत्तराधिकारी झाला. चिमणाजी यांचा मृत्यू १८७१ मध्ये झाला.

४.६.१० शंकरराव चिमणाजी पंतसचिव ऊर्फ रावसाहेब पंतसचिव (१८७१-१९२२)

चिमणाजी मृत्यू पावल्यावर त्यांचे पुत्र शंकरराव हे संस्थानचे मालक झाले. शंकररावांच्या जन्मामुळे भोर संस्थानला औरस वारस मिळाला. कारण तोपर्यंत ७० ते ६० वर्षांच्या कालावधीत पंतसचिवपढाचे जे उत्तराधिकारी झाले ते सर्व ढत्तक होते. शंकरराव यांनी गाढीची सूत्रे हाती घेतली त्यावेळी ते अल्पवयीन असल्याने त्यांची आई माईसाहेब यांनी कारभाऱ्यामार्फत कारभार करण्यास सुरुवात केली. तसेच ब्रिटिश सरकारतर्फेही पुन्हा संस्थानात कारभारी नेमण्यात आला. सन १८७२ मध्ये संस्थानात राज्यकारभार व्यवस्था पाहण्यासाठी सातारचे कलेक्टर मे. बासवेल यांनी भोरला भेट ढिली (भागवत अ. ना., १९०३ : २३१).

सन १८८७ पासून भोर संस्थानचा कारभार पुणे कलेक्टरच्या सल्लामसलतीने चालू लागला. पुढे सन१८९७ मध्ये भोर संस्थानला ढिवाणीचा स्पेशल अधिकार मिळाला. सन १९०३ मध्ये श्रीमंत शंकररावांना ढिल्ली ढरबारात ९ तोफांच्या सलामीचा मान मिळाला. तसेच सन १९११ मध्ये पुन्हा श्रीमंत रघुनाथरावांना ढिल्ली ढरबारात ९ तोफांचा वैयक्तिक मान मिळाला व ''हिज हायनेस'' ही पढवी मिळाली. सन १९२१ मध्ये संस्थानला फाशी ढेण्याचा अधिकार मिळाला.

श्रीमंत शंकरराव यांचा विवाह विंचूरकर घराण्यातील जिजिसाहेब व ढुसरा विवाह कृष्णाराव आंबेकर यांची सीताबाईसाहेब बरोबर झाला. सन १९२२ मध्ये श्रीमंत शंकररावचा मृत्यू झाला.

४.६.११ श्रीमंत रघुनाथराव पंतसचिव (१९२२-१९४८) ऊर्फ बाबासाहेब पंतसचिव

शंकररावांच्या मृत्यूनंतर त्यांचा पुत्र रघुनाथराव संस्थानचा उत्तराधिकारी झाला. त्यांच्या जन्माने भोर संस्थानच्या गाढीला वारस झाला. ते गाढीवर आल्यापासून संस्थानच्या इतिहासात एक सर्वसामान्य सुधारणा युग सुरू झाले असे म्हणावयास हरकत नाही. कारण श्रीमंत रघुनाथराव यांनी निस्तेज झालेली राज्यपद्धती लोकांच्या मागण्या व इच्छा लक्षात घेऊन लोकप्रतिनिधीत्वाचा पहिला कायढा पास केला. स्थानिक स्वराज्यसंस्था स्थापना, अस्पृश्यता निवारण, ग्रामोद्धार, अन्यायी कर

बंद केले. इंग्रज राजवटीच्या संक्रमणकाळातही पंतसचिव घराण्यातील कर्त्या पुरुषांनी योग्य वेळी योग्य निर्णय घेतल्याचे भोर संस्थान अनेक संकटांतून बचावले आणि ते भारतास स्वातंत्र्य मिळेपर्यंत अबाधित ठेवण्यात यश आले. तसेच इंग्रजी राजवट ही परकीयांची गुलामगिरी आहे, ती लवकर नष्ट व्हावी यासाठी गुप्तपणे हस्ते-परहस्ते मदतही केली (जोशी वा. ना., १९३१ : ३३ व ३४ आणि खंड क्र. २ : ४१२). पुणे येथील डेक्कन कॉलेज श्रीमंत बाबासाहेबांनी या कॉलेजात उच्च शिक्षण घेतले. पुरातत्त्वाचे शिक्षण मिळणारे पुणे येथील डेक्कन रिसर्च सेंटर या स्थानाचा भोर संस्थानने अभ्यास केला होता व आपल्या संस्थानातील वास्तू दगडाच्या व लाकडाच्या वापराने कशा उत्कृष्ट बनवाव्या यासाठी डेक्कन रिसर्च सेंटरच्याशी संपर्कात असत.

भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर श्रीमंत रघुनाथरावराजे यांनी भारतीय संघराज्यात आपले संस्थान ८ मार्च १९४८ रोजी विलीन केले आणि इतर सर्व संस्थानिकांचे संघराज्यात विलीनीकरण करण्यासाठी मन वळविले. या कालखंडामध्ये भोर संस्थांनी स्वतःची अशी राज्यघटना तयार केली होती व त्या राज्यघटनेतील सदस्यांची बैठक होत असे व घटनेमध्ये लोकांच्या मागणीनुसार प्रशासनात बदल केले जात असे. एकंदरच लोकांचा सर्व बाजूने विचार करून राज्यघटनेमध्ये बदल केले गेले.

चित्र क्रमांक : ४.३



षष्ठ्याब्दी पूर्तीच्या वेळी घेण्यात आलेला राजकुटुंबातील मंडळींचा फोटो (सन १९३८)


चित्र क्रमांक:४.४



राजा श्रीमंत रघुनाथराव बाबासाहेब पंडित पंतसचिव (कार्यकाल १८२७-१८३६)

भोर संस्थानची वंशावळ खालीलप्रमाणे :-

४.६.१२ पंतसचिव घराण्याची वंशावळ



४.७ भोर संस्थानाची प्रशासकीय कार्ययंत्रणा

४.७.१ प्रशासकीय विभाग

भोर संस्थानाचे राज्यकारभारच्या सोयीसाठी संस्थानाच्या एकूण प्रदेशाचे पाच विभागांत विभाजन करण्यात आले होते. त्यास तालुका म्हटले जात होते. तसेच प्रत्येक तालुक्यात मौजा, मजरा अथवा वाडी असे विभाग करण्यात आले होते.(तालुका हा शब्द संस्थानिकांच्या काळात वापरात होता. त्याचा खुलासा याच प्रकरणामध्ये म्हणजेच ४.१.१ मध्ये केलेला आहे.)

४.७.२ तालुका

संस्थानच्या राजधानीचे ठिकाण भोर होते. तसेच शिरवळ, नसरापूर, कोळवण, वेल्हे व पाली ही तालुक्याच्या ठाण्याची गावे होती. तसेच संस्थानातील कसबा, शिरवळ व पाली येथे नगरपालिका होत्या.

४.७.३ कसबा

भोर हे संस्थानच्या राजधानीचे ठिकाण त्यास कसबा भोर असेदेखील म्हटले जात होते (ढेरे आर. व्ही., २००७ : २०).

४.७.४ मौजे

भोर संस्थानातील आर्थिक आणि सामाजिक व्यवहाराचे केंद्रबिंदू म्हणजे खेडे होते. खेडे गावांना मौजा असेदेखील म्हटले जात होते. संस्थानातील लोकांचा शेती व्यवसाय हाच मुख्य व्यवसाय होता. त्यामुळे बहुतांशी लोक प्रामुख्याने शेती व्यवसायावरच अवलंबून असत.

४.८ भोर संस्थानाच्या प्रशासकीय कार्ययंत्रणेत झालेली स्थित्यंतराची कार्यपध्दती

छ्रापती शिवाजी महाराजांनी स्वतंत्र राज्याच्या निर्मितीबरोबर राज्यकारभाराची सुधृढ व्यवस्था निर्माण केली होती. या राज्यकारभार पद्धतीचा सर्वच इतिहासकारांनी उत्कृष्ट शासन व्यवस्था म्हणून उल्लेख केल्याचे आढळून येते. शिवाजी महाराजांनी अष्टप्रधानांची नेमणूक केली होती. त्यापैकी पंतसचिव हे अष्टप्रधान मंडळातील तिसऱ्या दर्जाचे मंत्री होते. तत्कालीन श्रेष्ठ व्यक्ती या पदावर नेमून त्यास सुरनविस असे प्रधान पद दिले जात होते. पंतसचिव असा त्याचा उल्लेख केला जाई. भोर संस्थानचे अधिपती पंतसचिव यांनी राज्यरक्षणाकडे लक्ष देऊनही आपल्या संस्थानचा राज्यकारभार दक्षतेने करून सर्वंकष विकास घडविण्याचे काम केले

४.८.१ कारभारी

सदाशिव चिमणाजी पंतसचिव यांनी प्रथमच संस्थानात कारभारी पद निर्माण करून सन १७७१ मध्ये सदाशिव रघुनाथ घाणेकर यास पहिला संस्थानचा कारभारी म्हणून नेमले. पंतसचिवांनी अनेक गुंतागुंतीच्या कामात सहकार्य करणे, तसेच संस्थानिक अज्ञान असेल तर संपूर्ण कारभार व्यवस्थित सांभाळण्याची महत्त्वाची जबाबदारी कारभाऱ्यास पार पाडावी लागत असे. संस्थानिकांना प्रत्येक कामाच्या बाबतीत सल्ला देणे, इतर सत्तांबरोबर तह करणे, युद्धाचे नियोजन करणे इ. कामे कारभारी संस्थानिकांच्या मार्गदर्शनाखाली करीत असे. सन १८१८ मध्ये भोर संस्थानात बाजी मोरेश्वर याची कारभारी म्हणून नियुक्ती झालेली होती.

सन १८२७ पर्यंत भोर संस्थानचे मुख्य प्रधान यास कारभारी म्हणण्यात येत होते. यावर्षी संस्थानाला ९ तोफांचा कायमच्या सलामीचा मान प्राप्त झाला. तसेच इतर संस्थानांच्या दिवाणाप्रमाणे भोर संस्थानाच्या कारभाऱ्यासही दिवाण म्हणण्यास सुरुवात झााली.सन १९२७ मध्ये काम करीत असलेले कारभारी गणेश हरी अंजनगावकर यांचीच पुढे सन १९२७ पासून भोर संस्थानचे दिवाणा म्हणून नियुक्ती करण्यात आली. अशा प्रकारे संस्थानातील कारभारी हे पद जाऊन त्याऐवजी दिवाण या पदाची निर्मिती झाली(रानडे वि. गो., १९४९ : २११).

सन १९३८ मध्ये कोंडू महादेव कुमठेकर संस्थानच्या दिवाणपदी दरमहा रुपये ६१८ वर नियुक्ती करण्यात आली. तर सन १९४७ मध्ये कृष्णराव रामराव दिवाण यांची संस्थानच्या दिवाणपदी दरमहा रुपये ७०० वर नियुक्ती करण्यात आली.

४.८.२ सर सुभेदार

एक अत्यंत महत्त्वाचे प्रशासकीय अधिकारी म्हणून सरसुभेदारांचा उल्लेख करावा लागतो. संस्थानच्या सर्व मुलकी कामाची माहिती संस्थानिकांना पोहचविण्याचे काम सर सुभेदाराकडे होती. संस्थानात या जागेवर बाळासाहेब गाडेकर, आप्पाजी गोडबोले, भालचंद्र त्रिंबक बापट यांची सरसुभेदार म्हणून नियुक्ती करण्यात आली होती. त्यांना दरमहा सरकारी तिजोरीतून पगार दिला जात असे.

४.८.३ चिटणीस

संस्थानतील चिटणीस पद हे प्रधान मंडळाबाहेरचे होते. पंतसचिवांना छत्रपतीस किंवा प्रधानास पत्र पाठवावयाचे झाल्यास त्याचे मसुदे तयार करून ते पंतसचिवांना दाखवून त्याप्रमाणे ते पत्र लिहिण्याचे काम चिटणीस करीत असे. चिटणीसाची नियुक्ती व बडतर्फीचे अधिकार पंतसचिवांनी

स्वतःकडे ठेवले होते. संस्थानामध्ये रामचंद्र बल्लाळ आगाशे, विनायक गोविंद रानडे इ. व्यक्तींनी चिटणीस म्हणून काम केले आहे.

४.८.४ दप्तरदार

भोर संस्थानातील जमाबंदीचे, वसूलीचे काम दप्तरदारांकडे होते. प्रत्येक परगण्याचे किंवा तालुक्याकडे, गावाकडे किती येणे, वसुल किती गोळा झाला, बाकी किती राहिली, त्याचा हिशेब ठेवून वसुलीची तजवीज करणे व त्याचा दरमहा पंतसचिवांना हिशेब देणे हे काम दप्तरदाराला करावे लागत असे. संस्थानात रघुनाथ धोंडीबा चित्रे, विनायक धोंडदेव लोणकर यांची दप्तरदार म्हणून नेमणूक करण्यात आली होती.

४.८.५ पागनीस

भोर संस्थानचे संस्थापक श्रीमंत शंकरजी नारायण पंतसचिव यांच्या काळात संस्थानची पागा व काम करणाऱ्या इसमांची संख्या बरीच मोठी होती. या पागेमुळे पंतसचिवांना आपल्या ताब्यातील प्रदेशाचे संरक्षण करून संस्थानात शांतता ठेवण्याच्या कामी उपयोग होत असे. सदाशिव बाळकृष्ण महाबळेश्वर, वि. स. पोतनीस, वामन आबा पाठकर इ. पागनीस म्हणून काम करीत होते (जोशी वा. ना., १९३९ : ८६२).

४.८.६ पोतनीस

भोर संस्थानातील सर्व आवकजावक या खात्याकडे सोपविण्यात आलेली होती. सरकारी खजिन्यात जमा होणारा सर्व पैसा लिहून त्याचा हिशेब ठेवणे, तसेच खजिन्यातून पैसा द्यावयाचा असेल तर त्याची पावती लिहून देणे हा सर्व जमा-खर्च हूजरातहिशेब पाठविणे, वसुलीसंबंधीचे सर्व दप्तर व रोकड सांभाळणे, खजिन्यावर देखरेख करणे, पंतसचिवांचे मौल्यवान रत्नाचे, सोन्या-चांदीचे दागिने व भांडी त्याचे एकूण नग व त्या वस्तूंची व्यवस्था ठेवण्याचे काम पोतनिसाकडे असे. संस्थानात रामचंद्र त्रिंबक पोतनिस व गोविंद बळवंत हे पोतनीस म्हणून काम करीत होते.

४.८.७ कोठनीस

रोज जे सामान लागत असे ते सर्व सामान कोठारात ठेवले जात असे. त्याचप्रमाणो श्रीमंत पंतसचिव यांच्या कुटुंबासाठी ज्या वस्तू खरेदी कराव्या लागत त्या स्वत: कोठनीस करीत असे. संस्थानात कृष्णराव सदाशिवराव सिंदकर, लक्ष्मण सखाराम कोठनीस, हरी वासुदेव लिमये इ. कोठनीस कामगार म्हणून कामावर होते.

४.८.८ शिबंदी

भोर संस्थानिकांनी जनतेच्या संरक्षण व्यवस्थेकरिता हे खाते तयार केले होते. या खात्यामार्फत अरब, मौलाढ, बाणढार व पोलिस यांना प्रशिक्षण ढिले जात होते. या विभागाकडे आधुनिक बंढुका होत्या. या शिबंढी खात्यात ढोनशे पन्नास शिपाई होते. तसेच पुरुषोत्तम ढामोढर सबनीस हे शिबंढी प्रमुख म्हणून काम करीत होते. त्यांना सरकारी तिजोरीतून रोख पगार ढिला जात असे.

४.८.९ मामलेढार

भोर संस्थानाचे राज्यकारभाराच्या व्यवस्थेसाठी सर्व प्रढेशाचे पाच विभाग केले होते. त्यास परगणे किंवा तालुके म्हटले जात होते. या पाच विभागांवर एक एक असे पाच अंमलढार नेमले होते. त्यांना मामलेढार असे म्हणत. तसेच प्रत्येक तालुक्यात मामलेढार, फडणीस व फौजढार असे तीन मुख्य अधिकारी नेमले होते. संस्थानिक स्वत: मामलेढाराची नियुक्ती करत असताना त्यांची पात्रता पाहून नेमणूक करीत असत. त्यामुळे योग्य व्यक्तीची निवड होत असे.

४.८.१० कमाविसढार

भोर संस्थानात प्रमुख रेव्हेन्यू अधिकारी म्हणून कमाविसढार काम करीत असे. कमाविसढाराची नेमणूक संस्थानतील पाडलेल्या लहान लहान पोटविभागात केलेली असे. प्रत्येक तालुक्यातील रयतेची स्थिती समजावून घेण्यासाठी तो संस्थानातील तालुक्याच्या गावी जावून वसूलीचे अंढाजपत्रक तयार करीत असे. कमाविसढारचा व्यवस्थापक अथवा वहिवाटढार असाही उल्लेख केलेला आढळतो (डेरे आर. व्ही., २००७ : २७).

४.८.११ फडणीस

सन १७७०-७१ मधील अनेक कागढपत्रातून फडणीसाच्या व त्याच्या अधिकारांविषयी उल्लेखसापडतात. त्यावरून फडणीसाला महालाचा ढैनंढिन हिशेब ठेवणे, महालासाठी नव्याने नेमलेल्या व जुन्या शिपायांच्या खर्चाचा हिशेब ठेवणे, हजेरीपत्रक तयार करून ते स्वत:जवळ ठेवणे, महालाच्या जमीन महसुलाच्या हिशेबाची कागढपत्रे सांभाळणे, महालातील अधिका-यांना, नोकरांना, चाकरांना सरकारच्या आढेशासंबधी पत्रे लिहिणे इ. कामे फडणीसाला करावी लागत असत. फडणीसाकडे तालुक्याचा सर्व जमा-खर्चाचा हिशेब ठेवण्याचे काम असे किंवा तोच तालुक्याच्या हिशेबाला जबाबढार असे. तो मामलेढाराचा मढतनीस म्हणून काम पाहत असे.

४.८.१२ फौजदार

भोर संस्थानात प्रत्येक तालुक्यातील प्रशासन व्यवस्थेमधील तिसऱ्या दर्जाचा अधिकारी म्हणून फौजदार असा उल्लेख येतो. फौजदाराकडे तालुक्याच्या बंदोबस्ताचे काम असे. तसेच मामलेदाराच्या हुकुमाप्रमाणो तालुक्याच्या बंदोबस्ताचे व शांतता राखण्याचे काम करीत असे. फौजदार हा पगारी नोकर होता.सन १९११ मध्ये हैबतराव विश्वनाथ व त्रिंबक सिद्धेश्वर कांगो हे फौजदार म्हणून काम करीत होते.

४.८.१३ गावकामगार पाटील (किंवा मुकदम म्हणजे देखरेख करणारा, एकंदर गावातील सर्व व्यवस्थेवर देखरेख करणारा सरकारी अधिकृत जबाबदार व्यक्ती म्हणजेच गावकामगार पाटील म्हणजेच मुकदम)

मराठी राज्यकारभारात खेडे एक महत्त्वाचा भाग असे.हा राज्यघटनेतील शेवटचा घटक होता. खेडेगावची व्यवस्था पाहणारे निरनिराळे घटक असत. त्यावेळी खेडी पूर्णपणे स्वायत्त व स्वतंत्र असत. खेड्यांवर देखरेख करणारी सरकारी यंत्रणा दूर केली तरी खेडी आपला राज्यकारभार सुरळीत पार पाडत व प्रजेचे रक्षण करीत. पाटील हा राज्यव्यवस्थेतले एक महत्त्वाचा दुवा मानला जात असे. भोर संस्थानात पाटील असा उल्लेख आलेला आहे. पाटील हा गावातील राजाचा प्रतिनिधी होता. पाटील म्हणजे म्होरक्या अथवा पुढारी होय. पाटीलकीचा संबंध गावच्या वसाहतीशी असे. गावच्या संरक्षणासाठी जरूर ती तजवीज करणे, आलेल्या-गेलेल्याची खबर देणे, गुन्हयांचा तपास लावणे, गुन्हेगारांना पकडणे, पंच बोलावून न्यायदान करून भांडण मिटवणे इत्यादी कामे पाटील करीत असत. एकंदरीत पाटील हा जितका सरकारचा अधिकारी तितकाच तो रयतेचा कैवारी होता. थोडक्यात पाटील हा खेडयाचा मुख्य वतनदार असे. तो संस्थानिक व खेडे यांना जोडणारा महत्त्वाचा दुवा होता.

४.८.१४ कुलकर्णी

पाटील-कुलकर्णी गाव कामगारांत प्रमुख काम होते. कुलकर्णी हा पाटलाच्या खालोखाल गावचा दुय्यम दर्जाचा अधिकारी होय. प्रत्येक गावात पाटील हा राजा तर कुलकर्णी हा प्रधान असे म्हटले जात असे. याची नेमणूक मुलकी प्रांतांचे अधिकारी करत. पाटील स्मरणाचा कितीही चांगला असला तरी त्याची गावची कामे लिहण्यापासून चोख होणे कठीण. सबब त्याला लेखक मदतनीस आवश्यक झाला. या मदतनीसाला स्थलपरत्वे पटवारी, कुलकर्णी किंवा पांड्या म्हणत असत.

४.८.१५ शेटे महाजन

प्रशासनाच्या कामात शेटे महाजन यास महत्त्वाचे स्थान होते. कसब्याच्या पेठेचे ते वंशपरंपरागत अधिकारी असत. शेटे हे वाण्या उदमऱ्यापैकीच असून त्याच्याकडे गावच्या पेठेच्या जबाबदारीचे काम असे. शहरगाव असल्यास त्यात नवीन पेठा बसविणे, एखाद्या गावात बाजार भरत नसल्यास तो सुरू करणे, आपले रास्त माप व वजन कोणी वापरण्यासाठी मागितल्यास ते देणे इ. कामे शेट्याची असत व पेठेचे हिशेब ठेवयाचे काम महाजन याचे असे. शेट्याचे घर जर गावात असेल तर त्यास घरपट्टी माफ असे. शेट्यासारखे जे पांढरपेशी लोक होते त्यांना वतनदारीच्या जमिनी नसल्याने साल बेगमीच्या धान्याचा बंदोबस्त अशा रुपाने करण्यात आला.

४.८.१६ सरगुवे व नाईकवडी

निरनिराळ्या खात्यांचे लेखनाधिकारी म्हणून कारकून प्रथम त्यानंतर सरगुवे व त्यानंतर राऊत व शेवटी नाईकवडी असा क्रम आहे (जोशी शं. ना., १९६० : ११).

तालुक्याच्या किंवा परगण्याच्या ठिकाणी नाईकवडी वतनदार असे. ते तालुक्याच्या ठिकाणी कसबा किंवा मौजे येथे दर आठवडी बाजाराच्या दिवशी बंदोबस्त ठेवण्याचे काम करीत असत. तसेच नायकवडी म्हणजे सर्व्हेअर होय, शेखदार म्हणजे कारकून होय.

४.८.१७ देशमुख/देशपांडे/देशकुलकर्णी

कुलकर्णी हे एक गावचे वतनदार असत व देशकुलकर्णी हे अनेक गावांच्या वतनाचे अधिकारी असत. त्यांना देशमुखही म्हणत असत. देखमुख/देशपांडे/देशकुलकर्णी हे देशाधिकारी होत. या ठिकाणी देश या शब्दाचा अर्थ मर्यादित घेतला पाहिजे, साधारणपणे परगणा किंवा तालुकाएवढ्या प्रदेशास देश समजत असत. देशमुखी वतन सामान्यपणे मराठा समाजाकडे असे. ते परगण्याच्या ठिकाणी राहून मामलेदारास मदत करीत असत.

गावात जे काम पाटील कुलकर्णी यांचे तेच काम देशात देशमुख व देशपांडे यांचे असे. पाटील कुलकर्णी यांनी गावचा वसूल करावयाचा व गावोगावच्या पाटील कुलकर्ण्यांनी जमविलेला पैसा देशमुख व देशपांडे यांच्याकडे द्यावयाचा. म्हणून पाटील कुलकर्णी यांना साह्य करण्याकरिता गावात जे वतनदार लोक असत तसेच देशाच्या मुख्य गावी देशमुख व देशपांडे यांच्या मदतीकरिता वरिष्ठ वजनदार नोक असत (भावे वा. कृ., १९५७ : २२३).

४.९ कलेक्टर पदाची निर्मिती

भोर संस्थानातील हा सर्वांत प्रमुख महसूल अधिकारी होय. संस्थानात कलेक्टर पदाची निर्मिती सन १९३४ मध्ये करण्यात आली व या जागेवर श्री. ए. एन. हुल्लयाळ यांची नियुक्ती करण्यात आली. संस्थानच्या कारभारावर व सर्व महसूल अधिकारीवर्ग यावर कलेक्टरचे नियंत्रण होते. याशिवाय कलेक्टर हा संस्थानचा लँड रेकॉर्ड विभागाचा प्रमुख म्हणून काम पाहत असे. त्याप्रमाणे संस्थानातील तालुक्याचे प्रमुख म्हणून खेड्याची पाहणी (तपासणी) मामलेदार करीत असे. त्याद्दष्टीने कलेक्टरलादेखील संपूर्ण संस्थानात दौरा काढावा लागत असे.

४.१० संस्थानातील इतर अधिकारी वर्ग

भोर संस्थानात वतनदार अधिकाऱ्याप्रमाणे इतर काही अधिकारी वर्ग होता. त्यामध्ये महार, रामोशी, शिरस्तेदार, शेतकी अधिकारी, पाटबंधारे अधिकारी, पी. डब्ल्यू. डी., वजनमाप अधिकारी, खरेदी अधिकारी, पोस्ट ऑफिस, पोलिस व्यवस्था, न्याय विभाग, वैद्यकीय अधिकारी, फॉरेस्ट अधिकारी, शिक्षणाधिकारी, ओव्हरसियर, स्टेट इंजिनिअर्स इ. चा समावेश होता.

४.१०.१ महार

जागले हे पाटील-कुलकर्णी यांचे शिपाई असत, सरकारी कामानिमित्त ज्या इलाख्यात त्यांना जावे लागत असे, त्याठिकाणी त्यांनी त्यांना मदत करावी व रात्रीच्या वेळी गस्त घालावी. त्याचप्रमाणे गाव स्वच्छ ठेवावे इ. स्वरूपाची ग्राम सत्तेची जबाबदारी त्यांच्यावर होती. भोर संस्थानातील महत्त्वाचा अधिकारी म्हणून महार याचा उल्लेख करावा लागेल (अत्रे त्रिं. ना., १९१७ : १०). कारण महाराला ढुहेरी राज्यव्यवस्था पाहवी लागत होती. म्हणजे महार हा बारा बलुतेदारांपैकी एक बलुतेदार होता व ढुसरे म्हणजे राज्यकारभारात रक्षक होय. महाराला गावात आलेल्या गेलेल्यांची खबर पाटलाला द्यावी लागत असे. सन १८४४ मध्ये मौजे कासुर्डी येथे तुकाराम सखाराम महार याचा गावकामगार म्हणून उल्लेख येतो. गावकीची कामे करावी लागत. यासाठी महाराला इनाम म्हणून जमीन ढेत असत (ढेरे आर. व्ही., २००७ : ३४).

४.१०.२ रामोशी

भोर संस्थानात रामोशी यास महत्त्व होते. तो गावात झालेल्या चोरीचा तपास करण्याचे काम करीत असे. ज्या गावात चोरी झाली असेल त्या गावात हे रामोशी पायाच्या ठश्यावरून चोर कोणत्या मार्गाने गेला असेल त्याचा मार्ग ओळखीत असत. त्याच्या कामगिरीमुळे गावातील होणाऱ्या चोरीचे

तपास लवकर लागत असत. सन १८२४ मध्ये मौजे कांजले येथे चोरीच्या तपासाचे काम संतू रामोशी करीत असे. यावरून खेडेगावच्या व्यवस्थेत रामोशाला महत्त्व असल्याचे दिसून येते.

४.१०.३ शिरस्तेदार

भोर संस्थानात पूर्वी मुख्य कारकुनाचे काम मुतालीक पाहत असे. त्यालाच पुढे शिरस्तेदार म्हटले जाऊ लागले. रांझेकर नावाचे संस्थानाचे मुतालीक होते. तेच कारकुनीचे काम पाहत होते. म्हणजे शिरस्तेदार या नात्याने मुतालीकच मुख्य कारकुनाचे काम करीत असे. सन १८७५ मध्ये नारायण विनायक जोशी याची शिरस्तेदार म्हणून नियुक्ती करण्यात आली. पुढील काळात साधारणपणे जो ज्या पदावर काम करीत असे त्यास त्या पदाचे आडनाव लावले जात असे.

४.१०.४ शेतकी अधिकारी

भोर संस्थानची बहुतेक सर्व प्रजा गरीब होती. शेती हेच प्रामुख्याने हे त्यांच्या उपजीविकेचे साधन होते. सबब शेतीवर उदरनिर्वाह करणाऱ्या प्रजेच्या कल्याणाकरिता एखादी संधी आल्यास तिचा योग्य उपयोग करण्याकडे श्रीमंत पंचसचिव यांची प्रवृत्ती असे. म्हणून त्याकरिता शेती विषयातील तज्ज्ञ रूरल डेव्हलमेंटचे काम केलेले श्री. बापूसाहेब जोशी यांची शेती अधिकारी म्हणून नियुक्ती केली. धरणात संस्थानची सुपीक जमीन बुडाली. त्याचे नियोजन व देखरेख करण्यासाठी संस्थानात सन १९३४ मध्ये पाटबंधारे खाते निर्माण करून त्यावर अधिकारी नेमले.

४.१०.५ सार्वजनिक बांधकाम खाते

या खात्यामार्फत संस्थानातील रस्ते, रस्ते दुरुस्ती, पूल, रस्त्याच्या कडेने झाडे इत्यादी काम पाहिली जात होती. तसेच संस्थानातील जनतेची साखर कारखान्याची मागणी होत होती (रानडे वि. गो., १९४९ : ३८८ व ३९५).

४.१०.६ वजन-माप अधिकारी

संस्थानातील जनतेची व शेतकऱ्यांची फसवणूक व्यापारी करतात का? व्यापारी जी वजनमापे वापरतात ती योग्य आहेत का? हे पाहण्यासाठी संस्थानामार्फत या चीफ कन्ट्रोल खात्याची व्यवस्था केली. या खात्यावर संस्थानच्या दिवाणाची देखरेख ठेवण्यात आली. तसेच खेडेगावातील वजनमाप दुरुस्त करण्याचे अधिकार संस्थानामार्फत ठरवून स्थानिक अधिकाऱ्याकडे दिला.

४.१०.७ खरेदी अधिकारी

संस्थानातील धान्याची खरेदी-विक्री करण्याचे काम ढरबाराने ठरावीक कंपन्यांकडे किंवा एजंटकडे दिले होते. त्यामुळे संस्थानातील सर्व व्यापार ठेकेदारांच्या हाती गेला. ढरबाराने ठेकेदारांना

सर्व हक्क ढेऊन चूक केली. कॉर्पोरेशनने जी नफेबाजी केली त्यास दरबार जबाबदार होते. म्हणून कॉर्पोरेशनच्या व्यवहारास योग्य नियंत्रण घालता यावे म्हणून दरबाराने सन १९४३ मध्ये खरेदी-विक्री निरीक्षक अधिकारी नेमला. संस्थानाच्या विविध प्रशासकीय व इतर बाबींसाठी खरेदी-विक्री करण्याचे काम या अधिकाऱ्यामार्फत चालत असे. (ढेरे आर. व्ही., २००७ : ३६).

४.१०.८ पोस्ट ऑफीस

भोर संस्थानातील प्रदेश अतिशय दुर्गम होता. संस्थानिकांना आपल्या राज्यकारभाराचा पत्रव्यवहार दरबारातील व्यक्तींच्या साह्याने करावा लागत असे किंवा पंतसचिवांकडे मोठी पागा होती. या पागेतील कामगारांचा उपयोग पत्र पोहोचविण्यासाठी केला जात असे. त्या काळात संस्थानातील जनतेची ही सर्वात मोठी अडचण होती. म्हणून श्रीमंत रघुनाथराव पंतसचिवांनी राज्यकारभाराची सूत्रे हाती घेताच संस्थानातील प्रजेची ही अडचण दूर केली.

४.१०.९ पोलिस व्यवस्था

प्रजेच्या जीविताचे व मालमत्तेचे संरक्षण करणे राज्यकर्त्यांचे हे आद्य कर्तव्य असल्याने पोलिस व्यवस्था कार्यक्षम असणे गरजेचे होते. सन १८४९ मध्ये श्रीमंत चिमणाजी पंतसचिव यांनी स्वतंत्र पोलिस खाते स्थापन केले. त्यापूर्वी संस्थानातील गावचा पाटील जो असे तोच त्या गावचा पोलिस पाटील म्हणून काम पाहत असे (अत्रे त्रिं. ना., १९१५ : ७०).

४.१०.१० न्याय व्यवस्था

पूर्वी संस्थानात मुलकी, दिवाणीव फौजदारी इ. सर्व कामाचे अधिकार परगण्याच्या किंवा तालुक्याच्या एकट्या मामलेदारास किंवा वहिवाटदारास असत (शेणोलीकर ह.श्री. व देशपांडे प्र. ना., १९७६ : ३१४) . न्यायदानाचे काम सोयिस्कर व्हावे व जनतेस योग्य व नि:पक्षपाती न्याय मिळावा तसेच वेळ व पैसा वाचावा म्हणून श्रीमंत पंचसचिवांनी संस्थानात स्वतंत्र न्याय खाते निर्माण करून या जागेवर नामांकित न्यायाधिशाची नेमणूक केली होती

४.१०.११ वैद्यकीय अधिकारी

भोर संस्थानात प्लेग, नारू व कॉलरा इ. सारखे साथीचे रोग उद्‌भवत. म्हणून श्रीमंत शंकरराव पंचसचिव यांनी रयतेच्या आरोग्याकडे लक्ष देण्याकरिता ताबडतोब प्रतिबंधात्मक उपाय योजण्यासाठी व रयतेचे आरोग्य चांगले राहवे म्हणून सन १९०४ मध्ये संस्थानात वैद्यकीय खाते असे स्वतंत्र खाते सुरू केले व त्र्यंबक अनंत रिसबूडकर, देवी इन्स्पेक्टर या प्रमुख वैद्यकीय अधिकाऱ्यांची नेमणूक केली.

४.१०.१२ फॉरेस्ट अधिकारी

भोर संस्थान हे जंगल संपत्तीच्या बाबतीत अत्यंत भाग्यशाली होते. या संस्थानात नैसर्गिक संपत्ती खूप होती. ही संपत्ती नियोजनपूर्वक वाढवित जाणे, जतन करून ठेवणे गरजेचे होते. सन १८८६ मध्ये श्रीमंत शंकरराव चिमणाजी पंतसचिव यांनी स्वतंत्र फॉरेस्ट खाते निर्माण केले. त्यावर विष्णू विठ्ठल भिडे या अधिकाऱ्याची नेमणूक केली. तो संस्थानातील प्रत्येक तालुक्यातील जंगलाची पाहणी करीत असे. सन १९४० मध्ये गुरुनाथ राघवेंद्र कमलापूरकर हे फॉरेस्ट अधिकारी म्हणून काम पाहत होते.

४.१०.१३ शिक्षणाधिकारी

शिक्षण हेच सर्व सुधारणेचे मूळ असल्यामुळे शिक्षणाचा प्रसार झाला पाहिजे असे श्रीमंत शंकरराव पंचसचिव यांना वाटत होते. ते स्वत: शिक्षणप्रेमी व बहुश्रुत असल्यामुळे भोर संस्थानातील शैक्षणिक प्रगतीसाठी त्यांनी विद्या खाते असे स्वतंत्र शिक्षण खाते सन १८७५ ला निर्माण केले. या खात्यावर एका शिक्षणाधिकाऱ्याची नेमणूक करून त्याच्याकडे संस्थानातील सर्व शिक्षणाची जबाबदारी सोपविली. शिक्षणामध्ये भोर संस्थान सर्वांत मागासलेले होते (पोतनिस ढा. बा., १९४० : २५३).

भोर संस्थानाने मुलींच्या शिक्षणाकरीता नियोजन केलेले होते व त्याकरीता त्यांनी शाळा पण चालू केली होती. पहा चित्र क्र. : ४.४ भोर संस्थानाने चालू केलेली पहिली मुलींची शाळा-शैक्षणिक क्षेत्रामध्ये मुलींना सुद्धा उच्च शिक्षणापर्यंत संधी मिळाली पाहिजे असा दृष्टीकोन ठेवून भोर संस्थानने मुलींसाठी शाळा चालू केली. एका प्रकारे हे सांस्कृतिक स्थित्यंतरच होते. शाळेकरीता बांधलेली ही पूर्णपणे ढगडाची इमारत त्या काळातील शाळेच्या स्थापत्य कामाविषयक बांधलेली उत्कृष्ट इमारत होती.

४.१०.१४ पर्यवेक्षक

श्रीमंत शंकरराव पंतसचिव यांच्या काळात खऱ्या अर्थाने संस्थानच्या भरभराटीला व सुधारणा युगास सुरुवात झाली. राज्यकारभारासाठी आवश्यक असणाऱ्या सर्व गोष्टीची पूर्तता करण्यासाठी त्यांनी अनेक योजना राबविण्यास सुरुवात केली. त्यासाठी ओव्हरसीअर या अधिकाऱ्याची नेमणूक करून संस्थानातील राजधानी भोर (कसबा) व ठाण्याच्या गावातील प्रशासकीय इमारती तसेच इतर बांधकामे या अधिकाऱ्याच्या देखरेखीखाली किंवा व्यवस्थापनाखाली इमारती तयार होत असत.

४.१०.१५ इंजिनिअर

संस्थानिकांनी प्रशासकीय इमारती, शाळा, पूल इतर बांधकामाच्या आराखड्यासाठी एका इंजिनिअरची नियुक्ती केली.

४.११ कार्यकारी कायदे मंडळाची स्थापना

भोर संस्थानात कायदेमंडळ स्थापन करण्याचा लोकप्रतिनिधीत्वाचा कायदा श्रीमंत रघुनाथराव पंतसचिव यांनी सन १९२८ मध्ये पास करून अंमलात आणला. त्यानुसार संस्थानात कायदे मंडळ व कार्यकारी मंडळाची स्थापना झाली. या कायद्यामुळे राज्यकारभारात प्रत्यक्ष सहभाग होऊ लागला. या कायदेमंडळात एकूण २१ सभासदांची नेमणूक केली. त्यांपैकी १० सरकारी अधिकारी आणि १० बिनसरकारी सभासद व अध्यक्ष मिळून २१ सभासद होते. हे कायदेमंडळ केवळ सल्लागार स्वरूपाचे होते.

भोर संस्थानाचा कल स्वधर्माकडे होता, याचे प्रतिबिंब त्यांच्या राजचिन्ह्यातून दिसत आहे. पहा चित्र क्र. : ४.७ भोर संस्थानाचे राजचिन्ह-या चिन्हाच्या शिक्क्याशिवाय कुठलेही पत्र संस्थानामधून पाठविले जात नसे. इंग्रजांच्या राजवटीच्या काळात त्यांनी अधिकृतपणे श्रीराम, लक्ष्मण सिता यांचे चित्र असलेले अधिकृत संस्थानाचे मानचिन्ह ठेवले होते. यावरून असे दिसते की, विधायक कामांच्या बरोबर त्यांनी स्वःधर्माची जाणिवपण ठेवलेली होती. हे विशेष आहे.

४.१२ भोर संस्थानातील सांस्कृतिक जीवन व त्याची स्थित्यंतरे

चैत्र शुध्द नवमी हा रामनवमी उत्सवाचा मुख्य दिवस असे. त्याबरोबर सकाळी सर्व लवाजम्यासह मिरवणूक निघत असे. श्रीरामचंद्रांची मूर्ती हत्तीवर ठेवण्यात येई. त्याच्याबरोबर शिबंदी, घोडेस्वार, वाजंत्री व सर्व नागरिक भारतीय पोषाखात फेटे घालून सामिल होत असत व मुख्य वाड्यात सकाळी ११ वाजता येत असे. दुपारी १२ वाजता भव्य समारंभ होत असे. रामजन्माचा सोहळा होत असे. तो आजही चालू आहे (जोशी वा. ना., १९३९ : ८७६).

भोर संस्थानातील मौजे मांगदरी येथील कुलदैवत श्रीराम या देवाची पूजा-अर्चा करणाऱ्या गुरवास वीस बिघे जमीन देण्यात आली होती. ही जमीन देवस्थान इनाम म्हणून तेथील गुरव वहिवाटीस असे. याशिवाय संस्थानिकांनी जेजुरी, पंढरपूर, नाशिक, काशी येथील गुरवांना इनाम जमिनी देण्यात आलेल्या होत्या. सन १८३० मध्ये मौजे नसरापूर येथील कुलदैवत श्रीराम देवस्थान व मौजे पडाळघर येथील देवस्थानाच्या पूजे-अर्चेबाबत ब्राह्मण पुजाऱ्याकडे जमीन इनाम देणगी म्हणून दिली होती. संस्थानातील प्रत्येक गावातील इतर लोकांच्यामध्ये गुरवाप्रमाणेच जोशी, सुतार, लोहार, कुंभार, धोबी, परीट, ढोर, न्हावी किंवा हजाम, शिंपी इ. एका श्रेणीतील समाज होता. यामध्ये जोशी हा भविष्य सांगणारा असे. यांच्यामध्ये लग्नसंबंध अथवा रोटी-बेटी व्यवहार होत नसत. हे सर्व बलुतेदार म्हणून गणले जात. हे सर्व आपणास मिळणाऱ्या बलुत्यावर उदरनिर्वाह करत असत. त्यांना दरवर्षी सेवेबद्दल

पगार म्हणून धान्य मिळत असे. त्या बदल्यात त्यांना सर्वांची सेवा चाकरी करावी लागत असे. दैनंदिन गरजांची पूर्तता करण्यासाठी या लोकांची आवश्यकता होती. त्यामुळे या समाजातील लोकांची घरे प्रत्येक गावात होती.

याशिवाय समाजरचनेचा दुसरा प्रकार म्हणजे वतनदारी व उपरी यांचा होय. भोर संस्थानात वतनदारांची संख्या जास्त होती. याचे प्रमुख कारण म्हणजे छत्रपती शिवाजी महाराजांच्या काळापासून कर्तबगारी दाखविणाऱ्या घराण्यांची संख्या जास्त होती. छत्रपती राजाराम महाराज व शाहू महाराज यांच्या कारकिर्दीत या घराण्यांना मोठ्या प्रमाणात इनाम मिळाले. तर समाजरचनेचा दुसरा प्रकार उपरी लोकांचा होय. उपरी लोकांची घरेही संस्थानात होती. त्यामध्ये सन १८१८-१९ मध्ये मौजे सारोळे येथे १७ उपरी लोकांची घरे होते. तर मौजे कासुर्डी येथे दोन उपरी लोकांची घरे होती. साधारणपणे उपरे म्हणजे जे लोक बाहेरगावचे असतील त्यांना उपरे म्हणून समजण्यात येते.

त्याचप्रमाणे ज्या लोकांना वंशपरंपरागत वतने मिळाली होती(अग्निहोत्री द. ह., १९७७ : २०७). त्यामध्ये पाटील, देशमुख, कुलकर्णी, देशपांडे, महार, रामोशी, शेटे, महाजन, चौगुला इत्यादींचा समावेश त्यात होत असे. हे लोक त्यांना मिळालेल्या वतनाचा वंशपरंपरागत उपभोग घेत होते. त्यांच्या मालकीची जमीन असे. तसेच ते गावचे वंशपरंपरागत अधिकारी असत आणि त्यांना गावात मानाचे स्थान असे.

नवीन शोधांमुळे यांत्रिक युगाला सुरुवात अथवा प्रारंभ झाला. यंत्राच्या साहाय्याने वस्तूंची निर्मिती होऊ लागली. साहजीकच पूर्वीची व्यवस्था पूर्णपणे बदलली. औद्योगिक व बौद्धिक प्रगतीमुळे सामाजिक प्रगती घडून आली. त्याचबरोबर आर्थिक परिस्थिती बदलली. भोर संस्थान त्यास अपवाद नव्हते. या सतत होणाऱ्या बदलामुळे संस्थानात परिवर्तनास प्रारंभ झाला. भोरचे संस्थानिक श्रीमंत पंतसचिव यांनी अनेक सुधारणा राबवून संस्थानातील शेतकऱ्यांचा विकास यावर भर देऊन सुधारणा घडवून आणल्या. त्यासाठी संस्थानिकांनी वेळोवेळी शेतकऱ्यांना आवश्यक त्या वेळेत संस्थानच्या उत्पन्नातून काही रक्कम शेतकऱ्यांच्या विकासासाठी अल्पदराने देत असत. तसेच संस्थानात सहकारी पतसंस्था काढून त्यांच्यामार्फत शेतकऱ्यांना आवश्यक गरजेपुरते शेतीला पाटाचे, उपसा सिंचन इ. द्वारा पाणी मिळू लागले. याशिवाय नगदी पिकांबरोबरच उत्पादन व क्षेत्र वाढले. तसेच शेतकरी वर्षभर शेतीत गरजेप्रमाणे आवश्यक पिके घेऊ लागला. त्यामुळे शेतीचे उत्पन्न वाढण्यास मदत झाली.

भोर संस्थानातील पावसाचे प्रमाण जास्त होते. तर संस्थानच्या पूर्व भागात पावसाचे प्रमाण कमी होते. वास्तविक पाहता कोणत्याही ठिकाणची घरे ही तेथील नैसर्गिक परिस्थितीशी

मिळत्याजुळत्या अशा स्वरूपाची असतात. भोर संस्थानात घाटमाथ्यावर व तळकोकणात पडणाऱ्या पावसाचे प्रमाण जास्त असल्याने येथील घरे लहान आकाराची व कौलारू उतरत्या छपराची होती. त्यामुळे पावसाचे पाणी ताबडतोब खाली पडत असे. तसेच येथील घराच्या भिंती भिजून पडू नयेत अथवा त्यांना ओलावा लागून त्या पडू नयेत तसेच शेवाळसारख्या पाणवनस्पती भिंतीवर वाढू नयेत म्हणून भिंतीच्या संरक्षणासाठी गवताचा अथवा पानवनस्पतींचा कूड घातला जात असे, त्यामुळे या प्रदेशातील घरे पावसाळ्यात टिकून राहत असत. तर शिरवळ भागात पावसाचे प्रमाण कमी असल्याने येथे धाब्याची घरे होती. सन १८९१ या वर्षी संस्थानातील एकूण घराची संख्या २१,७४८ होती. यांपैकी ही घरे एक शहर व पाचशे दोन गावात होती. भोर संस्थानातील लोकसंख्येचे प्रमाण दर चौरस मैलास १७१ होते.

४.१३ वेशभूषा पद्धत

एकूण तीन प्रकार होते. त्यात अंगावर उबेकरिता घेण्याचे वस्त्र, सामाजिक व धार्मिक समारंभात, दरबारात किंवा दैनंदिन जीवनात सर्वांच्या परिधान करावयाचे वस्त्र व झोपताना अंथरून-पांघरून म्हणून अंगावर घेण्याचे वस्त्र असत. यापैकी पासोडी व घोंगडी पांघरण्याचा गरिबांचा मुख्य आधार होता (ढेरे आर. व्ही., २००७ :७१).प्रत्येक शेतकऱ्यांच्या घरी घोंगडी असावयाचे कारण घोंगडी हे वस्त्र थंडीतही उबदार राहत असे व शेतकऱ्याला कमी किंमतीत परवडत असे. त्यामुळे समाजाला सर्वसामान्य लोक घोंगडीचा वापर मोठ्या प्रमाणात करीत असत. यावरून हे वस्त्र त्या काळात आवडत असावे.

भोरचे संस्थानिक श्रीमंत पंतसचिव यांचे घराणे खूप जुने होते. तसेच त्यांच्या पूर्वजांचे छत्रपती घराण्याशी जवळचे संबंध होते. शिवाय अष्टप्रधान मंडळ व्यवस्थेतील पंतसचिव हे तिसऱ्या दर्जाचे मंत्री होते. तसेच पंतसचिव घराण्यात पूर्वीची वतनदारी असून ते वतनदार देशपांडे होते. म्हणून श्रीमंत शंकरराव व श्रीमंत रघुनाथराव राजे पंतसचिव यांच्या कारकिर्दीत पूर्वीचा सुसंस्कृतपणा बराच होता. वास्तविक पाहता भोर संस्थानिक हे ब्राह्मण होते. परंतु त्यांचा पोशाख अस्सल मराठी शाहीचा असे. त्याचप्रमाणे अष्टप्रधान मंडळातील प्रत्येक मंत्र्यांचा विशिष्ठ पोषाख ठरलेला असे. त्यानुसार श्रीमंत पंतसचिव हे दरबारी राजे लोकांच्याप्रमाणे पोषाख परिधान करीत असत. त्यामध्ये अंगात चुडीदार अंगरखा, पायात तंग सलवार , डोक्याला कनीदार मराठेशाही पगडी, गळ्यात कंठहार, बोटात हिरे-पाचूच्या, खड्यांच्या अंगठ्या, मनगटात हिरे-मोतीजडित मनगटे असा त्यांचा त्या काळच्या रितिरिवाजाला अनुसरून पंतसचिवांचा या मंत्रिपदाला शोभेल असाच पोषाख असे. तसेच राजे वगैरे

लोकांचे बोलण्याचे अथवा वागण्याचे वेगळे तंत्र असे. श्रीमंत चिमणाजीराव, शंकरराव, रघुनाथरावराजे पंतसचिव हे दररोज कारभाराच्या निमित्ताने दरबारात येत. तेव्हा त्यांच्या समवेत अनेक मान्यवर असत. तसेच दरबारात येताना त्यांच्या पुढे व्यवस्थेकरिता शिबंदीमध्ये असलेले चोपदार व भालदार हातात विविध चिन्हे घेऊन सोन्या-चांदीची काठी पुढे करून श्रीमंतांना दरबारात आणत असत. ही पद्धत संस्थानात चालत आलेली होती. या शिबंदी खात्यातील चोपदार व भालदारांचा पोषाख वेगळा असे. ते कमरेला जरीचे बुट्टेदार शेले गुंडाळत व उंची कपडे घालत व रितिरिवाजानुसार ते लवून श्रीमंतांना नमस्कार करून पुढे येण्यासाठी आलिंगन देऊन दरबारात घेऊन येत. त्यावेळी दरबारातील अधिकारी वर्ग, मान्यवर ठरलेल्या जागेवर बसत.

भोर संस्थानातील पुरूषांमध्ये धोतर नेसणाऱ्याची संख्या मोठी होती. त्याचप्रमाणे अंगात अंगरखा तर काही लोक बाराबंडी वापरत असत. तसेच डोक्यावर टोपी किंवा पांढरे पागोटे वापरत असत. भोर संस्थानात धोतरजोड्या, कोटाचे कापड, साड्या, चोळखण, सुति कापडापासून अंगरखे, बाराबंडी व उपरणे तयार होत असत. तर उंची धोतरजोड्या, कापड, साड्या इत्यादी पुणे, पैठण, बारामती, सोलापूर येथून आणत असत. याशिवाय भोर येथे उत्तम प्रकारचे कापड तयार केले जात होते. तसेच भोर येथे आधुनिक पद्धतीचे कापड तयार करण्यात येत होते. मौज नसरापूर येथे हातमागावर धोतरजोड्या, लुगडी, खण, पागोटे, सुताडे तयार केले जात असे.

संस्थानातील समाजात स्त्रियांचे स्थान अत्यंत महत्त्वाचे व उच्च होते. तत्कालीन समाजात राजघराण्यातील स्त्रिया गोषा वापरत असत. परंतु पंतसचिव राजघराण्यातील स्त्रिया गोषा पद्धत वापरत नसत. मात्र राजघराण्यातील स्त्रिया उंची वस्त्रे परिधान करीत असत. त्यात नक्षी व कशिदा काम केलेले, बेलबुट्या काढलेल्या भरजरी नऊवारी साड्या, किनखाब, जरीकाठी खण वापरत असत. त्यामध्ये जरी पदरी, केशरी, जरीकाठी या उंची साड्या असत, संस्थानात पैठणी साड्या लोकप्रिय होत्या. याशिवाय नारायणपेठ साड्यांनाही स्त्रियांची मागणी होती. तर लहान मुली परकर, चोळ्या, लेहंगा, ओढण्या ही वस्त्रे वापरत असत. तर सामान्य स्त्रिया साड्या, पैठण्या, मोठ्या काठाच्या साड्या, शालू वापरत असत. त्यांपैकी पैठणी व नारायणपेठ साड्यांची किंमत रू. ११९ व ३३ रुपये ८ आणे होती(साधारणतः इ. स. १६९८ ते इ. स. १८९८ पर्यंतचा काळ)(ढेरे आर. व्ही., २००७ :८०).

४.१४ प्रत्यक्ष संशोधनात्मक वस्तुस्थितीचा अभ्यास

भोर संस्थानाच्या राजवाड्याचे स्थापत्य व त्यात झालेली स्थित्यंतरे

इ. स. १७४० मध्ये भोरच्या राजवाड्याचे काम पूर्ण झाले. त्यानंतर इ. स. १८६९ मध्ये परत नवीन बांधकाम झाले. पहा चित्र क्र. ४.८ भोर येथील राजवाडा, श्रीमंत नानासाहेब यांचे कारकीर्दीत इ.

स. १८६१ साली हा वाडा बांधण्यात आला. या राजवाड्याचे स्थापत्य इंग्रजांच्या काळात झाल्यामुळे मराठा शैली व इंग्रजांची स्थापत्य शैली यांची एकत्रित शिल्पकला किंवा स्थापत्य पाहण्यास मिळते.

४.१४.१ भोर राजवाड्याचे स्थापत्य व निरीक्षणे

सर्वच राजवाड्यांमध्ये मुख्य चौकटीच्या प्रवेशद्धारावर 'गणेशपट्टी' अशा स्वरूपाची लाकडात कोरलेली असे. इ. स. १८६१-७० या काळात वाड्याच्या पुर्नबांधणीत वाड्याच्या चौकटीवर कोरलेली 'गणेशपट्टी' आजही दिसत आहे. गणेशपट्टीच्या बाजूला व वर केलेले लाकडी कोरीव काम अत्यंत सुबक पध्दतीचे आहे. इ.स. २०१६ मध्ये या लाकडाच्या कारागिरीला आणि गणेशपट्टीला १४६ वर्षे पूर्ण होतील. पहा चित्र क्र. ४.३१

चार मजली या राजवाड्याचे क्षेत्रफळ ४४ हजार चौरस फूट आहे. अप्रतिम लाकूडकाम, ढगडकाम, वीटकाम या सगळ्यांचा एकत्रित संयोग या ठिकाणी दिसतो. तीन चौकी प्रसन्न वाड्याची जमिनीवरील व्याप्ती काटकोन आकाराची आहे. पूर्वेकडील वाड्याचे प्रथमदर्शनी रूप मोठे ऐतिहासिक वाटते. वर असलेल्या नगार खान्यातील लाकडाच्या महिरपीमुळे भव्यता अधिक वाटते. परंतु आतील वाड्याच्या लांबीनुसार प्रवेशद्धार त्याच्या तुलनेत जरा उंचीला मध्यम वाटते. परंतु लाकडाच्या कारागिरीची सुबकता व कामगिरी मात्र सौंदर्यात भर घालते. राजवाड्याचा मुख्य दरवाजा-प्रवेशद्धार- पहा चित्र क्र. ४.११ प्रवेशद्धार हे भक्कम, बांधिव व घडवलेल्या ढगडांनी तयार केलेली दरवाजाची चौकट व उंबरठा यांनी परिपूर्ण असे. चौकटीच्या बाजूला नक्षीदार पण कमानीदार घडवलेल्या ढगडांनी चौकटीचा भक्कमपणा व सौंदर्य या दोन्ही गोष्टी साध्य झालेल्या दिसत आहे. कमानीची पध्दत हिंदू वास्तुशास्त्राला धरून आहे. कमानीमध्ये एकंदर नऊ पाकळ्या आहेत. मध्यभागी पण दोन्ही बाजूला अर्ध्या अर्ध्या पाकळ्या व उर्वरित चार, चार दोन्ही बाजूला पाकळ्या एकंदर ९ पाकळ्यांची कमान झालेली दिसत आहे. आतील दरवाजा लाकडाचा पण त्याला संरक्षण लोखंडी पट्यांचे असे. पालखी किंवा मिरवणूक आत जाण्यासाठी केलेला प्रशस्त, उंच व रूंदीला तेवढाच मोठेपणा यामुळे भव्यता वाढते. साधारणतः जेवढी रूंदी त्याच्या ढुप्पट उंची असे गणित बसवलेले दिसते. एरवी बंद असलेला हा दरवाजा परंतु महत्त्वाचे काम असल्यास दिंडी दरवाजाने जावे-यावे याकरीता केलेली सोय पण दिसत आहे. दिंडी दरवाजा-पहा चित्र क्र. ४.१२ मुख्य प्रवेशद्धाराच्या आतमध्ये तळाला उघडणारा दरवाजा व वाकून एका वेळी एकच मनुष्य जाऊ शकतो अशी रचना असणारा दरवाजा. त्यामुळे हालचालींवर बंधन येते. संपूर्ण दरवाजा उघडून आत जाण्याची आवश्यकता काही वेळेला नसते. त्यावेळी याचा वापर होतो, पण तोही भक्कम व संरक्षित आहे. या दरवाज्याने नेहमीचे कामगार व नोकरचाकर व सतत ये-जा

करणारी कारकून मंडळी किंवा तत्सम दैनंदिन स्वरूपाची काम करणारी वाड्यातील मंडळी यांना उपयोग होत असे.

प्रथम चौकात प्रवेश केल्यावर दोन प्रकारच्या वास्तुकलेचे एकत्रीकरण पाहवयास मिळते. शिवकालीन व व्हिक्टोरियन शैलीची कलाकृत्य बघावयास मिळते. उंच जोत्यासाठी केलेली पायऱ्यांची रचना, उभे असलेले खांब मान ताठ करून उभे राहणाऱ्या एखाद्या जवान सैनिकासारखे रुबाबदार वाटतात. यावरून प्रवेशद्धाराची भव्यता अनुभवास येते.

मध्यवर्ती चौकामध्ये रामजन्माचा डोळे दिपवणारा सोहळा अजूनही होतो. पंतसचिव कुटुंबाची सध्याची पिढी पारंपरिक पोशाखात सहकुटुंब सहपरिवार येऊन रामजन्माचा सोहळा साजरा करते व त्यावेळी गावजेवण असते. रामनवमीचा उत्सव पहा चित्र क्र. ४.७ भोरच्या राजवाड्यात रामनवमीच्या कार्यक्रमाला श्रीरामजन्मोत्सवाकरीता सर्व गावाला निमंत्रण असे. त्याचप्रमाणे वाड्याच्या रचनेत बदल करून म्हणजेच वास्तुरचनेमध्ये सामाजिक भान ठेऊन वाडा बांधलेला दिसतो. वाड्याच्या या चौकामध्ये अतिभव्य असा मंडप म्हणजेच जवळजवळ वाड्याच्या दुसऱ्या मजल्यावरून मंडपाच्या आतमध्ये चालणारे कार्य सहज दिसेल, एवढी उंची व तेवढेच उंच जाडजूड लाकडी खांब त्याच्या आधारासाठी असलेल्या लाकडी पण कोरीव कमानी लक्ष वेधून घेतात. याच मुख्य चौकाच्या समोर राजाचे सिंहासन आहे. तेथून राजा सोहळा बघत असे. राजाने अशा सांस्कृतिक कार्यक्रमासाठी रचनात्मक वाडा बांधला आहे. आजही गेली २७५ वर्षे रामनवमीचा उत्सव चालू आहे. भोर संस्थान यांचे राजमुद्रा राम, लक्ष्मण, सीता यांच्या चित्राची आहे, पहा चित्र क्र. ४.६. इंग्रजांचा अंमल असूनसुध्दा राजा सात दिवस रामजन्मोत्सव करीत असे. साधारणतः इ.स. १७४० मध्ये या रामजन्माच्या उत्सवाला सुरूवात झाली, असे भोर संस्थानच्या इतिहासावरून दिसते.

मूळतः या राजवाड्यात हा कार्यक्रम चालू झाल्यापासून गावातील सांस्कृतिक जीवनावर याचा मोठा परिणाम झाला. त्याकाळी साधारणतः (१७१० ते १८१८) या कालखंडात धर्मांतराच्या घटना घडत. परंतु स्वतः राजा धर्मपरायण असल्यामुळे राजा जेव्हा स्वतः रामजन्माचा सोहळा करतो. याचा परिणाम लोकांच्या मनावर होतो.

दुसऱ्या चौकात गेल्यावर मात्र वाड्याची भव्यता लक्षात येते. दोन मजले असलेल्या या चौकात मध्यभागी दुप्पट उंचीचा भव्य सभामंडप संपूर्णपणे लाकडी खांब, लाकडाच्या महिरपी छताच्या खाली आधार देत शोभा वाढवतात व चारही बाजूने मोकळा असल्याने हवा खेळती रहाते, पण मध्यभागी सावली असते. ही रचना फारच वेगळी वाटते व क्वचितच दिसणारी आहे. कदाचित या चौकात

मध्यभागी असलेल्या सभा मंडपात महत्त्वाच्या व्यक्ती राजासमवेत बसू शकतील एवढीच जागा असल्याने फक्त प्रशासकीय कामाकरिता याचा उपयोग होत असावा असे दिसते किंवा खास पाहुणे यांच्या स्वागताकरिता किंवा सल्लामसलत करण्यासाठी उपयोग केलेला दिसतो.

या सभामंडपाचे छतसुद्धा लाकडात पण भक्कम असे दिसते. सभा मंडपातून आपल्याला दुसऱ्या चौकाच्या ओसरीच्या चारही बाजू दिसतात. म्हणजे मध्यभागी खास व्यक्ती सभामंडपात असताना त्यांच्या सन्मानार्थ अधिक लोक असतील त्यांना पण बसण्याची सोय होऊ शकते व चाललेल्या बैठकीचा भव्य सोहळा बघता येऊ शकतो, असे दिसते.

त्याचप्रमाणे पहिल्या मजल्यावरूनसुद्धा बघता येईल की सभा मंडपात कोणता कार्यक्रम चालू आहे किंवा एवढी उंची त्या मंडपाला आहे, याचे कारण बहुदा तेच असावे. कारण काही राजघराण्यांमध्ये माता भगिनी किंवा वयस्कर माताभगिनी यांनाही हा सोहळा किंवा कार्यक्रम बघता यावा, अशी सोय असायची. कदाचित एखादे कीर्तन असेल, छोटीशी सभा असेल, भेटण्यास आलेले गावकरी असतील, प्रशासकीय अधिकाऱ्यांची महत्त्वाची बैठक असेल तर त्यांच्या सहकाऱ्यांना बसण्यासाठी इ. सर्व प्रकारच्या प्रशासकीय व सामाजिक कामाकरिता या वाड्याची ही रचना असावी. पहा चित्र क्र. ४.१०

राजवाड्याच्या वास्तुरचनेत झालेला बदल. या काळात केला गेलेला मोठा बदल म्हणजेच हा सांस्कृतिक मंडप. राजवाड्याच्या मुख्य दुसऱ्या चौकात मध्यभागी संपूर्ण लाकडाचा, अत्यंत मोठा व उंच व दुर्मिळ असे लाकडाचे जाड खांब वापरून तयार केलेला मंडप. या मंडपाची उंची दुसऱ्या मजल्याच्या उंचीपर्यंत आहे. त्यामुळे दुसऱ्या मजल्यावरील सर्व खिडक्या या मंडपाच्या दिशेने उघडतात. घरातील काही कार्यक्रम किंवा काही सार्वजनिक कार्यक्रम धरातील माता-भगिनींना वरच्या मजल्यावरून सहजपणे बघता यावेत, यासाठी मंडपाची उंची मोठी केलेली आहे. गावातील सामाजिक व सांस्कृतिक कार्यक्रम या मंडपामध्ये होत असत. भोरच्या राजांनी सांस्कृतिक स्थित्यंतराच्या या काळात सर्व समाजातील सर्व घटकांना राजवाड्याचे आत येऊन कार्यक्रमात सहभागी व्हावी, असे वाटत असे. म्हणून अशा प्रकारची रचना केलेली दिसत आहे.

सर्वांत महत्त्वाचे म्हणजे ओसऱ्यांमधील गुळगुळीत जमीन अजूनही शेकडो वर्षे जशीच्या तशीच आहे, यासंदर्भात माहिती घेतली असता त्या काळात चुन्यामध्ये बाभूळ या झाडाच्या बिया त्यात टाकून चुन्यामध्ये गूळ आणि बाभळीच्या बिया यांचे एकजीव मिश्रण तयार करून घट्टअसे मिश्रण दोन

अडीच इंच घट्टपणे जाड थर ढेऊन घोटून घोटून तयार केले आहे, हे नवीनच संशोधन झाले असे म्हणावे लागेल. म्हणूनच ती जमीन आज १७० वर्षे जशीच्या तशी आहे, हे आश्चर्यकारक व कौतुकास्पद आहे.

दक्षिणेकडील चौकामध्ये जोत्यावरून असे वाटते की, याभोवती असलेल्या सर्व खोल्यांमध्ये राहण्याची दालने असावीत. त्याचबरोबर स्वयंपाक करण्याच्या जागा निश्चित आहेत. कारण जवळच भोजनगृह किंवा भोजनघर आहे. तळमजल्यावर असलेल्या स्वयंपाकघरात स्वयंपाकाचा धूर कोंडू नये म्हणून छतामधून अत्यंत सावधगिरीने, कुशलतेने लहानलहान धूर सोडण्याच्या जागा निर्माण केल्या आहेत.

या चौकात कमानीच्या खिडक्यांची रचना अशी काही केली आहे की, त्यांची दारे चौकात उघडतात. त्यामुळे आतील जागा वापरण्यास मिळते व दोन्ही मजल्यावर भरपूर प्रकाश व खेळती हवा चौकामुळे आत घरात येत असे. वास्तुरचना अतिशय शास्त्रशुद्ध आहे. यात शंका नाही.

तीन चौकाभोवती किंवा तीन चौकी राजवाडा हा उत्कृष्ट स्थापत्यशास्त्राचा नमुना आहे. लाकडाची कारागिरी, उत्तम प्रकारात घडविलेले शास्त्रशुध्द दगड घडवून बसविलेले दिसतात. उदा. सर्व संस्थानिकांच्या वाड्यामध्ये लाकडाच्या खांबाखाली तळखडा असतो. त्यासंदर्भात संशोधनात्मक माहिती दिसते ती पुढील प्रमाणे

सर्व राजवाड्यांच्या बांधकामात हा तळखडा फार महत्त्वाचा आहे. कारण हा तळखडा एका प्रकारे भक्कम पायाचे काम करतो. लाकडाच्या खांबांचा मुख्य आधार किंवा त्यावरील मजल्यांचा आधार हा तळखडा सहन करीत असे. पहा चित्र क्र. ४.१३ तळमजल्यावरील हा तळखडा ०.४५ मी. X ०.४५ मी. चा चौरस म्हणजेच हल्लीच्या फौडेशनच्या आकारासारखा जेवढी तळखड्याची उंची तेवढाच त्याच्या तळातील चौरसाचे माप असे. उदा. खालचा चौरस ०.३४ मी. असेल तर उंची सुध्दा ०.३४ मी. असते. तळखड्यावरील वरचा चौरस व तळखड्याचा खालचा चौरस यामध्ये ढुपटीने फरक आहे. उदा. तळखड्याचा खालचा चौरस ०.४५ मी. X ०.४५ मी. असेल तर तो कमी होत होत ०.२३ मी. X ०.२३ मी. चौरस झालेला दिसत आहे. या तळखड्याची गोलाई व त्याचे कोन आपण चित्रात बघत आहात. न चुकणारे गणित याप्रमाणे कारागिरांनी तळखडा बनविला आहे. स्थापत्याच्या दृष्टीने काटकोनात बनविलेल्या विटा व त्यांची बांधेसूत गुंतवणूक व संरचना निश्चितच इंजिनिअरिंगच्या दृष्टीने महत्त्वाची ठरते. भोर संस्थानचे राजे यांनी अनेक वास्तु आपल्या संस्थानामध्ये निर्माण केल्या त्यांना जुन्या दुर्मिळ ग्रंथांची व वस्तुंची आवड होती. त्यांनी सर्व जुने ग्रंथ एकत्र करून श्रीमंत सौ. गंगुबाई साहेब पंतसचिव वाचनालय-ग्रंथालय बांधले. पहा चित्र क्र. ४.१ भोर संस्थानाचे राजे पंतसचिव या घराण्याला

ग्रंथ साहित्य व पौराणिक वस्तू साठविण्याचा एक मोठा छंदच होता. त्यांचे ग्रंथालय व संग्रहालय ब्रिटीश राजवटीमध्ये एक कौतुकाचा विषय होता. ग्रंथालयाकरीता बांधलेली इमारत ही संपूर्ण ढगडाची असून त्याचे स्थापत्य हे मजबूत व काहीसे मराठा शैलीत व काही युरोपियन शैलीत आहेत.

तिसरे पंतसचिव चिमाजी नारायण यांनी इ. स. १७४० मध्ये राजवाडा बांधला. त्यानंतर ११२ वर्षांनी म्हणजे १८७८ व त्यानंतर परत ११ वर्षांनी १८६९ साली लागलेल्या आगीमध्ये राजवाड्याचा काही भाग जळून गेला. बरेच नुकसान झाले. त्यानंतर त्याच वर्षी सुमारे १८६९ ला दोन लाख रुपये खर्च करून राजवाडा परत जसा आहे त्यापेक्षा अधिक काळजीपूर्वक भक्कम बांधला.

४.१४.२. भोर संस्थानामधील स्थापत्य व स्थापत्यामधील झालेली स्थित्यंतर त्याचे चित्र क्रमांकासहित संशोधनात्मक निरीक्षण

भोर संस्थानच्या स्थापत्य दृष्ट्या अभ्यास करताना अनेक स्वरूपाचे नकाशे उपलब्ध झाले. या सर्व नकाशांना आपणांस असे दिसेल की, भोर राजवाड्याची व्याप्ती व त्यामध्ये असलेले चौक व या सर्व चौकांमध्ये असलेली स्थापत्यविषयक रचना उदा. सदर, जिने, सभामंडप, लाकडाचे केलेले कोरीव काम त्याचप्रमाणे जमिनीपासून ते छतापर्यंत असलेली खांबांची व तुळयांची रचना व या सर्वांचे एकत्रित असे चित्र व सर्व मजल्या असलेली ढालने आपणांस पहावयास मिळतील. सर्व प्रथम जमिनीपासून २.३ मीटर पातळीवर छेद घेऊन काढलेला तळमजल्याचा नकाशा पहा चित्र क्र. ४.१४ यामध्ये मुख्य प्रवेशद्धार व त्याच्याआतून गेल्यावर दिसणाऱ्या ओसऱ्या, पहिला चौक व गोलाकार पद्धतीने घडविलेल्या पायऱ्या या सर्व परिसरामध्ये संस्थानचे सरकारी कामकाज चालत असे. (संदर्भ : या प्रबंधामध्ये प्रकरण ४.१४.१ मध्ये सविस्तर वर्णन आहे.) त्याचप्रमाणे भोर संस्थानच्या राजवाड्याचा पहिल्या मजल्याचा नकाशा पहा चित्र क्र. ४.१७ जमिनीपासून ७.६ मीटरच्या पातळीवर छेद घेऊन काढला आहे. यामध्ये संपूर्ण राजवाड्याचा मुख्य भाग आपणास अवलोकन करता येत आहे. यामध्ये पहिला चौक, दुसरा चौक, सदर, दिवाणखाना, तिसरा चौक, राजाची राहण्याची व्यवस्था, परस, भिंतीमध्ये असलेले टप्पे (जीना) बाहेरील भिंतीची जाडी, देवघर इ. दिसत आहे. (संदर्भ :- या प्रबंधामध्ये प्रकरण ४.१४.१ मध्ये सविस्तर वर्णन आहे.) पहिल्या मजल्याप्रमाणे भोर संस्थानच्या राजवाड्याचा दुसऱ्या मजल्याचा व छताचा नकाशा पहा चित्र क्र. ४.१६ जमिनीपासून ८.६ मीटरवर छेद घेऊन काढला आहे. यामध्ये दुसऱ्या मजल्यावर जाणारे टप्पे (जीना), छत व गच्ची इ. सर्व दिसत आहे. भोर संस्थानच्या राजवाड्याचा सर्वात वरचा तिसरा मजला राजाच्या खाजगी वापरासाठी दिसत आहे व त्याची रचना सुद्धा अत्यंत प्रशस्त अशी आहे. पहा चित्र क्र. ४.१७ भोर संस्थानच्या राजवाड्याच्या तिसऱ्या मजल्याचा

व छताचा नकाशा जमिनीपासून ११.६ मीटरच्या पातळीवर छेद घेऊन काढला आहे. यामध्ये सर्वांत वरच्या मजल्यावरील सभागृह व प्रमुख अधिकारी यांची सल्लामसलतीची जागा व राजाचे वैयक्तिक दालन इ. सर्व दिसत आहे. भोर संस्थानच्या राजवाड्याची व्याप्ती खूप मोठी होती. संस्थानिकांच्या कडे येणारे त्यांचे जवळचे नातेवाईक व इतर राज परिवारातील कार्यक्रमाच्या निमित्ताने येणारे नातेवाईक यांची पण राहण्याची व्यवस्था उत्तम व्हावी, याकरीता भोर संस्थानने विशेष लक्ष दिले होते. पहा चित्र क्र. ४.१८ व चित्र क्र. ४.१९ छायाचित्रामध्ये उत्तरेकडून दिसणारे व राजवाड्याचा जमिनीपासून ते छतापर्यंत उभा छेद घेतल्यावर राजवाड्याची रचना कशी दिसेल, हा दर्शविणारा नकाशा. या नकाशामध्ये मराठा शैलीतील केलेल्या लाकडाच्या कमानी व तिन्ही चौकांमध्ये दिसणारे लाकडाच्या कमानी व दरवाजे यांची स्थिती व राजवाड्यातील दालनांची रचना आपणांस दिसत आहे. वरील छोट्या चित्रामध्ये असलेल्या लाकडाचे कोरीव काम कठड्यांना करण्याकरीता केलेल्या नक्षीकामाचे चित्र दिसत आहे. भोर संस्थानातील राजवाड्याच्या पहिल्या चौकातील गोलाकार पायऱ्या असलेल्या व गोलाकार पायऱ्यांच्या खाली असलेले बंदीगृह व त्याच्या बाजूला असलेले दगडाचे उंच जोते व लाकडाचे स्तंभ यांची रचना व पहिल्या मजल्यावरील मराठा शैलीत असलेली व लाकडाच्या स्तंभांच्या कमानीची रचना आपणांस दिसत आहे. त्याचप्रमाणे लाकडाचा कठडा व त्यामध्ये आधाराकरीता वापरलेले लाकडाचे छोटे-छोटे स्तंभ (कोरीव काम केलेले) आपणांस दिसत आहेत. तळमजल्यापासून ते छतापर्यंतचे सर्व स्थापत्य त्या चौकातून आपणांस बघावयास मिळतात.

संस्थानाच्या राजवाड्यातील सर्व चौक, सभागृह व जिना व त्याचे सुनियोजन याचा अभ्यास करण्याकरीता पहा चित्र क. ४.२० व चित्र क्र. ४.२१ भोर संस्थानच्या राजवाड्याचा जमिनीपासून ते वरच्या मजल्यापर्यंतचा पूर्वेकडून पश्चिमेकडे असा संपूर्ण आडवा, उभा छेद घेऊन नकाशा काढला आहे. या नकाशामध्ये जीन्यांच्या रचनेबरोबर तीनही चौक, सभागृह, सदर इ. सहित एकंदर राजवाड्याची व्याप्ती व सौंदर्य दिसत आहे. भोर संस्थानच्या राजवाड्याचा जमिनीपासून ते वरच्या मजल्यापर्यंतचा दक्षिणेतून उत्तरेकडे असा संपूर्ण आडवा, उभा छेद घेऊन नकाशा काढला आहे. या चित्रामध्ये तीनही मजल्यांची रचना, जीन्यांची जागा, सभागृह मंडप, सिंहासनाची जागा व एकंदर राजवाड्याची व्याप्ती दिसत आहे.

संस्थानच्या राजवाड्याचा भक्कमपणा हा त्या काळच्या स्थापत्य विशारदांचा कौशल्याचा नमुना होता. पहा चित्र क्र. ४.२२ भोरच्या राजवाड्यातील सर्वांत शेवटच्या चौकातील जमिनीपासून छतापर्यंत घेतलेल्या छेदाचा नकाशा- या नकाशामध्ये आपल्याला भोर राजवाड्याच्या भक्कमपणाचा पुरावा येथे

बघण्यास मिळतो. राजवाड्यात राजवाड्याच्या संरक्षणासाठी असलेली घडविलेल्या ढगडांची भिंत व मागील ढरवाजा यांचे स्थापत्य आपणांस ढिसत आहे. त्याचप्रमाणे आकाशातून पडणारे पाणी छतांच्या कशा प्रकारच्या रचनेमुळे एकत्रित होत असे हे पहा चित्र क्र. ४.२३ भोर राजवाड्याचे जमिनीपासून १४.६ मीटरच्या स्तरावरून ढिसणारा छताचा नकाशा-यामध्ये आपल्याला संस्थानाच्या राजवाड्याची व्याप्ती व छतांची रचना व आकाशातून पडणारे पाणी कशा प्रकारे छताला उतार ढिल्याने बाहेर काढता येईल, हे ढर्शविणारा नकाशा. राजवाड्याचा अभ्यास करताना लाकडाचे ढरवाजे, खिडक्या व कमानी यामुळे वाड्याला जी शोभा आली आहे तर त्या खिडक्या किंवा ढरवाजे कशा पद्धतीत व मापात असाव्या याकरीता त्यातील बारकावे पाहण्यासाठी पहा चित्र क्र. ४.२४ या छायाचित्रामध्ये लाकडाचे स्तंभ, कमानी, हस्त छज्जा, ढोन स्तंभामध्ये लाकडात केलेली जाळी, ढरवाजे, भिंतीतील कोनाडे यांचे मापासहित काढलेले चित्र आहे. नवीन वाडा ज्यांना बांधायचा आहे, त्यांना हे मापानुसार केलेले प्रातिनिधीक चित्र/नकाशा उपयोगी पडणार आहे. कशा पद्धतीने स्तंभ, ढरवाजे, लाकडाची जाळी, हस्त उभे करावेत व त्यांचे कोरीव काम कशा पद्धतीने करावे हे या चित्रावरून स्पष्ट ढिसत आहे संदर्भ : वाय. जी. कालेकर यांनी हे चित्र काढले आहे.

राजवाड्याचे मुख्य प्रवेशद्धार हे अत्यंत शास्त्रीयदृष्ट्या बांधलेले आहे व इंजिनिअरिंगच्या दृष्टीने एक उत्कृष्ट नमुना म्हणून भोरच्या प्रवेशद्धाराची गणना केली जाते. पहा चित्र क्र. ४.२५ या छायाचित्रामध्ये भोरच्या राजवाड्याचे मुख्य प्रवेशद्धाराच्या ढरवाज्याचे मापानुसार बारकाईने काढलेले चित्र, लाकडाचे कठडे, लाकडाच्या स्तंभावरील केलेले कोरीव काम, लाकडाच्या खिडकीचे मापासहित चित्र त्याचप्रमाणे लाकडाचे ढरवाजे इत्यादींचे बारकाईने मापानुसार काढलेले प्रातिनिधीक चित्र आहे.

भोरच्या राजवाड्याचे स्थापत्य हे अनेक अंगांनी अभ्यास करण्यासारखे आहे. राजवाड्यातील प्रत्येक जागेचा वापर कशा पद्धतीने करावा यासाठी पहा चित्र क्र. ४.२६ बंढीगृह - मुख्य प्रवेशद्धारातून आत गेल्यावर पहिल्या चौकामध्ये असलेल्या उंच जोत्याचा खालचा भाग वाया जाऊ नये म्हणून त्याचा वापर अशा पध्ढतीने केला की, जिन्याखालील जागेमध्ये बंढीगृह निर्माण केले. मुख्य म्हणजे ढगडाच्या भिंती चारही बाजूंनी व पहिल्याच चौकात सरकारी कामकाजाची माणसे यांचा वावर असल्यामुळे बंढीगृहात ठेवलेला बंढी किंवा शिक्षा भोगणारा चोर यांना पळून जाण्यास मार्गच नाही. मराठा स्थापत्यामध्ये अशा स्वरूपाच्या अनेक गोष्टी जागेचा योग्य वापर करण्याच्या संढर्भात अभ्यासपूर्ण आहेत, असा निष्कर्ष निघतो. याच बंढीगृहाच्या बाजूला असलेल्या गोलाकार पायऱ्या त्या पायऱ्यांमधून पाणी नि:सारण करण्याची योजना आपल्याला स्थापत्य शास्त्रातल्या एका अप्रतीम

कौशल्याचा भाग दिसेल. पहा चित्र क्र. ४.२७ मुख्य प्रवेशद्धारापासून आत गेल्यावर पहिल्या चौकातून दुसऱ्या चौकात जाण्याचा मार्ग यामधील पायऱ्यांवर बारीक बारीक साधारणतः १ ते १ १/४ गोलाकार छिद्रे दिसत आहे तो पाणी जाण्याचा मार्ग आहे. दुसऱ्या चौकात साठलेले पाणी तिथेच साठू नये म्हणून पाणी काढून टाकण्याचा मार्ग पायऱ्यांमधून गेलेला दिसतो. कारण पहिल्या व दुसऱ्या चौकाच्या खोलीमध्ये कमी व जास्तपणा आहे. हा स्थापत्य शास्त्रातील पाणी बाहेर काढण्याचा उत्कृष्ट नमुना आहे.

भोर संस्थानमध्ये असलेल्या अत्यंत खाजगी स्वरूपाचा वापर असलेली जागा म्हणजे तुळसी वृंदावनाचा चौक पहा चित्र क्र. ४.२८ तुळशीवृंदावनाचा चौक-भोर राजघराण्यातील व्यक्ती या ठिकाणी घरगुती स्वरूपाचे धार्मिक कार्यक्रम करीत असत. संस्थानच्या राजाचा व परिवाराचा हा खाजगी वापराचा चौक असल्यामुळे या ठिकाणी राजघराण्यातील माता-भगिनींचा वावर असे व चौकात चालू असलेले मंगलकार्य पहिल्या व दुसऱ्या मजल्यावरून बघता येईल अशी वास्तुरचना आहे. चौकाच्या चारही बाजूने जमिनीच्या स्तरावर आकाशातून पडलेले पावसाचे पाणी वाहून जाईल, अशा स्वरूपाचे केलेले ढगडी गटार दिसत आहे. हा चौक वरपर्यंत उघडा असल्यामुळे उन्हाळ्यामध्ये या ठिकाणी मांडव घालण्याकरिता लोहाराकडून बनविलेल्या लोखंडी कड्या जोत्यावर भक्कमपणे बांधकाम करताना लावलेल्या दिसतात. या लोखंडी कड्यांचा वापर शेतीची अवजारे बांधण्याकरता होत असे. वरील स्थापत्य हे बहुतांशी सर्व ठिकाणी आढळणारे मराठा स्थापत्य आहे.

मराठा कालीन संस्थानांमध्ये राजवाड्यांच्या स्थापत्यामध्ये छज्जा जर मुख्य भिंतीच्या बाहेर जर वास्तुरचनेचा भाग आला असेल तर त्याला कशा प्रकारे शास्त्रशुद्ध आधार द्यावा व सौंदर्य पण दिसावे याकरीता लाकडांच्या तीरांचा वापर केलेला दिसतो. पहा चित्र क्र. ४.२९ 'तीर' वाड्याच्या स्थापत्यामध्ये मुख्य चौकाच्या चारी बाजूंनी छज्जा सदृष्य भाग किमान एक मीटर ते सव्वा मीटर पर्यंत बाहेर येत असेल तर अशा स्वरूपाचे आधार देण्यासाठी ४५ अंशामध्ये मुख्य भिंत व भिंतीपासून पुढे आलेला भाग यांना आधार देण्याकरता लावलेले लाकडाचे आधार म्हणजे 'तीर'. परंतु हे नुसते 'तीर' दिसू नयेत म्हणून उत्कृष्ट प्रकारची कारागिरी केलेले मोठ्या स्वरूपाचे जाडीवर कोरीवकाम केलेले 'तीर' हे सौंदर्यात भर टाकत आहेत व छज्जाला आधारपण देत आहेत. अशा स्वरूपाचे लाकडात कोरलेले 'तीर' सर्वच राजवाड्यात बघायला मिळतील.

एकोणीसाव्या शतकाच्या प्रारंभात संस्थानिकांच्या स्थापत्यामध्ये फक्त राजवाडे बांधणे असा समज न राहता त्यांनी समाज हिताकरीता सुद्धा अनेक लोककल्याणकारी स्थापत्यविषयक कामे करुन

एका प्रकारे स्थापत्यामधील स्थित्यंतरे दर्शविली, त्याचे उत्तम उदाहरण म्हणजे भोर भाटघर धरण पहा चित्र क्र. ४.३० प्रशासकीय कामाच्या स्थित्यंतरासंदर्भात भोरचे हे धरण महत्त्वाचा पुरावा आहे. छत्रपती शिवरायांच्या काळात बांधलेले छोटे, मोठे स्वरूपाचे बांध या छोट्या बांधापासून ते आतापर्यंतच्या पाणी अडविण्यासाठी झालेला बदल म्हणजेच भोर भाटघरचे हे धरण. या धरणामुळे भोर संस्थानमध्ये विसाव्या शतकाच्या सुरवातीला झालेला बदल, प्रशासकीय व स्थापत्यामध्ये झालेला बदल म्हणजेच स्थित्यंतराच्या काळातील हे उदाहरण म्हणजेच हे धरण. वरील चित्रात त्याची भव्यता व सौंदर्य दिसत आहे.

भोर संस्थानच्या राजवाड्यात दगडाच्या खांबावर केलेले कोरीव काम पहा चित्र क्र. ४.३२. खांबाच्या तळखड्यावरील नक्षीकाम अत्यंत सुबक व नाजूक पद्धतीने केलेले दिसत आहे. स्थापत्यशास्त्रानुसार या खांबावरील नक्षी फार महत्त्वाची आहे. कारण कुठलीही नक्षी गोलाकार करताना बिघडलेली दिसत नाही. नक्षीकाम करण्याच्या अगोदर दगडी खांबावर अचूक आखणी करून घ्यावी लागते व नंतरच कोरीव काम करता येत असे. या खांबाला गेलेला तडा हा लोहाराकडून बनवून घेतलेला, पोलादी पट्टीने जुळवून घेतलेला दिसतो. या जाड पोलादी पट्टीची रिंग बरोबर त्याच गोलाईनुसार खांबाभोवती फिरविलेली दिसते. याचा अर्थ वास्तुकलेचे संरक्षण व्हावे व त्याचा भक्कमपणा कायम रहावा अशा रचनेनुसार काम केलेले दिसत आहे. भोर संस्थानच्या राजवाड्यात एकंदरच कारागिरांच्या कलाकुसरीचे संरक्षण केलेले दिसत आहे.

४.१७ सारांश :- या प्रकरणामध्ये भोर संस्थानची भौगोलिक स्थिती, त्याचा इतिहास व संस्थानचे निर्माते शंकराजी नारायण यांचे कर्तृत्व व त्यांची सचिव म्हणून छत्रपती राजारामांच्या दरबारात केलेली कामगिरी, छत्रपती संभाजी महाराजांच्या बलिदानानंतर मराठा स्वराज्य संकटात असताना त्यांनी केलेल्या कामगिरीचा इतिहास व पुढे त्यांच्या वंशजांनी स्वराज्याकरीता दिलेले योगदान याचा आढावा घेतला आहे. भोर संस्थानची प्रशासकीय कार्ययंत्रणा व त्यामध्ये झालेली स्थित्यंतरे म्हणजेच राज्यकारभार बघताना परंपरागत असलेल्या कार्ययंत्रणेमध्ये बदल करून नवीन लावलेली व्यवस्था म्हणजेच स्थित्यंतरे याचा आढावा घेण्यात आलेला आहे. भोर संस्थानच्या कालखंडामध्ये शिवशाहीनंतर पेशवाई व त्यानंतर आलेले इंग्रज या सर्वांच्याबरोबर संस्थानिकांचे विविध स्तरावर संबंध होते. त्यामुळे प्रशासकीय यंत्रणेमध्ये स्थित्यंतरे झाली. तसेच सांस्कृतिक जीवनामध्ये पण स्थित्यंतरे झाली. याच कालखंडामध्ये भोर संस्थानचा नवीन राजवाडा उभा राहिला. त्या राजवाड्याच्या स्थापत्यासंदर्भात या प्रकरणात थोडक्यात आढावा घेण्यात आलेला आहे.

४.१६ उपसंहार :- मराठ्यांच्या स्वराज्याच्या प्रशासकीय कार्यामध्ये शंकराजी नारायण या अत्यंत हुषार, कर्तबगार लढवय्याने स्वकर्तृत्त्वावर सचिवपद मिळवले. भोसले घराण्याशी प्रामाणिक राहून त्यांच्या कारकीर्दीत होऊन गेलेल्या सर्व छत्रपतींचा शंकराजी नारायण यांच्यावर विश्वास होता, असे अत्यंत निष्ठावान, मुत्सद्दी व लढवय्ये शंकराजी नारायण यांनी भोर संस्थानची निर्मिती केली.

भोर संस्थानाने मराठा स्वराज्याच्या सर्व प्रशासकीय परंपरा पाळून नवीन आंग्ल पद्धतीच्या आवश्यक तेवढ्या सुधारणा करून परंपरा व आधुनिकता यांचा मेळ घातला. त्यांनी नंतरच्या काळात शिक्षणाला प्राधान्य ढिले. स्थापत्यामध्ये काही सुधारणा करून धरणे, बंधारे, शाळा, ढरवाजे व स्वतःचे राजवाडे यांच्याकडे लक्ष ढेऊन नाविन्य आणले. त्यामुळे खऱ्या अर्थाने प्रशासकीय स्थित्यंतर व स्थापत्यविषयक स्थित्यंतर झालेले ढिसते.

मराठा स्वराज्यात असलेल्या अष्टप्रधान मंडळापासून ते ग्राम सत्तेपर्यंत व त्यानंतर अगढी शिक्षधाधिकारी, वैद्यकीय अधिकारी, फॉरेस्ट अधिकारी, खरेढी-विक्री अधिकारी आणि सार्वजनिक बांधकाम विभाग इ. अनेक लोककल्याणकारी योजना राबविण्यासाठी प्रमुख व्यक्ती नेमल्या. स्वतःच्या राज्याची नवीन राज्यघटना तयार करुन नवीन प्रशासकीय स्थित्यंतर केले.

विकास व सुधारणा यांचा पाठपुरावा केल्यामुळे व औद्योगिक धोरणामुळे सर्वसामान्य सांस्कृतिक जीवनातही मूळ परंपरा न मोडता हळूवारपणे बढल घडवून आणले. त्यामुळे भोर संस्थान हे प्रशासकीय, सांस्कृतिक व स्थापत्य यांच्या स्थित्यंतराचे एक चांगले उढाहरण आहे.


४.१७ भोर संस्थानामधील स्थापत्य व स्थापत्यामधील झालेली स्थित्यंतर याचे नकाशे व छायाचित्रे

चित्र क्रमांक : ४.७




भोर संस्थानाने चालू केलेली पहिली मुलींची शाळेची ढगडी इमारत

चित्र क्रमांक : ४.६




भोर संस्थानाचे राजचिन्ह (श्रीमंत रघुनाथराव पंतसचिव मोनोग्राम)

चित्र क्रमांकः ४.७



भोर संस्थान: रामनवमीचा उत्सव

चित्र क्रमांक : ४.८



भोर येथील राजवाडा

चित्र क्रमांकः ४.९




श्रीमंत सौ. गंगूबाई साहेब पंतसचिव वाचनालयाची इमारत (ग्रंथालय)

चित्र क्रमांकः ४.१०



राजवाड्याच्या वास्तुरचनेत झालेला बढल

चित्र क्रमांक : ४.११



राजवाड्याचा मुख्य दरवाजा – प्रवेशद्धार

चित्र क्रमांक : ४.१२




ढिंडी दरवाजा

चित्र क्रमांकः ४.१३




तळखडा एक संशोधन

चित्र क्रमांकः ४.१४




भोर संस्थानच्या राजवाड्याचा जमिनीपासून २.३ मीटरच्या पातळीवर छेद घेऊन काढलेला तळमजल्याचा नकाशा

चित्र क्रमांकः ४.१५




भोर संस्थानच्या राजवाड्याचा जमिनीपासून ५.६ मीटरच्या पातळीवर छेद घेऊन काढलेला नकाशा

चित्र क्रमांकः ४.१६




भोर संस्थानच्या राजवाड्याचा दुसऱ्या मजल्याचा व छताचा नकाशा जमिनीपासून ८.६ मीटरवर छेद घेऊन काढलेला नकाशा

चित्र क्रमांकः ४.१७




भोर संस्थानच्या राजवाड्याच्या तिसऱ्या मजल्याचा व छताचा नकाशा जमिनीपासून ११.६ मीटरच्या पातळीवर छेद घेऊन काढलेला नकाशा

चित्र क्रमांकः ४.१८



भोर राजवाड्याचा उत्तरेकडून दिसणारे व राजवाड्याचाजमिनीपासून ते छतापर्यंत उभा छेद घेतल्यावर राजवाड्याची रचना दर्शविणारा नकाशा.

चित्र क्रमांकः ४.११



भोर संस्थानातील राजवाड्याच्या पहिल्या चौकातील गोलाकार पायऱ्या असलेल्या चौकाचा नकाशा

चित्र क्रमांकः ४.२०



भोर संस्थानच्या राजवाड्याचा जमिनीपासून ते वरच्या मजल्यापर्यंतचा पूर्वेकडून पश्चिमेकडे असा संपूर्ण आडवा, उभा छेद घेऊन काढलेला नकाशा

चित्र क्रमांकः ४.२१




भोर संस्थानच्या राजवाड्याचा जमिनीपासून ते वरच्या मजल्यापर्यंतचा दक्षिणेतून उत्तरेकडे असा संपूर्ण आडवा, उभा छेद देऊन नकाशा काढला आहे.

चित्र क्रमांकः ४.२२




भोरच्या राजवाड्यातील सर्वांत शेवटच्या चौकातील जमिनीपासून छतापर्यंत घेतलेल्या छेढाचा नकाशा

चित्र क्रमांकः ४.२३




भोर राजवाड्याचे जमिनीपासून १४.६ मीटरच्या स्तरावरून दिसणारा छताचा नकाशा

चित्र क्रमांकः ४.२४



भोर संस्थानच्या राजवाड्यामध्ये लाकडाचे स्तंभ, कमानी, हस्त छज्जा, दोन स्तंभामध्ये लाकडात केलेली जाळी, दरवाजे, भिंतीतील कोनाडे यांचे मापासहित काढलेले चित्र

चित्र क्रमांकः ४.२५



भोरच्या राजवाड्याचे मुख्य प्रवेशद्धाराच्या दरवाज्याचे मापानुसार बारकाईने काढलेले चित्र,

चित्र क्रमांकः ४.२६



भोरच्या राजवाड्यातील बंदीगृह

चित्र क्रमांकः ४.२७




मुख्य प्रवेशद्धारापासून आत गेल्यावर पहिल्या चौकातून दुसऱ्या चौकात जाण्याचा मार्ग

चित्र क्रमांकः ४.२८



भोर राजवाड्यातील तुळशीवृंदावनाचा चौक

चित्र क्रमांकः ४.२१



भोर राजवाड्यातील तीर- वाड्याच्या स्थापत्यामध्ये मुख्य चौकाच्या चारी बाजूंनी छज्जा सदृष्य भाग

चित्र क्रमांकः ४.३०



भोर भाटघर पाण्याचे धरण

चित्र क्रमांकः ४.३१



भोर राजवाडा – गणेशपट्टी

चित्र क्रमांकः ४.३२



ढगडाच्या खांबावर काढलेले कोरीव नक्षीकाम

प्रकरण : ५

औंध संस्थान

प्रकरणाचा तपशिल

क्रमांक	तपशिल	पृष्ठ क्रमांक
प्रकरण ७ :	**औंधसंस्थान**	**१८७**
७.१	औंध संस्थान	१८८
७.२	पंतप्रतिनिधी घराण्याचा इतिहास व औंध संस्थान	१८८
७.३	परशुराम प्रतिनिधी (समशेर बहादूर जंग)	१९०
७.४	प्रतिनिधी (नवीनपढ)	१९७
७.७	पंतप्रनिधीनी यांना ढिलेला भौगोलिक प्रांत	१९६
७.६	सनढ	१९८
७.७	पंतप्रतिनिधी घराण्याची वंशावळ (औंध)	१९९
७.८	औंधचेराजे भवानराव उर्फ बाळासाहेब पंत	२००
७.९	औध संस्थानच्या राज्यघटनेसंबंधीचा सन १९३९ चा कायदा १ ला	२०९
७.१०	औंध संस्थानचे राज्यघटनेच्या कायद्यात ढुरूस्ती करणेबाबतचा कायदा सन १९४० चा (३ रा)	२०९
७.११	औंध संस्थानच्या राज्यघटनेसंबंधीच्या सन १९३९ च्या पहिल्या कायद्याच्या ढुरूस्तीचा कायदा सन १९४४ चा (पहिला)	२११
७.११.१	लहान सरनामा	२११
७.११.२	सुरूवात व व्याप्ती	२११
७.१२	औंध संस्थानच्या सन १९३९ च्या पहिल्या कायद्याचेकलम (आ) ची ढुरूस्ती	२११
७.१२.१	ढुरूस्तीपूर्वीच्या नेमणूका ढुरूस्तीनुसार असल्याचे ठरवून त्यांची मुदत निश्चित करणे	२१२
७.१३	संस्थानातील काही कायदे सुसंगत करण्याबाबतचा कायदा सन १९४७ चा (बारावा)	२१२
७.१३.१	सरनामा	२१२
७.१३.२	व्याप्ती	२१२

७.१३.३	सुरूवात	२१२
७.१४	औंध संस्थानचा राज्यघटनेचा कायदा सन १९३९ चा पहिला दुरूस्त करणेसंबंधीचा कायदा १९४७ चा (आठवा)	२१३
७.१४.१	सरनामा	२१३
७.१४.२	सुरूवात व व्याप्ती	२१३
७.१४.३	कलम	२१३
७.१५	औंध संस्थानचे भवानराव ऊर्फ बाळासाहेब पंतप्रतिनिधी यांनी सांस्कृतिक स्थित्यंतराच्या काळात केलेले योगदान	२१५
७.१६	महाराष्ट्रातील मराठाकालीन संस्थानातील राजवाड्यांच्या अंतर्गत लाकडाच्या व दगडाच्या जोडकामाच्या संदर्भात माहिती	२१६
७.१७	औंध संस्थानामधील स्थापत्य व स्थापत्यामधील झालेली स्थित्यंतर याचे चित्र क्रमांकासहित संशोधनात्मक निरीक्षण	२२१
७.१८	सारांश	२२४
७.१९	उपसंहार	२२४
७.२०	औंध संस्थानामधील स्थापत्य व स्थापत्यामधील झालेली स्थित्यंतर याचे नकाशे व छायाचित्रे	२२६-२३२

प्रकरण : ५

औंध संस्थान

५.१ औंध संस्थान

हे संस्थान सातारा जिल्ह्यात आहे. श्रीमंत राजा परशुराम त्रिंबक कुलकर्णी किन्हईकर हे या घरण्याचे मूळ पुरुष असून राजे छत्रपती राजाराम महाराज यांचे कारकिर्दीत ते उदयास आले व त्यांचे कारकिर्दीत त्यांना प्रतिनिधी पदवी मिळाली.

औंध हे क्षेत्र १७^{0} - ३२' २५' उत्तर ७४^{0} पूर्व अक्षांश रेखांक्ष आहे.

औंधचे क्षेत्रफळ :- ५०१ चौरस मैल(भागवत अ. ना. व आठले कृ. ना., १९१५ : २)

राजकीय विभाग :- औंध, किन्हई, संगममाहुली, कुंडल, आटपाडी व गुणदाळ असे सहा होते. या सहा विभागात मिळून ७२ गावे व ४४ वाड्या होत्या.

लोकसंख्या ६९०००

नद्या :- कृष्णा, मांड, डोण व वांजना, वेरळा

पिके :- गहू, हरभरा, बाजरी, ऊस, भुईमूग, मटकी, तीळ.

वसूल :- ठाणे औंध - अंदाजे महसूल - ६३००/- रुपये

ठाणे किन्हई - अंदाजे महसूल - ५०००/- रुपये

ठाणे संगममाहली - अंदाजे महसूल - ३००/- रुपये

ठाणे कुंडल - अंदाजे महसूल - ७००००/- रुपये

ठाणे गुणदाळ - अंदाजे महसूल - ४००००/- रुपये

ठाणे आटपाडी - अंदाजे महसूल - ८२०००/- रुपये

वरीलप्रमाणे त्याकाळी रुपये२,०३,६००/- एवढा महसूल इनामदारांचा वसूल जमा जात होता.

यावरुन प्रतिनिधींच्या संस्थानाची आर्थिक स्थिती लक्षात येते. त्यांची प्रत्येक गावाशीसंपर्क यंत्रणा व प्रशासकीय कार्यपद्धती लक्षात येते.

वरील वसूलीची माहिती इ.स. १८९५-९६ ची आहे.

५.२ पंतप्रतिनिधी घराण्याचा इतिहास व औंध संस्थान

शिंदखेडकरचे लखुजी जाधव यांच्याकडे मालोजींनी नोकरी पत्करली होती. लखुजी जाधव हे शिवाजी महाराजांचे आजोबा होते. मालोजी भोसल्यांना शहाजी व शरिफजी असे पुत्र झाले. वरील शिंदखेडकरच्या जाधवांची जिजाबाई शहाजींना दिली व त्यांचे पोटी शके १५४९ वैशाख शुद्धद्वितीया

सोमवार रोहिणी नक्षत्रावर मराठी राजाचा संस्थापक शिवनेरीवर जन्म झाला (भागवत अ. ना. व आठले कृ. ना., १९१७ : ७३). तो शिवाजी महाराजांचा याच महाराजांनी स्वराज्य निर्माण केले व आपण स्वतंत्र राजे आहोत यासाठी राज्यभिषेक करविला. ज्येष्ठ शुद्धत्रयोदशी शके १७१६ रोजी शिवाजी महाराज हे राजे शिवछत्रपती झाले. शके १७४१ ते १७१६ या ४७ वर्षाच्या कालखंडात बालपणाचा काळ वगळता ३५ वर्षांत त्यांनी जवळ-जवळ ३०० किल्ले व त्यांनी आरमाराचेप्रचंड सामर्थ्य निर्माण केले व जवळजवळ २०० नौकांवर नौदल निर्माण केले व राजाला सुस्थिती प्राप्त झाली. चैत्र शुद्ध पौर्णिमा शके १६०२ मध्ये शनिवारी रायगडी महाराजांचे महानिर्वाण झाले. त्यांचे शिवपुत्र संभाजी महाराजांनी युक्तीने व स्वसामर्थ्याने ९ वर्षे १६१० पर्यंत राज्य केले. फाल्गुन वद्य ३० अमावास्येला त्यांचे सहकारी कवि कलश व इतर यांना औरंगजेबाने मराठ्यांच्या फितुर गणोजी शिर्के या सरदारामुळे कैद केले व अतोनात हालआपेष्टा सहन करीत म्हणजे रत्नागिरी जवळील संगमेश्वर येथील कसबा पेठेतील सरदेसाईंच्या वाड्यापासून पुणे जिल्ह्यातील वढू बु. येथे आणण्यास त्यांना ३१ दिवस लागले. विविध क्रूर शारीरिक त्रास देऊन त्यांचे तुकडे-तुकडे करून मारले व वढू येथे महाराजांच्या शरीराचे तुकडे एकत्र करून त्यांच्यावर मराठ्यांनी अंत्यसंस्कार केले म्हणून त्या अमावास्येला लोक मृत्युंजय अमावास्या म्हणतात. इकडे औरंगजेबास असे वाटले की, मराठे आता गर्भगळीत होऊन शस्त्र खाली टाकतील पण तसे झाले नाही. छत्रपती संभाजी महाराजांच्या बलिदानामुळे मराठे सर्व परत एकत्र झाले. नंतर संभाजी महाराजानंतर छत्रपती शिवाजीराजे (दुसरे) छत्रपती राजाराम यांचा पुत्र यांनी अष्टप्रधान मंडळांना राजा बनविले. त्यामध्ये प्रल्हाद निराजी, धनजी जाधव, संताजी घोरपडे, रामचंद्रपंत बावडेकर, जनार्दनपंत हणमंते, खंडोबल्लाळ फडणीस, निंबाळकर व परशुराम त्रिंबक यांनी एकत्र येऊन विचार केला.

छत्रपतींना सुरक्षित ठिकाणी (पन्हाळा येथे) हलवावे व औरंगजेबास समाचार द्यावा व जेरीस आणून त्यांना येथून निघून जाण्यास भाग पाडावे. इकडे औरंगजेबाने रायगडास वेढा दिला. रायगड ही राजधानी असल्याने प्रचंड समृद्ध असा गड असल्याने अभेद्य होता. परंतु सूर्याजी पिसाळ नामक सरदाराने विश्वासघात करून (वाईची देशमुखी औरंगजेबाकडून पदरात पाडण्यासाठी) रायगड मुसलमानाच्या ताब्यात गेला. इ. स. १६८१ मध्ये रायगड व पन्हाळा सुध्दा औरंगजेबाने घेतला (भागवत अ. ना. व आठले कृ. ना., १९१७ : १०४).

त्यामुळे संभाजी महाराजांची पत्नी महाराणी येसूबाई व शाहू यांना कैद करून औरंगजेबाच्या पुढे दिल्लीस रवानगी केली. पन्हाळगडी ही बातमी छत्रपती राजाराम महाराज यांना कळाली. महाराष्ट्र व कर्नाटक राज्यामध्ये बंदोबस्त होईपर्यंत औरंगजेबास अडवून ठेवावे. रामचंद्रपंत अमात्य व त्यांचे

सहकारी म्हणून परशुराम त्रिंबक यांस सरदाराची वस्त्रे देऊन बंदोबस्तासाठी नेमले. राजाराम महाराज यांनी स्वतः गडांवर जावून पुन्हा राज्याची घडी बसविण्यास सुरुवात केली. स्वतः सिंहासनावर न बसता गादीवर बसून राज्य करण्याचे कारण राज्याचा खरा धनी संभाजी पुत्र शाहू आहे असे ते स्वतः मानीत असत.

पूर्वीचे सर्व अष्टप्रधान मंडळ आपआपल्या पदावर रुजू झाले. प्रल्हादजी निराजी यांना कुठले पद द्यावे असा प्रश्न निर्माण झाला. छत्रपती शिवाजी महाराजांचे न्यायाधीश निराजी रावजी यांचे प्रल्हादजी हे चिरंजीव. परंतु महाराज एकदा संकटात आले असता चंदी मुक्कामी छत्रपती राजाराम महाराजांना हा हिरा गवसला. त्यांनी मोठे कौशल्य व पराक्रम करून राजास व राज्यास वाचविले म्हणून छत्रपती राजारामांनी प्रल्हादजी यांची शके १६१४ किंवा इ.स. १६९२ ला प्रल्हादजींना प्रतिनिधी पद दिले (पारसनिस द. ब., १९१५ : ८).

आपलीच प्रतिमा म्हणजे प्रतिनिधी. या प्रतिनिधींचा अधिकार म्हणजे सर्व अष्टप्रधानांचे कार्य कसे चालले आहे ते पाहणे. राजपत्रावर मुख्य प्रधानाचे उजव्या बाजूस प्रतिनिधींचे शिक्के असत. त्यांना १५,००० होन सालाला मिळत असे. प्रतिनिधींना वस्त्रे स्वतः छत्रपती देत असत व इतर सर्व प्रधानांना प्रतिनिधी वस्त्रे देत असत. प्रल्हादजी निराजी प्रतिनिधी झाल्यावर त्यांचा एक शिक्का छत्रपतींच्या सांगण्यावरून घेतला तो असा :

''श्री. लक्ष्मीनृरहरी प्रातै मुद्रा निराजी जन्मनः । राजाराम प्रतिनिधै : प्रल्हादस्यः विराजते ॥''

५.३ परशुराम प्रतिनिधी (समशेर बहादूर जंग)

परशुरामपंतांचे पूर्ण नाव यमाजी कुलकर्णी. हे सातारा जिल्ह्यातील वर्धनगडाखालील किन्हई गावचे होते. औंधच्या यमाई देवीचे निस्सीम भक्त असणाऱ्या त्र्यंबकराव आणि लक्ष्मीबाई यांच्या पोटी परशुराम यांचा जन्म झाला. (इ. स. १६६०) रामचंद्रपंत (अमात्य) यांच्या पदरी मुतालिक म्हणून ते काम पाहत. राजाराम महाराजांनी जिंजीस जातेवेळी (इ. स. १६८९) त्यांना अमात्यांच्या पदरी सरदारी देऊन गेले. जिंजीस जाताना महाराजांनी परशुरामपंत यांना समशेर बहादूर जंग, सुभालष्कर ही पदवी दिली.

छत्रपती राजाराम महाराज जिंजीस जाताना पावनगड व पन्हाळा हे दोन किल्ले औरंगजेबाने जिंकले असता (इ. स. १६८९) परशुरामपंत यांनी २ वर्षे झुंज देऊन मोगलांकडून जून इ.स. १६९२ मध्ये पन्हाळा किल्ला परत स्वराज्यात आणला. कारण छत्रपती संभाजी महाराजांच्या बलिदानाचे शल्य त्यांच्या हृदयात सलत होते. त्यांनी औरंगजेबाच्या पाठोपाठ मिरजेपासून ते रांजण्यापर्यंतचा सर्व परिसर

परत जिंकला व स्वराज्यात दाखल केला व महत्त्वाची मोठी कामगिरी बजावली.(मक्कदुम दा., २०१४ : १९१).

छत्रपती राजाराम महाराज महाराष्ट्रात परत आल्यावर त्यांनी त्यांच्या कामगिरीची दखल घेऊन त्यांना प्रतिनिधी पदाची वस्त्रे दिली. सन १६९१ प्रतिनिधी म्हणजे राजाची प्रतिमा असा व्यापक अर्थ आहे. प्रतिनिधी पदांची वस्त्रे व सन्मान पुढीलप्रमाणे होते.

भरगच्च मंदील, चादर, पटका, किनखाप्याचे ठाण, शरपंचा, कंठी, चौकडा, तुरा, जिगा, शिक्केकटार, चौघडा, तीन हत्ती, सोन्याच्या दांडीची चवरी, ढाल तलवार, घोडा, सोन्याच्या काडीचा भालदार.

छत्रपती राजारामांच्यानंतर परशुरामपंत प्रतिनिधी ताराबाईंचे म्हणजे करवीर संस्थानचे गादीचे मुख्य आधारस्तंभ झाले. छत्रपती शाहूंच्या सुटकेनंतर महाराणी ताराबाई व छत्रपती शाहू यांच्यात वारसा हक्कासाठी वाद निर्माण झाले. अशावेळी बहुतेक खास मंडळी ताराबाईंना सोडून छत्रपती शाहू महाराजांच्याकडे सामील झाले. परशुरामपंत प्रतिनिधी मात्र ताराबाईंच्याकडे एकनिष्ठ राहिले. ऑक्टोबर व नोव्हेंबर १७०७ साली पुण्यापासून २२ किलोमीटर अंतरावर खेडजवळ भीमा नदीच्या काठावर शाहूंच्या फौजा जमा झाल्या. तर कडूस नजीक महाराणी ताराबाईंच्या फौजा जमल्या.महाराणी ताराबाईंबरोबर परशुरामपंत प्रतिनिधी, धनाजीराव जाधव, खंडेराव दाभाडे इत्यादी मातब्बर मंडळी होती. यामध्ये धनाजीराव जाधव लढलेच नाहीत. खंडेराव दाभाडे व परशुरामपंत यांना शाहूंनी कैद केले व कालांतरांनी त्यांची मुक्तता केली.

छत्रपती शाहूंना परशुरामपंतांची योग्यता कळून आली व त्यांना परत राजाचे प्रतिनिधी पद दिले.ते पद नंतर वंशपरंपरागत त्यांच्याकडे चालू होते. ते कसे यासंदर्भात पुढील माहिती उपलब्ध झाली.

प्रतिनिधी म्हणजे राजाची प्रतिमा-सिंहासनाधिश्वर राजाच्या / महाराजांच्या ऐवजी कोणत्याही कागदपत्रांवर शिक्कामोर्तब करण्याचा अधिकार तसेच हुकूम करण्याचे अधिकार, सर्व बाजूंनी विचार करून कार्य करण्याचे सरळ अधिकार त्याला प्राप्त आहेत तो प्रतिनिधी.(मेहेंदळे वा. प., १९१७ : ३) त्यांना औंध येथील अधिकार प्राप्त होता. त्यांचे शिक्कामोर्तब म्हणजे राजमुद्राच समजण्यास हरकत नाही.

यावरून छत्रपती राजारामांनी प्रतिनिधी हे पद निर्माण केले हे स्पष्ट होते. प्रतिनिधी या पदासंदर्भात एक वृत्तांत उपलब्ध आहे तो असा : शिवछत्रपती कर्नाटक स्वारीवर गेले असता राजे

व्यंकोजी व छत्रपती शिवाजी महाराज यांचे तेथे भेटीअंती मतभेद निर्माण झाले. ते मतभेद मिटविण्यासाठी तीन वेळेस परत परत भेटी झाल्या, परंतु पेचप्रसंग सुटला नाही व छत्रपती शिवाजी महाराजांनी नाराज होऊन आज्ञा केली की, रघुनाथ हणमंते व प्रल्हाद निराजी यांनी राजे व्यंकोजी यांना पकडून आणावे. जर महाराजांच्या आज्ञेनुसार पकडून आणले तर शिवछत्रपतींच्या कीर्तीला कलंक लागेल. म्हणून उभयतांनी एक रचना तयार केली, ती अशी प्रल्हादपंत व्यंकोजीसारखा पोषाख घालून मेण्यात घालून महाराजांच्या लष्करात नेले. तेथे राजे व्यंकोजी म्हणून एक दिवस मुक्काम केला. दुसरे दिवशी महाराजांच्यासमोर त्यांना येण्यास सांगितले. तेव्हा मेण्यात व्यंकोजीच्या पोषाखामध्ये प्रल्हादजी मेण्यातून उतरून महाराजांच्या समोर हजर झाले. पण महाराजांना याची काहीच कल्पना नव्हती. जर या नाटकाची गोष्ट महाराजांना समजली असती तर काय झाले असते? परंतु हेतू स्पष्ट असल्याने प्रल्हादजी धारिष्ट्य करून महाराजांच्या समोर उभे राहिले व व्यंकोजीच्या पोषाखात प्रल्हादजी उभे आहेत हे जेव्हा महाराजांना कळाले तेव्हा लागलीच हणमंते हात जोडून महाराजांसमोर आले. व म्हणाले, "व्यंकोजी राजे येण्यास लाचार आहेत. त्यांचे प्रतिनिधी म्हणून प्रल्हादजी आपल्यापुढे हजर आहेत." महाराज म्हणाले,"म्हणजे व्यंकोजीला कैद केलेच नाही का?" तेव्हा हणमंते हात जोडून म्हणाले,"आपल्या बंधुप्रेमास अपकीर्तीचा कलंक लागू नये म्हणून ही कैद सरकारजवळ हजर केली आहे." यावर महाराजांना आनंद झाला व महाराज म्हणाले, "प्रल्हादजी, आपण व्यंकोजीचे प्रतिनिधी नसून आजपासून आमचे प्रतिनिधी म्हणवून घेण्यास पात्र आहात. तेव्हापासून प्रल्हादजी प्रतिनिधी झाले असे म्हणतात, परंतु शिक्का वगैरे अधिकार काही पुरावा नसल्याने त्याला सत्य मानता येणे कठीण आहे. छत्रपती राजाराम यांच्या काळामध्ये प्रतिनिधी हे पद निर्माण झाले, असे पुराव्यानिशी लक्षात येते."

मागे सांगितल्याप्रमाणे सातारा प्रांती वर्धनगडाजवळ किन्हई म्हणून गाव आहे. त्याठिकाणी कुलकर्णी वृत्तीवर उदरनिर्वाह करणारा यजुर्वेदी ब्राह्मण राहत असे. त्याला दोन पुत्र होते. एक नागोपंत, दुसरा कृष्णाजीपंत. कृष्णाजीस दोन मुले एक अप्पाजी व दुसरे त्रिंबक. कृष्णाजीपंत यांचे यमाईदेवी औंध येथील डोंगरावर असलेली. एक फार पुरातन मूळपीठ आहे. त्रिंबकपंतही त्यांच्या वडिलांप्रमाणे देवी भक्त होते. देवीचे दर्शन घेतल्याशिवाय अन्न ग्रहण करीत नसत असे बारा वर्षे तप केल्यानंतर त्यांचीपत्नी लक्ष्मीबाई यांच्या पोटी मार्गशीर्ष वद्य प्रतिपदा १५८८ (इ.स.१६६०) रोजी परशुरामपंत यांचा जन्म झाला. नुसत्या कुलकर्णी वृत्तीवर उदरनिर्वाह होत नव्हता हे लक्षात आल्यावर किन्हई हे गाव सोडून विशालगडावर असलेल्या अमात्य निळा सोनदेव यांच्याकडे कारकुनीची नोकरी मिळाली.

निळोपंतांचे चिरंजीव रामचंद्रपंत यांचेही वय परशुरामपंतांच्या वयाचेच असल्याने उभयताची मैत्री झाली. शिवाय रामचंद्रपंत हे मोरोपंत पिंगळे (पेशवे) यांचे जावई होते.

परशुरामपंत यांना साताारा प्रांताची माहिती असल्याने रामचंद्रपंत अमात्य यांना ते राज्यकारभारात मदत करीत (भागवत अ. ना. व आठले कृ. ना., १९१७ : १३७) . कुलकर्णींनी तलवार गाजविली व मर्दुमकी केली. म्हणूनच रामचंद्रपंत अमात्यांबरोबर छत्रपती राजाराम महाराजांनी कर्नाटकप्रांती रामचंद्रपंत यांचे हाताखाली सरदारकीची वस्त्रे दिली. महाराष्ट्राच्या संरक्षणासाठी इ.स. १६९२ मध्ये छत्रपती राजाराम महाराजांनी चंदीचे मुक्कामी राज्यव्यवस्था चालू करून अष्टप्रधान कायम केले व त्यावेळी परशुरामपंतांना त्यांनी केलेल्या कामाबद्दल व दाखविलेल्या शौर्याबद्दल त्यांना जमशेद बहादर शहाजंग ही पदवी दिली. महाराष्ट्रातील मोगल सैन्याला मोडून काढण्यासाठी छत्रपती राजाराम महाराजांनी एक नवीन योजना केली. त्यांनी रामचंद्रपंत अमात्य, शंकरजी नारायण, परशुराम त्रिंबक यांची विशेष नेमणूक केली. त्या तिघांनी ऊन, वारा, पाऊस, थंडी यांना न जुमानता वेळप्रसंगी चटणी, भाजी, कांदा खाऊन औरंगजेबास नामोहरम करून सोडले. मराठ्यांच्या या पराक्रमाचे वर्णन करताना बखरदार म्हणतात की, औरंगजेब असा म्हणत असे की, " मराठे हे आदमी नव्हेत ते भूतखान आहेत". औरंगजेबाने किल्ले घ्यायचे व मराठ्यांनी ते परत मिळवायचे म्हणजे पुढचे पाठ मागचे सपाट अशी स्थिती औरंगजेबाची झाली. वाई व मिरज भागातील मोगलास सेनापती संताजी घोरपडे यांनी असे जेरीस आणले की, मुसलमानांना पाण्यामध्ये सुद्धा त्यांचे प्रतिबिंब दिसत असे. एकदा असे घडले, मोगलांनी पन्हाळगडाकडे आपली फौज पाठवून पन्हाळा घेतला ही बातमी रामचंद्रपंतांना कळल्यावर त्यांनी १०,०००फौज घेऊन पन्हाळगडावर परशुरामपंतांसह आगेकूच केली. खूप दिवस प्रयत्न करून किल्ला हाती येत नव्हता, तेव्हा परशुरामपंतांनी उत्तरेच्या बाजूस अवघड कड्यांवर शिड्या लावून ३०० मराठे आत घुसविले व कापाकापीला सुरुवात केली. पवार व भोसले हे दोन सरदार किल्ल्याच्या तटावर परशुरामपंतांच्या बरोबरीने लढत होते. परशुरामपंतांनी सर्जेखान याचा शिरच्छेद केला. त्याचा परिणाम इतका भयानक झाला की, मोगल वाट दिसेल तेथे पळत सुटले व हाहाकार झाला, पन्हाळा गड परशुरामपंतांनी सर केला.

परशुरामपंत प्रतिनिधी यांनी मायणी येथे इ. स. १६९४ मध्ये मोगलांना हुलकावणी देत असताना तुंग या गावाजवळ त्यांच्याबरोबर असलेले सरदारांपैकी बाबाजी डफळे व शिवाजी डफळे हे दोघे ब्रह्मनाळ येथे पोहचले. त्याठिकाणी श्री रामदास स्वामी परंपरेतील रघुनाथ स्वामी यांची समाधी त्या ब्रह्मनाळ मध्ये होती. त्याठिकाणी आनंद मूर्ती स्वामी हे त्या समाधीचे व्यवस्था बघत होते. डफळे बंधू

रघुनाथ स्वामींचे शिष्य असल्याने ते समाधीस्थानी थोडा वेळ थांबले. याचवेळी परशुरामपंत प्रतिनिधी आणि डफळे बंधू यांची चुकामुक झाली. थोडा काळ गेल्यानंतर ब्रह्मनाळ येथे प्रतिनिधी आणि डफळे यांची परत भेट झाली. त्या भेटीवेळी परशुपंतांना रघुनाथ स्वामी यांच्या समाधी ठिकाणी स्फूर्ती झाली. सरदार असलेल्या परशुरामपंतांनी स्वतःहून त्या ठिकाणी किर्तनही केले व हे स्थान जागृत असल्याची त्यांची खात्री झाली. मोगलांवर विजय मिळविण्यासाठी त्यांनी आशीर्वाद मागितला. (पारसनिस द. ब., १९१५ : ११) डफळे बंधू व परशुरामपंत प्रतिनिधीयांच्या मागावर असलेले मोगल सरदार यांची भिळवणी येथे गाठ पडली. समोरासमोर आल्यावर तुंबळ युद्ध झाले. डफळे बंधू व परशुरामपंतांनी पराक्रमाची शर्थ केली व आश्चर्यकारकरित्या मोगलांचा पराभव केला. केवळ हे सर्व रघुनाथस्वामींमुळे घडले असा त्यांचा मनोमन कयास झाला व त्यांनी परत ब्रह्मनाळ येथे मुक्काम केला. त्या समाधीची व्यवस्था बघण्याकरिता या मठामध्ये असलेल्या आनंदमूर्ती यांना बारा गावे इनाम देण्यात आली. परंतु आनंदमूर्तीनी ती गावे घेण्यास नकार दिला व परशुरामपंतांना ते असे म्हणाले, गावांच्या वसुलीचा हिशेब ठेवण्यापेक्षा मला माझ्या गुरूंची भक्ती जास्त प्रिय आहे, त्यामुळे मी त्यात वेळ घालविणार नाही. याचे कारण भक्तिमार्ग सोडून वसुली गोळा करण्यातच माझा वेळ जाईल. तरीपण छत्रपती राजाराम यांना ही सर्व हकिगत कळल्यानंतर त्यांच्या आग्रहास्तव फक्त ब्रह्मनाळ हे गाव त्यांना देऊ केले. त्याचवेळी छत्रपती राजाराम महाराजांच्या जिंजीला जुल्फिकरखान याने औरंगजेबाच्या वेढा दिला होता. परंतु इ.स. १६९१ ते १६९८ असे सात वर्षे हा किल्ला औरंगजेबास घेता आला नाही. यावरूनच किल्लयाची मजजुती व किल्ला बांधण्याचे दूरदर्शित्व दिसून येते. पराक्रमी व मुत्सद्दी प्रल्हादजी निराजी इ.स. १६९६ मध्ये निधन पावले व महाराष्ट्रातील राजकारणात त्यांची जागा कोण घेतो असे प्रश्न निर्माण झाले. जिंजीवरून म्हणजेच कर्नाटकावरून छत्रपती राजाराम महाराजांनी महाराष्ट्रात परत येण्याचे ठरविले. जिंजीपासून निघताना मोगलांशी लढतलढत महाराज विशाल गडावर दाखल झाले.

इ. स. १६९७ मध्ये शंकराजी नारायण, रामचंद्र निलकंठ व परशुराम प्रतिनिधी यांनी आपल्यावर सोपविलेल्या जबाबदाऱ्या पूर्ण केल्या होत्या. छत्रपती राजाराम महाराजांनी त्यांना सांगितले,यापुढे आपण सर्व जबाबदारी घेऊन राज्याचे संरक्षण करावे महावस्त्रे देऊन सर्वांचा सन्मान केला. रामचंद्रपंतांना अमात्य पद शंकराजी नारायण यांना सचिव पद व प्रल्हादजी निराजी यांचा मुलगा नारो प्रल्हाद यांना प्रतिनिधी पद दिले. परंतु तो विशेष कर्तृत्ववान नसल्याने रघुनाथ हणमंते यांचा मुलगा तिमाजी यांना दिले. परंतु हणमंते मोगलांच्या कैदेत गेल्यामुळे ते पद परशुरामपंत त्रिंबक यांना देण्यात आले. प्रतिनिधी पदांची वस्त्रे त्यांना देऊ केली (पारसनिस द. ब., १९१५ : १३).

राजांनी अशा प्रकारे त्यांना सन्मान दिला. त्यांचा मान खालीलप्रमाणे :-

५.४ प्रतिनिधी (नवीन पद)

प्रतिनिधींचे मान

प्रथम भेटीच्या वेळी	एक चादर
नेमणूकीच्या वेळी पदाची वस्त्रे	मंदिल, चादर, जामेवार,
	पट्टा (ढुपेटा), किनखाप
शस्त्रे	ढाल व तलवार, कट्यार
वस्तू -	१ चवरी सोन्याच्या ढांडीची
	१ कलमदान
	१ शिक्के कट्यार
अलंकार -	तुरा, कंठी, जेहगा, चौकडा व शिरपेच
	१ हत्ती जरीपटक्यासाठी, २ हत्ती वेगळे,
	१ घोडा व १ चौघडा नौबतीसाठी.
	पालखी व अब्दागिरी

शंभुपुत्र शाहूस सोडविण्यासाठी छत्रपती राजारामांनी उत्तरेकडे फौजेनिशी स्वारी करण्याचा निर्णय घेतला व त्याप्रमाणे उत्तरेकडे निघाले. शंभुपुत्र शाहू व येसूबाई बग्गीच्या कोठाच्या आत मोगलांच्या संरक्षणात असल्याने त्यांची सोडवणूक करता आली नाही. तेथून साताऱ्यास परत येता येता २ मार्च १७०० रोजी छत्रपती राजाराम महाराज यांचे महानिर्वाण झाले. अंतसमयी रामचंद्रपंत आमात्य यांनी शंभुपुत्र शाहूस सोडवून आणण्या संदर्भात आग्रह धरला (सोवनी अविनाश, १९९८ : ९४).

औरंगजेबास ही बातमी कळाली व त्याने लगेचच साताऱ्याच्या किल्ल्याला वेढा दिला. त्यावेळी परशुरामपंत परळीच्या किल्ल्यावर होते. बादशहास साताऱ्याचा किल्ला सर झाला नाही. रामचंद्रपंत अमात्य यांनी हा किल्ला ताब्यात ठेवण्याने बादशहास यश आले नाही. म्हणून त्याने कपट म्हणून परशुरामपंतास रामचंद्र अमात्य विरूध्द खोटे पत्र पाठविले. परंतु त्याचा उपयोग झाला नाही. रूमानजी लावंगरे हा सातारा किल्ला रखवालदार होता. त्यांनी किल्लेदार प्रयागजी अनंत याचाही विश्वासघात करून सातारा किल्ला बादशहास मिळावा असा प्रयत्न केला. परंतु किल्लातील ही बातमी परशुरामपंतास कळाली व किल्ल्यावरील सर्वांचे नुकसान होऊ नये म्हणून तह करून धनधान्य सामुग्रीसहित सैन्य खाली उतरवून किल्ला ताब्यात दिला व परळीचा किल्लाही अशा रितीने मोगलांच्या ताब्यात इ. स.

१७०१ पर्यंत होता. त्याचप्रमाणे विशालगडही मोगलांच्या ताब्यात होता. छत्रपती राजारामांच्या मृत्यूनंतर त्यांचे पुत्र शिवाजी यास ताराबाईनीं हट्टाने मुंज करून राज्याभिषेक करून घेतला व त्याचवेळी अष्टप्रधान पण नेमले गेले. अष्टप्रधानांतील अमात्यपद रामचंद्रपंत यांना मिळाले व प्रतिनिधी पद हणमंतेकडून परत परशुरामपंत त्रिंबक यांना दिले. इ. स. १७०१ ते १७०७ या कालखंडातच परशुरामपंत प्रतिनिधी यांनी राज्यभर चांगले कार्य केले. याच सुमारास इ. स. १७०७ मध्ये छत्रपती संभाजी महाराजांचे पुत्र छत्रपती शाहू महाराजांची सुटका श्री. बाळाजी विश्वनाथ यांच्या शिष्टाईने झाले. इ. स. १७०७ मध्ये शंभुपुत्र शाहू परत महाराष्ट्रात आले. त्यावेळी शाहू व ताराबाई यांमध्ये गृहकलह झाला. या सुमारास औरंगजेब मरण पावला, पण शेवटपर्यंत त्याला काही केल्या महाराष्ट्र घेता आला नाही. सर्वस्वी धनाजी जाधव सेनापती, खंडोजी बल्लाळ चिटणीस, अमात्य रामचंद्र पंत व प्रतिनिधी परशुराम त्रिंबक यांनी शंभुपुत्र शाहूस विरोध करावा व आपल्याकडे राज्य राहवे अशी योजना ताराबाईंनी केली. परंतु खंडोजी बल्लाळ व धनाजी जाधव यांनी शाहूंची परीक्षा घेतली व त्यास सामील झाले. छत्रपती राजारामांचे निष्ठावान परशुरामपंत प्रतिनिधी यांनी शाहूस विरोध केला व युद्ध केले. परशुरामपंत प्रतिनिधी यांनी साताऱ्याचा किल्ला परत घेऊन त्यामध्ये महाराणी ताराबाई यांच्या पाठीशी उभे राहून त्यांचे रक्षण केले. परंतु शाहूंनी निरनिराळ्या युक्त्या करून सातारा किल्ला हस्तगत केला, परशुपंतांस कैद केले. परशुरामपंतांचा एकमेव सेवक शेखमिरा यांनाही अकस्मात कैद केले. याच शेखमिरांनी शाहूस मदत केली. त्यामुळे परशुरामपंत कैद झाले (पारसनिस द. ब., १९१७ : १८).त्यामुळे खुश होऊन शाहूंनी शेखमिरास विचारले की, तुला काय पाहिजे त्यावर या एकनिष्ठ सेवकाने असे मागितले की, मला माझे मालक प्रतिनिधी परत द्या. शेखमिराने सेवक धर्मास अनुसरून त्याचे काम त्यांनी पूर्ण केले. परंतु परशुरामपंत प्रतिनिधी यांना शाहूंनी कैदच ठेवले. परशुरामपंत प्रतिनिधी यांनी आपणास शरण यावे असे छत्रपती शाहूंना वाटत होते. परंतु तसे झाले नाही. इकडे महाराणी ताराबाईंनी रामचंद्रपंत अमात्य यांना हाताशी धरून पन्हाळा येथे नवीन गादी स्थापन केली व सर्व मराठ्यांची मनस्थिती द्विधा झाली. यामुळे अनेक वेळेला महाराणी ताराबाई व छत्रपती शाहुमहाराज यांच्यात चढाओढ निर्माण झाली. चिटणीस खंडोजी बल्लाळ यांनी छत्रपती शाहू व परशुरामपंत यांचा समेट घडवून आणला.


७.७ पंतप्रनिधी यांना दिलेला भौगोलिक प्रांत :–दि. १७ डिसेंबर १७१० मध्ये परत प्रतिनिधी पद परशुराम त्रिंबक यांस दिले व त्यांचेकडे खालील मुलूख सोपविला (भागवत अ. ना. व आठले कृ. ना., १९१७ : २४८).

१. प्रांत राजापूर, २. प्रांत ढाभोळ, ३. प्रांत महिपतगड, ४. प्रांत जावळी, ५. प्रांत मंडनगड, ६. प्रांत वाई, ७. प्रांत सातारा, ८. प्रांत कऱ्हाड/व्याघ्रगड, ९. प्रांत मलकापूर/पन्हाळा/तारळे, १०. प्रांत कोल्हापूर, ११. प्रांत खटाव, १२. प्रांत माण १३. प्रांत मिरज

असे एकूण तेरा प्रांत दिले. किल्लयांच्या व्यवस्थेसाठी

१. विशाळगड, २. महिपतगड, ३. प्रतापगड, ४. सांगगड, ५. जयगड, ६. व्याघ्रगड, ७. रसाळगड, ८. सुनेरगड, ९. प्रचितगड, १०. मंगळगड,११. गहणगड, १२. जंजिरागड, १३. रत्नागिरीगड, १४. साताराग़ड, १६. भूषणगड, १७. सज्जनगड, १८. बारगड, १९. सुंदरगड, २०. गुणवंतगड, २१. पावनगड, २२. कोल्हापूर गगनगड

आणि इतर असे ३५ गड छत्रपती शाहूंनी परशुरामपंत प्रतिनिधी यांस मानाची वस्त्रे व शिक्क्यासहित दिले.



परंतु इ.स.१७११ मध्ये छत्रपती शाहूंनी परत त्यांचे प्रतिनिधी पद काढून घेऊन प्रल्हादजी निराजी यांचे दुसरे चिरंजीव नारायण प्रल्हाद यांना दिले(पारसनिस द. ब., १९१५ : २७). परशुरामपंत यांचा मुलगा कृष्णाजी यांनी छत्रपती शाहूंच्या राज्यात दंगल घडवून आणली म्हणून परशुरामपंत यांना अटक केली व त्यांचे डोळे काढावे असे सांगितले. प्रत्यक्ष ज्यावेळी डोळे काढण्याची वेळ आली त्यावेळी खंडोजी बल्लाळ यांनी छत्रपती शाहूंची कानउघडणी केली व आम्ही आपणास सोडून जात आहोत असे सांगितले. 'परशुरामपंत या वीर पुरुषाने एकनिष्ठपणे स्वराज्याची चाकरी केली आहे, अशा एकनिष्ठ सेवकांस आपण अशा पद्धतीने मारावे हे आपणास लांच्छनास्पद आहे म्हणून इतिहाससुद्धा त्यांना माफ करणार नाही. मुलाचे कृत्य व बापाला सजा का?' छत्रपती शाहूस कदाचित मनापासून असे वाटले असेल की,

औरंगजेबाने माझ्या वडिलांचे डोळे काढून दृष्ट कृत्य केले व त्यास कायमचे लांच्छन लागेल. तशाच प्रकारचे लांच्छन मला लागेल असे वाटून छत्रपती शाहूंनी (छत्रपती संभाजी पुत्र) परशुरामपंत प्रतिनिधी यांना मुक्त केले व परत त्यांच्याकडे प्रतिनिधी पद सन्मानाने दिले. यावेळी ते पंतप्रतिनिधी पद शेवटपर्यंत त्यांच्याकडेच राहील अशी योजना करून त्यांना एक सनद दि. ८ एप्रिल १७१४ रोजी दिली(भागवत अ. ना. व आठले कृ. ना., १९१५ : २७४). ती याप्रमाणे :-

७.६ सनद

'स्वस्ति श्री राज्याभिषेक शके ४० जय नाम संवत्सरे वैशाख शुद्ध पंचमी गुरू वासरे

क्षत्रिय कुलवतंस श्री राजा शाहू छत्रपती स्वामी यांनी समस्त राजकार्य धुरंधर विश्वास

निधी राजमान्य राजश्री परशुराम पंत त्रिंबक प्रतिनिधी यासी आज्ञा केली ऐसे जे तुम्ही स्वामी संबंधि विनंती केली की, तिर्थस्वरूप महाराज राजाराम काकासाहेब कैलासवासी यांचे कारकिर्दीत राज्यात श्रमसाहस करून यास स्तव प्रतिनिधींचे पद अजरामरावत वतनी आपण करून दिले आहे तरी ते पत्र पाहून नवीन पत्र करून घ्यावे म्हणून त्यावरून ते पत्र पाहून मनास आणता पूर्वी राज्यावर औरंगजेब बादशहा दक्षिणेत येऊन सातारा, परळी, विशालगड व पन्हाळा या गडांस वेढा घालून बसले त्यासमयी बादशहाशी झुंजण्याची शर्थ केली व पुन्हा बादशहा माघारी फिरताच सर्व किल्ले घेतले. चंदीला महाराज गेले होते तेथे धन्याचे रक्षणाची सीमा केली. तेथून साहेब घरी आल्यावर राज्य स्वाधीन केले. आणि आज्ञेप्रमाणे वर्तोणी एकनिष्ठपणे सेवा केली. अशी महत्त्व कार्य करून राज्य रक्षण केले. यास्तव तुम्हावर कृपाळू होऊन प्रतिनिधींचे पद तुम्हांस वंशपरंपरेने वतणी करून दिले असे भोसले यांचे वंशी जो कोणी राज्य करील त्याचे तुमचे वंशाचे ठायी ममता पुरस्सर विश्वास ठेवून तुमचे वंशी पद चालवावे याशी अंतर करी त्याचे राज्य सोयीस्कर होणार नाही.

तारीख २ रवि सु


॥ आर्वा ॥

असे शेवटपर्यंत छत्रपती शाहूंशी प्रामाणिक राहून २७ मे १७१८ मध्ये म्हणजेच (ज्येष्ठ शुध्द अष्टमी शके १६४०) विलंब नाम संवत्सरे या दिवशी श्री परशुरामपंत यांचे महाप्रयाण झाले. त्यांचे वृंदावन संगम माहुली येथे आहे (पारसनिस द. ब., १९१५ : ३१).

पुढे त्यांचे पुत्र श्रीपाद परशुराम प्रतिनिधी यांचेकडे शाहूंनी दिले व ते पद इ. स. १८४८ पर्यंत कायम होते. त्यानंतर ब्रिटिशांनी औंध ही जहागिरी देऊन संस्था स्थापन केल्या. परशुरामपंतांचे दुसरे पुत्र

कृष्णाजी परशुराम महाराणी ताराबाईकडे राहिले त्यांनी कोल्हापूर या गावाशी प्रामाणिक राहून त्यांना विशाळगडाची जहागिरी देऊन कायम स्वरूपी वतन दिले. आजही त्यांच्या पिढ्या तेथे कार्यरत आहेत. औंधच्या प्रशासकीय कार्ययंत्रणेत ज्यांनी औंध संस्थान सांभाळले त्यांची वंशावळ खालीलप्रमाणे (मक्कदुम ढा., २०१४ : २००).

५.७ पंतप्रतिनिधी घराण्याची वंशावळ (औंध)



श्रीनिवास उर्फ भवानराव
(मृ.३० ऑगस्ट १७७७)

परशूराम उर्फ थोटेपंत
(मृ. १० मे १८४८)

श्रीनिवासराव
(मृ.१९०१)

भवानराव बाळासा (१९४८ नंतर संस्थान खालसा झाले)

वरील सर्व पंतप्रतिनिधींचा कारभार त्यात्या राजांकडे व्यवस्थित करीत होते. इंग्रजांच्या अंमलाखाली असलेल्या काळात ग्रामसत्ता किंवा संस्थान यांच्यामध्ये एक आदर्श समन्वय असावा व त्याचप्रमाणे देशप्रेमही जागृत रहावे. इंग्रजांचे अधिकार त्या प्रदेशापुरते गृहित धरून त्यांनाही सामोपचाराने तोंड देऊन व त्यांच्या अधिन न होता, स्वधर्म रक्षण करणे अशा स्वरूपाचा अतिशय चांगला प्रयत्न भवानराव उर्फ बाळासाहेब पंतप्रतिनिधी यांनी केला. त्याकरीता त्यांची थोडक्यात पण महत्त्वाचा कार्यकालाचा आपण अभ्यास करूया.

७.८ औंधचे राजे भवानराव ऊर्फ बाळासाहेब पंत

चित्र क्रमांकः ७.१



राजे भवानराव ऊर्फ बाळासाहेब पंत

औंधचे राजे भवानराव ऊर्फ बाळासाहेब पंत यांची प्रसिद्धी त्यावेळच्या भारताच्या सर्व संस्थानांमध्ये होती. याचे कारण

१. त्यांनी सर्व सूर्यनमस्कारांचा जाहिर प्रचार केला.

२. गांधीवाढी राज्यघटना लिहिली व स्वतःच्या संस्थानांमध्ये अमलात आणली व कायदा तयार केला.

३. हा राज्यव्यवस्थेचा म्हणजेच 'प्रशासकीय कार्ययंत्रणेचा प्रयोग '' औध एक्सप्रिमेंट '' म्हणून सर्व भारतभर प्रसिद्ध आहे.

अप्पासाहेब पंत व मॉरस फ्रिडमन (भारतानंढ) या ढोघांनी मिळून केलेली ही राज्यघटना गांधीजींनी स्वतः बघितली व स्वहस्ते ढुरुस्त्या करून त्याला मान्यता ढिली. ती ही राज्यघटना

भवानराव पंतप्रतिनिधी यांनी सर्व ग्रामसत्तांना लागू केली व ते नेहमी म्हणत असत 'सर्व संस्थांचा कारभार आता लोकांनीच पूर्णपणे चालवावा, राजा फक्त लोकांचा आद्य सेवक व त्यांच्या सद्सद् विवेकबुद्धीचा विश्वस्त यापुढे राहणार आहे (बारलिंगे सुरेश, १९८६ : प्रस्तावनेचा सारांश) .

७.१ औंध संस्थानच्या राज्यघटनेसंबंधीचा सन १९३१ चा कायदा १ ला

औंध, फलटण, भोर व नागपूर यांच्या संस्थानांच्या राज्यघटना किंवा कायदेमंडळांनी केलेला कायदा व त्यांच्या दुरुस्त्या बहुतांशी महाराष्ट्रातील संस्थानांच्या जवळजवळ सारख्याच होत्या. प्रत्यक्ष सर्व घटनादुरुस्त्या वाचल्या तर औंध संस्थानची घटना व त्यासंदर्भातील कायदा हा एक उदाहरण म्हणून घेतलेला आहे. त्याचा अभ्यास करून प्रत्यक्ष राज्यघटनाच याठिकाणी घेतली आहे व ती सर्व संस्थानच्या प्रातिनिधीक स्वरूपात आहेत. म्हणून जशी आहे तशी राज्यघटना आदर्श ग्रामराज्य संस्थेकरीता आजही निश्चित उपयोगी पडते, असे दिसून आले. निष्कर्ष : अष्टप्रधान मंडळाच्या द्वारा चालणारी किंवा आज्ञापत्राच्या द्वारा चालणारी राज्यघटना व ही वरील ग्रामराज्यव्यवस्था हे एक प्रशासकीय स्थित्यंतरच आहे. प्रातिनिधीक स्वरूपाची राज्यघटना खालीलप्रमाणे :-

ज्या अर्थी ता. १.११.३८ च्या जाहिरनाम्यामध्ये औंध संस्थानच्या प्रजाजनांना संपूर्ण स्वराज्य देण्याची आपली इच्छा असल्याबद्दल श्रीमंत सरकार राजेसाहेब संस्थान औंध यांनी अत्यंत उदारपणाने घोषणा केली आहे, त्या अर्थी खालीलप्रमाणे कायदा करण्यात येत आहे (पंत आप्पा, १९८६ : १०० ते १०८).

१. (अ) **सरनामा :-** या कायद्यास औंध संस्थानच्या राज्यघटनेसंबंधीचा सन १९३१ चा १ला कायदा असे संबोधण्यात यावे.

(आ) **सुरुवात व व्याप्ती :-** श्रीमंत राजेसाहेब जाहीर करील त्या तारखेपासून हा कायदा कलमे २० व २१ खेरीज करून अंमलात येईल.

२. औंध संस्थानच्या वेळोवेळी होणाऱ्या कायद्यांची ज्याप्रमाणे वेळोवेळी ठरविण्यात येईल, त्याप्रमाणे हा कायदा खालील गोष्टींची हमी घेत आहे. अहिंसा व सार्वजनिक नीतिमत्ता या दोन तत्त्वांस अनुसरून या कायद्याने संस्थानच्या प्रत्येक नागरिकास, व्यक्तिस्वातंत्र्य, भाषणस्वातंत्र्य, मुद्रणस्वातंत्र्य, समितीस्वातंत्र्य, सभा व चर्चा स्वातंत्र्य, धार्मिक स्वातंत्र्य देण्यात आलेले आहे. तसेच लिंग, जाती, धर्म, वर्ण अगर सांपत्तिक स्थिती यामुळे कोणासही राजकीय बाबतीत अपात्र समजले जाणार नाही. कायद्यांच्या दृष्टीने औंध संस्थानच्या सर्व प्रजाजनांस पूर्ण समतेने वागविले जाईल. संस्थानातील न्यायदान स्वस्त व त्वरित अशा पद्धतीने चालेल.

प्राथमिक शिक्षण सक्तीने सर्वांस मोफत देण्यात येईल. मतदानाचा अधिकार सर्व साक्षर प्रौढ लोकांस समान राहील. प्रत्येक कामे करू इच्छिणाऱ्या इसमास जगण्यासाठी कमीत कमी लागणारा मोबदला घेऊन काम सरकारकडून मिळविण्याचा हक्क राहील.

३. श्रीमंत राजेसाहेब यांच्याकडे सध्या औंध संस्थानच्या राज्यकारभारासंबंधी अगर तद्नुषंगिक असलेले हक्क, अधिकार व सत्ता हा कायदा अंमलात आल्यास त्यात अगर त्यास अनुसरून ज्या योजना केल्या असतील, त्याप्रमाणेच त्यांना चालविता येतील. ज्या बाबीसंबंधी या कायद्यात उल्लेख केलेला नाही अशा बाबतींतही कायदे मंडळाचे निर्देशाप्रमाणे त्यांनी आपले अधिकार वापरण्याचे आहेत.

४. संस्थानातील प्रत्येक गाव आपल्या रहिवासी नागरिकांपैकी ५ कायम व २ राखीव सभासदांची एक पंचायत ३ वर्षांसाठी निवडील, मात्र सर्व अगर काही विशिष्ट कारणाकरिता म्हणून संस्थानातील दोन अगर दोहोंपेक्षा जास्त अशा खेड्यांना एक संयुक्त पंचायत सरकारचे मंजुरीने निवडता येईल.

५. (अ) ग्रामपंचायतीच्या सभासदांची निवडणूक गावातील साक्षर प्रौढ लोकांच्या मताधिक्क्याने होईल.

(आ) ग्रामपंचायतीच्या अध्यक्षाची निवडणूक पंचायतीच्या सभासदांकडून एकमताने होईल. परंतु अध्यक्षाच्या निवडणुकीसंबंधी सभासदांचे एकमत न झाल्यास पंचायतीच्या सभासदांपैकी कोणाही इसमाची अध्यक्षपदासाठी निवडणूक गावातील सर्व मतदार लोकांकडून होईल.

(इ) गावच्या शिक्षणाची व्यवस्था, ग्रामोद्धार कार्य, विशेषतः न्यायदान, पाणीपुरवठा, गावचे आरोग्य, रस्ते करणे व दुरुस्त ठेवणे, मोऱ्या, पूल, बंधारे, सार्वजनिक इमारतींची दुरुस्ती, गायरानाची जोपासना, उजेडाची व्यवस्था ठेवणे, जत्रा व बाजार यांचे नियंत्रण, सरकारच्या सहकार्याने प्राथमिक शिक्षणाची व्यवस्था, सूत काढणे वगैरे उद्योग सुरू करून बेकारी निवारणाचा उपक्रम, पशुसंरक्षण आणि संवर्धन आणि ज्या योजनेमुळे लोकांचे आरोग्य, सुरक्षितता, शिक्षण, सौख्य-सोयी किंवा सामाजिक व आर्थिक जीवनांचे संवर्धन होईल अशा योजना करणे हे काम पंचायतीचे असेल. या सर्व बाबी ग्रामपंचायतीने त्यांच्या ताब्यात दिलेल्या रकमेतून व तालुका समिती व सरकार यांचे नियंत्रणाखाली करावयाच्या आहेत.

(ई) जो इसम वेडा असेल अगर ज्या इसमावर नैतिक अधःपतनाचा समावेश होईल अशा गुन्ह्याची शाबिती झालेली असेल अशा इसमाचे नाव मतदानाचे यादीत घातले जाणार नाही.

मात्र वर नमूद केलेल्या नैतिक अधःपतनाच्या कारणामुळे मतदानाच्या हक्कास नालायक ठरलेल्या इसमाची नालायकी दूर होण्याच्या कारणासह अशा नालायक ठरलेल्या इसमाने अर्ज दिल्यास व ती कारणे कोर्टास पटल्यास अशा इसमाची नालायकी दूर होऊ शकेल.

मतदारांच्या यादीत नाव दाखल झालेला एखादा इसम वर नमूद केलेल्या कारणामुळे मतदानाचा हक्क असण्यास नालायक आहे, असे दिसून आल्यास मतदारांच्या यादीतून अशा इसमाचे नाव खोडले जाईल व तो मतदानास अपात्र समजला जाईल.

६. या कायद्याच्या अंमलबजावणी करिताच शक्य तितक्या लवकर संस्थानातील सर्व गावांचे पाच गट करून प्रत्येक गटाला तालुका असे संबोधण्यात येईल.

७. प्रत्येक तालुक्यातील सर्व ग्रामपंचायतीच्या अध्यक्षांची मिळून तालुका समिती बनविण्यात येईल व तालुका समितीचे सभासद आपल्या सभासदांतून तालुका समितीचा अध्यक्ष निवडतील.

८. संस्थानातील प्रत्येक तालुका समितीला संस्थानच्या उत्पन्नाचा ठरावीक भाग मिळेल व ती समिती गावच्या गरजांप्रमाणे ती रक्कम गावपंचायतींना वाटून देईल. प्रत्येक गावपंचायतीने दरवर्षास तयार केलेल्या जमेच्या व खर्चाच्या अंदाजपत्रकाची छाननी करणे, त्या तालुक्यातील गावांकरिता विशिष्ट जादा रकमेची सरकारकडे मागणी करणे, ही कामे प्रत्येक तालुका समिती करील, शिवाय तालुक्यातील प्रत्येक ग्रामपंचायतीचे कामकाज कसे चालले आहे, यासंबंधी दर तीन महिन्यांनी प्रत्येक तालुका समितीने सरकारकडे अहवाल पाठवावयाचे आहेत.

९. (अ) श्रीमंत राजेसाहेब व संस्थानचे कायदेमंडळ मिळून संस्थानचे विधिमंडळ (लेजिस्लेचर) होईल. संस्थानचे कायदेकानू करण्याची जबाबदारी श्रीमंत राजेसाहेब आणि संस्थानचे कायदेमंडळ मिळून होणाऱ्या विधिमंडळाकडे राहिल.

(आ) कायदेमंडळ ही संस्थानची वरिष्ठ संस्था राहील आणि संस्थानचा सुव्यवस्थित राज्यकारभार करण्याकरिता जरूर असणारे कायदे व नियम ही संस्था करील, तसेच संस्थानचे जमाबंदीवर तिचा पूर्ण अधिकार राहील.

१०. (अ) या कायद्याच्या (२७ व्या) (आ) कलमात नमूद केलेल्या योजनेस अनुसरून संस्थानचे कायदेमंडळ पंधरा सभासदांचे राहील. संस्थानातील सर्व तालुका समितीचे विद्यमान अध्यक्ष कायदे मंडळाचे सभासद राहतील.

(आ) प्रत्येक तालुका समिती दर तीन वर्षास आपले अध्यक्षाशिवाय आणखी दोन सभासद कायदेमंडळासाठी निवडून देईल. त्यांपैकी एक सभासद तालुका समितीचा सभासद नसला तरी चालेल.

(इ) वयाची अठरा वर्षे पूर्ण झाली असतील अशा औंध संस्थानच्या साक्षर व प्रौढ प्रजाजनांखेरीज दुसऱ्या कोणासही कायदेमंडळासाठी उमेदवार म्हणून उभे राहता येणार नाही.

११. कायदेमंडळ ही संस्था कायम स्वरूपाची असून ती कोणासही मोडता येणार नाही. पण या कायद्यातील कलम ४ व ११ प्रमाणे दरसाल १/३ सभासद कायदेमंडळातून निवृत्त होतील व नवीन निवडून येणारे त्यांच्या जागी येतील.

१२. कायदेमंडळाची बैठक वर्षातून दोन वेळा भरविण्यात येईल व दोन बैठकीच्या कालामध्ये सात महिन्यांहून अधिक काळ जाणार नाही.

१३. (स्पीकर आणि डेप्युटी स्पीकर) अध्यक्ष आणि उपाध्यक्ष यांची निवडणूक पहिल्या बैठकीच्या वेळी कायदेमंडळाचे सभासद करतील. प्रातिनिधिक सभेचे सभासद असेपर्यंत अगर एखादी सरकारी नोकरी पत्करेपर्यंत अगर प्रातिनिधिक सभेचा विश्वस्थ असेतोपर्यंत अगर ते कोणत्याही अन्य कारणाकरिता राजीनामा देईपर्यंत अध्यक्ष व उपाध्यक्ष हे आपल्या जागेवर राहतील.

१४. कायदेमंडळापुढील प्रश्नांचा निकाल अध्यक्ष अगर त्यांच्या जागी काम करणाऱ्या सभासदाशिवाय हजर असलेल्या व मत देऊ शकणाऱ्या सभासदांचे मताधिक्क्याने होईल. अध्यक्षांस प्रथम मत देता येणार नाही, पण मते समान पडल्यास त्यास आपले मत कोणत्याही बाजूस देण्याचा अधिकार राहील.

१५. (अ) हजर असून मत देत असलेल्या सभासदाच्या मताधिक्क्यानेच कायद्याचे मसुदे (बिल्स) पसार करण्यात येतील व श्रीमंत राजेसाहेब यांची संमती मिळाल्यावर ते मसुदे कायदे होतील.

(आ) एखाद्या कायद्याच्या मसुद्यास तो कायदेमंडळाने नियमानुसार पसार केला असतानाही जर श्रीमंत राजेसाहेब त्यास संमती देण्याचे नाकारतील तर तो कायद्याचा मसुदा परत कायदे मंडळाकडे त्यांनी पाठविला पाहिजे. याप्रमाणे मसुदा परत पाठविताना सदर मसुद्याचा त्यांनी सुचविलेल्या शिफारशीस अनुसरून फेरविचार करावा. अशा सूचनांचा संदेश श्रीमंत राजेसाहेबांना कायदे मंडळास देता येईल. याप्रमाणे फेरविचारासाठी म्हणून असा मसुदा श्रीमंत

राजेसाहेबांचेकडून आल्यानंतर कायदेमंडळ त्या मसुद्याचा श्रीमंत राजेसाहेबांचे संदेशाप्रमाणे फेरविचार करील.

(इ) फेरविचाराकरिता पाठविलेल्या मसुद्यात ज्या शिफारशीप्रमाणे फेरविचार व्हावा, असा श्रीमंत राजेसाहेबांचा संदेश असेल, त्या शिफारशी मान्य झाल्यास तो मसुदा कायदा म्हणून समजला जाईल. परंतु अशा शिफारशी कायदेमंडळास अमान्य झाल्यास श्रीमंत राजेसाहेबांना सदरहू कायद्याचे मसुद्यास संमती देण्याचे काम कायदे मंडळाच्या पुढील बैठकीपर्यंत पुढे टाकता येईल. याप्रमाणे संमती न दिलेल्या मसुद्यास लागोपाठ तीन वेळा संमती देण्याचे त्यांना नाकारता येईल. मसुद्यास श्रीमंतांनी संमती न दिल्यामुळे फेरविचाराकरिता पुढे येऊनही तीनही वेळेस जर मूळ स्वरूपातच तो मसुदा मताधिक्क्याने पसार होईल तर तो मसुदा मूळ स्वरूपातच कायदा म्हणून समजला जाईल.

१६. संस्थानचा राज्यकारभार चालविण्याची सत्ता कायदे मंडळाचे वतीने अधिकारारूढ मंत्रिमंडळा कडून वापरण्यात येईल. कायदे मंडळातील सभासदांमधून श्रीमंत राजेसाहेब ज्यांना नेमतील अशा मुख्य मंत्र्यांचे व दोनपेक्षा जास्त नाही, अशा उपमंत्र्यांचे मिळून मंत्रिमंडळ बनेल. राज्यकारभाराच्या सर्व बाबींसंबंधी मंत्रिमंडळ कारदेमंडळास जबाबदार राहील व कायदेमंडळाकडून अधिकारारूढ मंत्रिमंडळाविरुद्ध अविश्वासाचा ठराव पसार झाल्यास त्या मंत्रिमंडळाला अधिकार निवृत्त व्हावे लागेल.

१७. जमाबंदीच्या प्रत्येक वर्षारंभी मंत्रिमंडळ कायदेमंडळापुढे त्या वर्षांच्या वसुलाचे व खर्चाचे अंदाजपत्रक मांडील व या अंदाजपत्रकात खालील बाबींची तजवीज केली जाईल.

(अ) संस्थानच्या उत्पन्नापैकी १/२ रक्कम राज्यव्यस्थेचा खर्च चालविण्याकरिता व श्रीमंतांचे खाजगीकरिता व पोलिटिकल पेन्शनीकरिता म्हणून राहिल.

(आ) उरलेली १/२ रक्कम ग्रामपंचायती व तालुका समित्या यांनी करावयाच्या खर्चाकरिता राहील व ही रक्कम त्या त्या तालुक्याच्या वसुलाचे रकमेचे हिस्सेरशीने विभागली जाईल.

१८. कलम १७ (अ) मध्ये निर्दिष्ट केलेल्या खर्चासंबंधाने मत देण्याचा अधिकार कायदेमंडळास आहे, परंतु १७ (आ) मधील रकमेसंबंधीने मत देण्याचा अधिकार कायदेमंडळास नाही.

१९. (अ) कायदेमंडळाने पसार केलेल्या जमेच्या व खर्चाच्या अंदाजपत्रकावर सही करून त्याला श्रीमंत राजेसाहेब मान्यता देतील. अशा तऱ्हेने त्यांनी सही करून मान्यता दिल्याशिवाय संस्थानच्या उत्पन्नापैकी केला जाणारा कोणताही खर्च कायदेशीर समजला जाणार नाही.

(आ) तालुका समित्यांसाठी ठरवून देण्यात आलेल्या रकमेवर तालुका समितीचा पूर्ण ताबा राहील, परंतु त्यांच्या व्यवहाराची छाननी करण्याचा अधिकार मंत्रिमंडळास व कायदेमंडळास आहे.

(इ) कलम १७ मध्ये नमूद केल्याप्रमाणेच कलम १९ (अ) बाबतीत पसार झालेल्या बजेटला मान्यता न देण्यासंबंधी श्रीमंत राजेसाहेबांना अधिकार राहिल.

२०. संस्थानातील न्यायदान स्वस्त व त्वरित अशा पद्धतीने राहील, संस्थानच्या सरन्यायाधीशाकडून वारंवार ठरविले जाईल त्याप्रमाणे किरकोळ स्वरूपाचे दिवाणी दावे व फौजदारी खटले चालवून न्याय देण्याचे काम पंचायतीने करावयाचे आहे. याव्यतिरिक्त उरलेली न्यायदानाची कामे व पंचायतीच्या निकालावरील आपले चालविण्याचे काम सरन्यायाधीशाकडून करण्यात येईल. पंचायतीचे न्यायदानाचे काम मोफत चालेल, कोणासही दिवाणी आणि फौजदारी बाबतीत कायदेशीर सल्ला व बचावाची मदत मोफत मिळण्याची व्यवस्था सरकारकडून या बाबतीत हायकोर्टाकडून केल्या जाणाऱ्या नियमाप्रमाणेच केली जाईल.

२१. (अ) औंध संस्थानच्या सरन्यायाधीशांची नेमणूक श्रीमंत राजेसाहेब संस्थान औंध यांच्याकडून केली जाईल व सरन्यायाधीश संस्थानच्या न्यायखात्याचे मुख्य म्हणून काम करतील. ग्रामपंचायतीने दिलेले निकाल, हुकूम अगर हुकूमनामे यावर झालेली अपिले अगर तपासणी अर्जांचे काम चालविणेचे व त्याचप्रमाणे त्यांचेकडून ठरविण्यात आलेल्या ग्रामपंचायतीच्या अधिकारक्षेत्राबाहेरील असलेले फौजदारी व दिवाणी कज्जे चालविण्याचे काम सरन्यायाधीशांकडे राहील.

(आ) संस्थानच्या सरन्याधीशाच्या नेमणुकीचेवेळी त्यांची जी मुदत ठरली असेल त्या मुदतीपर्यंत व त्यांची चांगली वर्तणूक असेतोपर्यंत ते आपले अधिकार चालवितील.

२२. राज्यघटना अंमलात आल्यावर शक्य तितक्या लवकर अधिकारारूढ मंत्रिमंडळ सार्वत्रिक व मोफत, सक्तीच्या व शक्य तितके स्वावलंबी प्राथमिक शिक्षणाची सोय करील. तसेच औंध संस्थानच्या जनतेची अधिकाधिक सेवा करण्याची संधी देण्याच्या हेतूने योग्य नागरिक बनविण्यासाठी जेवढ्या शिक्षणाची जरुरी असेल तितकेच उच्च शिक्षण देण्याची व्यवस्था सरकार करील. हा कायदा अंमलात आल्यापासून संस्थानातील सर्व निरक्षरता दूर करण्याच्या

हेतूने संस्थानातील प्रत्येक प्रौढ स्त्री-पुरुषास मतदानाची योग्यता प्राप्त करून देण्याकरिता त्यांना साक्षर करण्याची योग्य ती तजवीज सरकार एक वर्षात करील.

२३. श्रीमंत राजेसाहेब हे संस्थानचे हिशेब व जमाखर्च तपासण्याकरिता मुख्य हिशेब तपासनिसाची नेमणूक करतील व हे मुख्य हिशेब तपासनीस या बाबतीत सरकारकडून केलेल्या नियमात नमूद केलेल्या कारणाशिवाय त्या जागेवरून काढले जाणार नाहीत.

२४. श्रीमंत राजेसाहेब हे औंध संस्थानच्या जनतेचे आद्य लोकसेवक व जनतेच्या विवेकबुद्धीचे विश्वस्त आहेत व या कायद्यात वर नमूद केलेल्या अधिकाराशिवाय खाली लिहिलेले अधिकार त्यांनी वापरावयाचे आहेत.

(अ) सार्वभौम सरकाराशी व इतर संस्थांनांशी असणाऱ्या संबंधाबद्दलची सर्व राजकीय कामे श्रीमंत राजेसाहेब यांच्या खास नजरेखाली चालतील.

(आ) संस्थानच्या कायदेमंडळाची जरुरीच्या वेळी जादा बैठक बोलविण्याचा अधिकार श्रीमंत राजेसाहेब यांना आहे.

(इ) श्रीमंत राजेसाहेब हे अधिकारारूढ मंत्रिमंडळाचे विचाराने संस्थानात शांतता व सुव्यवस्था राखण्याकरिता जरुरीचे जाहिरनामे काढू शकतील, परंतु असे जाहिरनामे काढल्यानंतर ते कायदेमंडळाची जी प्रथम बैठक होईल त्या बैठकीत त्यांना कायदेमंडळाने संमती न दिल्यास ते जाहिरनामे त्या अधिवेशाच्या समाप्तीनंतर रद्द म्हणून समजले जातील.

(ई) संस्थानातील अधिकारारूढ मंत्रिमंडळ निःसंदिग्धपणाने संस्थानचा राज्यकारभार गैररीत्या चालवीत असल्याचे श्रीमंत राजेसाहेबांच्या निदर्शनास आल्यास श्रीमंत राजेसाहेब त्या मंत्रिमंडळास आपला कारभार तहकूब ठेवण्याबद्दल हुकूम देऊन त्याचा कारभार बंद ठेवू शकतील व असा हुकूम दिल्यापासून एक महिन्यापेक्षा जास्त नाही अशा मुदतीच्या आत त्यांनी कायदेमंडळाची सभा बोलाविली पाहिजे.

(उ) श्रीमंत राजेसाहेबांना अधिकारारूढ मंत्रिमंडळाच्या शिफारशीवरून ग्रामपंचायतीत अगर कायदेमंडळात निवडून आलेल्या एखाद्या सभासदाची निवडणूक रद्द करण्याचा अधिकार आहे. मात्र याबाबतीत जरूर ते हुकूम निवडणुकीच्या तारखेपासून १ (एक) महिन्याच्या आत झाले पाहिजेत.

२७. (अ) मंत्रिमंडळाकडून केल्या जाणाऱ्या सर्व बाबी व करारमदार श्रीमंत राजेसाहेब यांच्या नावे झाले आहेत असे मानले जाईल व श्रीमंत राजेसाहेबांच्या वतीने मंत्रिमंडळाकडून त्याची अंमलबजावणी होईल.

(आ) हा कायदा अंमलात येण्यापूर्वी श्रीमंत राजेसाहेब यांनी केलेले सर्व करारमदार औंध संस्थानच्या सरकारच्या वतीने केले गेले होते असे समजण्यात येईल.

२६. (अ) औंध संस्थानचे मंत्रिमंडळ या कायद्यास पूरक व आनुषंगिक स्पष्टीकरणासाठी आवश्यक असे नियम तयार करील. पंचायती, तालुका समित्या, राज्यकारभार, न्यायदान, हिशेबतपासणी, शिक्षण, बेकारीनिवारण, संस्थानच्या नोकरांच्या हितसंबंधाचे रक्षण वगैरे गोष्टीकरिता व या कायद्यात समावेश न केलेल्या गोष्टी यासंबंधी मुख्यतः नियम केले जातील.

(आ) हे नियम व ढुरुस्त्या कायदेमंडळाने पसार केल्या पाहिजेत. कायदेमंडळ स्वतःच्या कामकाजासंबंधी नियम तयार करील.

२७. या कायद्याची योग्य अंमलवारी होण्यासाठी श्रीमंत राजेसाहेब खालील अधिकार तात्पुरते म्हणून आपल्याकडे राखून ठेवीत आहेत.

(अ) श्रीमंत राजेसाहेब यांनी नेमलेल्या मंत्रिमंडळाविरुद्ध पहिली दोन वर्षे अविश्वासाचा ठराव कायदेमंडळास मांडता येणार नाही.

(आ) हा कायदा अंमलात आल्यावर पाच वर्षेपर्यंत श्रीमंत राजेसाहेबांना कायदेमंडळासाठी पाच सभासदांपर्यंत सभासद नेमून देता येतील. अशा सभासदांची मुदत एक वर्षांहून अधिक असणार नाही.

(क) हा कायदा अंमलात आल्यावर पाच वर्षांपर्यंत श्रीमंत राजेसाहेब यांच्या खाजगी वार्षिक खर्चाकरिता ३६,००० रुपये कायम करण्यात येत आहेत. या रकमेत पोलिटिकल पेन्शन्सचा समावेश होणार नाही.

२८. (अ) या कायद्यातील कलमांच्या अर्थासंबंधी मतभेद उत्पन्न झाल्यास सरकार अगर जरूर असेल त्या इसमाने हायकोर्टकडे अर्ज करावा. यासंबंधीचा निर्णय अर्ज केल्या दिवसापासून दोन महिन्यांचे आत देण्यात आला पाहिजे.

(आ) हायकोर्टाचा निर्णय अखेरचा समजला जाईल व तो सर्व पक्षांवर बंधनकारक राहील.

२९. पुढील परिशिष्टात नमूद केलेले कायदे त्या परिशिष्टातील दुसऱ्या कॉलममध्ये निर्दिष्ट केले आहेत तितके रद्द करण्यात येत आहेत.

नंबर	वर्ष व कायदा	रद्द केलेला भाग
१.	सन १९३० चा पहिला कायदा	कलमे २० व २१ खेरीज बाकीची सर्व कलमे रद्द
२.	सन १९३१ चा चौथा कायदा	सर्व कायदा रद्द
३.	सन १९३८ चा तिसरा कायदा	सर्व कायदा रद्द

मंजूर तारीख ६.२.३९

सही सरकारची (मोर्तब)

राजेसाहेब, सं. औंध.

७.१० औंध संस्थानचे राज्यघटनेच्या कायद्यात दुरुस्ती करणेबाबतचा कायदा सन १९४० चा (तिसरा)

ज्याअर्थी औंध संस्थानच्या राज्यघटनेसंबंधीच्या सन १९३९ च्या पहिल्या कायद्यात दुरुस्ती करणे जरूर आहे, त्याअर्थी असा कायदा करणेत येत आहे की,

१. या कायद्यास औंध संस्थानच्या राज्यघटनेच्या दुरुस्तीचा कायदा असे म्हणावे.

२. हा कायदा ता. ३.६.४० पासून औंध संस्थानास लागू होईल.

३. औंध संस्थानच्या राज्यघटनेसंबंधीच्या कायद्यातील (ज्या कायद्यास यापुढे सदर कायदा असे संबोधण्यात आले आहे.) कलम ७ (अ) मधील पहिल्या ओळीतील साक्षर या शब्दास काट देण्यात यावा.

४. सदर कायद्याच्या कलम ७ (ई) मधील कोर्टाकडे या शब्दांना काट देऊन त्याऐवजी श्रीमंत राजेसाहेब यांजकडे अगर ते नेमतील त्या अंमलदाराकडे असे नवीन शब्द घालण्यात यावेत.

७. सदर कायद्याच्या कलम ७ (ई) नंतर नवीन कलम ७ (ड) म्हणून घालण्यात यावे.

(ड) कलम (ई) प्रमाणे दुरुस्त झालेली अगर त्याअन्वये कोणी अर्ज न केल्यास निवडणुकीपूर्वी प्रसिद्ध झालेली यादी कायमची समजण्यात येईल व त्या यादीत दाखल असणारा कोणीही इसम मतदानास अपात्र होतो अगर त्या यादीत दाखल नसणारा कोणीही इसम मतदानास पात्र असून त्याचे नाव यादीत दाखल व्हावयास पाहिजे होते अशी तक्रार कोणाही उमेदवारास अगर मतदारास करता येणार नाही.

६. सदर कायद्याच्या कलम १० (आ) मधील दुसऱ्या ओळीतील दोन या शब्दास काट देऊन त्याऐवजी एक असा शब्द नवीन घालावा, तसेच त्यापैकी एक सभासद तालुका समितीचा सभासद नसला तरी चालेल या वाक्याला काट देण्यात यावा.

७. सदर कायद्याच्या कलम १० (आ) नंतर खालीलप्रमाणे नवीन कलम १० (इ) घालण्यात यावे.

(इ) तालुक्यातील सर्व ग्रामपंचायतीकरिता तयार केलेल्या मतदाराचे याद्दीत ज्या इसमांची नावे नमूद आहेत अशा इसमांनी कायदेमंडळात एक सभासद निवडून देण्याचा आहे. या निवडणुकीस कोणाही औंध संस्थानात रहिवासी असणाऱ्या अगर औंध संस्थानात ज्यांच्या स्वतःच्या मालकीची अगर तो एकत्र हिंदू कुटुंबाचा सहभागीदार असल्यास त्या कुटुंबाच्या मालकीची स्थावर मिळकत आहे, अशा इसमास तो ग्रामपंचायत अगर तालुका समिती यांचा सभासद नसला तरीही उभे राहता येईल. निवडून आलेल्या सभासदांचे कायदेमंडळात फक्त तीन वर्षे सभासदत्व राहील. निवडणुकीचे तारखेपूर्वी पाच वर्षांचे अवधीत खरेदी घेतलेल्या स्थावर मिळकतीमुळे मात्र कोणासही निवडणुकीस उभे राहण्याचा हक्क प्राप्त होणार नाही.

८. सदर कायद्याचे कलम १० (इ) रद्दकरण्यात यावे व त्याऐवजी नवीन कलम १० (ई) म्हणून खालीलप्रमाणे घालण्यात यावे.

(ई) ग्रामपंचायतीच्या निवडणुकीस फक्त साक्षर व ज्याच्या वयाला २० वर्षे पुरी झाली आहेत अशा त्या गावच्या मतदारास फक्त उभे राहता येईल. संस्थानातील कोणाही मॅजिस्ट्रेटने सदर इसम साक्षर आहे, म्हणून दिलेले सर्टिफिकेट तो साक्षर आहे असे मानण्यास पुरेसे समजण्यात येईल व ते त्यांच्या साक्षरतेच्या प्रश्नावर कायमचे व निर्णयात्मक समजण्यात येईल.

९. सदर कायद्याच्या कलम २४ (उ) मधील शेवटच्या वाक्यानंतर खालील मजकूर नवीन घालण्यात यावा. तसेच कलम ५ (अ) प्रमाणे अगर कलम १० (इ) प्रमाणे झालेल्या पंचायतीच्या सभासदांच्या अगर तालुक्यातील ग्रामपंचायतीच्या मतदारांनी निवडलेल्या कायदेमंडळाच्या सभासदांच्या निवडणुकीबद्दल कोणाही सदर निवडणुकीत उभा असणाऱ्या अगर सदर निवडणुकीतील मतदार सदर निवडणूक गैरकायदा, अगर लाचलुचपत, फसवणूक, अगर धाकदपटशा यांनी दूषित असल्याबद्दल निवडणुकीचा निकाल जाहीर झाल्यापासून आठ दिवसांत श्रीमंत राजेसाहेब यांजकडे अगर त्यांनी नेमलेल्या निवडणूक चौकशी अंमलदार यांजकडे तक्रार अर्ज निवडणूक जाहीर झाल्यापासून आठ दिवसांचे आत करता येईल व

सरकारांनी केलेल्या नियमास अनुसरून चौकशी अंमलदार सदर अर्जाची चौकशी करून श्रीमंत राजेसाहेब यांकडे योग्य ती शिफारस करतील.

मंजूर ता. ३.६.४०

भवानराव (मोर्तब)

राजेसाहेब, संस्थान औंध

५.११ औंध संस्थानच्या राज्यघटनेसंबंधीच्या सन १९३९ च्या पहिल्या कायद्याच्या दुरुस्तीचा कायदा सन १९४४ चा (पहिला)

ज्या अर्थी औंध संस्थानच्या राज्यघटनेसंबंधीच्या सन १९३९ च्या पहिल्या कायद्याचे कलम २७ (आ) अन्वये सदर कायदा अंमलात आल्यावर पाच वर्षेपर्यंत पाच सभासदांपर्यंत सभासद कायदेमंडळावर नेमून देण्याचा श्रीमंत राजेसाहेब यांना असलेला अधिकार त्यांनी आणखी पाच वर्षेपर्यंत चालवावा असा कायदेमंडळाने ठराव केला असून त्याला श्रीमंत राजेसाहेबांनी मंजुरी दिलेली आहे व ज्या अर्थी या ठरावाची अंमलवारी करण्यासाठी औंध संस्थानच्या सन १९३९ च्या पहिल्या कायद्यात दुरुस्ती करणे आवश्यक आहे.

त्याअर्थी असा कायदा करण्यात येतो की,

५.११.१ लहान सरनामा

या कायद्यास औंध संस्थानच्या राज्यघटनेसंबंधीच्या सन १९३९ च्या पहिल्या कायद्याच्या दुरुस्तीचा कायदा सन १९४४ चा १ ला असे म्हणावे.

५.११.२ सुरुवात व व्याप्ती

हा कायदा श्रीमंत राजेसाहेब यांनी जारी केलेला एतद्विषयक सन १९४४ चा ऑर्डिनन्स पहिला औंध संस्थानचे आज्ञापत्रिकेत प्रसिद्ध झाल्या तारखेपासून अंमलात आला आहे, असे समजण्यात यावे व तो सर्व संस्थानास लागू असेल.

५.१२ औंध संस्थानच्या सन १९३९ च्या पहिल्या कायद्याचे कलम (आ) ची दुरुस्ती

औंध संस्थानच्या सन १९३९ च्या पहिल्या कायद्याचे कलम २७ (आ) ओळ पहिली यातील पाच वर्षेपर्यंत शब्दाऐवजी दहा वर्षेपर्यंत असे शब्द घालण्यात यावेत व या दुरुस्तीनुसार अस्तित्वात येणारे पोटकलम (आ) हे प्रथमपासूनच सदर राज्यघटनेच्या कायद्यात ग्रथित आहे असे समजण्यात यावे.

५.१२.१ दुरुस्तीपूर्वीच्या नेमणुका दुरुस्तीनुसार असल्याचे ठरवून त्यांची मुदत निश्चित करणे

श्रीमंत राजेसाहेबांनी दुरुस्तीपूर्वीच्या पोट कलमान्वये ज्या नामदार सभासदांना कायदेमंडळावर सभासद म्हणून नेमून दिले असेल त्यांच्या नेमणुका या दुरुस्त झालेल्या पोटकलमान्वये करण्यात आलेल्या आहेत असे समजण्यात यावे व त्यांच्या नेमणुकांची मुदत त्या करण्यात आल्या तारखेपासून एक वर्षाची राहवी.

मंजूर ता. २४.०४.४४

भवानराव (मोर्तब)

राजेसाहेब, सं. औंध

५.१३ संस्थानातील काही कायदे सुसंगत करण्याबाबतचा कायदा सन १९४५ चा (बारावा)

५.१३.१ सरनामा :- या कायद्यास संस्थानातील काही कायदे सुसंगत करण्याबाबतचा कायदा, सन १९४५ चा बारावा असे म्हणावे.

५.१३.२ व्याप्ती :- हा कायदा सर्व औंध संस्थानास लागू होईल.

५.१३.३ सुरुवात :- हा कायदा त्यास श्रीमंत राजेसाहेब यांनी मंजुरी दिल्या दिवसापासून अंमलात येईल.

१. (अ) औंध संस्थानचा राज्यघटनेचा कायदा सन १९३९ चा १ ला यातील कलम २१ (अ) यातील सरन्यायाधीश संस्थानच्या या शब्दापुढे व न्यायखात्याचे मुख्य या शब्दामागे हायकोर्ट ऑफ ज्युडिकेचर ॲक्टखाली हायकोर्टात करावयाचे नियंत्रणास पात्र राहून बाकी बाबतींत संस्थानच्या असे शब्द घालण्यात येत आहेत.

(आ) सदर कायद्याचे कलम २८ (अ) मधील इसमाने या शब्दापुढील व अर्ज या शब्दामागील हायकोर्टाकडे या शब्दाऐवजी सरन्यायाधीश कोर्टाकडे असे शब्द घालण्यात येत आहेत. तसेच सदर कलमातील पोटकलम आ रद्दकरून त्याऐवजी पुढीलप्रमाणे पोटकलम घालण्यात येत आहे.

(आ) सरन्यायाधीश कोर्टाचे निकालावर नाराज पक्षकारास हायकोर्टाकडे अपील करण्याचा हक्क राहील. मंजूर ता. १४.११.१९४५ इ.

७.१४ औंध संस्थानचा राज्यघटनेचा कायदा सन १९३९ चा पहिला दुरुस्त करणेसंबंधीचा कायदा १९४७ चा (आठवा)

ज्या अर्थी औंध संस्थानचा राज्यघटनेचा कायदा सन १९३९ चा पहिला दुरुस्त करणे जरूर आहे, त्या अर्थी यावरून खालीलप्रमाणे कायदा करण्यात येत आहे.

७.१४.१ सरनामा :- या कायद्यास औंध संस्थानचा राज्यघटनेचा कायदा १९३९ चा पहिला दुरूस्त करणेसंबंधीचा कायदा सन १९४७ चा ८ वा असे म्हणावे.

७.१४.२ सुरुवात व व्याप्ती :- हा कायदा त्यास श्रीमंत राजेसाहेब संस्थान औंध यांनी मंजुरी दिल्या दिवसापासून सर्व औंध संस्थानास लागू होईल.

७.१४.३ कलम :- औंध संस्थानच्या राज्यघटनेचा कायदा १९३९ चा पहिला यातील कलमे १० व ११ कमी करून त्याऐवजी खालीलप्रमाणे नवीन कलमे दाखल करण्यात येत आहेत.

१. औंध संस्थानचे कायदेमंडळ २७ सभासदांचे राहील. ते सभासद पुढीलप्रमाणे राहतील.

(अ) सर्व तालुका समित्यांचे अध्यक्ष हे कायदेमंडळाचे सभासद राहतील.

(आ) प्रत्येक तालुका समितीचे सभासदांतून त्या तालुक्यातील सर्व ग्रामपंचायतींच्या पंचांनी निवडून दिलेला इसम हा त्या त्या तालुक्यातर्फे विधिमंडळाचा सभासद राहील.

(इ) प्रत्येक तालुक्यातील मतदारांनी त्या त्या तालुक्यातर्फे दोन सभासद कायदेमंडळासाठी निवडून देण्याचे आहेत. सदर इसम ग्रामपंचायती अगर तालुका समित्या यांचे सभासद नसले तरी चालतील. मात्र ते औंध संस्थानचे रहिवासी असले पाहिजेत. अगर त्यांच्या स्वतःचे मालकीची किंवा ते एकत्र कुटुंबातील सहभागीदार असल्यास त्या कुटुंबाचे मालकीची संस्थानात स्थावर मिळकत असली पाहिजे. निवडणुकीच्या तारखेपूर्वी पाच वर्षांच्या अवधीत घेतलेल्या स्थावर मिळकतीमुळे कोणासही निवडणुकीस उभे राहण्याचा हक्क राहणार नाही.

(ई) विधिमंडळाकरिता एक स्त्री सभासद त्या त्या तालुक्यातील मतदारांकडून निवडला जाईल. तो प्रत्येक तालुक्यातर्फे एक याप्रमाणे क्रमाक्रमाने निवडला जाईल. तालुकेवार स्त्री सभासद निवडण्यासंबंधीचा क्रम ठरविण्याचा अधिकार मंत्रिमंडळास आहे. ह्या स्त्री सभासदांची मुदत एक वर्ष राहील.

(उ) औंध संस्थानातील कारखानदारांतर्फे एक सभासद कायदेमंडळावर निवडून दिला जाईल.

(ऊ) औंध संस्थानातील कारखान्यात काम करणाऱ्या कामगारांकडून कामगारातर्फे दोन कामगार विधिमंडळासाठी निवडले जातील. या निवडणुकीस उभा राहणारा उमेदवार कामगार कारखान्यातील रजिस्टर्ड युनियनचा सभासद असला पाहिजे.

(ए) प्रत्येक तालुक्यातील मतदारांकडून मतदाराचे यादीतील एक हरिजन इसम विधिमंडळातील सभासदांचे निवडणुकीसाठी प्रत्येक तालुक्यातर्फे उमेदवार म्हणून निवडला जाईल, व या पाच उमेदवारांतून एक उमेदवार विधिमंडळाचे २७ लोकनियुक्त सभासदांकडून बहुमताने विधिमंडळासाठी निवडला जाईल.

(ऐ) विधिमंडळावर दोन सभासद श्रीमंत राजेसाहेब यांच्याकडून नेमिले जातात, व त्यांची मुदत एक वर्षांची राहील.

१. ११ (अ) विधिमंडळ ही संस्था कायम स्वरूपाची राहील. कलम १० पोट कलम (आ) यातील सभासद तो तालुका समितीचा सभासद असेतोपर्यंत विधिमंडळाचा सभासद राहील. तालुका समितीतून निवृत्त झाल्यावर विधिमंडळातील त्या जागेची फेरनिवडणूक करण्याबद्दल श्रीमंत राजेसाहेब आदेश देतील.

(आ) कलम १० पोट कलम इ, उ, ऊ, ए अन्वये येणाऱ्या विधिमंडळातील सभासदांची मुदत चार वर्षांची राहील. त्यानंतर दर चार वर्षांनी सदर जागेची फेर निवडणूक करण्याबद्दल श्रीमंत राजेसाहेब आदेश देतील.

(इ) कलम १० यात नमूद केलेल्या ज्या सभासदांचे निवडणुकीबाबत हल्ली अंमलात असलेल्या नियमात तरतूद केलेली नाही, त्या सभासदाचे निवडणुकीबाबत नियम करण्याचा अधिकार मंत्रिमंडळास राहील.

(ई) ग्रामपंचायतीच्या निवडणुकीस फक्त साक्षर व ज्यांच्या वयास २१ वर्षे पुरी झाली आहेत अशा त्या गावच्या मतदारास निवडणुकीस उभे राहता येईल. संस्थानातील त्या त्या तालुक्यातील पदवीधर शिक्षक, ट्रेंड शिक्षक अगर प्रमुख संचालक व संचालक यांनी दिलेले साक्षरतेचे सर्टिफिकेट सदर उमेदवार साक्षर आहे असे मानण्यास पुरेसे समजण्यात येईल, व ते त्याच्या साक्षरतेच्या प्रश्नावर निर्णयात्मक समजण्यात येईल.

२. कलम २७ रद्दकरण्यात येत आहे व त्याऐवजी पुढीलप्रमाणे कलम घालण्यात येत आहे.

श्रीमंत राजेसाहेब यांच्या खाजगी खर्चासाठी संस्थानच्या उत्पन्नापैकी १/१० रक्कम देण्यात येईल.

३. सदर कायद्याचे कलम ४ यात तीन वर्षांसाठी असे शब्द आहेत त्याऐवजी चार वर्षासाठी असे शब्द वाचण्यात यावेत.

मंजूर ता. २१.४.४७ इ. भवानराव (मोर्तब)

राजेसाहेब, सं. औंध

५.१५ :- औंध संस्थानचे भवानराव ऊर्फ बाळासाहेब पंतप्रतिनिधी यांनी सांस्कृतिक स्थित्यंतराच्या काळात केलेले योगदान

औंध संस्थानचे भवानराव ऊर्फ बाळासाहेब पंतप्रतिनिधी यांची इ. स. १९०९ कार्तिक शु. नवमी १५ नोव्हेंबर १९०९ साली संस्थानचे गादीवर राजा म्हणून निवड झाली. त्यानंतर भवानराव पंतप्रतिनिधी यांनी प्रशासकीय कामात काही चांगले बदल केले. सामाजिक सुधारणा घडवून आणल्या, संस्थांमध्ये उद्योग चालू केले. संस्थानला विविध परिसरामध्ये विविध सुधारणा घडवून आणताना मूळ संस्कृतीशी नाते न तोडता समाजामध्ये असणारे अनेक दोष घालवण्याकरिता नवनवीन प्रकारच्या युक्त्या करून लोकांची धार्मिक वृत्ती जोपासून संस्थानला चांगल्या स्वरुपाच्या सेवा दिल्या. इंग्रजांच्या अधिपत्याखाली असलेल्या अनेक संस्थानांपैकी औंध संस्थान हे सुद्धा इंग्रजांच्या तैनाती फौजांच्या माध्यमातून अधिकार गाजवत असत. इंग्रजांच्या अधिपत्याखाली जरी औंध संस्थान असले तरी वेळप्रसंगी संस्थानातील लोकांच्या हिताकरता संघर्ष केला. जेव्हा त्यांच्या कारकिर्दीला म्हणजे १५ नोव्हेंबर १९३४ साली चौतीस वर्षें पूर्ण झाली. त्यावेळेला धार्मिक वृत्तीचे शंकराचार्य ते उद्योगपती किर्लोस्करांपर्यंत अनेक कर्तबगार समाजसुधारकांनी त्यांची स्तुती केली. त्यासंदर्भात त्यावेळचे रिटायर्ड डेप्युटी कलेक्टर काशिनाथ गणेश धांदरफळे यांनी एक सुंदर पत्र लिहिले. त्यामध्ये ते असे लिहितात, 'श्रीमंत भवानराव हे पहाटे साडेचार वाजता उठल्यापासून कुळाचर कुलधर्म पूर्ण करून कुलस्वामिनी जगदंबेचे दर्शन रोज करून संस्थानातील कारभाराचा आढावा घेऊन रात्री साठेआठपर्यंत काम करीत असत. त्यांना कसलेही व्यवसन नसून नितीप्रमाणे ते आचारण करत असत. सूर्यनमस्काराचा व्यायाम स्वतः करून कुटुंबातील सर्वांना व संस्थानातील सर्व शाळेतील मुलांना सूर्यनमस्कार सक्तीचे केले होते. समाजातील अस्थिरता जाऊन स्थिरता निर्माण व्हावी, यासाठी ते स्वतः कीर्तन करत असत. याच्याबरोबरच औद्योगिक क्षेत्रातही किर्लोस्करांसारखी माणसे घडविली व मोठी केली. स्वदेशी अवजारे वापरावीत व स्वदेशी कपडे घालावेत याकरिता ते सातत्याने प्रोत्साहन देत

असत. याशिवाय शाळेतून मुलांनी सूत कसे काढावे याचे शिण त्यांनी चालू केले होते. जातीभेदाकडे लक्ष न देता सर्वांनी शिकण्यावर ते जोर देत असत. वाङ्मय आणि कला यांच्यामध्ये भवानराव मोठे व्यासंगी होते. महाभारत, रामायण यांची पुस्तके स्वतःच्या छापखान्यात छापून तसेच सूर्यनमस्कार व आरोग्यविषयक पुस्तके औंधच्या छापखान्यात छापून प्रसिद्ध करत असत. समाजातील विविध सामाजिक संस्थांना त्यांनी मोठी आर्थिक मदत केली होती. त्यावेळी त्यांच्या काळात पंडीत मदन मोहन मालविय यांना हिंदू युनिव्हर्सिटीकरता दहा हजार रुपये त्याकाळी दिले व महाभारताच्या शुद्ध पाठाची प्रत तयार करण्याकरता एक लाख रुपये दिले. डोंगरावरील देवस्थानांना पायऱ्या बांधून देणे, रस्ता तयार करणे, डोंगरावर पाण्याची टाकी तयार करणे, त्याचप्रमाणे गावातील दुर्गम वस्तीत पाणी पुरवठ्याची व्यवस्था करणे, इलेक्ट्रीसिटी त्या काळात सर्व घरी पोहोचविली. अशा स्वरुपाची सामाजिक स्थित्यंतराची कामे भवानरावांनी कौशल्याने केली.

सांस्कृतिक स्थित्यंतराच्या या काळात बालविवाह न करणे, विधवांचे पुर्नविवाह करणे, मुलांप्रमाणे मुलींना शिक्षण देणे, आपल्या गावातील मुलांना उत्कृष्ट पोहता यावे, यासाठी तलावाची निर्मिती केली. त्याकाळात इंग्रजी भाषा शिकून इंग्रजांना त्यांच्याच भाषेत त्यांचे दोष सांगण्याचे काम त्यांनी केले. मुद्रण शास्त्रात प्रगती झाल्यामुळे स्वतःच्या मुद्रणखान्यातून समाजहिताची पत्रके काढताना इंग्रजांच्या चुकीच्या राज्ययंत्रणेवर टीकापण केली. जातीभेद नष्ट करणे, अस्पृश्यता समूळ नाहीशी करणे याकरिता स्वतःच्या घरापासून त्यांनी सुरूवात केली. त्यांच्याकडे येत असलेला एक इंग्रज अधिकारी मॉरीस फिडमन यांना संपूर्ण भारतीय करून त्याला भारतानंद अशी उपाधी जोडली जाऊ लागली. अशा तऱ्हेने स्वतःच्या हिंदू संस्कृतीच्या सत्त्वाला कोठेही तडा न जाऊ देता परकीयांच्या संस्कृतीतीत विकासाची तत्त्वे व निवडक गुण घेऊन त्यांनी सांस्कृतिक स्थित्यंतरात मोलाचीच भर घातली आहे (चाफेकर ना. गो., १९३४ : ७१).

५.१६ महाराष्ट्रातील मराठाकालीन संस्थानातील राजवाड्यांच्या अंतर्गत लाकडाच्या व दगडाच्या जोडकामाच्या संदर्भात माहिती

महाराष्ट्रातील मराठाकालीन संस्थानातील राजवाड्यांच्या अंतर्गत लाकडाच्या व दगडाच्या जोडकामाच्या संदर्भात हे चित्र आहे. पहा चित्र क्र. ५.१ छायाचित्रामध्ये क्र. १ ही लाकडाची तुळई आहे. क्र. २ लाकडाचा हस्त आहे. क्र. ३ लाकडाचा स्तंभशीर्ष आहे. क्र. ४ हा लाकडाचा भरीव स्तंभ आहे. क्र. ५ तळखडा हा काळ्या पाषाणाचा असून तो एका विशिष्ट आकारात घडवलेला आहे. तो अशा प्रकारे घडवलेला असतो की, लाकडाचा स्तंभ ज्या मापाचा असेल त्यापेक्षा घडविलेल्या तळखड्याचा वरचा

भाग हा चारही बाजूंनी किमान १ इंचापेक्षा मोठा असतो. तळखडा व स्तंभ यांना एकमेकांमध्ये लोखंडी सळईने त्यांच्या पोटात जोड दिलेला असतो, तो बाहेरून दिसत नाही. अशा पद्धतीने लाकडाच्या व ढगडाच्या जोड कामासंदर्भात वरील चित्र आहे (माटे म. श्री., २००८:६४).

महाराष्ट्रातील निवडक मराठाकालीन संस्थानांमधील राजवाड्यांच्या अंतर्गत नेहमीच बघायला मिळणाऱ्या लाकडांच्या व ढगडांच्या जोडकामांच्या संदर्भात माहिती

१. लाकडाची तुळई :- छताला आधार देण्याचे काम करते. तुळई दोन लाकडांच्या स्तंभावर आधारित असते. काही छोट्या तुळ्या ज्या दोन मोठ्या तुळ्यांना जोडलेल्या असतात. त्या तुळ्यापण छताला आधार देण्याचे काम करतात. मराठाकालीन तुळ्यांमध्ये ०.०६ मी. ते ०.१० मी. उंची असलेल्या, ०.४६ मी. ते ०.०७ मी. जाडी असलेल्या व त्याची लांबी किमान १.८३ मी. ते ६.१० मी. लांबीपर्यंतच्या असतात. मराठाकालीन तुळ्या या भराव सागवानी लाकडाच्या आहेत. हे सर्व सागवान लाकूड पूर्णपणे वाळल्यावर परत पाण्यामध्ये ठेवून परत वाळवून तयार केले जाते, यालाच तयार सागवान लाकूड असे म्हणतात. अशी सर्व तयार सागवानी लाकडे, तुळ्या, स्तंभ, स्तंभशीर्ष, हस्त, तीर याठिकाणी वापरली जातात.

२. हस्त :- वरील चित्रामध्ये आपण हस्त बघत आहोत. हे हस्त तयार सागवान लाकडाचे असून ०.२३ मी. जाडी, ०.२३ मी. उंची व लांबी ०.६० मी. अशा लाकडाच्या ठोकळ्यातून हा हस्त बनवला जातो. हस्ताची जास्त लांबी असलेली बाजू तुळईला टेकलेली असते व उर्वरित तीन बाजूंवर बऱ्याच ठिकाणी कोरीव काम केलेले आढळते. हा हस्त स्तंभशीर्ष व तुळई या दोघांच्यामध्ये भक्कम आधार देण्याचे काम करतो. हस्त जर वापरण्यात आला नाही तर तुळईवर छताचा जास्त भार येऊन तुळई तुटू शकते, म्हणून हस्ताची भूमिका जास्त महत्त्वाची आहे.

३. स्तंभशीर्ष :- स्तंभशीर्ष हा हस्त आणि स्तंभ यांच्यामध्ये असलेला महत्त्वाचा घटक आहे. स्तंभशीर्ष हे स्तंभाच्यापेक्षा उंचीला कमी असून जाडीला व रूंदीला मोठे असते. उदा. ०.४६ मी. X ०.३० मी. या लाकडाच्या ठोकळ्यातून स्तंभशीर्ष घडविला जातो. रूंदीने मोठ्या असलेल्या बाजूवर हस्त टेकलेलाअसतो. दुसऱ्या बाजूने स्तंभ टेकलेला असतो. उर्वरित चारही बाजूंनी त्याच्यावर अनेक ठिकाणी कोरीव काम केलेले आढळते. स्तंभशीर्ष नसेल तर हस्त व स्तंभ यांना आधार मिळणार नाही, म्हणून स्तंभशीर्ष हा महत्त्वाची भूमिका बजावतो.

४. स्तंभ :- ०.२३ मी. X ०.२३ मी. ते ०.६० मी. X ०.६० मी. जाडी रूंदी असलेले व उंचीला १.८३ मी. ते ४.५७ मी. उंच असलेले अशा स्वरूपाचे तयार स्तंभ आपणांस अनेक राजवाड्यात बघण्यास मिळतात. स्तंभ हा स्तंभशीर्ष व तळखडा यांच्यामधला तसेच संपूर्ण मराठी स्थापत्यामध्ये छताला आधार देणारा स्तंभ असतो. स्तंभ जर गोलाकार असेल तर तळखड्याच्या ठिकाणी ०.३० मी. व्यासाचा व स्तंभशीर्षापर्यंत जाईपर्यंत तो ०.२३ मी. चा केलेला असतो. याचे कारण या स्तंभावर विविध प्रकारचे कोरीव काम केलेले असते. स्तंभाचा भक्कमपणा कमी होऊ नये, याकरिता कोरीवकाम करताना कोरीव काम करताना काळजी घेतली जाते, असा हा अत्यंत महत्त्वाचा असलेला स्तंभ महत्त्वाची भूमिका करतो.

५. तळखडा :- तळखडा हा काळ्या पाषाणातून बनवलेला असतो. साधारणतः ०.४६ मी. X ०.४६ मी. X ०.३० मी. या काळ्या पाषाणाच्या ठोकळ्यातून ज्या-ज्या ठिकाणी जसा आवश्यक आहे. तसा त्या-त्या ठिकाणी वापरलेला असतो. तळखड्याची वरची बाजू ही लाकडी स्तंभाला आधार देते व तळाची बाजू खालच्या जमिनीवर किंवा तळखड्याखाली असलेल्या ढगडी फरशीवर आधारित असते. तळखडा व जमीन तळखडा व स्तंभ, स्तंभ व स्तंभशीर्ष, स्तंभ व हस्त, हस्त व तुळई या सर्वांचा एकमेकांमध्ये गुताव केलेला असतो. हा गुताव त्यांच्या पोटातल्या पोटात लाकडाच्या पाचरीने किंवा स्वतःच्याच अंगाच्या केलेल्या लाकडी पाचरीने किंवा गोल लोखंडाच्या बारा एम एम जाडीच्या गोल लोखंडाच्या तुकड्याने किंवा लोखंडाच्या तुकड्याबरोबर शिसे पातळ करून सुद्धा गुताव केलेला असतो. असा हा ढगडाचा तळखडा स्तंभाच्या पायाभरणीचे काम करतो.

६. तीर :- तुळई व स्तंभ यांना जोडण्याचे हा तीर काम करतो. साधारणतः ०.२३ मी. X ०.२३ मी. ते १.२० मी. X १.८३ मी. लांबी असलेल्या लाकडी ठोकळ्यातून हा हस्त बनवलेला असतो. हा हस्त चारही बाजूंनी दृष्टीला पडत असल्यामुळे याला चारही बाजूंनी कोरीव काम केलेले असते व हे नुसते कोरीव काम नसून त्याला एखाद्या प्राण्याचे आकारात घडवून आकर्षक राजवाड्याच्या सौंदर्यात भर टाकणारे असे घडवलेले असते. तीर हा बहुतांशी राजवाड्यांच्या ढगडी चौकात पहिल्या मजल्याच्या तळातून बाहेर आलेल्या छताच्या खाली असलेल्या ठिकाणी बघण्यास मिळतो. मुख्य अंगापेक्षा बाहेर आलेल्या छताला आधार देण्याचे तसेच दोन स्तंभांमधील अंतर पंधरा फूटांपेक्षा जास्त असेल तर त्या स्तंभांना जोडणाऱ्या तुळईला आधार देण्याचे तीर काम करतो. हे तीर स्थापत्य शास्त्राच्या दृष्टीने जास्त लांबी, रूंदी

असलेल्या सभागृहांच्या स्तंभांना किंवा सभामंडपांना स्तंभ ते तुळई असे आधार देण्याचे शास्त्रीयदृष्ट्या काम करतो. वरील चित्रात आपणांसया सर्वांच्या जागा स्पष्टपणे दिसतात.

त्याचप्रमाणे लाकड्याच्या व दगडाच्या छताच्या कामासंदर्भात आवश्यक असलेले जोडकाम कशा पद्धतीचे असते, यासाठी पहा चित्र क्रमांक ७.३

७. कैची :- सर्वांत वरच्या छताकरीता किंवा ज्या मजल्याचे काम थांबवयाचे आहे, अशा कुठल्याही मजल्याच्या छताकरिता चित्रात दाखविल्याप्रमाणे अशा प्रकारच्या कैच्या बनवून त्यावरती लाकडाचे उभे, आडवे लांबच्या लांब ०.६० मी. X ०.६० मी. जाडीच्या लाकडाच्या पट्या अंथरून व त्याचा एकमेकांमध्ये गुताव करून व त्या पट्यांमध्ये कौलाच्या लांबीइतके अंतर ठेवून त्यावर दोन प्रकारची कौले किंवा खापरे किंवा अलिकडच्या काळातील लोखंडी पत्रे ठेवून त्याची नीट बांधणी करत असत. बाहेरून कौलाचे उतरते छत या कैंचीमुळे छताला उतार देता येतो. कैची संपूर्ण सागवानी लाकडाची बनलेली असते. अलिकडच्या स्थापत्यविषयक स्थित्यंतराच्या काळात ती लोखंडी ख सेक्शन, ङ सेक्शन, किंवा सेक्शन किंवा अँगल यांचा वापर करून बनविलेली असते. त्याला इंग्रजीमध्ये "Queen Post" असे म्हणतात. या लोखंडी छतांवर पत्रे बसविण्याकरीता इंग्रजी ग आकाराच्या बोल्टचा आणि लोखंडी बॉशर यांचा वापर करतात. ज्या ठिकाणी ही संपूर्ण कैची लाकडाची असते. ती कैची त्रिकोणाकृती आकारामध्ये बनविली जाते. या त्रिकोणाला पोटात आधार देण्याकरीता लाकडाचाच वापर केला जातो. साधारणतः ०.१० मी. X ०.१० मी. ते ३.०५ मी. X ४.५७ मी. लांबीची असलेल्या कैच्या बनविल्या जातात. ते संपूर्ण सागवानी तयार लाकूड असते.

८. त्रिकोणी दगडांचे छत :- वरील चित्रामध्ये दिसणारे दगडांचे छत बहुतांशी मंढीरांच्या छोट्या गाभाऱ्यांकरीता तयार केले जाते. खालून वरती येणाऱ्या गाभाऱ्यांच्या चारही बाजूंच्या भिंतीवर चौकोनी आकाराचे गाभाऱ्याच्या लांबी-रूंदी एवढे दगडांचे तुळया सदृश दगड अंथरले जातात. चारही दिशेला दगड आल्यामुळे चारही कोपऱ्यांना वरील दगडांच्या आधाराकरीता त्रिकोणी आकाराचे दगड ठेवले जातात. त्यामुळे छताची आतील बाजू लहान होते. त्याच्यावरती परत चौकोनी आकारात दगड ठेवले जातात. त्यामुळे गाभाऱ्याच्या छताचा आतील भाग कमी होतो, असे त्रिकोणी व चौकोनी दगड वापरून छत पूर्ण केले जाते व सर्वांत शेवटी उंचीवर रहाणाऱ्या छोट्या गोलाकार पोकळीमध्ये दगडाची फरशी बसवून तोंड बंद केले जाते.

९. घुमटाकार छत :- वरील त्रिकोणी ढगडांच्या छतासारखेच या छताची रचना असते. त्रिकोणी ढगडांच्या छतामध्ये प्रत्येक कोपऱ्याला त्रिकोणी ढगड लावतात, त्याऐवजी घुमटाकार छतामध्ये तोच ढगड तशाच पद्धतीचा ढगड आतून गोलाई करून बसवितात. जशी शिखराची उंची वाढेल तसे एकमेकांवर गोलाकार ढगड बसवून छत पूर्णपणे झाकले जाते. या गोलाकार ढगडांच्या खालच्या बाजूस जो भाग गाभाऱ्यात गेल्यावर वरती बघितल्यावर दिसणार आहे. त्या भागावर ढगडाचे कोरीव काम केले जाते. यामध्ये फुलांचे आकार वेलींचे आकार, प्राण्यांच्या तोंडाचे आकार, शुभचिन्ह उदा. कमळ अशा स्वरूपाचे कोरीव काम करून हे छत सुशोभित करतात.

१०. झुकावाची कमान :- ही कमान राजवाड्यातील एका दालनातून दुसऱ्या दालनात जाण्यासाठी बांधण्यात येते. चित्रात दाखविल्याप्रमाणे दोन मोठ्या अर्धगोलाकार पाकळ्या दिसतील अशा पद्धतीने ढगडाचे बांधकाम केले जाते. दोन पाकळ्यांचा आतील भाग पोकळ असतो, त्यामध्ये लाकडाची चौकट बसू शकते व बाहेरील भाग ढगडांनी भक्कम बांधलेला असतो. झुकावाची कमान बांधताना कमानीच्या आतील बाजूस जे ढगड दिसतात, त्यांना ढगडाच्या हत्यारांच्या सहाय्याने गोलाई दिलेली असते. झुकावाच्या कमानीच्या भिंतीची जाडी साधारणतः ०.६० मी. एवढी असते.

११. पाचराची कमान :- झुकावाच्या कमानीप्रमाणेच याचा आकार दोन पाकळ्यांमध्ये असतो. कमानीच्या अंगानी म्हणजे आतल्या बाजूनी घडविलेल्या ढगडांचे बांधकाम केलेले असते. कमानीचा सर्वांत वरचा ढगड अशा पद्धतीने घडविलेला असतो की, त्या ढगडामुळे त्याच्याखाली असलेले ढगड कमानीच्या आत पडणार नाहीत. झुकावाची कमान आणि पाचरीची कमान या दोन्हीमध्ये एक महत्त्वाचा फरक आहे. तो म्हणजे पाचरीच्या कमानीचे ढगड एकमेकांना जोडताना अशा पद्धतीने जोडतात की, ढगड आतल्या बाजूला पडत नाहीत व कमान भक्कम राहते. पण झुकावाच्या कमानीत हे ढगड आत पडण्याची शक्यता जास्त असते, कारण प्रत्येक ढगड हा स्वतंत्र असतो. पाचरीची कमान ही भक्कम स्वरूपात बनविता येते म्हणून राजवाड्यांच्या मुख्य दरवाज्याच्या बाजूनी व मंढीरांच्या गाभाऱ्यांच्या मुख्य दरवाजाच्या बाजूनी ही कमान बनविली जाते.

महाराष्ट्रातील मराठाकालीन संस्थांनामधील राजवाड्यांच्या अंतर्गत लाकडाच्या व ढगडाच्या जोडकामासंदर्भात या प्रबंधातील सर्व राजवाड्यांमध्ये उदा. सातारा, भोर, औंध, फलटण व नागपूर

यांची एकत्रित सामायिक माहिती वरती दिली आहे. कारण अशा स्वरूपाची कामे सर्वच राजवाड्यात एकसारखी आढळून येतात. म्हणून याचा एकत्रित उल्लेख केलेला आहे.

५.१७ औंध संस्थानामधील स्थापत्य व स्थापत्यामधील झालेली स्थित्यंतर याचे चित्र क्रमांकासहित संशोधनात्मक निरीक्षण

मराठाकालीन संस्थानांमध्ये एकोणीसाव्या शतकात आंग्लशाही चालू झाली. त्यामुळे युरोपियन आर्किटेक्चर यांचा स्थापत्यावर परिणाम झाला. त्यामधून औंध संस्थानसुद्धा सुटले नाही. औंध संस्थानातील यमाईदेवीच्या मंदिराच्या सभागृहामधील छतांमध्ये आपल्याला हे स्पष्ट दिसते की, आंग्ल पद्धतीने केलेल्या रंगकामामुळे व सजावटीमध्ये मूळ लाकडाच्या असलेल्या छतामध्ये झालेला बदल पहा चित्र क्रमांक : ५.४ व ५.५ औंध संस्थानातील राजवाड्याच्या आतमध्ये असलेल्या यमाई मंदिराच्या सभागृहामधील छतांचीही चित्रे आहेत. या चित्रांमध्ये काही ठिकाणी कडीपाटाचे छत दिसत आहे. काही भागात लाकडाचे कोरीव काम केलेल्या छतामध्ये थोडासा बदल करून आधुनिक पद्धतीने रंगविले आहे. आधुनिकतेचा थोडा वापर केल्यामुळे मूळ लाकडाचे उठावदार, दिसणारे छत आधुनिक फॉल सिलिंग केल्याप्रमाणे दिसत आहे. इंग्रजांच्या राजवटीत काही संस्थानिकांच्या मनात नवीन कल्पना आल्या. राजवाडा व राजवाड्यातील इतर वास्तूंचे मूळ सौंदर्य त्याठिकाणी केलेल्या लाकडाच्या कोरीव कामांना बेल तेल किंवा काजूचे तेल याचा योग्य पद्धतीने वापर केल्यास लाकूड दीर्घकाळ टिकते व त्याला एक प्रकारची चकाकी येते हे ते विसरले व आधुनिक ऑईलपेंट सारखे रंग देऊन त्याचे सौंदर्य नष्ट केले. स्थापत्यातील स्थित्यंतराच्या या काळात मराठा स्थापत्य शैलीचे हे एक प्रकारे नुकसानच आहे. या मंदिराच्या सभागृहात लावलेली चित्रे मात्र पौराणिक स्वरूपाची दिसत आहे. कृष्णजन्मापासून ते महाभारतातील श्रीकृष्ण यामधील अनेक प्रसंगाचे राजा रविवर्मा यांनी काढलेली चित्रे आपणास दिसत आहेत. चित्रांमधील पौराणिकता व आधुनिक पद्धतीचे रंग देऊन केलेले सभागृहाचे छताचे काम व लावलेली झुंबरे व युरोपियन पद्धतीची ठेवण असलेल्या खिडक्या आहेत. स्थापत्यविषयक स्थित्यंतराकरिता ही दोन्ही चित्रे बोलकी आहेत.

औंध संस्थानाच्या राजवाड्याच्या दरबारगृहामध्ये सुद्धा मूळ स्थापत्यापेक्षा वेगळे असे बरेच काही दिसत आहे. त्यांनी केलेले रंगकाम हे मराठा संस्थानिकांच्या मूळ प्रतिमेमध्ये बदल दाखविते. पहा चित्र क्रमांक:५.६ औंध राजवाड्याच्या दर्शनी भागाचे हे चित्र आहे. पहिल्या मजल्यावरील दरबार हॉल व पाठीमागे असलेले यमाई देवीचे मंदीर दिसत आहे. या चित्रात दिसणाऱ्या पहिल्या मजल्यावरील असलेल्या दरबार हॉलमध्ये असलेल्या कोरीव काम केलेल्या लाकडाच्या कमानी, लाकडाचे स्तंभ यांना

आधुनिक रंगांनी रंगविले आहे. दोन लाकडी स्तंभामध्ये असलेले कठडे हे अलिकडच्या काळातील लोखंडी ग्रीलसारखे रंगवलेले दिसत आहेत. मूळ लाकडाच्या कोरीव कामाला उदा. लाकडाचे स्तंभ, कमानी, खिडक्या व दरवाजे तुळ्या व छत यांना आधुनिकतेचा साज चढविल्यामुळे मूळ सौंदर्यापासून दर्शनी भाग दूर जातो. याच दरबार हॉलमध्ये सध्याची राणी गायत्रीदेवी विजयादशमीच्या दिवशी येऊन सोने (आपट्याची पाने) वाटपाचा परंपरागत कार्यक्रम करत आहे. या वाड्यातील यमाई देवीचे मंदिर भक्कम दगडात बांधले गेलेले आहे व मंदिराचे शिखरही साठ फूट उंचीचे असून त्यालाही आधुनिक पद्धतीने रंगकाम केलेले आहे. मूळ मंदीराचे दगडाचे गर्भगृह व जोते हे अत्यंत भक्कम स्वरूपाचे असून त्यावरही दगडाचे कोरीव काम केलेले दिसत आहे. इ. स. १८१८ नंतर संस्थानिकांचा बराचसा कारभार इंग्रजांच्या ताब्यात गेल्यामुळे वास्तुरचनेत बदल झाले व स्थापत्यामधील स्थित्यंतराला सुरवात झाली असे सर्वच संस्थानिकांमध्ये दिसून येत आहे.

भारतीय संस्कृतीमध्ये दिपमाळेला निश्चित स्वरूपाचे महत्त्व आहे. औंध संस्थानातील स्थापत्याचा एक उत्कृष्ट नमूना म्हणून कारगिरांचे कौशल्य पणाला लावून केलेली ही दिपमाळ इंजिनिअरिंगच्या दृष्टीने महत्त्वाची ठरते. औंध संस्थानच्या राजवाडयाच्या अंतर्गत असलेली ही दिपमाळ २७ मीटर उंचीची असून स्थापत्यशास्त्राचा उत्कृष्ट नमुना आहे. कारण बहुतांशी संस्थानांमध्ये किंवा मंदिरांच्या समोर वीस फूटापर्यंत आपण दीपमाळा बघितल्या आहेत. परंतु ही दीपमाळ मात्र त्यापेक्षा चौपटीने मोठी आहे. स्थापत्यशास्त्रामध्ये अशा स्वरूपाच्या अष्टकोनी दीपमाळेला करण्याकरीता अत्यंत कुशल असे कारागिर लागतात. यामध्ये गणित चुकवून चालत नाही. जशी जशी दिपमाळ वरती जाईल तसे तसे जमिनीवर घडविलेले दगड वरती नेण्याकरीता त्याच्या वजनाचा व त्याच्या आकारमानाचा कारागिराला अंदाज आल्याशिवाय वरती दगड ठेवता येत नाहीत. ही दीपमाळ खाली ६ मीटर व्यासाची असून वरपर्यंत निमुळती होत जाते. तेव्हा तिचा व्यास फक्त १ मीटर झालेला दिसत आहे. प्रत्येक ६ मीटरनंतर दगडाचे छज्जा सदृश एक छत तयार केले आहे. मूळ अंगापेक्षा हे छत ०.४७ मीटर बाहेर आलेले आहे. अशी चार छते त्याला आहेत व खालपासून वरपर्यंत एक एक मीटरवर उभे आडवे हस्त बाहेर आलेले आहेत. दीपमाळेचे जोते, त्यावरील संपूर्ण दीपमाळ, हस्त, सदृश छत व दीपमाळेवरील सर्वात वरती असलेला कळस हे सर्व काळी काळ्या पाषाणात घडीव दगडांचे आहेत. ही संपूर्ण दीपमाळ बनवत असताना शंभर फूटाचा बांबूचा पहाड चारही बाजूंनी तयार केलेला होता. खालपासून वरती जायला व घडविलेले दगड, वाळू, चुना वरती नेण्याकरीता दोरखंडांचा व लोखंडी

चाक असलेल्या चापाचा उपयोग केला गेला. औंध संस्थानातील विविध स्थापत्यांमध्ये ही ढीपमाळ स्थापत्यशास्त्राचा उत्कृष्ट नमुना आहे.

औंध संस्थानचे राजे यांना संग्रहाची खूप आवड होती. त्यामध्ये चित्रकार रवी वर्मा यांनी काढलेली चित्रे, अजंठा वेरूळ या लेण्या असलेली पुराण चित्रे, त्यांनी स्वतः रेखाटलेली व काही चित्रकारांकडून काढून घेतलेली चित्रे त्यांच्या संग्रहालयात आहेत. त्याचप्रमाणे काही मिळविलेल्या मूर्ती आणि काही कारागिरांकडून घडवून घेतलेल्या मूर्ती राजांनी एका चौकामध्ये ठेवून चांगले सुशोभिकरण केलेले होते. अलीकडच्या काळामध्ये त्या चौकातील सजावटीचा कल युरोपियन रंगकामाकडे झुकल्यामुळे त्या चौकाचे पुरातत्त्व कमी झालेले दिसत आहे. पहा चित्र क्रमांक : ५.७ या चित्रामध्ये दुसऱ्या चौकातील तुळशी वृंदावन दिसत आहे. त्याचप्रमाणे श्रीशंकर, श्रीसरस्वतीदेवी व अजून एका देवतेची मूर्ती व इतर काही मूर्ती काळ्या पाषाणात कोरून दगडांवरील स्तंभावर ठेवलेल्या दिसत आहेत. मूर्ती अत्यंत सुबक पद्धतीने घडविल्या आहेत. त्यांची देखभाल नीट दिसत नाही. या चौकातील पहिल्या मजल्यावरील दरवाजे, छज्जा, लाकडी स्तंभ व त्याला जोडणारा कठडा हे सर्व आधुनिक पद्धतीने रंगविल्यामुळे त्या चौकाचे पुरात्त्व कमी झालेले आहे. वरील चित्रामध्ये मूळ अंगापासून बाहेर आलेला छज्जा (छताचा भाग) याला खालून आधुनिक पद्धतीने लोखंडाचे हस्त आधारासाठी व भक्कमपणासाठी जोडलेले दिसत आहे. चौकातील दगडाची फरशी व जोते, लाकडी स्तंभातील तळखडा हा पूर्णपणे घडविलेल्या माटीव दगडांमध्ये आहे. एकंदरीतच औंध राजवाड्यामध्ये स्थापत्यातील स्थित्यंतर दिसत आहे.

या प्रबंधामध्ये सातारा, भोर, फलटण आणि नागपूर या राजवाड्यांच्या संदर्भात त्यांचे स्थापत्यविषयक नकाशे जोडले आहेत. या प्रकरणामध्ये औंध संस्थानचा जो स्थापत्यविषयक नकाशा जोडलेला आहे, तो थोड्याशा वेगळ्या स्वरूपाचा आहे. कारण कुठल्याही राजवाड्यामध्ये तुळयांची (Beam), लाकडाचे खांब (Columm) यांचे एकमेकांमधील अंतर व कशा लांबी-रूंदीच्या असावेत याकरीता पहा चित्र क्रमांक : ५.८, ५.९ व ५.१० औंध राजवाड्याच्या नकाशामध्ये आपल्याला तळमजल्यावरील स्थापत्यचा व पहिल्या मजल्यावरील स्थापत्याचा नकाशा दिसत आहे. या नकाशामध्ये उजव्या बाजूला सर्वात वरती संपूर्ण राजवाड्याचा संक्षिप्त स्थापत्यविषयक आराखडा दिलेला आहे. त्या खालील नकाशामध्ये सविस्तर स्तंभ, तुळ्या, भिंत, खिडक्या, दरवाजे, चौक, सभामंडप, दरबार सभागृह, सोपा सदर ठिकाणी असलेल्या लाकडी स्तंभांची जागा व तुळ्यांची मापे, खिडक्यांची व दरवाजांची बाहेरील मापे, दोन लाकडी स्तंभामधील अंतर, जीन्याची जागा, दोन

खिडक्यांमधील अंतर, भिंतीची जाडी, पायऱ्यांची रूंढी हे सर्व मापानुसार अभ्यास करण्याकरीता संशोधकांना उपयोगी पडेल अशा स्वरूपाची माहिती आहे. वरील नकाशामध्ये पहिला व ढुसरा मजला अशी एकत्रित माहिती ढिलेली आहेत. यामध्ये राजवाड्याच्या पश्चिमेकडील भागाचे व ढक्षिणेकडील भागाचे स्थापत्यविषयक मापासहित आराखडे आहेत.


५.१८ सारांश :- या प्रकरणामध्ये औंध संस्थानची भौगोलिक स्थिती त्याचप्रमाणे औंध संस्थानचे संस्थापक परशुराम त्र्यंबक किन्हईकर (प्रतिनिधी हे पढ छत्रपती राजाराम महाराजांच्या काळात ढेण्यात आले.) याचा इतिहास छत्रपती संभाजी महाराजांच्या बलिढानानंतर मोगलांनी म्हणजेच औरंगजेबाने केलेल्या आक्रमणांना तोंड ढेण्यासाठी परशुराम त्र्यंबक, धनाजीराव जाधव, शंकराजी नारायण, संताजीराव घोरपडे, रामचंद्रपंत अमात्य या सर्वांनी केलेल्या पराक्रमामुळे मराठा राज्य कसे टिकून राहिले व औंध संस्थान कसे निर्माण झाले या सर्व इतिहासाचा आढावा घेण्यात आला आहे. त्याचप्रमाणे औंध संस्थानची राज्यघटना ही एकमेव राज्यघटना अशी होती की ती आढर्श राज्यघटना म्हणून एक उत्कृष्ट राज्यव्यवस्था कशी असावी हा एक प्रशासकीय आढर्श कार्ययंत्रणा म्हणून जशी आहे तशी अत्यंत ढुर्मिळ स्वरूपाची असून त्याचा उल्लेख या प्रकरणात केली आहे. ही राज्यघटना औंध एक्सप्रिंमेंट म्हणून भारतभर असलेल्या संस्थांनिकांमध्ये प्रसिध्ढ होती. या प्रकरणामध्ये औंध संस्थानचे राजे भवानराव राजेसाहेब यांच्यामुळे समाज जीवनामध्ये काही सांस्कृतिक बढल घडले याचा पण आढावा या प्रकरणात घेतला आहे. सर्वांत आश्चर्याची गोष्ट म्हणजे एक इंग्रज अधिकारी मॉरीस फिडमन भवानरावांच्या कार्यपद्धतीने प्रेरीत झाला होता. त्याने स्वतःला भारतानंढ हे नाव धारण करून भारतीय संस्कृतीचा स्विकार केला. औंध, भोर, फलटण, सातारा व नागपूर या सर्वच राजवाड्यांची रचना व स्थापत्यविषयक निष्कर्ष व त्यांची निरिक्षणे साधारणतः एकसारखी आहे म्हणून त्याचा उल्लेख प्रकरण ६ मध्ये केलेला आहे.

५.१९ उपसंहार :- मराठ्यांचे स्वराज्य टिकविण्यासाठी मराठ्यांचा राजा मराठ्यांच्या भूमीत नसतानाही ज्यांनी पराक्रमाची शर्थ केली व निष्ठेने राजानेच पालन केले अशा प्रमुख सरढारांमध्ये परशुराम त्र्यंबक या लढवय्या सरढाराचे नाव विसरता येणार नाही. या कामगिरीबद्दल छत्रपती राजारामांनी त्यांना प्रतिनीधी हे पढ ढिले व मुख्य सत्तेच्या प्रवाहात आणले. त्यांनी आपली निष्ठा छत्रपती घराण्याची महाराणी ताराबाई यांना समर्पित केली होती व नंतर छत्रपती संभाजी महाराजांचे पुत्र शाहू यांच्याशी अत्यंत प्रामाणिक राहून आपली निष्ठा त्यांना अर्पण केल्याचे जाणवते. त्यांच्या वंशजांनी संस्थान चालवत असताना आंग्लशाहीच्या काळात काही नव्या सुधारणा केल्या, परंतु स्वधर्माला व कुळाचाराला

बाधा येईल असे काहीही न करता सुधारणा केल्या. प्रत्येक संस्थानात प्रशासकीय स्थित्यंतरे घडतच होती, परंतु ही स्थित्यंतरे घडत असताना राज्य व्यवस्था अस्ताव्यस्त होऊ नये म्हणून एक उत्कृष्ट राज्यघटना तयार केली व ती सर्व भारतभर गाजली. परशुराम त्र्यंबक यांचे वंशज भवानराव पंतप्रतिनीधी यांनीही राज्यघटना बनविण्यासाठी विशेष परिश्रम घेतले. राज्यातील शेवटच्या माणसापर्यंत सुधारणा पोहचाव्यात व तो संरक्षित व्हावा, याकरिता या घटनेचा आदर्श राज्यघटना म्हणून उल्लेख करावा लागेल. आंग्लशाहीमध्ये ज्याप्रमाणे इतर संस्थानात बदल घडत गेले तसेच बदल इथे घडत असतानाही स्वदेशी उद्योगांकरीता विशेष प्रयत्न केले. प्रशासकीय व सांस्कृतिक स्थित्यंतराच्या या काळात औंध संस्थानचा वेगळाच ठसा निर्माण झाला होता.


५.२० औंध संस्थानामधील स्थापत्य व स्थापत्यामधील झालेली स्थित्यंतर याचे नकाशे व छायाचित्रे

चित्र क्रमांकः ५.२




महाराष्ट्रातील मराठाकालीन संस्थानांमधील राजवाड्याच्या अंतर्गत लाकडाच्या व ढगडाच्या जोड कामासंदर्भात माहिती

चित्र क्रमांकः ५.३



महाराष्ट्रातील मराठाकालीन संस्थानांमधील राजवाड्याच्याअंतर्गत लाकडाच्या व दगडाच्या जोड कामासंदर्भात माहिती

चित्र क्रमांकः ७.४



छताच्या नक्षीकामाचे छायाचित्र

चित्र क्रमांकः ७.७



औंध संस्थानातील राजवाड्याच्या आतमध्ये असलेल्या

यमाई मंदिराच्या सभागृहामधील छतांचीही चित्र

चित्र क्रमांकः ७.६




औंध राजवाड्याच्या दर्शनी भागाचे चित्र

चित्र क्रमांकः ७.७




औंध राजवाड्यातील दुसऱ्या चौकातील तुळशी वृंदावनाचे चित्र

चित्र क्रमांकः ७.८




औंध राजवाड्याच्या तळमजल्यावरील स्थापत्याच नकाशा

चित्र क्रमांकः ५.१



औंध राजवाड्याच्या तळमजल्यावरील मजल्यावरील स्थापत्याचा नकाशा

चित्र क्रमांकः ५.१०



औंध राजवाड्याच्या पहिल्या मजल्यावरील स्थापत्याचा नकाशा

प्रकरण ६

फलटण संस्थान

प्रकरणाचा तपशिल

क्रमांक	तपशिल	पृष्ठ क्रमांक
प्रकरण ६ :	**फलटण संस्थान**	**२३३**
६.१	फलटणची ऐतिहासिक माहिती	२३६
६.२	फलटण संस्थानचे प्रशासकीय परंपरागतअधिकार	२३९
६.३	राजवाड्याचे स्थापत्य व राजवाड्याचे स्थापत्यविषयक निरिक्षणे	२३९
६.३.१	काळापाषाण	२३९
६.३.२	भाजलेल्या मातीच्या विटा	२३९
६.३.३	चुना, नढीचीवाळू व त्याचेप्रकार	२४०
६.३.४	लाकूड	२४०
६.३.५	लोखंडी पट्या	२४०
६.३.६	ढगडाची छते व इतरप्रकार	२४०
६.३.७	माती	२४१
६.३.८	वाळू	२४१
६.३.९	कौले / छप्पर	२४१
६.३.१०	लांब स्वरूपाच्या नळ्या	२४१
६.३.११	लोखंडी खिळे	२४१
६.३.१२	रंग (भिंतींना ढिलेले)	२४१
६.३.१३	चित्रांचे रंग	२४१
६.३.१४	लाकडी ढरवाजे व लाकडी खिडक्या यांना लावण्यातआलेले सर्व प्रकारचे लोखंड	२४२
६.४	राजवाड्याच्या स्थापत्यसंढर्भात अभ्यास, निरिक्षण व संशोधन करून काढलेले अनुमान	२४२
६.५	राजवाड्याची स्थापत्य दृष्टीकोनातून वैशिष्ट्ये	२४७
६.५.१	राहत्या राजवाड्याच्या अंगाची बाहेरीलभिंत	२४७
६.५.२	राहत्या राजवाड्याच्या बाहेरील संरक्षितभिंत किंवा तटबंदी	२४७
६.५.३	प्रांगण	२४७

६.७.४	मंढिरे	२४८
६.७.७	देवघरासाठी किंवा मंढिरासाठी बगीचा किंवा फुलांची बाग	२४८
६.७.६	बाळंतीणिची खोली	२४९
६.७.७	सोपा	२७०
६.६	फलटण संस्थानामधील स्थापत्य व स्थापत्यामधील झालेली स्थित्यंतर याचे चित्र क्रमांकासहित संशोधनात्मक निरीक्षण	२७१
६.७	सारांश	२६०
६.८	उपसंहार	२६०
६.९	फलटण संस्थानामधील स्थापत्य व स्थापत्यामधील झालेली स्थित्यंतर याचे नकाशे व छायाचित्रे	२६२-२८२

प्रकरण ६

फलटण संस्थान

महाराष्ट्रातील सर्वांत जुने संस्थान

क्षेत्रफळ ९३६.३२ चौ. कि. मी. उत्तरेस - पुणे, दक्षिणेस आणि पश्चिमेस - सातारा, पूर्वेस सोलापूर.

हे संस्थान निरा नदीच्या खोऱ्यात वसलेले असून त्याची लोकसंख्या ७८ हजार ७६१ (१९३१ च्या जनगणनेनुसार)होती. एकंदरीत ७३ खेडी वसलेली असून संस्थानाचे वार्षिक उत्पन्न १५ लाख रुपये होते (आपटे ज. शं., १९९८ : ६५).

फलटण संस्थानच्या राजधानीचे शहर फलटणच होते. महाड व पंढरपूर रस्त्यावर बाणगंगा नदीच्या तीरावर फलटण संस्थान वसलेले होते.

६.१ फलटणची ऐतिहासिक माहिती

मूळ पुरुष निंबराज पवार हा भारताच्या दक्षिणेत आला. निंबराज हे मूळचे राजपुतन्यातील सुप्रसिद्ध परमार या घराण्यातील राजपुत होय. पूर्वीच्या फलटणाच्या पूर्वेस ९ मैलावर असलेल्या निंबाळ या गावी ते राहू लागले व त्यांनी तेथे वसाहत निर्माण केली. यावरूनच त्या वंशाला निंबाळकर आडनाव पडले. धारचे राजे परमार (पवार) यांच्यावर सुलतानांनी हल्ला केल्यावर इ. स. १२४० च्या सुमारास निंबराज परमार नावाचा हा कर्तबगार पुरुष धारवरून निंबळ येथे आले. निंबळच्या परिसरात स्वतःचे पराक्रम व कर्तृत्त्व दाखवून आजूबाजूचे मुलुखात देणाऱ्या स्वतःच्या ग्रामसत्ता निर्माण केल्या.

इ. स. १२४० ते इ. स. १९४८ पर्यंतचा फलटणच्या ७०८ वर्षांच्या इतिहासामध्ये खूप मोठे कर्तबगार पुरुष होऊन गेले. त्यांचा साधारणतः आढावा आपण घेऊ.

निंबराजच्या मृत्यूनंतर त्याचे पुत्र जगदेवराव सत्तेत आले. इ. स. १२९१ ते १३२७ हा त्यांचा कार्यकाल होता.

जगदेवराव निंबाळकर हे मुगल आक्रमक हे मुहमंद तुघलकाच्या बरोबर सामिल झाले व त्याच्या बरोबर युद्ध करताना इ. स. १३२७ मध्ये लढाईत मारले गेले, त्यांचा पराक्रम बघून तुघलकाने त्यांच्या मुलाला म्हणजेच निंबराज दुसरा याला नाईक पदवी दिली व फलटणची सनद दिली (देशमुख वि.,२००४ : १०). आपोआपच फलटणच्या परिसराचे निंबाळकर हे नाईक झाले. दुसरा नाईक निंबराज निंबाळकर यांनी इ. स. १३२७ ते इ. स. १३४९ या काळात राज्य केले व परमार हे आडनाव सोडून देऊन नाईक-निंबाळकर ही पदवी धारण केली.

निंबराज दुसरा याच्यानंतर त्याचा मुलगा वणंग भूपाळ इ. स. १३४९ मध्ये सत्तेवर आला. त्यांनी २७ वर्षे राज्य केले व राज्यातील बंडखोरांनी त्याची हत्या केली. इ. स. १३७४ मध्ये राज्यातील बंडखोरांनी नाईक, निंबाळकर, निंबराज दुसरा याला ठार करून इ. स. १३७४ ते इ. स. १३९० अशी १६ वर्षे राज्य केले. वणंग भूपाळचे पुत्र वणंगपाल यांनी बंडखोरांशी युद्ध करून स्वतःचे राज्य जहागिरी परत मिळविली. इ. स. १३९० ते इ. स. १४०० पर्यंत त्यांनी उत्तम राज्य केले. त्यानंतर इ. स. १४०० ते इ. स. १४३० वणगोजी निंबाळकर यांनी राज्य केले.

इ.स. १४३० च्या नंतर फलटणच्या राज्यावर बंडखोरीचे सावट आले नाही व नंतर सलग १४० वर्षे त्यांच्याच वंशजांनी राज्य केले. ते असे. इ. स. १७७० पर्यंत.

नाईक मालोजी राजे निंबाळकर (पहिले)	इ.स. १४३०-१४३७
नाईक बाजी राजे निंबाळकर (पहिले)	इ.स. १४३७-१४६७
नाईक पोवारराव राजे निंबाळकर	इ.स. १४६७-१४८०
नाईक बाजीराजे निंबाळकर (दुसरे)	इ.स. १४८०-१७१२
नाईक मुधोजी राजे निंबाळकर (पहिले)	इ.स. १७१२-१७२७
नाईक बाजीराव राजे निंबाळकर	इ.स. १७२७-१७६०
नाईक मालोजीराजे निंबाळकर (दुसरे)	इ.स. १७६०-१७७०

नाईक ही पदवी प्राप्त झालेले निंबाळकर हे स्वतंत्र मराठा घराणे महाराष्ट्रातील तसे सर्वांत जुने राज परंपरा चालवणारे.

फलटणच्या राजाच्या कार्यक्षेत्रात हिंगणी, बारेकी आणि ढेऊळगांव देशमुख, बाबाजी भोसले यांचे पुत्र मालोजी व विठोजी भोसले हे बंधू इ.स. १७७० च्या नंतर आलेले फलटणचे राजे व नाईक वणंगोजी ऊर्फ जगपाळराव निंबाळकर हे यांच्या समवयस्क असल्याने त्यांचा स्नेह जडला जणू काही मैत्रीच झाली. नाईक जगपाळेराव झुंझार नेते असल्याने त्यांचा पायबंद घालण्यासाठी आदिलशाहने पुढे त्यांच्यावर फौज धाडली. यावेळी विठोजी व मालोजी भोसले यांनी फार मोलाची मदत केली. व विजय मिळवून दिला. या प्रसंगाने जयपाळराव निंबाळकर यांनी आपली बहीण दिपाबाई हिचा विवाह मालोजीराजे भोसले यांच्याबरोबर करून दिला.

मालोजीराजे भोसले हे शिवाजी महाराजांचे आजोबा होते. लखुजी जाधव हे निजामशाहीचे मुख्य आधारस्तंभ. जयपाळराव निंबाळकर हे आदिलशाहीचे आधारस्तंभ, नाईकबाजी पोवारराव यांची मुलगी म्हाळसाबाई या लघुजी जाधवांच्या पत्नी होत्या. असा स्नेहसंबंध दोन्ही घराण्यांत होता.

लखुजी जाधव व म्हाळसाबाई यांची कन्या जिजाबाई व मालोजीराजे भोसले व ढिपाबाई निंबाळकर यांचा मुलगा शहाजी यांचा विवाह झाला व दोन्ही घराण्यांची नाती जोडली गेली.यातूनच छत्रपती शिवाजी महाराजांचा जन्म हा जाधव व भोसले या घराण्यात झाला. या घराण्यांतूनच मराठा राजा जगासमोर आला.

इ.स. १६३० मध्ये जगपाळराव यांच्या निधनानंतर त्यांचे पुत्र नाईक मुधोजी (दुसरे) निंबाळकर हे राजे झाले. याच मुधोजीची मुलगी म्हणजे सईबाई ही छत्रपती शिवाजी महाराजांची पत्नी. श्रीमंत सईबाई ह्या छत्रपती शिवाजी महाराजांची प्रथम पत्नी होत्या.

नाईक जगपाळराव यांचा पुत्र मुधोजीराव (दुसरे) यांनी राज्याभिषेक करून घेतले. ते फलटणचे अधिपती असताना त्यांचा तृतीय पुत्र बजाजी याला गादी मिळाली. कारण वडीलबंधू दोघेही आदिलशहास जाऊन मिळाले होते. परंतु दरम्यान एक गोष्ट झाली की मुधोजी (दुसरे) हे आदिलशहाला जुमानत नसत. ते व शहाजी यांची मैत्री आदिलशहाला खटकत असे. काही निमित्त करून मुधोजी (दुसरे) यांना अटक केली. परंतु शहाजींनी मध्यस्ती करून मुधोजींची सुटका केली. त्यामुळे मुधोजी निंबाळकर (दुसरे) व शहाजी भोसले यांची मैत्री अधिक दृढ झाली व त्यांचे रूपांतर त्यांची मुलगी सईबाई ही शहाजीचे पुत्र शिवाजी यास दिली. सन १६४०-४२ च्या दरम्यान छत्रपती शिवाजी भोसले यांच्या स्वराज्यनिर्मितीला मुधोजी निंबाळकर (दुसरे) व शहाजी भोसले यांचा पाठिंबा आहे. ही गोष्ट आदिलशहाच्या लक्षात आली. आदिलशहाने इ.स. १६४३ मध्ये मुधोजी निंबाळकर (दुसरे) याला चाल करून ठार केले (इ.स.१६४४) व त्यानंतर बजाजी हे गादीवर बसले. याच बजाजी नाईकांच्याविषयी त्यांनी धर्मांतर केले व मुसलमान झाले अशी अपुरी, अर्धवट व चुकीची माहिती आजपर्यंत इतिहासकार जोडत आले आहेत असे सध्याचे राजे रघुनाथराजे निंबाळकर यांचे मत आहे व ते योग्य आहे की अयोग्य हा अभ्यासाचा विषय आहे (देशमुख वि., २००४ : १).

नाईक निंबाळकर घराण्याची वंशावळ : निंबाळकर हे मूळचे धारचे परमार राजे, माळव्यात इस्लामी आक्रमणात धारचे राज्य नष्ट झाल्यावर त्यांच्या वंशजांनी महाराष्ट्रातील फलटण येथील निंबळकजवळ वास्तव्य केले. त्यावरून त्यांना निंबाळकर हे नाव पडले.

६.२ फलटण संस्थानचे प्रशासकीय परंपरागत अधिकारी

नाव	कालावधी
१. श्रीमंत वनगोजीराव निंबाळकर	१७७०-१६३०
२. श्रीमंत मुधोजीराव निंबाळकर	१६३१-१६४४
३. श्रीमंत बजाजीराव निंबाळकर	१६४७-१६७६
४. श्रीमंत वनगोजीराव निंबाळकर	१६७७-१६९३
७. श्रीमंत जानोजीराव निंबाळकर	१६९४-१७४८
६. श्रीमंत मुधोजीराव निंबाळकर	१७४८-१७६७
७. श्रीमंत सगुणाबाई निंबाळकर	१७६६-१७९१
८. श्रीमंत जानोजीराव निंबाळकर	१७९१-१८२७
९. श्रीमंत मुधोजी निंबाळकर	१८३६-१८४१
१०. श्रीमंत साहेबजीबाई निंबाळकर	१८४२-१८७३
११. श्रीमंत मुधोजीराजे नाईक निंबाळकर	१८६०-१९१६
१२. श्रीमंत मालोजीराजे निंबाळकर	१९१७-१९४८

(मक्कदुम ढा., २०१४ : ६६-६८)

६.३ राजवाड्याचे स्थापत्य व राजवाड्याचे स्थापत्यविषयक निरीक्षणे

(सातारा, फलटण, भोर, औंध, नागपूर या सर्व संस्थानातील राजवाड्यांचे सामाईक निरिक्षण केलेले आहे व वरील संपूर्ण राजवाड्यांचे स्थापत्य करण्यासाठी खालील स्वरूपाचे साहित्य ठिकठिकाणी संशोधन केल्यावर वापरलेले दिसते. त्यावरून काही प्रत्यक्ष निष्कर्ष काढले आहेत.)

६.३.१ काळा पाषाण :- अ. मोठे घडविलेले काळे ढगड उढा. ०.६० मी. X ०.४६ मी. X ०.६० मी. व त्यापेक्षाही मोठे

आ. न घडविलेले काळे ढगड उढा. ०.६० मी. X ०.३० मी. X ०.७६ मी. अडीच फूट

६.३.२ भाजलेल्या मातीच्या विटा :- लांबी X जाडी X रुंदी

अ. ०.२३ मी. X ०.०६ मी. X ०.१० मी.

आ. ०.२३ मी. X ०.०६ मी. X ०.१७ मी. अशा स्वरूपाच्या विटा

६.३.३ चुना नदीची वाळू व त्याचे प्रकार :-

अ. चुना, वाळू, मिश्रण, विट बांधकामासाठी (भाजलेली वीट) (Brick Masonary)

आ. चुना बारीक चाळलेली वाळू यांचे मिश्रण गिलाव्यासाठी (plaster)

६.३.४ लाकूडः

अ. तयार लाकूड(सागवान)

आ. तयार लाकूड(सिसम)

तयार लाकूड याचा अर्थ त्या लाकडाची सर्व हवामानामध्ये परीक्षा घेतली जाते. उदा. पाण्यात भिजवून ठेवणे, नंतर बाहेर काढून उन्हामध्ये ठेवणे व ते लाकूड कोठेही वाकडे होत नाही ना याची खात्री करून घेणे. अशा स्वरूपाची खात्री झाल्यावर त्याला तयार लाकूड असे म्हणतात.

६.३.५ लोखंडी पट्टया :

अ. लाकडाच्या जोड कामाकरिता वापरलेल्या नागमोडी वळणाच्या पट्टया

आ. छताच्या जोड कामाकरिता इंग्लिश एल आकाराच्या लोहाराकडून बनवून घेतलेल्या पट्टया

इ. तुळ्यांच्या जोडकामाकरिता वापरण्यात येणाऱ्या जाड लोखंडी पट्टया(लोहाराकडून बनवून घेतलेल्या)

ई. विविध आकाराच्या उदा. नागमोडी, सरळ, इंग्लिश एल आकाराच्या, इंग्लिश आय आकाराच्या व इंग्रजी ओ आकाराच्या

६.३.६ ढगडाची छते व इतर प्रकार :- विविध प्रकारची जाडी असलेले ढगडाचे एकमेकांत गुंतले जातील अशा प्रकारचे घडाई केलेले ढगड.

अ. 0.0६ मी. जाडीचे छताला लागणारे घडविलेले ढगड

आ. अर्धगोलाकार सांडपाण्यासाठी वापरण्यात येणारे ढगड

इ. लाकडी खांबांच्या खाली घडविलेले नक्षीदार ढगड(तळ खडा)

उ. पायऱ्यांसाठी (स्टेअर केस) घडविलेले मोठ्या स्वरूपाचे ढगड

ऊ जोतेसाठी लागणारे ढोन फूट बाय अडीच फुट बाय ढीड फुट घडविलेले चौकोनी स्वरूपाचे ढगड

६.३.७ माती :- अ. लाल रंगाची माती

आ. मातीचा चिखल करून तयार केलेली मिश्रण

६.३.८ वाळू :- अ. नदीची जाड वाळू

आ. नदी काठची बारीक वाळू

६.३.९ कौले / छप्पर :- अ. नळीची (अर्धचंद्रकार भाजलेल्या लाल मातीची कौले)

आ. सरळ (खापरे) स्वरूपाची एकावर एक बसणारी लाल मातीची कौले

६.३.१० लांब स्वरुपाच्या नळ्या :-

अ. पावसाचे पाणी बाहेर काढण्याकरिता लांबवर परसात नेऊन सोडलेल्या ढगडाच्या घडविलेल्या अर्धगोलाकार नळ्या. किमान १.२० मी. लांबीच्या.

आ. कुंभाराकडून बनवून घेतलेल्या लाल मातीच्या अर्धगोलाकार नळ्या. (सांडपाणीवाहून नेण्याकरिता) १.२० मी. लांबीच्या.

६.३.११ लोखंडी खिळे :- अ. (लांबी X जाडी) ०.१५ मी. X ०.०१२ मी., ०.१० मी. X ०.०१२ मी., ०.०५ मी. X ०.०१२ मी. आणि ०.०२५ मी. X ०.०१२ मी.

६.३.१२ रंग (भिंतींना दिलेले) :-

अ. पिवळा :- पिवळ्या रंगाच्या ढगडाच्याभुकटीपासून बनविलेला रंग.

आ. लाल :- गेरू ढगडाच्या भुकटीपासून बनविलेला रंग

इ. पिवळा अधिक लाल दोघांचे मिश्रण करून बनविलेला रंग

उ. लाल अधिक चुना अधिक शुद्ध चुन्याच्या भुकटीपासून बनविलेला रंग

६.३.१३ चित्रांचे रंग :- सर्व प्रकारचे नैसर्गिकरित्या बनविलेले रंग मिश्रणे उदा. तांबडा, नारंगी, पिवळा, हिरवा, निळा, पांढरा व जांभळा.

६.३.१४ लाकडी ढरवाजे व लाकडी खिडक्या यांना लावण्यात आलेले सर्व प्रकारचे लोखंड :-

अ. ढरवाजाच्या कड्या व कोयंडे

आ. नर व मादी स्वरूपाच्या विविध आकारांत (जाडीत व लांबीत) बनविलेल्या भक्कम स्वरूपाच्या लोखंडी बिजागऱ्या.

६.४ राजवाड्याच्या स्थापत्यसंदर्भात अभ्यास, निरीक्षण व संशोधन करून काढलेले अनुमान

१. संपूर्ण राजवाडा स्थापत्यदृष्ट्या लोडबेअरिंग स्ट्रक्चर आहे.

२. राजवाड्याचा पाया हा हार्ड रॉक लेनपर्यंत केलेला आहे.

३. राजवाड्याचे जोते हे संपूर्णपणे घडविलेल्या दगडांचे असून त्याच्या आतील भिंती पक्क्या भाजलेल्या विट्यांच्या आहेत असे दिसते.

४. राजवाड्याचे जे मुख्य आधार म्हणजे खांब (colum), तुळया (Bam), छत (celling), ढरवाजे (Doors), खिडक्या (Windows), कमानी (Carving Arches), हे सर्व सागवानी लाकडाचे पण पक्क्या स्वरूपाचे घट्ट असलेले परंतु सुकलेले थोडक्यात 'तयार लाकडाचे' बनविलेले आहेत.

७. राजवाड्याच्या बाहेरील भिंती किंवा आतील भिंती या चुन्याच्या व मातीच्या पक्का गिलावा केलेल्या आहेत. काही ठिकाणी दोन जाड भिंतींच्यामध्ये जिना पण तयार केलेला दिसतो. जिना फारच अरुंद पण भक्कम असून आतल्या आत वरून खाली किंवा खालून वर जाण्याकरिता अत्यंत कुशलतेने बनविलेला दिसत आहे.

६. राजवाडा साधारणतः लाकडाची इमारत वाटावी अशा पद्धतीने बनविलेला आहेत. त्यामध्ये काही वेळेला राजवाड्याचा एखादा भाग इतर भागांपेक्षा उंच व रूबाबदार म्हणजे कमानीदार खिडक्या, झरोके, लाकडाचे कोरीव छत अशा पध्दतीने बनविलेला दिसतो. त्याला **'रंगमहाल'** म्हणतात. या पद्धतीमुळे रंगमहाल किंवा तस्सम हा राजवाड्याचा भाग इतरांपेक्षा उंच असल्याने हवा खेळती राहते व उजेड भरपूर येतो. संपूर्ण वाड्यावर लक्ष देण्याकरितासुद्धा या भागाचा उपयोग होत असे.

७. राजवाड्याच्या अशा प्रकारचेसुद्धा भाग आहेत की, त्याला पुढे गच्ची, त्यालाच जोडून रंगमहालासारखा सुंदर लाकडाची नक्षीकाम केलेला मोठा दिवाणखाना, प्रशस्त सभागृह वाटावे असे पण छोट्या स्वरूपाचे सभागृह हल्लीच्या स्थापत्यामध्ये ज्याला आपण कव्हर्ड टेरेस फ्लॅट तशा स्वरूपाची संकल्पना करून बांधलेला दिसतो.

८. राजवाड्याची रचना फारच मोहक व उत्कृष्ट स्थापत्यशास्त्राचा नमुनाच म्हणावा लागेल. यामध्ये :

१. प्रशासकीय काम करण्यासाठी वेगळी केलेली रचना.

२. प्रशासकीय काम पण अत्यंत महत्त्वाच्या लोकांनी एकत्र बसून निर्णय करण्यासाठी केलेली खोल्यांची वेगळी रचना.

३. घरातील माता-भगिनी व इतर स्त्रियांकरिता राहण्याची व घरगुती काम करण्याकरिता केलेली वेगळी रचना.

४. स्वयंपाक करण्यासाठी केलेल्या खोल्यांची वेगळी रचना की, ज्या ठिकाणी वारा व उजेड भरपूर मिळेल, अशा पद्धतीने केलेली खिडक्यांची रचना.

९. स्वतः राजा व त्याचे कुटुंब यांच्याकरिता विशेष राहण्याची सोय व त्यांच्या बाजूलाच लगेचच लक्षात येणार नाही, अशी स्वयंपाकघराची रचना.

१०. वाड्यातील चौकांची रचना :- (वाड्याचा मधला भाग)

१. चौकाची रचना एक तर चौकोनी किंवा आयताकृती आहे.

२. प्रत्येक खोल्यांची रचना अशी आहे की, त्या चौकाच्या पटांगणाच्यापासून वरती जोते ०.६० मी. X ते ०.६० मी. X ०.२० मी. उंच आहे. चौक हा पूर्णतः आकरापर्यंत उघडा असून, पावसाचे पाणी या यंत्रणाहून साठून मागील दिशेने बाहेर काढता येते. हवा खेळती राहून, उजेड पूर्णतः वरून येत असल्याने, चारही बाजूंना भरपूर सूर्यप्रकाश मिळतो. त्यामुळे प्रत्येक चौकाची रचना अशीच असल्याने त्या स्थापत्यामध्ये दिशा व सूर्यप्रकाश यांचा विचार करूनच वाड्याचे बांधकाम करीत असे, सिद्ध होते.

११. चौकाचे उपयोगः-

१. साधारणतः पहिला चौक हा राजवाड्यामध्ये आलेले पाहुणे किंवा सरकारी वकील किंवा रोज प्रशासकीय काम करणारी मंडळी यांच्यासाठी जास्त उपयोग केला जात असे.

२. दुसरा चौक हा घरातील माता-भगिनी, स्त्रिया व मुलांसाठी याचा घरगुती वापर किंवा एखाद्या घरगुती अत्यंत खाजगी अशा कार्यक्रमासाठी वापर होई, कारण त्याला जोडून माजघर असे.

३. मध्यभागी एखाद्ये वेळेस कारंजे असे किंवा पाण्याचा हौद उत्कृष्ट कोरीव ढगडकाम केलेला हौद बांधत असत. किंवा एखाद्या वेळेस छोट्या स्वरूपाची विहीरसुद्धा दररोज

स्वयंपाकासाठी लागणारे पाणी किंवा इतर स्वयंपाकाच्या गोष्टी स्वच्छतेसाठी असत. कारण या चौकाला लागूनच स्वयंपाकघर, धान्याची कोठी, पूजाघर इत्याढी दैनंढिन कामासाठी लागणाऱ्या खोल्या उढा. कपडे बढलणे, ढागढागिने, पूजा साहित्य, समारंभाच्या मौल्यवान साहित्याच्या खोल्या यासाठी असत.

४. काही ठिकाणी तिसरा चौकसुद्धा अस्तित्वात असत. या ठिकाणी काही खोल्या साध्या स्वरूपाच्या किंवा झोपण्याच्या खोल्या आणि फक्त अंघोळीसाठी बांधलेल्या खोल्या म्हणजेच न्हाणीघर. सर्व प्रकारचे लाकूडफाटा किंवा सरपण ठेवण्याची जागा, पाणी गरम करण्यासाठी हंडा, चूल इत्याढी स्वरूपाचा वापर हा या शेवटच्या चौकात केला जात असे. हा वापर फक्त घरातील मंडळी किंवा कोणी पाहुणा, घरचा विशेष व्यक्तींचा जवळचा नातेवाईक यांच्यासाठी असे ढिसते.

५. सर्वांत शेवटी ज्याला आपण परस म्हणजे सर्वांत शेवटची वाड्याची जागा. याठिकाणी शौचालय व नैसर्गिक विधीसाठी केलेली योजना असे. हौढ असे, हात व पाय स्वच्छ धुण्यासाठी मोकळी जागा केलेली असे. काही ठिकाणी मोठमोठे घडवलेले ढगड बसविलेले असत. जेणे करून बसून हात व पाय घासून स्वच्छ धुण्यासाठी पण सोय केलेले ढिसते. सर्व वाड्याचे सांडपाणी याच ठिकाणी आणून ते जवळच्या नाल्यापर्यंत किंवा ढगडाची पन्हाळी करून लांबवर सोडलेले ढिसत आहे. सध्या ज्याला आपण 'सेफटिक टॅक' म्हणतो.

१२. सांडपाणी व्यवस्था किंवा पावसाळी पाण्याची व्यवस्था याचा राजवाडा बांधताना अधिक विचार करून ठेवलेला ढिसतो. उढा. १. ढगडाच्या फरशीची कामे चौकामध्ये करीत असताना त्याच्या अगोढरच ढगडाची पन्हाळ बंढिस्त करून अलीकडचे राजवाड्यात उढा. १८७० ते १९५० या काळात बांधलेल्या राजवाड्यात भाजलेल्या मातीची ०.१५ मी. जाड असलेली नळकांडी ज्याला आपण चिनी पाईप म्हणतो त्या स्वरूपाची नळकांडीमधून पाणी आणि मैला पाणी बाहेर काढून ते परसापर्यंत म्हणजे राजवाड्याच्या सर्वांत शेवटच्या भागापर्यंत नेत असत. म्हणजे आता जशी पद्धत आहे तशीच किंबहुना जुनीच पद्धत सध्याच्या नव्या तंत्रज्ञानाने घेतली आहे. उढा. ही म्हणजे बाथरूमवर बाथरूम बांधणे. हीच पद्धत ढोनशे वर्षांपूर्वीच्या राजवाड्यांमध्ये ढिसून येते. म्हणजेच तळ न्हाणी घरावरती पहिल्या व ढुसऱ्या मजल्यावर नान्हीघर असे. (न्हाणीघर हा

राजवाड्याचाच आतील एक भाग असे. कारण फक्त पाणी जाण्याकरिता नान्हीघराचा उपयोग होत असे.)

१३. मोठी व छोटी सभागृहे :-

१. छोटी सभागृहे ही साधारणतः घरगुती सणांच्या कार्यक्रमाकरिता उदा. चैत्र शुद्ध प्रतिपदा, गुढीपाडवा पूजन व दिपावलीतील लक्ष्मीपूजन, भाद्रपदातील गणेशपूजन, घरगुती समारंभ उदा. डोहाळेजेवण, नामकरण विधी, मुंज कार्य, धार्मिक यज्ञ, घरगुती भोजन समारंभ व छोट्या स्वरूपाचे संस्कार कार्य याकरिता छोटे सभागृह जे माजघराला लागूनच असे किंवा पहिल्या मजल्यावर असे.

२. मोठी सभागृहे ही उदा. सार्वजनिक रामनवमी उत्सवाकरिता वापरली जात. सर्व समाजाला राजे स्वतःच्या राजवाड्यात बोलवित असत व त्यावेळी हे सभागृह सजवत असत. रामनवमी उत्सवाकरिता नातेवाईक मंडळी जी राजांच्या राजघराण्याशी संबंधित आहेत, त्यांच्या राहण्याची सोयसुद्धा त्या सभागृहाच्या बाजूला उत्कृष्ट सोय असलेल्या खोल्यांमध्ये करीत असत. या सभागृहात लाकडाच्या कोरीव खांबांची संख्या जास्त असे. कारण सर्वच काम लाकडात असल्यामुळे तुळया, खांब व त्याला आधार देण्याकरिता मेघडंबरीसारख्या कमानी यामुळे कोरीव लाकडाच्या कारागिरीमध्ये शोभा येत असे. सभागृहाच्या खांबांवरसुद्धा सुंदर नक्षीकाम केलेले असे. दोन खोल्यांमध्ये जर भिंत असेल तर त्याच्या गिलाव्यावर सुंदर अशी कुराणातील भित्तिचित्रे काढलेली असत ही भित्तिचित्रे विविध नैसर्गिक रंगात रंगविलेली असत व या भित्तिचित्रांची चौकट हीसुद्धा सोन्याच्या गिलाव्यामध्ये लाकडावरील कोरीव कामासारखी चुन्यावरच कोरीव काम करून संरक्षित केलेली असे.

सभागृहाची उंची मोठी असल्याने त्याच्या छतापासून काचेच्या हंड्यात लोहाराकडून विशेष बनविलेल्या लोखंडी साखळ्यांमध्ये लटकविलेल्या दिसतात. काही ठिकाणी मोठमोठे दिवे लावण्याकरिता क्षमादाणी स्वरूपाच्या मोठ्या हंड्यांमध्ये व्यवस्था केलेली दिसते.(वीजेचा जोपर्यंत शोध लागलेला नव्हता तोपर्यंत अशा स्वरूपाच्या हंड्यांतून पणत्या, तेलाच्या किंवा तुपाच्या ठेवत असत व नंतरच्या काळात मेणाचा शोध लागल्यावर मेणाच्या पणत्या ठेवलेल्या असत.) असे हे मोठे सभागृह राजवाडाचे एक महत्त्वाचे अंग असून त्यामध्ये समाजातील सर्व लोकांना येण्याची मुभा असत.

१४. देवघर :- राजवाड्यामध्ये देवघराला स्वतंत्र स्थान असे व त्याचे पावित्र्यही पाळले जात असे. देवघराची खोली ईशान्य किंवा पूर्व दिशेला असे. साधारणतः सर्वच ठिकाणी देवघराची जमीन शेणाने सारवलेली दिसते. देवघराची जमीन झोडपून व ठोकून घट्ट अशी तयार करून मग त्यावर गाईच्या शेणाने सारवलेली असे. साधारणतः गाईच्या शेणाचे तीन थर असत. (एक सुकल्यावर दुसरा, दुसरा सुकल्यावर तिसरा अशा पद्धतीने) शेणाने सारविताना एकाच पद्धतीने सारविलेले दिसते. देवघराची खोली साधारणतः ३.०५ मी. X ४.२७ मी. अशी आयताकृती किंवा ४.२७ मी. X ४.२७ मी. अशी चौकोनी असल्याची दिसते. त्याच्याच एका भिंतीच्या मध्यभागी एक मोठा लाकडी देव्हारा असे. व त्या देव्हाऱ्यातील देवतांचे मुख उत्तरेकडे किंवा पूर्वेकडे येईल अशा पद्धतीने देव्हाऱ्याची मांडणी असे. १.२० मी. X १.२० मी. किंवा १.८३ मी. X १.८३ मी. एवढ्या लाकडी देव्हाऱ्याची व्याप्ती असे. जमिनीपासून किमान ०.१५ मी. वर देव्हारा उचललेला असे. त्याची उंची १.१८ मी. पर्यंत असे. संपूर्ण देव्हारा सागवानी किंवा सिसम लाकडामध्ये कोरीव कामात केलेला दिसत आहे. या लाकडी देव्हाऱ्याचे शिखर अत्यंत आखीवरेखीव व कोरीव पद्धतीने केलेले दिसत आहे. काही ठिकाणी सोन्याचे छोटे कळस लावलेले दिसतात. देवघराच्या या खोलीमध्ये देवघरावर कोठेही छताला तुळई येत नाही अशी काळजी घेत असत. हे लाकडी छत पूर्णतः कोरीव कामाने केलेले एकसंध फळ्यांमध्ये किंवा फळ्या एकमेकांत एक सरळ पद्धतीने केलेले दिसते. त्यालाच काही ठिकाणी कडीपाटाचे छत असे म्हणतात. या छताला कोणत्याही प्रकारची पाण्याची गळती होऊ नये अशा स्वरूपाची काळजी घेतलेली दिसत आहे. देवघराच्या खोलीचा मुख्य दरवाजा हा कोरीव कलाकारींनी युक्त असा व लाकडाच्या जाळीदार नक्षीकामात केलेला आढळतो.

विशेष म्हणजे लाकडी देवघराच्या खोलीच्या रचनेत त्याची मागील भिंत ०.९० मी. जाडीचीच येईल असे पाहिले जाते व त्याच भिंतीमध्ये एक छोटेसे कपाट निर्माण करीत असत. त्याला भक्कम अशी लाकडी चौकट, नक्षीकामाचा दरवाजा व कडीकोयंडे अशा पद्धतीने लावत असत की, जे सहसा कोणालाही उघडता येणार नाहीत. कारण त्यामध्ये देवाचे सोन्याचे-चांदीचे दागिने, शस्त्र पूजनाची शस्त्रे, परंपरागत वापरलेली युद्धकाळातील शस्त्रे या कपाटात ठेवलेली असत. साधारणतः मागील दहा पिढ्यांमध्ये जी महत्त्वाची देवाची वस्त्रे असत तीपण न वापरता घडी घालून नीट ठेवलेली असत.

देवघरातील पूजेकरिता लागणारी फुले, पाने या वेगळी व्यवस्था केलेली असे. त्या त्या काळातील प्रत्येक माळी समाजाच्या घराला काही जमीन इनाम देत असत. त्या जागेतून रोजच्या रोज ताजी फुले आणून देणे व सणासुदीला मोठ्या प्रमाणात फुलांची व्यवस्था करणे इत्यादी कामे त्यांच्याकडे असत. त्यासाठी विहीरपण बांधून देण्याची व्यवस्था असे.

६.७ राजवाड्याची स्थापत्य दृष्टिकोनातून वैशिष्ट्ये

६.७.१ राहत्या राजवाड्याच्या अंगाची बाहेरील भिंत

इ. स. १६९० च्या अगोदर किंवा नंतर साधारणतः मराठा सरदारांच्या घरावर म्हणजे वाड्यावरसुद्धा परकीय आक्रमणे उदा. मोगल बादशहांचे सरदार किंवा स्थानिक स्वकीय सरदार व राजघराण्यातील स्वकीय नातेवाईक सरदारसुद्धा राजवाड्यांवर हल्ला करीत असत. त्यामुळे राजवाड्याच्या भिंती किमान ०.९० मी. ते १.२० मी. जाडीच्या असत. आजही त्या दिसतात. या भिंती घडीव दगडाच्या व भक्कम पाया असलेल्या शेकडो वर्षे राहतील अशा पद्धतीने वाळू चुन्याचे मिश्रण व काही ठिकाणी शिश्याचा वापर केलेला दिसतो. या भिंतीवरून कोणी येऊ नये म्हणून काही ठिकाणी काचा लावलेल्या दिसतात किंवा लोखंडी भाले लावलेले दिसतात.

६.७.२ राहत्या राजवाड्याच्या बाहेरील संरक्षक भिंत किंवा तटबंदी

ज्याला आपण मुख्य राजवाडा म्हणतो तो राजवाडा हा एक राहण्याचा भाग झाला. परंतु संपूर्ण राजवाड्याचा परिसर हा साधारणतः चार एकर ते नऊ एकरापर्यंत असे. त्याला सर्व बाजून तटबंदी असे. म्हणजे संपूर्ण राजवाड्याला संरक्षण देण्याकरिता (आतील रिकाम्या जागेसहित) ही तटबंदी बांधलेली असे. जमिनीखाली किमान २.७४ मी. ते ३.०५ मी. दगडी बांधकाम व १.५२ मी. ते १.८३ मी. जाडीचे व त्यावर म्हणजेच जमिनीवर ४.५७ मी. ते ६.१० मी. उंचीच्या ०.०९ मी. जाडीच्या भिंती असत. यामध्ये साधारणतः ३०.४७ मी. ते ३८.१० मी. नंतर अशाच पद्धतीने पण अर्धगोलाकार बांधलेले आजही दिसतात. मुख्य दरवाजाच्या बाजूला दोन बुरूज असत. त्या बुरुजांमुळे मुख्य दरवाजाच्या मधून आत येणाऱ्या प्रत्येक माणसावर नजर ठेवण्याची पद्धत असे. अशा पद्धतीने बाहेरील तटबंदी बांधत असत व आतील राजवाडा व मोकळी मैदाने, बगीचा, विहिरी इ. संरक्षित केले जात.

६.७.३ प्रांगण

मुख्य दरवाजातून आत आल्यावर एकदम राजवाड्यात जाऊ नये म्हणून मुख्य दरवाजाच्या बाजूलाच लगेचच एकसंरक्षित खोली व शस्त्रधारी शिपाई असे. प्रांगणाकरिता जागा जर जास्त उपलब्ध

असेल तर हस्तीखाना या ठिकाणी बांधला जाई. ईशान्य दिशेला छोटेसे मंदिर बांधले जात असे. प्रांगणाच्या मध्ये काळी वा ढगडी फरशी करून किंवा ढगडाचे चौथरे बांधून बसण्याकरिता हवेशीर जागा मिळावी, याकरिता छोटीशी बागही त्या ढगडाच्या चौथऱ्यांच्या बाजूला करीत असत व या छोट्याशा बागेतील हिरवळीमुळे प्रांगणाची शोभा वाढत असे. या प्रांगणाचा वापर राजांचे स्वागत, त्यांच्या मिरवणुका व त्यांच्या स्वागतासाठी वाद्य वाजविण्याकरिता व शस्त्र घेऊन सरावासाठीसुद्धा या जागेचा वापर होत असे. एकंदरीत ही जागा यासाठी बनविलेली असे की जर, शत्रू किंवा स्वकीयांनी वाड्यावर हल्ला जरी केला तरी त्याला रोखता यावे व एकदम राजवाड्यात शत्रूंनी येऊ नये. असा विचार करून प्रांगण बनविलेले दिसते.

६.७.४ मंदिरे

प्रांगणाच्या बाजूलाच म्हणजे राजवाडा व प्रांगण यामध्ये किंवा मध्यभागी मोठ्या स्वरूपाचे मंदिर बांधत असत. उदा. ज्याप्रमाणे फलटण राजवाड्याच्या प्रांगणामध्ये रामाचे मंदिर भव्य बांधलेले आहे. कारण या राममंदिराच्या रामनवमीच्या उत्सवाला सर्व गावे व समाज येणार म्हणून त्यांना थोडी रिकामी जागा पाहिजे. गर्दी होणार म्हणून त्यांच्या सोयी करण्याकरिता म्हणजे पाणी, भोजन, स्वयंपाक व नैसर्गिक विधी याकरिता वेगळी व्यवस्था प्रांगणाच्या एका बाजूला म्हणजेच राजवाड्याच्या बाहेरपण तटबंदीच्या आत केलेली दिसते.

मंदिर हे भव्यदिव्य आकारानी मोठे व भक्कम बांधलेले दिसते व मंदिराचा कळस हा राजवाड्यापेक्षा उंच बांधण्याची पद्धत दिसत आहे. या मंदिराच्या समोरच किंवा बाजूला एक विशिष्ट प्रकारचा ध्वजस्तंभ ढगडी चौथऱ्यासह बांधलेला दिसतो. हा ध्वजस्तंभही राजवाड्याच्या उंचीपेक्षा कितीतरी उंच दिसत असे. आजही असे बघण्यास मिळते की, राजवाड्यातील ध्वज हा गावाच्या वेशीपासूनसुद्धा दिसत असे.

मंदिरातील उत्सवाला गर्दी होणार, निमंत्रित पाहुणे येणार, त्यांचीपण व्यवस्था दरबार सभागृहाशेजारी छोट्या छोट्या खोल्यांमध्ये केलेली दिसत आहे. बऱ्याच ठिकाणी दरबार सभागृहाच्या बाजूला किंवा राजवाड्याच्या पहिल्या ढगडी चौकाच्या असलेल्या खोल्यांमध्ये सरकारी अधिकारी, निमंत्रित अधिकारी, विशेष पाहुणे, भजन-कीर्तनकार इत्यादींची व्यवस्था उत्सवादरम्यान करीत असे. कारण हा उत्सव सात दिवस तरी चालत असे. यामुळे एक मंदिर राजवाड्यामध्ये बांधले की, त्याच्या अनुषंगाने त्या मंदिराच्या उत्सवाच्या निमित्ताने राजाला स्वतः व्यवस्था करावी लागत असे.

६.७.७ देवघरासाठी किंवा मंदिरासाठी बगीचा किंवा फुलांची बाग

राजवाड्याच्या देवघराचा किंवा मंदिराचा बगीचा किंवा बाग यासाठी विशेष तरतूद केलेली असे. कारण राजवाड्यात सतत काहीना काहीतरी धार्मिक कार्य, घरातील कुलाचार, भवानी मातेचे नवरात्र व इतर वार्षिक धार्मिक कार्यक्रम, दैनंदिन पूजेसाठीसुद्धा लागणारी फुले यासाठी बगीचा निर्माण करावा लागत असे. कारण फुलांनी राजवाडा सजविणे, उत्सवाकरिता मंदिर सजविणे व घरगुती कौटुंबिक कार्यक्रमाकरिता उदा. बारसे, डोहाळजेवण, मुंज इ. कौटुंबिक धार्मिक विधीसाठी फुलांची आवश्यकता लागत असे. त्याकरिता बगींच्याची निर्मिती झाली. बगीच्यांची माळी काम करण्याकरिता स्वतंत्र माळी यांची व्यवस्था केलेली दिसते. दिवसभरामध्ये देवघराचा बगीचा, प्रांगणातील बगीचा व इतर ठिकाणी शोभेकरिता लावलेली झाडे उदा. नारळ, सिताफळ, आंबा इ. झाडे यासाठी माळी समाज प्रामाणिकपणे काम करताना दिसतात. म्हणून त्यांच्या प्रामाणिकपणाबद्दल आजही आपल्याला माळी समाजाला इनामकीच्या जमीनी दिलेल्या आढळतात.

देवघराची बाग नेमकी देवघराच्या पाठीमागे असे. त्याला लागून एखादी विहिरीचीपण सोय करण्यात आलेली दिसत आहे. भिस्तीला (झाडाला पाणी घालणारा) पाणी घालण्याकरिता नेमलेले असे. सर्व राजांना असे वाटत असे की, आपल्या वाड्यातच एक प्रमुख मंदिर, भव्यदिव्य असे लाकडी कोरीव काम केलेले, भक्कम दगडाचे जोते असलेले व दगडाचेच गर्भगृह बांधलेले असावे. कारण या मंदिरामुळे शेकडो वर्षे आपल्या राजघराण्याचे वैभव टिकून राहील व यानिमित्ताने सर्व समाज राजवाड्यात येत राहील अशा पद्धतीने बांधलेले दिसते. म्हणून त्यांच्या कायमस्वरूपी फुलांच्या व्यवस्थेकरिता बगीच्याची जागा निर्माण केलेली असे. कारण हीच कल्पना देवघराच्या संदर्भातसुद्धा आहे. शेकडो वर्षे टिकेल असेच देवघर अनेक राजवाड्यात आजही बघण्यास मिळते. अर्थातच देवघर किंवा मंदिराचा बगीचा आजही आपल्याला फुलांच्या कामाकरिता वापरलेला दिसत आहे.

६.७.६ बाळंतिणीची खोली

प्रत्येक राजवाड्यात बाळंतिणीची खोली म्हणून एक भाग असे. तशी ती खोली बऱ्यापैकी मोठी म्हणजे ६.१० मी. X ४.२७ मी. अशा स्वरूपाची दिसत आहे. दुसऱ्या दगडाच्या चौकाच्या बाजूला साधारणतः उत्तरेला किंवा पूर्वेला बाळंतिणीची खोली बंदिस्त स्वरूपात दिसत आहे. की ज्या ठिकाणी लोक जास्त ये-जा करीत नाहीत. अशा स्वरूपाची असे, पूर्वेला ही खोली असल्यास खोलीच्या वरच्या बाजूला खिडक्या असत. कारण पूर्वेकडून येणारा सूर्यप्रकाश व खेळती हवा या खोलीमध्ये राहवी असा उद्देश दिसत आहे. उन्हाळ्यामुळे बारीक रोगजंतूंचा त्रास बाळ व बाळंतिणीला होऊ नये म्हणून ही जागा

ठरविलेली दिसत आहे. बाळंतिणीच्या खोलीतील धूर बाहेर जाण्याकरिता याच पूर्व दिशेला एक धूर काढण्यासाठी रिकामी खिडकी स्वरूपाची जागा दिसत आहे. बाळंतिणीच्या खोलीच्या आतमध्येच अंघोळीची व्यवस्था बाळ व बाळंतिणीची केलेली दिसत आहे. एकंदरीतच स्वयंपूर्ण पण बंदिस्त व बाळंतिणीची सेवा करणाऱ्या बायामाणसांना ये-जा करण्यासाठी सोयीची असावी म्हणून मुख्य ढगडी चौकातून आत जाण्याकरिता एखादा ढरवाजा दिसत आहे.

एकत्र कुटुंब पद्धतींमुळे काही वेळेस राजवाड्यात एकाच वेळेला ढोन-तीन बाळंतपणे येऊ शकतात, असे गृहीत धरून तळमजल्यावरसुद्धा काही ठिकाणी बाळंतिणीची खोली पहिल्याच मजल्याच्या खाली केलेली दिसत आहे. बाळंतिणीच्या खोलीतून बाहेर पडणाऱ्या पाण्यासाठी ढगडाच्या बंदिस्त नळीतून जोत्यापर्यंत पाणी आणून नंतर तेथून लांबवर म्हणजे परसातील सांडपाण्याकडे सोडलेले दिसत आहे. बाळंतिणीची खोली हा राजवाड्याचा महत्त्वाचा भाग असल्यामुळे बाळ व बाळंतिणीसाठी जास्तीत जास्त सोयी व सुविधा ढेण्याचा राजवाड्यातील लोकांचा कल दिसतो. सुरक्षितता व निरोगी आरोग्याकरिता या खोलीचा वापर करण्याकरिता राजेलोकांचा कल असे.

६.५.७ सोपा

राहत्या राजवाड्याच्या साधारणतः आपण बघितले की, पहिल्या ढगडी घातलेल्या चौकामध्ये (court yard) त्या राजाच्या प्रशासकीय यंत्रणेचे काम चालविण्याकरिता केलेली रचना आपल्याला आढळली व त्याची वैशिष्ट्ये आपण बघितली. आता ढुसऱ्या ढगडी चौकामध्ये आपण जेव्हा राजवाड्यात येतो तेव्हा आपणास असे दिसते की, राजवाड्याच्या विस्तारित कक्षाप्रमाणे ढरबार सभागृहासारखा दिसतो. त्याच्या प्रत्येक खांबाला कोरीव लाकडाच्या कमानी आहेत. बाजूला पाहुण्यांच्या खोल्या आहेत. राजवाड्यात येणारे राजांचे नातेवाईक किंवा त्यांच्या जवळचे राजकीय पुढारी वारसढार यांच्यासाठी खोल्यांची रचना केलेली दिसते. सोप्याला जोडूनच एक मोठे स्वयंपाकघर असे. स्वयंपाकघराला लागूनच वेगळी खोली दिसत आहे. स्वयंपाक करणारे आचारी व कर्मचारी त्यांच्या छोट्या खोल्या सोप्याच्या एखाद्या कोपऱ्यात दिसत आहेत. सोप्यामधून बाळंतिणीच्या खोलीकडे जाण्याकरिता व इतर नातेवाईक पण राजवंशांचे नातेवाईक यांच्या निवासाची व्यवस्था ढुसऱ्या चौकाच्या चारही दिशेला दिसत आहे. परंतु या सर्वांची भोजनाची सुविधा कोठे करावयाची?या प्रश्नाचे उत्तर आहे सोपा. सोपा हा लांबलचक वरांडा पण थोडासा रुंढ, जेवणाच्या पंगतीसाठी एकढम योग्य. किंबहुना सर्व नातेवाइकांना किंवा समारंभाच्या पंगती, विविध धार्मिक कार्यक्रमाच्या जेवणाच्या पंगती याकरिता या सोप्याचा वापर वारंवार होत असे. त्यामुळे याचकरिता सोपा नेहमीच

स्वच्छठेवण्याकरिता काही ठिकाणी जमीन धोपटून धोपटून शेणाने सारवून सारवून मऊ गालिचासारखी केलेली दिसते. अशा स्वरूपाचा सोपा प्रत्येक राजवाड्यात अन्नढानाचे काम करतो. वेळप्रसंगी राजाचे कुटुंब व स्वतः राजा येथे जेवायला बसत असत. राजाला सोप्याच्या व्यतिरिक्त स्वयंपाकघराच्या एका विशिष्ट खोलीतपण व्यवस्था केलेली दिसते. कारण सोप्यावर चौकाच्या चारही बाजूला पाहुणे असतील किंवा पाहुणे कोणीच नाही व फक्त घरातील माणसे आहेत, अशा वेळी राजा स्वयंपाक घराच्या विशेष खोलीचा वापर करीत असे. एकंढरीतच सोपा राजवाड्याचा महत्वाचा भाग होता किंवा आजही आहे.

६.६ फलटण संस्थानामधील स्थापत्य व स्थापत्यामधील झालेली स्थित्यंतर याचे चित्र क्रमांकासहित संशोधनात्मक निरीक्षण

महाराष्ट्रातील मराठा संस्थानिकांमध्ये ऐतिहासिक दृष्ट्या फलटण संस्थान किंवा फलटण संस्थानचे नाईक-निंबाळकर यांचा इतिहास सर्वांत जुना आहे. किंबहुना भोसले घराण्याचा उढय होण्याच्या अगोढरपासून निंबाळकर घराणे त्या काळातील अनेक ग्रामसत्तांमध्ये महसूल गोळा करण्याचे काम करीत होते. फलटणचे राजे नाईक-निंबाळकर यांच्या राजवाड्यांचे स्थापत्य खरोखरीच अभ्यास करण्यासारखे आहे. याकरीता स्थापत्य व त्यामध्ये झालेले बढल याचा अभ्यास करण्याकरीता पहा चित्र क्रमांक : ६.१ मुधोजी मनमोहन राजवाड्याच्या पहिल्या मजल्याचे जुने व नवे ढरबार सभागृहाचा नकाशा दिसत आहे. जुन्या ढरबार सभागृहामध्ये कडीपाटाचे छत, लाकडाचे स्तंभ त्याला जोडणाऱ्या लाकडाच्या कोरीव काम केलेल्या कमानी, तळखडे इ. पारंपारिक पद्धतीने जुने ढरबार सभागृह दिसत आहे. नवीन ढरबार गृहामध्ये कडीपाटाचे लाकडी छत जाऊन नव्या स्वरूपाच्या युरोपियन पद्धतीप्रमाणे फॉल सिलिंग करून सभागृह थोडेसे आधुनिक पद्धतीचे केलेले आहे. त्याप्रमाणे मधील सर्व जुन्या पद्धतीचे लाकडी स्तंभ व तळखडे यांचा वापर न करता सभागृहाची रूंढी वाढविली आहे. हे स्थापत्यविषयक स्थित्यंतर आपल्याला स्पष्टपणे दिसत आहे.

फलटणच्या राजवाड्याची व्याप्ती व राजवाड्याच्या शेजारी असलेली मंढीरे व त्यांची व्याप्ती, त्याचे केलेले निरिक्षण पहा चित्र क्रमांक : ६.२ मुधोजी मनमोहन राजवाड्याचा छतापासून जमिनीपर्यंतचा घेतलेला वरून दिसणारा आराखडा, या आराखड्यात मुख्य राजवाडा व त्या बाजूला असलेले राममंढिर व ढत्तमंढिर दिसत आहे. राममंढिर हे संपूर्ण जागेच्या मध्यभागी आहे व त्याचे तोंड पूर्वेकडे आहे. त्याचप्रमाणे राममंढिराच्या उजव्या बाजूला राजवाडा आहे व डाव्या बाजूला ढत्तमंढिर आहे. राजवाड्याचे प्रवेशढ्दार मात्र उत्तरेकडे आहे. या संपूर्ण परिसराला बाहेरून मोठी तटबंढी आहे.

त्यामुळे राजवाडा, मंढीर, प्रांगण चारही बाजूंनी एकत्रित संरक्षित केलेले आहे. याची सर्व माहिती ६.७ या प्रकरणामध्ये राजवाड्याची स्थापत्य दृष्टीकोनातून वैशिष्टये या मथळ्याअंतर्गत दिलेली आहे.

मराठाकालीन स्थापत्यामध्ये फलटणच्या राजवाड्याच्या अंतर्गत भागामध्ये काही ठिकाणी त्यांनी केलेली रचना काहीशी ऐसपैस व थोडीशी पाश्चिमात्य अंतर्गत सजावटीकडे झुकलेली दिसते. पहा चित्र क्रमांक : ६.३ व ६.४ मुधोजी मनमोहन राजवाड्याच्या तळमजल्याचा आराखडा दिसत आहे. या आराखड्यामध्ये राजवाड्याचा जुना भाग व नवीन भाग हा एकमेकांना जोडलेला दिसत आहे. ज्याला आपण सदर (ड्रॉईंगरूम) म्हणतो. त्या भागामध्ये मध्यभागी लाकडी स्तंभ व तळखडे हे पारंपारिक पद्धतीचा वापर करून तयार झालेली सदर व ढगडी चौक हे आपणांस दिसत आहे व त्याच्याच शेजारी नवीन बांधण्यात आलेला राजवाड्याचा ढगडी चौक दिसत आहे. आपल्याला स्पष्टपणे वरील आराखड्यात असे दिसत आहे की, कोर्ट यार्ड मध्ये दिसणारे लाकडी स्तंभ व तळखडे यांचा वापर कोर्ट यार्ड मध्ये केला नसून त्याऐवजी कोर्ट यार्ड मोठे केले असून सदरेच्या जागी कोर्ट यार्ड मध्ये ब्रिटीश पद्धतीप्रमाणे लोखंडाचे सेक्शन लाकूड व ढगड यांच्यासह वापरून छोट्या खोल्या काढल्या आहेत. हा स्थापत्य शास्त्रातील बदल ब्रिटीशांच्या काळात झाला. स्थापत्य स्थित्यंतराचा हा नमुना इथे आपल्याला या आराखड्यात स्पष्टपणे दिसत आहे. कोर्ट यार्ड हे सरकारी कामाकाजाकरता व सामान्य माणसाच्या निगडीत असलेली सर्व प्रकारची काम करण्याकरिता वापरत असत. वरील आराखड्यामध्ये पारंपारिक पद्धतीच्या जाड भिंती (जवळजवळ १ मी. जाडीच्या) दिसत आहेत. त्यामध्ये असलेले लाकडाचे जीनेसुद्धा दिसत आहेत. मुधोजी मनमोहन राजवाड्याचा दुसऱ्या मजल्याचा आराखडा - या आराखड्यामध्ये आपल्याला स्पष्टपणे दिसत आहे की, जुन्या पद्धतीच्या पहिल्या मजल्यावरच दुसरा मजला तयार केला आहे. पहिल्या मजल्यावर ज्याप्रमाणे लाकडी स्तंभ, तळखडे जसे सदरेमध्ये होते. त्याचप्रमाणे दुसऱ्या मजल्यावर केलेले दिसत आहे. नवीन ब्रिटीश पद्धतीने बांधलेल्या पहिल्या मजल्याच्या वरती जास्त स्वरूपाचे बांधकाम न करता त्याला पारंपारिक पद्धतीने छत टाकलेले आहे. स्थित्यंतराच्या या काळात युरोपियन पद्धतीच्या कामकाजामध्ये लोखंडाच्या सेक्शनचा वापर व जीन्याकरिता लोखंडाच्या गोलाकार पायऱ्यांचा वापर एकंदरीत लोखंडाचा जास्त वापर वाढला. वास्तूरचनेमधील स्थित्यंतरे आपल्याला ठिकठिकाणी अनेक राजवाड्यांमध्ये अशी पहावयास मिळतील.

या प्रबंधामध्ये किंवा एकंदरच सर्व मराठा संस्थानिकांमध्ये श्रीराम हे त्यांचे कुलदैवत आहे. त्या कुलदैवतांची मंढीरे किंवा त्यांना दिलेला मान व त्या कुलदैवतांमुळे निर्माण होणारी स्वःधर्म निष्ठा बघण्यास मिळते. यासंदर्भात पहा चित्र क्रमांक : ६.७ फलटणच्या राजवाड्यात असलेल्या राममंदिराचा

दर्शनी भाग यामध्ये सर्वांत महत्त्वाचे म्हणजेच ढगडाच्या स्तंभांची कारागिरी इ. स. १३ व्या शतकात असलेल्या यादवकालीन खांबांची प्रतिकृती तयार करण्याचा नव्वद टक्के प्रयत्न केला आहे. त्यामुळे हे मंदिर सतराव्या शतकातले असूनसुद्धा तेराव्या शतकातले स्थापत्य वाटते. मंदिर स्थापत्याचा एक चांगला नमुना त्याकाळच्या कारागिरानी दाखविला आहे. राममंदिराच्या गर्भगृहाच्या प्रवेशद्धाराच्या बाजूला असलेली गणेशपट्टी व द्धार शाखा लाकडात कोरलेली असून त्यावर असलेले लाकडाचे कोरीव काम हे अलिकडच्या सतराव्या शतकातले दिसत आहे. एकंदरीतच हे राममंदिर फलटणच्या राजाचे आराध्य दैवत असून सर्व सामान्य जनता श्रीराम नवमीच्या निमित्ताने राजवाड्याच्या या प्रांगणात येते व अप्रत्यक्षपणे राजा व नागरिक यांचा एक समन्वय तयार होतो व तो संबंध राज्य चालविण्याच्या दृष्टीने आवश्यक असतो. तो येथे श्रीराम नवमीच्या उत्सवाने बघण्यास मिळतो.

त्याचप्रमाणे फलटणच्या अंतर्गत काही मंदीरे पुरातत्त्वांच्या अभ्यासाच्या दृष्टीने महत्त्वाची आहेत, त्यापैकी एक सध्याच्या राजवाड्याच्या अगदी समोर असलेले शंकराचे मंदीर. पहा चित्र क्रमांक ६.६, फलटणच्या राजवाड्यासमोरील पुरातन मंदीर-संपूर्ण ढगडामध्ये कोरलेले पुरातन मंदीर उत्कृष्ठ कोरीव कामाचा नमुना आहे. ज्याप्रमाणे लाकडाच्या प्रवेशद्धाराला द्धारशाखांवर कोरीव काम केलेले असते. अगदी तसेच काम ढगडामध्ये हुबेहुब कोरल्याचे दिसत आहे. गर्भगृहाच्या बाहेर असलेल्या छोट्या मंडपाला जे ढगडाचे कोरीव स्तंभ आहेत, त्यावरच ढगडाच्या तुळ्या, ढगडाचे हस्त, ढगडांच्या खांबाच्याखाली कोरलेले तळखडे व या सर्वांवर केलेले कोरीव काम कदाचित सध्याच्या लाकडाच्या कारागिरांनासुद्धा जमणार नाही, एवढे सुबक काम ढगडांवर केलेले दिसत आहे. मंदिराच्या ज्योतापासून ते शिखरापर्यंत असलेले ढगडाचे हे शिल्प म्हणजे फलटण गावाचे पुरातत्त्व सिद्ध करते. एकंदर मंदिराच्या या स्थापत्यावरून व स्तंभाच्या रचनेवरून इ. स. तेराव्या शतकात हे मंदीर स्थापित झाले असावे, असे दिसते. सध्या या मंदीरात शिवलिंग स्थापित असून बाहेर नंदी पण स्थापित आहे. हे मात्र अलिकडच्या काळातील दिसत आहे. त्यामुळे हे मूळ मंदिर कोणाचे होते हे स्थापत्यदृष्ट्या सांगणे अवघड आहे. तरीही फलटणच्या या भूमीचे पौराणिकत्व या मंदीरावरून सिद्ध होते.

मराठाशाहीतून जेव्हा आंग्लशाहीमध्ये राजसत्तेचे रूपांतर झाले त्याचा परिणाम संस्थानिकांच्या स्थापत्यामध्ये झाला. याकरीता एक चांगला नमूना म्हणून फलटणच्या राजवाड्याचा दर्शनी भाग सर्व अभ्यासकांना विचार करण्यास भाग पाडेल. यासंदर्भात पहा चित्र क्रमांक : ६.७ राजवाड्याचा दर्शनीभाग (Elevation Treatement) स्थापत्यविषयक विचार केला असता असे दिसून येते की, यामध्ये मराठा व युरोपियन स्थापत्य यांचे मिश्रण आहे. लाकडाचे षटकोनी खांब जाऊन गोल व

चौकोनी खांब आले व त्यावरील नक्षी पाश्चिमात्य स्वरूपाची आहे. कमानी नऊ पाकळ्यांनी मराठा वास्तुशास्त्रात पूर्ण होत असे. पण त्याऐवजी इथे दोन मोठ्या अर्धपाकळ्यातच कमान पूर्ण केलेली दिसत आहे. खांबांची, खिडक्यांची व कमानीची जागा व रचना मराठा आर्किटेक्चरप्रमाणे आहे. परंतु त्यांची ठेवण युरोपियन पध्दतीची दिसत आहे. यालाच आपण स्थापत्याचे स्थित्यंतर झाले असे म्हणतो. फलटणच्या राजाच्या बोधचिन्हावरसुद्धा आंग्लशाहीचा परिणाम दिसत आहे. या चिन्हामध्ये कुलदैवताचे नाव आहे व खाली इंग्रजीमध्ये फलटण दरबार असे लिहिले आहे. पहा चित्र : ६.८

आंग्लशाहीमध्ये काम करणारे कारागिर किंवा त्या काळात काम करणारे स्थापत्य विशारद यांच्या कार्यपद्धतीमध्ये सुद्धा युरोपियन प्रभाव दिसतो. आपल्या देवतांच्या मूर्तीच्या चेहऱ्यामध्ये सुद्धा हा जाणवतो की काय? पहा चित्र क्रमांक : ६.९ मुधोजी मनमोहन फलटण राजवाड्याच्या दर्शनी भागाच्या सर्वात वरती असलेली सरस्वतीची मूर्ती-ही सरस्वतीची मूर्ती मोरावर बसलेली असून, मोराचा पिसारा फुललेला असून ही वीणावादन करत आहे. परंतु सरस्वतीचा चेहरा मात्र भारतीय संस्कृतीला शोभणारा नसून तीच्या चेहऱ्याची ठेवण व मुकूट युरोपियन राणीसारखा वाटतो. ज्या कारागिरांनी ही मूर्ती बनविली ते कदाचित युरोपियन असतील. त्यामुळे स्थापत्यविषयक स्थित्यंतर फक्त वास्तुरचनेतच झाले नाही तर देवतांच्या मूर्तीमध्येही झालेले दिसत आहे. हाच संशोधनाचा निष्कर्ष आहे.

राजवाड्यातील स्थापत्यातील स्थित्यंतरासंदर्भात एक कोनशिला आपले लक्ष वेधून घेते. पहा चित्र क्रमांक : ६.१० व ६.११ बांधकामातील स्थित्यंतर - २२ मार्च १८६१ ला वाड्याच्या पश्चिमेकडील भाग बांधण्यास सुरूवात केली व चौदा वर्षांनंतर ६ मे १८७५ ला तो भाग पूर्ण बांधून झाला. जुन्या पध्दतीच्या स्थापत्य शास्त्रानुसार वाडा बांधला व नंतर २८ ऑगस्ट १९०१ साली परत नवीन भाग बांधला व ते काम १२ जानेवारी १९११ पर्यंत चालले. यामध्ये युरोपियन पध्दतीचे स्थापत्य व मराठा शैलीचे स्थापत्य यांचे मिश्रण आहे. यालाच आपण स्थापत्यामधील स्थित्यंतर म्हणतो. त्याचा पुरावा म्हणून ही कोनशिला इंग्रजीमध्ये कोरलेली आपल्याला दिसत आहे. भारतीय पुरातत्त्वामध्ये दगडावर कोरलेल्या माहितीला विशेष महत्त्व आहे. हा पैलू लक्षात घेऊन त्यांनी कोरलेली ही कोनशिला अभ्यासकांना पुरावाच देते. कोरीव शिलालेख - शिलालेखामध्ये असा उल्लेख आहे की, जुन्या राजवाड्याचे बांधकाम शके १७८२ (इ.स. १८६०) मध्ये चालू केले. त्यांचे हे काम जवळजवळ १५ वर्षांनी म्हणजे शके १७९७ (इ.स. १८७५) ला पूर्ण झाले. तसेच नवीन वाड्याचे काम शके १८३८ ला चालू केले. (इ.स. १९०९) व शके १८३२ (इ.स. १९१०) ला काम पूर्ण केले. याचा अर्थ त्या वाड्याच्या स्थापत्याच्या स्थित्यंतराचा काळ आपणास लक्षात येईल. इ. स. १८६० ते इ. स. १९१० या काळामध्ये

अनेक राजवाड्यांमध्ये स्थापत्यविषयक स्थित्यंतरे झाली. यामध्ये जुनी मराठा शैली व युरोपियन शैली यांचे मिश्रण वाह्यांगावरून लक्षात येते. (Elevation Treatement) तसेच राजवाड्यातील माणसांच्या सोयीनुसार किंवा संस्थांच्या राज्याच्या कारभारानुसार त्यामध्ये बढल केले गेले हे सिद्ध होते. यालाच स्थापत्यविषयक स्थित्यंतर म्हणतात. त्याचा हा पुरावा म्हणजे हा शिलालेख होय.

फलटणच्या राजवाड्याचा अंतर्गत सजावटीचा काही भाग हा पाश्चिमात्य आर्किटेक्चरकडे झुकलेला दिसत आहे. एकोणीसाव्या शतकात आंग्लशाही चालू झाल्यावर महाराष्ट्रातील नव्हे तर भारतातील सुद्धा अनेक संस्थानिकांच्या राजवाड्यामध्ये जे सुशोभिकरण झाले, ते आपणाला युरोपियन कल्चरकडे झुकलेले दिसते. पहा चित्र क्रमांक : ६.१२ मुधोजी मनमोहन राजवाड्याचे आतील भागाचे प्रवेशद्धार यावर पूर्णपणे युरोपियन आर्किटेक्चरचे वर्चस्व असून, खिडक्यांच्या, दरवाज्यांच्या सज्जांच्या जागा त्याचप्रमाणे तुळई व स्तंभ यांच्या जागा व रचना, मराठा आर्किटेक्चरप्रमाणे असून परंतु त्याची ठेवण पूर्णतः युरोपियन पद्धतीची आहे. हे स्पष्टपणे या चित्रात दिसून येत आहे. साधारणतः इ. स. १८२५ नंतर ब्रिटीश राज्यकर्त्यांनी त्यांच्या अमलाखाली येणाऱ्या संस्थानांमध्ये युरोपियन आर्किटेक्ट व कारागीर यांना भारतात आणलेले दिसत आहे. त्याचप्रमाणे पहा चित्र क्रमांक : ६.१३ छज्जांना आधार देण्याकरीता लाकडी कोरीव तीरांचा वापर केला जात असे. (०.३० मी. जाडीचा) त्याच्याऐवजी युरोपियन टाईपमध्ये ०.१५ मी. जाडीचा काटकोन त्रिकोण स्वरूपाचा तीर दिलेला दिसत आहे. हेच स्थापत्यविषयक स्थित्यंतर आहे.

राजवाड्याच्या अंतर्गत सजावटीचा विचार करता देवघर हे सर्व राजांनी सुशोभित केलेले दिसत आहे. त्यामध्ये फलटणचे राजे यांनी विशेष महत्त्व दिलेले दिसत आहे. पहा चित्र क्रमांक : ६.१४ मुधोजी मनमोहन राजवाड्याच्या देवघराच्या बाजूस केलेले नक्षीकाम गेरू (लाल रंगाचा रंग) व चुना (पांढरा रंग मीठ घालून केलेला) यांचा वापर करून पारंपारिक पद्धतीने केलेले नक्षीकाम वाड्यात ठिकठिकाणी दिसते. या नक्षीकामामध्ये चुन्यामध्ये मीठ घालून तयार केलेला पांढरा रंग वापरलेला आहे. त्यामुळे हा रंग दीर्घकाळ टिकतो, या नक्षीमध्ये दाखविलेली फुले, वेली व कमानी ज्याप्रमाणे लाकडावर कोरलेल्या दिसतात, त्याचप्रमाणे रंगात काढण्याचा प्रयत्न केलेला दिसत आहे. या चित्राच्या मध्यभागी असलेला कोनाडा पूर्णपणे मराठा स्थापत्याचा नमुना आहे.

राजवाड्यात ज्याप्रमाणे दगडाच्या कोरीव कामांना विशेष लक्ष दिलेले दिसत आहे. तसेच लाकडाच्या कोरीव कामांनासुद्धा विशेष लक्ष देऊन केलेले दिसत आहे. पहा चित्र क्रमांक : ६.१५ या चित्रामधील लाकडाची कारागिरी ही अत्यंत कौशल्याने करायची कारागिरी असते. लाकडाच्या पट्टया

एकमेकात घालून मधे शंकरपाळ्यांसारखा आकार येतो. त्याच्या आतील बाजूस अशा स्वरूपाचे लाकडाचे कोरीव काम केले जाते. या नक्षीच्या दोन्ही बाजूला लाकडाचे दोन खिळे आपल्याला दिसतात. ते सर्वांत महत्त्वाचे काम करतात. कारण या लाकडाची जाळी तयार होते व ही लाकडाची जाळी तयार करताना ज्या ठिकाणी दोन लाकडाच्या पट्ट्या एकमेकांना ४५ अंशात छेदतात, त्या ठिकाणी येणाऱ्या जोडाला लाकडाचे खिळे वापरले जातात. अशा स्वरूपाची जाळी सध्या कारागिर करत नाहीत, कारण याच्यात गणित आहे व काटेकोरपणा आहे. हा मराठा आर्किटेक्चरचा सर्वोत्कृष्ट नमुना आहे. युरोपियन आर्किटेक्चरमध्ये हा कोठेही दिसत नाही. अशा स्वरूपाच्या दिसायला सोप्या पण अवघड असलेल्या लाकडाच्या रचना युरोपियन कारागिरांनी कोठेही केलेल्या आढळत नाही.

फलटणच्या राजवाड्यात दरबार सभागृह यामध्ये अतिशय कौशल्याने लाकडाचे कोरीव काम केलेले दिसत आहे. या सभागृहामध्ये लाकडाचे कोरीव खांब व त्यावर केलेली नक्षी तसेच दोन्ही लाकडाच्या खांबांमध्ये असलेली नऊ पाकळ्यांनी पूर्ण केलेली लाकडाची शास्त्रशुद्ध कमान व त्यावर असलेले कडी पाटाचे छत हे संपूर्णपणे मराठा आर्किटेक्चर याचे प्रतिनीधीत्व करते. एका रांगेत अशा दिसणाऱ्या या असंख्य कमानी व महिरपी व भिंतीवर काढलेले उठावदार चुन्याच्या कमानी, ०.३ मी व ०.३ मी. असलेल्या छोट्याशा खिडक्या त्याबाजूने केलेले नक्षीकाम हे सर्व दरबार सभागृहाच्या सौंदर्यात भर घालते. पहा चित्र क्रमांक : ६.१६ व ६. १७ या दरबार सभागृहाच्या लाकडाच्या कामांना केलेले पॉलीश त्यामुळे आलेली चकाकी ही सभागृहाच्या ताजेपणाची साक्ष देते. राजासाठी बनविलेले सिंहासन व त्यासमोर प्रत्येक सरदाराला बसण्याकरीता दिलेले लाकडाचे आसन हे सर्व दरबार सभागृहाला शोभा देणारे आहे. संपूर्णपणे मराठा शैलीमध्ये दिसणारे हे दरबार सभागृह आपल्याला फलटणप्रमाणेच भोर, औंध, नागपूर व सातारा या सर्वच ठिकाणी एकसारखे दिसत आहे.

स्थापत्यामध्ये झालेल्या स्थित्यंतराचे एक उत्कृष्ट उदाहरण म्हणून पहा चित्र क्रमांक : ६.१८ व ६.१९ दरबार सभागृहाप्रमाणेच अन्य छोटी मोठी सभागृहे या राजवाड्यामध्ये आहेत. त्या सभागृहामध्येही अशा दरबार सभागृहाप्रमाणेच लाकडी कोरीव खांब, कमानी, खिडक्या इ. सर्व मराठा आर्किटेक्चरप्रमाणेच होते. पण ते सर्व काढून टाकून छोट्या सभागृहाचे मोठ्या सभागृहामध्ये रूपांतर केले. हे सर्व करीत असताना पूर्णपणे युरोपियन आर्किटेक्चर वापरून त्या सभागृहाचे छत, त्यावरील नक्षीकाम, काचेची झुंबरे, आसन व्यवस्था, लाकडी कपाटे, दरवाजांच्या बाजूवरील नक्षीकाम इ. सर्व बारीक सारीक गोष्टींमध्ये बदल करून पूर्णपणे आंग्लशाहीचा प्रभाव असलेले सभागृह तयार केलेले दिसत आहे.

याच फलटणच्या राजवाड्यामध्ये बरोबर तशाच प्रकारचे एक मोठे सभागृह पण मराठा शैलीमध्ये असलेले पहा चित्र क्रमांक ६.२० या चित्रांमध्ये आपल्याला मराठा आर्किटेक्चरमध्ये दिसणारे कडीपाटाचे छत, लाकडाचे कोरीव स्तंभ, लाकडाचा किंवा ढगडाचा तळखडा, लाकडाच्या कोरीव स्तंभांना जोडणाऱ्या लाकडाच्याच कमानी त्यामुळे भरगच्च दिसणारे मराठा स्थापत्य शैलीत असलेले दरबार सभागृह आपणास दिसत आहेत. हे प्रत्यक्ष ६.१ आराखड्यामध्ये बघावयास मिळते. त्याचप्रमाणे त्यालाच जोडून बांधलेल्या नवीन राजवाड्यामध्ये वरील मराठा स्थापत्यामध्ये असलेले लाकडाचे स्तंभ, तळखडे, कमानी व छत हे पूर्णतः बदलून चित्र क्र. ६.१८ व चित्र क्र. ६.१९ मध्ये नवीन दरबार गृहाचे युरोपियन स्थापत्यचा वापर करून तयार केलेले सभागृह दिसत आहे. हा स्थापत्यविषयक स्थित्यंतरातील महत्त्वाचा पुरावा आहे.

फलटणच्या राजवाड्यात असणारे चौक व त्या चौकातील दृश्य, चौकात असणाऱ्या माणसांना त्याचप्रमाणे चौकात आलेल्या पाहुण्यांना एकंदरच चौकामध्ये घडणाऱ्या प्रत्येक घडामोडीला पहिल्या व दुसऱ्या मजल्यावरून लक्ष ठेवता येत असे. त्याप्रमाणेच राजवाड्याची रचना बहुसंख्य ठिकाणी दिसते. यासंदर्भात पहा चित्र क्र. ६.२१, ६.२२, ६.२३ व ६.२४ यामध्ये तळमजल्यावरील चौकात होणारा कार्यक्रम पहिल्या व दुसऱ्या मजल्यावरील उपस्थित असलेल्या लोकांना बघता येईल, याप्रमाणे खिडक्या व दरवाजे यांची रचना केली आहे. हा एक मराठा स्थापत्य शैलीमध्ये जागेचा वापर कसा करावा व खिडक्या दरवाजांची रचना कशी असावी याचा उत्कृष्ट नमुना म्हणून ही चित्रे आहेत.

फलटणच्या राजवाड्यात असलेला वृंदावनाचा चौक व त्यामध्ये दिसणारी पाणी निःस्सारणाची योजना, माटीव ढगडामध्ये कोरलेले वृंदावनाचे ढगड, पायऱ्या व लगेचच त्यावर असलेले लाकडी खांब, तसेच वरपर्यंत जाणाऱ्या ढोन पाकळ्यांनी तयार झालेल्या कमानी हे सर्व पाहिल्यावर स्थापत्यामधील बदल डोळ्यामध्ये भरतो. पहा चित्र कम्रांक ६.२५ व ६.२६ तुळशी वृंदावनाचा चौक व त्याबाजूने असलेले नवीन राजवाड्यात केलेले काम - या छायाचित्रामध्ये आपल्याला स्पष्ट जाणवेल की चौकाच्या बाजूला असलेले लाकडी कोरीव खांब, तळखडा, त्याला जोडणाऱ्या लाकडाच्या कमानी व लाकडाची जाळी असलेला, कोरीव काम असलेला अर्धगोलाकार कठडा हे मराठा स्थापत्य शैलीतील काहीही नसून त्यामध्ये लोखंडाचे ओतीव काम केलेले कठडे, थोडे इस्लामिक व थोडे युरोपियन शैली असलेल्या वीटांमध्ये बांधलेल्या कमानी व बाहेरून लाकूड व आतून लोखंड असे असलेले स्तंभ आपणास दिसत आहेत. हा स्थापत्य शैलीतील स्थित्यंराचा पुरावाच आहे.

फलटणच्या राजाकडे लाकडावर कोरीव काम करणारे कारागिर हे अत्यंत बुद्धीमान व कुशल असे दिसत आहेत. एखाद्या तुळईचा शेवटचा भाग ढगडी चौकामध्ये येत असेल तर त्या तुळईच्या शेवटच्या भागाचे सौंदर्ययीकरण कसे करावे हे कारागिरांना कौशल्य अवगत दिसत आहे. पहा चित्र क्रमांक ६.२७ व ६.२८ लाकडाच्या हस्तांवर कोरलेले कोरीव काम-या छायाचित्रामध्ये एक शिल्पकाष्ठ तुळईच्या तोंडावर कोरलेले आपल्याला दिसत आहे. वाड्याच्या चौकामध्ये जेव्हा तुळईचे तोंड उघडे असते, त्याला झाकण्यासाठी व त्या तुळईच्या तोंडातून आत वाळवी जाऊ नये, उन्हाचा व पावसाचा परिणाम होऊ नये याकरिता तुळईच्या तोंडावर अशा स्वरूपाचे कोरीव काष्ट शिल्प जोडले जाते. या छायाचित्रामध्ये ६.२७ मध्ये पोपटांचे व ६.२८ मध्ये माकडांचे व मोरांचे आकार असलेले कोरीव काम केलेले दिसत आहे. कदाचित हे कोरीव काम अलिकडे नंतर केलेले असावे. कारण तुळईला जोड देण्याकरिता वापरलेले लाकडाचे खिळे स्पष्टपणे दिसत आहे. हा तुळईच्या तोंडावर कोरलेला हस्त हा दोन्ही प्रकारची काम करतो. एक म्हणजे सौंदर्यात भर टाकतो व दुसरे म्हणजे तुळईचे कोड, हवापाणी यापासून रक्षण करतो, त्यामुळे आयुष्य वाढते. हा मराठा स्थापत्यशास्त्राचा एक नमुना आहे. या प्रबंधामध्ये फलटणबरोबरच भोर, सातारा, औंध आणि नागपूर किंवा इतरही संपूर्ण महाराष्ट्रात दिसणाऱ्या सर्व राजवाड्यांमध्ये एका विशिष्ट्य प्रकारच्या लाकडाची महिरप आपल्याला सर्वच ठिकाणी दिसते. ही कमान ज्या पद्धतीने शास्त्रशुद्ध बनविली आहे, तिचा संशोधनात्मक निष्कर्ष पहा चित्र क्रमांक ६.२९ लाकडाच्या कमानीचे वैशिष्ट्य-मराठा स्थापत्य शैलीमध्ये बरोबर नऊ पाकळ्यांनी ही कमान पूर्ण होते. खालून वरती जाणाऱ्या लंबगोलाकार साडेचार पाकळ्या उजवीकडे व लंबगोलाकार साडेचार पाकळ्या डावीकडे अशा एकंदर नऊ पाकळ्यांनीच बनलेली ही लाकडी कमान सर्व राजवाड्यांमध्ये आपणांस दिसते. या कमानीचे वैशिष्ट्य असे की, युरोपियन किंवा इस्लामिक स्थापत्यामध्ये अर्धगोलाकार दोन पाकळ्यांमध्येच कमान पूर्ण होते. परंतु मराठा स्थापत्य शैलीमध्ये नऊ या अंकाला विशेष महत्त्व असल्याने एकंदर ही नऊ पाकळ्यांची कमान महाराष्ट्रातील सर्व राजवाड्यांमध्ये दिसते. तशाच स्वरूपाचे ढगडामध्ये सुद्धा ढगडात कोरीव काम केलेल्या कमानी, खांब आपल्याला याच राजवाड्यात पहावयास मिळतात. ढगडाच्या किंवा लाकडाच्या कमानी एकसारख्याच गणिताने कारागिराने कोरलेल्या आहेत, हे या स्थापत्याचे वैशिष्ट्य आहे. पहा चित्र क्रमांक ६.३० एकमुखी दत्त मंदिराचे उत्कृष्ट ढगडाचे स्थापत्य-इ. स. १७ व्या व १८ व्या शतकात स्थापित झालेल्या अनेक ढगडी कोरीव काम केलेल्या मंदिरामध्ये आपल्याला अशाच स्वरूपाचे एकसारखे अत्यंत अवघड, लाकडाच्या कोरीव कामाप्रमाणे दिसणारे तळखडे, स्तंभ, कमानी, त्यावरील नक्षीकाम हे सवृ दिसते. हे दिसायला

जरी सामान्य दिसले तरी स्थापत्यदृष्ट्या अत्यंत कठीण व भक्कम स्वरूपाचे असते व सौंदर्यातही भर टाकणारे असते, ही विशिष्ट प्रकारची ढगडाची मराठा स्थापत्य शैली आहे.

सर्व संस्थानिकांच्या राजवाड्यामध्ये असलेल्या चौकांमध्ये ढगडाची फरशी व वृंदावन आपल्याला दिसते. परंतु चौकाच्या सर्वात कडेला चारही बाजूंनी केलेली माटीव ढगडामध्ये असलेली पाणी जाण्याकरीता केलेली झरी हा स्थापत्य शास्त्रातील एका महत्त्वाच्या रचनेचा भाग आहे. पहा चित्र क्रमांक ६.३१ पाणी निःस्सारण योजना - पावसाचे पाणी व इतर बाजूंनी चौकात पडलेले पाणी बाहेर काढण्यासंदर्भात अशी व्यवस्था असे की, चौकाचे बांधकाम करताना जोत्यावर (Plinth) तळाला ढगडी गटार तयार करीत असे व ते ढगडाच्या चौकोनी तयार केलेल्या पन्हाळीतून बाहेर काढले जात असे. याला जल निःस्सारण प्रक्रिया म्हणत असत. यावरून मराठा वास्तू शास्त्रज्ञ पाण्यासंदर्भात चांगला विचार करीत असे, असे दिसते. उदा. या पन्हाळीतून बाहेर पडलेले पाणी अर्धगोल अशा ढगडी गटारीतून परत झाडांमध्ये किंवा इतर कामांसाठी वापरत असत. म्हणजे पावसाचे किंवा इतर पाणी वाया जाऊ न देता इतर कामाला वापरावे, असा समज होता. यालाच सध्या ठरळप थरींशी कर्शींशींळपसम्हणतात. याच चित्रामध्ये घडवलेल्या ढगडाच्यावरती जोत्यामध्ये लोहाकडून बनविलेल्या लोखंडी कड्या काम करतानाच अडकवलेल्या आहेत. त्याचाही उपयोक चौकामध्ये सणासुदीच्या काळात किंवा इतर धार्मिक कार्यक्रमात मांडवाच्या वाशांना आधार देण्याकरीता केला जात असे. एखाद्या वेळेस गोपूजनाच्या कार्यक्रमात गाय पण बांधून ठेवण्याकरता या लोखंडी कड्यांचा उपयोग होत असे. यावरून स्थापत्यशास्त्राची दूरदृष्टी समजते. फलटणच्या राजवाड्यात स्थापत्य कलेचा सुंदर नमुना जर अभ्यास करावयाचा असेल तर राजवाड्यात आवारातच बनविलेली अष्टकोनी दीपमाळ - ढगडातील स्थापत्याचा उत्कृष्ट नमुना आहे. अत्यंत रेखीव, प्रमाणबध्द व स्थापत्यशास्त्राच्या गुणवत्तेनुसार कोठेही चूक नाही. तळापासून अष्टकांन ते माथ्यापर्यंत कमी कमी होत जाणारे अष्टकोन करणे हा कारागिराचा व स्थापत्यकलेच्या गणिताचा अभ्यास असल्याशिवाय होऊ शकत नाही. मुख्य प्रवेशद्धाराच्या उजवीकडे असलेली दिपमाळ आजच्या कारागिरांना आव्हान देत आहे. या दीपमाळेच्या बरोबर डाव्या बाजूला जो नवीन राजवाड्याचा भाग आहे. मागे निष्कर्ष दिल्याप्रमाणेच त्या जोडकाम केलेल्या राजवाड्याचे प्रवेशद्धार दोन भिन्न संस्कृतीची साक्ष देते. पहा चित्र क्रमांक ६.३२ महाराष्ट्रातील सर्वांत जुने मराठा घराणे नाईक-निंबाळकर यांच्या राजवाड्याचे फलटण येथील प्रवेशद्धार - यामध्ये मराठा स्थापत्य व युरोपियन स्थापत्य यांचे मिश्रण दिसत आहे. घराण्याचे बोधचिन्ह इंग्रजी अक्षरात

आहे. परंतु भारतीय हिंदू संस्कृतीप्रमाणे प्रथम पूजन 'श्रीगणेश' मूर्ति स्थापन करण्याची परंपरा नाईक-निंबाळकर विसरले नाहीत, असे या चित्रात दिसत आहे.


६.७ सारांश :- फलटण संस्थान हे महाराष्ट्रातील सर्वांत जुने संस्थान असून छत्रपती शिवाजी महाराजांच्या पत्नी सईबाई या फलटण संस्थानचे निंबाळकर यांच्या घराण्यातील होत्या. या प्रकरणामध्ये फलटण संस्थानची भौगोलिक स्थिती व फलटण संस्थानचे अधिपती निंबाळकर यांचा पूर्वेतिहास व संस्थानचा इतिहास याचा धावता आढावा घेण्यात आला आहे. फलटण संस्थानच्या राजवाड्याप्रमाणेच भोर, औंध, सातारा व नागपूर या संस्थानिकांचे राजवाडे व त्यांचे स्थापत्य खूपच मिळते-जुळते असल्यामुळे या प्रकरणात सर्वांचा एकत्रित अभ्यास केल्यावर केलेली निरिक्षणे, स्थापत्यविषयक झालेली स्थित्यंतरे व संशोधनात्मक अनुमाने याचा सविस्तर आढावा घेण्यात आलेला आह. त्यामध्ये राजवाड्याच्या स्थापत्यामध्ये वापरण्यात आलेले साहित्य, कशा स्वरूपाचे आहे, रचना कशा स्वरूपाची व का आहे यामध्ये मोठी, छोटी सभागृहे, प्रांगण, आतील व बाहेरील संरक्षक भिंत, मंढिरे, ढेवघर, तळघर, बाळंतिणीची खोली, सोपा इ. जुन्या राजवाड्यांच्या स्थापत्यामध्ये आलेल्या संज्ञा व त्यांचा अर्थ याचा आढावा घेण्यात आलेला आहे. एकंदरीतच राजवाड्यांचा स्थापत्यविषयक प्रबंधामध्ये असलेला भाग यावर जास्त अभ्यासपूर्ण प्रकाश टाकला आहे. साताराच्या भोसले घराण्यातूनच निर्माण झालेले नागपूर संस्थान याचा आढावा पुढील प्रकरणात घेण्यात आलेला आहे.

६.८ उपसंहार :- मराठ्यांचे साम्राज्य निर्माण होण्याच्या अगोदरपासून ज्यांनी स्वतःला नाईक म्हणूनच घेऊन आजूबाजूच्या गावांमध्ये स्वतःची सत्ताकेंद्रे निर्माण केली. ही ग्राम सत्ताकेंद्रे त्यांना महसूल मिळवून देत असत. अशा काही गावांमध्ये हळूहळू सत्ता केंद्रे निर्माण करून स्वतःचा परगणा तयार केला व मोठे सत्ताकेंद्र तयार केले असे फलटणचे राजे नाईक निंबाळकर घराण्याचा इतिहास आहे. ग्राम सत्तेत चालणारी सर्व प्रशासकीय व्यवस्था यावर राजे निंबाळकरांचा धाक असे, असे दिसते. मराठ्यांचे साम्राज्य निर्माण होण्याच्या अगोदर दिल्लीच्या बादशहाला विनाकारण मोठे करून त्याचे मांडलिकत्व स्विकारत असत. हा पायंडा छत्रपती शिवरायांनी मोडून काढला. निंबाळकरांची मुलगी सईबाई हिच्याशी लग्न केले. त्यामुळे आपोआपच निंबाळकरांशी सोयरीक होऊन नाते जोडले गेले. फलटणचा परिसर हा एक मोठा परगणा होता. असेच आजूबाजूचे परगणे मिळवून सत्ताकेंद्रे तयार करून निंबाळकरांनी स्वतःचे संस्थान निर्माण केले. याच काळात (१८ व्या शतकात) महाराष्ट्रातील संस्थानिकांनी स्वतःच्या राजवाड्या सदृश्य वास्तु निर्माण केल्या. त्याला लोक राजवाडा म्हणू लागले. संस्थानिक स्वतःला राजे म्हणून घेऊ लागले. या भव्य राजवाड्यांच्या निर्मितीमध्ये ढगड, लाकूड, लोखंड यांचा मोठ्या प्रमाणात

वापर झाला. त्यामुळे सुतारांना, पाथरवटांना, लोहारांना व ग्रामसत्तेतील इतर बारीक सारीक कारागिरांना, तरुणांना मोठ्या प्रमाणात रोजगार उपलब्ध झाला. १९ व्या शतकात आंग्ल पद्धतीमुळे राजवाड्याच्या स्थापत्यात स्थित्यंतरे झाली. १९ व्या शतकाच्या उत्तरार्धात व २० व्या शतकाच्या पूर्वार्धात उद्योगांना चालना मिळून मोठी उद्योग व्यवस्था निर्माण झाली. त्यामुळे सांस्कृतिक स्थित्यंतरेही घडली. फलटण संस्थानच्या या प्रकरणामध्ये स्थापत्यविषयक निरीक्षणे व वस्तुस्थिती, संशोधनात्मक अनुमाने यांचा संशोधनात्मक अभ्यास केला आहे.


६.१ फलटण संस्थानामधील स्थापत्य व स्थापत्यामधील झालेली स्थित्यंतर याचे नकाशे व छायाचित्रे

चित्र क्रमांकः ६.१




मुधोजी मनमोहन राजवाड्याच्या पहिल्या मजल्याचे जुने व नवे दरबार सभागृहाचा नकाशा

चित्र क्रमांकः ६.२




मुधोजी मनमोहन राजवाड्याचा छतापासून जमिनीपर्यंतचा घेतलेला वरून दिसणारा आराखडा

चित्र क्रमांकः ६.३



मुधोजी मनमोहन राजवाड्याच्या तळमजल्याचा आराखडा

चित्र क्रमांकः ६.४



मुधोजी मनमोहन राजवाड्याचा दुसऱ्या मजल्याचा आराखडा

चित्र क्रमांकः ६.७




फलटणच्या राजवाड्यात असलेल्या राममंदिराचा दर्शनी भाग

चित्र क्रमांकः ६.६



फलटणच्या राजवाड्यासमोरील पुरातन मंदीर

चित्र क्रमांकः ६.७



फलटणच्या राजवाड्याचा दर्शनीभाग

चित्र क्रमांकः ६.८



फलटण संस्थानचे बोधचिन्ह

चित्र क्रमांकः ६.१



मुधोजी मनमोहन फलटण राजवाड्याच्या ढर्शनी भागाच्या सर्वात वरती असलेली सरस्वतीची मूर्ती

चित्र क्रमांकः ६.१०



फलटण राजवाडाच्या बांधकामातील स्थित्यंतराचा शिलालेख

चित्र क्रमांकः ६.११


॥ श्रीरामप्रसन्न · ॥
॥ स्वस्तिश्रीनृपशालिवाहन शके १७८२ ॥
॥ रौद्र नाम संवत्सरे मित्ती फाल्गुन शुद्ध ११ शुक्रवारीं ॥
॥ मुधोजी मनमोहन ॥
॥ हा वाड्याच्या इमारती पैकीं जुन्या भागाच्या कामासआरंभ होऊन तें काम ॥
॥ शके १७९७ युवनामसंवत्सरे मित्ती वैशाख शुद्ध १ गुरुवारीं पुरें झालें. हा जुन्या ॥
॥ भागास जोडून हा नवीन इमारती चा जो भाग करण्यांत आला त्यास आरंभ ॥
॥ शके १८३१ सौम्य नामसंवत्सरे मित्ती श्रावण शुद्ध १२ शनिवारीं होऊन तें काम ॥
॥ शके १८३२ साधारणनाम संवत्सरे मित्ती पौष शुद्ध १२ गुरुवारीं पुरें झालें ॥
॥ हा वाडयाचें जुनें बनवें सर्व काम जानोजीसुत मुधोजी नाईक निंबाळकर यांनीं केलें
॥ विद्या विघ्नेश विलसद्भवनं नंददोहनम् · ॥
॥ गोपाल गोपितं गोप्यं मुधोजी मनमोहनम् ॥ गोप्या

फलटण राजवाड्यातील कोरीव शिलालेख

चित्र क्रमांकः ६.१२




मुधोजी मनमोहन राजवाड्याचे आतील भागाचे प्रवेशद्धार

चित्र क्रमांकः ६.१३




सज्जांना आधार देण्याकरीता लाकडी कोरीव तीरांचा वापर

चित्र क्रमांकः ६.१४



मुधोजी मनमोहन राजवाड्याच्या देवघराच्या बाजूस केलेले नक्षीकाम

चित्र क्रमांकः ६.१५



मुधोजी मनमोहन राजवाड्यात लाकूडकाम केलेल्या जाळीचे चित्र

चित्र क्रमांकः ६.१६




मुधोजी मनमोहन राजवाड्यात दरबार हॉलचे प्रत्यक्ष चित्र

चित्र क्रमांकः ६.१७



मुधोजी मनमोहन राजवाड्यात दरबार हॉलचे दर्शनी भागाचे प्रत्यक्ष चित्र

चित्र क्रमांकः ६.१८



मुधोजी मनमोहन राजवाड्यात दरबार हॉलचे युरोपियन पद्धतीच्या छताचे चित्र

चित्र क्रमांकः६.१९



मुधोजी मनमोहन राजवाड्यात दरबार हॉलचे युरोपियन पद्धतीच्या छताचे चित्र व सजावट

चित्र क्रमांक:६.२०



मुधोजी मनमोहन राजवाड्यात दरबार हॉलचे अंतर्गत सजावट असलेले चित्र

चित्र क्रमांकः ६.२१



मुधोजी मनमोहन राजवाड्यामध्ये पहिल्या व दुसऱ्या मजल्याचे पहिल्या मजल्यावरून दिसणारे दृश्य

चित्र क्रमांकः ६.२२



मुधोजी मनमोहन राजवाड्यामध्ये पहिल्या व दुसऱ्या मजल्याचे पहिल्या मजल्यावरून दिसणारे दृश्य व ढगडी चौक

चित्र क्रमांकः ६.२३



मुधोजी मनमोहन राजवाड्यामध्ये दुसऱ्या मजल्यावरील चौकामधून दिसणाऱ्या खिडक्या व दरवाजांचे स्थापत्य

चित्र क्रमांकः ६.२४



मुधोजी मनमोहन राजवाड्यामध्ये दुसऱ्या मजल्यावरील खिडक्या स्थापत्य

चित्र क्रमांकः ६.२५



मुधोजी मनमोहन राजवाड्यात तुळशी वृंदावनाचा चौक व त्याबाजूने असलेले नवीन राजवाड्यात केलेल्या कामाचे चित्र

चित्र क्रमांकः ६.२६



मुधोजी मनमोहन राजवाड्यात तुळशी वृंदावनाचा चौक व त्याबाजूने असलेले युरोपियन पद्धतीच्या कमानीचे चित्र

चित्र क्रमांकः ६.२७




मुधोजी मनमोहन राजवाड्यात लाकडाच्या हस्तांवर कोरलेले पोपटाच्या आकाराचे कोरीव कामाचे चित्र

चित्र क्रमांकः ६.२८



मुधोजी मनमोहन राजवाड्यात लाकडाच्या हस्तांवर कोरलेले माकडाच्या आकाराचे कोरीव कामाचे चित्र

चित्र क्रमांकः ६.२९



मुधोजी मनमोहन राजवाडा-लाकडाच्या कमानीचे वैशिष्ट्य

चित्र क्रमांकः ६.३०



मुधोजी मनमोहन राजवाडा-एकमुखी दत्त मंदिराचे उत्कृष्ट दगडाचे स्थापत्य

चित्र क्रमांकः ६.३१



राजवाड्यातील पाणी निःस्सारण योजना

चित्र क्रमांकः ६.३२



राजवाड्याचे प्रवेशद्धार - मुधोजी मनमोहन राजवाडा

प्रकरण सातवे

नागपूर संस्थान

प्रकरणाचा तपशिल

क्रमांक	तपशिल	पृष्ठ क्रमांक
प्रकरण ७ :	**नागपूरसंस्थान**	**२८३**
७.१	प्रस्तावना	२८७
७.१.१	परसोजी भोसले (इ. स. १६९९ ते १७०९)	२८७
७.२	नागपूरकर भोसले कालीन राज्यांची प्रशासकीय व्यवस्था	२९२
७.२.१	महसूलपध्दती	२९३
७.२.२	कमाविसदार	२९३
७.२.३	कोतवाल	२९३
७.२.४	साहूकार	२९४
७.२.५	टांकसाळ	२९५
७.२.६	गुप्तचरव्यवस्था	२९५
७.३.१	नागपूरकर भोसले प्रशासनातील प्रमुख पदे	२९५
७.३.१	दिवाण	२९५
७.३.२	फडणवीस	२९६
७.३.३	चिटणीस	२९६
७.३.४	जामदार	२९६
७.३.५	बक्षी	२९६
७.३.६	जमेनविस	२९७
७.३.७	खाजगी	२९७
७.३.८	जामूदआणि हरकरे	२९७
७.३.९	वऱ्हाडपांडे	२९७
७.४	नागपूरकर भोसले यांचीवंशावळ	२९८
७.५	नागपूर संस्थानामधील स्थापत्य व स्थापत्यामधील झालेली स्थित्यंतर याचे चित्र क्रमांकासहित संशोधनात्मक निरीक्षण	२९९
७.६	सारांश	३०८
७.७	उपसंहार	३०८
७.८	नागपूर संस्थानामधील स्थापत्य व स्थापत्यामधील झालेली स्थित्यंतर याचे नकाशे व छायाचित्रे	३११-३२२

प्रकरण ७
नागपूर संस्थान

७.१ प्रस्तावना

भोसले घराणे हे महाराष्ट्रात सर्वांनाच माहीत आहे. छत्रपती शिवाजी महाराज यांच्या कुलाची एक शाखा नागपूरमध्ये होती व त्याचा मूळ पुरुष खेलोजी भोसले म्हणून सांगितला जातो. त्याच्या चौथ्या पिढीनंतर छत्रपतीशिवाजी महाराजांची वेरूळ शाखा आणि नागपूरकर भोसल्यांची हिंगणी शाखा म्हणून इतिहासात नोंदवल्या गेल्या (कोलारकर श. गो., पुरंदरे गो. मा., २००५: १). हिंगणी शाखेचा मूळ पुरुष परमोजी भोसले आणि त्यांचा जन्म इ. स. १७१६ मधील आहे असा पुरावा मिळतो. या परमोजीला एक मुलगा होता, त्याचे नाव बिंबाजी, त्याला दोन मुले होती. एक मुधोजी व रूपाजी. हे दोघेही जण छत्रपती शिवाजी महाराजांकडे काम करीत होते. मुधोजींना तीन मुले होती. त्यांपैकी एकाचे नाव बापूजी म्हणजेच पहिले रघुजी महाराज यांचे आजोबा. बापूजींचा मुलगा बिंबाजी (दुसरा) याला अनेक वर्षे पुत्र संतान नव्हते. श्री. रामजी कोल्हटकर या सत्पुरुषांच्या आशीर्वादामुळे आणि रामभक्तीमुळे त्यांना मुलगा झाला, असे त्यांचे म्हणणे होते, म्हणून त्यांनी त्यांचे नाव राघव ठेवले. हाच राघव पुढे नागपूर संस्थानाचा प्रसिद्ध राजा पहिले रघुजी महाराज म्हणून प्रसिध्द झाले. इ. स. १६९७ मध्ये यांचा जन्म झाला. (जन्म स्थितीमध्ये स्पष्टता नाही.) मुधोजीला जी तीन मुले होती, त्यातील बापूजीचा उल्लेख वर केला आहे. उरलेले दोन पुत्र परसोजी भोसले व साबाजी भोसले. छत्रपतीशिवाजी महाराजांच्या राज्याभिषेकाच्या वेळी इ. स. १६७४ मध्ये साबाजी भोसले हा उपस्थित होता. पुरातन व एकनिष्ठ सेवक म्हणून त्यास संबोधले जायचे. छत्रपतीशिवाजी महाराजांचा अंत्यविधी ज्या साबाजी भोसलेकडून करविला गेला तेच हे साबाजी भोसले असे दिसते. साबाजीचा भाऊ परसोजी भोसले यांनी संताजी घोरपडे व धनाजी जाधव यांचे प्रमाण वऱ्हाड व गोंडवनात कार्य केले. औरंगजेबाला त्राही त्राही करून सोडले व मराठवाड्यात परसोजींनी जम बसविला. नंतरच्या १७ ते २० वर्षांच्या कालखंडात (छत्रपतीसंभाजी महाराजांचा काल १६८० ते १६८९ व छत्रपती राजाराम महाराजांच्या काळाची सुरुवात १६८९ ते १६९७) म्हणजेच इ. स. १६८० ते १६९७ या कालखंडात त्यांनी मराठवाड्यावर जम बसविला. त्या परसोजीला "सेनासाहेब सुभा" हे पद छत्रपतीराजारामांनी त्यांना दिले व हेच पद अखेरपर्यंत नागपूरकर भोसले यांना लाभले. साधारणतः इ. स. १६९९ मध्ये हे पद छत्रपतीराजारामांनी त्यांना दिले. या पदाबरोबरच त्यांना सरंजाम देऊन, वऱ्हाड व गोंडवन प्रांतातील चौथाई व सरदेशमुखी वसूल

करण्याचे काम ढेऊन सनद दिली. हे छत्रपती राजारामांच्या या कालखंडात झाले. लगेचच ४ मार्च १७०० मध्ये छत्रपती राजारामांचे महानिर्वाण झाले.

७.१.१ परसोजी भोसले (इ. स. १६९१ ते १७०१)

परसोजी महाराजांची इतिहासात नोंदवली गेलेली खरी कामगिरी संभाजी महाराजांच्या बलिदानानंतरची आहे. औरंगजेबाच्या मृत्यूनंतर छत्रपती शाहू (शंभुपुत्र शाहू) जेव्हा दक्षिणेकडे निघाले (गद्रे प्र., २००१ : १२) त्यावेळी त्यांची प्रथम नर्मदेच्या दक्षिणेस बंडवानी जे संस्थान आहे तेथे मोहनसिंग रजपूत यांची भेट झाली. मोहनसिंग रजपुतांनी शाहूंना फौज व पैसा ढेऊन मदत केली व त्यांची रवानगी सुलतानपूर येथील कोकरमुंडा किल्ल्याच्या जवळ लांबकानी या गावात झाली. त्यावेळी एक महिना शाहूंचा निवास तेथे राहिला. यादरम्यानच परसोजी भोसले २७ जून १७०८ या दिवशी छत्रपती शाहूंना भेटला. मुठे खोऱ्याच्या कुलकर्णी बापूजी, सोलाजी ढिघे यांस शाहूने पत्र लिहून कळविले की, आम्ही स्वराज्यात आलो असता परसोजी भोसले यांनी आम्हांस एकनिष्ठ सेवा दिली व राज्याचा खरा वारस शाहू महाराज आहेत हे सर्व सरदारांस पटवून दिले. यानंतरही परसोजीने शाहूंना खूप साथ दिली. पुढे छत्रपती शाहूंचा राज्याभिषेक सातारा मुक्कामी १२ जानेवारी १७०८ सोमवार माघ शुद्ध प्रतिपदा रोजी झाला. त्यावेळी परसोजी भोसले उपस्थित होते. त्यानिमित्ताने परसोजी यांना 'सेनासाहेब सुभा'(कोलारकर श. गो., पुरंदरे गो. मा., २००७ : ६). हे पद व वऱ्हाड, गोंडवन प्रांताचा अंमल कायम करून वंशपरंपरेची नवीन सनद दिली.ही सनद प्राप्त झाल्यावर परसोजीने वऱ्हाडात येऊन काहीकाळ उत्तम कारभार केला. त्यानंतर तो साताऱ्याच्या शाहू महाराजांच्या भेटीस परत आला. तेथे काही महत्त्वाच्या चर्चा झाल्यावर तेथून परत निघाला. परत जात असतानाच कृष्णा वेण्णा नदीच्या संगमावर माहुलीजवळ खेड येथे इ. स. १७०१ मध्ये त्याचा मृत्यू झाला. त्याठिकाणी परसोजी भोसले समाधी आजही आहे. (त्याच्या मृत्यूची बरोबर तारीख उपलब्ध नाही. इतिहासकारांची वेगवेगळी मते आहेत.) नंतर त्याचा पुत्र कान्होजी यास 'सेनासाहेब सुभा' नेमण्यात आले. त्यानंतर तीन वर्षे कान्होजीने बरे काम केले. पण नंतर त्या कालखंडात सरसेनापती धनाजी जाधव यांच्यासारख्या निष्ठावान सेनापतीचा मुलगा चंदसेन जाधव याने पक्षांतर केले. त्याच काळामध्ये छत्रपती शाहूंचे कोल्हापूर गादीशी संघर्ष जोरात होण्याची चिन्हे निर्माण झाली. एकंदर त्या कालखंडात खूप गोंधळ निर्माण झाला व या गोंधळामध्ये कान्होजींना नीट राज्य करता आले नाही. छत्रपती शाहूंच्या बरोबर वाटाघाटी करण्यासाठी कान्होजी विचार करीत होते. त्याने परस्पर निजामाकडून काही जहागिरी मिळविली होती. हे छत्रपती शाहूंच्या लक्षात आले होते. त्यामुळे कान्होजी हा वादात सापडला होता.

इकडे छत्रपती शाहूंना मदत करणारे बाजीराव पेशवा व रघुजी भोसले (परसोजीचा पुतण्या) यांनी आपली कार्यक्षमता दाखवून तर्कशुद्धपणे छत्रपती शाहूंवर प्रभाव टाकला होता व त्यामुळेच कान्होजीच्या ऐवजी रघुजी असा विचार छत्रपती करू लागले. लष्करी डावपेच व मराठ्यांचे ध्येय हे नेमके काय आहे हे रघुजीला छत्रपती शाहूंच्या सहवासामुळे लक्षात आले होते. त्यामुळे त्याची जडणघडण होत गेली व एक उत्कृष्ठ मनःस्थितीचा मराठ्यांचा सरदा र म्हणून रघुजीला मान्यता मिळू लागली. याच काळामध्ये २४ मार्च १७१७ रोजी पेशवा बाजीराव व फत्तेसिंह भोसले यांनी श्रीरंगपट्टणला स्वारी केली. त्यावेळी रघुजी भोसले त्यांना सहाय्यक म्हणून काम करीत होता. बाजीरावाने कर्नाटकाचा नबाब साढुल्ला खानशी तंजावरचे छत्रपती यांच्याशी मैत्री व युतीचा करार केला. या सर्व घडामोडींमध्ये रघुजी भोसले बरोबरच होते. त्यामुळे त्याला राजकारणातील घडामोडीमध्ये प्रवेश मिळाला. एकंदरीतच या काळामध्ये फत्तेसिंह भोसले यांनी छत्रपती शाहूंकडे त्यांची स्तुती करून त्याला कृपेस पात्र ठरविले (गद्रे प्र.,२००१: १६). मागे आपण बघितले की कान्होजी भोसले यांनी छत्रपती शाहूंना विश्वासात न घेता निजामाकडून जहागिरी मिळविली होती व त्यांची कटकारस्थाने छत्रपती शाहूंच्या लक्षात आली होती. त्यामुळे कान्होजी छत्रपतींच्या मर्जीतून उतरले होते.कान्होजी भोसल्यांच्या एकंदर कारवायांना कंटाळून छत्रपती शाहूंनी त्यांचा सर्व सरंजाम फत्तेसिंह भोसले यांना दिला व फत्तेसिंहांनी छत्रपतींपुढे रघुजींची स्तुती केल्यामुळे छत्रपतींनी फत्तेसिंह भोसल्यांना विश्वासात घेऊन सर्व सरंजाम कारभार रघुजींला बघण्यास सांगितले. या एकाच निर्णयामुळे रघुजी भोसले हे मराठा सरदारांच्या वरच्या रांगेत जाऊन बसले. एकंदरीच रघुजी भोसले फत्तेसिंहाच्या सहकार्याने काम करू लागले. त्यांचे एकंदरीत कर्तृत्व व समज बघून म्हणजेच जवळजवळ तेवीस वर्षांनंतर २३ मे १७३३ यादिवशी रघुजी भोसले यांना त्यांच्या स्वकर्तृत्वाने 'सेनासाहेब सुभा' ही पदवी व जबाबदारी छत्रपती शाहूंनी दिली.

रघुजी भोसल्यांनी वंशपरंपरागत छत्रपतींची सेवा व स्वराज्यासाठी पराक्रम व निष्ठा दाखविली. यासाठी त्यांना देऊर हे गाव देण्यात आले. त्यावेळी त्यांचा सरंजाम ६ लाख ६४ हजार रुपयांचा होता.पुढील १० वर्षे मराठ्यांनी रघुजी भोसले व पेशवे यांच्या नेतृत्वाखाली दक्षिणेवर स्वारी केली. मराठ्यांच्या स्वारीचे राजकीय महत्त्व असे झाले की, मोगल संघटन व प्रशासकीय यंत्रणा यांना धक्का बसला. त्यांचे दौर्बल्य वाढले. दक्षिणेकडील राजेरजवाडे यांच्या कारवाया शिथील झाल्या. मोगलांनी मराठ्यांच्या गनिमी डावपेचांचा धसका घेतला. उदा. कडप्पा, अरकॉट, म्हैसूर, मदुरा राज्यांत मराठ्यांच्या स्वारीमुळे त्याप्रमाणे तंजावर येथील मराठ्यांच्या राज्य प्रशासनामुळे या भागातील हिंदू

संस्कृतीला चांगले दिवस आले व संस्कृतीचे पुनर्रज्जीवन झाले. ज्याज्या मंदिरांतील देवता भ्रष्ट झाल्या होत्या त्यात्या मंदिरात देवता परत स्थानापन्न झाल्या. मंदिरांचे पुनर्निर्माण झाले. उदा. मीनाक्षी मंदिरातील सुंदरेश्वराची देवता मधुरेच्या मंदिरात पुनःप्रस्थापित करण्यात आली. एकंदरीतच दक्षिणेवरील स्वारी मराठ्यांसाठी ऐतिहासीक ठरली. इ. स. १७३८ मध्ये छत्रपती शाहू महाराजांकडून रघुजीला नवीन सनदा प्राप्त झाल्या. त्यात नवीन प्रदेशावर मराठ्यांचा अंमल चालविण्यासाठी त्याला अधिकार प्राप्त झाला. त्यात खालील प्रदेश होते. १. लखनऊ, २. मळसुदाबाद, ३.बेदर, ४.बंगाल, ५. बितिया, ६. बुंदेलखंड, ७.इलाहाबाद, ८.हाजीपूर पाटना यांच्याशिवाय देवगड, गढा, भवरगड, चांदा या प्रांतांची चौथाई व मोकासा हे हक्क वसूल करण्याचा अधिकार दिला (कोलारकर श. गो., पुरंदरे गो. मा., २००५ : २२). रघुजीने नागपूर, भंडारा हा सपाटीचा प्रदेश पूर्वीचा काबीज केला होता. तेथे आपले सरदार ठेवून ती ठाणी पक्की केली होती. त्यानंतर नागपूर ही सोईस्कर जागा पाहून याठिकाणाहून राज्यविस्तार चांगला करता येईल, म्हणून नागपूर येथेच तो राहू लागला.

नागपूरकर रघुजी भोसले आणि पेशवे यांचा अंतर्गत संघर्ष होता. १७३८ मध्ये ज्यावेळी नवीन सनदा प्राप्त झाल्या, त्या काळातच बाजीराव पेशव्यांनी धडक मारून थेट दिल्लीपर्यंत घाला घातला होता. यादरम्यान भोपाळ येथे बाजीराव व निजाम उल्लमुल्ला यांची मोठी लढाई झाली. याचवेळी बाजीरावांनी रघुजी भोसल्याची मदत मागितली होती. परंतु रघुजी भोसले तिकडे न जाता अलाहाबादपर्यंत मुलूखगिरी करत होता. ही गोष्ट पेशव्यांच्या लक्षात आली. खरे तर छत्रपती शाहूंकडून नवीन सनद रघुजी भोसल्यांना मिळाली त्यावेळी पेशव्यांनी स्वारीवर असताना मदत मागितल्यास ती दिली पाहिजे असे कलम होते. त्यामुळे पेशवे व नागपूरकर भोसले संघर्ष सुरू झाला. नागपूरकर रघुजी भोसल्यांनी इ. स. १७३८ च्या उत्तरार्धात कर्नाटकातील मंडल्यावर स्वारी केली होती.मंडल्याच्या किल्ल्याला मजबूत तटबंदी होती. जवळजवळ तीन महिने हा वेढा पडला होता. किल्ल्याचा किल्लेदार पंजाबी जाट होता. रघुजी भोसल्यांचे हजारोंचे घोडदळ व पंधरा हजारांचे पायदळ व पन्नास तोफा यांचा एकत्रित परिणाम असा झाला की, मराठयांच्या या लोंढयापुढे पंजाबी जाट किल्लेदार गुप्त वाटेने पसार झाला. यामध्ये रघुजी भोसल्यांना वीस हजार रुपये नगद, १०० उत्तम घोडे व १०० हत्ती, सोने, हिऱ्यांचे जडावाचे काम केलेली नऊ कडा, अकरा सोन्याच्या कड्या, चांदी सोन्याचा पत्र्याचा पागवाचा पलंग इ. मोठी संपत्ती मिळाली. त्यातील निम्मी संपत्ती व जडावाचा पलंग छत्रपती शाहूंकडे पाठविला रघुजीच्या दक्षिणा दिग्विजयानंतर बंगालवर रघुजी महाराजांच्या चार स्वा-या झाल्या. बंगालमध्ये पाल वंशाच्या हिंदू वंशाच्या राजाची राजवटसंपुष्टात आल्यावर बंगालमध्ये हिंदू राजवंश कधीच उदयाला आला नाही.

शेकडो वर्षे दिल्लीचा इस्लामी राज्यकर्ताच बंगालचा शासक राहिला. बंगालवर सर्वांचीच नजर होती. कारण अखंड आणि मोठ्या प्रमाणात पैसा पुरविणारा प्रांत अशी त्याची ख्याती होती. औरंगजेब बादशहाच्या बऱ्हाणापुरातून जाफरखान नासीर नावाचा एक महसूल खात्याचा अधिकारी होता. इस्लामी राज्यकर्त्यांना बंगालमधून पैसा मिळण्याकरिता त्याला बंगालचा दिवाण म्हणून नेमले गेले. औरंगजेबाच्या मृत्यूनंतर हा नासीर इ. स. १७१३ मध्ये बंगालचा सुभेदार झाला. नासीर यानेच मुर्शिदाबाद शहर बसविले होते. पुढे त्याच्या घराण्यातील माणसे बंगालची सुभेदारी बघत होते. त्यामध्येच त्यांचे एक सल्लागार होते. अली वर्दीखान. अली वर्दीखान आणि त्यांचे मित्र फार पाताळयंत्री लोक होते. त्यांनी दिल्लीशी संधान साधून व बंगालामध्ये कूटकारस्थाने करून बंगालमध्ये दहशत व गोंधळ माजविला होता. अली वर्दीखानने दिल्लीतील सत्ताधाऱ्यांना असे पटवून दिले की, मला बंगालची सुभेदारी दिल्याशिवाय बंगाल स्थिर होणार नाही. या ना त्या कारणाने दिल्लीवर दबाव आणून अली वर्दीखान हा बंगालचा सुभेदार झाला (गद्रे प्र., २००१ : ११०).

बंगालच्या या प्रशासनामध्ये मीर हबीब नावाचा एक प्रामाणिक सरदार होता. त्याला अली वर्दीखानच्या कटकारस्थानांचा व कपटी राजकारणाचा वीटआला होता. या दुष्ट सुभेदाराकडून बंगाल वाचवू शकतील, असे फक्त मराठेच आहेत, हे त्याला माहीत होते. म्हणूनच तो नागपूरकर भोसले यांच्याशी संधान साधण्यासाठी नागपूरला आला. त्यावेळी भास्करपंत कोल्हटकर हा प्रमुख सेनापती राजवाड्यात उपस्थित होता. रघुजी भोसले हे मोहिमेवर असल्यामुळे ते येई तोपर्यंत मीर हबाब याला थांबवून ठेवले. रघुजीला राज्य वाढविण्याकरिता ही योग्य संधी होती, त्यामुळे इ. स. १७४२ मध्ये रघुजीने बंगालवर पहिली स्वारी केली. या सुमारास अली वर्दीखान हा नबाब शिकार करण्यात गुंग होता. मराठ्यांचे सैन्य चालून येत आहे. हे समजल्यावर त्याच्या ख्याली खुशालीत काही फरक पडला नाही. अशा बेफीकिर अवस्थेत मराठ्यांनी त्यांच्या छावणीला वेढा घातला. रात्रीच्या अंधाराच्या सेनापती भास्कर कोल्हटकरांनी एका उंचवट्यावर भगवा झेंडा फडकत ठेवून मुसलमान सैन्याला आवाहन केले. या झेंड्याखाली जे येतील त्यांना जीवदान देऊन अली वर्दीखानने तहाच्या बोलणीसाठी शेरउल्लाखान यास भास्करपंतांकडे पाठविले. त्यावेळी भास्करपंत रघुजींच्या वतीने म्हणाले, "आता तहाची बोलणी काय करणार, तुमची सर्व छावणी आमच्या अधिपत्याखाली असून तुम्ही कोणत्याही परिस्थितीत बाहेर पडू शकत नाही. पण जर का एक कोट रुपये व सर्व हत्ती आमच्या स्वाधीन केल्यास आम्ही नबाब अली वर्दीखानला सुरक्षित वाट देऊ. भास्करपंतांनी सकाळपर्यंत वाट बघितली व मोगल सैन्यांवर हल्ला केला. मोगल सैन्यांच्या दुर्दशेला सीमा उरली नाही. नबाब अली वर्दीचा पाठलाग करीत असताना मोगल

सैन्य व सरदार यांचा सफशेल पराभव झाला व या सर्व गडबडीत केवळ अंगावरच्या कपड्यांनिशी नबाब कटव्याच्या किल्ल्याच्या आश्रयात गेला. अखेर अलीवर्दीवरील महान संकट दूर झाले, परंतु माझ्या पाठीवर असलेले मराठे जर का मुर्शिदाबाद येथे गेले तर राजधानीचे काय होईल या भीतीने अलीवर्दी त्रस्त झाला. मराठ्यांचं सरदार भास्करपंत हा शूरवीर तर होताच व राजनिष्ठपण होता. त्याने मिर हबीब या आपल्याला सामील झालेल्या नबाबच्या सरदारास सैन्य देऊन मुर्शिदाबादकडे पाठविले (दीक्षित नि. सी., २०१४ : ८३७). मीर हबीब याला संपूर्ण मुर्शिदाबादची माहिती असल्यामुळे त्याने मुर्शिदाबाद सहज जिंकले. त्याने आलमचंद या कोट्याधिशाच्या पेठीवर हल्ला केला व अडीच कोट व जडजवाहीर लुटले. ही लूट इतकी मोठी होती की घोड्यांच्या खोगिरामध्ये सोने भरावे लागले. अलीवर्दीच्या ताब्यात असलेल्या स्वतःच्या भावाला सोडवून त्याला परत नेऊन सोडले. मिळालेले सर्व धन घेऊन मीर हबीब भास्करपंतांना देण्यास निघाला. रात्रभर चाळीस पन्नास मैलाचे अंतर काढून भास्करपंतांच्या पुढे सर्व नजराणा ठेवला व म्हणाला, आपल्याला पाहिजे तेवढे धन देतो, पण बंगाल सोडू नका, मराठ्यांनी आपल्याला केलेल्या मदतीची आठवण करून दिली.कृतज्ञता व्यक्त केली. त्यामुळे भास्करपंतांनी आपली छावणी बंगालमध्येच ठेवण्याचे ठरवले. इ.स. १७४३ मध्ये भास्करपंतांनी बंगालवर दुसरी स्वारी केली. याचवेळी नेमके बाळाजी बाजीराव ऊर्फ नानासाहेब पेशवे बंगालच्या स्वारीवर निघाले होते. इकडे रघुजीपण बंगालच्या दिशेने निघाला होता.अलीवर्दी खान व नानासाहेब पेशव्याच्या पत्रव्यवहारामुळे पल्लटीमनोर या ठिकाणी ८एप्रिल १७४३ रोजी दोघांच्या भेटीगाठी झाल्या. नबाबाने ६० लाख रुपये दिले व भोसल्यांना रोखण्यास सांगितले. ही माहिती रघुजीस मिळाली. परकीयांच्या समोर घरातील भांडणाचे प्रदर्शन नको म्हणून रघुजीने माघार घेण्याचे ठरविले. अलीवर्दी खानला लढाई झाल्याचे नाटक दाखवून रघुजी नागपूरकडे परत आला. नानासाहेब पेशाव्यांच्या वर्तनाबद्दल रघुजी महाराजांनी राजा शाहू छत्रपती यांच्याकडे साता-याला जाऊन तक्रार केली. बंगालची सनद रघुजींकडे असल्यांनी पेशव्यांनी त्यांच्या मुलखात लक्ष घालू नये असे स्पष्ट सांगून त्यांच्या मर्यादा स्पष्ट केल्या. भारताच्या पूर्वेकडील सर्व प्रांत रघुजींकडे दिला व उत्तरेकडील सर्व जबाबदारी पेशव्यांकडे दिली. ही सर्व निरवानिरव झाल्यावर भास्करपंत रघुजींच्या सांगण्यावर २०००० ची फौज व २१ सरदार घेऊन बंगालला निघाले. इकडे अलीवर्दीला ही गोष्ट कळाली.त्याने भास्करपंतांचा कपटाने ठार करण्याचा घाट घातला. कारण त्याच्याकडे सैन्यही नव्हते व युद्ध करण्याची मानसिकता व शूरता नव्हती. याउलट भास्करपंतांकडे वीरता व लढवय्येपणा होता. त्यामुळेच त्याने बंगालवर तिसरी स्वारी करण्याचे ठरविले. नबाबाने मुस्तफखान याला भेटीच्या

कामाकरिता नेमले. मुस्तफखानने कुराणावर शपथ घेऊन भास्करपंतांना सांगितले की आपण नबाबाच्या भेटीस यावे. कोठेही दगाफटका होणार नाही अशी ग्वाही दिली, परंतु जेव्हा नबाबाच्या भेटीकरिता भास्करपंत पंडीत गेले तेव्हा भास्करपंतांच्या बरोबर काही शूर सरदारपण होते. नबाबाच्या तंबूत भेटीला जाण्याचा प्रसंग लांबून दूरवर असलेल्या मराठी सैन्याला दिसत होता. मुस्तफाखान, भास्करपंडीत व मराठे सरदार जेव्हा नबाबास भेटण्यास गेले, तेव्हा नबाबाने सिंहासनावरून उठून विचारले, इसमें शूरविर भास्करपंडीत कौन है? मुस्तफाने भास्कर पंडिताकडे बोट दाखविले. नबाबाच्या हुकुमावरून भास्कर पंडीत व त्याच्या सरदारांचा अमानुषपणे शिरच्छेद करण्यात आला. मोगलांची गद्दारी पुन्हा एकदा जगासमोर आली (कोलारकर श. गो., पुरंदरे गो. मा., २००७ : ७२). भास्कर पंडीत यांच्याबरोबर यशवंतराव गुजर, निळकंठराव मोहिते, दादाजी भोसले, बापूजी महाडीक, शहा महंमद खाँ, मानाजी भोसले, कृष्णराव निंबाळकर, बापूजी कदम, श्रीपतराव मेहकर, व्यंकटराव भाऊ, दाजिबा पाटणकर, यशवंतराव शिर्के, गोविंदराव शेलकर, मानाजी भोसले, सुभानजीराव, नाना बक्शी आणि ज्योतिबा कारभारी इ.मराठी सरदारांची आत्माहुती झाली. अलीवर्दी खानाने विश्वासघात करून भास्करपंतांचा काटा काढला, पण ही गोष्ट त्याला महागात पडली. या विश्वासघातामुळे रघुजी भोसले अत्यंत संतप्त झाले. त्यांनी बंगालवर चौथी व शेवटची स्वारी करण्याचा निर्णय घेतला. या विश्वासघातामध्ये अलीवर्दीला मदत करणारा मुस्तफा खान याने बिहारच्या सुभेदारीची मागणी केली, त्याला तसा शब्द दिला होता. पण नेहमीप्रमाणे नबाबाने शब्द फिरविला व मुस्तफाखानशी गद्दारी केली. याचा परिणाम झाला, नबाबाचा मोठा भाऊ हाजी अहमद यास मुस्तफाखानने पकडून पाटणा शहराच्या भर चौकात खाली डोके वर पाय असे टांगून त्याला जाळून टाकले. अलीवर्दीखान हादरूनच गेला.रघुजी भोसले यांनी बंगालला जाण्यापूर्वी इ. स. मार्च १७४७ रोजी ओरिसा प्रांतात स्वारी केली. ओरिसा प्रांत हा नबाबाच्या अखत्यारीत होता. परंतु मराठ्यांच्या फौजेपुढे मीर अब्दुल हा कटकचा किल्लेदार त्यांना शरण गेला व संपूर्ण कटक रघुजी भोसल्यांकडे आले. इकडे नबाब अलीवर्दी खान पटण्यावरून मुर्शिदाबादला आलेला होता. रघुजी भोसल्यांना हे समजताच त्यांनी तीन कोटी रुपयांची मागणी अली वर्दीकडे केली. यामध्ये भास्करपंतांच्या बलिदानाचा राग होताच. मुस्तफा खानशी अली वर्दीने गद्दारी केल्यामुळे ती अफगाणी माणसे रघुजी भोसल्यांना सामील झाली. रघुजीने अली वर्दीला लढाईचे आव्हान दिले. नबाबाच्या व त्यांच्या सैन्याच्या हालअपेष्टांना अंत नव्हता.अशातच नबाबाचे अनेक सरदार रघुजी भोसल्यांना सामील झाले होते. नबाबाचा नातू सिराज उद्दौला हा त्याच्या विरोधात गेला. नबाब मिदनापुरास आल्यावर मराठ्यांची व त्याची लढाई झाली. तेथून पश्चिम बंगालच्या डोंगर

ढऱ्या जवळच असल्यामुळे नबाब त्या डोंगरढऱ्यांत लपून बसला. मराठे व नबाब यांच्या लढाया या डोंगरढऱ्यांत व जंगलात सुमारे ८०० मैलांच्या परिसरात चालू होत्या. नबाब शेवटी थकून गेला. त्याने आपल्या मीर हुसेन अली व मीर खाऊस अली या दोन विश्वासू माणसांबरोबर तहाचा खलिता रघुजी भोसले यांच्याकडे पाठविला. भास्करपंत व एकवीस सरदारांचे बलिदान हे रघुजीच्या मनातून जात नव्हते. या दोघांमध्ये तह झाला.या तहामध्ये :

१. ओरिसा प्रांत पूर्णपणे रघुजी भोसल्यांना नबाबाने देऊन टाकावा. (भास्करपंत व एकवीस सरदारांच्या मोबदल्यात ही मागणी असावी.)
२. बंगालच्या उत्पन्नातून नबाबाने रघुजी भोसल्यांना चौथाई म्हणून १२ लाख रुपये दरवर्षी द्यावेत. (गद्रे प्र., २००१ : १३३)
३. नबाब व रघुजी भोसले यांच्या राज्याकरिता सुवर्णरेखा नदी प्रमाण हद्द मानण्यात यावी.
४. वरील तीन अटी पाळल्यास रघुजी भोसल्यांनी नबाबाच्या हद्दीत शिरू नये, असे तहात ठरले.

यानंतर अलीवर्दीने कधीही उपद्रव दिला नाही व मीर हबीबला रघुजींनी ओरिसाचा सुभेदार नेमले. रघुजी भोसल्यांनी आपले स्वराज्य व्यवस्थित ठेवून पूर्वेकडील राज्य वाढवले होते. रघुजी भोसल्यांनी आपले स्वराज्य शून्यातून निर्माण केले होते. आपल्या कर्तृत्वाच्या व वैभवाच्या अत्युच्च शिखरावर असताना मनाने मोकळ्या मनाचा व दिलदार मनुष्य म्हणून त्याची ख्याती होती. जे राम करील ते खरे असेङ्क ते नेहमी म्हणत असत. पत्राच्या सुरुवातीला सीताकांत असे लिहीत असत. रघुजीने शाहू महाराजांची परवानगी घेऊन प्रभू रामचंद्रांचे चित्र असलेला भगवा ध्वज व जरीपटका भोसल्यांच्या लष्कराची निशाणी म्हणून चालू केला. असा रघुजी भोसले, यांच्याकडे सर्व जातीपंथाचे लोक काम करीत होते. अशा रघुजी भोसल्यांचा फाल्गुन शुक्ल तृतीया १४ फेब्रुवारी १७५५ रोजी मृत्यू झाला. त्यांच्या सहा बायका सती गेल्या. त्यांना चार मुले व दोन मुली होत्या. या सर्व मुलांमध्ये जानोजी हा वडील मुलगा होता.

७.२ नागपूरकर भोसले कालीन राज्यांची प्रशासकीय व्यवस्था

नागपूरकर भोसले कालीन राज्यांची प्रशासकीय व्यवस्था :- भोसल्यांनी इ. स. १७४३ मध्ये गौडांकडून राज्य मिळविले होते (दीक्षित नि. सी., २०१४ : ८३५). त्यामुळे त्यांच्या अगोदर गौडांच्या व मोगलांच्या प्रशासकीय पध्दती प्रचलित होत्या. गौडांच्या काळात पूर्णपणे जमीनदारी पद्धती होती. मुगल दरबारीसुद्धा त्यांची जमीनदार म्हणून नोंद केली जात होती. त्यांच्या परगण्याचा महसूल हे जमीनदार देशपांडे व देशमुखाकडून मिळवत होते. परगण्यांचे विभाजन

खेड्यात झाले होते. या खेड्याच्या पटवारी पटेल हा शेतसारा वसूल करून सरकारकडे पोहचवित होता. खेडे जर मोठे असेल तर पटवाऱ्याला मदत करण्यासाठी एक मदतनीस असे.

७.२.१ महसूल पद्धती

नागपूरकर भोसल्यांनी परगण्याचे महसूल वसूल करण्याकरता कमाविसदारांची नेमणूक केली होती व या कमाविसदारांच्या मदतीकरता फडणवीस व वऱ्हाड पांडे हे शेतसाऱ्याचा हिशेब ठेवण्यास मदत करीत असत. महसूल गोळा करताना कोणत्या पिकावर त्यावर्षी किती शेतसारा लावायचा हे गावाचा पटवारी ठरवित असे. व हा पटवारी रयतेशी संस्था साधून असावयाचा.त्याच्याशी चर्चा करून म्हणजेच शेत मालक व पटवारी यांच्यात एक करार होत असे. या कराराला लगान असे म्हणत असत. या लगानाची शासनदरबारी नोंद झाल्यास त्याला धारा म्हणत असत. हा पुढे अनेक वर्षे चालत असे.

७.२.२ कमाविसदार

कमाविसदार हा निरनिराळ्या पटवाऱ्यांना (पटेल बोलवून परगण्याचा एकूण महसूल वसूल किती झाला हे ठरवित असे. वसुली बहूतेक वर्षातून दोनदा केली जात असे. पटवारी या कामाकरिता पांड्यांना नेमत असे. व त्यांना पगार देत असे. अशा तऱ्हेने कमाविसदार काही वर्षांनी तरबेज होत असे.

या खेड्यांतील प्रशासनात जोशी यास फार मानाचे स्थान असे. जोशी हा ब्राह्मण जातीचा असून तो सर्वसामान्य शेतकऱ्यांना कामात मदत करीत असे. पेरणीपासून ते कापणीपर्यंत याबद्दल त्यांचा सल्ला घेतला जात असे. याव्यतिरिक्त गावातील धार्मिक विधी त्यांच्याशिवाय होत नसे. या कामाबद्दल त्यांना शेतीचा एक तुकडा मिळत असे. इतर धार्मिक कार्याप्रसंगी त्याला पैसे दिले जात असत.

७.२.३ कोतवाल

याची काम खेड्यात शांतता ठेवणे हे होते. पाटील किंवा पटवारी यांच्याकडून मिळालेला हूकूम तो ठाणेदाराकडे पोहचविण्याचे काम करीत असे. एकंदरीत तो गावाचा रखवालदार होता. या कामाकरिता त्याला जमीन व धान्य स्वरूपात मोबदला मिळत होता. या प्रत्येक गावामध्ये बारा बलूतेदार आपापली कामे करीत असत. यांच्याव्यतिरिक्त पटेल अथवा पटवारी यांना एकूण शेतसाऱ्याच्या १५ टक्के मोबदला मिळत असे. त्याप्रमाणे देशमुखांना ५ टक्के भाग मिळण्याची सोय

होती. देशपांड्यांना अडीच टक्के भाग मिळण्याची सोय होती (कोलारकर श. गो., पुरंदरे गो. मा., २००७ : २९०).

७.२.४ साहुकार

नागपूरकर भोसले राजे लोक आपला वसूल सावकारांकडे (साहुकार) यांच्याकडे ठेवत असत. त्याप्रमाणे अनेक वेळेला कर्जे होत असत. नागपूरला नगर, नाईक, काळे, झिपरे, पटवर्धन, उढेपुरी, गोसावी, नारोबा नाईक इ. प्रसिद्ध सावकार होते. भोसला राजवटीत बहुतेक देवाणघेवाण वस्तूच्या विनिमयाने होत असे. शेतसाराही बहुतेक धान्याच्या स्वरूपात घेतला जात असे. तिसऱ्या रघुजीच्या काळात म्हणजे इ. स. १८४४ ते १८७५ नारोबा काळेकर हे महसूल खात्याचे प्रमुख होते. खरे तर महसूल खात्याचा मनुष्य लोकप्रिय होऊ शकत नाही. परंतु नारोबा काळेकर हे महसूल वसूल करण्यात इतके निपुण होते की, त्यांच्या कार्यपद्धतीमुळे महसूल वसूलपण होत असे. राजाविषयीचा आदर जो लोकांमध्ये असावा लागतो तो आदर वाढून ते स्वतः लोकप्रिय झाले होते. नागपूरकर भोसल्यांची ही महसूल वसुलीची पद्धती पहिल्या रघुजीपासून इ.स. १८१८ पर्यंत ज्याप्रमाणे महाराष्ट्रात व भारतातही इ. स. १८१८ मध्ये पेशवाई संपली. पेशव्यांचे भव्य साम्राज्य इंग्रजांच्या हातात गेली. तेव्हापासून प्रशासकीय कार्ययंत्रणेच्या स्थित्यंतराला सुरुवात झाली. इ. स. १८१८ मध्ये नागपूरकर भोसल्यांच्या राजवटीच्या वर रेसिडेंट जेन्किस याने काम केले (गद्रे प्र., २००१ :२५६).

नागपूरकर भोसल्यांच्या प्रशासकीय कार्ययंत्रणेतील स्थित्यंतर रेसिडेंट जेन्किस या नवीन युक्त अधिकाऱ्याने भोसला राजवटीत महसूल विभागामध्ये बदल घडवून आणले. या कंपनी सरकारच्या अमदानीत त्यांनी मागील धान्य किंवा वस्तू स्वरूपात येणारा महसूल बंद करून नगदी स्वरूपात चालू केला. लोकांकडे जास्त नगद नसल्याने सुरुवातीच्या काळात लोकांना त्रास होऊ लागला. परंतु हळूहळू गोंधळ दूर होऊन वसुलीची शिस्त लागली. दर सात वर्षांनी महसूल खात्यातील आर्थिक बाबींचा आढावा घेतला जाई. त्यामुळे मागील सात वर्षांपूर्वी महसूल किती जमा होत होता व आता किती जमा होत आहे, याचा अंदाज येऊ लागला.

रेसिडेंट जेन्किन्स यांनी लाचखाऊ वसुली अधिकाऱ्यांवर शस्त्राचा धाक दाखवून महसूल वसूल केला. त्याने पडीक जमिनी लागवडीखाली आणल्या व त्यामुळे अनेक प्रकारच्या शेतीच्या उत्पन्नामध्ये वाढ होऊन राज्याच्या अंतर्गत शेतकऱ्यांनी व्यापार सुरू केला. त्यामुळे आयात कमी झाली व निर्यात वाढली. अशा पद्धतीने इ. स. १८७५ पर्यंत राज्याच्या खजिन्यात हळूहळू फरक

पडत गेला. जुन्या पद्धती पूर्णपणे बदलून गेल्या होत्या. भोसले वंशातील रघुजी (पहिला) याने जी प्रशासकीय कार्यपद्धती चालू केली. त्यामध्ये हळूहळू स्थित्यंतरे होत गेली (कोलारकर श. गो., पुरंदरे गो. मा., २००७ : ३११) . परंतु याच काळात भारतातील अनेक संस्थांनावर (इ. स. १८७३ च्या नंतर) इंग्रजांनी हळूहळू जम बसविण्यास सुरुवात केली होती.

७.२.५ टांकसाळ

नागपूरमधील टांकसाळ शहराच्या मध्यभागी होती. भोसल्यांच्या राजवटीत या टांकसाळीमध्ये नाणी पाडण्याबाबत शिस्त नव्हती. इ.स. १७४८ ते इ. स. १८७४ पर्यंत नागपूर टांकसाळीत अहमदशाहच्या नावाने रुपये पाडले जात होते (दीक्षित नि. सी., २०१४ : ८६२) . शंभर वर्षांत नाण्यांचे वजन कधीही एकसारखे राहिले नाही. रेसिडेन्ट जेन्किन्सने टांकसाळीचे काम विकसित व्हावे यासाठी प्रयत्न केले होते. परंतु त्यात त्याला यश आले नाही. एकंदरीतच चलनी नाण्यासंदर्भात अतिशय असमाधानकारक अवस्था होती.

नागपूरकर भोसल्यांची नाणी कमी प्रतीची होती.त्यात चांदी कमी असे. नागपूरकर भोसल्यांचे राज्य ओरिसात होते. तेथे देवाणघेवाण करण्याकरिता कवड्यांचा उपयोग होत असे.याचे उदाहरण म्हणजे ओरिसाचा सुभेदार शिवभट साठे याने ओरिसाचा कर म्हणून २७,८२,४४६ कवड्या गोळा केल्या व तो कर म्हणून भरला. अर्ध्या शेराच्या मापाएवढ्या कवड्या भरल्यावर त्याची किंमत रुपयाचा चौथा भाग होत असे. अशा स्वरूपात जर कर भरला, तर त्या कवड्यांचे करायचे काय? अशा स्वरूपाची अवस्था होती.

७.२.६ गुप्तचर व्यवस्था

राजकीय कारस्थाने शत्रुसैन्याच्या हालचाली, शत्रूंनी लपविलेली संपत्ती, पाणीपुरवठ्याची जागा, नद्यांचे उतार कुठल्या दिशेला आहेत, इ. सर्व महत्त्वाची माहिती गुप्तचर यंत्रणेला बघावी लागत असे. सर्व गुप्तचर साध्या प्रवाशी माणसांप्रमाणे पोषाख करीत असत. कधी साधूसंन्यासी यांचा पोषाख करून राज्यभर फिरून माहिती घेत असत. ही यंत्रणा अत्यंत प्रभावी अशी होती (गद्रे प्र., २००१ : २२१). नागपूरकर भोसल्यांच्या अमलाखाली असलेल्या टांकसाळी पण नागपूर प्रांतात नसलेल्या अशा टांकसाळी कटक, जबलपूर, बैतूल, सुहागपूर इ. ठिकाणी होत्या.

७.३ नागपूरकर भोसले प्रशासनातील प्रमुख पदे

७.३.१ दिवाण :- राजाच्या खालील दुसरे महत्त्वाचे पद म्हणजे दिवाण हे होते. संपूर्ण राज्याच्या महसूल खात्यावर देखरेख ठेवणे व त्याची अंमलबजावणी करणे व इतर

संपूर्ण महसूल व्यतिरिक्त खात्यांवर प्रशासकीय देखरेख करणे. नागपूरकर भोसले संस्थानाच्या कारकिर्दीत बाबूराव कान्हेर, दिवाकर पंडीत, भवानी नागनाथ मुन्शी इ. महत्त्वाची मंडळी होऊन गेली.

७.३.२ **फडणवीस** :- राज्याच्या सारा जमाखर्च फडणवीस पाहत असे. त्यामुळे त्यांच्या पदाला फार महत्त्व होते. सनदा देणे आणि देणग्या देणे इ. आर्थिक गोष्टी त्यांच्या सहीने व साक्षीने होत असत. फडणवीस म्हणून नागपूरच्या संस्थानात जिवाजी महादेव, त्र्यंबक मोरेश्वर हे प्रसिद्ध लोक या पदावर काम करीत होते.

७.३.३ **चिटणीस** :- संपूर्ण राज्याचा पत्रव्यवहार चिटणीस पाहत असून राज्याच्या मार्गदर्शनानुसार 'राजाज्ञा' पाठविणे व त्यांची उत्तरे पाठविणे, आलेली पत्रोत्तरे राजाला अवगत करणे हे त्याचे प्रमुख काम होते. सर्व कागदपत्रांवर त्यांच्या हस्ताक्षरात तारखा टाकण्याची जबाबदारी होती. नागपूरच्या प्रशासकीय कार्ययंत्रणेत रखमाजी गणेश प्रभू, चिमाजी रुक्मानंद हे महत्त्वाचे चिटणीस होऊन गेले.

७.३.४ **जामदारः**-जामदाराच्या ताब्यात राज्याचा खजिना आणि राजघराण्यातील लोकांची भारी वस्त्रे आणि सर्व हिऱ्यामोत्यांचे अलंकार व इतर मौल्यवान जडजवाहीर असत. हे खाते बरेच मोठे होते. जामदारांच्या अंतर्गतच शिलेखाना, शिक्केखाना नावाचा एक उपविभाग होता. त्याच्या प्रमुखाला शिकेनविस म्हणत असत. सर्वात महत्त्वाचे म्हणजे राजाचा शिक्का त्याच्या ताब्यात होता, सर्व राजपत्रांवर शिक्का मारण्याचे त्याचे काम होते.

७.३.७ **बक्षी** :- बक्षी याच्याकडे लढाईचे मुख्य कार्य होते. एखाद्या मोहिमेची किंवा लढाईची सर्व तयारी करण्याचे अत्यंत महत्त्वाचे काम बक्षीकडे असे. सैन्याच्या भरतीपासून ते प्रत्येक सैनिकाचा पगार करण्यापर्यंत त्यांचे व्यवस्थापन असे. सैन्याचे अनेक विभाग होते. त्यामध्ये सैन्याचा पूर्ण जमाखर्च किंवा मोहिमेच्या खर्चाचे अंदाजपत्रक तयार होत असे, हा एक भाग होता. दुसऱ्या भागात घोडदळ प्रमुख आणि तोफखाना प्रमुख असे महत्त्वाचे भाग होते. त्याचाही हिशेब ठेवण्याकरिता वेगवेगळे कारकून नेमलेले असत. मागे सांगितल्याप्रमाणे फडणवीसांचे यावर लक्ष असेच. परंतु या संपूर्ण लष्कराचा जमाखर्च, जुन्यानव्या मोहिमांचा जमाखर्च यांची व्यवस्थित नोंद ठेवण्याचे कार्य बक्षी यांच्याकडेच होते (कोलारकर श. गो., पुरंदरे गो. मा., २००५ : २१६) .

७.३.६ **जमेनविस :-** सैनिकांमधील सर्व सरदार व त्यांचे हिशोब, त्यांचा पगार इ. सर्व सैनिक अधिकाऱ्यांची कामे जमेनविस करीत असत. त्याच्या हाताखाली दोन कारकून व एक मुजूमदार (रू. २००० हून जास्त त्याला वेतन असे.) असे (गद्रे प्र., २००१ : २२०) .

७.३.७ **खाजगी :-** या खात्याकडे फक्त राजघराण्यातील लोकांचा खर्च उदा. राजे, राण्या, राजपुत्र, दासीपुत्र, राजवाड्यात असलेले शागीर्द यांच्या खर्चाचे व्यवस्थापन व त्यांच्या सोयी पाहण्याची जबाबदारी त्यांच्याकडे होती. राजवाड्यात शागीर्द यांच्या नेमणुका करणे, त्यांच्या सोयीसुविधा बघणे व त्यांच्यासाठी खर्च करणे अशा स्वरूपाची जबाबदारी खाजगीवाल्यांकडे होती. खाजगीमध्ये कोठी म्हणून एक भाग होता. या कोठीमध्ये सर्व प्रकारचे धान्य व राजघराण्यात होणाऱ्या धार्मिक व पारिवारिक या कार्यक्रमाकरिता येणारा खर्च या कोठीतून केला जात असे. नागपूरकर भोसले यांच्या प्रशासकीय कार्ययंत्रणेत शंकरजी रखमाजी यांचे नाव घेतले जात असे.


७.३.८ **जामूद आणि हरकरे :-** हा एक स्वतंत्र विभाग होता. नागपूर संस्थानच्या या विभागाच्या प्रमुखाला नाईक असे म्हणत असत. नाईकाच्या हाताखाली त्यांची काही खास माणसे असत. ते मागे उल्लेख केल्याप्रमाणे कमाविसदारांवर नजर ठेवत असत. हे लोक अत्यंत निष्ठावान व प्रामाणिक असत. नाईक व नाईकांचे सहकारी राज्याच्या अनेक भागांमध्ये वेशांतर करून किंवा सामान्य माणसांच्या पोषाखात लोकांच्यात मिसळत असत. सामान्य लोक राजाबद्दल व राज्ययंत्रणेबद्दल काय म्हणतात याची बित्तंबातमी त्याचप्रमाणे राज्यात होणाऱ्या घडामोडी, महत्त्वाचे उत्सव, महत्त्वाचे प्रसंग या सर्व बातम्या नाईक व त्याचे सहकारी राजालाच कळवत असत. एखादी लढाई राजाला लढायची असेल, तर त्याठिकाणी अगोदरच नाईकांची माणसे साध्या पोषाखात पोहचत असत. शत्रूकडील सर्व हालचाली व अगदी छोट्यामोठ्या गोष्टींची टिप्पणी काढूनसुद्धा नाईकांना व राजाला कळवत असत. प्रत्यक्ष लढाई चालू असताना त्याची ही कामे चालूच असत. बऱ्याच वेळेला लढाई झाल्यावरसुद्धा नाईकांचे हरकरे बातम्या आणून देत असत. एकंदरीच नाईक हा राजाला योग्य निर्णय घेण्याकरिता आधारच होता.

७.३.९ **वऱ्हाडपांडे :-** नागपूरकर प्रशासकीय कार्ययंत्रणेत या पदाचा उगम गोंड राज्यातून झाला. संपूर्ण राज्याचा शेतसारा वसूल करणारे व त्यावर नियंत्रण करणारे जे

अधिकारी असत, त्यांना वऱ्हाडपांडे म्हणत असत. त्यामुळे त्यांचा दर्जा राज्यशासनात बराच वरचा होता. त्यांच्या हाताखाली खेड्यातील शेतसारा वसूल करण्यासाठी अधिकारी होते.त्यांना हुद्दार म्हणत असत. असे हुद्दार त्यांच्याकडे कामाला होते (कोलारकर श. गो., पुरंदरे गो. मा., २००७ : २१६) .

नागपूर राज्यातील प्रशासकीय यंत्रणेतील राजपुरुषांची वंशावळ खालीलप्रमाणे :-

७.४ नागपूरकर भोसले यांची वंशावळ(मक्कदुम दा., २०१४: २११)



या प्रबंधामध्ये नागपूरकर भोसल्यांच्या राजवाड्याचे स्थापत्यविषयक नकाशे व राजवाड्याच्या संदर्भात त्यांचे नकाशे याठिकाणी अभ्यासाकरिता जोडलेले आहेत, मागे उल्लेख केल्याप्रमाणे सातारा, भोर, फलटण, औंध व नागपूर या सर्वांचे एकत्रित राजवाड्याच्या संदर्भात असलेले स्थापत्य व त्यामध्ये झालेले कालक्रमानुसार बदल म्हणजेच स्थित्यंतरे होय. याचे एकत्रित वर्णन व निरिक्षणे याचा फलटण संस्थानच्या प्रकरणामध्ये समावेश केलेला आहे.

७.७ नागपूर संस्थानामधील स्थापत्य व स्थापत्यामधील झालेली स्थित्यंतर याचे चित्र क्रमांकासहित संशोधनात्मक निरीक्षण

मराठा कालीन संस्थानांमध्ये राजवाड्यासदृश्य वास्तु निर्माण झाल्या. साधारणतः आपल्या स्वतःच्या राज्याची व्याप्ती त्यामध्ये चालणारे प्रशासन व त्यातून गोळा होणार महसूल व राज परिवार याचा एकंदर ताळमेळ साधून त्या संस्थानचा राजा स्वतःचे राजवाडे, मंदीरे व इतर स्थापत्यविषयक वास्तु व लोकहितार्थ कराव्या लागणाऱ्या स्थापत्य वास्तु याचा समावेश त्या राज्याच्या अंतर्गत असे. उदा. नागपूर संस्थान. या संस्थानचा राजा पहिला रघुजी भोसले व त्याचे वंशज या सर्वांनाच स्थापत्यामधील जाण होती, असे दिसते. पहा चित्र क्रमांक : ७.२ व ७.३ (७.२ मध्ये तळमजल्यावरील पहिल्या मजल्याचे व्यवस्थित नियोजन केलेले स्थापत्य दिसत आहे.)

राजा रघुनाथ भोसले तिसरा यांनी वरील राजवाडा बांधला. एकंदर हा राजवाडा, प्रांगण, तटबंदी, कारंजे व गोलाकार स्तंभ असलेला मोठ्या सभागृहासहित एकंदर पाच एकरामध्ये इ. स. १८३० ते १८४० मध्ये बांधला आहे. याच काळात ब्रिटीशांची सत्ता नागपूरवर होती. त्यामुळे नागपूरकर भोसल्यांनी मराठा स्थापत्यशैली ठेवली, परंतु काही रचना मात्र ब्रिटीशांच्या प्रशासकीय कामाकरता अनुकूल अशा केल्या. तळमजल्याचा नकाशा चित्र क्रमांक ७.२ यामध्ये प्रथमतः आपल्याला ढेवडी ओलांडून गेल्यावर गोलाकार लाकडाचे स्तंभ असलेला मोठा चौक दिसेल. एकंदर या चौकाच्या बाजूने वीस गोलाकार लाकडाचे स्तंभ आहेत. राजवाड्याच्या आत प्रवेश केल्यावर प्रथमदर्शनी हा चौक दिसतो. म्हणून त्याला गोल राजवाडा असे नाव पडले होते. तळमजल्यावरील नकाशामध्ये दोन प्रकारचे चौक आपल्याला दिसत आहेत. त्यातील एक दगडी चौक व दुसरा लाकडी चौक अशी नावे त्याला ठेवली आहेत. दगडी चौकामध्ये नेहमी दिसणारे लाकडाचे स्तंभ कमी दिसत आहेत व लाकडी चौकामध्ये जवळ जवळ अठ्ठेचाळीस स्तंभ लाकडाचे आहेत. म्हणून त्याला लाकडी चौक म्हणत असत. तळमजल्यावरील बरीच मोठी जागा देवघराकरता दिलेली दिसत आहे. त्यामध्ये एक देवघर ज्याला कृष्ण देवघर असे म्हणतात. त्याला स्वतंत्र सभामंडप आहे. त्याचप्रमाणे दुसरे राम देवघर त्यालाही

स्वतंत्र सभामंडप आहे. देवघराच्या सभामंडपाला लागूनच देवघराची बाग आहे. प्रकरण क्र. ६.७.७ मध्ये याचा सविस्तर उल्लेख आहे. घरात होणाऱ्या विविध धार्मिक विधींकरता स्वतंत्र स्वयंपाकघर व त्याला लागणारे धान्याचे कोठार व त्याला लागणाऱ्या इंधनाची खोली अशा सर्व स्वतंत्र व्यवस्था आहेत. ढगडी चौकामधील सर्व स्थापत्याचे सर्व काम ढगडामध्येच केलेले आहे व लाकडी चौकामधील स्थापत्याची सर्व कामे लाकडाचीच आहेत. ढगडी चौक व लाकडी चौक यांना लागूनच असलेल्या मोठ्या सदरेमध्ये प्रशासकीय कामाकरीता खोल्या बनविल्या आहेत. खरेतर या जागेवर पूर्वी सदर म्हणजे राजानी राज्यातील लोकांसमवेत व अधिकाऱ्यांसमवेत उपस्थित राहून त्यांच्या प्रश्नांची सोडवणूक करण्याकरीता सदरेवर बैठक भरविण्यात येत असे. परंतु ब्रिटीशांच्या कार्यपद्धतीप्रमाणे विविध प्रकारची ढालने बनविण्यात आली. यालाच आपण स्थापत्यविषयक स्थित्यंतर म्हणतो. तळमजल्यावरील व पहिल्या मजल्यावरील सदरेमध्ये (व्हरांडा आणि त्या शेजारील बाजू) मराठा स्थापत्य शैलीमध्ये असलेले तळखडा व लाकडाचा स्तंभ व लाकडाच्या कमानी हे परंपरागत स्थापन केलेले दिसत आहे. चित्र क्रमांक ७.३ मध्ये पहिल्या मजल्याचा नकाशा दिसत असून त्यामध्ये सदर व सोपा यांच्यावरती बरोबर गच्ची केलेली दिसते. तळमजल्याच्या देवघराच्या वरती बरोबर एक खोली व देवघराच्या सामानाची खोली म्हणून चांगला वापर केलेला दिसत आहे. एकंदरीतच नागपूरकर भोसले यांनी राजघरातील माणसांचा व त्यांच्या सवयींचा विचार करून आराखडा बनविलेला दिसत आहे. कारण तळमजला व पहिला मजल्यामधील सर्व खाजगी ढालनांना स्वच्छतागृह जोडलेली आहेत. राजघराण्यातील पाहुणे व बाहेरून येणारे पाहुणे यांचा पण विचार या नकाशामध्ये केलेला दिसत आहे. तळमजल्यावरील व पहिल्या मजल्यावरील न्हाणीगृहाचे व स्वच्छतागृहाचे पाणी तळमजल्यावर केलेल्या पश्चिम दिशेला असलेल्या सोकपीट (वीटांचे तुकडे घालून खड्डा करून सांडपाणी सोडण्याची केलेली खोलगट जागा) मध्ये सोडलेले आहे. (चित्र क्र. ७.२ व ७.३ हे सर्व नकाशे के. एम. गिऱ्हे यांनी रेखाटले आहेत.)

नागपूरकर भोसल्यांमध्ये स्थापत्यविषयक जी जाण होती, ती जाण आपल्याला त्यांच्या राजवाड्यातील केलेल्या सोयांवरून लक्षात येते. त्याचे उत्कृष्ट उदाहरण म्हणजे मराठा स्थापत्यातील सर्व राहत्या वाड्याच्या जागा व त्याचा स्थापत्यावर होणार परिणाम हे जर का आपल्याला पहावयाचे असेल तर पहा चित्र क्रमांक : ७.४ मध्ये तळमजल्याचा नकाशा-हा राजवाडा इ. स. १८६८ मध्ये राजा जानोजी भोसले यांनी बांधला. या राजवाड्यामध्ये विविध प्रकारची ढालने किंवा खोल्या दिसून येतील. याचे कारण राजाकडे राहणाऱ्या राजपरिवाराबरोबर त्यांच्या परिवारातील नातेवाईक यांचा पण राबता

मोठ्या प्रमाणात असावा किंवा राजांच्या प्रशासकीय यंत्रणेत काम करणाऱ्या व्यक्तीचीसुद्धा राहण्याची सोय केलेली दिसत आहे. मराठा स्थापत्य शैलीमध्ये असलेल्या सदर व सोपा या सर्व जागांचा वापर विविध प्रकारच्या खोल्या व दालनांमध्ये केलेला दिसत आहे. यालाच आपण स्थापत्यविषयक स्थित्यंतर म्हणतो. या नकाशामध्ये आपल्याला सुरवातीला प्रवेश करताना दोन्ही बाजूला नगारखाना दिसेल. त्या ठिकाणी मंगलवाद्ये वाजविण्याकरीता व्यवस्था केलेली असते. दरवाजातून आत गेल्यावर नगारखान्याच्याच बाजूला कार्यालय म्हणजेच संस्थानिकांचे दफ्तर, ज्या ठिकाणाहून वाड्याची सर्व व्यवस्था बघितली जाते व प्रशासकीय कामाचा मुख्य अधिकारी तेथे बसलेला असतो, ती जागा आपणांस दिसेल. सर्वसाधारणपणे राजवाड्याच्या तळमजल्याच्या पहिल्या चौकाच्या बाजूला दरबार सभागृह (हॉल) असते. परंतु या ठिकाणी आपल्याला दिसत आहे. या दरबार सभागृह जागेचा वापर प्रशासकीय कामे, आलेल्या पाहुण्यांची राहण्याची सोय, वाड्यात काम करणाऱ्या अधिकाऱ्यांच्या, कामगारांच्या राहण्यासाठी केलेल्या खोल्या दिसत आहेत. कोठीवानाची खोली, कामगारांच्या खोल्या, दिवसरात्र पहारा देणाऱ्या सैनिकांकरता खोल्या असा वापर केलेला दिसत आहे. तसेच चौकामध्ये जाण्यासाठी ज्या ठिकाणी पायऱ्या दिसत आहेत, त्या सोप्याच्या बाजूला माजघर दिसत आहे. माजघराचा फक्त राजपरिवारातील माता-भगिनींसाठी जास्त होत असे. त्यामुळे त्याला लागूनच धान्याचे कोठार आहे. माजघरातून आपण शेवटच्या परसाकडे जाण्यास निघतो, तेथेच आपल्याला स्वयंपाकघर/पाकशाळा या दोन्हीमध्ये एक रिकामी जागा/व्हरांडा आहे. याठिकाणी जेवणाच्या पंक्ती बसत असाव्यात. राजवाड्याला लागूनच राममंदिर आहे. राममंदिराच्या पुढे असलेला सभामंडपाला अठ्ठावीस स्तंभ आहेत व हे सर्व स्तंभ लाकडाचे असून मराठा स्थापत्य शैलीचा अविष्कार दिसत आहे. त्याला लाकडी कमानी पण दिसत आहे. मुख्य म्हणजे श्रीराम मंदिर हे प्रशस्त असून त्यामध्ये होणाऱ्या सर्व धार्मिक कार्यक्रमांकरीता स्वतंत्र स्वयंपाघर आहे व ते हवेशीर आहे. हे स्वयंपाघर राममंदिराच्या बरोबर पाठीमागे आहे. स्वयंपाघर व श्रीराममंदिर यामध्ये रिकामी जागा असून त्या जागेचा वापर धार्मिक विधींची तयारी करण्याकरीता केलेला आहे. आपल्याला वरील छायाचित्रात जो हत्तीखाना दिसत आहे, पूर्वी त्या ठिकाणी हत्ती बांधले जात असत असे भव्यदिव्य मोकळे मैदान होते. आता त्या ठिकाणी मुलींचे वसतीगृह आहे. हत्तीखान्याला लागून मोठे प्रांगण दिसत आहे. प्रांगणामध्ये बाग केलेली आहे. त्यामध्येच दोन विहिरी दिसत आहेत. संपूर्ण वाड्याला प्रांगणातील विहिरीतून पाणी मिळत असे. या प्रांगणामध्ये घोड्यांची एक पागा होती. त्याला हुजूरपागा म्हणत असत. सध्या त्या ठिकाणी अपंग मुलांचे वसतीगृह आहे. एकंदरीतच या प्रबंधामध्ये अभ्यासासाठी निवडलेल्या राजवाड्यांमध्ये ज्या

सामायिक गोष्टी दिसतात, त्या सर्वांचा उल्लेख, माहिती व निरिक्षण प्रकरण क्र. ६.५ मध्ये सविस्तर संशोधनात्मक दृष्टीने केलेला आहे. उदा. तटबंदी, प्रांगण, सोपा, बाळंतिणीची खोली, देवघर, देवघराकरिता केलेली खास बाग, धान्याची कोठारे, स्वयंपाघर इ. जवळजवळ सर्व गोष्टींचा उल्लेख संशोधनात्मकदृष्ट्या केलेला आहे.

नागपूर संस्थानांमध्ये प्रत्येक गादीवर आलेला भोसला हा स्वतःच्या कल्पकतेने व स्वतःचे स्वतंत्र अस्तित्व दाखविण्यासाठी मोठमोठे राजवाडे उभे करीत असे. उदा. पहा चित्र क्रमांक : ७.५ मध्ये धाकटे भोसले यांचा राजवाड्याच्या पहिल्या मजल्याचा नकाशा-या नकाशामध्ये आपल्याला विविध प्रकारची दालने दिसत आहेत. तळमजल्यावरील विविध दालनांचा वापर ज्याप्रमाणे प्रशासकीय व्यवस्थेत काम करणारी मंडळी, राजघराण्याशी संबंधित मंडळी इ. नेहमीच्या वापर असणाऱ्या माणसांसाठी तळमजल्याचा वापर होत असावा असे दिसते. पहिल्या मजल्यावर मात्र बाहेरून आलेले पाहूणे, निवासी प्रशासकीय अधिकारी, घरातील धार्मिक विधी व सणवारांसाठी आलेली पाहुणेमंडळी, राजघराण्याबरोबर सामाजिक काम करताना आलेली प्रतिष्ठित मंडळी व त्यांचे सहकारी इ. सर्वांच्या राहण्याची, जेवण्याची सोय, त्याचप्रमाणे त्यांना आवश्यक असलेली स्वच्छतागृहे व प्रसाधनगृहे यांची रचना व हवेशीर गच्च्या, अधिकाऱ्यांची बैठक घेण्याकरीता छोटा दरबार हॉल इ. सर्व आवश्यक असलेल्या दालनांची रचना पहिल्या मजल्यावर दिसत आहे. या नकाशाच्या शेजारी आपणांस एक चित्र दिसत आहे. त्या चित्रामध्ये संपूर्ण राजवा÷याची स्थापत्यविषयक रचना प्रातिनिधीक स्वरूपात दिसत आहे. ज्याला आपण संपूर्ण नकाशा असे म्हणतो. उदा. राजवाड्याची जागा व त्याची व्याप्ती, तटबंदी, प्रांगण, विहिरी, हुजूरपागा, हत्तीखाना, बगिचा, श्रीराममंदिराची जागा, आखाडा, सार्वजनिक स्वयंपाघर, कामगारांची राहण्याची जागा व इतर छोटी मंदिरे या सर्वांची स्थाने नेमकी कोठे आहेत व त्यांची व्याप्ती किती आहे व कोठे आहे हे दर्शविणारा संपूर्ण जागेचा आराखडा आपल्याला दिसत आहे. यावरून राजवाड्याची व्याप्ती एका टप्प्यांत आपल्याला नजरेसमोर दिसत आहे.

भोसले घराण्यामध्ये काही कर्तबगार स्त्रिया होऊन गेल्या. त्यामध्ये नागपूरच्या बकाबाई भोसले यांना समाजामध्ये विशेष आदर होता. त्या धार्मिक होत्या. त्यांनी लोकउपयोगी कामे केली. त्यांनी पण स्वतःसाठी एक वास्तु निर्माण केली. पहा चित्र क्रमांक : ७.६ मध्ये कै. राणी बकाबाई भोसले यांचा राजवाडा- या चित्रामध्ये आपल्याला दोन चौकी मराठा स्थापत्यातील वाडा कसा असावा याची स्पष्ट कल्पना येते. यामध्ये दोन दगडी चौक त्याच्या बाजूला असलेला सोपा, विविध प्रकारची दालने व एखाद्या महत्त्वाच्या बैठकीकरता सोय केलेला दरबार हॉल, सर्व दालनांच्या बाजूने असलेल्या मराठा

स्थापत्याच्या शैलीत असलेल्या, लाकडी कमान केलेल्या, कोरीव काम केलेल्या खिडक्या, त्याचप्रमाणे त्याच शैलीत ढरवाजे आपल्याला ढिसतील. एकंढर ज्यांना ढोन चौकी ढोन मजली वाडा बांधायचा आहे, त्यांच्या अभ्यासाकरता व नियोजनाकरता हा एक प्रतिनिधी स्वरूपाचा वाढा आहे. नागपूरकर भोसल्यांच्या वाड्याच्या स्थापत्याचा उत्तम नमुना आहे.

लोकांच्या मनामध्ये स्वधर्म भाव जागविण्याकरीता नागपूरकर भोसले व त्यांचा राजपरिवार कधीही मागे राहिला नाही. त्यांनी अनेक धार्मिक उत्सवाचे संयोजन केले व लोकांच्या धार्मिक वृत्तीमध्ये भर घातली. त्याचप्रमाणे स्वतःच्या उपासनेकरीताही एक आढर्श ढेवघरासारख्या वास्तु निर्माण केल्या. पहा चित्र क्रमांक : ७.७ कै. राणी बकाबाई भोसलेवाडा-नागपूरकर भोसले यांच्या संस्थानामध्ये ढेवघराला विशेष महत्त्व ढिसत आहे. संपूर्णतः मराठा स्थापत्य शैलीमध्ये असलेले हे ढेवघर एखाद्या मोठ्या इमारतीसारखे शोभावे असे आहे. साधारतः ११ मीटर X ११ मीटर एवढे प्रशस्त ढेवघर आहे. म्हणून त्याला राणी बकाबाई भोसले ढेवघरवाडा असे म्हणत असत. श्रीगणेश, श्रीराम यांच्यासहित अनेक ढेवतांच्या धातूंच्या मूर्ती नित्य पूजेत होत्या. त्यासाठी स्वतंत्रव्यवस्था होती. ढेवघराच्या पुढील बाजूला मोठा सभामंडप आहे. या सभामंडपामध्ये ढगडाच्या तळखड्यासहित लाकडाचे कोरीव स्तंभ आहेत. लाकडाच्या कमानीपण आहेत. तसेच या ढेवघराच्या इमारतीची उंचीसुद्धा ७ मीटर आहेत. त्यामुळे एक छोटासा पोटमाळा पण ढेवाचे साहित्य वगैरे ठेवण्यासाठी केलेला आहे. तसे हे ढेवघर म्हणजे छोट्या स्वरूपाचे एक मंढिरचआहे. वरील छत कौलांनी पूर्णपणे झाकलेले असून एक स्वतंत्र वास्तु म्हणून संशोधकांनी याचा अभ्यास करावा अशा पद्धतीची ही वास्तू आहे. या संपूर्ण ढेवघराच्या वाड्याला लाकडाचे कोरीव काम केलेले छत आहे.

ज्याप्रमाणे संस्थानांचे राजे वाड्याची निर्मिती करीत असतात. त्याचप्रमाणे काही मराठा सरढार सुद्धा नागपूर संस्थानामध्ये मागे नव्हते. त्यांनी एखाद्या राजवाड्याला शोभेल अशा प्रकारे वास्तु निर्माण केली. या राजवाड्याचा अभ्यास करताना असे ढिसून आले की, वाड्याचे स्थापत्य करणारा राजा असो वा सरढार असो आपली वास्तु शेकडो वर्षे राहिल या पद्धतीने बांधकाम केलेले ढिसत आहे. पहा चित्र क्रमांक : ७.८ सरढार अहिरराव वाडा - या नकाशामध्ये मागे उल्लेख केल्याप्रमाणे तळमजल्यावर नेहमीच्या पद्धतीप्रमाणे मराठा स्थापत्यामध्ये असलेली सर्व प्रकारची ढालने उढा. सोपा, सढर, माजघर, ढेवघर, स्वयंपाघर, कोठार, ढेवडी इ. नेहमीप्रमाणे रचना आहेत. परंतु यापेक्षा थोडी वेगळी रचना या अहिरराव वाडयामध्ये ढिसत आहे. ती म्हणजे भूयार आणि खजिना याकरिता केलेली वेगळ्या स्वरूपाची वास्तूरचना ज्याला आपण तळघर म्हणू. अशा स्वरूपाची रचना प्रामुख्याने मुद्दाम केलेली

दिसत आहे. वरील नकाशामध्ये आपण बघितल्यास आपल्याला असे आढळेल की, खजिना व भुयार ज्याजागी आहे, त्याला जमिनीच्या खालपासून ढगडाचे भक्कम बांधकाम केलेले दिसत आहे. तळघरात उतरण्याकरिता भक्कम ढगडांचा जिना दिसत आहे. खजिना व भुयार यामध्ये राजाची मौल्यवान संपत्ती असते, त्यामुळे त्याला भक्कम तटबंदीसारखे बांधकाम केलेले दिसत आहे. बाहेरून कोठूनही आत येण्यास ढरवाजा नाही. ज्या ठिकाणाहून ढरवाजा केलेला आहे, त्याठिकाणी भक्कम ढालन आहे. त्या ढालनाच्या आतून एक छोटा ढरवाजा आत जाण्यासाठी आहे. त्यातून आत गेल्यावर भुयारांच्या पायऱ्यांपाशी आपण जातो. भुयारातून आत उतरल्यावर लगेचच खजिना मिळेल, असे नाही. त्याकरिता भुयारातून थोडे अंतरावर चालत गेल्यावर खजिन्याच्या ढोन खोल्या केल्या आहेत. त्या ढोन खोल्यांना मिळून एकच प्रवेशआहे, तर तो कसा ते आपण नकाशा पाहिल्यावर लक्षात येते. कुठल्याही वाड्याच्या मागच्या भागाला परस असे म्हणतात. आपण जेव्हा परसाकडे जाऊन येतो, असे म्हणतो याचा अर्थ वाड्याच्या मागच्या बाजूस परसामध्ये बांधलेल्या स्वच्छतागृहाकडे जाणे असा होता. तो वरील नकाशामध्ये सेक्शन अअ याठिकाणी बघावयास मिळेल. त्याचबरोबर संपूर्ण जागेचा नकाशा म्हणजेच वाडा, कचेरी, मंढिर, प्रवेशढ्ढार, प्रांगण व तटबंढीसह सर्व सिमा आपणांस स्पष्टपणे ढिसत आहे. वरील नकाशा आर्किटेक्चर के. एम. गिऱ्हे यांनी काढला आहे.

मागे उल्लेख केल्याप्रमाणे नागपूरकर संस्थान हे स्वतःची राजधानी नागपूर शहर व त्यामध्ये राहणारा जनसमुढाय यांचे रक्षण व्हावे याकरीता गावाच्या वेशीवर किंवा ज्याठिकाणी राज्यांवर चाल करून येणारा शत्रू ज्या ठिकाणाहून आत येण्याची शक्यता आहे. त्याठिकाणी नागपूरकर संस्थानिक भक्कम ढरवाजा व तटबंढी सदृश्य वास्तु निर्माण करीत असत. त्याचे उत्कृष्ठ उढाहरण म्हणजे सुक्करवार ढरवाजा. पहा चित्र क्रमांक : ७.१ सुक्करवार ढरवाजा (शुक्रवार) –या नकाशामध्ये गावाच्या वेशीवर जसे प्रवेशढ्ढार असते, तसेच राजा रघुजी भोसले पहिला यांने त्याच्या काळात बांधलेली वास्तू आहे. चौढा मीटर जाडी पंचवीस मीटर लांब व बारा मीटर उंची असलेला हा ढरवाजा पूर्णपणे ढगडात आहे. त्याची पायाभरणी तेवढीच केलेली आहे. संपूर्णपणे चुना आणि वाळू यांच्या मिश्रणाने ढगडाचे बांधकाम केलेले आहे. हा ढरवाजा त्याच्या भोवती बांधलेली वास्तू ढोन मजली असून ढरवाजाच्या भोवती ढोन पाकळ्यांनी मिळून बनलेली कमान (मोगल स्थापत्य शैलीसारखी) ढिसते. या कमानी बाजूनी ढगडाचे नागमोड वळणाचे कोरीव काम केलेले स्थापत्य ढिसत आहे. मुख्य ढरवाजाच्या बाजूला असलेल्या भिंती या भक्कम ढगडामध्ये बांधलेल्या आहेत. त्याच्याच बाजूला बुरूजाप्रमाणे ढिसणारी ढोन मोठी ढालने बांधली आहेत. त्याला मुख्य ढरवाजाच्या आतून गेल्यावर लगेचच उजव्या व डाव्या बाजूला ढेवडी

असते, त्या ढेवडीतून वरती जाण्याकरिता जीना केलेला आहे. हा जीना एकंदर ढरवाजाच्या बांधकामाच्या पहिल्या मजल्यावर जातो. वरील ढोन्ही ढालने १.६५ X ७.० मीटर X ७.० मीटर या आकारमानाने असून त्याला ढोन हवा खेळती राहण्यासाठी उभे झरोके आहेत, तेसुद्धा २ मीटर X १ मीटर एवढ्या लांबी रूंढीचे असून त्या झरोक्यासारख्या ढिसणाऱ्या खिडकीतून आपण ढरवाजातून कोण आत येत आहे, हे स्पष्टपणे ढिसते व त्यावर नजर ठेवता येते. तसेच युद्धावरून आल्यानंतर राजा व सैनिकांवर पुष्पवृष्टीसुद्धा करता येते. एकंढरीतच हा ढरवाजा म्हणजे प्रवेशद्धाराचा उत्कृष्ट स्थापत्यशास्त्राचा उत्कृष्ट नमुना आहे. या ढरवाजाला काही लोक जुमा गेट म्हणत असत.

त्याचप्रमाणे नागपूर संस्थानमध्ये जर अजून एका तटवंढी सदृश्य प्रवेशद्धाराचा अभ्यास करावयाचा असेल तर सुक्करधारा ढरवाजा या प्रवेशद्धाराची व तटबंढीची नोंढ घ्यावीच लागेल. पहा अभ्यासाकरीता चित्र क्रमांक : ७.१० सक्करधारा ढरवाजा - राजा रघुजी भोसले चौथा यांनी या ढरवाजाची निर्मिती केली असून सक्करधारा स्थापत्य समूहाचे हे मुख्य प्रवेशद्धार आहे, त्या ढरवाजाला भोसले सैनिकांच्या छावणीचा ढरवाजा असेसुद्धा म्हणत असत. मागील सुक्करवार ढरवाजा याचे ज्या पद्धतीचे स्थापत्य होते, तसेच या ढरवाज्याचे स्थापत्य आहे. या स्थापत्यशास्त्रामध्ये मोगल व मराठा मिश्रशैली ढिसत आहे. या ढरवाजाचे स्थापत्य आहे. या स्थापत्यशास्त्राचे वैशिष्ट्य म्हणजे त्याच्या ढोन्ही बाजूला तटबंढीसहित ढोन अष्टकोनी बुरूज आहेत. या ढोन बुरूजांच्या आतमध्ये ढोन भल्यामोठ्या अष्टकोनी खोल्या असून त्याला ०.६० X ०.६० मीटर छोटी खिडकी वजा ढरवाजा आहे. या ढोन्ही बुरूजांच्या आत खोल्यांमध्ये ढोन जिवंत सिंह ठेवलेले असत. शत्रूला घाबरवण्यासाठी व शत्रूच्या अंगावर हिंस्त्र श्वापढे सोडण्यासाठी या बुरूजांचा वापर होत होता, असे ढिसते. मुख्य ढरवाजातून आत गेल्यावर नेहमीप्रमाणे ढोन्ही बाजूला ढेवड्या आहेत. ढेवड्यातून वरती जाण्याकरीता ढगडाचा जीना आहे. या जीन्यातून वरती गेल्यावर ढरवाजाच्या बरोबर वरच्या भागात एक चौकोनी मोठे ढालन आहे. या ढालनाच्या आतमध्ये मराठा स्थापत्यशास्त्राप्रमाणे नेहमीसारखे तळखडा व लाकडी स्तंभ आहेत. त्या स्तंभांना जोडणाऱ्या लाकडी कमानी आहेत. बरोबर मुख्य ढरवाजाच्या वरती ढरवाजा सदृश्य ढिसणाऱ्या खिडक्यांना १.०० X १.०० मीटर लोखंडी जाळी लावली आहे. त्यामुळे त्याला एका छोट्या मेघडंबरीसारखे स्वरूप आले आहे. या मेघडंबरीच्या वरती जाण्याकरीता ढगडी जीना केला आहे. त्या जीन्यावरून मेघडंबरीच्या वरती असणाऱ्या गच्ची सदृश्य भागामध्ये पोचतो. या गच्चीच्या बाजूला असलेल्या जीनाच्या भिंती गच्चीपेक्षाही ढोन मीटरनी उंच आहेत. त्यामुळे त्याला वेगळे प्राप्त झालेले स्वरूप नकाशामध्ये ढिसत आहे. प्रवेशद्धाराच्या या मुख्य ढरवाजाची ढारे शोभिवंत

सागवान लाकडाची असून सूर्यचंद्राच्या प्रतिमेचे कोरीव काम त्यावर केलेले आहे. या दरवाजाची उंची नऊ मीटर असून या दरवाज्यातून अंबारीसह हत्ती आत जात असे. एवढे उंच आहे. त्याच्याही वरती मराठा स्थापत्य शैलीप्रमाणे चुना व वाळू यांच्या मिश्रणाचा वापर करून केलेले अर्ध्या अर्ध्या पाकळ्यांचे कमानी स्वरूपात केलेला सुशोभित गिलावा आहे. या गिलावा व दरवाजा यांच्या मध्यभागी कमळावर स्थापित श्रीगणेश मूर्ती स्थापित आहेत. या मुख्य दरवाजाची उंची नऊ मीटर असल्यामुळे एकंदरच या दरवाजाची उंची तीन मजल्याएवढी झालेली आहे. मुख्य दरवाजाच्या असलेल्या दोन्ही जाड भिंतीच्या कडेला अलिकडच्या काळातील दिसणारे ब्रॅनाईटचे स्तंभ उभे केलेले आहेत. एकंदरीतच सक्करधारा दरवाजा हा स्थापत्यशास्त्रातील स्थित्यंतराचा नमुना आहे, हे या चित्रावरून स्पष्ट दिसत आहे.

मराठा संस्थानच्या राज्यामध्ये भारतभर आपण अहिल्यादेवी होळकर यांचे नाव अनेक विहिरी व नदीचे काठ बांधण्यामध्ये ज्यांनी अमाप पैसा खर्च केला व दानधर्म केला त्याची इतिहासामध्ये नोंद आहे. त्याचप्रमाणे नागपूरकर भोसले यांनी अशीच लोकोपयोगी कामे केली. त्यामध्ये एका अतिशय उत्कृष्ठ व स्थापत्याचे कौशल्य दाखविणारी पायऱ्यांची विहिर बांधली. पहा चित्र क्रमांक ७.११ नंदनवन नागपूर-नागपूर संस्थांनामधील एक उत्कृष्ट स्थापत्य शास्त्राचा नमुना म्हणून याकडे बघावे लागेल. शंकराच्या पिंडीच्या आकारामधील असलेली ही पायऱ्यांची विहिर ही भारतातील अनेक पायऱ्यांच्या विहिरींची रचना असलेल्या स्थापत्याचे प्रतिनिधीत्व करते. वरील नकाशामध्ये आपण असे बघत आहेत की विहिरीकडे जाणारा मार्ग हा उतरत्या दगडाच्या पायऱ्यांनी केलेला आहे. काही पायऱ्या उतरून गेल्यावर विश्रांतीसाठी केलेली दगडाची जमीन आहे. परत काही पायऱ्या उतरून गेल्यावर दगडाने सुशोभित केलेले बसण्याकरीता किंवा कपडे बदलण्यासाठी, प्रसाधनगृहासारखी खोली निर्माण केली आहे. हे सर्व जमिनीपेक्षा खालच्या सहा मीटर स्तरावर आहे. याच प्रसाधनगृहाच्या मधून सात आठ पायऱ्या वरती चढून गेल्यावर एक छोटेसे शिवमंदीर आहे. याच ठिकाणी बसून विहिरीतून आंघोळ करून येऊन लोक उपासना करत असत. त्याचप्रमाणे जसे आपण प्रसाधनगृहातून चढून वरती गेलो. तसेच तेवढ्या पायऱ्या उतरून खाली गेलो की परत एक दगडाची फरशी घातलेली विसाव्याची जागा दिसते. त्या दगडाच्या फरशीपर्यंत मुख्य विहिरीचे पाणी दिसते. ही सर्व विहीर वरपासून खालपर्यंत घोटीव दगडांमध्ये केलेली आहे. हे आपल्याला वरील नकाशावरून स्पष्ट दिसत आहे. नकाशामध्ये विहिरीला उभा छेद दिल्यावर विहिरीच्या पोटातील विसाव्याची जागा, मंदीराची जागा, प्रसाधनगृहाची जागा स्पष्टपणे दिसत आहे. या विहिरीच्या सर्वांत वरती एक पाण्याचा हौद केलेला आहे. त्या हौदामध्ये विहिरीचे पाणी काढून साठवता येऊ शकते, अशी सोय आहे. जमिनीच्या खाली जवळ जवळ पंधरा

मीटर असलेली विहिर व त्यासाठी केलेले हे स्थापत्य भारतीय स्थापत्यशास्त्राचा हा एक उत्कृष्ट नमुना आहे. चित्र क्रमांक ७.१० मध्ये पायरीच्या विहिरीचे काढलेले सर्व नकाशे हे के. एम. गिऱ्हे यांनी काढलेले आहेत. ही पायऱ्यांची विहिर ही राजा रघुजी दुसरा यांच्या काळात निर्माण केलेली आहे.

संस्थानिकांचा अभ्यास करताना आपल्याला निश्चित एका निष्कर्षापर्यंत येऊन पोहचावे लागते. ज्या संस्थानिकांनी स्वधर्माचे पालन केले. लोकांमध्ये धर्म जागृतीच्या निमित्ताने राजपरिवार यांचा जो संवाद व सहकार्य मिळायचे त्यामुळे जनता राजाविषयी मान व आदर ठेवून असायची. त्यापैकी नागपूरचा राजा रघुजी भोसले दुसरा यांनी एक उत्कृष्ठ शिव मंदीर बांधले. पहा चित्र क्रमांकः ७.१२ व ७.१३ तेलंगखेडी येथील शिवमंदिर नागपूरच्या पश्चिम भागात असून हे मंदिर इ. स. १७१४ मध्ये राजा रघुजी दुसरा याची आई राणी चिमाबाई हिने निर्माण केलेले आहे. अठराव्या शतकातील हे मंदीर नागपूर संस्थानच्या वैभवात भर टाकते. हे मंदीर कल्याणेश्वर मंदीर म्हणून पण ओळखले जाते. वरील नकाशानुसार पूर्व-पश्चिम १२.६ मीटर व दक्षिण-उत्तर १४.६ मीटर एवढी व्यासी आहे. या मंदीराला गर्भगृह, अंतराळ आणि सभामंडप आहेत. त्याचप्रमाणे सभामंडपाला लागून इतर देवतांची दोन मंदीरे आहेत. गर्भगृह हे नकाशाप्रमाणे ३ मीटर x ३ मीटर प्रमाणे आहे. गर्भगृहाच्या बाहेर चार कोपरे बाहेर आलेले दिसतात व पुढील भाग समांतर आहे. म्हणून या अशा स्वरूपाच्या मंदीराच्या स्थापत्याला पंचस्थ स्थापत्य असे म्हणतात. गर्भगृहाच्या आतमध्ये तीन बाजूला तीन कोनाडे आहेत व मध्यभागी शिवलिंग स्थापित आहे. या गर्भगृहाच्या मूळ भिंती एक मीटर जाडीच्या आहेत व अशाच त्या शिखरापर्यंत कमी कमी होत गेलेल्या आहेत. गर्भगृहाच्या पुढे असलेल्या छोट्या सभामंडपाला अंतराळ असे म्हणतात. हे अंतराळ सभागृह व गर्भगृह यांना जोडणारा एक भाग आहे. या अंतराळामध्ये दोन सुशोभित केलेले दगडाचे खांब आहेत. या अंतराळ मंडपातून लोकांना दर्शन मिळू शकते किंवा तेथून लोक आरती पण करू शकतात. अंतराळगृहाच्या अगदी सुरवातीला नंदी आहे. तेथूनच सभामंडपाला सुरूवात होते. सभा मंडपाला एकंदरीत दगडाचे बत्तीस स्तंभ आहेत व सर्व दगडाचे स्तंभ आहेत. या स्तंभांच्या आधारावर सभामंडप व त्यापुढील मोकळी जागा यावर छत टाकले आहे. या बत्तीस स्तंभामधील आठ स्तंभ इतर देवतांच्या मूर्ती असलेल्या गर्भगृहाच्या समोर आहेत व बारा स्तंभ मोकळ्या जागेवरील छताखाली आहेत. उर्वरीत बारा स्तंभ हे सभामंडपाच्या छताखाली आहेत. एकंदरीत अंतराळ व सभागृह धरून चौतीस दगडी स्तंभांवर व त्याचप्रमाणे गर्भगृहाच्या जाड भिंतीवर आधारलेले आहेत. यामध्ये अंतराळ गृह, सभामंडप व मोकळी जागा यामध्ये असलेले दहा स्तंभ हे मोठ्या आकाराचे

म्हणजेच चार अर्धगोलाकार स्तंभ मिळून एक यापद्धतीने झालेले आहे व बावीस स्तंभ दोन अर्धगोलाकार मिळून एक या पद्धतीने आहेत व चार स्तंभ पूर्ण गोलाकार लहान आकाराचे आहेत.


एकंदर मंदीराचे स्थापत्य बघता व मंदीराचे बाहेरील स्थापत्य व सौंदर्य बघताना ही स्थापत्य रचना नागर मंदीर शैली अशी वाटत आहे. कारण नागर मंदीर शैलीमध्ये गर्भगृह, अंतराळ व सभामंडप असे तीन भाग महत्त्वाचे असतात, ते येथे दिसून येतात. नागर मंदीराच्या शैलीत तीनही बाजूंच्या भिंतीचे मधले भाग पुढे आलेले असतात. त्यांना रथ असे म्हणतात. नागर मंदीरांची शिखरांची रचना ही उंच असते व बाह्यरेषा दिसणारे अशी त्याची ख्याती असते. नागर मंदीरात उंची या अंगाला प्राधान्य आहे. नागर मंदीरांच्या शिखरांमध्ये चारही बाजूला शंकूच्या आकाराची जी शिखरे असतात. ती उंचीने कमी कमी होत जातात. हे पण याठिकाणी स्पष्ट दिसत आहे. नागर मंदीरावरील शिखर हे जसे निमुळते होत जाते. तसे त्याच्यावरती अमलका व कळस स्पष्टपणे दिसत आहे. या शिवमंदीराच्या गर्भगृहाचा दरवाजा हा एक विशिष्ट प्रकारचा दरवाजा असून त्याला सात शाखा आहेत. त्याला द्धारशाखा असे म्हणतात. एकाऐवजी एकात एक बसणाऱ्या अनेक चौकटी घडवणे हा वास्तू स्थापत्यातील द्धार शाखेचे वैशिष्ट्य आहे व ते याठिकाणी आपल्याला दिसते. या द्धारशाखेमध्ये एका चौकटीवर बेलपत्ती शाखा (वनस्पती जग) रत्नशाखा (खनिजे) व्यालशाखा (प्राणीसृष्टी) रूपशाखा, (मानव, गंधर्व) इ. शाखांचे शिल्पकाम याठिकाणी दिसून येत आहे. दरवाजाच्या सर्वांत खालती किर्ती मुख आपणांस दिसत आहे. असे हे तेलंगखेडी येथील शिवमंदीर अठराव्या शतकातील नागपूरकर भोसल्यांच्या राजवटीतील स्थापत्यशास्त्राचा उत्कृष्ट नमुना आहे.

७.६ सारांश : नागपूर संस्थान हे छत्रपती शिवाजी महाराजांच्या कुळामधील एक शाखा असलेल्या भोसले घराण्याचेच होते. या प्रकरणामध्ये नागपूर संस्थान कसे निर्माण झाले याचा इतिहास, त्याचप्रमाणे नागपूरकर भोसल्यांनी केलेली ऐतिहासिक कामगिरी म्हणजे बंगालपर्यत मराठ्यांचे साम्राज्य कसे वाढविले या संदर्भातल्या इतिहासाचा आढावा व नागपूर भोसल्यांची प्रशासकीय कार्ययंत्रणा कशी होती, या संदर्भातला सविस्तर आढावा या प्रकरणात घेण्यात आलेला आहे. नागपूर, औंध, फलटण, भोर ही सर्व संस्थाने सातारा संस्थानशी निगडीत असताना नंतरच्या काळात पुण्याच्या पेशवाईशी जोडली गेली. याचा आढावा पुढील प्रकरणात घेण्यात आलेला आहे.

७.७ उपसंहार :– भारताच्या मध्यभागी असलेले नागपूर हे १७ व्या शतकाच्या उत्तरार्धाच्या अंतिम टप्प्यात भोसले घराण्याशी जोडले गेले. वऱ्हाड व गोंडवन या भागामध्ये स्वतःच्या पराक्रमाने मराठा सरदारांनी स्वतःचे सत्ताकेंद्र निर्माण केले. भोसले घराण्याची जशी वेरूळ शाखा शिवरायांची आहे, तशी

भोसल्यांची हिंगणी शाखा. परसोजींची म्हणून ओळखली जाते. त्याच परसोजींनी व त्यांच्या वंशजांनी नागपूर हे संस्थान निर्माण केले. नागपूरकर भोसल्यांमध्ये रघुजी भोसले यांनी विशेष पराक्रम करून बंगाल व ओरिसापर्यंत मराठ्यांचे राज्य वाढवले. त्यांनी नुसत्या राज्याच्या सीमा वाढवल्या नाहीत तर त्यांनी प्रशासकीय यंत्रणा पण चांगल्या पद्धतीने राबविल्या. स्वतःची टांकसाळ त्यांनी निर्माण केली होती. १८ व्या शतकामध्ये नागपूरकर भोसल्यांनी स्वतःच्या राज्यामध्ये स्थापत्यविषयक उत्तम कामे केली. यामधील काही स्थापत्यविषयक कामे लोककल्याणकारी होती. उदा. मोठमोठ्या बावड्या पाण्याच्या साठ्यासाठी बांधल्या. त्याचप्रमाणे भव्यदिव्य मंदिरे, वेशीवरील बांधकामे व स्वतःकरता निर्माण केलेला राजवाडा, सरदारांकरीता निर्माण केलेले वाडे यामधील स्थापत्यशास्त्राला धरून केलेले आहे. एकंदरीतच नागपूरकर भोसल्यांचा स्थापत्यविषयक दृष्टीकोन चांगला होता. काळाच्या गरजेनुसार व लोकांच्या आवश्यकतेनुसार त्यांनी स्थापत्यविषयक स्थित्यंतरे केली व कामे केली. १९ व्या शतकात आंग्लाच्या राजवटीमध्ये प्रशासकीय कामात स्थित्यंतरे घडली. पण स्थापत्यविषयक कामात युरोपियन कार्यशैलीमुळे युरोपियन पद्धतीची स्थित्यंतरे दिसून येत नाहीत. या प्रकरणामध्ये मराठ्यांच्या साम्राजाचा एक भाग असलेल्या नागपूरकर भोसल्यांच्या स्थापत्यविषयक वास्तुंची सविस्तर व संशोधनात्मक वस्तुस्थिती मांडली आहे.

चित्र क्रमांक : ७.१




नागपूरकर भोसले यांची वंशावळ

या प्रबंधामध्ये नागपूरकर भोसल्यांच्या राजवाड्याचे स्थापत्यविषयक नकाशे व राजवाड्याच्यासंदर्भात त्यांचे नकाशे याठिकाणी अभ्यासाकरिता जोडलेले आहेत, मागे उल्लेख केल्याप्रमाणे सातारा, भोर, फलटण, औंध व नागपूर या सर्वांचे एकत्रित राजवाड्याच्यासंदर्भात असलेले स्थापत्य व त्यामध्ये झालेले कालक्रमानुसार बदल म्हणजेच स्थित्यंतरे होय. याचे एकत्रित वर्णन व निरिक्षणे याचा फलटण संस्थानच्या प्रकरणामध्ये समावेश केलेला आहे.


७.८ नागपूर संस्थानामधील स्थापत्य व स्थापत्यामधील झालेली स्थित्यंतर याचे नकाशे व छायाचित्रे

चित्र क्रमांक : ७.२




नागपूरकर भोसले यांच्या राजवाड्याचा पहिल्या मजल्याचा नकाशा

चित्र क्रमांक : ७.३




नागपूर संस्थानच्या राजवाड्याचा अंतर्गत रचना दाखविणारा तळमजल्याचा नकाशा

चित्र क्रमांक : ७.४




नागपूर संस्थानच्या राजवाड्याचा अंतर्गत रचना दाखविणारा तळमजल्याचा नकाशा

चित्र क्रमांक : ७.५




धाकटे भोसले राजवाड्याच्या पहिल्या मजल्याचा नकाशा

चित्र क्रमांक : ७.६




कै. राणी बकाबाई भोसले यांचा राजवाड्याचा नकाशा

चित्र क्रमांक : ७.७




कै. राणी बकाबाई भोसले वाड्यातील ढेवघराचा नकाशा

चित्र क्रमांक : ७.८




अहिरराव वाड्यातील तळमजल्यावर मराठा स्थापत्यामध्ये असलेली सर्व प्रकारची ढालने व अंतर्गत स्थापत्याचा नकाशा

चित्र क्रमांक : ७.१




सुक्करवार दरवाज्याचा स्थापत्याचा नकाशा

चित्र क्रमांक : ७.१०




सक्करधारा दरवाजा स्थापत्याचा नकाशा

चित्र क्रमांक : ७.११




नागपूर संस्थान-पायऱ्यांची विहिर नंदनवन नागपूर

चित्र क्रमांक : ७.१२



शिव मंढिराचे स्थापत्यामधील नागरशैलीतील शिखराचा नकाशा

चित्र क्रमांक : ७.१३



शिव मंदिर सभागृह

प्रकरण : आठ

सातारा संस्थानचे छत्रपती शाहू महाराज यांच्यानंतर प्रशासकीय कार्ययंत्रणा व त्यामध्ये झालेली प्रशासकीय स्थित्यंतरे

प्रकरणाचा तपशिल

क्रमांक	तपशिल	पृष्ठ क्रमांक
प्रकरण : ८	**सातारासंस्थानचे छत्रपती शाहू महाराज यांच्यानंतरप्रशासकीय कार्ययंत्रणा व त्यामध्ये झालेली प्रशासकीय स्थित्यंतरे**	**३२३**
८.१	पेशवाई काळ (इ. स. १७०७ ते इ. स. १८१८)	३२५
८.१.१	बाळाजी विश्वनाथ	३२५
८.१.२	पहिला बाजीराव पेशवा	३२६
८.१.३	नानासाहेब पेशवे उर्फ बाळाजी बाजीराव पेशवे	३२७
८.१.४	माधवराव पेशवे	३२७
८.१.५	सवाई माधवराव पेशवे	३२९
८.१.६	दुसरा बाजीराव	३३०
८.२	स्थित्यंतराचे त्रिविधस्वरूप	३३१
८.३	मराठ्यांच्या संस्थानांच्या प्रशासकीय कार्ययंत्रणेतील स्थित्यंतरे	३३२
८.४	पेशव्यांची वंशावळ	३३५
८.५	सारांश	३३६
८.६	उपसंहार	३३६

प्रकरण ८

सातारा संस्थानचे छत्रपती शाहू महाराज यांच्यानंतर प्रशासकीय कार्ययंत्रणा व त्यामध्ये झालेली प्रशासकीय स्थित्यंतरे

मराठ्यांच्या प्रशासकीय कार्ययंत्रणेचा अभ्यास करताना ज्याप्रमाणे छत्रपती राजाराम व महाराणी ताराबाई व परत छत्रपती थोरले शाहुमहाराज यांच्या प्रशासकीय राज्यकारभारात अष्टप्रधान मंडळातील मुख्य प्रधान म्हणजे पेशवे, यांची भूमिका फार महत्त्वाची ठरत होती. मराठ्यांच्या किंवा संस्थानिकांच्या प्रशासकीय कार्ययंत्रणेमध्ये पेशव्यांचा सहभाग किंवा पेशव्यांचे अधिपत्य, छत्रपतींकडून त्यांना ढिला जाणारा विश्वासाचा सन्मान यामुळे राज्ययंत्रणेचा केंद्रबिंदू हळूहळू छत्रपतींकडून पेशव्यांकडे गेला. याचे कारण बाळाजी विश्वनाथ यांच्या मुत्सद्देगिरीमुळे म्हणजेच मराठा मंडळाच्या प्रभावामुळे ढिल्लीकडून चौथाईचे हक्क मिळवून म्हणजेच सनढा मिळवून पुन्हा स्वराज्य मोठे केले व या झालेल्या साम्राज्य विस्तारामुळे बाळाजी विश्वनाथ यांचा मुलगा बाजीराव याने मराठ्यांच्या स्वराज्याचे रूपांतर साम्राज्यात केले. म्हणूनच पेशव्यांची भूमिका मराठ्यांच्या प्रशासकीय कार्ययंत्रणेत महत्त्वाची ठरते. त्यामुळे पेशवाईच्या संढर्भात आपण माहिती घेऊ.

८.१ पेशवाई काळ (इ. स. १७०७ ते इ. स. १८१८)

८.१.१ बाळाजी विश्वनाथ

मराठ्यांचे राज्य नष्ट करण्याच्या हेतूने आलेला औरंगजेब इ. स. १७०७ मध्ये मृत्यू पावला. परंतु महाराष्ट्र घेण्याचे त्याचे स्वप्न अपुरेच राहिले. त्यामुळे रिक्त झालेल्या ढिल्लीच्या तख्तावर आझमशहा आरूढ झाला. त्याने आपल्या कैदेत असलेला संभाजी राजांचा मुलगा शाहू याची सुटका केली. यावेळी महाराष्ट्रामध्ये छत्रपती राजारामांची पत्नी ताराबाई राज्य करीत होती. महाराणी ताराबाई व शाहू यांच्यात राज्यपढासाठी गृहकलह माजून मराठ्यांचे राज्य ढुर्बल व्हावे या हेतूने शंभुपुत्र शाहूस पाठविले, मराठ्यांचे राज्य ढुर्बल व्हावे अशी त्याची इच्छा होती. प्रारंभी तसे घडलेसुद्धा. मराठ्यांच्या सरढारांत फूट पडली. शंभुपुत्र शाहू यांना महाराणी ताराबाई यांच्याकडील काही मातब्बर सरढार येऊन मिळाले. शाहूंचे पारडे जड झाले. इ. स. १७०७ मध्ये सातारा येथे राज्याभिषेक करून घेतला व महाराणी ताराबाई यांनी आपला मुलगा शिवाजी (ढुसरा) यास पन्हाळ्याच्या गादीवर बसविला. त्यामुळे मराठ्यांच्या राज्ययंत्रणेत ढोन सत्ता निर्माण झाल्या अशा या कठीणप्रसंगी बाळाजी विश्वनाथ या पेशव्यांनी छत्रपती शाहूंची बाजू विविध मराठ्यांच्या सरढारांना, प्रधानांना व सेनापतींकडे जाऊन त्यांची बाजू बळकट केली व मराठे सरढारांमध्ये एक नवीन चैतन्य निर्माण झाले. मराठा मंडळ बळकट केले. छत्रपती शाहू व

महाराणी ताराबाई यांच्यातील संघर्षाची धार बोथट करून त्याची तीव्रता कमी केली व मराठी सरदारांना एक प्रकारे मोठे क्षेत्र उपलब्ध करून दिले. याचवेळी दिल्लीमध्ये आझमशहाचा पराभव करून दिल्लीचे तख्त शहाआलम याला मिळाले. त्याच्या दरबारात असलेले सय्यद बंधू यांचे वर्चस्व वाढून सय्यद बंधूंच्या हातात दिल्लीची सत्ता गेली व भारतीय राजसत्तेला एक वेगळेच वळण मिळाले. दक्षिण भारत व उत्तर भारत या दोन्ही ठिकाणी बलाढ्य सरदारांनी याच काळात स्वतःच्या सामर्थ्यांवर प्रादेशिक सत्ता निर्माण केली. पेशवे बाळाजी विश्वनाथ यांनी स्वतः दिल्लीस जाऊन मराठ्यांचे स्वराज्य जे छत्रपती शिवाजी महाराजांच्या काळात जी राज्यव्याप्ती होती ते स्वराज्य, आणि दक्षिणेतील सहा मोगलाई सुभ्यांतील चौथाई व सरदेशमुखी यांच्या सनदा दिल्लीच्या तख्ताकडून आपल्या मुत्सद्देगिरीने मिळविल्या व महाराणी येसूबाई (छत्रपती संभाजी महाराजांची पत्नी व शाहुमहाराजांची आई) यांची दिल्लीतील कैदेतून सुटका होती (अग्निहोत्री द. ह., १९७७ : २१५).

बाळाजी विश्वनाथांच्या या मुत्सद्देगिरीमुळे छत्रपतींचा त्यांच्यावरील विश्वास मोठ्या प्रमाणात वाढला. मराठ्यांचा राज्यविस्तारही मोठ्या प्रमाणात झाला. बाळाजी विश्वनाथ हे नुसते मुत्सद्दी नव्हते तर ते स्वतः योद्धा होते. त्यांनी अनेक मोहिमांमध्ये विजय मिळवून दिला व इ. स. १७२० मध्ये बाळाजी विश्वनाथ यांचे निर्वाण झाले.

८.१.२ पहिला बाजीराव पेशवा

इ.स. १७२० मध्ये बाळाजी विश्वनाथांच्या मृत्यूनंतर त्यांचा मुलगा पेशवा झाला. बाजीरावांनी स्वतःच्या हिंमतीवर आणि शिंदे व होळकर यांच्या मदतीने उत्तर हिंदुस्थानात मराठ्यांचे साम्राज्य वाढवून दरारा निर्माण केला. त्यांचे बंधू चिमाजीअप्पा यांच्या मदतीने व पराक्रमाने माळवा प्रांत हस्तगत केला. बुंदेलखंडात असलेला महंमदखान बंगरा याचा पराभव करून राजा छत्रसाल बुंदेल याला त्याचे राज्य परत दिले. राजा बुंदेलने याचे बक्षीस म्हणून बुंदेलखंडाचा काही भूभाग बाजीरावाला देऊन टाकला. बाजीराव व चिमाजी या बंधूंनी दक्षिणेतसुद्धा निजामुल मुलक याचा दोन वेळा पराभव करून त्याची सत्ता क्षीण केली. इतक्यावरच न थांबता चिमाजीअप्पा व बाजीराव यांनी वसईच्या रणसंग्रामात यश मिळविले. पहिल्या बाजीरावाच्या काळात चिमाजीअप्पांच्या सहकार्याने मराठ्यांच्या प्रशासकीय कार्ययंत्रणेतसुद्धा बदल घडवून आणले. एकंदरीत त्याचा हा कालखंड छत्रपती शाहूंचे राज्य वाढवण्यास फारच महत्त्वाचा ठरला. इ. स. १७४० मध्ये पहिल्या बाजीरावाचे निर्वाण झाले (शेणोलीकर ह. श्री. व देशपांडे प्र. ना., १९७६: २९१).

८.१.३ नानासाहेब पेशवे ऊर्फ बाळाजी बाजीराव पेशवे

पहिल्या बाजीरावाच्या मृत्यूनंतर त्याचा मुलगा बाळाजी बाजीराव यास पेशवेपद मिळाले. मराठा मंडळातील शूर मुत्सद्दी मल्हारराव होळकर व राणी शिंदे या दोघांचे सहाय्य घेऊन अटकेपार मराठ्यांचे झेंडे लावले. इ. स. १७४१ मध्ये छत्रपती शाहू महाराजांनी स्वराज्याची सर्व सूत्रे मृत्यूसमयी नानासाहेब पेशव्यांच्या हाती दिली व त्यामुळे मराठ्यांचे सत्ता केंद्र साहजिकच पेशव्यांकडे गेले. साताऱ्याचे छत्रपती त्यामुळे नामधारी छत्रपती राहिले. इ. स. १७६१ मध्ये अफगाणिस्तानचा बादशहा अहमदशहा अब्दाली याने रोहिल्याच्या मदतीने भारतावर स्वारी करून मराठ्यांना आव्हान दिले. ही सर्व घटना पानिपत येथे घडली. पानिपतचा महासंग्राम झाला. या महासंग्रामात मराठ्यांची हानी जरी झाली असली तरी अब्दालीला विजय टिकवता आला नाही. पुढील एक दीड वर्षांच्या कालखंडातच अब्दालीचे सैन्य परत गेले. याच काळामध्ये बंगालमधील इंग्रजांना दिल्लीच्या राजकारणात शिरकाव करण्याची संधी प्राप्त झाली. दक्षिणेत निजामाच्या कारवाया सुरू झाल्या. म्हैसूर येथे नवीन उदयास आलेला हैदरअली याने मराठ्यांना आव्हान दिले. इकडे महाराष्ट्राच्या पश्चिम किनाऱ्यावर कान्होजी आंग्र्यांच्या आरमाराचा इंग्रजांच्या मदतीने पेशव्यांनी पराभव केला ही घटना स्वराज्याच्या दृष्टीने हिताची नव्हती. या घटनेमुळे इंग्रजांना मराठ्यांच्या राजकारणात व पश्चिम किनाऱ्यावर आरमार वाढवण्यात मदत झाली. त्या आरमारावर वर्चस्व वाढले. या सर्व घटना इ. स. १७६१ पर्यंत घडत होत्या (दीक्षित नि. सी., २०१४ : ४७३).


८.१.४ माधवराव पेशवे

नानासाहेब पेशव्यांनंतर त्याचा मुलगा माधवराव पेशवा झाला. इ. स. १७६१ ते इ. स. १७७२ अशी अकरा वर्षे त्यांना पेशवे पदावर काम करता आले. वयाने तरुण, आरोग्यसंपन्न व वृत्तीने उमदे व्यक्तिमत्त्व असलेल्या माधवरावांनी मराठी राज्याची घडी नीट बसवली. त्यांनी स्वतःचे कौशल्य व मुत्सद्दीपणा वापरून गृहकलह टाळला (शेणोलीकर ह. श्री. व देशपांडे प्र. ना., १९७६ : २९३).

इ.स. १७६३ मध्ये राक्षसभुवन येथील युद्धात निजामाचा मोठा पराभव करून त्याचे पारिपत्य केले. तसेच म्हैसूरच्या हैदरअलीचा पराभव करून दक्षिण भारतातील आपले वर्चस्व वाढवित तुंगभद्रेपर्यंत साम्राज्य वाढविले. त्याचवेळी महादजी शिंदयांनी रोहिल्यांचा पराभव करून पानिपत युद्धात झालेल्या प्रचंड हानीची भरपाई करून दिल्लीवर वर्चस्व गाजविले. एकंदरच उत्तर भारतात परत साम्राज्य वाढविण्याकरिता माधवरावांनी महादजी शिंदयांच्या मदतीला तुकोजी होळकर, सरदार कानडे, सरदार बिनीवाले यांना पाठवून दिले. माधवराव पेशव्यांनी प्रशासकीय यंत्रणा चांगल्या प्रकारे

हाताळल्यामुळे मराठे सरदारांत ऐक्य टिकवून ठेवले होते. तसेच आधुनिक शस्त्र निर्माण करून स्वावलंबी होण्यासाठी त्यांनी धाडस करून तोफा ढाळण्याचा कारखाना चालू केला. अशा या अत्यंत उत्साही, मुत्सद्दी, कल्पक, धाडसी व कुशल प्रशासक अशा माधवरावांचा वयाच्या अठ्ठाविसाव्या वर्षी अंत झाला. त्यांच्या अकाली जाण्याने मराठ्यांचे लष्कर ज्या आधुनिक शस्त्रास्त्रांनी परिपूर्ण होण्याचे स्वप्न व प्रशासनातील काही चांगले बदल हे अपुरेच राहिले. धूर्त इंग्रजांनी त्यांचे सर्व गुण पारखले होते. इंग्रजांच्या अनेक कुटील हेतूंचा त्यांनी बिमोड केला होता. माधवराव पेशव्यांच्या मृत्यूमुळे इंग्रजांना आनंदच झाला. पानिपत युद्धात मराठ्यांची जी हानी झाली, त्यापेक्षाही माधवरावांचा मृत्यू हा जास्त हानिकारक होता. त्यांच्या मृत्यूमुळे पेशव्यांची मध्यवर्ती सत्ता किंबहुना मराठ्यांची मध्यवर्ती सत्ता ढासळू लागली, असे अभ्यासावरून दिसते (दीक्षित नि. सी., २०१४ : ७६८).

चित्र क्रमांकः८.१



पहिला बाजीराव पेशवा

चित्र क्रमांकः ८.२



माधवराव पेशवे दुसरा

८.१.७ सवाई माधवराव पेशवे

माधवराव पेशवे यांच्या मृत्यूनंतर त्यांचे बंधू नारायणराव यांस पेशवाईपद मिळाले. माधवरावांच्या मृत्यूनंतर सत्तेसाठी गृहकलह झाला, त्यांचे चुलते रघुनाथराव व चुलती आनंदीबाई यांनी गारदयांकरवी नारायणरावांचा खून केला. शनिवार वाड्यात घडलेली अत्यंत दुर्दैवी घटना होती. या घटनेमुळे महादजी शिंदे, तुकोजी होळकर, सखारामबापू, नाना फडणवीस आणि इतर चिडलेल्या बारा प्रमुख सरदार मुत्सद्दयांनी रघुनाथरावाला पेशवाईपद मिळू द्यायचे नाही, असे ठरविले. अकाली मृत्यू पावलेला नारायणराव यांची पत्नी गंगाबाई गरोदर होती. तिला पुरंदरच्या किल्लयांत कडेकोट बंदोबस्तात ठेवून पेशवाईचा कारभार चालविला. या सर्व घटनेला बाराभाईंचे कारस्थान असे म्हणतात (अग्निहोत्री द. ह., १९७७ : २१७).

या नीच रघुनाथरावांनी इंग्रजांचा आश्रय घेतला व मराठ्यांशी युद्ध करण्याकरता प्रवृत्त केले. बाराभाईंमधील सर्व मराठे सरदार पराक्रमी होते. त्यांच्याकडे शूरवीरांची फौज होती. त्यांनी इंग्रजांचा पराभव केला. समजा याठिकाणी इंग्रज जिंकले असते तर इंग्रजांची सत्ता महाराष्ट्रात त्याचवेळी आली असती व मराठ्यांचे स्वातंत्र्य संपुष्टात आले असते. पुरंदरला गंगाबाई प्रसूत होऊन तिला मुलगा झाला. त्याचे नाव सवाई माधवराव ठेवले व हा सव्वा महिन्याचा असताना त्याला पेशवे पदावर बसविले. अर्थातच त्याच्या वतीने मुत्सद्दी मराठे सरदार व नाना फडणवीस पेशवाईचा कारभार बघत होते. इ. स.

१७९५ च्या खर्ड्याच्या लढाईत निजामाचा संपूर्ण ढणढणीत पराभव करून नाना फडणविसांनी मराठ्यांच्या सरदारांची एकजूट करून त्यांच्या प्रशासकीय कार्ययंत्रणेचा ढरारा बसवला. याचवेळेला उत्तरेत महादजी शिंदे यांनी मोगलांवर ढरारा बसवला. नर्मदेपासून ते सतलजपर्यंतच्या सर्व प्रदेशावरमहादजी शिंदे यांचे नियंत्रण होते. अशा तऱ्हेने निजाम व मोगल यांच्यावर या बारभाई सरदारांच्या एकजुटीमुळे वर्चस्व निर्माण झाले. सवाई माधवरावांकडे इ. स. १७९५ पर्यंत पेशवाई होती (ढीक्षित नि. सी., २०१४ : ६६२).

८.१.६ ढुसरा बाजीराव

या मधल्या मराठा व इंग्रजांमधील संघर्षाच्या काळात महादजी शिंदे व तुकोजी होळकर हे ढोघे कालवश झाले. याचप्रमाणे नाना फडणवीसही इ. स. १८०० मध्ये गेले. त्यामुळे रघुनाथरावांचा मुलगा ढुसरा बाजीराव यास पेशवाईपढ मिळाले. यांचे अंगी कसलेच कर्तृत्व नव्हते. या नाढान ढुसऱ्या बाजीरावाने एकनिष्ठ असलेल्या शिंदे व होळकर घराण्यांशी वैर केले. त्यामुळे इंग्रजांचे वर्चस्व वाढले. संपूर्ण भारतभर याच काळामध्ये इंग्रज प्रभावी होत चालले होते. मराठ्यांच्या काही सरदारांनी आणि काही संस्थानिकांनी इंग्रजांच्या तैनाती फौजा स्विकारून आपले स्वातंत्र्य त्यांच्या हातात ढिले. इ. स. १८०२ मध्ये बाजीरावानेही तेच केले. हळूहळू पेशव्यांचे वर्चस्व मराठा प्रशासकीय यंत्रणेत ढुसऱ्या बाजीरावाच्या वर्तणुकीमुळे कमी होत गेले व मराठा शासनाची पकड संपूर्ण भारतभर कमी होत गेली. मुत्सद्दी मराठा सरदारसुद्धा कालवश झाल्यामुळे मराठ्यांची साम्राज्यावरील पकड पुढील सोळा वर्षांत हळूहळू कमी होत गेली व इ. स. १८१८ मध्ये इंग्रज व मराठे यांच्यात झालेल्या लढाईत मराठ्यांचा संपूर्ण पराभव झाला व मराठ्यांचे राज्य जे संपूर्ण भारतभर एकछत्री अंमलाखाली होते. त्याचे तुकडेतुकडे झाले. उढा. मराठ्यांच्या प्रमुख सरदारांनी स्वतःच्या हिंमतीवर स्वतःच्या अधिपत्याखाली ज्या भूभागावर वतनढारी म्हणून किंवा सरंजामी म्हणून राज्य केले. त्यात्या ठिकाणी त्यांनी स्वतःची प्रशासकीय कार्ययंत्रणा राबवून व इंग्रजांच्या तैनाती फौजा ठेवून स्वतःची संस्थाने निर्माण केली. या संस्थानिकांनी भगवा झेंडा हा स्वतःच्या संस्थानाचा ध्वज म्हणून स्वीकारला. महाराष्ट्रात व महाराष्ट्राबाहेर त्यामुळे छोटीमोठी संस्थाने निर्माण झाली. उढा. ग्वाल्हेर, इंढौर, नागपूर, भोर, बडोढा, औंध, फलटण, अक्कलकोट अशी परंपरागत सरदार असलेली घराणी, मुत्सद्दी व योद्धे असलेली घराणी स्वतःचे संस्थान बनवून राजे म्हणवून घेऊ लागली (शेणोलीकर ह. श्री. व ढेशपांडे प्र. ना., १९५६ : २९४).

छत्रपती शाहू महाराजांच्या काळात बाळाजी विश्वनाथ व इतर मराठे सरदार यांनी मराठा मंडळाच्या वतीने राज्यव्यवस्था सुरू केली होती. चौथाई व सरदेशमुखी व स्वराज्य यांच्या बद्दलची पध्दत व उपयोग याबाबत मराठा मंडळाने निरनिराळ्या व्यवस्था निर्माण केल्या (चिटणीस के. एन., १९८७ : १४६).

सातारा संस्थानाच्या प्रशासकीय कार्ययंत्रणेच्या संदर्भात अभ्यास करताना असे दिसून येते की, एक मध्यवर्ती नियंत्रण संपूर्ण मराठ्यांच्या राजसत्तेवर असावे, या हेतूने मराठा मंडळाने काही संकेत निर्माण केले होते. छत्रपती शाहू महाराज हे पेशव्यांच्या सल्ल्याने म्हणजेच राज्याचा मुख्य प्रधान या नात्याने त्यांच्याशी सल्लामसलत करून मुख्य निर्णय घेत असत. पहिले बाजीराव पेशवे यांची शूरवृत्ती शाहू महाराजांचा उत्साह वाढवित असे. त्यामुळे छत्रपती शाहूंचा साहजिकच कल पेशव्यांच्या राज्यव्यवस्थेतील निर्णयाकडे असे. मराठ्यांच्या या प्रशासकीय राज्ययंत्रणेतील त्यांच्या अधिकाराच्या प्रदेशातील महत्त्वाच्या अधिकाऱ्यांच्या नेमणुका पेशवे स्वतः करीत असत. छत्रपती शाहूंना सहाय्य करणारे सरदार किंवा त्यांचे प्रधान मंडळातील जबाबदार प्रधानांच्यामध्ये त्यांच्या घरातील भाऊबंदकीमुळे जर प्रशासनात अव्यवस्था माजली तर त्या सरदारांचा किंवा प्रधानांचा महाल जप्त करण्याचा अधिकार मुख्य प्रधान या नात्याने पेशव्यांनी स्वतःकडे राखून ठेवला होता. सरदारांच्या किंवा प्रधानांच्या वारसांनी अधिकार ग्रहण करताना पेशव्यांना नजराणा देण्याची प्रथा पाडली होती. छत्रपती शाहूंच्या वतीने पेशवे राज्यकारभार करीत असत. राज्यसत्तेचे केंद्र मुख्य प्रधान झाल्यानंतर पुणे येथे त्यांनी मुख्य कचेरी केली. त्याला फड म्हणत असत. पुण्यात पेशव्यांनी शनिवारवाड्यासारखा अतिभव्य वाडा एखाद्या राजाला शोभेल अशा पद्धतीने बांधला.त्या वाड्यातून भारतातील संपूर्ण मराठ्यांच्या साम्राज्याची सूत्रे हलत असत. त्याकरिता त्यांनी काही व्यवस्था निर्माण केल्या.

८.२ स्थित्यंतराचे त्रिविध स्वरूप

समाजाच्या विविध घटकातील अंतर विरोधांमुळे किंवा बाह्य आक्रमकांमुळे त्या राज्याच्या संस्कृतीमध्ये विविध क्षेत्रामध्ये बदल घडून येतात व ते बदल पुनरूज्जीवन परिवर्तन आणि क्रांती या तीन संज्ञांनी त्याचे वर्णन केले आहे. यालाच स्थित्यंतराचे त्रिविध स्वरूप म्हणतात (शेणोलीकर ह. श्री. व देशपांडे प्र. ना., १९७६ : २०२).

८.३ मराठ्यांच्या संस्थानांच्या प्रशासकीय कार्ययंत्रणेतील स्थित्यंतरे

सातारा, भोर, फलटण, औंध व नागपूर या सर्वांना मराठ्यांची संस्थाने म्हणतो. त्या सर्वांची प्रशासकीय कार्ययंत्रणा काही काळ कार्ययंत्रणेत झालेल्या स्थित्यंतरामुळे पुण्यातील शनिवारवाड्यातून चालत होती. ती खालीलप्रमाणे :-

१. पुण्याच्या फडात एकंदर पंधराशे कारकून यांची व्यवस्था निर्माण केली.

२. भारताच्या ज्या भागात मराठ्यांचे साम्राज्य होते, त्यात एकंदर वीस हजार कारकून काम करत होते.

३. पुण्यामध्ये स्वतंत्र पोलिसखाते निर्माण केले. या पोलिसांच्या प्रमुख अधिकाऱ्याला कोतवाल अशी संज्ञा देऊन तिन पोलिस मुख्यालये बांधून त्यामध्ये शंभर पोलिसांची तुकडी निर्माण केली. कोतवाल हे नवीन पद निर्माण केले.

४. मराठ्यांच्या राज्ययंत्रणेच्या अंतर्गत जी छोटीमोठी शहरे येत असत. त्यामध्ये पोलिसांच्या तुकड्या नेमून कोतवाल नेमले.

७. मराठ्यांच्या राज्ययंत्रणेमध्ये विविध ठिकाणी टांकसाळी निर्माण केल्या. या टांकसाळीमध्ये चांदी व तांबे या धातूंची नाणी पाडली जात असत. उदा. चिंचवड, वसई, नाशिक, चांदवड व पुणे येथे टांकसाळी निर्माण केल्या.

६. शिवकालात राज्यात आरंभिलेले अठरा कारखाने छत्रपती शाहुमहाराजांनी व्यवस्थित चालू ठेवले होते. सातारा या राजधानीमधून त्यांचे नियोजन व सूत्र हालत असे. पेशव्यांनी याचप्रमाणे छत्रपती शाहूंचे मुख्य प्रधान असल्याने तीच खाती थोडा फार बदल करून चालू ठेवली. त्या कारखान्यांची नावे अशी :

१. तोफखाना, २. छीलखाना, ३. उंष्ट्रखाना, ४. शिलेखाना, ५. फरासखाना, ६. कोठी, ७. लकडखाना, ८. इमारत, ९. बागा, १०. कुरणे, ११. रथखाना, १२. पेठा, १३. थट्टी, १४. जामदारखाना, १५. जिन्नसखाना, १६. वैद्यशाला, १७. पुस्तकशाला, १८. खाजगी या सर्व कारखान्यांची माहिती सातारा संस्थानचा अभ्यास करताना आपण घेतली आहे.

७. याव्यतिरिक्त मुख्य प्रधान पेशवे यांनी टपालखाते चालू केले. टपालखात्यामध्ये महत्त्वाच्या सुधारणा करून राज्यविस्तार वाढल्यामुळे नाना फडणवीस यांनी लक्ष घालून त्यात सुधारणा घडवून आणल्या व त्यांची व्याप्ती वाढवली.

८. परराज्याशी संबंध ठेवण्याकरिता वकिलांची नेमणूक केली. उदा. निजाम व हैदर यांच्या राज्यात मराठ्यांचे वकील कायमस्वरूपी नेमण्यात आले होते.

९. मराठ्यांच्या प्रशासनाच्या सोयीसाठी राज्यात विविध प्रकारचे भाग केले. उदा. १. प्रांत, २. जिल्हा, ३. तालुका, ४. महाल (कसबा किंवा मौजे), ७. गाव.

१०. प्रांतांच्या अधिकाऱ्यांला सुभेदार म्हटले जात असे. तालुक्याच्या प्रमुख अधिकाऱ्याला मामलेदार म्हणत असत. महालाच्या प्रमुख अधिकाऱ्याला महालकरी म्हणत असत. तरफ (महालापेक्षा लहान व गावापेक्षा मोठा) याच्या प्रमुख अधिकाऱ्याला पाटील किंवा मुकादम म्हटले जात असे. या अधिकाऱ्यांना वेतन वर्षातून एकदाच दिले जाई.

११. दररोज काम करणाऱ्या कामगारांना रोजच्या रोज वेतन दिले जाई.

१२. मराठ्यांच्या छत्रपतींच्या उत्पन्नाच्या बाबी ज्या होत्या, याच पुढे पेशवाईच्या काळात चालत होत्या (अग्निहोत्री द. ह., १९७७ : २२०).

उदा. १. शेती जमिनीवरील कर (सारा) २. जकात (पदार्थ, प्राणी यांच्या खरेदी व विक्रीवरील कर), ३. अबकारी कर (दुकाने व खाजगी दफ्तरे यांच्यावरील शुल्क), ४. पट्टी (ही विशेष प्रसंगी बसविली जाई.) उदा. नळपट्टी, तळेपट्टी इ.

१३. महाराष्ट्रातील प्राचीन काळापासून जी ग्रामव्यवस्था होती ती तशीच चालू ठेवली होती. उदा. पाटील, कुलकर्णी, चौगुला, शेटे, महाजन, देशमुख, देशपांडे, मिरासदार, बलुतेदार इ. स्वरूपाच्या ग्रामव्यवस्था होत्या.

१४. मराठ्यांच्या प्रशासकीय कार्ययंत्रणेत शेती हा प्रमुख व्यवसाय होता. त्यामुळे शेतीला पाणीपुरवठा करणे, नवीन बंधारे बांधणे, उत्तम जनावरे उपलब्ध करून देणे, उत्तम फळे व फुले झाडांसाठी लागणारे बी-बियाणे परराज्यातून मागविणे, छत्रपती शाहूंनी सातारा भागात काही ठिकाणी नारळी व सुपारी यांची लागवड केली होती.

१५. प्राचीन काळापासून भारतात दर्जेदार कापड तयार होत असे. त्या कापडाचा कारखान्यांच्या उद्योग वाढीसाठी विशेष प्रयत्न केले गेले. कापडाप्रमाणे कागदउद्योगासाठी विशेष प्रयत्न करून कागद निर्माण करण्याचे कारखाने चालू केले. मराठी राज्यात जुन्नर येथे उत्तम कागद तयार होत असे, अठराव्या शतकाच्या अखेरीस इंग्रजांनी इंग्लंडमधून चांगच्या दर्जाचा कागद आणल्यामुळे स्वदेशी कागदापेक्षा परकीय कागद बाजारात स्वस्त दरात विकला जाऊ

लागला. त्याला उत्तर देण्याकरिता मराठ्यांच्या प्रशासकीय कार्ययंत्रणेत स्वदेशीला महत्त्व दिले.

१६. आधुनिक शस्त्रास्त्रनिर्मितीसाठी स्वराज्याच्या संरक्षणाकरता व युद्ध जिंकण्यात उपयोगी पडतात हे मराठ्यांच्या पानिपतच्या युद्धाच्या वेळेस लक्षात आले होते. ही गोष्ट लक्षात घेऊन तोफा व बंदुका तयार करण्यासाठी कारखाने निर्माण केले. भारतीय कामगारांनी बंदुका व तोफा तयार करण्याची कला साध्य केली होती. पुण्यामध्ये माधवराव पेशवे यांनी तोफा तयार करण्याचा कारखाना काढला होता. ही त्यांच्यामुळे सुरुवात झाली होती. म्हणजेच आधुनिक शस्त्रास्त्रांच्या निर्मितीकरता प्रशासन गांभीर्याने विचार करून होते हे लक्षात येते.

१७. याच मराठ्यांच्या प्रशासकीय कालखंडात वास्तुनिर्मितीकडे लक्ष देण्यात आले आहे. उदा. जमिनीवरच असलेले व भक्कम तटबंदी असलेले दोन चौकी, चार चौकी, सहा चौकी, आठ चौकी ते बारा चौकी वाड्यापर्यंत वाडे, राजवाडे दगडात व लाकडात तयार करण्याकरता विशेष भर देऊन वास्तुशिल्प निर्मितीचे नवीन शास्त्रशुद्ध तंत्रज्ञान निर्माण केले (शेणोलीकर ह. श्री. व देशपांडे प्र. ना., १९९६ : ३०६).


१८. मराठा मंडळाच्या संयुक्त राज्यव्यवस्थेत राज्यांच्या सुरक्षिततेसाठी भुईकोट किल्ल्यांना महत्त्व प्राप्त झाले होते, प्रमुख गावे, शहरे यांच्या संरक्षणासाठी तटबंदी बांधण्याची कला त्याचप्रमाणे मोठ्या शहरांना जोडण्याऱ्या रस्त्यांची दुरुस्ती व त्याचे तंत्र लक्ष देऊन व विशेष माणसे नेमून उत्तम रस्ते तयार करण्यात आले. याचा अर्थ मराठ्यांच्या व संस्थानिकांच्या प्रशासकीय कार्ययंत्रणेत चांगले रस्ता बांधणीचे तंत्र निर्माण केलेले दिसते. उदा. पुणे-सासवड, पुणे-पाषाण, पुणे-आळंदी,पुणे-कात्रज इ. रस्ते चांगल्या पद्धतीने दुरुस्त केले.

१९. मराठेकालीन प्रशासकीय कार्ययंत्रणेत पाणी पुरवठ्याच्या अनेक योजना कौशल्याने व शास्त्रशुद्ध विज्ञानाचा आधार घेऊन निर्माण केलेल्या दिसतात. उदा. कात्रज घाटातील तलावाचे पाणी शनिवारवाड्यात व इतर पेठांमध्ये बंदिस्त पन्हाळीने आणण्यात आले (अग्निहोत्री द. ह., १९७७ : २२४).

इ. स. १७०७ ते इ. स. १८१८ या मराठा पेशवाई प्रशासनेच्या कार्ययंत्रणेत बरीच स्थित्यंतरे झाली.

इ. स. १७०७ ते १८१८ या काळात मराठ्यांच्या राज्यात प्रशासकीय कार्ययंत्रणेत ज्या पेशव्यांनी महाराजांच्या गादीचे मुख्यप्रधान पेशवे म्हणून राज्य केले त्यामधील झालेली स्थित्यंतरे खालील वंशावळीच्या रूपाने अभ्यास करता येईल.

८.४ पेशव्यांची वंशावळ (मक्कदुम दा., २०१४ : २३८)



या प्रशासकीय स्थित्यंतराच्या काळामध्ये सांस्कृतिक स्थित्यंतराच्या कामाची बीजे त्यात ढडली होती. हे आपण आतापर्यंत झालेल्या प्रशासकीय सुधारणांमध्ये बघितले. यानंतर म्हणजेच इ. स. १८०८ नंतर नवीन राज्यव्यवस्था चालू झाली. इ. स. १८१८ ते इ. स. १९४७ हा कालखंड हा प्रशासकीय व सांस्कृतिक तसेच या ढोघांच्या बढलामुळे स्थापत्यविषयक कामात सुद्धा बढल व स्थित्यंतरे घडत गेली. त्याचा आढावा पुढील प्रकरणात घेऊ.

८.७ सारांश : सातारा संस्थानचे छत्रपती शाहू महाराज यांच्यानंतर मराठ्यांच्या प्रशासकीय कार्ययंत्रणेमध्ये स्थित्यंतरे झाली याचा आढावा या प्रकरणामध्ये प्रामुख्याने घेतला आहे. महाराष्ट्रातील प्रशासकीय कार्ययंत्रणेतील स्थित्यंतरे या प्रबंधाचा एक महत्त्वाचा भाग असून संपूर्ण प्रबंधाच्या दृष्टीने प्रशासकीय यंत्रणेतील स्थित्यंतरे या महत्त्वाच्या भागावर अभ्यासपूर्ण प्रकाश टाकण्यात आलेला आहे. उढा. पेशवाई काळ (इ. स. १७०७ ते इ. स. १८१८) या कालखंडात झालेली पेशवाईची स्थित्यंतरे, स्थानिक ग्रामसंस्थेत झालेले बढल याचा आढावा घेण्यात आलेला आहे. पेशव्याची वंशावळ या प्रकरणात बघता येईल. इ. स. १८१८ मध्ये पेशवाई संपली व पेशव्यांकडून सत्ता इंग्रजांकडे गेली आणि सांस्कृतिक स्थित्यंतराला सुरवात झाली. याचा अभ्यास पुढील प्रकरणात केला आहे.

८.६ उपसंहार :- मराठ्यांच्या प्रशासकीय कार्ययंत्रणेमध्ये सातारा संस्थान हे प्रमुख केंद्र होते. छत्रपती थोरले शाहू महाराजांनी (छत्रपती संभाजीपुत्र) १८ व्या शतकाच्या मध्यभागी म्हणजेच इ. स. १७४० मध्ये पेशव्यांकडे सत्तेची सूत्रे सोपविल्यामुळे सत्ताकेंद्र छत्रपती जरी असले तरी त्यांचा केंद्रबिंदू पेशव्यांकडे जात होता. छत्रपती थोरले शाहूमहाराज यांचे निर्वाण होण्यापूर्वी बाळाजी विश्वनाथ व त्यांचा मुलगा पहिला बाजीराव पेशवा यांनी स्वराज्याचे रूपांतर साम्राज्यात केले होते. एवढे सर्व भारतभर पसरलेले साम्राज्य हा प्रशासकीय यंत्रणेचा कौशल्याचा भाग होता. छत्रपती घराण्यापासून चालत आलेली अष्टप्रधानमंडळ प्रशासकीय यंत्रणा कमी पडायला लागली. नवीन प्रशासकीय यंत्रणेला एवढ्या मोठया साम्राज्याचा आवाका सांभाळण्यासाठी प्रशासकीय यंत्रणेत बढल करणे आवश्यक झाले. पेशव्यांनी त्याकरीता पुण्यामध्ये शनिवारवाडा बांधला. त्यामुळे प्रशासकीय यंत्रणा काम करीत होती. भारतभर पसरलेल्या या साम्राज्याच्या महसूलीकरता शनिवारवाड्यात १७०० सरकारकुनांची नियुक्ती केली होती व एकंढर ढेशभरात त्या त्या सत्ताकेंद्रामध्ये एकंढर वीस हजार कारकुन काम करत होते. पहिल्या बाजीरावांच्या आकस्मित मृत्यूमुळे त्यांचे पुत्र नानासाहेब पेशवे हे लहान असले तरी त्यांनी मराठा मंडळातील होळकर व शिंढे यांच्या सहाय्याने चांगले राज्य केले. याच काळात पानीपतचा संग्राम झाला. पानीपतच्या संग्रामानंतर माधवराव पेशवे हे पेशवे झाले. त्यांनी कौशल्य व मुत्सद्दीपणा वापरून

इ. स. १७६३ नंतर पानीपत युद्धात झालेल्या नुकसानीची भरपाई करून शिंद्यांच्या मदतीने चौदा वर्षे दिल्लीवर राज्य केले. याच काळात दिल्लीवर मराठ्यांची सत्ता होती व भगवा झेंडा दिल्लीवर फडकत होता. अत्यंत कुशल प्रशासक असलेल्या माधवरावांनी आधुनिक शस्त्रे निर्माण करण्याकरीता कारखाना निर्माण केला होता. अत्यंत उत्साही असलेले हे व्यक्तिमत्त्व वयाच्या अठ्ठावीसाव्या वर्षी गेल्यामुळे मराठ्यांची हानी झाली व इंग्रजांना आनंद झाला. माधवरावानंतर त्यांचे बंधू नारायणराव यांना पेशवे करण्यात आले. नारायणरावांच्या काकांनी म्हणजे रघुनाथरावांनी गारद्यांच्या मदतीने नारायण पेशव्यांना अकाली ठार करण्यात आले. रघुनाथराव अत्यंत नीच वृत्तीचा होता. याचवेळी एक महत्त्वाची घटना घडली. मारल्या गेलेल्या नारायणराव पेशव्यांचा वंश पुरंदरच्या किल्ल्यात वाढत होता. तो सव्वा महिन्याचा झाल्यावर त्याला पेशवेपद देण्यात आले. शिंदे, होळकर, सखारामबापू, नाना फडणीस यांच्यासह एकंदरीत बारा मराठा सरदारांनी रघुनाथरावांचे कारस्थान धुळीला मिळविले. त्याला बारभाईंचे कारस्थान म्हणतात. या सव्वा महिन्याच्या सवाई माधवरावांच्या नावाने मराठा साम्राज्य चालू ठेवले. अठराव्या शतकाच्या अखेरपर्यंत मराठेशाही ठिक होती. एकोणीसाव्या शतकाच्या प्रारंभी लबाड रघुनाथरावांचा मुलगा दुसरा बाजीराव याच्याकडे पेशवेपद आले. त्यामुळे नाराज झालेल्या मराठा लढवय्यांनी पेशव्यांकडे दुर्लक्ष केले. संपूर्ण भारतभर पसरलेल्या मराठा साम्राज्यावर असलेली मराठ्यांची पकड ढिली झाली व याच काळात मराठ्यांची अनेक छोटी छोटी संस्थाने निर्माण झाली. उदा. ग्वाल्हेर, इंदूर, भोर, औंध, फलटण, अक्कलकोट इ. अशा रितीने मराठ्यांच्या प्रशासकीय कार्ययंत्रणेमध्ये स्थित्यंतरे होत गेली. या प्रकरणामध्ये प्रशासकीय स्थित्यंतरावर जास्त प्रकाश टाकला आहे.

प्रकरण : नऊ

संस्थानांच्या कारभारात झालेली सांस्कृतिक व स्थापत्यविषयक स्थित्यंतरे

प्रकरणाचा तपशिल

क्रमांक	तपशिल	पृष्ठ क्रमांक
प्रकरण : १	**संस्थानांच्या कारभारात झालेली सांस्कृतिक व स्थापत्यविषयक स्थित्यंतरे (इ. स. १८१८ ते इ. स. १९४७)**	**३३८**
१.१	नवीन प्रशासकीय राज्यव्यवस्था (एक स्थित्यंतर)	३४०
१.२	इंग्रजांच्या प्रशासकीय कार्ययंत्रणेमुळे झालेली सांस्कृतिक स्थित्यंतरे	३४०
१.३	सुधारकांची पहिली पिढी	३४२
१.४	स्थापत्यविषयक झालेली स्थित्यंतरे यांचा अभ्यास व संशोधनात्मक वस्तुस्थिती (इ. स. १६८० ते १९४७)	३४६
१.५	सांस्कृतिक स्थित्यंतराचा काळ	३५१
१.५.१	संगीत क्षेत्रातील स्थित्यंतरे	३५१
१.५.२	करमणूकीचे खेळ आणि खेळांमधील स्थित्यंतरे	३५२
१.५.३	साहित्यांमध्ये स्थित्यंतरे	३५२
१.५.४	राजकीय स्थित्यंतरे	३५३
१.६	सांस्कृतिक स्थित्यंतराचा संशोधनात्मक सारांश	३५६
१.७	विलीनीकरणाचा करारनामा	३५७
१.८	सारांश	३६०
१.९	उपसंहार	३६१

प्रकरण १

संस्थानांच्या कारभारात झालेली सांस्कृतिक व स्थापत्यविषयक स्थित्यंतरे

१.१ नवीन प्रशासकीय राज्यव्यवस्था (एक स्थित्यंतर)

१ नोव्हेंबर इ. स. १८१८ मध्ये आंग्लशाही भारतामध्ये चालू झाली. मुंबईच्या इलाख्यामध्ये गव्हर्नर पदी एलफिन्स्टन् या इंग्रज अधिकाऱ्याची नियुक्ती झाली (शेणोलीकर ह. श्री. व देशपांडे प्र. ना., १९७६ : ३०६). इ. स. १८१८ मध्ये त्यांच्या हुकुमतीखाली येणाऱ्या प्रदेशांचे त्याने पाच जिल्ह्यात विभाजन केले. त्यामध्ये :

१. प्रत्येक जिल्ह्यासाठी एक इंग्रज जिल्हा अधिक्षक नेमला.
२. प्रत्येक जिल्ह्यासाठी जिल्हा अधिक्षकाच्या हाताखाली दुय्यम दर्जाचे स्थानिक लोक नेमले.
३. पोलिस खात्याची उभारणी करून नागरिक संरक्षणाची व्यवस्था केली (अग्निहोत्री द. ह., १९७७ : २३३).
४. सामान्य लोकांतील अज्ञान व अंधश्रद्धा नाहीसे करण्यासाठी पुणे येथे एक विद्यालय स्थापन केले.
५. इ. स. १८२८ मध्ये भारताच्या गव्हर्नर जनरलपदी असलेल्या लॉर्ड विल्यम बेंटींग याच्या मदतीने सामाजिक सुधारणा उदा. सतीची चाल, नरबळीची चाल या अनिष्टपरंपरा कायद्याने बंद केल्या. एक अर्थाने हे सांस्कृतिक स्थित्यंतर होते (शेणोलीकर ह. श्री. व देशपांडे प्र. ना., १९७६ : ३२३).

१.२ इंग्रजांच्या प्रशासकीय कार्ययंत्रणेमुळे झालेली सांस्कृतिक स्थित्यंतरे

एकंदरीतच भारतीय राज्यव्यवस्थेमध्ये अशा स्वरूपाची स्थित्यंतरे घडत असतानाच इंग्रजांच्या काही जाचक अटींमुळे धर्मस्वातंत्र्यावर गदा येत होती. असंतोष वाढत होता.स्थानिक जिल्हाधिकारी सुधारणेच्या नावाखाली जाच करीत होते. त्यातच भर म्हणून की काय लॉर्ड मेकॅलो यांच्या शिक्षण पद्धतीमुळे इंग्रजी भाषा हे माध्यम ठेवून महाराष्ट्रातील काही विचारवंतांचा एक नवमतवादी वर्ग तयार झाला. त्यांनी सामाजिक सुधारणांचा आग्रह धरला. एकीकडे हा वर्ग तर दुसरीकडे क्रांतिकारक त्यातून याचा एक व त्यांना मदत करणारे स्वदेशाचा अभिमान राखणारे, इंग्रजांचे राज्य येथून जावे याचा सातत्याने पाठपुरावा करणारे पुढारी उदा. बाळ गंगाधर टिळक, लाला लजपतराय, बिपिनचंद्र पाल या त्रिमूर्तीने (लाल-बाल-पाल) इंग्रजांच्या ठिकठिकाणी होणाऱ्या अन्यायाविरुद्ध आवाज उठवून

त्यांच्याविरुद्ध जनमत तयार केले होते. एकंदरीतच इंग्रज अधिकारी हे खरे तर परक्या प्रांतातून येथे आलेले परंतु दुर्दैवाने स्थानिक राज्यव्यवस्था स्वतःच्या हाती घेऊन या मातीत जन्मलेल्या स्थानिक लोकांशी व पुढाऱ्यांशी अपमानास्पदरित्या वर्तणूक करीत होते. उदा. इ. स. १८८७ मध्ये आलेली आरोग्याच्या दृष्टीने हानिकारक असलेली प्लेगची साथ, की ज्या साथीमुळे स्थानिक नागरिक हैराण झाले होते. एकंदर आरोग्याच्या दृष्टीने हा ज्वलंत विषय नीट हाताळता आला असता, परंतु इंग्रज अधिकाऱ्याने या प्लेगच्या नावाखाली पादत्राणे घालून, शस्त्रे घेऊन घरांमध्ये, वाड्यांमध्ये, देवघरांमध्ये प्रवेश केला. लहान मुले व स्त्रिया यांना चुकीची वर्तणूक दिली. प्लेग झालेल्या माणसाला औषध देण्याऐवजी किंवा सार्वजनिक दवाखान्यात ठेवण्याऐवजी त्यांना घराबाहेर काढून ज्याप्रमाणे उकिरड्यावर एखादी वस्तू फेकून द्यावी, त्या पद्धतीने माणसांना त्यांनी वागविले. त्यामुळे सामान्य जनतेत चीड निर्माण झाली व त्याचे प्रत्यंतर म्हणजे चापेकर बंधूंनी पुणे प्रांतावर नेमलेल्या रँड अधिकाऱ्याला ठार केले. दामोदर, बाळकृष्ण आणि वासुदेव या तीन्ही चापेकर बंधूंना फाशी झाल्यावर त्यांच्या आईचे सांत्वन करण्याकरिता गेलेल्यांना त्यांच्या आई गोपीकाबाई यांनी असे उत्तर दिले की " पोटची तीन मुले फाशी गेली हे दुःख मला आहेच, परंतु त्याहून मोठे दुःख आहे की, मला आणखी तीन मुले पाहिजे होती, ती देखील या भारतभूमी करिता अर्पण केली असती." परिणामतः ही लाट भारतामध्ये पसरली.त्यातूनच क्रांतिकारकांचे मनोधैर्य वाढले. इ.१८८७ मध्ये घडलेली घटना जवळजवळ पुढे पन्नास वर्षे क्रांतिकारकांना प्रेरणा देत राहिली. इ.स. १९४७ पर्यंत म्हणजेच भारत स्वतंत्र होईपर्यंत मागील पन्नास वर्षांत क्रांतिकारकांचे फारच मोठे बलिदान झाले. दुसरीकडे छोट्याछोट्या सामाजिक सुधारणा करून स्थानिक उदारमतवाद्याकरिता इंग्रजी शिक्षणाच्या द्वारा आपलेसे करून घेत होते (खेर भा. द., १९९८ : १७).

इंग्रजांच्या प्रशासकीय राजवटीमध्ये भारताचा औद्योगिकदृष्ट्या विकास झाला होता. मुंबई, सोलापूर, नागपूर इ. शहरांच्या ठिकाणी कापड्यांच्या गिरण्या निघाल्या होत्या. महाराष्ट्रात व इतर प्रांतात लोहमार्ग पसरले गेले. मुंबई व गुजरात इ. ठिकाणी असलेल्या बंदरांतून परदेशांशी व्यापार चालू झाला. अशा स्वरूपाच्या उद्योगव्यवसायांमुळे लोकांना थोडाफार रोजगार मिळू लागला. त्यामुळे अर्धशिक्षित किंवा अशिक्षित तसेच शिक्षित व बहुजन समाज यांनासुद्धा छोटे-मोठे व्यवसाय, कारख्यान्यांमध्ये नोकरी, सरकारी दफ्तरांमध्ये नोकऱ्या मिळू लागल्या. याच काळामध्ये सामाजिक दोष दूर करण्याकरिता महात्मा गांधी, कोल्हापूरचे छत्रपती राजर्षी शाहू महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, महात्मा जोतिबा फुले, सावित्रीबाई फुले, सेनापती बापट, स्वातंत्र्यवीर सावरकर, महर्षी

विठ्ठल शिंदे, न्यायमूर्ती महादेव गोविंद रानडे, लोकमान्य टिळक, डॉ. हेडगेवार, संत तुकडोजी महाराज, संत गाडगे महाराज, प्रज्ञाचक्षू गुलाबराव, शेगांवचे गजानन महाराज, डॉ. भांडारकर, डॉ. मुंजे, खापर्डेकर इ. समाजसुधारकांनी व संतांनी याच काळामध्ये समाजातील दोष नाहीसे करण्याकरता महाराष्ट्र पिंजून काढला. या सर्व घडामोडींमध्ये सर्व राष्ट्र पुरुषांचा व संतांचा एक सामायिक दृष्टिकोन दिसून आला. तो म्हणजे अस्पृश्यता व जातीभेद मुळापासून नष्ट करणे व सामाजिक समरसता व एकता निर्माण करून एक सशक्त समाज निर्माण करणे व इंग्रजांना या देशातून बाहेर घालविण्यासाठी व भारताला स्वतंत्र करण्यासाठी निर्माण करत होत (सरदार गं. बा., १९६० : २९७).

१.३ सुधारकांची पहिली पिढी

इ. स. १८१७ ते इ.स. १८४७ या काळामध्ये आपण बघितले, अनेक सामाजिक व सांस्कृतिक स्थित्यंतरे झाली. या स्थित्यंतरामध्ये किंवा या सुधारणांमुळे देशातील सर्व नेते किंवा लोकमान्य पुढाऱ्यांना असे वाटायला लागले की, भारत लवकरच स्वतंत्र होऊ शकतो. या कामातील पहिले पाऊल जगन्नाथ शंकरशेठ मुरकुटे यांचे होते. त्यांनी दादाभाई नौरोजी, बाळशास्त्री जांभेकर, दादोबा पांडुरंग यांच्यासारख्या तरुण उद्योजकांना मुंबईच्या व महाराष्ट्राच्या आर्थिक व सामाजिक उत्कर्षासाठी प्रोत्साहित केले व त्यांना कार्याला उद्युक्त केले. अनेक क्षेत्रांमध्ये संस्थात्मक जीवनाचा (Institutional Mind) विकास करण्यातच आपले आयुष्य पणाला लावले. म्हणूनच ते सुधारणांचे बिजारोपण करणारे पहिले सुधारक ठरतात (शेणोलीकर ह. श्री. व देशपांडे प्र. ना., १९५६ : ३३४).

बाळशास्त्री जांभेकर यांनी स्वतःच्या जीवनात प्रचंड विविध प्रकारचे ज्ञान संपादन केले. ते भौतिकशास्त्राचे प्राध्यापक होते. लोकशिक्षणासाठी नियतकालिकांचा आरंभ त्यांनी केला. खरेतर ज्ञानदान हा त्यांचा पिंड होता. त्यांनी केलेले सर्वात मोठे कार्य म्हणजे धर्मांतराच्या शुद्धीकरणाला व विधवांच्या पुनर्विवाहाला इ. स. १८६६ मध्ये तळेकर शास्त्री, विष्णूशास्त्री पंडित व गोपाळराव देशमुख यांना घेवून पुनर्विवाह उत्तेजक मंडळ स्थापन केले. शास्त्रीय आधार शोधून काढून त्यावर ग्रंथ लिहिण्याची कामगिरी गंगाधरशास्त्री फडके यांच्याकडून करवून घेतली. त्यामुळे ते सुधारणावाद्यांचे मुकुटमणी ठरतात. तसेच दादोबा पांडुरंग तर्खडकर यांना मराठी भाषेचे पाणिनी म्हणत असत. तर्खडकरांनी मराठी इंग्रजी व्याकरणाची शास्त्रशुद्ध पुस्तके लिहून काढली. त्यांची पुस्तके पाश्चिमात्य इंग्रजीचे प्राध्यापकही वाचत असत. इंग्रजीचे ज्ञान काही सुधारकांना चांगले मिळाल्यामुळे इंग्रजी भाषेमध्ये भारतीयांविरुद्धचे मजकूर किंवा भारतीय समाजाची निंदानालस्ती करणारी इंग्रजी माध्यमे यांच्याविषयी माहिती समाजाला करून देता आली म्हणजेच शत्रूची भाषा अवगत केल्यामुळे शत्रू

आपल्याविषयी काय बोलतो, काय लिहतो, हे तर्खडकरांमुळे साध्य झाले (सरदार गं. बा., १९६० : २९७ व २९६). तसेच कृष्णशास्त्री चिपळूणकर हेसुद्धा त्या काळातील व्यासंगी पंडित होते. भारतीय संस्कृतीच्या जुन्या विद्यांचे त्यांना ज्ञान होते.नवीन आलेल्या विद्यांचे त्यांना आकलन झाले होते. त्यामुळे जुन्या व नव्या विद्यांची सांधेजोड करण्याचा प्रयत्न त्यांनी 'विचारलहरी' या नावाने पाक्षिक चालवून केला (शेणोलीकर ह. श्री. व ढेशपांडे प्र. ना., १९५६ : ३२७). त्यांनी अनेक विद्या 'मूलतत्त्व संग्रह' या पुस्तकात विपुल शास्त्रीय माहिती उत्तम शैलीमध्ये मांडून संपूर्ण महाराष्ट्रभर साहित्यिक म्हणून छाप पाडली होती. त्यांच्या विचारांचा उपयोग सामाजिक व सांस्कृतिक स्थित्यंतरांमध्ये झाला. याच काळामध्ये लोकमान्य टिळक, छत्रपती शाहूमहाराज, महात्मा फुले, सावित्रीबाई फुले इ. सामाजिक स्थित्यंतराचा किंवा सांस्कृतिक स्थित्यंतराचा प्रवाह बहुजन समाजापर्यंत पोहचवण्याचे कार्य करीत होते व त्यांना त्यात यशही मिळत होते. महात्मा ज्योतिबा फुल्यांनी सत्यशोधक समाज काढून बहुजन व मुलींसाठी शाळा काढल्या. अनाथालय काढले. विधवेला पुनर्विवाहासारख्या कामांमध्ये सक्रीय पाठिंबा दिला. इंग्रजांनी खरेतर समाजामध्ये दुफळी पाडण्याकता हिंदु-मुलसमान, ब्राह्मण-ब्राह्मणेतर असे वाद सुधारणेच्या नावाखाली अगदी व्यवस्थित नियोजन करून केल्याचे दिसते. क्रांतिकारकांचा एक वर्ग, सुधारकांचा एक वर्ग असे वेगवेगळे वर्ग लोकांच्या मनामध्ये निर्माण केले, खरेतर तत्कालीन सर्व राज्यकर्त्यांना किंवा सुधारकांना भारत स्वतंत्र व्हावा व स्वतःच्या पायावर आधुनिक तत्त्वज्ञान आत्मसात करून, धार्मिक व सांस्कृतिक भावना तशीच ठेवून त्यामध्ये सामाजिक सुधारणा घडवून दोघांचा समन्वय असावा असाच विचार होता. परंतु इंग्रज एकमेकांमध्ये भांडणे लावण्यात पटाईत होते. १८५७ च्या बंडामध्ये तात्या टोपे व झाशीची राणी लक्ष्मीबाई यांनी केलेला पराक्रम महाराष्ट्राच्या अंतःकरणात होताच. त्याचप्रमाणे त्या पराक्रमाबरोबर राजर्षी शाहू महाराज, लोकमान्य टिळक यांनी सामाजिक मनःस्थिती भारतीय संस्कृतीबद्दल आदराची व प्रेमाची राहावी याकरता केलेले प्रयत्न हेसुद्धा लोकांच्या अंतःकरणात होते. याच काळामध्ये अनेक संस्कृत ग्रंथांची भाषांतरे इंग्रज, फ्रेंच, जर्मन भाषांमध्ये झाली. त्यामुळे हिंदू संस्कृतीचे तत्त्वज्ञान संस्कृतीचे सौंदर्य व संस्कृतीचे प्राचीन शास्त्रीय ज्ञान जेव्हा पाश्चिमात्य तत्त्वचिंतकांना झाले तेव्हा पाश्चिमात्य विचारवंत थक्क झाले. याचा परिणाम असा झाला की, काही परदेशी विचारवंत व तत्त्वचिंतक यांनी भारतीय संस्कृतीची स्तुती केली व त्यामुळे भारतातील सर्व तरुणांमध्ये हिंदू संस्कृतीविषयी स्वाभिमानाची लाट निर्माण झाली. त्यामध्येच भर म्हणून की काय डॉ. भांडारकर व तेलंग या प्रभृतींनी प्राचीन शिलालेख ताम्रपट, प्राचीन ग्रंथांतील संदर्भ, प्राचीन नाणी यांच्या आधाराने प्राचीन इतिहासाची रूपरेषा तयार केली. डॉ. ह. श्री. सांकलिया व

डॉ. वि. वा. मिराशी यांनी आर्कियालॉजी (archaeology) आणि भारतीयविद्या (Indology) या विषयांमध्ये अधिक ज्ञान मिळवून भारतीय पुरातत्त्वविद्या किंवा प्राचीन भारतीय संस्कृती व ज्ञान जगापुढे आणले व एक वेगळीच घटना सांस्कृतिक स्थित्यंतरामध्ये व सामाजिक स्थित्यंतरामध्ये झाली. या ढोघांच्या व अन्य काही लोकांच्या श्रमामुळे-परिश्रमामुळे लोकांच्या मनात आपल्या प्राचीन संस्कृतीविषयी आढर वाटू लागला व अप्रत्यक्षपणे इंग्रज राज्यकर्त्यांमुळे निर्माण झालेली आधुनिकतेची लाट काही प्रमाणात ओसरली व इंग्रज सरकारच्या काही अन्यायकारक कायद्यांविषयी भारतीय मनात चीड निर्माण झाली. याचे रूपांतर व मागे काही वर्णन केलेल्या सुधारकांच्यामुळे इंग्रजांच्या विरोधात जे जनमत तयार झाले. त्यामुळे इ. स. १८७० मध्ये पुण्यामध्ये स्थापन झालेली सार्वजनिक सभा नावाची संस्था, न्यायमूर्ती रानडे यांनी स्थापन केली व सार्वजनिक महत्त्वाच्या प्रश्नासंबंधी जनजागृती निर्माण करण्याचे कार्य चालू केले. या कार्याला पुढे सनढशीर राजकीय चळवळीचे स्वरूप ढेऊन एक सनढशीर राजकारणाचा पाया न्यायमूर्ती रानडे यांनी घातला.

इ. स. १८६७ मध्ये डॉ. आत्माराम पांडुरंग यांनी समाजातील अंधश्रद्धा नष्ट करण्याच्या हेतूने

१. प्रार्थना समाजाची स्थापना केली.

२. मजुरांसाठी रात्रीच्या शाळा काढल्या.

३. ढलितांसाठी आश्रम उघडले.

४. स्त्रियांसाठी शाळा काढल्या.

७. श्रीक्षेत्र पंढरपूर येथे अनाथाश्रम नावाच्या संस्थेची स्थापना.

अशा प्रकारे सामाजिक व सांस्कृतिक स्थित्यंतरे घडत असताना भारतीयांच्या या असंतोषाला सुसंघटित करण्याच्या हेतूने इ. स. १८८७ मध्ये सर ए. ओ. ह्युम या सेवानिवृत्त इंग्रज अधिकाऱ्याने मुंबईला "राष्ट्रीय सभेची म्हणजेच कॉग्रेसची स्थापना केली" व त्याचे पहिले अधिवेशन मुंबईला घेण्यात आले. याअधिवेशनात ढादाभाई नौरोजी, न्यायमूर्ती रानडे, सर भांडारकर, फिरोजशहा मेहता इ. मान्यवर उपस्थित होते. राजर्षी शाहू महाराज व लोकमान्य टिळक यांचाही काँग्रेसला पाठिंबा होता. इ. स. १८८७ ते इ.स. १८९७ या काळात वारंवार विविध सभांद्वारे सरकारला जागृत करण्याचा प्रयत्न वरील मंडळींनी केला (अग्निहोत्री ढ. ह., १९७७ : २३६). शेवटी कंटाळून लोकमान्यांनी जहाल राजकारणाला सुरुवात केली. त्यांनी 'केसरी व मराठा' या वृत्तपत्रांद्वारे इंग्रज सरकारविरुद्ध असंतोष पसरविला. स्वराज्य हा माझा जन्मसिद्ध हक्क आहे आणि तो मिळवणारच या एका घोषणेमुळे लोकांच्या मनात ठिणगी पेटली, भारतीयांमध्ये असंतोषाचे जनक टिळक आहेत, हे इंग्रजांना पटले. सरकारने

त्यांना दोन वेळा दीर्घकाळ कारावासाची शिक्षा दिली. हिंदुधर्मातील या लोकांच्या आत्मपरीक्षणाच्या प्रयत्नांनी सर्वसामान्य भारतीयांच्या मनामध्ये आपल्या संस्कृतीबद्दल व देशभक्तीबद्दल पुनरुज्जीवन झाल्यासारखे वातावरण निर्माण झाले. महाराष्ट्रातील सुशिक्षित किंवा अशिक्षित माणसांच्या मनातील न्यूनगंड घालवून टाकला व त्यांचा स्वाभिमान जागृत करून सामान्य मनुष्याला राष्ट्रकार्याला प्रवृत्त केले. विष्णुशास्त्री चिपळूणकरांच्या 'आमच्या देशाची स्थिती' या प्रभावी निबंधामुळे आपल्या ओजस्वी भाषेने देश, धर्म व इतिहास यासंबंधीच्या दुर्मतांचे खंडन करून लोकांच्या मनातील चुकीच्या विचारांचे उच्चाटन करून त्यांनी एका प्रकारे सांस्कृतिक स्थित्यंतरांची एक मोठी कामगिरी केली. आपल्या थोर व उज्ज्वल परंपरा लक्षात घेऊन स्वकर्तृत्वाने व स्वभावनेने पेटून निर्माण झालेले सुशिक्षित व अशिक्षित तरुण ज्ञानसंपन्न व कृतिशूर होतील आणि हेच तरुण देशाला स्वातंत्र्य मिळवून देतील. याकरिता समाजसुधारणेचे प्रयत्न करणारे प्रथाकथित मवाळ नेते व जहाल मते राष्ट्राभिमानी यांनी आपापसात भांडण्यात अर्थ नाही असा स्पष्टआशय विष्णुशास्त्री यांनी समाजापुढे मांडला. याच वेळेला सत्यशोधक समाजाने राजकारण वर्ज्य करावे, असे महात्मा फुले यांनी सांगितले. त्यामुळे इंग्रजांना अप्रत्यक्षपणे पाठिंबाच मिळत होता.कारण महात्मा फुल्यांसारख्या प्रभृती राजकारणात न आल्यामुळे इंग्रजांचे फावतच होते.कारण इंग्रज सरकारला त्यांचा समोरासमोर विरोध होत नव्हता (शेणोलीकर ह. श्री. व देशपांडे प्र. ना., १९७६ : ३२८). राष्ट्रीय काँग्रेसने शेतकरी, कामकरी समाजाचे खरेखुरे प्रतिनिधित्व करावे असे महात्मा फुल्यांना वाटत होते.ही त्यांची मागणी जरी रास्त असली तरी राजकीय व्यासपीठावर येऊन इंग्रजांच्या काही कुटील धोरणांना ते विरोध करत नव्हते. त्यामुळे इंग्रजांचे काही वेळेला फावतच असे.

एकोणिसाव्या शतकाच्या इंग्रजांच्या राज्यव्यवस्थेमुळे भारतीय जनतेची आर्थिक स्थिती खालावली. लोकहितवादी यांनी शतपत्रांमध्ये उघडपणे इंग्रजांवर टीका करून त्याच्यामुळे भारतातील उद्योगधंद्यांचा व कलाकुसरांचा ऱ्हास कसा झाला. हे नमूद करून इंग्रजांच्या प्रशासकीय कार्ययंत्रणेमुळे होणारी जनतेची पिळवणूक ही दूरगामी परिणाम करणारी झाली व भारताच्या आर्थिक दुःस्थितीला इंग्रजी राजवटच जबाबदार आहे. अशा स्वरूपाचा अभ्यासपूर्ण प्रहार इंग्रजांवर केला व सामान्य जनतेला खालील पाच तत्त्वे सांगितली.

१. स्वदेशी उद्योगधंदे काढणे, वाढवणे.

२. परकीय स्पर्धेला विरोध करणे.

३. स्वदेशी मालाची निर्यात वाढवणे.

४. यंत्रविद्येचा उपयोग करणे.

७. लोकांनी स्वदेशीचा पुरस्कार करणे व जास्त जकात ढेऊन आणलेल्या पाश्चिमात्य वस्तू विकत न घेणे.

लोकहितवादींनी या तत्त्वांचा आग्रह धरला. त्याचप्रमाणे न्या. रानडे यांनी फारच मोलाची मदत भारतीय समाजाला केली. ब्रिटिशांच्या राजवटीतील काही प्रशासकीय धोरणांना त्यांनी विरोधच केला व सांगितले.

१. ब्रिटिश मालाच्या आयातीला आळा बसून एतद्देशीय उद्योगधंद्यांना संरक्षण मिळावे म्हणून संरक्षक जकातीची मागणी केली.

२. खुल्या व्यापाराच्या तत्त्वाला विरोध केला.

३. सरकारने शेतीवरील कर कमी करून भारतीय धंद्यांना प्रोत्साहन द्यावे व औद्योगिक पतपेढ्या स्थापन कराव्यात व नवीन उद्योगधंद्यांना मदत करावी. या स्वरूपाच्या मागण्या जाहिररित्या मांडून इंग्रजांच्या विरोधात एक महत्त्वाचे पाऊल उचलून लोकांमध्ये आर्थिक जागृती केली. याच काळामध्ये एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धात आगगाड्या, टपालखाते, तारायंत्रे यांच्या योगाने औद्योगिक विकासास प्रारंभ झाला होता. एकंदरीतच या काळामध्ये सांस्कृतिक व सामाजिक स्थित्यंतरे घडत होती (अग्निहोत्री ढ. ह., १९७७ : २४१) .

१.४ स्थापत्यविषयक झालेली स्थित्यंतरे यांचा अभ्यास व संशोधनात्मक वस्तुस्थिती

(इ. स. १६८० ते १९४७)

एकोणविसाव्या शतकाच्या उत्तरार्धात स्थापत्य व शिल्प या कलांचा विकास ज्याप्रमाणे भारतातील अनेक ठिकाणी आढळून आला. त्याचप्रमाणे महाराष्ट्रात आढळून आला. शिवकालामध्ये (इ. स. १६३० ते इ. स. १६८०) घर, वाडा किंवा राजवाडा बांधताना चुना, माती व लाकूड व आकाराने मोठी असलेली ढगडे यांचा वापर मोठ्या प्रमाणात झाला. ढगडाच्या भिंती मातीत किंवा चुन्यात बांधलेल्या असत व त्याची जाडी तीन फुटांपर्यंत असे. ग्रामीण भागामध्ये नैसर्गिक साधनांचा वापर करून थोड्याशा ओबडधोबड पद्धतीप्रमाणे ढगड व माती यांचा वापर करून व जंगलातील झाडांचे जुन्या वृक्षांच्या फांद्या व लाकडे त्यातल्या त्यात सरळपद्धतीने असलेली लाकडे याचा वापर करून घराला मजबुती ढेऊन गावकरी लोक घराची बांधणी करत असत. घराच्या छपराकरता कुंभाराकडून बनवलेली अर्धगोलाकार मातीची खापरे इ. गोष्टींचा वापर करून ऊन, वारा, पाऊस यांच्यापासून संरक्षण व्हावे व घरातील बायका, मुले सुरक्षित राहवी, असा प्रामुख्याने विचार करून घराची रचना केली

जात असे. गावातील काही लोकांकडेच न्हाणीघर असे व बहुतांशी लोक जवळील नदी, ओढा, तलाव याठिकाणी अंघोळीला जात असत. नैसर्गिक विधीकरता सुद्धा याठिकाणी वेगळी अशी व्यवस्था नसे. परंतु गावातील मातब्बर मंडळी हे मात्र त्यांच्या ऐपतीप्रमाणे घरातील बायकामुलींसाठी वाड्याच्या परसाकडच्या जागेत नैसर्गिक विधीकरता जागा तयार करत असत. त्याचप्रमाणे न्हाणीघर हे वाड्याच्या आतमध्ये आढळते व काही वेळेला परसाच्याकडील भागात आढळते. सांडपाण्याची व्यवस्था दोन प्रकारे आढळत होती. ढगडाची पन्हाळी करून किंवा कुंभाराकडून मातीची पन्हाळ करून लांब दूरवर खड्ड्यात सोडले जाई. राजवाड्यामध्ये त्याकाळात लाकडाचा व ढगडांचा जास्त वापर होई व ते ढगड किंवा लाकूड जास्त पैसे देऊन उत्कृष्ट कारागिरांकडून तासून घेऊन सरळ रेषेमध्ये करून वापरण्यात येई. चुना व गुळ एकत्र करून ढगडाच्या घाण्यातून घोळून घोळून मऊशार पद्धतीने चुना वापरला जाई. राजवाडे म्हणजे त्या काळातले सर्वांत मोठे घर असे. त्यांच्या चारही बाजूंनी तटबंदी चार फूट जाडीची करीत असत. याचे कारण वारंवार होणारी संस्थानिकांची, सरंजामांची, सरदारांची, सुभेदारांची आपापसांत होणाऱ्या लढाया व भांडणे यामुळे संरक्षणाची काळजी होती. साधारणतः ही स्थापत्यविषयक पद्धत शाहुमहाराजांच्या काळापर्यंत (इ.स. १७९० पर्यंत) चालू होती. छत्रपती शाहू महाराज यांच्या काळात पोर्तुगीज, फ्रेंच, डच, इंग्रज इ. परकीयांच्या व्यापाराच्या निमित्ताने सागरी मार्गाने कारागिरांची ये-जा चालू झाली. त्यामुळे त्याचा परिणाम स्थापत्यशास्त्रावरपण झाला. उदा. लोखंडाचा वापर वाड्यांच्या बांधकामात बऱ्यापैकी वाढला. लोखंड आपल्याकडे उपलब्ध होतेच, परंतु त्याचा विशिष्ट प्रकारे वापर करून वेगवेगळ्या आकारांमध्ये तयार करून दरवाजे, खिडक्या व छपरांच्या आधाराकरीता त्याचा वापर होऊ लागला. पेशवाईच्या काळात संपूर्ण भारतामधून उत्तम कारगीर महाराष्ट्रात येऊ लागले. त्याचा परिणाम वास्तुकलेवर व शिल्पांवर पडायला लागला. उत्तर भारतातून व दक्षिण भारतातून येणाऱ्या कारागिरांना महाराष्ट्र हा मध्यवर्ती वाटू लागला. त्यामुळे बांधकामाच्या शैलीवर त्याचा परिणाम दिसू लागला. उदा. उत्कृष्ट दर्जाचे लाकूड, त्याच्यावर होणारी बारीक कलाकुसर, विविध प्रकारच्या लाकडाच्या कमानी, भव्य प्रवेशद्धारे, घडवलेल्या ढगडांचे भक्कम दिसणारे व असणारे व ढगडावर कलाकुसरी असलेले, बारीक नक्षीकाम असलेले भव्यदिव्य वाड्यांची, राजवाड्यांची प्रवेशद्धारे दिसू लागली. त्यावर मोगलाईतून आलेले मुसलमान मोगल कारागीर यांच्याही कारागिरीचा परिणाम ढगडाच्या व चुन्यातून निर्माण होणाऱ्या गिलाव्यावर दिसून येऊ लागला. इ. स. १८१८ पर्यंत म्हणजे पेशवाई संपेपर्यंत संपूर्ण महाराष्ट्रात आपल्याला असे आढळेल की, स्थापत्यशास्त्रामध्ये व शिल्पशास्त्रामध्ये बऱ्याच मोठ्या प्रमाणात विकास व बदल घडून आलेले दिसतील. उदा. उत्कृष्ट

दर्जाची कलाकुसर केलेले लाकडाचे खांब, लाकडाच्या कमानी व लाकडाच्या मेघडंबरी, तुळया, छत, लाकडाचे कोरीव काम केलेले छत व एकावर एक लाकडाचे मजले चढविण्याची पद्धत, ढगडाच्या पन्हाळीच्या सहाय्याने पाण्याचा केलेला वापर त्यामुळे अनेक वाड्यांमध्ये दिसणारी पाण्याची कारंजी, त्या कारंज्याबाजूने असणारी ढगडाची कलाकुसर, वाड्याच्या अवतीभोवती असलेली व वाड्यामध्ये वापरलेले ढगड उत्कृष्टपणे तासलेले, एकमेकांत गुंतलेले, बारीक सांध असलेले किंबहुना जोडलेल्या ढगडांची सांध दिसणार नाही अशा पद्धतीने केलेले ढगडाचे बांधकाम व त्यावर असलेले बारीक नक्षीकाम, कुंभाराकडून भाजून घेतलेल्या नियोजनबद्ध, आकारबद्ध मातीच्या कौलांचा वापर यामुळे स्थापत्यशास्त्रामध्ये व शिल्पकलेमध्ये एका प्रकारे भरच पडली. परंतु ही भर म्हणजे शिवपूर्व कालापासून म्हणजे इ. स. १६३० पासून ते इ. स. १८१८ पर्यंत एकप्रकारे स्थापत्यातील स्थित्यंतरेच होती. इ. स. १८१८ नंतर पेशवाई संपल्यानंतर इंग्रजांच्या हातात राज्यव्यवहार गेला व इंग्रजी राजवट हळूहळू संपूर्ण देशभरात म्हणजे साधारणतः इ. स. १८७० पर्यंत म्हणजेच सातारा संस्थानावर इंग्रजांचे अधिपत्य येण्यापर्यंत, संपूर्ण भारतभर निर्माण झालेली संस्थाने ही उत्तरेपासून दक्षिणेपर्यंत व पूर्वेपासून पश्चिमेपर्यंत म्हणजेच दिल्लीपासून कर्नाटकापर्यंत व आसामपासून मणिपूर, गुजराथ माळवापर्यंत सर्व संस्थाने इंग्रजांच्या अधिपत्याखाली आली. एकंदरीत लहान मोठी धरून ७३८ संस्थाने इंग्रजी राजवटीखाली आली. इंग्रजांच्या राजवटीमुळे स्थापत्यावर व शिल्पकलेवर परिणामच झाला. उदा. सामान्य घर, वाडा, राजवाडा व सरकारी इमारती यांच्या वास्तुशास्त्रांवर इंग्रजांच्या आर्किटेक्चरचा परिणाम झाला. त्यामध्ये लोखंडाचा वापर जास्त वाढला. कारखान्यांची निर्मिती झाल्यामुळे कौलांच्याऐवजी लोखंडी पत्रे येऊ लागले. जमिनीच्या खालपासून ते वरच्या जमिनीवरच्या मजल्यापर्यंत लोखंडाचा मोठ्या प्रमाणात वापर वाढला. दरवाजे, खिडक्या व मुख्य दरवाजा यामध्ये कारखान्यांमध्ये तयार केलेले लोखंडाचे अवजड सामान वापरण्यात येऊ लागले. पूर्वी दरवाजे, खिडक्या, तुळयांसाठी व छतासाठीसुद्धा लाकडाचा वापर करण्यात येत असे. या इंग्रजांच्या राजवटीमुळे लाकूड व लोखंड यांचा वापर करून मोठमोठ्या सभागृहांची निर्मिती होऊ लागली. काचेची मोठी झुंबरे येऊ लागली. स्फटिकांचा वापर केलेली आकर्षक, मोठी व शोभिवंत काचेची झुंबरे राजवाड्यांमध्ये व साध्या वाड्यांमध्ये दिसू लागली. विसाव्या शतकाच्या पूर्वार्धात सिमेंटचा वापर दिसू लागला. म्हणजे साधारणतः इ. स. १९०० ते इ. स. १९५० या काळात जमिनीच्या खाली पायाभरणीपासून ते जमिनीवरच्या वरच्या मजल्यापर्यंत सिमेंट व लोखंड त्याचप्रमाणे नदीतील वाळू (Sand) व खडी (ढगडाचे लहान तुकडे) यांच्या मिश्रणाचा (१:२:४) या पद्धतीने वापर करून म्हणजेच एक पोते सिमेंट

असेल तर दोन पोती वाळू व चार पोती खडी या प्रमाणात मिश्रण तयार करून इमारतीचा सांगाडा उभा करीत असत (अग्निहोत्री द. ह., १९७७ : २५८). या पद्धतीमुळे लाकडाच्या खांबाऐवजी काँक्रीटचे कॉलम, लाकडाच्या तुळ्यांऐवजी काँक्रीटचे बीम व लाकडाच्या छताऐवजी सिमेंटचे छत दिसू लागले. यामुळे लाकडाचा व दगडांचा वापर कमी होऊ लागला. सांडपाण्याच्या व्यवस्थेसाठी दगडाच्याऐवजी काँक्रीटच्या नळ्या वापरण्यात येऊ लागल्या. खरेतर भाजलेल्या मातीच्या विटांचा उपयोग उपलब्ध आपल्या भारतामध्ये इ. स. पूर्व ३००० पासून म्हणजेच गेली ५००० वर्षे भाजलेल्या मातीच्या विटांचा वापर विविध आकारांमध्ये परंपरागत भिंती बांधण्याकरिता होत होता. तसाच याच काळामध्ये साधारणतः ०.२३ X०.१५X०.१० मी अशा आकाराच्या स्वरूपाच्या विटांचा वापर भिंती बांधण्यासाठी करून भक्कमपणा येण्याकरता केला जाऊ लागला. गिलावा (प्लॅस्टर) करण्याच्या पद्धतीमध्येसुद्धा स्थित्यंतरे घडतच गेली. अगदी शिवपूर्व काळापासून घट्ट कालवलेल्या बारीक लाल मातीचा वापर गिलाव्यासाठी व सांधा भरण्यासाठी होत असे. हळूहळू त्यामध्ये बदल होऊन मातीच्या ऐवजी दगडाच्या घाण्यात घोळलेला बारीक चुना व गूळ यांचे मिश्रण भिंतीवर गिलावा म्हणून वापरण्यात येत असे. गिलाव्याचा थर समान जाडीचा यावा याकरता लाकडाचा वापर गिलावा पसरण्यासाठी होत असे. गुळामुळे एक प्रकारचा विशिष्ट चिकटपणा येऊन चुन्याबरोबर केलेल्या त्याच्या मिश्रणाने कित्येक वर्षे गिलावा तग धरून असे. या गिलाव्यामुळे भिंतींना भक्कमपणा व एकसंधपणा येत असे व त्यावर काही कारागीर लाकडावरच्या कमानीसारखे दिसणारे नक्षीकाम गिलाव्यावर काढत असत. नंतर ज्यावेळी सिमेंटचा वापर होऊ लागला, त्यावेळेला सिमेंट व नदीकाठची बारीक वाळू यांचे १:४ या प्रमाणात मिश्रण करून आतून व बाहेरून गिलावा केला जाऊ लागला. बाहेरून केलेल्या सिमेंटच्या गिलाव्यामुळे पावसाचे पाणी आत येत नाही या गुणधर्मामुळे सिमेंटचा वापर जास्त होऊ लागला. एकंदरीतच स्थापत्यावर म्हणजे विविध प्रकारच्या बांधकामावर या स्थित्यंतराचा प्रभाव दिसू लागला. विसाव्या शतकाच्या पूर्वार्धामध्ये विविध प्रकारची विकासाची कामे इंग्रजांनी भारतातीलच कामगार वापरून नदीचे पाणी अडविण्यासाठी छोटे बंधारे, मोठ्या नदीचे पाणी अडविण्याकरीता धरणे, नदीचे पाणी एका तालुक्यातून दुसऱ्या तालुक्यात नेण्याकरिता व एका जिल्ह्यातून दुसऱ्या जिल्ह्यात नेण्याकरिता सिमेंटचे कालवे, दगडाचा वापर करून बांधले. नदीवरचे पूल बांधण्याकरिता सिमेंट, दगड व लोखंड यांचा भरपूर प्रमाणात वापर करून पूल बांधण्यात आले. त्याचप्रमाणे इंग्रजांनी स्थानिक संस्थानिकांना हाताशी धरून उदा. सातारा, कोल्हापूर, भोर, औंध, फलटण, नागपूर, अक्कलकोट, मिरज, सांगली येथे शैक्षणिक इमारती बांधल्या. इ. स. १८५७ साली हिंदूस्थानात मुंबई, कलकत्ता, मद्रास ही तीन विद्यापीठे होती,

१९१३ मध्ये अभ्यासक्रमाचे पुनरावलोकन करण्यात आले. १९४८ मध्ये पुणे विद्यापीठाची स्थापना करून पदवीधरांचे अभ्यासक्रम चालू केले. अशा प्रकारे उच्च शिक्षणाचा पाया घातला गेला (सरदार गं. बा., १९६० : ७७).

यामध्येसुद्धा ढगड, लोखंड, सिमेंट व उत्कृष्टदर्जाची मातीची कौले यांचा वापर केला. स्थानिक संस्थानिकांना आधुनिक शस्त्रे खरेदी करायला लावली व त्याचा वापर स्वतःचे राज्य बळकट करण्याकरिता केला. संस्थानिकांनी मात्र स्वधर्माचे पालन करून भारताशी एकनिष्ठ राहून इंग्रजांच्या धाकामुळे इंग्रजांच्या प्रशासकीय राज्यव्यवस्थेला मनाविरुद्ध का होईना मदत केली. एकंदरीतच या प्रशासकीय व सांस्कृतिक व स्थापत्यविषयक स्थित्यंतरामध्ये भारतात व महाराष्ट्रात जरी बदल घडत असले तरी दुसऱ्या बाजूला जहाल देशभक्तांना इंग्रजांच्या सुधारणेच्या काळामध्ये देशामध्ये पारतंत्र्य मनात सलत होते. त्यातूनच क्रांतिकारक निर्माण होत होते. काही ठिकाणी तर इंग्रजांनी आधुनिक सुधारणांच्या नावाखाली हिंदूस्थानातील धार्मिक श्रद्धांना हात घातला. सामाजिक सलोखा बिघडवला.उदा.

१. इ. स. १८७७ चे स्वातंत्र्य समरामध्ये क्रांतिकारक मंगल पांडे यांनी इंग्रजांना आव्हान का दिले तर गाईच्या चरबीची काडतुसे त्यांना वापरावी लागली. त्यामुळे असंतोष पसरला.

२. १८९७ प्लेगची साथ आली. एखाद्या घरात प्लेगचा रोगी आहे समजले की, इंग्रज सैनिक त्या घरामध्ये घुसत असत व घर निर्जंतुक करण्याच्या नावाखाली पायातील बूट घालून मुद्दाम स्वयंपाक व देवघरात जाऊन स्वयंपाक घरातील अन्न, देवघरासकट देव घराबाहेर फेकत असत. प्लेगचा रोगी बघण्याकरिता इंग्रजी डॉक्टर घराबाहेरच्या ओट्यावर येऊन मुद्दाम कपडे काढावयास लागत असत. काखेत व मांडीवर कुठे प्लेगची गाठ आहे, हे बघण्याकरिता पुरुषांचे सर्रास कपडे उतरविले जात असत. त्याचप्रमाणे अत्यंत अपमानास्पद माता-भगिनींची चोळी उतरवून व लुगडे वरती करून तपासण्या उघड्यावर केल्या जात असत. आपल्या आप्तांच्या अब्रूचे धिंडवडे डोळ्यादेखत समाजाने बघितले. 'सुधारक' हे नेमस्त साप्ताहिक. इंग्रजांच्या सैनिकांच्या बेगुमान वर्तनामुळे तेही चिडले (उदास शाम, १९९८ : ६३). त्यांनी १२ एप्रिल १८९७ च्या अंकात असे लिहिले आहे की, "इंग्रजांचे इतके दिवस चोळीवर भागत होते, पण आता बायकांच्या अंगावर हात टाकण्यापर्यंत मजल येऊन ठेपली आहे. इतके सारे प्रकार रोज घडत असून आमचे लोक अजूनही शांतच, खरोखरच आमच्या लोकांसारखे नामर्द लोक पृथ्वीच्या पाठीर कोठेही सापडणार नाहीत, असे मोठ्या शरमेने कबूल केले पाहिजे." इंग्रजांच्या या कृत्यामुळे सामाजिक व्यवस्थाच ढासळून गेली होती. लोकमान्य टिळकांनी आपल्या निखाऱ्यासारख्या

शब्दांनी चाफेकरांना पेटविले व म्हणाले,'भाषणे करणाऱ्यांना तुम्ही षंढ म्हणता मग ज्याच्यापाशी पौरूष आहे, त्यांनी रँडला कसे जिवंत ठेवले.' चापेकरांनी त्याच वेळेला ठरवले की आपण असे काहीतरी करून दाखवू की ज्यामुळे मुंबईपासून कलकत्त्यापर्यंत आणि कलकत्त्यापासून लंडनपर्यंत भूकंपासारखा हादरा बसेल आणि चापेकरांनी २२ जून १८९७ ला रँडला ठार केले. चापेकर बंधूंच्या या बलिदानाने त्यांच्या सर्वस्वाची होळी झाली व क्रांतिकारकांना त्यांच्या स्फूर्तिदायी बलिदानातून नवीन मार्ग मिळाला. लोकमान्य टिळकांवर अभियोग चालवून दीडवर्षांची सश्रम कारावसाची शिक्षा इंग्रजांनी ठोठविली. चापेकर पर्वातील या घटना इतक्या प्रक्षोभक होत्या आणि त्यांचे बलिदान एवढे स्फूर्तिदायी होते की, त्यामुळे हिंदुस्थानातील क्रांतिकारकांच्या मनात विशेषतः तरुण क्रांतिकारकांच्या मनात स्वातंत्र्यलालसेची ज्योत पेटविली गेली. विनायक दामोदर सावरकर हे त्यावेळी सोळा वर्षांचे होते. चापेकर बंधूंपासून त्यांनी स्फूर्ती घेतली. देशात व परदेशात त्यांनी क्रांतिकारक तयार केले. देशभरात अशा अनेक ठिकाणी सुधारणांच्या नावाखाली सामाजिक व धार्मिक सलोखा बिघडवून टाकला व हेच इंग्रजांच्या भारत देश सोडून जाण्याचे कारण ठरले.

१.७ सांस्कृतिक स्थित्यंतराचा काळ

१.७.१ संगीत क्षेत्रातील स्थित्यंतरे

या स्थित्यंतराच्या काळामध्ये संगीत व कला यामध्ये स्थित्यंतरे झाली. संगीत, कला, करमणुकीचे खेळ यामध्ये झालेली स्थित्यंतरे :- उदा. यादवकालीन महाराष्ट्रामध्ये राजा सिंघण यादवाच्या कारकिर्दीत 'संगीत रत्नाकर' हा ग्रंथ लिहिला गेला. अल्लाउद्दीन खिलजीने महाराष्ट्रावर केलेल्या स्वारीच्या वेळी गोपालनायक नावाचा संगीतशास्त्रज्ञ होता. त्याला अल्लाउद्दीनने जबरदस्तीने आपल्याबरोबर दिल्लीस नेले, त्याच्याबरोबर संगीतशास्त्राचे बारकावे समजून घेऊन 'आमीर खुश्रुने' ख्याल गायन पद्धती विकसित केली. महानुभाव साधू दामोदर पंडीत याने अनेक हिंदी पदे चौदाव्या शतकात रचून संगीताला वेगळेच वळण दिले, 'पुंडलिक विठ्ठल' नावाच्या कवीने संगीतशास्त्रावर चार ग्रंथ सोळाव्या शतकात लिहिले. पुढे मराठे व पेशवे यांच्या राजवटीत शाहिरी कवनांना प्रतिष्ठा प्राप्त झाली. इ. स. सतराव्या व अठराव्या शतकात हे सर्व घडले. एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धात महाराष्ट्रात संगीताची उपासना होऊ लागली. उदा. इ. स. १८७४ मध्ये ब. त्र्य. सहस्त्रबुद्धेयांनी गायन समाजाची स्थापना केली. विसाव्या शतकात संगीत शास्त्र व गायन उपासनेमध्ये विकास झाला. उदा. भातखंडे, बखले, पलुस्कर, बालगंधर्व इ. नामांकित गायकांनी महाराष्ट्राच्या संगीताला नवीन वळण दिले. याच काळात विसाव्या शतकाच्या

उत्तरार्धात युरोपीय संगीत भारतात रुजू लागले. इ. स. १६७० ते इ. स. १९५० पर्यंत म्हणजेच शिवकाल, मराठाकाळ, पेशवेकाळ, इंग्रजकाळपर्यंत अशा प्रकारे एका सामान्य कवीपासून ते युरोपीय संगीत येईपर्यंत अशी स्थित्यंतरे झाली (अग्निहोत्री ढ. ह., १९७७ : २४४).

१.५.२ करमणुकीचे खेळ आणि खेळांमधील स्थित्यंतरे

महाराष्ट्राच्या ग्रामीण भागात हुतूतू म्हणजेच कबड्डी, आट्यापाट्या, खो-खो, लंगडी, लगोरी, सुरूपारंबी इ. खेळ प्रचलित होते. याच खेळांची जागा हळूहळू बढलून फुटबॉल, क्रिकेट, हॉकी, टेनिस, गोल्फ हे पाश्चिमात्यांचे खेळ हळूहळू लोकप्रिय झाले. विसाव्या शतकाच्या पूर्वार्धात व्हॉलीबॉल, बेसबॉल, बास्केटबॉल, बॅडमिंटन, टेबलटेनिस इ. पाश्चिमात्य खेळही लोकप्रिय झाले. खेळामधील ही स्थित्यंतरे शहराप्रमाणे खेड्यातही झाली होती. ही स्थित्यंतरे म्हणजेच खेळ संस्कृतीमध्ये झालेले सांस्कृतिक स्थित्यंतर.

१.५.३ साहित्यांमध्ये स्थित्यंतर

मुद्रण कलेच्या सोयीमध्ये या काळामध्ये साहित्याचे स्वरूप बढलत गेले. लोकांच्या गरजा बढलल्या. भूगोल, इतिहास, भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र या विषयांची अनुवादीत व रूपांतरित पुस्तके निर्माण झाली. ढाढोबा तर्खडकर (१८१४ ते १८२२) यांनी इंग्रज व्याकरण लोकांच्या समोर आणले (शेणोलीकर ह. श्री. व ढेशपांडे प्र. ना., १९५६ : ३३५) .

त्यामुळे अनेक इंग्रजी पुस्तके स्थानिक लोकांनी लिहिली. परढेशी इंग्रजी माध्यमांची अनेक पुस्तके भारतात आल्यावर लोकशाही कल्पनांचा विस्तार वाढतच गेला. त्यामुळे अनेक नियतकालिकांची निर्मिती झाली व स्वातंत्र्यांच्या उद्दिष्टांना व कार्यक्रमांना एक वेगळे व्यासपीठ तयार झाले. सामाजिक प्रश्नांना व राजकीय प्रश्नांना वेगळेच वळण मिळाले. लोकांच्या संघर्षाला एक वेगळीच पातळी प्राप्त झाली. या इंग्रजी भाषेच्या ज्ञानामुळे व मुद्रण कलेतील प्रगतीमुळे भारतीय लोकांना म्हणजेच राजकीय पुढाऱ्यांना, समाजसुधारकांना इंग्रजांवर इंग्रजीत टीका करण्याकरिता साधनच मिळाले व त्यामुळे भारतीय विचारवंतांचे इंग्रजी एवढे प्रगल्भ झाले की, इंग्रजीमधील परढेशी लोकांना, भारतावर इंग्रज कसे अन्याय करतात हे सांगण्यास मोठे शस्त्रच मिळाले. इंग्रज भाषा व मुद्रण कला याच्या स्थित्यंतरामुळे इंग्रजांनी स्वतःच्या पायावर धोंडाच मारून घेतला. ढेशाभिमान असलेले विचारवंत व क्रांतिकारक यांनी या इंग्रजी शिक्षणाचा सर्रास वापर करून इंग्रजांच्या चुका त्यांना ढाखवून ढिल्या व त्यांना नामोहरम केले. एकंढरीत आपण स्वातंत्र्याच्या जास्त जवळ गेलो. मुद्रण कलेमुळे ज्ञानप्रकाश, विविध ज्ञान विस्तार, सद्धर्म ढिपिका, प्रभाकर, ढर्पण, ज्ञानसिंधू इ.

नियतकालिकांतून लोकांमध्ये जागृती करू लागले (अग्निहोत्री ढ. ह., १९७७ : २४१). एकोणिसाव्या व विसाव्या शतकातील साहित्यिकांनी ज्ञान, विचार, स्फूर्ति लोकांना जोमाने देऊन नव्या संस्कृतीच्या घडणीसाठी महाराष्ट्राला संपन्नता व सुधारणा दिली. हेच एक प्रकारे साहित्यिक, सांस्कृतिक स्थित्यंतर होते.

सांस्कृतिक स्थित्यंतराबरोबरच स्त्री-पुरुषांचे पोषाख व राहणीमान बढलले. सामान्य मनुष्याचा पोषाख धोतर, सदरा व त्यावर कोट व काळी टोपी (आतून पुठ्ठा लावलेली)असे. शास्त्री व पंडित पगड्या घालीत, हे घालणारे महाराष्ट्रीयन तरुण जेव्हा सरकारी नोकरीत लागले तेव्हा त्यांच्यांमध्ये पोषाखात स्थित्यंतर झाले. उढा. सरकारी अधिकारावर असलेले लोक शर्ट, पॅन्ट त्यावर इंग्रजी कोट, टाय, पायात बूट-मोजे घालीत. स्त्रियांच्या पोषाखात विशेष बढल झाला नाही. परंतु इ. स. १८३२ मध्ये सतीची चाल बंढ झाली. बालविवाह हळूहळू कमी होत गेले. विधवांच्या विवाहाला कायद्याने मंजुरी मिळाली. स्त्रियांनी शिक्षण घ्यावे याचा प्रचार व पुरस्कार होऊ लागला. इत्याढी स्थित्यंतरे माता-भगिनींच्या जीवनात घडली.

१.५.४ राजकीय स्थित्यंतरे

सांस्कृतिक स्थित्यंतराचा विचार करता आपण पाहिले सर्व प्रथम शिवपूर्वकाल, शिवकाल, संभाजीकाल, राजारामकाल, महाराणी ताराबाईकाल, छत्रपती थोरले शाहुकाल, पेशवेकाल, इंग्रजकाल अनुक्रमे इ. स. १६३०-१६८०, इ. स. १६८० ते १६८९, इ. स. १६८९ ते १७००, इ. स. १७०० ते १७०७, इ. स. १७०७ ते १७४९, इ. स. १७४९ ते १८१८, इ. स. १८१८ ते १९४७ अशा प्रकारे राजकीय स्थित्यंतरे झाली हे आपण पाहिले. इंग्रजांच्या काळ म्हणजे संस्थानिकांचा काळ म्हणून ओळखला जातो. एकंढर भारतामध्ये ७३८ संस्थाने होती. ही सर्व संस्थाने कमी-जास्त प्रकारात इंग्रजांच्या अधिपत्याखाली काम करीत होती (शर्मा रा., १९२८ : २६). लोक सशस्त्रक्रांतीचे पुरस्कर्ते झाले तर काही लोक सनढशीर मार्गाचे पुरस्कर्ते झाले. विसाव्या शतकाच्या पूर्वार्धात महाराष्ट्रातील राजकीय आंढोलनात लोकमान्य टिळकांचे वर्चस्व होते. स्वराज्य हा माझा जन्मसिद्ध हक्क आहे आणि तो मी मिळवणारच. या उद्घोषणामुळे उच्च ध्येयाचे लोण समाजातल्या सर्व थरात सामान्यांपर्यंत पोहोचवले. अत्यंत कुशाग्र बुद्धीने व कळकळीने या वाक्याचा उपयोग करून स्वबळावर स्वराज्य मिळवण्यासाठी स्वढेशी, स्वभाषा, स्वधर्म व स्वराज्य या चतु:सूत्रीचा पुरस्कार (अग्निहोत्री ढ. ह., १९७७ : २५१). अशा पद्धतीने लोकांच्या समोर मांडला की, त्यामुळे इंग्लंडवरून व परढेशातून होणारी मालाची आयात जवळजवळ थांबवली. भारतातून परढेशात जाणारा पैशाचा ओघ थांबवला. त्यामुळे इंग्रज आर्थिकदृष्ट्या

जेरीस आले. या कारणामुळे इंग्रजांच्या मनात टिळकांविषयी राग होता. १९२० पर्यंत लोकमान्य टिळक होते. त्यानंतर महात्मा गांधींकडे भारतीय चळवळीचे नेतृत्व गेले. अहिंसात्मक सत्याग्रह व इंग्रजांच्या अन्यायी कायद्यांचा सविनय कायदेभंग करणे या दोन प्रमुख धोरणांमुळे सामान्य लोकांपर्यंत स्वातंत्र्याची चळवळ पोहोचली व सहभाग वाढला. स्वराज्य प्राप्तीसाठी महात्मा गांधींनी केलेला मिठाचा सत्याग्रह, जंगल सत्याग्रह, दांडीमार्च इ. चळवळींमध्ये तरुणांचा सहभागसुद्धा त्यांनी वाढवला. शाळा, कॉलेज बंद पडून तरुण मुले, मुली सत्याग्रहात सहभागी होऊ लागली. संपूर्ण भारतभर सत्याग्रहींची संख्या लाखाच्यावर होती. बारडोली येथे लोकांनी शेतसारा देण्याचे नाकारले. ही चळवळ संपूर्ण भारतात पसरली. हे सर्व १९२० ते १९३९ या एकोणीस वर्षांच्या कालखंडात झाले. १९३९ साली युरोपात दुसरे महायुद्धभडकले. इंग्रज त्यामध्ये गुंतले होते. या संधीचा फायदा भारतातील धूर्त व बुद्धिमान राजकारणी सुभाषचंद्र बोस यांनी घेतला. ते भारतातून वेशांतर करून जर्मनीत गेले व जपान सरकारच्या साहाय्याने आझाद हिंद फौज ब्रह्मदेशात उभारली. याच काळामध्ये १९४२ साली 'भारत छोडो' आंदोलन उग्र झाले होते. त्याकाळी भारताचे व्हाईसरॉय माऊंट बॅटन यांनी इंग्लंडला असे कळविले की, भारतासारख्या अफाट विस्तीर्ण देशामध्ये काश्मीरपासून कन्याकुमारीपर्यंत व मुंबईपासून कलकत्यापर्यंत इंग्रजी फौजा वाढवाव्या लागतील किंवा तैनात कराव्या लागतील या व्हाईसरॉयच्या सूचनेचा इंग्रजांनी गांभीर्याने विचार केला व व्हाईस रॉयला असे कळविले, दुसऱ्या जागतिक महायुद्धामध्ये आपण मेटाकुटीस आलो आहोत व यंत्रणा मोडकळीस आली आहे त्यामुळे भारताला स्वातंत्र्य देऊन टाकावे, अशी शिफारस केली. नेमके याच वेळी इंग्लंडमध्ये हुजूर मंत्रिमंडळ जाऊन मजूर मंत्रिमंडळ सत्तारूढ झाले व त्यांनी भारताला स्वातंत्र्य देण्याच्या ठरावास संमती मिळाली. सरदार वल्लभभाई पटेल, महात्मा गांधी, पंडीत नेहरू यांच्या हाती देश सोपविताना भेदनीतीचा अवलंब केला व इस्लाम धर्मीयांच्या हिताचे रक्षण करण्याचे निमित्त करून भारताचे विभाजन केले व पाकिस्तान निर्माण केले. कायमची डोकीदुखी निर्माण करून इंग्रज येथून निघून गेले.

सरदार पटेलांनी भारतातील सर्व संस्थाने, संस्थानिकांची भेट घेऊन नवीन निर्माण झालेल्या भारताच्या राज्यव्यवस्थेत विलीन करून टाकली. संस्थाने दि. ८ मार्च १९४८ साली भारतात विलीन झाली (देशमुख वि., २००४ : ७६). इंग्रजांच्या या एकंदर राजव्यवस्थेमुळे व त्यांनी आणलेल्या शिक्षणपद्धतीमुळे फक्त महाराष्ट्रातच नव्हे तर संपूर्ण भारतात संस्कृती ढवळून निघत होती. तिचे स्वरूप थोडेसे अस्थिर होत होते. पाश्चिमात्य भौतिक विज्ञानाच्या प्रगतीने झालेल्या आर्थिक समृद्धीने सामान्य मनुष्य दिपून गेला होता व गोंधळून गेला होता. न कळतच सर्व बाबतीत पाश्चिमात्यांचे अनुकरण होऊ

लागले. नित्याच्या भाषेत अनेक इंग्रजी शब्द रूढ होऊ लागले. हे लोण शहरापासून खेड्यापर्यंत पोहचले होते. पोशाख, केशरचना, वास्तुशिल्प, खेळ, शिष्टाचार इ. अनेक बाबतींत स्थित्यंतरे घडत गेली. याचे सर्वांत मुख्य कारण म्हणजे ढळणवळणाची साधने उपलब्ध झाली असून जणू जग लहानच झाले आहे. जगाच्या विरुध्द टोकाची बातमीसुद्धा काही मिनिटांत पोहचत असे, त्याचाही परिणाम सामाजिक संस्कृतीवर झालेला आढळतो. जेव्हा खाद्यतेलाच्या उत्पादनासाठी, कापड्यांसाठी व इतर दैनंदिन लागणाऱ्या वस्तू निर्माण करण्यासाठी यंत्रघाण्या, यंत्रउद्योग निघाले. परिणामतः परंपरागत हस्तोद्योग नष्ट झाले. उदा. तेली, सुतार, लोहार, विणकर, कातकरी, शेतकरी, मालाचे ने-आण करणारे कुशल कारागीर इ. सर्व निरूद्योगी झाले. आपला स्वतःचा परंपरागत उद्योग कालबाह्य झाल्याप्रमाणे वाटू लागला. कारखान्यामध्ये एकत्र काम करणाऱ्या स्त्री-पुरुषांमुळे कौटुंबिक व्यवस्था बिघडली. आंतरजातीय विवाह होऊ लागले. यामध्येच भर म्हणून की काय, चित्रपटसृष्टीच्या माध्यमानेही या विचारांना खतपाणी घातले व एका वेगळ्याच प्रकारचे सांस्कृतिक स्थित्यंतर झाले. काळाची गरज म्हणून की काय जाती-भेदपणा व अस्पृश्यता एक मनुष्य विकार पुष्कळ प्रमाणात सौम्य झाले. एकत्र कुटुंब पध्दती बहुतांशी नष्ट झाली. सामान्य जनांच्या जातीधर्माच्या उदासीनतेमुळे संस्कृतीमध्ये झपाट्याने स्थित्यंतरे झाली (अग्निहोत्री ढ. ह., १९७७ : २७९).

एकंदरीतच शासनाने अन्न, वस्त्र, निवारा व संस्कार हे सामान्य जनांना देण्याची जबाबदारी त्या-त्या काळच्या शासनाची असते. प्रत्येक क्षेत्रातील विषमता नष्ट व्हावी असाच विचार शासनाचा असावा लागतो. त्याप्रमाणे शासन प्रयत्नपण करते. कोणत्याही शासनाला असेच वाटते की सामान्य जनांचे सुख हे अर्थार्जनावर अवलंबून असते. परंतु कालांतराने हा विचारही चुकीचा ठरला. समाजातील थोर विचारवंतांना व शासनातील आर्थिक योजना राबविणाऱ्यांना असे दिसून आले की, सामान्य जनांचे सुख माणसाच्या आर्थिक विकासावर अवलंबून नसून आध्यात्मिक विकासावर अवलंबून आहे. शासनाने अनेक प्रकारे सामान्य लोकांसाठी सुविधा निर्माण केल्या. सर्व प्रकारच्या प्राथमिक गरजा तसेच उत्तम सुखसोयींच्या गरजासुद्धा पुरविल्या तरीसुद्धा मनुष्य सुखी नाही हे, लक्षात आले म्हणूनच शासन व विचारवंत या निकषावर पोचले की, आर्थिक विकासाने मनुष्य सुखी न होता, आध्यात्मिक विकासानेच सुखी व समाधानी होईल. मागील शतकात स्वामी रामकृष्ण परमहंस, स्वामी विवेकानंद, स्वामी रामतीर्थ, योगी अरविंद, तुकडोजी महाराज, विनोबा भावे, प्रज्ञाचक्षु गुलाबराव महाराज माधान अमरावती, परमपूज्य गोंदवलेकर महाराज, गोंदवले, स्वामी समर्थ महाराज, अक्कलकोट, गजानन महाराज, शेगांव व साईबाबा महाराज, शिर्डी शंकर महाराज इ. संतांनी जाणीवपूर्वक सामान्य जनांच्या

दैनंदिन जीवनात आध्यात्मिक विकास करण्याचा विचार केला, परंतु पाश्चिमात्य भौतिक शिक्षणामुळे धुंद झालेल्या लोकांनी या थोर लोकांच्या लहान-सहान दोषांवर बोट ठेवून त्यांच्या उपदेशापासून सामान्य लोकांना जाणीवपूर्वक दूर ठेवून त्यांचा बुद्धिभेद केला. त्यामुळे सामान्यजनांमध्ये सांस्कृतिक स्थित्यंतरे झाली.

१.६ सांस्कृतिक स्थित्यंतराचा संशोधनात्मक सारांश

विज्ञान व तंत्रज्ञान यांच्या अभ्यासाने यंत्र चलित उद्योगाने ऐहिक सुख प्राप्त होते. सामान्यजनांना ऐहिक सुखाचे आकर्षण मूळतः असते. यामुळेच सामान्यजन औद्योगिक क्षेत्राकडे वळले. त्यामुळे सांस्कृतिक व सामाजिक स्थित्यंतराला सुरुवात झाली.

१. औद्योगिक क्रांतीमुळे जातीधर्म व्यवस्था निरुपयोगी ठरली आणि म्हणूनच जातीयता व अस्पृश्यता नष्ट व्हावी, हे तत्त्व सामान्य लोकांना मान्य झाले. म्हणजेच सांस्कृतिक स्थित्यंतरे झाले.

२. दोन भिन्न सांस्कृतिक एकत्र आल्यास नवीन संस्कृतीच्या बाह्यांगाचे अंधानुकरण झालेले दिसते. त्यामुळे पोशाख, विद्याभ्यास व सामाजिक रितीभाती यांचे अनुकरण होऊ लागले. सामान्य लोकांचा हा न्यूनगंड घालविण्यासाठी व रोखण्यासाठी अनेक देशभक्त व संस्कृती अभिमानी लोकांनी ही पाश्चिमात्यांची लाट रोखण्याकरिता प्रयत्न केले.

३. पाश्चिमात्यांच्या निकट संपर्कामुळे लोकशाही राज्यव्यवस्था ही राष्ट्राच्या सर्वांगीण विकासाकरिता अपकारक असते. हे तत्त्व मान्य झाले.

४. जलद वाहतुकीची साधने उपलब्ध झाल्यामुळे भिन्न संस्कृतीच्या लोकांशी निकट संबंध प्रस्थापित झाला. आपल्या संस्कृतीची तुलना इतर संस्कृतीशी केली जाऊ लागली. त्यामुळे त्याज्य रूढी टाकून देऊन उदा. सतीची चाल, बालविवाह, विधवा विवाह, स्पृश्य-अस्पृश्यता, विषम जातीव्यवस्था इ. निरुपयोगी प्रथा टाकून देण्याचे लोकांच्या मनात आले. म्हणजेच स्वसंस्कृतीतील वाईटपणा टाकून देऊन दुसऱ्या संस्कृतीतील चांगले असेल, ते घेण्याची मानसिकता म्हणजेच सांस्कृतिक स्थित्यंतर झाले.

७. गेल्या ३०० वर्षांत जगात प्रचंड घडामोडी झाल्या. राजकीय क्षेत्र, आर्थिक क्षेत्र व सांस्कृतिक क्षेत्रात मूलगामी स्थित्यंतरे घडून आली. वेगवेगळे विचार, संप्रदाय पुढे आले. नवसमाज निर्मितीच्या प्रत्येक प्रयोगाच्या वेळी त्याकडे जग मोठ्या उत्सुकतेने व आशेने बघत होते. परंतु निराशाच पदरी आली. पण जन्मसिद्ध, उच्चनीच भाव व अधिकार यांचे प्रस्थ कमी झाले.

६. व्यवसाय स्वतंत्र्य मिळाले, उत्पादन क्षमता वाढली. विद्येची दारे खुली झाली. जबाबदार राज्यपद्धती अस्तित्वात आली. कायदा आणि सुव्यवस्था एवढेच कार्यक्षेत्र न मानता लोककल्याणाच्या योजना राज्यसंस्थांनी हाती घेतल्या.

७. आपले दैन्य फिटेल व आपली दुःखे संपतील व संपूर्ण देशात किंवा विश्वात नंदनवन अवतरेल. असे लोकांना वाटू लागले. पण अनुभव उलटा आला कारण आर्थिक पिळवणूक साम्राज्य लालसा गरीब-श्रीमंत वर्ग कलह इ. अनिष्ट प्रकृती जोमाने उदयाला आल्या.

८. आपल्या देशाच्या या मधल्या काळात समाज जिवनामध्ये ज्या अनिष्ठ प्रथा होत्या, प्रवृत्ती होत्या त्यांची हकालपट्टी करून आपण जुन्या परंपरेला उजाळा देत आहोत, ती प्राचीन परंपरेत अंतभूत आहेतच, यालाच आपण सांस्कृतिक स्थित्यंतरे म्हणतो (सरदार गं. बा., १९६० : ७२४).

९. जागतिक लोकसंख्येची वाढ झाली. अन्न, वस्त्र व इतर आवश्यक वस्तू यांचा पुरवठा अपुरा होऊ लागला. आर्थिक विषमता नाहीसे करणे याकडे सामाजिक लक्ष वेधले असताना कुटुंबाची संख्या मर्यादित असावी, असे वाटू लागले. एकूणच सामान्य समाज ऐहिक सुखासाठी आवश्यक असणाऱ्या द्रव्यार्जनाच्या मागे लागला, असे दिसू लागले. नीतिभ्रष्टपणा समाजामध्ये, कुटुंबामध्ये आढळून येऊ लागला. त्याचा दुष्परिणाम म्हणजे मूळ संस्कृती विस्मरणात जाऊ लागली. सांस्कृतिक स्थित्यंतराच्या काळात ही उणीव आली, असे निष्कर्षाप्रती विचारवंतांना वाटले. तसेच सामाजिक व आर्थिक विषमता नाहीशी करण्यात यावी, अशी शासनाला वाटले (अग्निहोत्री द. ह., १९७७ : २७१).

सरदार पटेलांनी व नव्या प्रशासकीय यंत्रणांनी सर्व संस्थाने भारतीय राज्यव्यवस्थेत विलीन केली, महाराष्ट्रातील संस्थानांच्या विलीनीकरणाचा करार खालील पद्धतीने केला. त्यामुळे नवीन भारतीय प्रशासकीय कार्ययंत्रणा अस्तित्त्वात आली.

१.७ विलीनीकरणाचा करारनामा

कोल्हापूर व्यतिरिक्त सतरा संस्थानिकांशी जो करारनामा भारत सरकारने केला, त्याचा आशय पुढीलप्रमाणे आहे :-

१. संस्थान व जनता यांच्या हिताच्या दृष्टीने संस्थानचा कारभार मुंबई प्रांताच्या कारभारांत समाविष्ट करणे इष्ट असल्यामुळे हा विलीनीकरण करार करण्यात येत आहे.

२. संस्थानांतील न्यायदान व इतर सर्व कारभार यांविषयीचे संपूर्ण अधिकार हिंदुस्थान सरकारकडे सोपविण्यात येत आहेत. हिंदुस्थान सरकारने आता कारभार योग्य वाटेल त्या पद्धतीने चालवावा.

३. संस्थानिक व त्यांचे कुटुंब यांचा खाजगी खर्च व त्यांचा खाजगी नोकरवर्ग, निवासस्थानें, लग्न वगैरे समारंभ यांविषयीचा खर्च यासाठी संस्थानिकाला कर द्यावे लागणार नाहीत. कोणत्याही कारणास्तव ही रक्कम कमी किंवा अधिक करण्यात येणार नाही. ही रक्कम चारसारख्या हप्त्यांत म्हणजे दर तिमाहीच्या सुरुवातीस संस्थानिकाला मिळेल. त्यासाठी त्याने संस्थानी किंवा हिंदुस्थान सरकार सांगेल त्या दुसऱ्या ट्रेझरीकडे आपली बिलें सादर करावींत.

४. कराराच्या दिवशी संस्थानिकाच्या मालकीच्या असलेल्या सर्व खाजगी मालमत्तेसंबंधी मालकी व इतर सर्व अधिकार त्यांच्याकडेच राहतील.

७. आपली सर्व स्थावर मिळकत, कर्जरोखे व रोकड शिल्लक या मालमत्तेची पूर्ण यादी संस्थानिकाने हिंदुस्थान सरकारला सादर करावी. एखादी मालमत्ता संस्थानच्या मालकीची आहे की संस्थानिकाच्या खाजगी मालकीची आहे, याविषयी वाद उत्पन्न झाल्यास तो हिंदुस्थान सरकारने नेमलेल्या एका अधिकाऱ्याकडे निर्णयासाठी सोपविण्यात येईल. राजा, राणी, राजमाता, युवराज व युवराज्ञी यांचे १५ ऑगस्टच्या वेळी असलेले सर्व वैयक्तिक खास अधिकार कायम राहतील.

६. संस्थानिकाचे वैयक्तिक अधिकार, दर्जा व पदव्या त्याचप्रमाणे कायदा व रूढी यांनुसार गादीसंबंधीच्या वारसाचे अधिकार कायम राखण्याची हमी हिंदुस्थान सरकार घेत आहे (आपटे ज. शं., १९१८ : १९१).

संस्थानी खात्याचा खुलासा

७. राजा व राणी यांना हत्यारांचा कायदा लागू राहणार नाही. संस्थानिक आपल्या कुटुंबियांच्या दर्जास साजेल अशा रितीने त्यांच्या विषयीची आपली रूढी व कायदेशीर कर्तव्यें पार पाडीत अशी हिंदूस्थान सरकारची उमेद आहे.

८. संस्थानची जी रोकड शिल्लक हिंदुस्थान सरकारकडे सुपूर्त होईल ती होता होईल तो त्या संस्थानी मुलखाच्या हितासाठीच खर्च करण्यास मुंबई सरकारने मान्यता दिली आहे.

९. संस्थानांतील नोकरवर्ग ज्या शर्तीवर १ डिसेंबर १९४७ पूर्वी नोकरीवर होता त्या शर्तीवरच तो शक्यतोवर कायम ठेवला जाईल.

१०. इतर उरलेल्या मुद्यांसंबंधीचा निर्णय हिंदुस्थान सरकार शक्य तितक्या लवकर घेईल.

११. संस्थानिकांस संस्थानच्या १९४७-४६ च्या उत्पन्नाच्या १७ टक्के हिस्सा खाजगी खर्च म्हणून मिळणार आहे.

कोल्हापूर महाराजांच्याशी जो करार करण्यात आला, त्यांत आणखी काही जास्त कलमें आहेत. त्यांपैकी महत्त्वाचा भाग पुढील आशयाचा आहे :-

अ. हा करारनामा झाला नसता, तर महाराजांचे जे वैयक्तिक अधिकार, मानमरातब, आणि सन्मान कायम राहिले असते. त्यांस या करारनाम्याने बाधा येणार नाही.

ब. वार्षिक दहा लाख रुपये तनखा मिळेल.

क. महाराज तख्तारूढ असतांना, त्यांच्या हातून वैयक्तिक अगर इतर कोणत्याही नात्याने काही गोष्टी घडल्या असतील अगर नसतील, त्याबद्दल त्यांच्याविरुद्ध हिंदुस्थान सरकार कोणतीही चौकशी करणार नाही.

ड. कायम नोकरांना नोकरींत ठेवले जाईल अगर कोणताही तोटा होऊ न देता, नुकसानभरपाई दिली जाईल. त्याचप्रमाणे महाराजांनी दिलेली पगारी रजा अगर पेन्शनें तशीच पुढे चालू ठेवली जातील.

दक्षिण महाराष्ट्रातील विलीन झालेल्या अठरा संस्थानिकांना मुंबई सरकारमार्फत पुढीलप्रमाणे तनखे दिले जातात :-

१. कोल्हापूर	रु. १०,००,०००	९. मिरज	रु.८७,०००
२. भोर	रु. ८९,०४२	१०. रामदुर्ग	रु.३२,४८६
३. जमखिंडी	रु. ११,१६३	११. सावनूर	रु.३०,३१६
४. कुरूंदवाड (थोरली पाती)	रु.४१,१२४	१२. सावंतवाडी	रु.१,०७,७००
		१३. जंजिरा	रु.१,३३,७००
५. औंध	रु.७५,२१२	१४. मुधोळ	रु.७५,३००
६. फलटण	रु.१,४०,४४२	१५. अक्कलकोट	रु.७३,७८३
७. मिरजमळा	रु.७०,४७४	१६. सांगली	रु.२,६२,६३१
८. कुरूंदवाड	रु.७६,०००	१७. वाडी	रु.६,०००

(धाकटी पाती) १८. जत रु.४१,१२४

(कोल्हापूरच्या छत्रपतींना जाढा एक लाख रुपये त्यांच्या हयातींत मिळावयाचे आहेत.)

१.८ सारांश संस्थानांच्या कारभारात झालेली सांस्कृतिक व स्थापत्यविषयक झालेली स्थित्यंतरे (इ. स. १८१८ते इ. स. १९४७) याचा या प्रकरणात अभ्यास केला आहे. उढा. इ. स. १८१८ मध्ये आंग्लशाही चालू झाली. इंग्रजांनी भौगोलिक रचना बढलल्या. सुधारणांच्या नावाखाली स्थानिक, सांस्कृतिक भावना ढडपल्या गेल्या. त्यामुळे काही ठिकाणी असंतोषास तोंड द्यावे लागले. नवीन विज्ञानामुळे नवीन उद्योग आले, त्यामुळे मोठे सामाजिक बढल घडले. रस्ते, वीज, पाणी व घरे या मूलभूत व्यवस्था पुरवण्याकरीता आधुनिक यंत्रणेचा वापर करण्यात आला, त्यामुळे स्थापत्यविषयक स्थित्यंतरे झाली. या संपूर्ण नवीन समाजरचनेमुळे सांस्कृतिक स्थित्यंतरे होत गेली. काही स्थित्यंतरे आपोआप झाली व काही जाणीवपूर्वक घडवून आणली अशा अनेक क्षेत्रांमध्ये बढल झाले. सर्वसामान्य मनुष्याच्या जीवनपद्धतीमध्ये कपड्यांपासून ते मनोरंजनापर्यंत स्थित्यंतरे होत गेली. याचा संपूर्ण आढावा या प्रकरणात घेतला असून विशेष म्हणजे एवढे मोठे बढल समाजामध्ये घडत असताना ज्या व्यक्तींनी योगढान ढिले अशा एकशे एक व्यक्तींचा उल्लेख परिशिष्टात केलेला आहे. अशा रीतीने महाराष्ट्रातील निवडक संस्थांनामधील स्थापत्य, प्रशासन आणि सांस्कृतिक स्थित्यंतराचा अभ्यास या शोधप्रबंधात करण्यात आलेला आहे.

१.९ उपसंहार :- मराठ्यांच्या निर्माण झालेल्या नवीन प्रशासकीय कार्ययंत्रणेमुळे जी संस्थाने निर्माण झाली. त्या सर्व संस्थानिकांना एकोणीसाव्या शतकाच्या प्रारंभामध्ये आंग्लशाहीच्या प्रशासन यंत्रणेतून जावे लागले. आंग्लशाहीमध्ये भारतामध्ये वेगवेगळ्या ठिकाणी गव्हर्नर नेमण्यात आले. पेशव्यांनी वाढविलेले मराठ्यांचे साम्राज्य भारतभर पसरलेले होते. ते संपूर्ण साम्राज्य इंग्रजांच्या हाती आयतेच गेले. त्यामुळे मराठ्यांच्या अंतर्गत असणाऱ्या साम्राज्यामध्ये पुणे, सातारा, कोल्हापूर, मुंबई, सांगली, नागपूर, आसाम, बंगाल इ. अनेक ठिकाणी नवीन गव्हर्नर रूजू झाले. त्यामुळे या अंतर्गत मराठ्यांच्या संस्थानिकांच्या प्रशासकीय यंत्रणेत स्थित्यंतरे झाली.

ठिकठिकाणी असलेल्या संस्थानिकांच्यामध्ये पोलीस खात्याची उभारणी करून अप्रत्यक्षपणे स्वतःचा धाक संस्थानिकांवर निर्माण केला. काही संस्थानांमध्ये अंधश्रद्धा व अज्ञान नाहीसे करण्याकरीता उढा. सतीची चाल, नरबळी इ. अनिष्ट परंपरा नष्ट करण्यासाठी कायढे केले. त्यातच भर म्हणून लॉर्ड मेकॅलोने नवीन शिक्षणपद्धती आणली. जुन्या गुरूकुल पद्धतीत चालत असलेले शिक्षण यांची अनुढाने बंढ केली. त्यामुळे शिक्षण पद्धतीत स्थित्यंतर झाले. इंग्रजांचा नवा विचार घेऊन

नवमतवादी व सुधारक तयार झाले. त्याचप्रमाणे स्वदेश व स्वधर्मावर निष्ठा ठेऊन नवीन आलेले इंग्रजाचे विचार व पारंपारिक चालू असलेले समाजजीवन यांचा समन्वय करून देशप्रेम जागृत करणारे पुढारी असे वर्ग तयार झाले. त्यामुळेच संपूर्ण समाजला या सांस्कृतिक स्थित्यंतरातून जावे लागले.

समाजातील सुशिक्षित, अशिक्षित माणसांच्या मनातील सर्व प्रकारचे न्यूनगंड घालवण्याकरीता व स्वाभिमान जागृत करून सर्वसामान्य मनुष्याला राष्ट्रकार्यात प्रवृत्त करणारे लोकमान्यांसारखे पुढारी पुढे आले व दुसऱ्या बाजूला इंग्रजांच्या जुलूम, जबरदस्ती व अन्यायाला कंटाळून त्यांना देशाबाहेर घालवण्याकरीता चापेकर बंधूपासून पुढे क्रांतिकारकांची फळीच तयार झाली.

याचकाळात समाजामध्ये विविध प्रकारची स्थित्यंतरे व बदल घडत होती. उदा. कौटुंबिक व्यवस्था, वेशभूषेतील बदल, संगीत क्षेत्र, करमणुकीचे खेळ, पारंपारिक व नवीन आलेले खेळ, साहित्यामध्ये झालेले बदल (छपाई, कागद व इतर व्यवस्था) याचबरोबर स्थापत्यक्षेत्रामध्ये लाकूड, दगड, मातीच्या ऐवजी सिमेंट, लोखंड, वाळू, खडी इ. नवीन साहित्य आले व स्थापत्य क्षेत्रात नवीन बदल घडते. एकंदरीतच विसाव्या शतकाच्या प्रारंभात विज्ञान, तंत्रज्ञान व औद्योगिकतेमुळे भिन्न प्रकारच्या संस्कृती एकत्र आल्या व त्यामुळे सांस्कृतिक स्थित्यंतर झाले. रस्ते, वीज, पाणी व वाहतूकीची साधने उदा. रेल्वे, विमान, बस इ. स्वरूपाच्या वाहतूक साधनांमुळे प्रशासकीय, आर्थिक व सांस्कृतिक क्षेत्रात स्थित्यंतरे घडून आली. या संपूर्ण प्रशासकीय व सांस्कृतिक स्थित्यंतराच्या काळामध्ये स्थापत्यविषयक झालेल्या स्थित्यंतराची दखल घेणे क्रमप्राप्त आहे. उदा. पाण्याच्या साठ्यासाठी बांधलेली धरणे, नदीवरील बांधलेले पूल, छोट्या खेडेगावांमध्ये केलेले बंधारे, मोठमोठी धान्याची कोठारे इ. लोकोपयोगी स्थापत्य तसेच मोठमोठ्या प्रशासकीय कामासाठी बांधलेल्या इमारती, संस्थानिकांनी उभे केलेले राजवाडे, मुलामुलींसाठी काढलेल्या भक्कम दगडात व सिमेंटचा वापर करून बांधलेल्या शाळा, पोहोण्याचे तलाव, खेळासाठी विविध प्रकारची मैदाने व क्रिडा संकुले इ. सर्व स्थापत्यविषयक झालेली स्थित्यंतरे व त्याची लोकांनी घेतलेली दखल व त्याकाळच्या म्हणजेच १९ व्या शतकाच्या प्रारंभात पुढारी म्हणून किंवा नेते म्हणून निर्माण झालेल्या राजकीय व्यक्तींनी एक नवीन स्वरूपाची लोकशाळी निर्माण केली, असे पहावयास मिळते. नवीन निर्माण केलेल्या लोकशाहीत सर्व संस्थाने सरदार पटेलांनी विलीन करून टाकली व नवीन भारतीय लोकशाही निर्माण झाली.

प्रबंधाचा एकत्रीत उपसंहार

महाराष्ट्र हा शब्द ज्या भूभागाला लावला गेला त्या भूभागांची अगोदर व नंतर काय परिस्थिती होती व ती परिस्थिती कशी बदलत गेली, मग ती भौगोलिक रचना असो किंवा इतिहास असो किंवा प्रशासन असो अथवा संस्कृती असो याचा अभ्यास आपण या प्रकरणात केला आहे. आजचा महाराष्ट्र हा शब्द उच्च्यारल्यावर एवढा सगळा कालपट उभा राहतो.

महाराष्ट्रात किंवा संपूर्ण देशात संस्थानिक निर्माण होण्याचे महत्त्वाचे कारण म्हणजे बलाढ्य झालेले स्थानिक सरदार व त्यांनी जनतेत निर्माण केलेली स्वतःची प्रशासकीय कार्ययंत्रणा व जनतेकडून महसूल गोळा करण्याच्या निमित्ताने झालेला संपर्क यामुळेच बलाढ्य सरदार जनतेला राज्यकर्ते वाटू लागले. छत्रपती शिवाजी महाराजांच्यानंतर आलेल्या राजांचे प्रशासकीय यंत्रणेच्या शेवटच्या टोकापर्यंत म्हणजेच सर्वांत कमी अधिकार असलेल्या प्रशासकीय व्यक्तीपर्यंत संपर्क किंवा धाक कमी झाला यामुळेच सरदार स्वकर्तृत्त्वाने संस्थानिक झाले व ती एक काळाची गरज झाली, कारण स्वराज्य संग्रामात (इ. स. १६८० ते इ. स. १७०७) संस्थानिकांचे बीजारोपण झालेले दिसत आहे.

राज्य चालविताना प्रशासकीय यंत्रणेत काही नियम व धोरणे आणि बारीक सारीक तपशील सदैव ध्यानात ठेऊन अत्यंत सूक्ष्म व मार्मिक पद्धतीने राज्याची धोरणे दूरदृष्टीने कशी असावीत याचा विचार राजाने करायचा असतो. म्हणून राज्य चालविताना आपल्या पुढेही राज्य असेच चालेल त्याकरीता राज्यघटना बनवावी लागते व त्या अनुषंगाने कार्यवाही करावी लागते. अशी दूरदृष्टी ठेऊन राजाचे नेमके काम काय, पंतप्रधान किंवा पेशवा यांनी कशा पद्धतीने काम करावे, साहुकारांचा उपयोग कशा पद्धतीने करून घ्यावा, वतनदारांकडून वतनाधिष्ठित गावसत्ता कशी असावी, पराक्रम केलेल्या माणसांना वतने कशा पद्धतीने द्यावीत, अशा स्वरूपाचा सर्व बाजूंनी विचार राज्याची प्रशासकीय कार्ययंत्रणा करीत असे. संपूर्ण राज्याचे सार म्हणजे दुर्ग आणि आरमार यासंदर्भात कशा पद्धतीने राज्य चालविताना विचार व्हावा व तसा पायंडा पडावा या हेतूने संस्थानच्या राजाने काम केलेले दिसत आहे. राज्य चालविताना हे राज्य एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे जात असते तेव्हा प्रशासकीय स्थित्यंतरे घडतात व राज्याचे मुख्य प्रधान, पंतसचिव, अमात्य, मंत्री, सेनापती, सुमंत, चिटणीस यांच्यामधेही बदल घडतात. कार्यपद्धतीत फरक पडतो. हे सर्व करत असताना राजा व अष्टप्रधान त्याचप्रमाणे लष्करी प्रशासन व ग्रामव्यवस्था याकडेही बारकाईने लक्ष ठेवावे लागते. या सर्वांना जोड म्हणून राज्यातील व्यापार व्यवस्था, उद्योग व्यवस्था, रोजगार व्यवस्था या सर्व नीट चालण्याकरिता प्रशासकीय कार्ययंत्रणेने अठरा कारखाने व बारा महाल यांच्या माध्यमातून एकंदरीत राज्याची सर्व

बाजूंनी व्यवस्था उत्तम असावी. असाच प्रयत्न मुख्य सातारा संस्थानने केलेला दिसत आहे व ही सर्व प्रशासकीय कार्ययंत्रणा ज्या राजवाड्यातून चालायची त्या राजवाड्याच्या स्थापत्याकडे विशेष लक्ष दिलेले दिसत आहे. आपल्या राज्यातील लोकांची धार्मिक वृत्ती व सामाजिक अभिसारणाची प्रक्रिया नीट असावी, याकरिता संस्थानिक विविध उपक्रम व परंपरा यांचा मेळ घालून लोकांची मनःस्थिती नीट ठेवण्याचा प्रयत्न करत आहे.

सातारा संस्थान हे महाराष्ट्राचे प्रमुख संस्थान होते. तेथूनच सर्व सत्तासूत्रे हालत होती. साताऱ्याच्या छत्रपती शाहूंनी जेव्हा पेशव्यांकडे सत्ता सूत्रे दिली तेव्हा पुणे हे सत्तेचे केंद्र झाले. तरीपण साताऱ्यांच्या गादीवर असलेले छत्रपती हेच राजे असत.

मराठ्यांच्या स्वराज्याच्या प्रशासकीय कार्यामध्ये शंकराजी नारायण या अत्यंत हुषार, कर्तबगार लढवय्याने स्वकर्तृत्त्वावर सचिवपद मिळवले. भोसले घराण्याशी प्रामाणिक राहून त्यांच्या कारकीर्दीत होऊन गेलेल्या सर्व छत्रपतींचा शंकराजी नारायण यांच्यावर विश्वास होता, असे अत्यंत निष्ठावान, मुत्सद्दी व लढवय्ये शंकराजी नारायण यांनी भोर संस्थानची निर्मिती केली.

भोर संस्थानाने मराठा स्वराज्याच्या सर्व प्रशासकीय परंपरा पाळून नवीन आंग्ल पद्धतीच्या आवश्यक तेवढ्या सुधारणा करून परंपरा व आधुनिकता यांचा मेळ घातला. त्यांनी नंतरच्या काळात शिक्षणाला प्राधान्य दिले. स्थापत्यामध्ये काही सुधारणा करून धरणे, बंधारे, शाळा, ढरवाजे व स्वतःचे राजवाडे यांच्याकडे लक्ष ढेऊन नाविन्य आणले. त्यामुळे खऱ्या अर्थाने प्रशासकीय स्थित्यंतर व स्थापत्यविषयक स्थित्यंतर झालेले दिसते.

मराठा स्वराज्यात असलेल्या अष्टप्रधान मंडळापासून ते ग्राम सत्तेपर्यंत व त्यानंतर अगढी शिक्षधाधिकारी, वैद्यकीय अधिकारी, फॉरेस्ट अधिकारी, खरेढी-विक्री अधिकारी आणि सार्वजनिक बांधकाम विभाग इ. अनेक लोककल्याणकारी योजना राबविण्यासाठी प्रमुख व्यक्ती नेमल्या. स्वतःच्या राज्याची नवीन राज्यघटना तयार करुन नवीन प्रशासकीय स्थित्यंतर केले.

विकास व सुधारणा यांचा पाठपुरावा केल्यामुळे व औद्योगिक धोरणामुळे सर्वसामान्य सांस्कृतिक जीवनातही मूळ परंपरा न मोडता हळूवारपणे बढल घडवून आणले. त्यामुळे भोर संस्थान हे प्रशासकीय, सांस्कृतिक व स्थापत्य यांच्या स्थित्यंतराचे एक चांगले उढाहरण आहे.

मराठ्यांचे स्वराज्य टिकविण्यासाठी मराठ्यांचा राजा मराठ्यांच्या भूमीत नसतानाही ज्यांनी पराक्रमाची शर्थ केली व निष्ठेने राजानेच पालन केले अशा प्रमुख सरढारांमध्ये परशुराम त्र्यंबक या लढवय्या सरढाराचे नाव विसरता येणार नाही. या कामगिरीबद्दल छत्रपती राजारामांनी त्यांना प्रतिनीधी

हे पद दिले व मुख्य सत्तेच्या प्रवाहात आणले. त्यांनी आपली निष्ठा छत्रपती घराण्याची महाराणी ताराबाई यांना समर्पित केली होती व नंतर छत्रपती संभाजी महाराजांचे पुत्र शाहू यांच्याशी अत्यंत प्रामाणिक राहून आपली निष्ठा त्यांना अर्पण केल्याचे जाणवते. त्यांच्या वंशजांनी संस्थान चालवत असताना आंग्लशाहीच्या काळात काही नव्या सुधारणा केल्या, परंतु स्वधर्माला व कुळाचाराला बाधा येईल असे काहीही न करता सुधारणा केल्या. प्रत्येक संस्थानात प्रशासकीय स्थित्यंतरे घडतच होती, परंतु ही स्थित्यंतरे घडत असताना राज्य व्यवस्था अस्ताव्यस्त होऊ नये म्हणून एक उत्कृष्ट राज्यघटना तयार केली व ती सर्व भारतभर गाजली. परशुराम त्र्यंबक यांचे वंशज भवानराव पंतप्रतिनीधी यांनीही राज्यघटना बनविण्यासाठी विशेष परिश्रम घेतले. राज्यातील शेवटच्या माणसापर्यंत सुधारणा पोहचाव्यात व तो संरक्षित व्हावा, याकरिता या घटनेचा आदर्श राज्यघटना म्हणून उल्लेख करावा लागेल. आंग्लशाहीमध्ये ज्याप्रमाणे इतर संस्थानात बदल घडत गेले तसेच बदल इथे घडत असतानाही स्वदेशी उद्योगांकरीता विशेष प्रयत्न केले. प्रशासकीय व सांस्कृतिक स्थित्यंतराच्या या काळात औंध संस्थानचा वेगळाच ठसा निर्माण झाला होता.

मराठ्यांचे साम्राज्य निर्माण होण्याच्या अगोदरपासून ज्यांनी स्वतःला नाईक म्हणूनच घेऊन आजूबाजूच्या गावांमध्ये स्वतःची सत्ताकेंद्रे निर्माण केली. ही ग्राम सत्ताकेंद्रे त्यांना महसूल मिळवून देत असत. अशा काही गावांमध्ये हळूहळू सत्ता केंद्रे निर्माण करून स्वतःचा परगणा तयार केला व मोठे सत्ताकेंद्र तयार केले असे फलटणचे राजे नाईक निंबाळकर घराण्याचा इतिहास आहे. ग्राम सत्तेत चालणारी सर्व प्रशासकीय व्यवस्था यावर राजे निंबाळकरांचा धाक असे, असे दिसते. मराठ्यांचे साम्राज्य निर्माण होण्याच्या अगोदर दिल्लीच्या बादशहाला विनाकारण मोठे करून त्याचे मांडलिकत्व स्विकारत असत. हा पायंडा छत्रपती शिवरायांनी मोडून काढला. निंबाळकरांची मुलगी सईबाई हिच्याशी लग्न केले. त्यामुळे आपोआपच निंबाळकरांशी सोयरीक होऊन नाते जोडले गेले. फलटणचा परिसर हा एक मोठा परगणा होता. असेच आजूबाजूचे परगणे मिळवून सत्ताकेंद्रे तयार करून निंबाळकरांनी स्वतःचे संस्थान निर्माण केले. याच काळात (१८ व्या शतकात) महाराष्ट्रातील संस्थानिकांनी स्वतःच्या राजवाड्या सदृश्य वास्तु निर्माण केल्या. त्याला लोक राजवाडा म्हणू लागले. संस्थानिक स्वतःला राजे म्हणून घेऊ लागले. या भव्य राजवाड्यांच्या निर्मितीमध्ये दगड, लाकूड, लोखंड यांचा मोठ्या प्रमाणात वापर झाला. त्यामुळे सुतारांना, पाथरवटांना, लोहारांना व ग्रामसत्तेतील इतर बारीक सारीक कारागिरांना, तरुणांना मोठ्या प्रमाणात रोजगार उपलब्ध झाला. १९ व्या शतकात आंग्ल पद्धतीमुळे राजवाड्याच्या स्थापत्यात स्थित्यंतरे झाली. १९ व्या शतकाच्या उत्तरार्धात व २० व्या शतकाच्या

पूर्वार्धात उद्योगांना चालना मिळून मोठी उद्योग व्यवस्था निर्माण झाली. त्यामुळे सांस्कृतिक स्थित्यंतरेही घडली. फलटण संस्थानच्या या प्रकरणामध्ये स्थापत्यविषयक निरीक्षणे व वस्तुस्थिती, संशोधनात्मक अनुमाने यांचा संशोधनात्मक अभ्यास केला आहे.

भारताच्या मध्यभागी असलेले नागपूर हे १७ व्या शतकाच्या उत्तरार्धाच्या अंतिम टप्प्यात भोसले घराण्याशी जोडले गेले. वऱ्हाड व गोंडवन या भागामध्ये स्वतःच्या पराक्रमाने मराठा सरदारांनी स्वतःचे सत्ताकेंद्र निर्माण केले. भोसले घराण्याची जशी वेरूळ शाखा शिवरायांची आहे, तशी भोसल्यांची हिंगणी शाखा. परसोजींची म्हणून ओळखली जाते. त्याच परसोजींनी व त्यांच्या वंशजांनी नागपूर हे संस्थान निर्माण केले. नागपूरकर भोसल्यांमध्ये रघुजी भोसले यांनी विशेष पराक्रम करून बंगाल व ओरिसापर्यंत मराठ्यांचे राज्य वाढवले. त्यांनी नुसत्या राज्याच्या सीमा वाढवल्या नाहीत तर त्यांनी प्रशासकीय यंत्रणा पण चांगल्या पद्धतीने राबविल्या. स्वतःची टांकसाळ त्यांनी निर्माण केली होती. १८ व्या शतकामध्ये नागपूरकर भोसल्यांनी स्वतःच्या राज्यामध्ये स्थापत्यविषयक उत्तम कामे केली. यामधील काही स्थापत्यविषयक कामे लोककल्याणकारी होती. उदा. मोठमोठ्या बावड्या पाण्याच्या साठ्यासाठी बांधल्या. त्याचप्रमाणे भव्यदिव्य मंदिरे, वेशीवरील बांधकामे व स्वतःकरता निर्माण केलेला राजवाडा, सरदारांकरीता निर्माण केलेले वाडे यामधील स्थापत्यशास्त्राला धरून केलेले आहे. एकंदरीतच नागपूरकर भोसल्यांचा स्थापत्यविषयक दृष्टीकोन चांगला होता. काळाच्या गरजेनुसार व लोकांच्या आवश्यकतेनुसार त्यांनी स्थापत्यविषयक स्थित्यंतरे केली व कामे केली. १९ व्या शतकात आंग्लाच्या राजवटीमध्ये प्रशासकीय कामात स्थित्यंतरे घडली. पण स्थापत्यविषयक कामात युरोपियन कार्यशैलीमुळे युरोपियन पद्धतीची स्थित्यंतरे दिसून येत नाहीत. या प्रकरणामध्ये मराठ्यांच्या साम्राजाचा एक भाग असलेल्या नागपूरकर भोसल्यांच्या स्थापत्यविषयक वास्तुंची सविस्तर व संशोधनात्मक वस्तुस्थिती मांडली आहे.

मराठ्यांच्या प्रशासकीय कार्ययंत्रणेमध्ये सातारा संस्थान हे प्रमुख केंद्र होते. छत्रपती थोरले शाहू महाराजांनी (छत्रपती संभाजीपुत्र) १८ व्या शतकाच्या मध्यभागी म्हणजेच इ. स. १७४० मध्ये पेशव्यांकडे सत्तेची सूत्रे सोपविल्यामुळे सत्ताकेंद्र छत्रपती जरी असले तरी त्यांचा केंद्रबिंदू पेशव्यांकडे जात होता. छत्रपती थोरले शाहूमहाराज यांचे निर्वाण होण्यापूर्वी बाळाजी विश्वनाथ व त्यांचा मुलगा पहिला बाजीराव पेशवा यांनी स्वराज्याचे रूपांतर साम्राज्यात केले होते. एवढे सर्व भारतभर पसरलेले साम्राज्य हा प्रशासकीय यंत्रणेचा कौशल्याचा भाग होता. छत्रपती घराण्यापासून चालत आलेली अष्टप्रधानमंडळ प्रशासकीय यंत्रणा कमी पडायला लागली. नवीन प्रशासकीय यंत्रणेचा एवढा मोठा

साम्राज्याचा आवाका सांभाळण्यासाठी प्रशासकीय यंत्रणेत बढल करणे आवश्यक झाले. पेशव्यांनी त्याकरीता पुण्यामध्ये शनिवारवाडा बांधला. त्यामुळे प्रशासकीय यंत्रणा काम करीत होती. भारतभर पसरलेल्या या साम्राज्याच्या महसूलीकरता शनिवारवाड्यात १७०० सरकारकुनांची नियुक्ती केली होती व एकंढर ढेशभरात त्या त्या सत्तार्केंद्रामध्ये एकंढर वीस हजार कारकुन काम करत होते. पहिल्या बाजीरावांच्या आकस्मित मृत्यूमुळे त्यांचे पुत्र नानासाहेब पेशवे हे लहान असले तरी त्यांनी मराठा मंडळातील होळकर व शिंढे यांच्या सहाय्याने चांगले राज्य केले. याच काळात पानीपतचा संग्राम झाला. पानीपतच्या संग्रामानंतर माधवराव पेशवे हे पेशवे झाले. त्यांनी कौशल्य व मुत्सद्दीपणा वापरून इ. स. १७६३ नंतर पानीपत युद्धात झालेल्या नुकसानीची भरपाई करून शिंद्यांच्या मढतीने चौढा वर्षे ढिल्लीवर राज्य केले. याच काळात ढिल्लीवर मराठ्यांची सत्ता होती व भगवा झेंडा ढिल्लीवर फडकत होता. अत्यंत कुशल प्रशासक असलेल्या माधवरावांनी आधुनिक शस्त्रे निर्माण करण्याकरीता कारखाना निर्माण केला होता. अत्यंत उत्साही असलेले हे व्यक्तिमत्त्व वयाच्या अठ्ठावीसाव्या वर्षी गेल्यामुळे मराठ्यांची हाती झाली व इंग्रजांना आनंद झाला. माधवरावानंतर त्यांचे बंधू नारायणराव यांना पेशवे करण्यात आले. नारायणरावांच्या काकांनी म्हणजे रघुनाथरावांनी गारद्यांच्या मढतीने नारायण पेशव्यांना अकाली ठार करण्यात आले. रघुनाथराव अत्यंत नीच वृत्तीचा होता. याचवेळी एक महत्त्वाची घटना घडली. मारल्या गेलेल्या नारायणराव पेशव्यांचा वंश पुरंढरच्या किल्ल्यात वाढत होता. तो सव्वा महिन्याचा झाल्यावर त्याला पेशवेपढ ढेण्यात आले. शिंढे, होळकर, सखारामबापू, नाना फडणीस यांच्यासह एकंढरीत बारा मराठा सरढारांनी रघुनाथरावांचे कारस्थान धुळीला मिळविले. त्याला बारभाईंचे कारस्थान म्हणतात. या सव्वा महिन्याच्या सवाई माधवरावांच्या नावाने मराठा साम्राज्य चालू ठेवले. अठराव्या शतकाच्या अखेरपर्यंत मराठेशाही ठिक होती. एकोणीसाव्या शतकाच्या प्रारंभी लबाड रघुनाथरावांचा मुलगा ढुसरा बाजीराव याच्याकडे पेशवेपढ आले. त्यामुळे नाराज झालेल्या मराठा लढवय्यांनी पेशव्यांकडे ढुर्लक्ष केले. संपूर्ण भारतभर पसरलेल्या मराठा साम्राज्यावर असलेली मराठ्यांची पकड ढिली झाली व याच काळात मराठ्यांची अनेक छोटी छोटी संस्थाने निर्माण झाली. उढा. ग्वाल्हेर, इंढूर, भोर, औंध, फलटण, अक्कलकोट इ. अशा रितीने मराठ्यांच्या प्रशासकीय कार्ययंत्रणेमध्ये स्थित्यंतरे होत गेली. या प्रकरणामध्ये प्रशासकीय स्थित्यंतरावर जास्त प्रकाश टाकला आहे.

मराठ्यांच्या निर्माण झालेल्या नवीन प्रशासकीय कार्ययंत्रणेमुळे जी संस्थाने निर्माण झाली. त्या सर्व संस्थानिकांना एकोणीसाव्या शतकाच्या प्रारंभामध्ये आंग्लशाहीच्या प्रशासन यंत्रणेतून जावे लागले. आंग्लशाहीमध्ये भारतामध्ये वेगवेगळ्या ठिकाणी गव्हर्नर नेमण्यात आले. पेशव्यांनी

वाढविलेले मराठ्यांचे साम्राज्य भारतभर पसरलेले होते. ते संपूर्ण साम्राज्य इंग्रजांच्या हाती आयतेच गेले. त्यामुळे मराठ्यांच्या अंतर्गत असणाऱ्या साम्राज्यामध्ये पुणे, सातारा, कोल्हापूर, मुंबई, सांगली, नागपूर, आसाम, बंगाल इ. अनेक ठिकाणी नवीन गव्हर्नर रूजू झाले. त्यामुळे या अंतर्गत मराठ्यांच्या संस्थानिकांच्या प्रशासकीय यंत्रणेत स्थित्यंतरे झाली.

ठिकठिकाणी असलेल्या संस्थानिकांच्यामध्ये पोलीस खात्याची उभारणी करून अप्रत्यक्षपणे स्वतःचा धाक संस्थानिकांवर निर्माण केला. काही संस्थानांमध्ये अंधश्रद्धा व अज्ञान नाहीसे करण्याकरीता उदा. सतीची चाल, नरबळी इ. अनिष्ट परंपरा नष्ट करण्यासाठी कायदे केले. त्यातच भर म्हणून लॉर्ड मेकॅलोने नवीन शिक्षणपद्धती आणली. जुन्या गुरूकुल पद्धतीत चालत असलेले शिक्षण यांची अनुदाने बंद केली. त्यामुळे शिक्षण पद्धतीत स्थित्यंतर झाले. इंग्रजांचा नवा विचार घेऊन नवमतवादी व सुधारक तयार झाले. त्याचप्रमाणे स्वदेश व स्वधर्मावर निष्ठा ठेऊन नवीन आलेले इंग्रजाचे विचार व पारंपारिक चालू असलेले समाजजीवन यांचा समन्वय करून देशप्रेम जागृत करणारे पुढारी असे वर्ग तयार झाले. त्यामुळेच संपूर्ण समाजला या सांस्कृतिक स्थित्यंतरातून जावे लागले.

समाजातील सुशिक्षित, अशिक्षित माणसांच्या मनातील सर्व प्रकारचे न्यूनगंड घालवण्याकरीता व स्वाभिमान जागृत करून सर्वसामान्य मनुष्याला राष्ट्रकार्यात प्रवृत्त करणारे लोकमान्यांसारखे पुढारी (या प्रकरणामध्ये जवळजवळ शंभरपेक्षा जास्त समाजसुधारकांचा उल्लेख केला आहे. प्रातिनिधीक स्वरूपात लोकमान्याचे नाव घेतले आहे.) पुढे आले व दुसऱ्या बाजूला इंग्रजांच्या जुलूम, जबरदस्ती व अन्यायाला कंटाळून त्यांना देशाबाहेर घालवण्याकरीता चाफेकर बंधूपासून पुढे क्रांतिकारकांची फळीच तयार झाली.

याचकाळात समाजामध्ये विविध प्रकारची स्थित्यंतरे व बदल घडत होती. उदा. कौटुंबिक व्यवस्था, वेशभूषेतील बदल, संगीत क्षेत्र, करमणुकीचे खेळ, पारंपारिक व नवीन आलेले खेळ, साहित्यामध्ये झालेले बदल (छपाई, कागद व इतर व्यवस्था) याचबरोबर स्थापत्यक्षेत्रामध्ये लाकूड, दगड, मातीच्या ऐवजी सिमेंट, लोखंड, वाळू, खडी इ. नवीन साहित्य आले व स्थापत्य क्षेत्रात नवीन बदल घडते. एकंदरीतच विसाव्या शतकाच्या प्रारंभात विज्ञान, तंत्रज्ञान व औद्योगिकतेमुळे भिन्न प्रकारच्या संस्कृती एकत्र आल्या व त्यामुळे सांस्कृतिक स्थित्यंतर झाले. रस्ते, वीज, पाणी व वाहतूकीची साधने उदा. रेल्वे, विमान, बस इ. स्वरूपाच्या वाहतूक साधनांमुळे प्रशासकीय, आर्थिक व सांस्कृतिक क्षेत्रात स्थित्यंतरे घडून आली. या संपूर्ण प्रशासकीय व सांस्कृतिक स्थित्यंतराच्या काळामध्ये स्थापत्यविषयक झालेल्या स्थित्यंतराची दखल घेणे क्रमप्राप्त आहे. उदा. पाण्याच्या साठ्यासाठी बांधलेली धरणे,

नढीवरील बांधलेले पूल, छोट्या खेडेगावांमध्ये केलेले बंधारे, मोठमोठी धान्याची कोठारे इ. लोकोपयोगी स्थापत्य तसेच मोठमोठ्या प्रशासकीय कामासाठी बांधलेल्या इमारती, संस्थानिकांनी उभे केलेले राजवाडे, मुलामुलींसाठी काढलेल्या भक्कम ढगडात व सिमेंटचा वापर करून बांधलेल्या शाळा, पोहोण्याचे तलाव, खेळासाठी विविध प्रकारची मैढाने व क्रिडा संकुले इ. सर्व स्थापत्यविषयक झालेली स्थित्यंतरे व त्याची लोकांनी घेतलेली ढखल व त्याकाळच्या म्हणजेच १९ व्या शतकाच्या प्रारंभात पुढारी म्हणून किंवा नेते म्हणून निर्माण झालेल्या राजकीय व्यक्तींनी एक नवीन स्वरूपाची लोकशाळी निर्माण केली, असे पहावयास मिळते. नवीन निर्माण केलेल्या लोकशाहीत सर्व संस्थाने सरढार पटेलांनी विलीन करून टाकली व नवीन भारतीय लोकशाही निर्माण झाली.

हा शोधप्रबंध जर सामाजिक दृष्टीकोनातून अभ्यासला तर असे आढळेल, छत्रपती शिवाजी महाराजांचे प्रशासन यंत्रणेचे धोरणे आजच्या काळातही एखाढी स्वराज्य संस्था, महानगरपालिका, सार्वजनिक संस्था, शैक्षणिक संस्था, विद्यापीठे, मोठमोठी देवस्थाने आणि एखाद्या कार्यक्रमाचे व्यवस्थापन यामध्येही ही धोरणे उपयोगी पडू शकतात. एक सामाजिक म्हण अशी आहे, "आपल्याकडील पाहुण्याला ताट द्यावे, पण पाट देवू नये. " याचा अर्थ पाहुण्यांचा आढर सत्कार जरूर करावा, पण त्याला आपले घरचं देऊन टाकले असे करू नये. हे धोरण छत्रपती शिवाजी महाराजांनी अवलंबलेले होते. भारतावर आलेल्या आक्रमकांना तिथल्या राजांनी आपले राजपाटच ढिले. त्यामुळे त्यांनी येथे राज्य केले. हे शिवरायांच्या लक्षात आले होते. परंतु या धोरणाचा ऱ्हास झाल्यामुळे वतने देण्यात आली व राज्य टिकविण्यासाठी संस्थाने निर्माण करण्यात आली. याच धरतीवर परदेशातील ईस्ट इंडिया कंपनी पाहुण्याच्या स्वरूपात आली. त्यांना आपला राजपाट मिळाला व त्यामुळे इंग्रजांचे राज्य आले.

त्याचबरोबर स्थापत्यशास्त्रामध्ये विज्ञानाला धरून जर चौसोपी वाडा (किंवा अनेक चौकांचा) उभा करायचा असेल तर कोणकोणती साधनं वापरावेत इथंपासून कशा पद्धतीने वाड्याची अंतरीक रचना असावी, ढगडांची विहिर कशी असावी, लाकडाच्या खिडक्या मराठा स्थापत्यशैलीत कशा पद्धतीने कराव्यात, लाकडाचे खांब व त्यावरील तळखडा कशा पद्धतीने घडवावा, या स्वरूपाचे प्रबंधातून ज्ञान मिळेल.

सांस्कृतिक स्थित्यंतराच्या काळात ज्या ज्ञात आणि अज्ञान महानुभवांचे योगढान झाले, त्यांच्या कार्याविषयी माहिती या प्रबंधातून समाजाला मिळेल. या प्रबंधामध्ये ज्या संस्थानांचा विचार केला, ती सर्व संस्थाने छत्रपती शिवाजी महाराजांच्या अष्टप्रधान घराण्याशी निगडीत होती. परंतु अशी संपूर्ण देशामध्ये स्थानिक राज्यकर्त्यांची ५३४ संस्थाने होती. त्याची व्याप्ती खूपच मोठी आहे. त्याचा

पण याच अनुषंगाने होऊ शकतो. या शोधप्रबंधामध्ये सांस्कृतिक स्थित्यंतरांच्या काळात ज्या लोकांनी योगदान दिले, त्यांच्या कार्याविषयी आणखीही माहिती उपलब्ध केली. तर त्यातून मोठा ग्रंथ निर्माण होईल आणि नवीन सामाजिक तत्त्वे कळून येतील. याविषयी संशोधन होऊ शकते. या सांस्कृतिक, प्रशासकीय स्थापत्यविषयक झालेल्या स्थित्यंतराच्या काळाचा अभ्यास करताना अजूनही काही व्यक्ती अज्ञात आहेत. याच्याविषयीही संशोधन होऊ शकते आणि स्थापत्यामध्ये लाकडाचे व ढगडाचे उपयोग करून केलेले वाडे ढीर्घकाळ टिकताना दिसत आहेत. परंतु कॉन्क्रीट किंवा अन्य वस्तु वापरून केलेल्या इमारती पन्नास ते ऐंशी वर्षांच्या काळात मोडकळीला का येतात यावरही संशोधन होऊ शकते. संस्थानिकांच्या राजवाड्याच्या व्याप्ती एवढे राजवाडे निर्माण न करता छोट्या स्वरूपाचे लाकडाचा व ढगडाचा वापर करून केलेली घरे निश्चितपणे ढीर्घकाळ टिकतील का यावरही संशोधन होवू शकते.

संदर्भग्रंथ सूची

१. अग्निहोत्री ढ. ह., १९७७,महाराष्ट्र संस्कृतीचे तात्विक अधिष्ठान, सुविचार प्रकाशन मंडळ, नागपूर -१२, (महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळाच्या मदतीने)

२. अत्रे त्रिंबक नारायण, १९१५, गावगाडा, प्रकाशक वरदा पब्लिकेशन, पुणे १६,

३. आपटे ज. शं., १९१८,संस्थानी स्वराज्य कर्ते भारत सेवक वामनराव पटवर्धन यांचे कार्य व कर्तृत्व, प्रकाशक सरवर्ट ऑफ इंडिया सोसायटी, हिंद सेवक संघ, पुणे ४

४. उदास शाम, १९१८, क्रांतीयज्ञ, कंठस्नान आणि बलिदान, क्रांतीवीर चाफेकर बंधू स्मृती शताब्दी समारोह समिती, चिंचवड

५. एकबोटे नं. र., मार्च २०१५, मराठा ISSN:0076-2571, टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे.

६. कर्वे चिंतामण गणेश, जोगळेकर सदाशिव आत्माराम, जोशी यशवंत गोपाळ, १९५४, महाराष्ट्र परिचय खंड १, प्रसाद प्रकाशन, पुणे २

७. कुलकर्णी अ. रा., १९९१, शिवकालीन महाराष्ट्र, राजहंस प्रकाशन, पुणे

८. कुलकर्णी अ. रा., २००७, आज्ञापत्र, मोडी-मराठी-इंग्रजी, डायमंड पब्लिकेशन, पुणे ३०

९. कोलारकर श. गो., पुरंदरे गो. मा., २००५, नागपूर राज्याचा अर्वाचिन इतिहास, श्री मंगेश प्रकाशन, नागपूर-१७

१०. खेर भा. ढ., १९९८,क्रांतीयज्ञ, क्रांतीचा ज्वालामुखी, प्रकाशक क्रांतीवीर चाफेकर समिती, चिंचवड,पुणे

११. गद्रे प्रभाकर, २००१, नागपूर राज्याचा उदय आणि अस्थापना, मंगेश प्रकाशन, नागपूर

१२. गायकवाड आर. डी., सरदेसाई बी. एन., थोरात डी. के., हणमाने बी. एन., मराठे कालीन संस्था व विचार, १९९०, कोल्हापूर, एन. व्ही. फडके आणि कंपनी

१३. गुने व्ही. सी., १९५३, अनुवाद डॉ. शिंदे सदाशिव, २०१३, मराठ्यांची न्याय्य व्यवस्था, स्नेहल प्रकाशन, २०१५, पुणे

१४. चाफेकर नारायण गोविंद, १५ नोव्हेंबर १९३४, श्री भवानराव गौरवग्रंथ, भाग १ ते ४

१५. चिटणीस के. एन., पुणे विद्यापीठ इतिहास विभाग, १९८५, मध्ययुगीन भारतीय संकल्पना व संस्था, (भाग १), संकल्पना व प्रशासन, प्रकाशक चिटणीस आणि कांबळे

१६. जोशी प्र. न., १९७८, मराठी वाङ्मयाचा विवेचक इतिहास आणि प्राचीन काल, स्नेहवर्धन प्रकाशन, पुणे ३०

१७. जोशी प्र. ना., १९६०, मराठेशाहीतील राजनिती, आज्ञापत्र, व्हीनस प्रकाशन, पुणे

१८. जोशी वा. ना., १९३९, राजा श्रीमंत रघुनाथराव पंडित पंतसचिव यांचे चरित्र, खंड पहिला, प्रकाशक सरदेसाई सदाशिव रामचंद्र, समर्थ भारत छापखाना, पुणे २

१९. जोशी शं. ना., १९६०, मराठेकालीन समाजदर्शन, अनाथ विद्यार्थीगृह प्रकाशन, पुणे

२०. जोशी पी. जी., २००२, भारताचा इतिहास, मुंजे प्रकाशन नागपूर

२१. डिसकळकर द. बा., १९६४, महाराष्ट्राचा प्राचीन इतिहास व संस्कृती, प्रकाशक पुणे विद्यापीठ

२२. ढेरे आर. व्ही., २००५, भोर संस्थान (१६९० ते १९४८), सुयश प्रकाशन, पुणे

२३. देव दिनकर विनायक, १९३४, भोर संस्थान वार्षिक, सूर्यकांत प्रकाशन, भोर

२४. देव शांताराम भालचंद्र, १९७६, पुरातत्त्व विद्या, महाराष्ट्र विद्यापीठ ग्रंथनिर्मिती मंडळ, पुणे ३०

२५. देशपांडे अ. ना., १९७३,प्राचीन मराठी वाङ्मयाचा इतिहास, खंड १, व्हिनस प्रकाशन, पुणे ३०

२६. देशपांडे प्र. न., २००५,आज्ञापत्र, मराठेशाहीतील राजनिती, स्नेहवर्धन पब्लिशिंग हाऊस क्र. ५२२, पुणे

२७. देशपांडे सौरभ अनंत, २०११, अमात्यांचे आज्ञापत्र आणि भारतीय संविधान, गो. नि. दांडेकर प्रकाशन, पुणे ९

२८. देशमुख विश्वासराव, २००४, मालोजी राजे, फलटण-सातारा, प्रकाशक श्रीमंत मालोजी राजे स्मृति प्रतिष्ठान, फलटण

२९. दीक्षित नि. सी., २०१४, छत्रपती आणि पेशवा, पिंपळपुरे अॅन्ड पब्लिकेशन्स्, नागपूर - ३२

३०. दीक्षित स. का., १९६०, प्राचीन भारतीय संस्कृती, मध्यप्रदेश, प्रकाशक मोघे दा. ना., कोल्हापूर

३१. नरवणे एम. एन., १९९५, फोर्टस् ऑफ महाराष्ट्र, ए. पी. एच. पब्लिसिंग कार्पोरेशन, दिल्ली

३२. पारसनिस दत्तात्रय बळवंत, १९१५, परशुराम त्रिंबक प्रतिनिधी यांचे चरित्र, ज्ञान प्रकाशन, पुणे

३३. पिंगळे वि. दा., २००४, लोकशाही अण्णाभाऊ साठे, प्रकाशक कदम शैलेंद्र सुरेश, भक्ती सुगंध प्रकाशन, पुणे ४१

३४. पोतनिस दामोदर बाळकृष्ण, १९४०, सचिवशाहींची पाच वर्षे, प्रकाशक सातवळेकर श्रीपाद दामोदर, औंध

३५. पंत आप्पा, १९८६, मुलूखावेगळा राजा, महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ, मुंबई, मा. देशमुख सूर्यकांत आणि मानसन्मान प्रकाशन, पुणे

३६. पांडे श्रीनिवास, सुरेश गोंधळे, नंदकुमार मेगदे, २०१३,प्राचीन महाराष्ट्र परंपरा आणि समृध्दी, रश्मी पब्लिकेशन, नांदेड(प्राचीन महाराष्ट्राची प्रशासन परंपरा, शेळके जी. एस., नांदेड यांच्या लेखातून.)

३७. बनहट्टी श्री. ना., १९६१, आज्ञापत्र, सुविचार प्रकाशन मंडळ, धतोली, नागपूर -१२

३८. बारलिंगे सुरेश, १९८६, मुलूखावेगळा राजा, महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ, (अध्यक्ष), प्रस्तावनेचा सारांश

३९. बावडेकर न. वा., ढिगे श्री. शं., १९३४, भोर संस्थान वार्षिक, भोर संस्थान प्रकाशन, सूर्यकांत भोर, ढेव ना. वि., (भोर संस्थानातील किल्ले)

४०. बेंद्रे वा.सी., १९६७, मालोजीराजे आणि शहाजीराजे, प्रकाशक बेंद्रे वा. सी., मुंबई

४१. बेंद्रे वा. सी., १९७५, छत्रपती राजाराम महाराज आणि नेतृत्त्वहिन हिंदवी स्वराज्याचा मोगलांशी झगडा, घाणेकर एच. के., मुंबई

४२. भावे वासुदेव कृष्ण, १९५७, शिवराज्य व शिवकाल, (शिवकालीन महाराष्ट्र), भावे नारायण वासुदेव, पुणे २

४३. भागवत अ. ना. व आठले कृष्णाजी नारायण, १९१५, साताऱ्याच्या प्रतिनिधी घराण्याचा इतिहास, ग्रंथ क्र. १, प्रकाशन औंध संस्थानचे छापखान्यात, औंध

४४. भागवत अ. ना., १९०३, भोर संस्थानचा इतिहास, ज्ञान प्रकाशन, पुणे ३०

४५. भागवत अ. ना., १९०३, भोर संस्थानचा इतिहास, खंड दुसरा, ज्ञान प्रकाशन छापखाना, भोर

४६. भागवत अ. ना., १९०३, भोर संस्थानचा इतिहास, खंड क्र. ३ व खंड क्र. ४, ज्ञान प्रकाशन छापखाना, भोर

४७. भिडे विष्णू गोपाळ, १८६६, साताऱ्याचे श्रीमंत छ. शिवाजी महाराज यांचे प्रतिनिधी आणि अष्टप्रधान यांचा इतिहास, प्रकाशक भिडे वि. गो., भोर

४८. भोसले जालिंदर, २००१, १६८० ते १८१८ मराठ्यांचा इतिहास, पुणे विद्यापीठ, मुरलीधर प्रकाशन, पुणे ४

४९. मक्कदुम दामोदर, २०१४, स्वराज्याचे शूर सेनानी, मराठी देशा फाऊंडेशन, कोल्हापूर

५०. मल्हार - रामराव चिटणीसकृत छत्रपती राजाराम महाराजांची बखर आणि थोरले राजाराम महाराज यांचे चरित्र, १९६३, प्रस्तावनाकार - श्री. वा. सी. बेंद्रे, संपादक - जुवेकर प्रमोदिनी, पोरबंदर, विशाखा प्रकाशन, पुणे २

५१. मल्हार रामराव चिटणीस, १९६७, शककर्ते श्रीशिवछत्रपती महाराज ह्यांचे समग्रप्रकरणात्मक चरित्र, हेरवाडकर र. वि., व्हीनस प्रकाशन, पुणे २

५२. महाराष्ट्र शासन, १९६३,महाराष्ट्र राज्य गॅझेटिअर, सातारा जिल्हा

५३. माटे म. श्री., २००८,मराठेशाही वास्तु शिल्प (१६५० ते १८५०), कॉन्टिनेन्टल प्रकाशन, कुलकर्णी अनिरूद्ध अनंत, पुणे ३०,

५४. मेहेंदळे वा. प., १९१५, परशुराम त्रिंबक प्रतिनिधी यांचे चरित्र, औंध

५५. रानडे महादेव गोविंद (न्यायमूर्ती), १८९७,मराठ्यांच्या सत्तेचा उत्कर्ष, यांच्या पुस्तकाचे रूपांतर, आपटे मोरेश्वर रामचंद्र, इनामदार रामचंद्र नरसिंह, विजापूरकर विष्णू गोविंद यांनी १९२५ साली केले, प्रकाशक जोशी शंकर नरहर, पुणे २६

५६. रानडे विनायक गोविंद, १९४९,राजा श्रीमंत रघुनाथराव पंडित पंतसचिव यांचे चरित्र, खंड क्र. ४, समर्थ भारत छापखाना, पुणे २

५७. शेणोलीकर ह. श्री. व ढेरेपांडे प्र. ना., १९५६,महाराष्ट्र संस्कृती घडण आणि विकास, प्रकाशक प्रभाकर पाध्ये, पुणे २

५८. शिवदे सदाशिव, २००८,छत्रपती राजाराम ताराराणी, लोकव्रत प्रकाशन, सातारा

५९. शिवदे सदाशिव, २०१२, महाराणी येसूबाई, तृतीय आवृत्ती, स्नेहल प्रकाशन,पुणे १२

६०. सरदार गंगाधर बाळकृष्ण, १९६०,महाराष्ट्र जीवन, परंपरा प्रगती आणि समस्या, प्रकाशक लोखंडे म. द. व जोशी दे. श्री., पुणे

६१. सरदार दिगंबर बाळकृष्ण, १९६०,महाराष्ट्र जीवन, परंपरा, प्रगती आणि समस्या खंड १, जोशी-लोखंडे प्रकाशन, पुणे

६२. सेन सुरेंद्रनाथ यांच्या Administrative System of Maratha, १९२५ यांच्या ग्रंथाचा अनुवाद, डॉ. शिवदे सदाशिव यांनी २०१५ मध्ये केला, स्नेहल प्रकाशक, पुणे

६३. सोवनी अविनाश,१९९८, स्वराज्याचे छत्रपती आणि अष्टप्रधान, पूर्वा प्रकाशन, पुणे २१

६४. हेरवाडकर विनायक रघुनाथ, १९७६, मल्हार रामराव चिटणीस विरचित थोरले शाहू महाराज चरित्र, व्हीनस प्रकाशन, पुणे ३०

परिशिष्ट १

महाराष्ट्राच्या इतिहासाच्या प्रशासन व सांस्कृतिक स्थित्यंतरामध्ये योगदान देणारे महाराष्ट्राचे शिल्पकार

महाराष्ट्राच्या सांस्कृतिक स्थित्यंतराचा विचार करता, विविध क्षेत्रांमध्ये बदल होऊ लागले. हे बदल नित्य परंपरेपेक्षा थोडेसे वेगळे असल्यामुळे त्याकरिता समाजातील जाणत्या व्यक्तींना संघर्ष करावा लागला व त्याचप्रमाणे सामाजिक, सांस्कृतिक बदल होण्याकरिता काही समाजसुधारकांना आपले संपूर्ण आयुष्य अपमान सहन करावा लागला व त्या व्यक्ती गेल्यानंतर त्यांच्या कामाचे मूल्य लोकांना पटले. त्यानंतर सुद्धा सुधारणा झाल्या, औद्योगिक प्रगती झाली. जातिभेद नष्ट होण्यासाठी मदत झाली. जवळजवळ शंभर वर्षे किंबहुना कमी-जास्त प्रमाणात हा सामाजिक व सांस्कृतिक स्थित्यंतराचा काळ झाला. यावरून आपल्याला लक्षात येईल की, समाजातील चुकीच्या रूढी परंपरा यांच्यामध्ये बदल होण्यास अनेकांचे योगदान कायमस्वरूपी आहे. याकरिता विविध क्षेत्रांचा केवळ नामोल्लेख करून आपण या स्थित्यंतराच्या काळाचा अभ्यास करू.

सांस्कृतिक स्थित्यंतरामध्ये महाराष्ट्राच्या इतिहासात शैक्षणिक व सामाजिक क्षेत्रात योगदान देणाऱ्या व्यक्ती

१. जगन्नाथ शंकरशेट (१८०३-१८६७)
   मुंबईतील दानशूर, शिक्षणप्रेमी, सार्वजनिक कार्यकर्ते.
२. बाळ गंगाधरशास्त्री जांभेकर(१८१२-१८४६)
   गणितज्ञ, बहुभाषाभिज्ञ पंडित, संशोधक, वृत्तपत्रकार, समाजसुधारक
३. दादोबा पांडुरंग तर्खडक (१८१४-१८८२)
   व्याकरणकार, धर्मतत्त्वविवेचक, समाजसुधारक
४. भाऊ महाजन(१८१५-१८९०) संपूर्ण नाव : गोविंद विठ्ठल महाजन
   स्वतंत्र्य बाण्याचे कर्तबगार पत्रपंडित
५. लोकहितवादी (१८२३-१८९२) संपूर्ण नाव : गोपाळ हरि देशमुख
   मध्ययुगीन मूल्यांवर प्रहार करून समाजाला आधुनिक काळांतील नव्या प्रेरणांची ओळख करून देणारे विचारवंत
६. कृष्णशास्त्री चिपळूणकर(१८२४-१८७८)
   संपूर्ण नाव : कृष्ण हरि चिपळूणकर

संस्कृत विद्येत पारंगत, भाषाप्रभू, उत्कृष्ट गद्य-लेखक, कवी, वक्ते.

७. विष्णुबाबा ब्रह्मचारी(१८२७-१८७१)

संपूर्ण नाव : विष्णु भिकाजीगोखले

वैदिक धर्माचे अभिमानी, समाज-सुधारक, ख्रिस्ती धर्मोपदेशकांना

नामोहरम करणारे वादकुशलवक्ते

८. ज्योतिराव गोंविद फुले(१८२७-१८९०)

सामाजिक गुलामगिरीविरुध्द झगडण्यास लोकांना प्रवृत्त करणारे बहुजन समाजातील प्रभावी कार्यकर्ते.

९. विष्णु परशुरामशास्त्री पंडित (१८२७-१८७६)

कर्ते समाज - सुधारक

१०. सार्वजनिक काका (१८२८-१८८०)

संपूर्ण नाव : गणेश वासुदेव जोशी

सार्वजनिक सभेचे संस्थापक, स्वदेशीचे पुरस्कर्ते.

११. ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराज (१८४७-१९१२)

बहुजन समाजाच्या एकत्र पंगती बसवून जातीभेद दूर केला, पारंपारिक कर्मकांडाला बाजूला ठेवून नामस्मरणात परमेश्वर प्राप्ती या त्यांच्या कार्यामध्ये सांस्कृतिक स्थित्यंतरात भर पडली.

१२. डॉ. कुर्तकोटी Shankaracharya Swami Vidya Shankar Bharati (Dr. Kurtkoti)

१८८८ – १९६७ करवीरपीठाचे शंकराचार्य पदाचा त्याग करून अस्पृश्य समाजात जाऊन त्यांच्यामध्ये जागृती केली, टिळक महाराष्ट्र विद्यापीठाचे संस्थापक सदस्य म्हणून महत्त्वाचे कार्य केले

१३. गुलाब गोंढीजी मोहळ (१८८१-१९१७)

मराठवाड्यामध्ये अंधश्रद्धा निर्मुलनाचे कार्य करून सामाजिक स्थित्यंतराच्या काळात महत्त्वाची भर टाकली. १३८ ग्रंथाची निर्मीती केली

१४. शंकर महाराज (महानिर्वाण १९४८)

निरनिराळ्या पंथातील भक्ती मार्गाला एकत्र आणून जनजागृती केली, या त्यांच्या भक्तीमार्गामुळे समाजातील अस्पृश्यता, जाती-पंथ-धर्म भेद कमी झाला.

सांस्कृतिक स्थित्यंतरामध्ये महाराष्ट्राच्या इतिहासात राजकीय क्षेत्रात योगदान देणाऱ्या व्यक्ती

१७. दादाभाई नौरोजी(१८२७-१९१७)

ऋषितुल्य राजकीय नेते, अर्थशास्त्रज्ञ.

१६. विश्वनाथ नारायण मंडलिक (१८३३-१८८९)

प्रख्यात कायदेपंडित, जुन्या परंपरेचे अभिमानी, ग्रंथकार, सार्वजनिक कार्यकर्ते.

१७. महादेव गोविंद रानडे (१८४२-१९०१)

महाराष्ट्रातील उदार मतवादाचे आद्यप्रवर्तक, संस्थात्मक जीवनाचे प्रनेते, अर्थशास्त्रज्ञ

१८. बहुद्दिन तय्यबजी (१८४४-१९०६)

राष्ट्रीय वृत्तीचे राजकीय कार्यकर्ते.

१९. फिरोजशहा मेहता(१८४७-१९१५)

बाणेदार, प्रभावशाली राजकीय नेते.

२०. काशीनाथ त्र्यंबक तेलंग(१८७०-१८९३)

कायदेपंडीत, राजकीय नेते, प्राच्यविद्या विमर्शक

२१. गोपाळ कृष्ण गोखले(१८६६-१९१५)

नेमस्त पक्षाचे अध्वर्यू

२२. वासुदेव बळवंत फडके (१८४५-१८८३)

सशस्त्र क्रांतिकारक.

सांस्कृतिक स्थित्यंतरामध्ये महाराष्ट्राच्या इतिहासात राजकीय व बौध्दिक क्षेत्रात योगदान देणाऱ्या व्यक्ती

२३. विष्णू कृष्ण चिपळूणकर(१८७०-१८८२)

महाराष्ट्रात स्वत्व-भावनेचज्योत प्रज्ज्वलित करणारे देशभक्त आणि प्रतिभा संपन्न साहित्यिक

२४. गणेश कृष्ण खापर्डे(१८७४-१९३८)

राजकीय कार्यकर्ते, नामांकित वक्ते

२५. गोपाळ गणेश आगरकर(१८७६-१८९५)

व्यक्तिवाद आणि बुद्धिवाद यांचा पुरस्कार करणारे द्रष्टे सुधारक, देशभक्त, संपादक.

२६. लोकमान्य टिळक (१८७६-१९२०)

संपूर्ण नाव : बाळ गंगाधर टिळक

भारतीय राजकारणातील जहाल पक्षाचे प्रमुख नेते, संपादक, तत्त्वज्ञ, प्राच्यविद्या-संशोधक.

२७. सरदार वल्लभाई पटेल (१८७५-१९५०)

सरदार पटेलांनी सर्व संस्थाने भारतीय राज्यव्यवस्थेत विलीन केली.

सांस्कृतिक स्थित्यंतरामध्ये महाराष्ट्राच्या इतिहासात प्रसार माध्यमांच्या क्षेत्रात योगदान देणाऱ्या व्यक्ती

२८. शिवराम महादेव परांजपे(१८६४-१९२९)

प्रतिभाशाली लेखक आणि वक्ते, वृत्तपत्रकार, राष्ट्रीय जहाल पक्षाचे प्रभावी प्रवक्ते.

२९. नरसिंह चिंतामण केळकर(१८७२-१९४७)

आदर्श संपादक, चतुरस्त्र लेखक, टिळक संप्रदायातील राजकीय कार्यकर्ते, समाजसुधारक

३०. बाळकृष्ण शिवराम मुंजे(१८७२-१९४८)

हिंदुत्वनिष्ठ राजकीय कार्यकर्ते, लष्करी शिक्षणाचे पुरस्कर्ते

३१. मुकुंदराव रामराव जयकर(१८७३-१९५९)

प्रख्यात कायदेपंडित, विधायक दृष्टीचे सार्वजनिक कार्यकर्ते, इंग्रजी भाषेतील नावाजलेले वक्ते.

सांस्कृतिक स्थित्यंतरामध्ये महाराष्ट्राच्या इतिहासात सामाजिक हक्काच्या स्वरूपात योगदान देणाऱ्या व्यक्ती

३२. भीमरावरामजी आंबेडकर(सपकाळ) (१८९३-१९५६)

हरिजन समाजाचे कर्तबगार व यशस्वीनेते, घटना पंडित, व्यासंगी विचारवंत.

३३. आचार्य जावडेकर(१८९४-१९७७)

संपूर्ण नाव : शंकरदत्तात्रय जावडेकर

आधुनिक भारतातील वेगवेगळ्या विचार प्रणालीची आणि घडामोडींची मीमांसा करणारे समन्वयशील विचारवंत, ग्रंथकार, वृत्तपत्रकार.

३४. केशवराव मारुतराव जेधे(१८९६-१९५९)

बहुजन समाजांच्या हितासाठी झगडणारे राष्ट्रीय वृत्तीचे लोकप्रिय पुढारी

३५. साने गुरुजी(१८९९-१९५०)

संपूर्ण नाव : पांडुरंग सदाशिव साने

भावनाप्रधान, ध्येयवादी, साहित्यिक आणि समाजवादी प्रवृत्तीचे निष्ठावंत कार्यकर्ते.

३६. युसुफ जे. मेहरअल्ली(१९०३-१९५०)

युवक संघटनेच्या चळवळीतील प्रमुखनेते, काँग्रेस सोशालिस्ट पक्षाचे एक आधारस्तंभ

३७. नारायण मेघाजी लोखंडे (१८४८-१८९७)

सत्यशोधक समाजातील एक प्रसिद्ध कार्यकर्ते, मुंबई प्रांतातील कामगार संघटनेच्या चळवळीचे आद्यप्रवर्तक.

३८. कृष्णराव पांडुरंग भालेकर(१८७०-१९१०)

शेतकऱ्यांच्या प्रश्नांत तन्मयतेने लक्ष घालणारे वृत्तपत्रकार, वक्ते व कार्यकर्ते.

३९. पंडिता रमाबाई (१८७८-१९२२)

संपूर्ण नाव : पंडिता रमाबाई डोंगरे

स्त्रीशिक्षणाच्या कार्याचा धडाडीने पुरस्कार करणाऱ्या ख्रिश्चन विदुषी.

४०. विठ्ठल रामजी शिंदे(१८७३-१९४४)

अस्पृश्योद्धाराच्या कार्याला वाहून घेणारे समाजसुधारक.

४१. नारायण मल्लार जोशी(१८७९-१९७७)

कामगारांचे पुढारी

४२. श्रीपाद महादेव माटे (१८८६-१९७७)

समाजसुधारक, साहित्यसेवक, वक्ते

४३. कर्मवीर भाऊराव पाटील(१८८७-१९७१)

संपूर्ण नाव : भाऊराव पायगौंडा पाटील

बहुजन समाजाच्या शैक्षणिक प्रगतीसाठी आटोकाट प्रयत्न करणारे संघटन कुशल कार्यकर्ते.

४४. लोकशाही आण्णाभाऊ साठे (१९२०-१९६९)

सामाजिक हक्क मिळविण्याकरिता केलेला संघर्ष

४५. केशव बळीराम हेगडेवार(१८९०-१९४०)

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे जनक, सामाजिक समानता आणण्यासाठी केलेले विशेष प्रयत्न

४६. विनायक दामोदर सावरकर (१८८३-१९६६)

एक विशिष्ट तत्त्वज्ञान मांडणारे तत्त्वज्ञ, विज्ञानाचा पुरस्कार व जातिभेदाला तीव्र विरोध करणारे समाज क्रांतिकारक, भाषाशुद्धी व लिपिशुद्धी ह्या चळवळींचे प्रणेते, प्रतिभावंत साहित्यिक आणि प्रचारक असे अनेक पैलू सावरकरांच्या व्यक्तिमत्त्वाला होते.

सांस्कृतिक स्थित्यंतरामध्ये महाराष्ट्राच्या इतिहासात साहित्य क्षेत्रात योगदान देणाऱ्या व्यक्ती

४७. विष्णू बुवा जोग(१८६४-१९२०)

महाराष्ट्रातील भागवत धर्माचे उपासक व प्रचारक, मल्लविद्या विशारद.

४८. धर्मानंद ओसंबी(१८७३-१९४७)

बौद्धधर्माचे अभ्यासक व मर्मग्राही प्रवक्ते

४९. वासुदेव महादेव अभ्यंकर(१८६३-१९४२)

जुन्या परंपरेतील व्युत्पन्न पंडित

५०. केवलानंद सरस्वती(१८७७-१९७४)

पूर्वाआश्रमीचे नाव : नारायणशास्त्री मराठे

तत्त्वचिंतक, मीमांसक, समाजसुधारक.

५१. केशव लक्ष्मण दप्तरी(१८८०-१९७६)

जुन्या धर्मग्रंथाचे आधुनिक दृष्टीने विवरण करणारे भाष्यकार

५२. वामन मल्हार जोशी(१८८२-१९४३)

तत्त्वचिंतक, कादंबरीकार, साहित्य मीमांसक, देशभक्त व समाजसुधारक.

५३. श्रीधर व्यंकटेश केतकर(१८८४-१९३७)

ज्ञानकोषकार, संशोधक, समाजशास्त्रज्ञ, कादंबरीकार, स्वतंत्र बुद्धीचे विचारवंत

५४. रामचंद्रदत्तात्रेय रानडे(१८८६-१९५७)

तत्त्वज्ञ, लेखक, संतवाङ्मयाचे अधिकारीप्रवक्ते.

सांस्कृतिक स्थित्यंतरामध्ये महाराष्ट्राच्या इतिहासात प्राच्यविद्या व संस्कृत भाषेच्या क्षेत्रात योगदान देणाऱ्या व्यक्ती

५५. भाऊ दाजीलाड(१८२१-१९७४)

संपूर्ण नाव : रामकृष्ण विठ्ठल लाड

संशोधक, सार्वजनिक कार्यकर्ते.

५६. महादेव मोरेश्वर कुंटे (१८३५-१९८८)

कवि, भारतीय तत्त्वज्ञानआणि संस्कृती यांचे व्यासंगी समीक्षक

५७. रामकृष्ण गोपाळ भांडारकर(१८३७-१९२५)

प्राच्यविद्या संशोधक, प्रार्थना समाजाचे अध्वर्यू, समाजसुधारक.

७८. राजारामशास्त्री भागवत(१८७१-१९०८)

संपूर्ण नाव : राजाराम रामकृष्ण भागवत

समाजसुधारक, व्यासंगी विचारवंत

७९. वामन शिवराम आपटे (१८७८-१८९२)

संस्कृत भाषेचे पंडित, कोशकर, शिक्षण क्षेत्रातील कार्यकर्ते.

६०. चिंतामण विनायक वैद्य(१८६१-१९३८)

प्राचीन आणि मध्ययुगीन इतिहासाचे अभ्यासक, संशोधक व समीक्षक

६१. विष्णू सिताराम सुखटणकर(१८८७-१९४३)

भांडारकर ओरिएन्टल रिसर्च इन्स्टिट्यूट तर्फे प्रसिद्धहोतअसलेल्या महाभारताच्या चिकित्सक आवृत्तीच्या कार्यपध्दतीचे प्रणेते

६२. अनंत सदाशिव आळतेकर(१८९८-१९७९)

इतिहाससंशोधक

६३. काशिनाथ नारायण साने(१८७०-१९२७)

जुन्या बखर ग्रंथाचे संशोधक व संपादक

६४. वासुदेव वामन खरे(१८७८-१९२४)

कवि, नाटककार, इतिहाससंशोधक, चिकित्सक विचारवंत

६५. विश्वनाथ काशिनाथ राजवाडे (१८६३-१९२६)

स्वतंत्र प्रज्ञेचे इतिहास संशोधक व वाङ्मयसेवक

६६. गोविंद सखाराम सरदेसाई (१८६७-१९७९)

सुप्रसिध्द इतिहासकार

सांस्कृतिक स्थित्यंतरामध्ये महाराष्ट्राच्या इतिहासात गणित, शास्त्र व वाङ्.मय माध्यमाच्या क्षेत्रात योगदान देणाऱ्या व्यक्ती

६७. विनायक लक्ष्मण भावे(१८७१-१९२६)

जुन्या मराठी वाङ्मयाचे संशोधक, वाङ्मयेतिहास लेखक

६८. शंकर श्रीकृष्ण देव(१८७१-१९७८)

रामदासी वाङ्.मयाचे संग्राहक, अभ्यासक व प्रचारक

६९. लक्ष्मण रामचंद्र पांगारकर(१८७२-१९४१)

संत वाङ्मयाचे अभ्यासक, रससिद्ध लेखक आणि वक्ते

७०. केरोलक्ष्मण छत्रे(१८२४-१८८४)

गणित व सृष्टी विज्ञान यांचे गाढे अभ्यासक

७१. शंकर बाळकृष्ण दीक्षित(१८७३-१८९८)

पाश्चात्य व पौरस्त्य गणित ज्योतिषाचेअभ्यासक व लेखक

७२. शंकर आबाजी भिसे (१८६७-१९३५)

अंतरराष्ट्रीय किर्तीचे रसायनशास्त्राचे संशोधक

७३. सयाजीराव खंडेराव गायकवाड(१८६३-१९३८)

राज्यव्यवस्था, लोकसंग्रह आणि ज्ञानप्रसार या तीन्हीबाबत प्रगतीशिल धोरण ठेवणारे संस्थानिक

७४. छत्रपतीशाहू महाराज (१८७४-१९२२)

बहुजन समाजात शिक्षणाचा प्रसार व्हावा, म्हणून प्रयत्न करणारे संस्थानिक, दलितोद्धारक, समाजसुधारक

७५. लक्ष्मण काशीनाथ किर्लोस्कर (१८६९-१९५६)

सुप्रसिध्द कारखानदार

७६. विठ्ठलदास दामोदर ठाकरसी (१८७३-१९२१)

प्रख्यात व्यापारी, नाणकशास्त्रज्ञ, दानशूर, धर्मनिष्ठ

७७. रामचंद्र भिकाजी गुंजीकर (१८४३-१९०१)

संपादक, कादंबरीकार, विविध विषयांचे चिकित्सक अभ्यासक.

७८. अच्युत बळवंत कोल्हटकर (१८७९-१९३१)

दैनिक वृत्तपत्रास लोकप्रियता मिळवून देणारे कुशल संपादक, चतुरस्त्र लेखक आणि वक्ते.

७९. गोपाळ अनंत ओगले (१८७९-१९४५)

यशस्वी संपादक, शैक्षणिक व औद्योगिक क्षेत्रांतील कार्यकर्ते.

सांस्कृतिक स्थित्यंतरामध्ये महाराष्ट्राच्या इतिहासात संगीत, नाट्य क्षेत्रात योगदान देणाऱ्या व्यक्ती

८०. विष्णुदास भावे (१८१९-१९०२)

संपूर्ण नाव : विष्णु अमृत भावे

मराठी रंगभूमीचे जनक.

८१. अण्णासाहेब किर्लोस्कर (१८४३-१८८७)

संपूर्ण नाव : बळवंत पांडुरंग किर्लोस्कर

मराठी रंगभूमीचा कायापालट घडवून आणणारे नाटककार आणि दिग्दर्शक.

८२. नारायण बापूजी कानिटकर (१८७२-१८९७)

लोकप्रिय प्रहसनकार

८३. गोविंद बल्लाळ देवल (१८७४-१९१६)

नाटककार व नाट्यशिक्षक

८४. श्रीपाद कृष्ण कोल्हटकर (१८७१-१९३४)

विनोदी वाङ्मयाचे आद्यप्रवर्तक, टीकाकार, नाटककार.

८५. कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर (१८७२-१९४८)

प्रभावी नाटककार, देशभक्त, वृत्तपत्रकार

८६. राम गणेश गडकरी (१८८५-१९१९)

प्रतिभासंपन्न कवी, नाटककार व विनोदी लेखक.

८७. हरि नारायण आपटे (१८६४-१९१९)

मराठीतील सर्वश्रेष्ठ कादंबरीकार

८८. केशवसुत (१८६६-१९०५)

संपूर्ण नाव : कृष्णाजी केशव दामले

आधुनिक भाव-काव्याचे जनक, नव्या युगात तुतारी फुंकणारे कविकुलगुरू

८९. बालकवी (१८९०-१९१८)

संपूर्ण नाव : त्र्यंबक बापूजी ठोमरे

अद्भुतरम्य कल्पनासृष्टींत सदैव रंगून जाणारे सौंदर्यवादी कवी

९०. बाळ सीताराम मर्ढेकर (१९०९-१९७६)

नवकाव्याच्या परंपरेचे एक प्रमुख प्रतिनिधी, कलातत्त्व-मीमांसक

९१. बाळकृष्णबुवा इचलकरंजीकर (१८४९-१९२७)

अव्वल दर्जाचे गायक, संगीतशास्त्रवक्ते.

१०. अलादिया खाँ (१८७७-१९४६)

प्रथम श्रेणींतील गायक

११. भास्करबुवा रघुनाथ बखले (१८७०-१९२२)

पट्टीचे गायक, संगीतविद्येचे अभ्यासक

१२. विष्णू दिगंबर पलुस्कर (१८७२-१९३१)

संगीत-क्षेत्रांतील कल्पक व संघटनाकुशल कार्यकर्ते, सुप्रसिद्ध गायक

१३. विष्णू नारायण भातखंडे (१८७५-१९३६)

भारतीय संगीताचे संकलनकार व समीक्षक

१४. गोविंद सदाशिव टेंबे (१८८१-१९७५)

संगीतकलेचे मर्मज्ञ टीकाकार, नट, नाटककार

१५. अब्दुल करीमखाँ (१८८४-१९३८)

स्वरमाधुर्याने श्रोत्यांना तल्लीन करून सोडणारे प्रथितयश गायक

१६. पठ्ठे बापूराव (१८६५-१९४५)

संपूर्ण नाव : श्रीधर कृष्ण कुलकर्णी

प्रसिध्द लावणीकार

१७. भाऊराव कोल्हटकर (१८६३-१९०१)

सुविख्यात संगीत नट

१८. गणपतराव जोशी (१८६७-१९२२)

संपूर्ण नाव : गणेश कृष्ण जोशी

आपल्या अभिनय चातुर्याने गद्य-नाटकें यशस्वी करणारे प्रभावी नट

१९. दादासाहेब फाळके (१८७०-१९४४)

संपूर्ण नाव : धुंडिराज गोविंद फाळके

हिंदी चित्रपटसृष्टीचे जनक

१००. बाबूराव पेंटर (१८९२-१९५४)

संपूर्ण नाव : बाबूराव कृष्णाजी मिस्त्री

अभिजात चित्रकार, चित्रपट सृष्टींतील कल्पक कार्यकर्ते

सांस्कृतिक स्थित्यंतरामध्ये महाराष्ट्राच्या इतिहासात मुद्रण, खेळ व आयुर्वेद क्षेत्रात योगदान देणाऱ्या व्यक्ती

१०१. महादेव विश्वनाथ धुरंधर (१८७१-१९४४)

प्रसिध्द चित्रकार

१०२. आवजी ढाढाजी चौधरी (१८३९-१८९२)

मुद्रणकलाविशारद

१०३. शंकर ढाजीशास्त्री पदे (१८६७-१९१०)

अखिल भारतीय आयुर्वेद महामंडळाचे संस्थापक

१०४. अच्युतानंद स्वामी (१८३९-१८९९)

संपूर्ण नाव : ढामोढर रामकृष्ण मोघे

मल्लविद्येचे उपासक व प्रचारक

१०५. विष्णुपंत मोरोपंत छत्रे (१८४०-१९०६)

भारतातील सर्कस व्यवसायाचे आद्यप्रवर्तक, संगीतशास्त्रज्ञ

चित्र क्रमांक १.१



जगन्नाथ शंकरशेट

अनु क्र: १

चित्र क्रमांक १.२



बाळ गंगाधरशास्त्री जांभेकर

अनु क्र: २

चित्र क्रमांक १.३



ढाढोबा पांडुरंग तर्खडकर

अनु क्र: ३

चित्र क्रमांक १.४



लोकहितवादी

अनु क्र: ५

चित्र क्रमांक १.५



कृष्णशास्त्री चिपळूणकर

अनु क्र: ६


चित्र क्रमांक १.६



ज्योतिराव गोंविद फुल

अनु क्र: ८

चित्र क्रमांक १.७



सार्वजनिक काका

अन् क्र: १०


चित्र क्रमांक १.८



गोंढवलेकर महाराज

अनु क्र: ११


चित्र क्रमांक १.९



डॉ. कुर्तकोटी

अन क· १२


चित्र क्रमांक १.१०



गुलाब गोंढीजी मोहळ

अन् क्र: १३

चित्र क्रमांक १.११



शंकर महाराज

अन् क्र: १४

चित्र क्रमांक १.१२



ढादाभाई नौरोजी

अनु क्र: १५

चित्र क्रमांक १.१३



महादेव गोविंद रानडे

अनु क्र: १७

चित्र क्रमांक १.१४



फिरोजशहा मेहता

अनु क्र: १९


चित्र क्रमांक १.१५



काशीनाथ तेलंग

अनु क्र: २०


चित्र क्रमांक १.१६



कर्मवीर भाऊराव पाटील, संत गाडगे महाराज ,भीमरावरामजी आंबेडकर

अनु क्र: ३१

चित्र क्रमांक १.१७



विष्णू कृष्ण चिपळूणकर

अनु क्र: २३

चित्र क्रमांक १.१८



लोकमान्य टिळक

अनु क्र: २६

चित्र क्रमांक १.१९



लोकशाहीर आण्णाभाऊ

साठे अनु क्र: ४३

चित्र क्रमांक १.२०



केशव बळीराम

हेगडेवार अनु क्र: ४४

चित्र क्रमांक १.२१



भाऊ ढाजीलाड

अनु क्र: ५३

चित्र क्रमांक १.२२



रामकृष्ण भांडारकर

अनु क्र: ५५

चित्र क्रमांक १.२३



छत्रपतीशाहू महाराज

अन क्र: ७२

चित्र क्रमांक १.२४




विनायक ढामोढर

सावरकर

अनु क्र: ४६

चित्र क्रमांक १.२५



सरढार वल्लभभाई पटेल

अनु क्र: २७